चिंगीज ऐत्मातोव

तीन कादंबरिका

*

लालरुमालातला चिनार

*

दुईशेन मास्तर

*

धरतीमाता

प्रगती प्रकाशन मॉस्को



चिंघिज ऐत्मातोव

तीन कादंबरिका

*

प्रगती प्रकाशन
मॉस्को

अनुवादक : अनिल हवालदार

चित्रकार : वालेन्तीन कश्लोव

Чингиз Айтматов

ПОВЕСТИ ГОР И СТЕПЕЙ

На языке маратхи

सोविएत संघात मुद्रित

A $\frac{70303-1245}{014(01)-76}$ 831—75

लाल
रुमालातला
चिनार

प्रस्तावनेऐवजी

माझ्या वृत्तपत्रीय कामगिरीसाठी तिएन शान प्रदेशात मला अनेक वेळा जाण्याचा प्रसंग येई. वसंतामधले दिवस. त्यावेळी मी नारीन या प्रादेशिक केंद्राच्या ठिकाणी होतो आणि माझ्या मुख्य कचेरीकडून मला तातडीचे बोलावणे आले. अगदी थोडक्या मिनिटांनी माझी बस चुकली व पुढची बस सुमारे पाच तासांनंतर होती. आता जाणायेणाऱ्या मोटरीं-पैकी एखादी पकडून प्रवास करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. म्हणून त्या छोटया गावालगत जाणाऱ्या हमरस्त्यापर्यंत मी चालत चालत गेलो.

कोपऱ्यावर मी वळलो आणि पेट्रोल पंपाशी एक लॉरी उभी असलेली मी पाहिली. पेट्रोल भरून झाले असावे, कारण ड्रायव्हर टाकीचे बूच बसवीत होता. माझे नशीब जोरावर आहे असे वाटले. दर्शनी काचेवर सोविएत संघ अशी ठळक अक्षरे होती. त्याचा अर्थ ही लॉरी आंतरराष्ट्रीय मार्गावर वाहतूक करणारी होती. ती बहुधा चीनकडून आली असावी

व रिबाच्येमधील आंतरराष्ट्रीय डेपोकडे चालली असावी. तेथून फ्रुन्झेला जाणे सोपे होते.

"काय आत्ताच निघणार काय?" मी ड्रायव्हरला विचारले. "रिबाच्येपर्यंत घेऊन चलता का मला?"

तो वळला आणि त्या ओणव्या अवस्थेतच त्याने एकवार माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकला. मग तो सरळ उभा राहिला.

"नाही भाऊसाहेब, मला आपल्याला नेता येणार नाही," त्याने शांतपणे सांगितले.

"खरंच नेणार नाही? हे पहा, मला फ्रुन्झेला तातडीचं बोलावणं आलंय आणि काम तसंच महत्त्वाचं आहे."

ड्रायव्हरने पुन्हा एकदा खिन्नपणे माझ्याकडे पाहिले.

"भाऊसाहेब, तुमचं काम महत्त्वाचं असणार हे मला समजतं. पण मला माफी करा, मी कुणालाही बरोबर नेऊ शकत नाही."

मी चकरावलो. लॉरीत जागा तर होती, मग तो मला मदत का करीत नव्हता?

"मी पत्रकार आहे, माझं काम अत्यंत तातडीचं आहे. तुम्ही मागाल तेवढे पैसे देईन."

"पैशाचा प्रश्न नाही भाऊसाहेब," त्याने माझे बोलणे मध्येच तोडले व पुढच्या टायरवर रागाने एक जोरात लाथ हाणली. "पुढच्या वेळी मी तुम्हाला फुकट घेऊन जाईन. पण आत्ता मात्र... मला जमणार नाही. राग धरू नका भाऊसाहेब. आमच्या बऱ्याच गाड्या लौकरच इथं येतील आणि त्यांच्यापैकी कुणीही तुम्हाला घेऊन जाईल. पण मला जमणार नाही."

वाटेत कुणालातरी घेण्यासाठी पुढची सीट तो राखून ठेवीत होता हे स्पष्ट झाले होते.

"मी मागे बसलो तर?" मी विचारले.

"नाही भाऊसाहेब, मला माफ करा."

कपाळाला आठ्या घालीत त्याने घड्याळावर एकवार चिंताग्रस्त नजर टाकली.

मी पुरा गोंधळून गेलो. खांदे उडवून मी एकवार पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या त्या वयस्क रशियन बाईकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. एवढा वेळपर्यंत ती आमच्यामधील संवाद शांतपणे आपल्या छोट्या खिडकीमधून ऐकत होती. मान हलवून ती मला म्हणाली: "त्याला त्रास देऊ नका, त्याला जाऊ दे एकट्याला." मला अधिकच आश्चर्य वाटले.

ड्रायव्हर लॉरीत बसला, त्याने तोंडात सिगरेट धरली आणि ती न पेटवताच इंजिन चालू केले. तिशीच्या आसपास त्याचे वय असावे. उंची चांगली होती, पण किंचित पोक होते. चाक धरलेल्या त्याच्या भल्यामोठ्या हाताच्या पंजांनी व जडावलेल्या पापण्यांच्या त्याच्या डोळ्यांनी माझे लक्ष वेधून घेतले. क्लच टाकण्यापूर्वी त्याने तळहाताने आपला चेहरा खसाखसा चोळला, एक उसासा टाकला व डोळे किलकिले करून समोरच्या पहाडी मार्गाकडे धास्तावल्या नजरेने पाहिले.

तो लॉरी घेऊन निघून गेला.

"चिंता करू नका, लौकरच आणखी काही गाड्या येतील," पेट्रोल पंपावरची बाई बाहेर येता येता म्हणाली.

मी काहीच बोललो नाही.

"तो गरीब बिचारा फार अडचणीत सापडलाय. फार मोठी कहाणी आहे ती... एकेकाळी इथल्या आंतरराष्ट्रीय वाहतूक तळावर तो रहायचा..."

मला पुढची कथा ऐकायची संधीच मिळाली नाही, कारण तेवढ्यात एक गाडी आली.

दोलन खिंडीजवळ ती लॉरी आमच्या दृष्टीला पडली. तिएन शानचे ड्रायव्हर बेफाम गाडी हाकण्याबद्दल प्रसिद्ध आहेत, पण ती लॉरी त्याहूनही वरताण वेगाने धावत होती. वळणावर जराही वेग कमी न करता ती लॉरी त्या उभ्या कड्यांखालच्या रस्त्यावरून रोरावत चालली होती, चढांवर झेपावत होती, दऱ्यांमधील उतारांवर सुसाट धावत होती आणि पुन्हा एकवार आमच्या दृष्टीपथात येत होती. तिच्या ताडपत्रीची टोके वाऱ्याने फडफडत होती.

आम्ही तिला मागे टाकले तेव्हा मी वळून कुतूहलाने त्या ड्रायव्हरकडे पाहिले. कोणत्या सूडाच्या भावनांनी तो पेटला होता, अशा बेफाम वेगाने तो कुठे निघाला होता? एकाएकी गारांचे वादळ चालू झाले. पहाडी खिंडींमध्ये असे अनेकदा घडते. त्या धो धो पावसाच्या धारांमधून व गारांच्या वर्षावामधून मला त्या ड्रायव्हरचा फिकुटलेला, ताणलेला चेहरा दिसला. त्याचे हात अत्यंत आत्मविश्वासाने व जलदपणे चाकावरून फिरत होते. लॉरीमध्ये दुसरे कुणीही नव्हते.

त्यानंतर लौकरच मला किर्घिझियाच्या दक्षिणेस ओश प्रदेशात पाठविण्यात आले. आमच्या कामात नेहमीच घडते त्यानुसार अगदी शेवटच्या क्षणी आगगाडी पकडण्याचा प्रसंग

माझ्यावर आला. धावतपळत मी कसाबसा स्टेशनात गाडीच्या वेळेवर पोचलो आणि गाडीत उडी टाकली. माझ्या डब्यात मी माझ्या जागेवर टेकलो तेव्हा शेजारच्या प्रवाशाकडे माझे पटकन लक्ष गेले नाही. तो खिडकीकडे तोंड करून बसला होता आणि गाडीने वेग धरला तरी त्याने नजर डब्यात वळवली नाही.

कोमुझ नावाच्या किर्घिझ वाद्यावरची एक धून रेडिओवर वाजत होती. ती धून मी अनेकवार ऐकलेली होती. ते गाणे ऐकले की, नेहमी माझ्या नजरेसमोर संध्याप्रकाशात स्तेपमधून एकाकी जाणारा घोडेस्वार यायचा. त्याला खूप दूरचा प्रवास करायचा आहे, समोर विस्तीर्ण स्तेप पसरले आहे, निवांत विचार करायला त्याला वेळ आहे आणि आपल्या काळजातल्या भावना हळुवारपणे तो त्या गाण्यामधून व्यक्त करतोय. तो माणूस एकटा असताना विचार करण्यासारख्या अनेक गोष्टी त्याच्याजवळ आहेत आणि त्या नीरव शांततेमध्ये केवळ त्याच्या घोड्याच्या टापांचा तालबद्ध आवाज होतोय. स्वच्छ, गुळगुळीत गोट्यांवर पाण्याच्या लाटांचा ध्वनी उमटतो तशा कोमुझच्या तारा छेडल्या जात होत्या. कोमुझवरचे गाणे म्हणत होते... टेकडीपल्याड सूर्य बुडतोय... साऱ्या मैदानावर थंडगार निळाई हळूच पसरतेय... उन्हाने भाजलेल्या वाटेवर वाऱ्याने थरथरणारा व डोलणारा कडू दवणा नि पिवळ्या तुऱ्यांचे गवत आपले केसर शिंपडताहेत... स्तेप त्या घोडेस्वाराचे गाणे ऐकील, त्याच्याबरोबरच गूजगुंजन करील नि त्याच्याबरोबरच गाणे गाईल...

कदाचित कोणे एके काळी तो घोडेस्वार याच वाटेने

गेला असेल... आणि स्तेपच्या दूर क्षितिजावर सूर्याचा गोळा मावळताना फिकट पिवळा होत गेलेला त्याने आमच्याप्रमाणेच पाहिला असेल... पर्वतशिखरांवरील हिमाने मावळतीची किरणे पकडल्यानंतर क्षणभरच त्याला आलेली गुलाबी छटा आणि दुसऱ्याच क्षणी लाभलेले फिकुटलेपण त्याने पाहिले असेल.

आमचा प्रवास चालू होता. फळबागा, द्राक्षांचे मळे, हिरव्याकंच मक्याची शेते भराभरा मागे पडत होती. नुकत्याच कापलेल्या विलायती गवताच्या भाऱ्यांनी भरलेली दोन घोड्यांची एक गाडी लेव्हल क्रॉसिंगपाशी येऊन उभी राहिली. फाटके जाकीट घातलेला व नडगीच्या वर पँट दुमडलेला, उन्हाने रापलेल्या चेहऱ्याचा त्या गवताच्या गाडीतील पोरगेला तरुण धाडधाड जाणाऱ्या आगगाडीला हसऱ्या मुद्रेने हात हलवून दाखवीत होता.

रेडिओवर वाजणारी ती धून व धावणारी आगगाडी यांची एक सुरेख लय जमली होती. घोड्याच्या टापांऐवजी मला चाकांचा खडखडाट ऐकू येत होता. माझा सहप्रवासी छोट्याशा टेबलावर वाकून, तोंडावर हात झाकून बसला होता. मला उगीचच वाटले की, त्या एकल्या घोडेस्वाराचे गाणे तोसुद्धा आतल्या आत गात असावा. तो दुःखात चूर होता किंवा दिवास्वप्ने पहात होता. यापैकी नक्की तो काय करत होता हे सांगणे मला अवघड होते, पण त्याच्याभोवती एक दुःखाचे वलय पसरलेले जाणवत होते. एका कायम स्वरूपाच्या खिन्नतेने त्याला घेरलेले दिसत होते. तो आपल्या विचारांमध्ये एवढा गढला होता की, त्याला माझे अस्तित्वही

जाणवलेले नव्हते. मी त्याचा चेहरा अधिक बारकाईने पाहण्याचा प्रयत्न केला. त्याला कुठे बरे पूर्वी मी पाहिला होता? त्याचे हातसुद्धा माझ्या परिचयाचे होते—भक्कम, उन्हाने रापलेले हात आणि लांबसडक पातळ बोटे.

आणि मला आठवले: त्या दिवशी मला बरोबर घेऊन जायला नकार देणारा तो लॉरी ड्रायव्हर होता. मी त्याबद्दल जास्त विचार न करता पुस्तक वाचायला घेतले. उगीच पुन्हा कशाला सारे उकरून काढायचे? तो केव्हाच सारे विसरून गेला असणार. काही झाले तरी रस्त्यावर भेटणाऱ्या प्रत्येक माणसाची लॉरी ड्रायव्हर कशी आठवण ठेवणार?

दिवस मावळत चालला होता. अजून आम्ही एक शब्दही बोललो नव्हतो. त्या माणसाने सिगरेटचे पाकीट काढले आणि काडी पेटविण्यापूर्वी एक दीर्घ सुस्कारा टाकला. मग त्याने मान वर केली, माझ्याकडे पाहताच त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटले आणि तो एकदम शरमेने लालबुंद झाला. त्याने मला ओळखले होते.

"अरेच्चा भाऊसाहेब तुम्ही आहात होय," दिलगिरीच्या स्वरात किंचित हसून तो म्हणाला.

मी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला.

"लांब चालला काय?" मी विचारले.

"होय, खूप लांब," त्याने सिगरेटचा एक लांब झुरका घेतला व थोडे थांबून म्हणाला: "पामीरला."

"काय पामीरला? मग आपण एकाच मुक्कामाला चाललोय. मी ओशला निघालोय. सुट्टीवर चालला की बदली झाली?"

"होय, म्हणजे तसंच काहीसं... सिगरेट ओढणार?"

आम्ही गप्प राहून सिगरेटी पीत राहिलो. अधिक बोलण्यासारखे काही नव्हते. तो माणूस पुन्हा आपल्या दुःखात चूर झाला. आगगाडीच्या हादऱ्यांबरोबर त्याचे शरीर हिंदकळत होते. मुंडी झुकवून तो बसला होता. आमची भेट झाली होती तेव्हापेक्षा त्याच्यात आता मला फार मोठा बदल जाणवत होता. तो अधिक हडकला होता, त्याचा चेहरा ओढला होता, त्याच्या कपाळावर तीन ठळक रेषा उमटल्या होत्या आणि मुद्रेवर कायम भकासपणाची छटा आली होती.

"भाऊसाहेब, त्या दिवशी माझ्याकडून तुमचा अपमान झाला ना?" कसनुसे हसण्याचा प्रयत्न करीत त्याने अचानक विचारले.

"केव्हा? मला नाही आठवत," त्याला अधिक अवघडल्यासारखे वाटू नये म्हणून मी थोडे खोटे बोलू पहात होतो. पण त्याच्या नजरेतला प्रामाणिकपणा पाहताच तो प्रसंग आठवत असल्याची मला कबुली द्यावी लागली. "हां हां त्यावेळी... चालायचंच. त्याबद्दलचं सारं मी विसरून गेलोय. वाटेत अनेक गोष्टी घडतात. पण तुम्हाला का आठवण व्हावी?"

"एरवी मला आठवण राहिली नसती... पण त्या विशिष्ट दिवशी मात्र..."

"काय घडलं? अपघात झाला नाही ना?"

"नाही, त्याला मी अपघात म्हणणार नाही," धीम्या स्वरात तो म्हणाला व हसला किंवा त्याने हसण्याचा प्रयत्न

केला. "तुम्हाला हव्या त्या ठिकाणी मी आता घेऊन जायला तयार आहे, पण आत्ता मात्र मी तुमच्यासारखाच प्रवासी आहे."

"टापेच्या एकाच खुणेवर घोडा हजारदा पुन्हा पाय ठेवतो; तेव्हा एखाद्या ठिकाणी पुन्हा आपली भेट होईलच."

"तसे जर आपण भेटलो तर मी तुम्हाला माझ्या गाडीतून खेचून घेऊन जाईन," मान उडवीत तो म्हणाला.

"मग हा करार ठरला तर?"

"भाऊसाहेब, हे माझं वचन आहे," आता त्याचा चेहरा थोडा खुलला होता.

"आता मला सांगा, त्यावेळी तुम्ही मला का नेलं नाही?"

"का नेलं नाही?" त्याने पुन्हा माझेच शब्द उच्चारले आणि त्याचा चेहरा काळवंडला. तो गप्प झाला व सिगरेटकडे एकटक पहात जोरजोराने झुरके मारू लागला. तो प्रश्न मी विचारायला नको होता याची मला जाणीव झाली, पण आता परिस्थिती कशी सुधारायची ते समजेना. सिगरेटचे थोटुक चुरगाळून त्याने मोठ्या प्रयासाने उत्तर दिले.

"मला शक्य नव्हतं, माझ्या मुलाला मी फिरवायला निघालो होतो."

"तुमचा मुलगा?"

"म्हणजे ते असं आहे पहा... तुम्हाला कसं समजावून सांगावं ते मला समजत नाहीय्." त्याने दुसरी सिगरेट पेटवली व आपल्या भावना आवरून माझ्या नजरेला ठाम नजर भिडवली.

आणि त्याने मला आपली प्रेमकहाणी सांगितली.

आमच्याजवळ भरपूर वेळ होता. ओशपर्यंत पोचायला आगगाडीला पुरे दोन दिवस लागतात. मी त्याला घाई केली नाही किंवा त्याच्यावर प्रश्नांचा भडिमारही केला नाही. थांबत थांबत, शब्दांवर विचार करीत, आपली कथा जणू तो पुन्हा जगत होता. त्याच्या निवेदनात खंड न पाडण्यासाठी मला कमालीचे आत्मसंयमन करावे लागले. कारण अचानक मला जाणीव झाली की, योगायोगामुळे आणि माझ्या चळवळ्या व्यवसायामुळे व्यक्तिशः त्याच्याबद्दल आणि तो ज्या लोकांबद्दल सांगत होता त्यांच्याबद्दल आतली माहिती माझ्यापाशी होती. त्याच्या गोष्टीतले मधले सुटलेले धागे मी गुंफू शकलो असतो व अनेक गोष्टींचा खुलासा करू शकलो असतो, पण त्याला त्याचे निवेदन पुरे करू द्यावे असे मी ठरवले. पण नंतर मी कहाणी सांगण्याची कल्पनाच सोडून दिली. आणि मला खात्री आहे की, मी योग्य तेच केले आहे. कथानायकांना स्वतःलाच आपली कथा सांगू द्या.

ड्रायव्हरची कथा

ते सारेच अचानक घडले. त्यावेळी लष्करी नोकरीतून मी नुकताच मोकळा झालो होतो. लष्कराच्या मोटर तुकड्यांमध्ये मी काम केले होते आणि त्यापूर्वी शाळेच्या दहा इयत्ता शिकल्यानंतर लॉरी ड्रायव्हर म्हणून मी काम

केले होते. अनाथालयात मी लहानाचा मोठा झालो. माझा मित्र अलिबेक जान्तुरीन माझ्याआधी एक वर्ष लष्करी नोकरीतून मोकळा झाला होता व रिबाच्ये मोटर डेपोमध्ये त्याला नोकरी मिळाली होती. मीही त्याला जाऊन मिळालो. तिएन शान किंवा पामीर पाहण्याची स्वप्ने अलिबेक आणि मी नेहमी पहात असू. मोटर डेपोमधील लोकांनी माझे चांगले स्वागत केले. त्यांनी मला वसतीगृहात जागा दिली आणि जवळजवळ कोरी करकरीत 'झिल' लॉरी दिली. या गाडीवर माझे एखाद्या माणसावर बसावे तसे प्रेम बसले होते. अत्यंत उत्तम जातीची ही गाडी होती. तिचे इंजिन चांगले भक्कम होते. अर्थात पुरेपूर भरगच्च माल भरून नेण्याची संधी मला नेहमीच मिळायची नाही हे मात्र खरे. विशेषतः तिएन शान मोटर रस्त्यावर तर नाहीच. जगातील तो अतिउंच रस्ता आहे आणि त्याच्यावर अनेक खिंडी आहेत, अवघड घाटांची वळणे आहेत. त्या पहाडांमध्ये पाणी भरपूर मिळते, तरीही आम्ही थोडे पाणी नेहमी बरोबर घेऊन जातो. गाडीच्या पुढच्या भागाच्या टोकाला लाकडाच्या उभ्या-आडव्या पट्ट्यांचा एक तुकडा व त्याला एक आतल्या बाजूने रबरी नळी लोंबकळताना तुम्ही पाहिली असेल; ती नळी पाण्याने भरलेली असते. याचे कारण घाटातल्या वळणांवर इंजिन कमालीचे गरम होते. आणि अशा रस्त्यांवर तुम्ही मालही फारसा वाहून नेऊ शकत नाही. जास्तीत जास्त किती माल वाहून नेता येईल याबद्दल सुरुवातीला मी खूप डोके खाजवले. पण त्याबाबतीत काहीही करता येणार नाही असे आढळून आले. शेवटी पहाड ते पहाडच राहणार.

माझे काम मला आवडायचे. बाजूचा खेड्यांचा परिसरही आवडायचा. आमचा डेपो इस्सिक-कुलच्या जवळजवळ किनाऱ्यावरच होता. परदेशी प्रवासी या सरोवराच्या काठी जेव्हा तासन् तास मुग्ध होऊन उभे रहायचे तेव्हा मला मोठा अभिमान वाटायचा आणि मनात विचार यायचा: "हे आमचे इस्सिक-कुल! याच्या सौंदर्यावर मात करता येईल अशी दुसरी गोष्ट मिळते का शोधून पहा!"

मी डेपोत कामाला लागलो तेव्हा एक गोष्ट मात्र माझ्या आवडीची नव्हती. ते वसंतामधले दिवस होते आणि सप्टेंबरमधील सर्वसदस्य अधिवेशनानंतर सामुदायिक शेतांवर बांधकामाच्या व विस्ताराच्या योजनांची एकच गर्दी उडालेली होती. ती आपले काम चोख पार पाडीत होती, पण त्यांच्याकडे लॉरींची संख्या कमी पडत होती. म्हणून आमच्यापैकी काहींवर शेतांना मदत करण्याची कामगिरी सोपवून देण्यात आली होती. नव्याने कामाला लागलेल्यांना बहुधा तेथे कामावर पाठविण्यात येई. मीही अर्थात त्याला अपवाद नव्हतो. लांबच्या पल्ल्याच्या सफरी करण्यात मी नुक्ता कोठे रूळलो होतो, एवढ्यात धाडकन त्यांनी मला त्या कामावरून बाजूला केले आणि या खेड्यापासून त्या खेड्यापर्यंत धावपळ करायला लावली. हे असे करावे लागते याची मला कल्पना होती. पण किती झाले तरी मी ड्रायव्हर होतो आणि माझ्या 'झिल' ला गुडघाभर चिखलातून धक्के खात नेताना त्या यातना जणू मला स्वत:ला होत होत्या. त्या शेतांकडे जाणारे रस्ते महाभयंकर होते...

अशाच एका दिवशी मी सामुदायिक शेताकडे लॉरी घेऊन निघालो होतो. तेथे बांधीत असलेल्या गायींच्या नव्या गोठ्यासाठी छपरांची सामग्री मला पोचती करायची होती. ते खेडे डोंगराच्या पायथ्याशी होते आणि खेड्याला जायचा रस्ता स्तेपमधून होता. एकूण परिस्थिती तितकीशी वाईट नव्हती. रस्ता एव्हांना सुकत आला होता व खेड्यापासून हाकेच्या अंतरापर्यंत मी पोचलो होतो, तेवढ्यात अचानक माझी गाडी एका खड्ड्यात रुतली. त्या वसंतामध्ये गाड्यांच्या चाकांनी तो रस्ता एवढा पिसला होता की, अख्खा उंट तेथे चिखलात बुडाला असता तरी सापडणे अवघड होते. मी हरतऱ्हांनी बाहेर निघण्याचा प्रयत्न केला, पण काही जमेना. चाकांना चिखल घट्ट चिकटून बसला होता. मी चांगलाच फसलो होतो. शिवाय, मनाच्या प्रक्षुब्ध अवस्थेत स्टीअरिंग व्हीलला मी एवढा जोरात दणका दिला होता की, त्यातही काही गडबड झाली होती. त्यामुळे लॉरीखाली सरपटत जाऊन काय बिघडले आहे ते मला पहावे लागले. त्या चिखलामध्ये मला सचैल स्नान घडत होते, जीव घामाघूम झाला होता, त्या खडबडीत रस्त्याला मी मनात शिव्यांची लाखोली वहात होतो, एवढ्यात कुणाच्यातरी पावलांचा आवाज ऐकू आला. मला फक्त दोन रबरी बूट दिसत होते. ते बूट जवळ आले, थांबले आणि तेथेच उभे राहिले. मी पुरा वैतागलो. कुणी उभे राहून असे पहायला मी काही विदूषकाचे खेळ करीत नव्हतो.

"चला, आपल्या कामाला जा, उगीच मला वैताग देऊ नका," मी लॉरीखालून ओरडलो. मी डोळ्यांच्या

कोपऱ्यांमधून पाहिले. एका जुनाट, चिखलाचे शिंतोडे उडालेल्या घागऱ्याची किनार दिसत होती. कुणा म्हाताऱ्या खोडाला खेड्यापर्यंत माझ्या गाडीतून जायला हवे होते, असे मला वाटले.

"आजीबाई, तुम्ही चालत जा. हे काम माझा अख्खा दिवस खाईल. उगीच वाट बघून काही उपयोग होणार नाही," मी म्हणालो.

"मी आजीबाई नाही काही," ती अडखळत म्हणाली का खिदळून म्हणाली ते मला समजले नाही.

"मग कोण आहेस तू?" मी रागाने विचारले.

"मी मुलगी आहे."

"मुलगी?" मी तिच्या बुटांकडे पुन्हा एकदा नजर टाकली आणि मूर्खासारखा एक प्रश्न फेकला: "सुंदर मुलगी?"

बुटांची किंचित चाळवाचाळव झाली आणि जाण्यासाठी एक पाऊल उचलले गेले. मी पटकन लॉरीखालून बाहेर आलो. ती खरोखरीच सुंदर होती. सडपातळ बांध्याची, कमानदार भुवयांची ती तरुणी होती. तिने डोक्याला तांबडा रुमाल बांधला होता आणि खांद्यांभोवती एक भलेमोठे पुरुषी जाकीट लपेटले होते. बहुधा ते तिच्या वडिलांचे असावे. एकही शब्द न बोलता ती माझ्याकडे पहात होती. चिखलात आणि वंगणात माखून निघाल्याने माझा अगदी प्रेक्षणीय अवतार झालेला असावा.

"अगदीच वाईट नाही! तू खरंच सुंदर मुलगी आहेस!" मी दात विचकून म्हटले. उभे राहता राहता

तिला चिडवायला मी म्हणालो, "फक्त तू सुंदर बूट पायात घालायला पाहिजे होते."

ती एकदम गरंकन वळली आणि एकदाही न पाहता सरळ रस्त्यावरून चालू लागली.

एकदम तिला काय झाले? मी तिच्या भावना दुखावल्या काय? मला कसेसेच वाटले. मी तिच्यामागून जायला निघालो, पण तेवढ्यात दुसरा विचार डोक्यात आला; मी माझी सगळी हत्यारे भराभरा गोळा केली आणि माझ्या सीटवर उडी मारून बसलो. मी उलटीकडून गिअर टाकून गाडी मागे घेण्याचा प्रयत्न करू लागलो. तिला गाठायचे एवढा एकच विचार माझ्या मनात होता. इंजिनाने घरघराट केला, लॉरी हादरू लागली पण जागेवरून हलेना. आणि ती मुलगी तर अधिकाधिक दूर चालली होती. चाके चिखलात गरगरा फिरत होती. मी ओरडलो: "चल लौकर! लौकर! तुला ऐकू येतंय् की नाही?"

सगळी ताकद एकवटून मी माझा पाय ॲक्सलरेटरवर दाबला. लॉरी गुरगुरली आणि पुढे सरपटू लागली. अत्यंत आश्चर्यकारक पद्धतीने ती चिखलातून बाहेर पडली. केवढा सुटकेचा निश्वास टाकला! वेगाने जात असतानाच तोंडावरचा चिखल मी रुमालाने पुसला व केस सारखे केले. त्या मुलीच्या समांतर रेषेला येताच मी वेग मंदावला, सीटवर आडवे पडून झोकात दरवाजा उघडला. माझा नेहमीचा मनमोकळा व सहज स्वभाव पुन्हा आश्चर्यकारकरीत्या जागा झाला होता.

"आपली गाडी तयार आहे बाईसाहेब," मी म्हणालो आणि आत बसण्याची खूण केली.

पण ती मुलगी माझी दखल न घेता सरळ चालतच राहिली. तिच्या या वागण्याने माझी हवाच गेली. मी पुन्हा तिला गाठले आणि यावेळी म्हणालो:

"मला माफ कर. तुझा अपमान करायचा माझा हेतू नव्हता... गाडीत चढ."

पण तरीही त्या मुलीने माझ्याकडे दुर्लक्ष केले.

तेव्हा मी गाडी पुढे काढली आणि रस्त्याच्या मध्ये आडवी उभी केली. मी खाली उडी मारली, उजव्या बाजूला पळत गेलो, दार उघडले व दाराच्या मुठीवर हात ठेवून उभा राहिलो. ती आली तेव्हा तिच्या नजरेत असा भाव होता की, आता आणखी कोणती खोडी काढणार आहेस? मी तर तुला कंटाळले आहे. पण मी काहीही न बोलता नुसता वाट पहात तिथे उभा राहिलो. तिला एकतर माझी दया आली असावी किंवा तिने फारसा उलटसुलट विचारही केला नसावा. पण तिने मान हलवली आणि एकही शब्द न बोलता ती गाडीत चढली.

आम्ही बरोबर निघालो.

काय बोलावे ते मला सुचेना. अर्थात मुलींशी संभाषण करणे यात मला नवीन काहीच नव्हते, पण कुठल्यातरी कारणाने माझ्या तोंडाला कुलूप बसल्यासारखे झाले होते. हे असे का व्हावे याचे मला आश्चर्य वाटत होते. म्हणून मी माझी नजर रस्त्यावर रोखून धरली व अधूनमधून तिच्याकडे चोरटे कटाक्ष टाकू लागलो. तिच्या काळया नरम केसांच्या कुरळ्या बटा मानेवर रुळत होत्या. जाकीट खाली घसरले होते व ती कोपराने ते सावरून धरत होती. माझ्या

अंगाला स्पर्श होईल या धास्तीने ती शक्यतो दूर बसली होती. तिच्या डोळ्यात एक करारी झाक होती, पण तिचा स्वभाव गोड असणार याची मला खात्री होती. ते तिच्या चेहऱ्यावरच लिहिलेले होते. तिला कपाळाला आठ्या घालून त्रासिक मुद्रेने बसायचे होते, पण तसे करणे तिला जमत नव्हते. तीसुद्धा माझ्याकडे चोरून कटाक्ष टाकीत होती. आमचे डोळे एकमेकांना भिडले. ती हसली. आणि तेवढ्या-मुळे मला काहीतरी बोलायला पुरेसा धीर आला.

"मी दुरुस्ती करत असताना तू लॉरीजवळ उभी कशाला राहिली होती?"

"मला तुला मदत करायची होती," ती उत्तरली.

"तू खरंच मदत केलीस!" मी हसून म्हणालो. "तू जर भेटली नसतीस ना, तर मी दिवसभर तिथंच रखडलो असतो... नेहमी या रस्त्यानं जातेस तू?"

"होय, मी डेरीवर काम करते."

"अरे वा!" मी एकदम उत्साहाने उद्‌गारलो, पण ताबडतोब स्वत:ला आवरले: "चांगला रस्ता आहे हा!" आणि नेमक्या त्याच क्षणाला आम्हाला एवढा हादरा बसला की, आमचे खांदे एकमेकांवर दणकन् आदळले. मी रागाने गुरगुरलो आणि माझ्या तांबड्यालाल झालेल्या चेहऱ्याकडे पाहून ती हसू लागली. तिला हसताना पाहून मलाही हसू कोसळले.

"तुला ठाऊक आहे, मला सामुदायिक शेताकडे यायची खरी इच्छा नव्हती," मी हसत हसत कबुली दिली. "पण रस्त्यावर तुझ्यासारखी मदत करणारी छान मुलगी मला भेटणार आहे

हे आधी कळलं असतं तर मला इथं पाठवणाऱ्या माणसाशी मी हुज्जत घालीत बसलो नसतो. अरेरे इल्याज, काय केलंस तू हे?" मी नाटकी आविर्भावाने म्हटले. "इल्याज म्हणजे, मी बरं का," मी तिला सांगितले.

"आणि माझं नाव आसेल."

आम्ही आता खेड्याजवळ येत होतो आणि रस्ता अधिक चांगला होता. आत घुसणाऱ्या वाऱ्याने आसेलचा रुमाल खेचला जात होता व तिचे केस विस्कटून भुरूभुरू उडत होते. आम्ही गप्प होतो आणि ती शांतता दोघांनाही आवडत होती. कुणीतरी तुमच्यालगत बसले असले, अगदी कोपराला टेकून बसले असले, तासाभरापूर्वी ज्या व्यक्तीची तुम्हाला माहितीही नव्हती पण आता फक्त तिचाच तुम्ही सारा वेळ विचार करता असे कुणी तुमच्याजवळ बसले असले, तर तुम्हाला खूप आनंदी आणि हलके हलके वाटते याचा मला शोध लागला... आसेलला काय वाटत होते ते मला ठाऊक नाही, पण तिच्या डोळ्यात हसू उमलले होते. मला असे वाटले की, आम्ही दोघांनी जगाच्या अंतापर्यंत असेच गाडी चालवीत बरोबर जावे, कधी अलग होऊच नये. त्यावेळी मला हे स्वप्न पडत होते. पण प्रत्यक्षात मात्र एव्हांना आम्ही खेड्यातल्या रस्त्यावरून चाललो होतो.

"थांब, मी इथं उतरते," आसेल एकदम अस्वस्थपणे उद्गारली.

"तू इथं राहतेस?" ब्रेक लावीत मी विचारले.

"नाही, पण इथंच मी उतरणं चांगलं," ती काहीशी गोंधळलेली आणि चिंताग्रस्त दिसली.

"कशासाठी पण? मी सरळ तुला तुझ्या घराच्या दारात नेऊन सोडतो," असें म्हणून तिने नाही म्हणायच्या आतच मी गाडी पुढे नेली.

"कृपा करून इथं थांबव," आसेलने विनवणी केली. ती आभाराचे शब्द पुटपुटली.

मीही उत्तरादाखल काहीतरी पुटपुटलो आणि म्हणालो, "समज, उद्या जर मी त्याच ठिकाणी पुन्हा अडकलो तर येऊन मला मदत करशील?"

तिने काही उत्तर द्यायच्या आतच फाटकाचे दार सताड उघडले गेले आणि एक वयस्क बाई संतापल्या चेहऱ्याने धावतच बाहेर आली.

"आसेल!" ती जोराने ओरडली, पण ताबडतोब तिने आपल्या तोंडावर हात दाबून धरला. "कारटे गेली होतीस कुठं? देव चांगली शिक्षा करो तुला! जा लौकर घरात नि कपडे बदल. ती सोयरीक जुळवणारी माणसं आली आहेत."

आसेल गोंधळलेली दिसली. तिच्या हातून जाकीट खाली पडले. तिने ते पटकन उचलले आणि आज्ञाधारकपणे आईपाठोपाठ ती निघाली. फाटकाशी तिने मागे वळून माझ्याकडे पाहिले, पण तेवढ्यात फाटक दाण्दिशी बंद झाले. मगच माझ्या नजरेला वाफाळणारे दोन घोडे बांधलेले दिसले. मी मातीच्या भिंतीपलिकडे पाहिले. काही बायका अंगणातल्या चुलाणापाशी कामात गुंतल्या होत्या. तांब्याच्या भल्यामोठ्या समोवाराच्या नळकांड्यामधून धुराचे लोट निघत होते. एका आडोशाला दोन माणसे बकरे सोलीत होती. इथल्या चालीरीतींप्रमाणे सोयरीकवाल्यांच्या स्वागताची तयारी चालली

होती. मला काही करण्यासारखे तेथे नव्हते. अजून शेतावर जाऊन लॉरीतला माल उतरवायचा होता.

मी डेपोत परत आलो तेव्हा दिवस जवळजवळ संपत आला होता. मी गाडी धुतली आणि गॅरेजमध्ये ठेवली. बारिकसारिक कामे काढून मी बराच वेळ तेथे रेंगाळत राहिलो. एवढे मी माझ्या मनाला का लावून घेत होतो? ही जाणीव मला खुपत राहिली. डेपोला परतायच्या सबंध रस्त्यावर मी स्वत:लाच प्रश्न विचारीत होतो: "तुला नेमकं काय होतंय? असा कसा अगदीच मूर्ख तू? शेवटी ती तुझी कोण? तुझी प्रेयसी? तुझी बहीण? योगायोगाने तू तिला रस्त्यावर भेटला आणि गाडीतून तिला तिच्या घरापर्यंत पोचवलंस, म्हणून काय झालं? आणि तरी तू असा वागतोयस जणू काही तुम्ही प्रेमिक आहात! कदाचित तिला तुझ्याबद्दल काहीच वाटत नसेल. तिच्या दृष्टीनं तुला काहीच महत्त्व नसेल. तिला वाग्दत्त वर आहे आणि तू तिचा तसा कुणीही नाहीस. रस्त्यावर भेटणाऱ्या सगळ्या ड्रायव्हरांची कुणाला आठवण रहात नसते. आशा करायला तुला कोणताही अधिकार नाही. लोकांचे वाङ्‌निश्चय होताहेत, त्यांची लग्नं होणार आहेत, तिथं तुझा संबंध येतोच काय मुळी? काढून टाक डोक्यातलं हे खूळ. मुकाट आपल्या हातातल्या चाकाला नीट पकडून रहा आणि आपल्यापुरतं पहा."

पण अडचण ही होती की, मी स्वत:ला असे कितीही समजावले तरी आसेलबद्दल मनामध्ये सतत विचार येतच राहिले.

गॅरेजमध्ये मला काम करण्यासारखे काही राहिले नव्हते. वसतीगृहावर मी जाऊ शकलो असतो. तिथे नेहमी वर्दळ असते, शिवाय मनोरंजनासाठी तिथे आमच्यासाठी एक खास दालन होते. पण मला एकटे रहावेसे वाटत होते. डोक्यामागे हात धरून मी मडगार्डवर उताणा रेललो. शेजारीच जान्ताइ हा आमच्यातला एक ड्रायव्हर आपल्या लॉरीची दुरुस्ती करीत होता. लॉरीखालून डोके बाहेर काढून तो उद्गारला :

"काय भाऊ, कसली गाजरं खाताय?"

"पैसे मिळवायची," त्याला गप्प करण्यासाठी मी फटकन उत्तरलो.

मला तो आवडत नसे. सदा पैशाला हपापलेला असायचा. मोठा कावेबाज आणि मत्सरी स्वभावाचा होता. आमच्या-बरोबर तो वसतीगृहात रहात नसे. कुणा बाईची एक खोली त्याने भाड्याने घेतली होती. त्याने तिला लग्नाचे वचन दिले आहे अशी कुणकुण होती. दुसरे काही नाही तरी तो त्यामुळे घरमालक बनला असता.

मी त्याच्याकडे पाठ फिरवली. बाहेरच्या आवारात पाण्याच्या नळाशी आमच्या लोकांनी दंगामस्ती चालवली होती. त्यांच्यापैकी एकजण आपल्या लॉरीच्या टपावर उभा होता व हातातल्या पाण्याच्या रबरी नळीने खाली थांबलेल्या ड्रायव्हरांना तुषार-स्नान घडवीत होता. सारेजण मोठ्यांदा खिदळत होते. पाण्याचा फवारा एवढा जबरदस्त होता की, उभा राहिलेला माणूस क्षणात आडवा झाला असता. तोल सांभाळणे त्याला अवघड ठरले असते. त्या माणसाला

टपावरून खाली खेचायचा साऱ्यांचा प्रयत्न चालला होता, पण तो तिथेच थयथया नाचत होता आणि हातातली पाण्याच्या फवाऱ्याची रबरी नळी टॉमीगनसारखी लोकांवर रोखून त्यांच्या टोप्या उडवीत होता. एकाएकी पाण्याच्या फवाऱ्याची कमान उंचावली. इंद्रधनुष्याप्रमाणे फवारा चमकत होता. त्याचा इरादा तरी काय होता? मी पलिकडे नजर टाकली. कादिचा तेथे उभी होती. आम्हाला कामगिरीवर पाठविण्याचे काम तिच्याकडे होते. ती किंचाळली नाही किंवा पळालीही नाही. आपल्याला सारे पुरुष कौतुकाच्या नजरेने न्याहाळतात याची कादिचाला जाणीव होती. तिचा आत्मविश्वास दांडगा होता. तिने आपली प्रतिष्ठा राखली होती. तिची छेड काढणे तेवढे सोपे नव्हते. आत्तासुद्धा ती तेथे अत्यंत शांतपणे व थंडपणे उभी होती. तुझी हिंमत नाही माझी छेड काढायची, असेच जणू तिची नजर त्या माणसाला सांगत होती. तिने तोंडात भराभर पिना धरल्या होत्या व कुणाहीकडे लक्ष न देता त्या केसात खोवून केस सारखे बसवताना ती हळूच हसत होती. एक सुंदर रुपेरी फवारा तिच्यावर उडाला. सारेजण खिदळले व पाण्याची नळी धरलेल्या माणसाला चेतवणी देऊ लागले.

"तिच्यावर नेम धरून भिजव!"

"अरे पाड तिला!"

"कादिचा, सांभाळ!"

त्या माणसाची काही हिंमत झाली नाही आणि तो पाण्याच्या फवाऱ्याशी उगीच खेळत राहिला. त्याच्या जागी जर मी असतो तर तिला पायापासून डोक्यापर्यंत चिंब भिजवली

असती आणि कदाचित तिने त्याचे काही विशेष मानलेही नसते. केवळ हसण्यावारी तिने ती बाब नेली असती. इतरांपेक्षा ती माझ्याशी वेगळी वागायची हे मी हेरले होते. तिचा ताठरपणा माझ्याशी बोलताना कमी व्हायचा, किंबहुना ती थोडीशी खोडकर वागायची. तिच्याशी लघळपणा मी केला तर तिला आवडायचा. तिच्या केसांशी मी खेळलेले तिला आवडायचे. आणि जरी नेहमी ती माझ्याशी वाद घालायची नि भांडायची, तरी तिच्याबद्दलची एक गोष्ट मला फार आवडायची. तिचे बरोबर असले तरी ती पटकन माझे म्हणणे मान्य करायची. काही वेळा मी तिला सिनेमाला घेऊन जायचा आणि वसतीगृहाच्या वाटेवरच असलेल्या तिच्या घरापर्यंत तिला सोडायचा. मी नेहमी सरळ तिच्या ऑफिसातल्या खोलीत जायचा, पण इतरांना मात्र छोट्या खिडकीतूनच तिच्याशी बोलावे लागे.

पण आत्ता यावेळी मला तिच्यात स्वारस्य नव्हते. त्या लोकांची गंमत चालू होती. करोत बापडे!

कादिचाने शेवटची पिन केसात खोवली.

"पुरे झाला मूर्खपणा, थांबवा आता," तिने हुकूम ठोकला.

"होय बाईसाहेब," हातात रबरी नळी धरलेल्या माणसाने लटका सलाम ठोकला. दुसऱ्याच क्षणी लोकांच्या हास्य-कल्लोळात त्याला खाली खेचण्यात आले.

कादिचा गॅरेजमध्ये आली. ती जान्ताइच्या लॉरीजवळ उभी राहिली. तिची नजर कुणाला तरी शोधत होती. तिने मला प्रथम पाहिले नाही, कारण जाळीदार पडद्यांनी

गॅरेजमध्ये वेगवेगळी दालने पाडलेली होती. जान्ताइने पुन्हा एकवार डोके बाहेर काढले आणि सलगीने तो म्हणाला: "काय, कसं काय सुंदर तरुणी!"

"अरेच्चा, जान्ताइ तू आहेस होय..."

त्याने तिच्या पायांकडे लोभी नजरेने पाहिले. तिरस्काराने तिने खांदे उडवले.

"डोळे मीट, फाजील मेला," असे म्हणून तिने हळूच त्याच्या हनुवटीला लाथ मारली.

कुणालाही तो अपमान वाटला असता, पण जान्ताइला तसे वाटत नसे. तिची ती नाजुक लाथ त्याला चुंबनासारखी वाटली आणि पुन्हा त्याने इंजिनात डोके खुपसले.

आणि नंतर तिने मला पाहिले.

"इल्याज, आराम करतोयस?"

"या ठिकाणी अगदी पिसांच्या गादीसारखं मऊ वाटतंय."

तिने जाळीला चेहरा दाबून धरला व माझ्याकडे एकटक पाहिले.

"माझ्या ऑफिसात ये," शांतपणे ती म्हणाली.

"ठीक आहे."

ती निघून गेली. मी जायला निघालो तसे जान्ताइने पुन्हा मुंडके बाहेर काढले.

"लेका, मजा आहे तुझी. चांगलं रसदार खायला मिळतंय तुला!" डोळा मारून तो चावटपणे म्हणाला.

"होय, पण तुम्ही तिथं आशा धरू नका. काही मिळायचं नाही," मीही उलट टोमणा हाणला.

मला वाटले तो आता चिडणार आणि मारामारीला सुरुवात करणार. गंमतीसाठी मारामारी करणे मला कधीच आवडत नाही, पण मी इतका खिन्न होतो की, कदाचित मारामारीमुळेही मला बरे वाटले असते.

पण जान्ताइला माझ्या बोलण्याचेही काही विशेष वाटले नाही.

"जाने दो," तो गुरगुरला. "आपण पाहू या पुढे."

ऑफिसमध्ये कुणीच नव्हते. हा काय प्रकार? ती कुठे होती? मी परत जायला मागे वळलो आणि कादिचाशी माझी जवळजवळ टक्कर झाली. दाराला ओठंगून ती उभी होती. हनुवटी उंचावून तिने डोके मागे टेकले होते. तिच्या अर्धमिटल्या डोळ्यांमध्ये एक चमक होती. तिचा गरम श्वास माझा चेहरा भाजून काढीत होता. मला स्वस्थ राहणे अशक्य झाले. मी तिच्या दिशेने पुढे सरकलो, पण दुसऱ्याच क्षणी मागे झालो. चमत्कारिक वाटेल, पण मी आसेलशी अप्रामाणिक होतोय अशी भावना मनात आली.

"काय काम होतं माझ्याशी?" कपाळाला आठ्या घालीत मी प्रश्न केला.

कादिचा माझ्याकडे नुसती पहात राहिली.

"काय काम होतं?" मी चिडून पुन्हा विचारले.

"आज तू माझ्याशी नीट वागत नाहीस," दुखावल्या आवाजात ती म्हणाली. "किंवा दुसरं कुणीतरी तुला आवडलंय?"

मी गोंधळलो. का तिने माझ्यावर असा ठपका ठेवावा? तिला माझे गुपित कसे समजले?

खिडकीची खिट्टी खाडकन वाजली. जान्ताइचे डोके डोकावले. त्याच्या चेहऱ्यावर कपटी हास्य होते.

"बाई, जरा एवढं काम पाहता का," तो छद्मीपणाने म्हणाला व कादिचाच्या हाती त्याने कागद सरकवला.

तिने तो हातात घेतला व त्याच्याकडे एक रागीट कटाक्ष टाकला.

"आणि तुझे कामाचे हुकूम कोण घेणार?" ती माझ्यावर फिस्कारली. "तुला खास आमंत्रण पाठवायला पाहिजे असं समजतो काय?"

मला बाजूला ढकलून ती झटकन आपल्या टेबलापाशी गेली.

"हे घे," तिने माझ्या कामाच्या वेळापत्रकाचा कागद हाती दिला.

मी त्यावर नजर टाकली. पुन्हा तेच सामुदायिक शेत. पुन्हा पोटात खड्डा पडला: पुन्हा मी तिथे कसा जाणार, आसेलचे लोकरच... शिवाय इतर कुणाहीपेक्षा मलाच सारखे या शेतावरून त्या शेतावर का पिटाळतात?

"पुन्हा शेतावर?" मी कडाडलो. "पुन्हा खतं आणि विटा? मी जाणार नाही," तिच्या टेबलावर कागद फेकून मी म्हणालो. "मी भरपूर चिखल तुडवलाय. आता जरा दुसऱ्यांना त्या सुंदर रस्त्यांची चव चाखू द्या."

"ओरडायचं काही कारण नाही. तुला आठवड्याचा हुकूम मिळालाय. माझ्या हाती तुझं काम ठरवणं असतं तर याहून जास्त वेळा मी तुला तिथं पाठवलं असतं," आता कादिचालाही खरोखरीच राग आला होता.

"मी जाणार नाही," थंड्या आवाजात मी म्हणालो.

नेहमीप्रमाणे, कादिचाने आपला हट्ट चटकन सोडला.

"ठीक आहे. मी साहेबांशी बोलते," ती म्हणाली व तिने तो कागद उचलला.

"म्हणजे मी आता जाणार नाही नि आसेलला कधीही पाहणार नाही," मनात विचार आला. माझी मनःस्थिती अधिकच वाईट झाली. याचा मला आयुष्यभर पश्चात्ताप वाटत राहील, हे मला जाणवले. ठीक आहे, काहीही होवो, मी जाईन असा निश्चय केला.

"आण तो कागद इकडे," असे म्हणून मी कादिचाच्या हातून कागद हिसकावून घेतला.

जान्ताइ खिदळला.

"तुझ्या आजीबाईला माझा नमस्कार सांग," तो म्हणाला.

मी काहीही बोललो नाही. त्याला एक दणदणीत ठोसा लगावण्याची जोरदार इच्छा होत होती. दाणकन् दरवाजा आपटून मी ऑफिसबाहेर पडलो आणि वसतीगृहावर गेलो.

* * *

दुसऱ्या दिवशी रस्त्यावर ती कुठे दिसते का ते मी पहात होतो. लाल रुमालातल्या माझ्या सुंदर सदाबहार चिनाराला मी पुन्हा पाहीन का? स्तेपमधला माझा लाडका सदाबहार चिनार! तिच्या रबरी बुटांमध्ये आणि वडिलांच्या जाकीटामध्ये ती खरोखरीच चिनाराच्या झाडासारखी सुंदर, उंच नि सडपातळ दिसत होती! त्या तशा अवतारातही तिचे सौंदर्य लपले नव्हते.

तिच्यात असे एवढे काय होते, म्हणून मी इतका हिंदकळलो होतो?

लॉरी चालवीत असताना माझी नजर सतत रस्त्यावर तिला शोधीत होती, पण ती कुठेही दृष्टीपथात येत नव्हती. खेड्याशी पोचलो तेव्हा मी तिच्या घराशी लॉरीचा वेग कमी केला. कदाचित ती घरी असेल? पण मी तिला बोलावणार कसा बाहेर? आणि बोलू काय तिच्याशी? तिच्या भेटीचा योग माझ्या नशिबी दिसत नव्हता. मी पुन्हा वेग वाढवला आणि माल उतरवायला गेलो. परतीच्या वाटेवर ती मला दिसेल अशी एक आशा होती. पण ती दिसली नाही. मग मी लॉरी पुन्हा वळवली आणि डेरीकडे गेलो. मुख्य रस्त्यापासून बाजूला ही वाट चांगली होती आणि खेड्यापासून बरीच लांब होती. पहिल्या भेटलेल्या मुलीलाच मी विचारले. त्या दिवशी आसेल कामावर आली नव्हती. "रस्त्यावर मला भेटायची तिची इच्छा नाही, म्हणून ती आज कामावर न येता घरी राहिली असावी," असा मी मनाशी विचार केला आणि दुखावलो. डेपोत परत आलो तेव्हा मी अगदी उदास होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी पुन्हा त्याच रस्त्याने निघालो. ती दिसेल अशी मला मुळीच आशा वाटत नव्हती. खरे सांगायचे तर तिच्या दृष्टीने मी कोण? लग्न ठरलेल्या मुलीबाबत डोक्याला कशाला ताप करून घ्यायचा? माझा जरी अजून विश्वास बसत नव्हता, तरी ते तिथेच सारे संपलेले होते; नाहीतरी आजही आमच्या खेड्यांमधून आईबाप आपल्या मुलींची लग्ने त्यांच्या इच्छेविरुद्ध लावीत होतीच.

वर्तमानपत्रातून अशा बातम्या मी शंभरदा वाचल्या होत्या. म्हणून काय झाले? नासलेल्या दुधाबाबत रडून काय उपयोग? ते तिचे लग्न लावणार, ते थांबविणे तितके सोपे नाही, तिचे आयुष्य बरबाद होणार... अशा विचारांची माझ्या डोक्यात एकच गर्दी उडाली होती...

ऐन वसंतामधले दिवस. सारा डोंगरपायथा ट्युलिपच्या लालबुंद फुलांनी बहरला होता. लहानपणापासून मला ही फुले आवडायची. ओंजळभर फुले वेचून तिला नेऊन द्यायची जबर इच्छा झाली. पण मी तिला शोधणार कुठे...

आणि एकाएकी ती दिसली—आसेल! माझा डोळ्यांवर विश्वास बसेना. रस्त्यालगतच्या एका वाटोळ्या दगडावर ती बसली होती. पहिल्या वेळी माझी गाडी रुतली होती अगदी त्याच जागी! ती कुणाचीतरी वाट पहात होती. मी लॉरी तिच्याजवळ नेली. तिने दचकून उडी मारली. ती पुरती गोंधळून गेली होती. रुमालाची टोके धरून अभावितपणे तिने त्याचा चोळामोळा केला. यावेळी तिने सुंदर कपडे घातले होते व पायात देखणे बूट होते. चक्क उंच टाचेचे बूट घालून ती त्या खडबडीत रस्त्यावरून आली होती. मी करकचून ब्रेक लावले. आपले प्राण कंठाशी आले आहेत असे मला वाटले.

"काय आसेल, कशी आहेस?"

"ठीक आहे," ती खालच्या सुरात उत्तरली.

गाडीत चढण्यासाठी मी तिला हात देणार होतो, पण ती बाजूला वळली नि हळूहळू रस्त्याच्या कडेने चालू लागली. याचा अर्थ ती गाडीत येऊन बसणार नव्हती. दार उघडेच

ठेवून मी तिच्या बरोबरीने गाडी चालवू लागलो. असे थोडा वेळ आम्ही जात राहिलो — ती रस्त्याच्या कडेने नि मी लॉरी चालवीत. आम्ही काहीही बोललो नाही. बोलण्यासारखे काय होते?

"काल तू डेरीत गेला होता?" तिने विचारले.

"होय. का?"

"काही नाही. तू तिकडे जात जाऊ नको."

"मला तुला भेटायचे होते."

तिने काहीच उत्तर दिले नाही.

त्या सोयरीकवाल्यांचा विचार माझ्या मनाला छळत होता. परिस्थिती काय आहे हे समजून घ्यायला माझा जीव अगदी तडफडत होता. पण तिला त्याबाबत विचारायची माझी हिंमत होत नव्हती. मी घाबरत होतो. तिचे उत्तर ऐकायला घाबरत होतो.

आसेल मागे वळली आणि तिने माझ्याकडे पाहिले.

"ते खरं आहे?" मी विचारले.

तिने होकारार्थी मान हलवली. माझ्या हातातले चाक थरथरले.

"लग्न केव्हा आहे?"

"लौकरच," हळू आवाजात ती उत्तरली.

जा, वेगात कुठेही गाडी घेऊन जा, पण चटकन इथून नीघ! मनात विचार आला. पण अ‍ॅक्सलरेटरवर पाय देण्याऐवजी मी क्लचवर दिला. इंजिनाचा जोरात आवाज होताच आसेलने घाबरून बाजूला उडी मारली. तिची मी माफी मागितली नाही. असल्या उपचारांच्या पलिकडे माझे मन गेले होते.

"याचा अर्थ आपण पुन्हा एकमेकांना भेटणार नाही?" मी विचारले.

"मला माहीत नाही. पण न भेटलेलं जास्त चांगलं."

"पण मी... पण मी तुला कसंही करून सतत भेटण्याचा प्रयत्न करीत राहीन."

आम्ही पुन्हा गप्प झालो. जरी आम्ही वेगवेगळे चाललो होतो तरी कदाचित आमचे विचार सारखेच चालले होते. जणू काही तेथे एक अदृश्य भिंत उभी होती आणि ती भिंत मला चाक सोडून तिच्याजवळ जायला किंवा तिला माझ्याजवळ येऊन बसायला अडथळा करीत होती.

"आसेल, मला टाळू नकोस. मी तुला अजिबात त्रास देणार नाही. मी माझं अंतर राखून राहीन आणि नुसता तुला पाहीन. वचन देतेस?"

"मला माहीत नाही. कदाचित..."

"आसेल, गाडीत ये."

"नाही. तू आता जा. आपण खेड्यापर्यंत आलोय."

त्यानंतर योगायोगाने असेच आम्ही रस्त्यावर काही वेळा भेटलो. आम्ही त्याच पद्धतीने "चालत" होतो: ती रस्त्याच्या कडेने आणि मी लॉरी चालवीत. या प्रकाराने इकडे फिरून जायचे, पण माझ्याशेजारी बसायची बळजोरी मी तिच्यावर करू शकत नव्हतो. खरेच करू शकलो असतो का?

ती कोणत्या माणसाशी लग्न करणार आहे हे मी तिला कधीही विचारले नाही. माझा त्याच्याशी काही संबंध नव्हता आणि शिवाय मला त्याबद्दल माहिती करून घ्यायची इच्छाही नव्हती. तिच्या एकूण बोलण्यावरून मला एवढेच

समजले की, तिला त्याची काहीच ओळख नव्हती. तो तिच्या आईच्या नात्यातल्यापैकी होता आणि दूर पहाडात जंगलतोड्यांच्या छावणीत रहात होता. मुलींशी सोयरीक जोडण्याची दोन्ही कुटुंबांमध्ये फार जुनी प्रथा होती आणि असे नात्याचे संबंध त्यांनी पिढ्यान् पिढ्या जपले होते. बाहेरच्या माणसाशी लग्न करायला आसेलच्या आईवडिलांनी तिला कधीही परवानगी दिली नसती. आणि माझ्याशी लग्न करणे ही तर दूरची गोष्ट होती. कोण होतो मी? एक सामान्य लॉरी ड्रायव्हर. ज्याचा ठावठिकाणा नाही, ज्याला सांगायला नाती नाहीत. लग्नाची मागणी घालायचे धाडसही मला कधी झाले नसते.

या दिवसांमध्ये आसेल गप्प गप्प असायची. आपल्याच विचारांमध्ये गुरफटलेली असायची. मी मात्र साऱ्या आशा सोडून दिल्या होत्या. तिचे भवितव्य ठरले होते आणि आमच्या अशा भेटींनी त्यात काही फरक पडणार नव्हता. तरीही, लहान मुले करतात त्याप्रमाणे आम्ही तसे होणार आहे यावर विश्वासच ठेवीत नव्हतो आणि एकमेकांना भेटणे चालूच ठेवीत होतो, कारण आम्हाला एकमेकांना भेटल्याशिवाय राहवतच नव्हते. आम्हा दोघांनाही असे वाटत होते की, आम्ही एकमेकांना भेटलो नाही तर जगण्याला काही अर्थच राहणार नाही.

असे पाच दिवस चालले होते. एके सकाळी मी गॅरेजमधून निघण्याच्या तयारीत होतो, तेवढ्यात मला ऑफिसमधून बोलावणे आले.

"तुझ्यासाठी चांगली बातमी आहे," कादिचा हसत म्हणाली. "तुझी सिंकिआंग मार्गावर बदली झालीय."

बातमी हादरा देणारी होती. त्या अखेरच्या काही दिवसात दुसरीकडे काम करण्याचा विचारसुद्धा मनाला शिवला नव्हता. चीनला जाऊन यायचे म्हणजे बरेच दिवस मोडणार. मग आसेलला भेटायचे कसे जमणार? आणि तिला न सांगता मी एकदम नाहीसा कसा होणार?

"तुला आनंद झाला नाही?" कादिचाने विचारले.

"पण शेताचं काय? तिथं अजून बरंच काम बाकी आहे," मी अडखळत म्हणालो.

कादिचाने आश्चर्याने खांदे उडवले.

"पण तुलाच तर त्याचा वैताग आला होता ना?"

"मग त्याच्याशी तुझा काय संबंध?" मी उद्धटपणे उद्‌गारलो.

खुर्ची ओढून मी तिच्यावर बसलो. मनाचा निश्चय होत नव्हता.

जान्ताइ धावत आला. सामुदायिक शेतावरचे माझे काम त्याच्यावर सोपवणार असे दिसत होते. तो ते काम नाकारील अशा अपेक्षेने मी तेथेच बसून त्यांचे बोलणे ऐकत राहिलो. कारण खेड्यातल्या रस्त्यावरच्या कामात वरकमाई होत नसे. पण आश्चर्य म्हणजे तो तयार झाला. एवढेच नव्हे तर तो पुढे म्हणाला:

"कादिचा, तुझी इच्छा असेल तर जगाच्या दुसऱ्या टोकालासुद्धा धाड. मी जायला एका पायावर तयार आहे. खेड्यात कोकरांच्या कापणीची वेळ जवळ आली आहे. मी तुझ्यासाठी एखादं आणू?"

एवढ्या बोलण्यानंतरच त्याचे माझ्याकडे लक्ष गेले.

"अरेच्चा, पण मी कुणाच्या मध्ये तर येत नाही ना?" तो म्हणाला.

"चालता हो इथून," मान वर न करताच मी फिस्कारलो.

"इल्याज, तुला बदली का नको?" कादिचाने मला विचारले आणि खांद्याला स्पर्श केला.

"मला शेतावर गेलंच पाहिजे. कादिचा, कृपा करून मला शेतावरचीच कामगिरी दे."

"अरे तुझं डोकं ठिकाणावर आहे का? तसं कसं करू मी? मला तसा हुकूम नाही," ती म्हणाली आणि तिने माझ्याकडे काळजीच्या नजरेने पाहिले: "तिथं कोणतं आकर्षण आहे?"

एकही शब्द न बोलता मी ऑफिसातून बाहेर पडलो आणि गॅरेजमध्ये गेलो. जान्ताइ आपली लॉरी घेऊन भर्ररदिशी मला अगदी घासून गेला. जाताना त्याने डोळे मिचकावले.

कामाला सुरुवात करायला जेवढा वेळ लावता येईल तेवढा मी लावायचा प्रयत्न केला. पण अखेर काही इलाज नव्हता. मालधक्क्याकडे गाडीत माल भरण्यासाठी मला जाणे भाग होते. तिथे गाड्यांची रांगही फारशी लांब नव्हती.

सिगरेट ओढण्यासाठी इतर ड्रायव्हर मला बाहेर बोलावत होते, पण मी चाकाशीच बसून राहिलो. मी डोळे मिटून घेतले आणि आसेल माझी कशी तासन्तास वाट पहात राहील याचे चित्र नजरेसमोर आणले. ती उद्याही वाट पाहील, परवा पाहील आणि... माझ्याबद्दल काय समज होईल तिचा?

माझी पाळी जवळ आली होती. माझ्या पुढची लॉरी भरत होते. मला अवघा मिनिटभराचा अवधी होता. "आसेल, लाडके मला क्षमा कर, माझ्या सुंदर सदाबहार चिनारा, मला क्षमा कर" असा विचार माझ्या डोक्यात आला आणि एकाएकी एक कल्पना चमकली: "तिच्याकडे जाऊन तिला सांगून परत येण्याइतपत माझ्याजवळ वेळ होता. काही तास उशिरा निघालो म्हणून काय विशेष बिघडणार होते? नंतर मी साहेबांना सारी परिस्थिती समजावून सांगीन. कदाचित ते मला समजून घेतील, नाही समजून घेतलं तर माझी चांगली तासंपट्टी करतील... पण माझा काही इलाज नाही. मला गेलंच पाहिजे."

रांगेतून माघारी जाण्यासाठी मी इंजिन चालू केले, पण दोन लॉरींच्या मध्ये मी अडकलो होतो. मला हलता येत नव्हते. दरम्यान, माझ्या पुढच्या ड्रायव्हरने आपला माल भरून घेतला होता आणि आता माझी पाळी होती.

"अरे इल्याज, गाडी यारीखाली घे," ऑपरेटरने ओरडून मला सांगितले.

माझ्यावर यारी लटकत होती, आता फार उशीर झाला होता. निर्यातीचा माल एकदा भरून घेतल्यानंतर ठरल्या मार्गाशिवाय दुसरीकडे जाता येत नसे. हा विचार आधी का डोक्यात आला नाही? कारकून माझे कागदपत्र माझ्या हातात देत होता. मी मागील खिडकीतून पाहिले: माझ्या लॉरीच्या मागील भागात ठेवण्यात यावयाचा माल खाली येत होता. दर क्षणागणिक तो अधिकाधिक खाली झुकत होता.

"सांभाळा," मी जोरात ओरडलो आणि खाली येणारा मालाचा खोका चुकवून गाडी जोरात पुढे काढली. (माझे इंजिन चालूच होते.) माझ्या पाठमोरे आरडाओरडा, शिट्या आणि शिव्याशाप ऐकू येत होते.

गुदामे, लाकडाचे साठे, कोळशाचे ढीग यांना मी भरवेगात पार केले. हातातल्या चाकाशी माझे पंजे जणू एकरूप झाले होते. रस्ता अक्षरशः थयथया नाचत असल्याचा भास होत होता. लॉरी इकडेतिकडे झुकत होती आणि त्याबरोबर मीही झुकत होतो. पण यात नवे असे काही नव्हते.

लौकरच मी जान्ताइला गाठले. एवढ्या जोरात कुणाची लॉरी येते आहे हे पाहण्यासाठी त्याने डोके बाहेर काढले आणि मला पाहताच त्याचे डोळे अक्षरशः विस्फारले. मी घाईत आहे तेव्हा मला रस्ता मोकळा करून दिला पाहिजे हे त्याला समजत होते. पण अखेरीस तो जान्ताइ होता. रस्त्याच्या बाजूला जाऊन मी गाडी त्याच्या पुढे काढायचा प्रयत्न केला. पण त्याने वेग वाढवला आणि तो मला परत रस्त्यावर येऊ देईना. आम्ही अटीतटीने धावत होतो. तो रस्त्यावरून आणि मी रस्त्याच्या बाजूने. आमच्या चाकांवर झुकून लॉरी चालवताना आम्ही एकमेकांकडे एखाद्या जंगली श्वापदांसारखे पहात होतो व शिव्यांचा भडिमार करीत होतो.

"कुठं निघालायस? कशासाठी?" - त्याने ओरडून विचारले.

मी त्याला हाताच्या मुठी वळवून दाखवल्या. मी माल भरलेला नसल्याने अखेरीस त्याच्या पुढे गाडी काढली व त्याला पार मागे टाकले.

तिथे आसेल नव्हती. खेड्यात पोचलो तेव्हा मला अक्षरशः धाप लागली होती. जणू मी सारा रस्ता धावत आलो होतो. त्यांच्या अंगणात किंवा रस्त्यावरही चिटपाखरू नव्हते. खोगीर चढवलेला घोडा बांधून ठेवलेला दिसला. मी काय करू? मी तिथे थांबायचे ठरवले. ती लॉरी पाहील आणि बाहेर येईल. बॉनेट उघडून मी इंजिन दुरुस्त करण्याचा बहाणा केला. पण माझी नजर मात्र सतत फाटकावर होती. मला फार वेळ वाट पहावी लागली नाही: तिची आई एका काळ्या दाढीवाल्या धिप्पाड म्हाताऱ्या माणसाबरोबर बाहेर आली. त्या माणसाने दोन जाड फरगोल घातले होते: एका रेशमी मांडचोळण्यावर मखमली फरगोल. त्याच्या हातात एक चांगल्यापैकी चाबूक होता. त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. त्याने बहुधा नुकताच गरम चहा घेतला असावा. ती दोघे घोड्याजवळ गेली. आसेलच्या आईने घोड्याची रिकिब आदबीने धरली होती व खोगीरावर बसायला त्या म्हाताऱ्या माणसाला ती मदत करीत होती.

"तुम्ही ठरवलेल्या सोयरीकीनं आम्हाला खूप आनंद झालाय," ती म्हणाली. "देण्याघेण्याच्या बाबतीत काही चिंता करू नका. आमच्या मुलीबाबत आम्ही हात राखून धरणार नाही. देवदयेनं आम्हाला सारं काही भरपूर लाभलंय."

"वैनीसाहेब, जे काही तुम्ही कराल ते आम्ही गोड मानून घेऊ," असे म्हणत तो म्हातारा जीनवर व्यवस्थित मांड टाकून बसला. "देव त्यांचे कल्याण करो. हुंड्याचं म्हणाल तर ती माणसं आपल्या रक्ताचीच आहेत. शिवाय

नातं जोडायची ही काही आपली पहिलीच वेळ नाही... येतो तर वैनीसाहेब. मग शुक्रवार नक्की ठरला."

"होय शुक्रवार नक्की. चांगला शुभ दिवस आहे. तुमच्या बायकोला माझा नमस्कार सांगा."

"शुक्रवारी त्यांचा काय बेत असावा?" मी मनाशीच विचार करीत होतो. "आज कोणता वार आहे बरं? बुधवार... याचा अर्थ शुक्रवारी ते तिला घेऊन जाणार? आग लागो या जुन्या रिवाजांना, किती काळपर्यंत हे तरुणांच्या आयुष्यांना बरबाद करणार?"

तो म्हातारा माणूस दौडत पहाडांच्या दिशेने निघून गेला. तो नजरेआड होईपर्यंत आसेलची आई त्याला पहात होती. नंतर ती वळली आणि तिने मला पाहिले.

"अच्छा, तू पुन्हा आलास तर? ही काही धर्मशाळा नाही. इथं लॉरी उभी करू नको. चालता हो! तुला ऐकू येतंय ना? चालता हो इथून!"

याचा अर्थ एव्हांना तिला संशय आला होता.

"माझी गाडी नादुरुस्त झालीय," असे पुटपुटत पुन्हा मी इंजिनात डोके खुपसले. मी तिला भेटल्याशिवाय परत जाणार नव्हतो. मला ते शक्य नव्हते!

तिची आई आणखी थोडा वेळ बडबडत राहिली आणि मग घरात गेली.

मी फूटबोर्डावर बसून सिगरेट शिलगावली. एक छोटी मुलगी कुठूनतरी धावत आली. ती लॉरीभोवती लंगडी घालीत होती. ही आसेलची छोटी बहीण असावी काय? ती बरीचशी आसेलसारखी दिसत होती.

"आसेल बाहेर गेलीय," ती म्हणाली व लंगडी घालू लागली.

"कुठं गेलीय?" मी तिला पकडून विचारले. "कुठं गेलीय?"

"मला काय माहीत? सोड मला," तिने माझ्या पकडीतून स्वत:ला सोडवून घेतले आणि जीभ काढून वेडावून दाखवले.

मी दाणदिशी बॉनेट खाली आदळले आणि माझ्या सीटवर जाऊन बसलो. आता तिला कुठे शोधायचे? कोणत्याही परिस्थितीत आता परत जाणे मला भाग होते. उशीर होत चालला होता. रस्ता पार करून मी स्तेपमध्ये शिरलो. एका खड्ड्याच्या अलिकडे मी गाडी थांबवली, कारण पुढे कुठे जायचे ते मला समजत नव्हते. मी बाहेर पडलो आणि जमिनीवर फतकल मारून बसलो. काय दिवस उजाडला! आसेलचा ठिकाणा नाही आणि त्यातच माझ्या दूरच्या सफरीचा गोंधळ. या विचारांनी मन अगदी बधीर झाले होते. भोवतालची सारी जाणीव नाहीशी झाली होती. मी तिथे नसाच किती वेळ पडून होतो कुणास ठाऊक, पण जेव्हा डोळे उघडले तेव्हा लॉरीच्या दुसऱ्या बाजूला सुंदर बुटांमध्ये दोन पाय उभे असलेले मला दिसले. आसेल! मी तिला ताबडतोब ओळखले. मला एवढा आनंद झाला होता की, माझी छाती धडधडू लागली. मी उभा रहायचा प्रयत्न केला पण पायातली जणू शक्तीच गेली होती. आणि नेमक्या याच जागी आमची पहिली भेट झाली होती.

"आजीबाई, पुढचा रस्ता धरा," त्या बुटांना उद्देशून मी म्हणालो.

"पण मी आजीबाई नाही काही," आसेलनेही माझ्या नाटकात भाग घेतला.

"मग कोण आहेस तूं?"

"मी मुलगी आहे."

"सुंदर मुलगी?"

"येऊन पहा."

आम्ही दोघे मनमुराद हसलो. मी उडी मारून उभा राहिलो आणि तिच्याकडे धावलो. तीही माझ्या दिशेने धावली. आम्ही एकमेकांना सामोरे उभे राहिलो.

"जगातली सर्वांत सुंदर मुलगी," मी म्हणालो. "मी इथं आहे हे तुला कसं समजलं?"

आखूड बाह्यांच्या पोषाखात ती उभी होती तेव्हा खरोखरीच वाऱ्यात डोलणाऱ्या लहान, सडपातळ चिनाराच्या झाडासारखी दिसत होती. तिच्या हातात दोन पुस्तके होती.

"मी वाचनालयातून परत येत होते नि मी तुझ्या गाडीच्या चाकांच्या खुणा रस्त्यावर पाहिल्या."

"खरंच?" मी तुझ्यावर प्रेम करते असे तिने म्हटले असते, तरी मला आत्ताच्या तिच्या उद्‌गारांनी झाला तेवढा आनंद वाटला नसता. याचा अर्थ ती माझ्याबद्दल विचार करीत होती, माझ्या चाकांच्या खुणा निरखण्याइतपत तिचे माझ्याकडे लक्ष होते.

"म्हणून तू वाट पाहत असशील या विचारानं मी इथं धावत आले..."

मी तिचा हात हातात घेतला.

"बैस गाडीत आसेल, आपण कुठंतरी भटकून येऊ."

तिने आनंदाने होकार दिला. आज ती वेगळी होती. आणि मीही आज वेगळा होतो. आमच्या साऱ्या चिंता, साऱ्या अडचणी जणू नाहीशा झाल्या होत्या. आमच्या आनंदाशिवाय, समोरच्या रस्त्याशिवाय आणि माथ्यावरच्या आकाशाशिवाय कुणाचेच अस्तित्व आमच्या लेखी नव्हते. मी दार उघडले, तिला आत बसवले आणि मी चाकावर येऊन बसलो.

रस्ता नेत होता तिकडे आम्ही चाललो होतो. कुठे चाललो होतो आणि का चाललो होतो हे आम्हालाच माहीत नव्हते. पण त्याची आम्हाला पर्वा नव्हती. एकत्र बसण्याचा, नजरांनी भेटण्याचा आणि हातांच्या स्पर्शाचा आनंद पुरेसा होता. आसेलने माझी लष्करी टोपी नीट केली. गेली दोन एक वर्षे मी ती वापरीत होतो.

"ही अशी चांगली दिसते," ती म्हणाली आणि माझ्या खांद्याला हळूच बिलगली.

एखाद्या पाखरासारखी स्तेपमधून आमची लॉरी भन्नाट चालली होती. साऱ्या जगाला जणू चैतन्य प्राप्त झाले होते. पर्वत, शेते, झाडे आम्हाला भेटण्यासाठी धावत येत होती... आमच्या तोंडावर वारा सपकारे मारीत होता, आम्ही वेगाने पुढे पुढे जात होतो, आकाशात सूर्य तळपत होता, आम्ही हसत होतो, दवण्याच्या आणि ट्युलिपच्या वासाने आसमंत दरवळला होता... आम्ही मनमुक्त स्वातंत्र्य अनुभवीत होतो...

एका अतिप्राचीन कबरीपासून एक घार उडाली आणि जणू आमच्याशी शर्यतीचे आव्हान घेऊन रस्त्याला समांतर खालून उडू लागली.

दोन घोडेस्वार घाबरून बाजूला झाले. आणि नंतर आपल्या घोड्यांना टाच मारून "थांबा, थांबा!" अशा आरोळ्या ठोकीत आमच्या मागे दौडू लागले. घोड्यांच्या तोंडाला फेस येईपर्यंत त्यांनी चाबूक मारले. मला ते घोडेस्वार कोण होते ते माहीत नव्हते. कदाचित आसेलला ठाऊक असतील. लौकरच आम्ही त्यांना धुळीच्या लोटात मागे टाकले.

आमच्यापुढील एका बैलगाडीने चटकन आम्हाला वाट मोकळी करून दिली. त्या बैलगाडीतले तरुण जोडपे गळ्यात गळा घालून उभे राहिले व आम्हाला मित्रत्वाच्या नात्याने त्याने हात हलवून अभिवादन केले.

"रामराम" मी बाहेर वाकून हात हलवीत त्यांना प्रतिसाद दिला.

स्तेप मागे पडले. आम्ही आता अस्फाल्टच्या रस्त्यावरून धावत होतो.

सरोवर फारसे दूर राहिले नव्हते. मुख्य रस्त्यापासून लॉरी आडरस्त्याला वळवून, झाडाझुडुपांमधून आणि उंच गवतामधून मी सरोवराच्या किनारी निघालो. पाण्याच्या नेमक्या वर असलेल्या एका उंच टेकाडावर आम्ही थांबलो.

निळ्या-पांढऱ्या लाटा हातात हात घालून पिवळ्या किनाऱ्याकडे धावत होत्या. डोंगरापलिकडे सूर्य मावळत होता आणि सरोवराच्या दुसऱ्या टोकाच्या पाण्याला गुलाबी छटा आली होती. दूर अंतरावर हिमाच्छादित शिखरांची जांभळी रांग उभी होती. काळ्या मेघांच्या झुंडी त्यांना वेढत होत्या.

"आसेल, ते पहा हंस!"

इस्सिक-कुल सरोवरात फक्त शरदात आणि हिवाळ्यात हंस येतात. वसंतामध्ये ते क्वचित आढळतात. लोक म्हणतात की, ते दक्षिणेकडचे हंस उत्तरेकडे उडत जात असतात. ते भाग्य बरोबर घेऊन येतात म्हणे...

राजहंसांचा थवा सरोवराला चक्कर मारीत होता. ते वर भरारी घ्यायचे आणि खाली येताना पंख पसरायचे. पाण्यावर उतरून ते दंगामस्ती करायचे, पाण्यात भली मोठी वर्तुळे तयार करायचे आणि पुन्हा भरारी घ्यायचे. अखेरीस त्यांनी एक लांब साखळी केली आणि एकसाथ पंख फडफडवीत रात्रीच्या निवाऱ्यासाठी पलिकडल्या वाळूच्या उताराच्या किनाऱ्याला गेले.

आम्ही लॉरीत बसूनच हंसांची ती क्रीडा शांतपणे पहात होतो. आणि जणू काही आमच्यामध्ये सारे काही निश्चित ठरले आहे अशा थाटात मी म्हणालो.

"किनाऱ्यापलिकडची ती छपरे दिसतात ना, तो आमचा डेपो. आणि हे आपले घर," हाताच्या इशाऱ्यानेच आम्ही बसलो होतो ती लॉरीतली जागा दाखवीत मी म्हटले आणि हसलो. तिला न्यायला मला दुसरी जागा नव्हती. आसेलने माझ्या डोळ्यात खोल पाहिले आणि मला बिलगून ती एकाच वेळी रडू-हसू लागली.

"माझ्या लाडक्या, माझ्या सर्वस्वी प्राणा! मला घराची गरज नाही. नंतर कधीतरी माझ्या आई-वडिलांनी मला समजून घेतलं... तर तेवढंच मला पुरेसं आहे... मला ठाऊक आहे, ते मला कधीच क्षमा करणार नाहीत... पण मी तरी काय करू?.."

झपाट्याने काळोख पडत चालला होता. आकाशात ढग विखुरले होते आणि खाली पाण्यावर ओठंगले होते. सरोवरातले पाणी निश्चल व काळेभोर बनले. इलेक्ट्रिक वेल्डर घेऊन कुणीतरी पर्वतात दडून बसले आहे असा भास होत होता: क्षणभर नजर दिपवून टाकणारी प्रकाशशलाका चमकायची आणि लुप्त व्हायची. वादळाची पूर्वचिन्हं होती. राजहंसांनी प्रवासात खंड पाडून इथे निवारा का शोधला ते समजत होते. त्यांना वादळाची चाहूल आधी लागली होती. पर्वतात वादळात सापडण्याऐवजी त्यांनी आधीच निवारा शोधला होता.

ढगांचा गडगडाट झाला. मुसळधार पाऊस कोसळू लागला. सरोवराचे पाणी ढवळून निघू लागले आणि किनाऱ्यावर धडधडा आपटू लागले. वसंतामधला तो पहिला वादळी पाऊस होता. आणि ती आमची एकत्रित अशी पहिली रात्र होती. समोरच्या काचेवरून आणि दारांच्या कडांवरून पाणी ओघळत होते. काळ्याभोर, अथांग पसरलेल्या तळ्यावर पांढऱ्याशुभ्र विद्युल्लतेच्या शलाका भसाभस खुपसल्या जात होत्या. आम्ही एकमेकांना अगदी बिलगून बसलो होतो व हळुवार आवाजात कुजबुजत होतो. आसेल थरथर कापत होती. ती घाबरली असावी किंवा तिला थंडी वाजत असावी; म्हणून मी माझे जाकीट तिच्याभोवती गुंडाळले आणि तिला घट्ट छातीशी धरले. असे करताना आपण मोठे आणि सामर्थ्यवान आहोत अशी भावना मनात निर्माण होत होती. माझ्यात एवढा हळुवारपणा आहे हे मला यापूर्वी कधीच जाणवले नव्हते, कुणालातरी आधार देण्यात एवढा आनंद

सामावलेला असतो हे मला यापूर्वी कधीच माहिती नव्हते. मी तिच्या कानात कुजबुजलो: "लाल रुमालातल्या माझ्या सदाबहार छोटुकल्या चिनारा, मी असताना तुला कुणीही बोट लावू शकणार नाही."

ज्या अचानकपणे वादळ सुरू झाले होते त्याच अचानकपणे ते थांबले. पण सरोवराचे उसळलेले पाणी मात्र तितक्या लौकर शांत झाले नाही. पावसाची बारिक झिमझिम चालू होती.

लॉरीत एक छोटा रेडिओ होता. त्यावेळी माझ्याजवळ मूल्यवान अशी तेवढीच एक वस्तू होती. मी रेडिओचे बटण दाबले. तो सारा प्रसंग जणू काल घडल्यासारखा मला आठवतोय. फ्रुन्झे थिएटरमध्ये चाललेले 'चोल्पोन' बॅले रेडिओवरून प्रसारीत होत होते. डोंगरापल्याडून संगीताचे स्वर माझ्या गाडीत येऊन कोसळताहेत असा भास होत होता. बॅलेमधील नायकांना हलवून सोडणाऱ्या प्रेमाप्रमाणेच ते संगीत नाजुक आणि मंत्रमुग्ध करणारे होते. टाळ्यांचा कडकडाट झाला, लोक नर्तकांची नावे घेऊन हाका मारू लागले आणि कदाचित त्यांनी त्यांच्या पायांशी फुले फेकली असावीत. पण माझी खात्री आहे की, त्या बॅलेचा आनंद आम्ही जसा उपभोगला तसा त्या प्रेक्षकांमधील कुणीही लुटला नसणार. खवळलेल्या इस्सिक-कुलच्या किनाऱ्यावर लॉरी उभी करून त्या छोट्याशा दोन बैठकांवर आम्ही त्या बॅलेचा स्वर्गीय कलात्मक आनंद मनमुराद लुटला. बॅलेचा विषय आमचाच होता, आमच्याच प्रेमाबद्दलचा होता. आनंदाच्या शोधात गेलेल्या चोल्पोनच्या कहाणीने आम्ही हेलावून गेलो माझा

चोल्पोन, माझा पहाटेचा तारा, माझ्याशेजारीच होता. मध्यरात्रीच्या सुमारास ती माझ्या बाहुपाशात झोपी गेली, पण मी मात्र खूप वेळ अस्वस्थ होतो. हळुवारपणे मी तिचा चेहरा कुरवाळत होतो. इस्सिक-कुलच्या लाटांचा घनगंभीर नाद कानांवर आदळत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही डेपोकडे गेलो. माझी चांगलीच कानउघाडणी करण्यात आली, पण एकूण परिस्थितीचा विचार करून मला माफी करण्यात आली. आणि यारीला झुकांडी देऊन मी केलेले पलायन हा बराच काळपर्यंत डेपोमध्ये विनोदाचा विषय झाला.

मी चीनपर्यंत प्रथमच सफर करणार होतो आणि आसेलला मी माझ्याबरोबर घेऊन जाण्याचे ठरवले. वाटेत माझा मित्र अलिबेक जान्तुरिन याच्याकडे तिला ठेवायचे असा माझा बेत होता. तो नारीनजवळ आंतरराष्ट्रीय वाहतूक तळाजवळ आपल्या कुटुंबासह रहात होता. सीमेपासून हे ठिकाण फारसे दूर नव्हते आणि मी तेथून जवळून जात असताना घटकाभर त्याला भेटून जात असे. अलिबेकची बायको फार चांगली बाई होती. मला ती आवडायची.

आम्ही निघालो. पहिली गोष्ट आम्ही केली ती म्हणजे वाटेवरच्या दुकानात आसेलसाठी काही कपडे विकत घेतले. फक्त अंगावरच्या कपड्यानिशी ती माझ्याबरोबर आली होती. इतर गोष्टींबरोबरच आम्ही एक मोठी, रंगीत, फुलाफुलांची शाल घेतली. आणि आम्ही ते चांगलेच केले. वाटेत आम्हाला उर्म-ताके हा वयस्क उस्ताद ड्रायव्हर भेटला. त्याला आम्ही सारे तरुण लोक फार मान देत असू.

तशी आमच्यात परंपरा होती. दूर अंतरावर असतानाच त्याने मला थांबण्याचा इषारा दिला. मी लॉरीतून खाली उतरलो व त्याला भेटायला गेलो.

"सलाम आलेकुम् उर्म-ताके," मी म्हणालो.

"आलेकुम् सलाम इल्याज. तुझ्यावरच्या संकटांनासुद्धा शुभरूप लाभो," त्याने रूढीनुसार आशीर्वाद दिला. "देव तुला सुखी करो व चांगली संतती देवो."

मी त्याचे आभार मानले व विचारले, "आमच्याबद्दल तुम्हाला कसं समजलं उर्म-ताके?"

"अरे बेटा, चांगली बातमी कधी लोळत पडून रहात नाही. तोंडातोंडी साऱ्या मार्गावर तुझी बातमी समजलीय."

मी अगदी चकित झालो.

आम्ही रस्त्यावरच बोलत उभे होते. उर्म-ताके लॉरी-कडे फारसा पहात नव्हता आणि आसेल आतच बसून राहिली होती. सुदैवाने तिने एक योग्य गोष्ट चटकन केली: तिने डोक्यावरून शाल घेतली व आपला चेहरा झाकून घेतला. उर्म-ताके सौम्य हसला.

"आता कसं सारं ठीक झालं," तो म्हणाला. "शाबास पोरी, वाडवडलांनी घालून दिलेल्या परंपरा राखतेस. इथून पुढं डेपोतल्या सर्व उस्तादांची तू सून आहे. इल्याज, हे घे सूनमुख पाहिल्याबद्दल," त्याने काही पैसे माझ्या हातावर ठेवले. मी ते नाकारून त्याचा अपमान करायला धजलो नाही.

आम्ही आपापल्या मार्गांनी गेलो. आसेल शाल डोक्यावर पांघरूनच बसली. कुणी आम्हाला भेटले की, कुठल्याही

घरंदाज किर्घिझ मुलीप्रमाणे ती तोंडावर शाल धरायची. आणि नंतर आम्ही खूप हसायचो. शाल पांघरल्यावर ती अधिकच सुंदर दिसते असे मला वाटले.

"माझ्या लाडके, डोळे वर करून पहा नि माझं चुंबन घे," मी तिची विनवणी केली.

"मी नाही बाई, उस्ताद पाहतील ना आपल्याला," असे हसत ती म्हणाली आणि पटकन तिने माझ्या गालाचा मुका घेतला.

आम्हाला भेटलेल्या सर्व लॉरी थांबल्या आणि ड्रायव्हरांनी आमचे शुभचिंतन केले. अनेकांनी केवळ फुलेच नव्हे, तर भेटीसुद्धा दिल्या. त्यांनी आणखीही एक गंमत केली. ही बहुधा आमच्या रशियन मित्रांची कल्पना असावी. खेड्यात लग्न असते तेव्हा साधारणपणे ते गाडी फुलांनी सजवतात. आमच्याही लॉरीला त्यांनी तांबड्या, निळ्या, हिरव्या फिती बांधून, रेशमी रुमाल बांधून आणि फुलांचे गुच्छ अडकवून सजवले. लॉरी एवढी देखणी सजली होती की, तिचे रंगीबेरंगी रूप दूर अंतरावरूनही लक्षात येत होते. आम्ही आनंदात होतो आणि माझ्या मित्रांचा मला अभिमान वाटत होता. संकटकाळी मदतीला धावतो तो खरा मित्र अशी म्हण असली, तरी आनंदाच्या क्षणीही मित्र बरोबर असणे हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे.

माझा जिवश्चकंठश्च मित्र अलिबेक जान्तुरिन आम्हाला रस्त्यावरच भेटला. माझ्यापेक्षा तो दोन वर्षांनी मोठा आहे. स्वारी धिप्पाड आणि भल्या मोठ्या डोक्याची आहे. त्याला एकूण जाण फार चांगली आहे, त्याचा स्वभाव गंभीर आहे

आणि तो उत्तम ड्रायव्हर आहे. डेपोत सारेजण त्याला मान देतात आणि ट्रेड युनियन समितीवर त्याला लोकांनी निवडून दिला आहे. तो काय म्हणेल याचा मला अंदाज नव्हता.

अलिबेक लॉरीकडे नुसता पहात राहिला. त्याची मुग्धता फार बोलकी होती. नंतर तो आसेलजवळ गेला, तिच्याशी त्याने हस्तांदोलन केले आणि तिला शुभचिंतन केले.

"तुझा जाण्याच्या मार्गाचा कागद दे," त्याने मागणी केली. त्याच्या या मागणीने मी बुचकळ्यात पडलो. पण जास्त काही न विचारता मी कागद त्याच्या हाती ठेवला. मोठ्या अक्षरात त्याने त्या कागदावर आडवे लिहिले: "विवाह सफर क्र. १६७." तो आकडा त्या कागदावरचा अनुक्रम होता.

"अरे हे काय करतोस?" घाबरून मी विचारले. "हा ऑफिसच्या कामाचा कागद आहे हे तुला माहीत नाही?"

गालातल्या गालात हसत तो म्हणाला, "अरे वेड्या, इतिहासात नोंद होईल या सफरीची. आपले कारकूनसुद्धा माणसंच आहेत, होय ना? हं, आता मला तुझं अभिनंदन करू दे." त्याने मला कडकडून मिठी मारली आणि माझे चुंबन घेतले. आम्ही दोघेही हसलो. नंतर निरोप घेऊन आम्ही आपापल्या गाड्यांकडे निघालो तेव्हा अलिबेकने अचानकपणे विचारले:

"तुम्ही राहणार कुठं?" मी खांदे उडवले: आम्ही अजून कुठे राहिलोच नव्हतो.

"हे आमचं घर," लॉरीकडे बोट दाखवून मी म्हटले.

"काय हे? आणि तुझी पोरं तू तिथं लहानाची मोठी करणार? हे बघ, माझ्या जागेत घर कर. मी व्यवस्थापनविभागाला सांगीन आणि आम्ही आमच्या स्वतःच्या घरात रहायला जाऊ."

रिबाच्येमध्ये डेपोपासून जवळच अलिबेक घर बांधीत होता. माझ्या फुरसतीच्या वेळात मी त्याला त्या कामी मदत केली होती.

"पण ते अजून रहायला लायक कुठं झालंय?"

"त्याचं काय एवढं विशेष, थोड्याशा कामाची गरज आहे. बघ बुवा, एवढी चांगली ऑफर तुला दुसरीकडे कुणी देणार नाही. आपल्याकडे जागेचा प्रश्न किती अवघड आहे तुला माहीत आहे."

मी अलिबेकचे आभार मानले. "याहून अधिक चांगली इच्छा आम्ही काय करणार?" मी म्हणालो. "मला एक दोन दिवसापुरता निवारा पाहिजे होता आणि तू तर रहायला अख्खा फ्लॅट देतो आहेस."

"दरम्यान आम्ही तुझी तिथं व्यवस्था करतो. परतीच्या वाटेवर माझ्यासाठी तिथं जरा थांब. याबाबत आपण आपल्या बायकांशी बोलू आणि ठरवू," त्याने आसेलकडे डोळे मिचकावून पहात म्हटले.

"हो, आता आपल्या बायका झाल्या नाही का!"

"लग्नाची सफर आहे, मजा करा लेको," अलिबेक जाता जाता ओरडून म्हणाला.

खरोखरीच आमची जगावेगळी लग्नसफर चालली होती. एक आनंददायी, गंमतीदार लग्नसफर.

सारे काही निर्विघ्न पार पडत चालले होते म्हणून आम्ही आनंदात होतो. रस्त्यावर घडलेल्या एका प्रसंगाने मात्र आमच्या आनंदाला किंचित गालबोट लागले.

मागच्या वळणावरून जान्ताइची लॉरी भरवेगात आमच्याजवळ आली. त्याच्या बरोबर कादिचा होती. त्याने मला हात केला. मी ब्रेक दाबले. दोन्ही लॉरी एकमेकींना घसटून थांबल्या.

"एवढी सजवलीय का लॉरी? काय लग्नबिग्न आहे काय?" जान्ताइने बाहेर वाकून विचारले.

"होय," मी उत्तरलो.

"चेष्टा करतो काय!" अविश्वासाने तो म्हणाला आणि त्याने कादिचाकडे पाहिले. "हे बघा, आणि आम्ही याचा जंग जंग शोध घेत फिरतोय."

कादिचाचा चेहरा पांढराफटक पडला. ती स्तंभित झाली होती.

"कादिचा, कशी आहेस तू?" मी तिला विचारले. तिने मानेनेच ठीक असल्याचे उत्तर दिले.

"ही तुझी भावी बायको तर?" जान्ताइने अखेर सारा प्रकार समजून विचारले.

"नाही, माझी बायको," असे म्हणत मी आसेलभोवती हात टाकला.

"खरंच?" जान्ताइचे आश्चर्य आता कळसाला पोचले. ही बातमी चांगली का वाईट याची त्याला स्वतःलाच खात्री देता येत नव्हती. "असं का, तर मग अभिनंदन. मनःपूर्वक अभिनंदन."

"आभार."

"साला तू हुषार बरं का!" खवटपणे हसत जान्ताइ म्हणाला. "हुंड्याचे पैसे न देता पोरगी पटकावलीस ना?"

"मूर्ख कुठला! चालता हो!" मी त्याच्यावर ओरडलो.

काही माणसे अगदी हद्द गाठतात! त्याच्यावर आणखी तोंडसुख घ्यायची माझी इच्छा होती आणि म्हणून मी गाडीतून पुन्हा बाहेर डोकावलो. पण त्यावेळी माझ्या नजरेला वेगळेच दृश्य दिसले. जान्ताइ लॉरीजवळ गाल चोळीत उभा होता आणि कादिचा शेताच्या दिशेने पळत चालली होती. तिच्या दिशेने मुठी वळवून तो काहीतरी ओरडला. तिने आपले शरीर गवतावर झोकून दिले आणि दोन्ही हातांनी तोंड लपवून घेतले. हे सारे काय चालले होते ते मला समजले नाही. पण मला तिच्याबद्दल वाईट वाटले. या साऱ्याला मी जबाबदार आहे याची खंत वाटली. मी आसेलला मात्र याबाबत काहीएक बोललो नाही.

आठवड्यानंतर आम्ही आंतरराष्ट्रीय वाहतूक तळानजीकच्या एका छोट्या घरकुलात स्थायीक झालो. दोन दोन खोल्यांच्या झोपड्यांची ती वस्ती होती आणि तिच्यात लॉरी ड्रायव्हर व त्यांची कुटुंबे किंवा पेट्रोल पंपावर काम करणारी माणसे रहात होती. ही फार सोयीची जागा होती. तशी हमरस्त्यावर होती आणि नारीन हे जिल्ह्याचे ठिकाणही दूर नव्हते. तिथे आम्ही सिनेमा पहायला किंवा दुकानात खरेदी करायला जात असू. तिथे इस्पितळही होते. आणखी एक गोष्ट म्हणजे माझ्या कामाच्या मार्गाच्या मध्यावरती हे ठिकाण होते. बहुधा नेहमी आमची रिबाच्ये आणि

सिंकिआंगच्या दरम्यान वाहतूक चालायची. तेव्हा वाटेवर आम्हा ड्रायव्हर लोकांना थोडा वेळ घरात आराम करता यायचा. मी आसेलला जवळजवळ रोज भेटायचा. मी कितीही गडबडीत असलो, कितीही उशिरा आलो तरी घरी जाऊन यायचा. कारण आसेल माझी वाट पहात बसलेली असायची, माझी काळजी करीत बसलेली असायची. आम्ही घरासाठी एक एक वस्तू खरेदी करायला लागलो होतो. घराला घरपण येऊ लागले होते. आसेलने नोकरी धरावी असे आम्ही ठरवले. म्हणजे तिचाच तसा आग्रह होता. खेड्यात रहात असताना तिला कामाची सवय असल्याने घरात नुसते बसून राहणे तिला आवडत नव्हते. आणि एकाएकी एक दिवस तिला समजले – ती आई होणार होती! आमचा आनंद गगनात मावेनासा झाला.

बाळाचा जन्म झाला तेव्हा मी चीनहून परत येत होतो. नारीन येथील प्रसूतीगृहात आसेल होती. मी घाईघाईने, चिंताक्रांत मन:स्थितीत परत येत होतो. मला मुलगा झाला! अर्थात त्या दिवशी त्यांनी मला आसेलला भेटू दिले नाही. मी पुढच्या प्रवासाला निघालो. रस्ता पहाडातून जाणारा होता. हिवाळ्याचे दिवस, हिम आणि खडक यांच्याशिवाय नजरेला दुसरे काही दिसत, नव्हते. त्या काळ्या-पांढऱ्या, पांढऱ्या-काळ्या पट्ट्यांना पाहता पाहता मी चकरावून गेलो. दोलन खिंडीपर्यंतचा रस्ता मी चढून गेलो. हा चढ अफाट आहे. खूप खाली ढग तरंगताना दिसत होते आणि कुंची पांघरलेल्या ठेंगू माणसांप्रमाणे पर्वतांची शिखरे दिसत होती. मी गाडी थांबवून रस्त्यावर उडी मारली, छातीत

ताजी हवा भरली आणि अगदी बेंबीच्या देठापासून ओरडलो :

"हे पर्वतांनो, ऐकलंत का! मला मुलगा झाला!"

उत्तरादाखल पर्वत थरारल्याचा मला भास झाला. साऱ्या कडेकपाऱ्यांमधून त्यांनी माझ्या आवाजाचे प्रतिध्वनी घुमवले.

मुलाचे आम्ही सामत असे नाव ठेवले. हे नाव मी निवडले. सारा वेळ आम्ही सामतबद्दल बोलत असू : आमचा सामत, आमचा छोटा बाळ, सामत आज पहिल्यांदा हसला, सामतला पहिला दात आला... पहिल्या बाळाचे कोडकौतुक तरुण आईबाप कसे करतात ते तुम्हाला माहीत आहेच.

आम्ही आनंदात होतो, एकमेकांवर खूप प्रेम करीत होतो आणि नंतर संकट आले...

* * *

या संकटाचे मूळ कुठून सुरू झाले ते आता सांगणे अवघड आहे. सगळा एकच गोंधळ माजलाय. प्रचंड गोंधळ... ते कशामुळे सुरू झाले हे मला ठाऊक आहे ही गोष्ट खरी, पण त्याचा काय उपयोग?

योगायोगाने त्या माणसाची माझी रस्त्यावर गाठ पडली आणि जेव्हा आम्ही निरोप घेतला तेव्हा आमच्या आयुष्यांच्या वाटा पुन्हा एकमेकींना छेदून जातील असा कधी विचारही मनाला शिवला नाही.

शरदामधले अखेरचे दिवस होते. हवा कमालीची वाईट होती. हिमवर्षाव होत होता का पाऊस पडत होता हे सांगणे कठीण होते. आकाशातून बारिक झिमझिम सतत चालू होती

व वातावरणाला दमटपणा होता. डोंगरउतारांवर धुके दुधाच्या चिकासारखे घट्ट चिकटून बसले होते. समोरच्या काचेवरचे वायपर मी सतत चालू ठेवले होते. एव्हांना मी ऐन पहाडांच्या मध्ये होतो व दोलन खिंड जवळपास आली होती. दोलन खिंड! तिएन शानमधली महाप्रचंड खिंड! या पर्वतराजीचा एक अविभाज्य भाग. अत्यंत कठीण, अत्यंत धोक्याचा रस्ता. नागमोडी रस्त्यांची भेंडोळी चढत चढत तुम्ही आकाशाला भिडता तेव्हा काळ्याकभिन्न पहाडाची महाप्रचंड भिंत अचानक समोर आडवी येते. तुमच्या गाडीच्या चाकांखाली ढगांचा चुरा होत असतो. त्या अवघड चढावर जाताना हातातल्या चाकावर तुम्हाला किंचितही वाकता येत नाही. रेटा दिल्यासारखी तुमची पाठ सीटच्या मागच्या भागाला चिकटलेली असते आणि एकदम एवढा मोठा उतार येतो की, हातातल्या चाकापासून छाती दूर ठेवायला सारी ताकद एकवटून बसावे लागते. आणि एखाद्या दुष्ट स्वभावाच्या उंटासारखी येथील हवा असते. उन्हाळा असो वा हिवाळा असो, दोलन त्याची पर्वा करीत नाही. तिच्या लहरीनुसार ती केव्हाही तुम्हाला गारांच्या वर्षावाने, पावसाच्या धारांनी किंवा हिमवादळाने झोडपून काढते. आमची दोलन ही अशी आहे. पण आम्हा तिएन शानच्या लोकांना तिच्या या लहरींची सवय आहे. रात्रीच्या वेळी तिच्याजवळ जाण्याचेही धाडस आम्ही करतो... ते केवढे प्रचंड धाडस असायचे याची आता आठवण करताना कल्पना येते, पण त्यावेळी दिवसांमागून दिवस काम करताना मी कधी तसे लक्षच दिले नव्हते.

दोलनजवळच्या एका खिंडीशी मी माझी गाडी दुसऱ्या एका लॉरीच्या पुढे काढली. GAZ-51 हा तिचा नंबर अजूनही मला पक्का आठवतो. नेमके सांगायचे म्हणजे मी तिच्या पुढे माझी लॉरी काढली नव्हती. ती रस्त्यावर थांबलेली होती. दोन माणसे ती दुरुस्त करण्याची खटपट करीत होते. त्यांच्यापैकी एकजण हळूहळू चालत रस्त्याच्या मध्यभागी येऊन उभा राहिला व मला थांबविण्यासाठी त्याने हात वर केला. त्याच्या अंगातला ताडपत्रीचा रेनकोट ओलाचिंब झाला होता. त्याने डोक्यावर रेनकोटाचे टोपडे चढवलेले होते. त्याचे वय चाळीसच्या आसपास असावे. दात घासायच्या ब्रशासारख्या आकाराच्या त्याच्या भुऱ्या मिशा होत्या, एकूण थाट सैनिकी आणि चेहऱ्यावर भकास छटा. त्याची नजर संथ होती.

"दोलन रस्ता दुरुस्ती केंद्रापर्यंत मला घेऊन जाणार का भाऊ?" त्याने मला विचारले. ही लॉरी बंद पडलीय. ती खेचून न्यायला मी तिथून ट्रॅक्टर घेऊन येतो."

"जरूर चला माझ्याबरोबर. पण इथंच आपण काही उपाय करू शकणार नाही का?" मी त्याला सुचविले आणि खाली उतरलो.

"काहीही करता येणार नाही. इंजिन मुडद्यासारखं थंड पडलंय," ड्रायव्हर वैतागून म्हणाला व त्याने धाडकन बॉनेट खाली आदळले. बिचारा अगदी घायकुतीला आला होता. गारठ्याने त्याचा चेहरा निळाजांभळा पडला होता. आमच्या भागाला तो नवखा होता. बहुधा तो शहरवासी असावा. या अनपेक्षित आपत्तीने तो हरवल्यासारखा झाला होता.

फुन्झेपासून रस्ता दुरुस्ती केंद्रापर्यंत ते माल वाहून नेत होते. त्यांना कोणत्या प्रकारे मदत करणे शक्य होते? आणि एकाएकी माझ्या डोक्यात एक अफलातून कल्पना चमकली. प्रथम मी खिंडीपलिकडचे आकाश न्याहाळले. ते अंधारत चालले होते व ढग खाली ओठंगले होते. तरीही मी धोका पत्करायचे ठरवले. कल्पना काही खास नव्हती, पण त्यातील धोक्याचे मला आकर्षण निर्माण झाले होते. शत्रूवर हल्ला करायला जाण्यात जी रोमांचकता होती तीच या बाबतीत होती.

"तुमचे ब्रेक व्यवस्थित आहेत?" मी त्या ड्रायव्हरला विचारले.

"असावेत. मी ब्रेकशिवाय ड्रायव्हिंग करीन काय? मी तुम्हाला पुन्हा सांगतो इंजिन बंद पडलंय."

"तुमच्याजवळ तारेचा दोर आहे?"

"अर्थात आहे. का?"

"माझ्या लॉरीशी तुमची लॉरी त्यानं बांधा. मी तुमची गाडी खेचत नेतो."

ते दोघे माझ्याकडे आ वासून पहातच राहिले. कसलीही हालचाल न करता ते निश्चलपणे उभे होते.

"आपल्याला वेड लागलंय का?" ड्रायव्हरने शांतपणे विचारले.

मी हा असा बनलोय; हा स्वभाव चांगला की वाईट ते मला ठाऊक नाही. पण एकदा का एखाद्या कल्पनेने मला झपाटले म्हणजे ती अंमलात आणीपर्यंत मला स्वस्थ बसवत नाही.

"हे बघ मित्रा, मी म्हणतो तसे कर. मी शप्पत तुम्हाला तुमच्या ठिकाणापर्यंत नेऊन पोचवतो," मी म्हणालो.

ड्रायव्हरने हात उडवूनच माझ्या कल्पनेला नकार दिला.

"सोडून द्या विचार. या रस्त्यावर दुसरी लॉरी खेचत न्यायला परवानगी नाही हे तुम्हाला ठाऊक नाही का? मी हा असला विचार डोक्यातसुद्धा आणला नसता."

जणू माझ्यासाठी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट करायला त्याने नकार द्यावा अशी वेदना मला झाली.

"गाढव आहात, भेकड कुठले!"

मी त्या दुसऱ्या माणसाशी सल्लामसलत केली. तो ताडपत्रीच्या रेनकोटातला दुसरा माणूस रस्ता दुरुस्ती कामगारांचा प्रमुख होता हे नंतर मला समजले. त्याने एकदा माझ्याकडे पाहिले आणि ड्रायव्हरला तारेचा दोर लावायला सांगितले.

ड्रायव्हर आता मात्र घाबरला.

"याची जबाबदारी तुमच्यावर राहील बैतेमीर-आके," तो म्हणाला.

"आपण सारेच जबाबदार राहू," तो माणूस तुटकपणे म्हणाला.

मला तो आवडला. असा माणूस चटकन तुमचा आदर पैदा करतो.

अशा प्रकारे मी त्यांची लॉरी खेचू लागलो. प्रथम सारे काही सुरळित चालले. पण दोलनच्या चढावर रस्ता इंजिनाला अत्यंत कठीण जातो. सारा वेळ उभा चढ चढायचा आणि मध्येच जोरदार उतार. इंजिन रोराबू लागले. माझे कान

अक्षरश: बधीर झाले. इंजिनाकडून जास्तीत जास्त काम करवून घेण्याचा मी प्रयत्न करीत होतो. यापूर्वी माझ्या आढळात एक गोष्ट आली होती की, दोलनचा चढ कितीही अवघड असला तरी इंजिन साफ बंद कधी पडले नव्हते. त्यात थोडी अधिक ताकद शिलकीत असायची. आम्ही नेहमी सावधानता राखून माल भरीत असू. एकूण ताकदीच्या ७० टक्केपेक्षा अधिक माल कधीही भरत नसू. अर्थात त्यावेळी मी त्याचा विचार करीत नव्हतो. माझ्या चित्तथरारक कल्पनेने मी झपाटलो होतो. सामर्थ्याच्या विचाराने वेडावलो होतो. हा जुगार जिंकणे मला भाग होते. त्यांना त्यांच्या ठिकाणा-पर्यंत पोचवणे आवश्यक होते. पण मला वाटले होते त्यापेक्षा मामला फारच जड गेला. ताणामुळे माझी लॉरी थरथरू लागली. वायपर्स असूनही समोरच्या काचेवर ओलसर धुरळ्याचे थर बसले. ढग माझ्यावर गर्दीने चालून येत होते. सारा रस्ता त्यांनी व्यापला होता व चाकांखाली ते चुरडत होते. आता वळणे अधिक अवघड होती, उतार जोराचे होते. या भानगडीत स्वत:ची मान अडकवून घेतल्याबद्दल एव्हांना मी स्वत:लाच दूषणे देऊ लागलो होतो. समजा हे दोघे अपघातात ठार झाले तर? इंजिनापेक्षा माझ्यावरचा ताण अधिक मोठा होता. मी टोपी, जाड कोट, जाकीट, स्वेटर असे सारे काही काढून बाजूला ठेवले. अंगात फक्त शर्ट होता तरी वाफेचे स्नान घ्यावे तसा मी घामाने निथळत होतो. लॉरी आणि तिच्यातला माल यांचे एकूण वजन ओढून नेणे म्हणजे चेष्टा नव्हती. फूटबोर्डावर उभे राहून बैतेमीर मला मदत करीत होता. तो ओरडून मला

दिशा सांगायचा आणि आपल्या ड्रायव्हरला इशारे देऊन आमच्या हालचालीत सुसूत्रता आणायचा प्रयत्न करायचा. आम्ही जेव्हा आकड्यासारख्या वळणांवरून जाऊ लागलो तेव्हा मला वाटले की, आता त्याला फूटबोर्डावर उभे राहणे जमणार नाही आणि तो धोका पत्करणार नाही. पण नाही, तो तसूभर डगमगला नाही. भरारी घेणाऱ्या सोनेरी गरुडाच्या पवित्र्यात त्याने आपले शरीर झुकवले आणि दार घट्ट पकडून तो तसाच उभा राहिला. मी त्याच्या चेहऱ्याकडे एकवार नजर टाकली—तो अत्यंत शांत होता. जणू ग्रॅनाईट-मध्ये खोदलेला पुतळा. पावसाचे थेंब त्याच्या गालांवरून ओघळत होते व त्याच्या ओल्या मिशा चकाकत होत्या. माझ्या मनावरचा ताण एकदम हलका झाल्यासारखा वाटला.

आता आम्हाला आणखी फक्त एक चढ चढायचा होता. तेवढा टप्पा पार पडला की आम्ही जिंकली होती. मी अशी खुषीत गाजरे खात असतानाच बैतेमीरच्या आरोळीने माझी तंद्री भंगली: "सांभाळून, समोरून दुसरी लॉरी येतेय. उजवीकडं गाडी घे."

मी उजवीकडे चाक वळवले. कुणीतरी वरून येत होते. तो जान्ताइ होता. तो या प्रकाराबाबत नक्की बोलणार आणि मजूर सुरक्षा प्रमुखाकडून माझी खरडपट्टी निघणार. जान्ताइ जवळजवळ येत होता. त्याची मुद्रा त्रासिक दिसत होती आणि हातातल्या चाकापासून मागे रेटा देऊन तो बसला होता. आम्ही एवढ्या जवळून गेलो की, आमच्या गाड्यांची मडगार्ड्स् एकमेकांना घासून गेली. जान्ताइने मला पाहिले तेव्हा तो चमकला. त्याने तांबडी केसाळ टोपी घातली होती

व रागारागाने तो काहीतरी पुटपुटत होता. "गेलास खड्डयात, जा काय पाहिजे ते सांग," मी मनाशी म्हणालो.

त्या चढाचे वरचे टोक आम्ही गाठले, उभा उतार पार केला आणि रस्ता दुरुस्ती केंद्राच्या वळणापाशी गाड्या आणून उभ्या केल्या. मी काम फत्ते केले होते. मी इंजिन बंद केले आणि जाणीव झाली की, मला काहीही ऐकायला येत नाही. मी बहिरा झालो नाही, तर भोवतालचा निसर्ग मुका बनलाय अशी माझी भावना झाली. अगदी नीरव शांतता पसरली होती. मी सीटवरून उठलो व फूटबोर्डावर धापा टाकीत बसलो; मी दमलो होतो आणि शिवाय खिंडीत हवा अगदी विरळ होती. बैतेमीरने घाईघाईने माझे गरम जाकीट माझ्या खांद्यांवर लपेटले आणि माझी टोपी कानांवर ओढून घेतली. दुसरा ड्रायव्हर थरथरत उभा होता. तो पांढराफटक पडला होता आणि त्याच्या तोंडून एक अक्षर फुटत नव्हते. तो माझ्यासमोरच जमिनीवर फतकल मारून बसला आणि सिगरेटचे पाकीट त्याने माझ्यापुढे धरले. मी एक सिगरेट घेतली तेव्हा माझे हात कापत होते. आम्ही साऱ्यांनी सिगरेटी शिलगावल्या आणि दोन चार दम मारल्यानंतर ठिकाणावर आलो. पुन्हा एकदा माझ्यातली खुमखुमी जागी झाली.

"कोण म्हणालं मला जमणार नाही म्हणून?" मी जोराने ओरडलो व त्या ड्रायव्हरच्या पाठीवर एवढ्या जोराने थाप मारली की, तो पटकन पुन्हा खाली बसला. त्या क्षणी आम्ही तिघेही उड्या मारून उभे राहिलो व एकमेकांच्या

खांद्यांवर आणि पाठींवर थापट्या मारीत आनंदाने वेड्यासारखे खिदळू लागलो.

अखेरीस आमचा तो वेडा आनंद ओसरला व आम्ही पुन्हा सिगरेटी पेटवल्या. मी माझे गरम कपडे घातले, घड्याळाकडे पाहिले आणि मला घाई केली पाहिजे हे लक्षात आले.

"बरं आहे, मला गेलं पाहिजे," मी म्हणालो.

बैतेमीरच्या कपाळाला आठ्या पडल्या.

"छे छे, तुला माझ्या घरी आलं पाहिजे आणि माझा पाहुणचार घेतला पाहिजे," तो म्हणाला.

पण माझ्याजवळ तेवढा वेळ नव्हता.

"मला यायला आनंद वाटला असता, पण खरोखरच वेळ नाही," मी म्हणालो. "वाटेत मला माझ्या घरी गेलं पाहिजे. माझी बायको माझी वाट पहात असेल."

"अरे, जाऊ नको एवढ्यात. आपण आता बाटली उघडू या," माझा नवा मित्र, तो दुसरा ड्रायव्हर विनवीत म्हणाला.

"नको, त्याला जाऊ दे," बैतेमीर त्याला पुढे बोलू न देता पटकन म्हणाला. "त्याची बायको त्याची वाट पाहतेय. मित्रा, तुझं नाव काय म्हणालास?"

"इल्याज."

"लौकर घरी जा इल्याज. आम्हाला मदत केल्याबद्दल धन्यवाद."

पुन्हा मुख्य रस्त्याला लागेपर्यंत बैतेमीर फूटबोर्डावर उभा राहून माझ्याबरोबर आला. तिथे त्याने काही न बोलता माझा हात घट्ट दाबला व खाली उडी टाकली.

वळणावर मी मागे वळून पाहिले. बैतेमीर अजूनही रस्त्याच्या मध्यभागी उभा होता. तो विचारात गढून

गेल्यासारखा दिसला. त्याने टोपी दोन्ही हातात गच्च पकडली होती व त्याची मान खाली झुकली होती.

बस्स. तेवढेच. मी झपाट्याने पुढचे अंतर कापू लागलो.

आसेलला मी हा तपशील सांगितला नाही. मी तिला एवढेच म्हणालो की, रस्त्यावर काही लोक अडचणीत सापडले होते त्यांना मदत करण्यात मला वेळ लागला. मी माझ्या बायकोपासून काही गुप्त गोष्टी दडवून ठेवल्या नव्हत्या. पण ह्या अशा गोष्टी तिला माहीत होणे इष्ट नव्हते. आधीच ती नेहमी माझ्या काळजीत असायची. शिवाय, असला मूर्खपणाचा खेळ पुन्हा खेळायचा माझा इरादा नव्हता. क्वचित एकदाच घडणाऱ्या गोष्टींपैकी तो प्रसंग होता. मी खिंडीतून दुसरी लॉरी खेचून आणली होती आणि अशक्य ते शक्य करून दाखवल्याचा आनंद मिळवला होता. बस्स! मला तिथे थंडीची बाधा झाली नसती, तर दुसऱ्या दिवशी मी त्याबद्दल सारे काही विसरूनही गेलो असतो. परत येताना मला बरे वाटत नव्हते. घरात पाऊल ठेवले आणि मी कोसळलो. तापाच्या उन्मादवायूत मला दुसरे काहीही आठवत नव्हते, तर दोलन खिंडीतून मी सतत लॉरी खेचत नेतोय अशी भावना होत होती. हिमवादळाने मला झोडपून काढले होते, मी एवढा थकलो होतो की मला श्वासही घेता येत नव्हता, मी चाक वळवले पण ते लोकरी सुताचे बनवल्यासारखे वाटत होते आणि माझ्या हातून निसटत होते. माझ्यासमोर खिंड उभी होती–समोरच्या रस्त्याला अंत नव्हता, रेडिएटरचा काटा वरची दिशा दाखवत होता, वर वर चढताना लॉरी रोरावत होती आणि एकाएकी

ती एका कड्याच्या टोकावर गेली... तिसऱ्या दिवशी तब्येतीला उतार पडला. आणखी दोन दिवस संपूर्ण निजून राहिल्यानंतर मला खूपच बरे वाटू लागले व मी बिछान्यात उठून बसू लागलो. पण आसेल मला सक्तीने निजून रहायला लावत होती. तिच्याकडे नीट पाहिल्यानंतर मला असे वाटले की, आमच्यापैकी नक्की आजारी कोण आहे? ती पार बदलून गेली होती. तिचा चेहरा कमालीचा थकला होता. तिच्या डोळ्यांखाली निळी वर्तुळे दिसत होती आणि वाऱ्याने उडून जाईल एवढी ती हडकली होती. शिवाय तिला बाळाचे सर्व काही करावे लागत होते. नाही, हे असे चालायचे नाही असा विचार मनात आला. असे मूर्खासारखे आजारी पडण्याचा व माझी शुश्रूषा तिला करायला लावण्याचा मला काही एक अधिकार नव्हता. तिला थोड्या विश्रांतीची गरज होती. मी उठलो व कपडे करू लागलो.

बाळ जागा होऊ नये म्हणून मी तिला हलकेच हाक मारली, "आसेल. सामतकडे कुणाला तरी लक्ष ठेवायला सांग. तू आणि मी शहरात जाऊन सिनेमा पाहून येऊ या."

ती पळत पळत माझ्याजवळ आली आणि उशांवर माझे डोके टेकवून अशा काही नजरेने पहात राहिली की, जणू काही दीर्घ काळाच्या विरहानंतर ती मला प्रथमच पाहते आहे. अश्रू आवरून धरण्याचा तिने प्रयत्न केला, पण तिच्या पापण्यांवर गोळा झालेले पाणी चमकू लागले आणि तिचे ओठ थरथरू लागले. माझ्या कुशीत डोके खुपसून ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

"आसेल, अगं झालं काय?"

"काही नाही, तू बरा झालास याचा मला खूप आनंद झालाय."

"मलाही मी बरा झाल्याचा आनंद झालाय. पण एवढा त्रास का करून घ्यायचा? मी थोडासा आजारी पडलो तर काय बिघडलं? त्यामुळं तरी मला तुझ्याजवळ सारा वेळ रहायला मिळतं आणि सामतबरोबर हवा तेवढा वेळ खेळता येतं." सामत आता रांगू लागला होता व कोणत्याही दिवशी उभा राहू लागला असता. या अशा वयाची मुले फार गंमतीशीर असतात. मी आसेलला म्हणालो, "तुला खरं सांगू का, मला पुन्हा आजारी पडायला मजा वाटेल."

"नको ग बाई! तू पुन्हा आजारी पडलेला मला पाह्यचा नाही," माझ्या तोंडावर हात ठेवीत आसेल म्हणाली.

सामत तेवढ्यात जागा झाला. त्या अर्धवट झोपाळल्या अवस्थेतल्या ऊबदार सामतला आसेल माझ्या बिछान्याशी घेऊन आली. आम्ही तिघांनी खूप गंमत केली. एखाद्या छोट्या अस्वलासारखा आमच्या अंगावर चढून सामत मस्ती करत होता.

"बघ आहे की नाही गंमत! आणि तू वेडी रडत बसते!" मी म्हणालो. "आपण लौकरच तुझ्या आई-बापांना भेटायला जाऊ या. सामतला त्यांनी एकदा पाहिला म्हणजे ते आपल्याला सारं काही माफ करतील, पूर्वीचं सारं काही विसरतील. बघ ते विसरतील की नाही!"

खरेच, आम्ही तिच्या आईवडिलांकडे जाणार होतो. डोक्यावरची टोपी उतरवून, ती हातात धरून रिवाजाप्रमाणे माफी मागायला जाणार होतो. पण त्याआधी रजेसाठी

मला अर्ज करायला हवा होता, तिच्या नातेवाईकांसाठी भेटी विकत घ्यायला पाहिजे होत्या. मला रित्या हातांनी जायची इच्छा नव्हती.

दरम्यान हिवाळ्याची ऐन थंडी पडू लागली. तिएन शान पर्वतांमध्ये हिवाळा फार कडक असतो. हिमवादळे होतात, अफाट हिमवर्षाव होतो आणि हिमकडे कोसळतात. आमच्या कामाचा त्रास तर वाढतोच, पण रस्ता दुरुस्तीचे काम करणाऱ्या लोकांवर फार ताण पडतो. हिमकडे कोठे कोसळतात यावर त्यांना सतत लक्ष ठेवावे लागते. ज्या ठिकाणी असा धोका निर्माण होतो तेथे वेळीच जाऊन त्यांना बर्फाचा डोंगर उडवून लावावा लागतो आणि रस्ता मोकळा करावा लागतो. त्या हिवाळ्यात नेहमीपेक्षा थोडा कमी त्रास होता हे खरे किंवा कदाचित मला जाणवला नाही. आम्ही ड्रायव्हर लोक सतत कामात असतो याची तुम्हाला कल्पना आहेच. शिवाय आमच्या मोटर डेपोवर जादा कामगिरी सोपविली होती. किंबहुना आम्ही ड्रायव्हर लोकांनी स्वेच्छेने ती अंगावर घेतली होती. मी सर्वांत पहिल्यांदा कामाला पुढे सरसावलो होतो. त्याचा मला आत्ताही पश्चात्ताप होत नाही, पण मला वाटते तेच आगामी संकटपरंपरेचे कारण ठरले. ती हकिकत अशी घडली...

एके दिवशी संध्याकाळी मी डेपोकडे परत चाललो होतो. अलिबेक जान्तुरिनच्या बायकोसाठी आसेलने एक पुडके बांधून दिले होते. ते देण्यासाठी मी त्यांच्या घरासमोर गाडी उभी केली व हॉर्न वाजवला. अलिबेकची बायको बाहेर आली.

"अलिबेक कुठं आहे?" मी तिला विचारले.

"कुठं म्हणून काय विचारता? सगळेजण तिकडं रेल्वे स्टेशनावर गेलेत, त्यात ते पण गेलेत. एव्हांना आगगाडी आलीय म्हणतायत."

ती कशाबद्दल बोलतेय याची मला काहीच कल्पना नव्हती. तेव्हा तिने मला माहिती सांगितली. चीनमधल्या एका कारखान्यातील कामगारांनी आमच्या डेपोला तार पाठवली होती व त्यांचा विशिष्ट माल तातडीने पोचवावा अशी विनंती केली होती.

हा सारा प्रकार काय आहे ते पहायला मी लगबगीने लॉरी स्टेशनाकडे घेतली. तळयाच्या बाजूला जिथे खिंड होती तेथील रेल्वे धक्क्यावर माल उतरवला जातो. तेथील प्रत्येक गोष्टीवर एक चमत्कारिक सावट पडल्यासारखे वाटत होते. वारा भणाणत वहात होता, दिवे हेलकावत होते व प्रत्येक झोताबरोबर रेल्वे स्लीपर्समधील बर्फाचा चुरा उधळला जात होता. रूळांवरून इंजिने डब्यांचे शंटिंग करीत होती. आणखी पलिकडच्या रूळांवर यारीचा हात हवेत अधांतरी लोंबत होता. लोखंडी पट्ट्या व तारेने बांधलेली खोकी तो उतरवीत होता. सिंकिआंगसाठी आंतरराष्ट्रीय वाहतुकीचा माल ते तेथे उतरवीत होते. सिंकिआंगमध्ये उभारण्यात येणाऱ्या एका भल्या मोठ्या अभियांत्रिकी कारखान्यासाठी हा माल चालला होता. आम्ही एव्हांना काही सामग्री तेथे पोचवली होती.

ती जागा लॉरींनी खच्चून भरली होती, पण कुणीही अद्याप माल भरीत नव्हते. ते सारे कशाची तरी वाट पहात

होते. ड्रायव्हर लोक आपापल्या जागांवर गाडीत किंवा फूटबोर्डावर बसले होते. काहींनी वाऱ्याचा त्रास होऊ नये म्हणून रचून ठेवलेल्या खोक्यांच्या ढिगाचा आसरा घेतला होता. मी अभिवादन केले तर उत्तर द्यायची सुद्धा कुणी दखल घेतली नाही. ते मुकाट बसून सिगरेटी फुंकत होते. अलिबेक त्या सर्वांपासून थोडा दूर अलग उभा असलेला मी पाहिला. मी त्याच्याजवळ गेलो.

"काय चाललंय इथं? तारेत काय म्हटलंय?"

"ठरल्या वेळेच्या आधी त्यांना कारखाना चालू करायचा आहे."

"मग?"

"मग काय, ते सारं आपल्यावर अवलंबून आहे. रूळांच्या कडेनं लावलेला माल पहा. शिवाय आणखी येतोय. हा माल पोचवायला आपल्याला किती काळ लागेल? आणि त्या लोकांना तर तो तातडीनं हवाय. आपल्यावर भरोसा ठेवून ते बसलेत. प्रत्येक क्षण ते मोजताहेत."

"तू असं काही बोलतो आहेस की जणू हा सारा माझाच अपराध आहे. मला या गोष्टीशी काय कर्तव्य?"

"म्हणजे असा तू विचार करतोस तर? तू दुसऱ्या कुठल्या देशातून आलायस का? ही बाब किती महत्त्वाची आहे हे तुला समजत नाही?"

"तू मूर्ख आहेस," त्याच्या बोलण्याने दुखावून मी म्हणालो आणि तिथून चालता झालो.

दरम्यान तिथे डेपोचा प्रमुख अमानजोलोव आला. एकाने पेटविलेल्या काडीची ज्योत आपल्या कोटाच्या आडोशाने पेटती

ठेवून त्याने आपली सिगरेट पेटविली. अमानजोलोवने आम्हा साऱ्यांवरून एकवार दृष्टी फिरविली.

"मी मंत्रालयाशी फोन लावतो. कदाचित ते आपल्याला जादा कुमक पाठवतील. पण कॉम्रेडहो, त्यावर विसंबण्यात अर्थ नाही," तो म्हणाला. "आपण काय करू शकू हे अजून मला नक्की ठाऊक नाही..."

"हा एक अवघड प्रश्न आहे हे ठीक आहे कॉम्रेड अमानजोलोव," एक आवाज उमटला. "पण हा माल अवजड आहे. एका वेळी दोन किंवा तीन खोक्यांपलिकडे आम्ही जास्त माल वाहून नेऊ शकणार नाही आणि अगदी चोवीस तास सतत काम केले तरी येत्या वसंतापर्यंत हा सगळा माल इथून उठणार नाही."

"तोच तर महत्त्वाचा मुद्दा आहे," अमानजोलोव म्हणाला. "ते काही असले तरी ही कामगिरी पार पाडलीच पाहिजे. आता सारे आपापल्या घरी जा आणि स्वस्थपणानं विचार करून तोडगा मिळतोय का पहा."

तो आपल्या गाडीत बसून निघून गेला. आम्हा ड्रायव्हरांपैकी कुणीही जागेवरून हलला नाही. अंधाऱ्या कोपऱ्यात बसलेला कुणीतरी एकजण हलक्या आवाजात जणू स्वतःशीच उद्देशून बोलला :

"आपण सारे खूप प्रयत्न करू. पण एका कातड्यात दोन कोट शिवता येत नाहीत. याचा विचार त्यांनी आधी करायला हवा होता." तो माणूस उठून उभा राहिला, त्याने सिगरेटचे थोटुक पायांखाली चुरगळले आणि आपल्या लॉरीकडे नो गेला.

"ते नेहमी असेच वागतात," दुसऱ्याने त्याची री ओढली. "अगदी गळ्यापर्यंत पाणी आल्यानंतर ते मदतीसाठी ओरडायला लागतात. मग आपण भली माणसे ठरतो."

"ही भावाच्या नात्यानं करायची कामगिरी आहे आणि तू एखाद्या मच्छीबाजारातल्या कोळणीसारखी हुज्जत घालतोयस," कुणीतरी खेकसला.

मी त्या वादविवादात भाग घेत नव्हतो, पण एकाएकी मला खिंडीत लॉरी ओढत नेल्याची आठवण झाली आणि पुन्हा एकदा अंगातून वीज सळसळून गेली.

"अरे दोस्तांनो, ही अगदी सोपी गोष्ट आहे!" मी त्या जमावाच्या मध्यभागी जात ओरडून म्हटले. "आपण ट्रेलर जोडून दुप्पट माल वाहून नेऊ शकतो. आहे काय त्यात मोठंसं अवघड?"

कुणीही यावर काहीच बोलले नाही. काहींनी तर माझ्याकडे नजरही टाकली नाही. पार कवटी सरकलेला माणूसच अशी सूचना करू शकेल असा साऱ्यांच्या चेहऱ्यांवर भाव होता.

हलकेच शीळ घालीत जान्ताइ म्हणाला: "ऐकलंत का मंडळी?" त्याचा आवाज मी ओळखला.

मी त्या दिवशी लॉरी कशी खेचून नेली ते मला त्यांना सांगायचे होते. पण तशी मला कुणी संधीच दिली नाही. एक भला घिप्पाड उंच ड्रायव्हर खोक्यावरून खाली उतरला, त्याच्याशेजारी बसलेल्या ड्रायव्हरकडे त्याने आपले हातमोजे दिले व तो माझ्या दिशेने येऊ लागला. त्याने माझ्या

कोटाच्या कॉलरला गच्च पकडले व स्वतःच्या दिशेने खेचले.

"तुझ्या तोंडाचा वास बघू."

मी त्याच्या तोंडावर फुंकर मारली.

"अरे हा प्यालेला नाही," गोंधळून तो माणूस म्हणाला आणि त्याने मला सोडले.

"मग त्याचं डोकं फिरलं असलं पाहिजे," त्याचा मित्र म्हणाला. दोघेही आपापल्या लॉरींमधून निघून गेले. बाकीचे लोकही आपापल्या जागांवरून उठले व काहीही न बोलता घरी जायला निघाले. एवढी माझी फजिती मी कधी जन्मात अनुभवली नव्हती. शरमेने मी लालबुंद झालो.

"एक मिनिट थांबा, जाऊ नका" मी एका ड्रायव्हर-पासून दुसऱ्याच्या अंगावर धावून जात म्हणालो. "मी पूर्ण विचार करून बोलतोय. ट्रेलर ओढून नेणे अगदी सहज शक्य आहे..."

जुन्या ड्रायव्हरांपैकी एक उस्ताद माझ्या जवळ आला. त्याच्या चेहऱ्यावर वेदना होती.

"माझ्या तरुण मित्रा, मी जेव्हा प्रथम चाक हाती धरलं तेव्हा तू बिछान्यात चड्डी ओली करत होतास. तिएन शानचे पहाड म्हणजे नाचायची जागा नव्हे. मला तुझ्याबद्दल वाईट वाटतं, पण असं स्वतःचं हसं करून घेऊ नको."

उपहासाने स्मित करीत माणसे आपापल्या गाड्यांकडे गेली. आणि जणू साऱ्या जगाला ऐकू गेले पाहिजे अशा थाटात बेंबीच्या देठापासून ओरडलो:

"अरे स्वतःला ड्रायव्हर कशाला म्हणवता? तुम्ही म्हणजे वय झालेल्या म्हाताऱ्या!"

असे म्हणणे अगदी मूर्खपणाचे होते. संकट अंगावर ओढवून घेण्याचा हा शुद्ध गाढवपणा होता.

ते सारे क्षणभर थांबले आणि एकदम माझ्या अंगावर धावून आले.

"तुला लोकांच्या जिवाशी खेळायचंय होय रे?"

"हा आपल्यातला मोठ्ठा संशोधक! अरे हा बोनसच्या पाठीमागं धावतोय!" जान्ताइ ओरडला.

त्यांच्या वाढत्या प्रमाणातील आरोळ्या भीतीदायक होत्या. त्या खोक्यांवर मी दाबला जात होतो. ते मला पिटून माझा भुगा करतील अशी मला भीती वाटत होती, म्हणून मी खाली वाकून चटकन एक फळकूट उचलले.

"सारेजण मागे सरका!" जमावाला ढकलीत कुणीतरी पुढे आला. तो अलिबेक होता.

"शांत रहा!" तो गरजला. "बोल इल्याज, तुझी काय कल्पना आहे ती चटकन सांग."

"काय उपयोग?" धापा टाकीत मी म्हणालो. "त्यांनी कोटाची सारी बटणं तोडून टाकलीत. ठीक आहे. खिंडीतल्या रस्त्यावरून रस्ता दुरुस्ती केंद्रापर्यंत माल भरलेली लॉरी मी एकदा ओढून नेलीय. बस्स, एवढंच."

लोकांना शंका होती, पण ते गप्प राहिले.

"आणि तू तिथपर्यंत गाडी घेऊन पोचलास?" एकाने विचारले.

"होय. मी दोलन चढून पार केली आणि पलिकडच्या रस्ता दुरुस्ती केंद्रापर्यंत गेलो."

"कस काय शक्य आहे!" एकाने तारे तोडले.

“तो उगाच भुंकतोय साला,” दुसरा आवाज ओरडला.

“केवळ कुत्री भुंकतात. गाडी ओढून नेताना जान्ताइनं मला पाहिलंय. ए जान्ताइ, कुठं आहेस तू? सांग त्यांना. आठवतं तुला, तू मला पाहिलं होतंस...”

पण जान्ताइकडून काहीही उत्तर आले नाही. तो त्या जमावात कुठेतरी दडून राहिला. तसा एरवीसुद्धा मला तो आवडत नसे. अर्थात त्यामुळे काही अडले नव्हते. पुन्हा वादविवाद चालू झाला आणि काहीजणांनी एव्हांना माझी बाजू घेतली होती. पण एका शंकेखोराने एका फटक्यात त्यांना गप्पगार केले.

“ही सारी फुकाची बडबड आहे,” कडवट चेहऱ्याने तो म्हणाला. “कुणीतरी केव्हातरी काहीतरी एकदा केलं, म्हणून काय झालं? आपण काही कुक्कुली बाळं नव्हेत. आपल्या मार्गावर ट्रेलर बांधून न्यायला बंदी आहे. आणि कुणीही हे करायला परवानगी देणार नाही. मजूर सुरक्षा प्रमुखासमोर ही बाब ठेवा म्हणजे तो तुम्हाला कसा फैलावर घेतो बघा! तुमच्यासाठी तो काही तुरुंगात जाणार नाही... तेव्हा या प्रकरणावर चर्चा बंद.”

“अरे जा रे! इथं कोण कुणाच्या परवानगीची पर्वा करतो?” दुसरा माणूस म्हणाला. “खिंडीतल्या रस्त्यावरून इवान स्तेपानोविचने तीस सालानंतरच्या काळात आपला दीड टनी ट्रक पहिल्यांदा नेला तेव्हा त्याच्याजवळसुद्धा परवानगी नव्हती. तो सरळ गेला आणि त्यानं कामगिरी फत्ते केली. आत्ता तो इथं आहे, तो सांगील तुम्हाला...”

“मी त्यावेळी तसं केलं हे खरं,” इवान स्तेपानोविच

म्हणाला. "पण आज या बाबतीत मला शंका आहेत. ऐन उन्हाळ्यातही कुणी ट्रेलर ओढून नेण्याचा प्रयत्न केलेला नाही आणि आता तर हिवाळ्याचे दिवस आहेत."

हा सारा वेळपर्यंत अलिबेक गप्प राहिला होता, पण आता त्याने बोलायचे ठरवले.

"आपण चर्चा खूप केली," तो म्हणाला. "आत्तापर्यंत असं कुणी केलं नसलं हे खरं असलं तरी कल्पना अंमलात आणून बघण्यासारखी आहे. मात्र इल्याज तुझ्या पद्धतीनं नव्हे – एकदम धाडदिशी जाण्यात अर्थ नाही! आपण त्यासाठी तयारी केली पाहिजे, योग्य तो विचार केला पाहिजे, कुणा जाणकाराचा सल्ला घेतला पाहिजे आणि चाचण्या घेतल्या पाहिजेत. नुसत्या शब्दांनी काहीच सिद्ध होणार नाही."

"मी माझं म्हणणं सिद्ध करायला तयार आहे," मी जाहीर केले. "तुम्ही विचार करीत बसेपर्यंत मी सिद्ध करून दाखवीन. मग कोण बरोबर ते तुम्ही पहाल!"

अर्थात प्रत्येकाचा एक विशेष स्वभाव असतो. प्रत्येकाला तो काबूत ठेवता आला पाहिजे हे खरे, पण काहीवेळा कुणाकुणाला जमत नाही. चाक माझ्या हाती होते हे खरे असले तरी लॉरीची व रस्त्याची परिस्थिती मला माहीत नव्हती. निराशेच्या, कडवटपणाच्या, रागाच्या अशा सर्व भावनांचा एकत्रित कल्लोळ डोक्यात माजला होता. माझ्या अस्मितेला दिलेल्या आव्हानाचा जेवढा अधिक विचार करू लागलो तेवढा अधिक अधिक मी खचत चाललो. माझ्या दोस्तांनो, जरा थांबा, मी अजून तुम्हाला सिद्ध करून दाखवीन! एखाद्या माणसावर अविश्वास दाखवून त्याची

टवाळी कशी करू नये ते मी तुम्हाला शिकवीन! अति सावधगिरी उपयोगाची नाही हेही मी तुम्हाला दाखवून देईन! अलिबेकची पण कमाल आहे: म्हणे यावर विचार केला पाहिजे, तयारी केली पाहिजे, चाचण्या घेतल्या पाहिजेत! हॅट्! तो विचारी आणि सावध माणूस आहे. पण सावधपणाची आपल्याला पर्वा नाही! मी सरळ ट्रेलर ओढून नेईन आणि त्यांचे शब्द त्यांच्याच घशात घालीन!

मी लॉरी गॅरेजमध्ये परत आणली तेव्हा तिच्याशी खुडबुडत बराच वेळ तिथे रेंगाळत राहिलो. माझ्या डोक्याच्या शिरा ताणून तुटायच्या बेतात होत्या. मला फक्त एक ट्रेलर हवा होता आणि ताबडतोब खिंडीच्या रस्त्याला जायचे होते. काहीही करून मला ते करायलाच हवे होते. पण मला ट्रेलर कोण नेऊ देणार?

खूप विचार करून, मी कुंपणापलिकडच्या फाटकाच्या दिशेने रखडत निघालो. खूप उशीर झालेला होता. डिस्पॅचरची खिडकी सोडली तर बाकी साऱ्या खिडक्या काळोख्या होत्या. मी थांबलो—अरेच्चा, कादिचा आपल्याला हवे ते करू शकेल! डिस्पॅचरला काहीही करायचा अधिकार आहे. कादिचा आत्ता कामावर असावी असे मला वाटले. ती मला नकार देणार नाही, तसे ती करू शकणार नाही. मी काही गुन्हा करायला निघालो नव्हतो. मामला उलट होता आणि सर्वांच्या कल्याणासाठी मी करीत असलेल्या कार्यात ती मला मदत करणार होती.

डिस्पॅचरच्या खिडकीशी मी पोचलो तेव्हा माझ्या लक्षात आले की, त्या खोलीच्या दारातून सरळ आतपर्यंत अलिकडे

फारा दिवसात मी गेलेलो नाही. इतर चारचौघांप्रमाणेच कादिचाबरोबर खिडकीच्या झरोक्यातून बोललोय. या विचाराने मला शरमल्यासारखे झाले. दार उघडले गेले व कादिचा बाहेर आली.

"कादिचा, मी तुलाच भेटायला आत येत होतो. तू अजून गेलेली नाहीस हे पाहून बरं वाटलं."

"मी चाललेय."

"चल, मी तुझ्या घरापर्यंत सोबतीला येतो."

तिने आश्चर्याने भुवयांची कमान केली व माझ्याकडे एकवार शोधक नजर टाकून म्हणाली: "ठीक आहे."

आम्ही फाटकांमधून बाहेर पडलो. रस्त्यावर काळोख होता. सरोवरावरून थंडगार वारा सुटला होता आणि किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटांचा आवाज ऐकू येत होता. कादिचाने माझ्या बाहूला धरले व वाऱ्याने कापत असल्याने ती मला घट्ट बिलगली.

"थंडी वाजतेय?" मी तिला विचारले.

"तू इतका जवळ असताना मी गोठणार नाही," ती हसून म्हणाली.

एक मिनिटभरापूर्वी माझ्या सर्व शिरा पार टोकापर्यंत ताणल्यासारख्या झाल्या होत्या, पण आता काही कारणाने मी एकदम पुरा शांत झालो.

"कादिचा, उद्या तू कामावर केव्हा जाणार?"

"दुपारी. का?"

"माझ्या डोक्यात एक योजना घोळतेय. फार महत्त्वाची आहे आणि सारं काही तुझ्यावर अवलंबून आहे."

माझी योजना तिला प्रथम मुळीच पटली नाही, पण मी माझा हेका धरून राहिलो. कोपऱ्यावरच्या दिव्याखाली आम्ही उभे होतो.

माझ्या डोळ्यांमध्ये काळजीने बघत एक सुस्कारा टाकून कादिचा म्हणाली, "इल्याज, यातून तुझं काही चांगलं होणार नाही."

पण माझी मागणी अखेरीस ती मान्य करणार हे मला निश्चित ठाऊक होते.

तिचा हात माझ्या हातात घेत मी तिला म्हणालो, "माझ्यावर विश्वास ठेव. सारं काही ठीक होईल. तू करशील ना तेवढं?"

तिने निरुपायाचा निश्वास टाकला.

"तुझ्यासारख्या माणसाबरोबर कोण काय बोलणार?" असे म्हणून तिने संमतीदर्शक मान हलवली.

चटकन मी तिला घट्ट मिठी मारली.

"कादिचा, तू मैत्रिणीपेक्षा मित्र असायला हवी होतीस! उद्या भेटू," मी तिचा हात घट्ट धरून हस्तांदोलन केले. "संध्याकाळपर्यंत सारे कागद तयार ठेव. ठीक आहे?"

"पळून जाऊ नकोस," आपल्या हातात माझा हात पकडून ती म्हणाली. मग एकाएकी वळून ती म्हणाली: "ठीक आहे, जा... वसतीगृहावर चाललास?"

"होय कादिचा."

"गुड नाईट."

दुसऱ्या दिवशी आमच्याकडे तांत्रिक तपासणी होती. डेपोतला प्रत्येकजण अस्वस्थ होता. हे साले तपासनीस नेहमी

भलत्या वेळी येतात, प्रत्येक गोष्टीत काहीतरी खोट काढीत बसतात आणि या ना त्या गोष्टीवर अहवाल तयार करीत बसतात. हे लोक म्हणजे निष्कारण एक कटकट आहे. निव्वळ वैताग. सारा वेळ ते मात्र काकडीसारखे थंड असतात.

माझी लॉरी ठाकठीक होती हे मला ठाऊक होते. तरीही मी त्यांच्यापासून दूर राहिलो व काहीतरी दुरुस्ती करीत असल्याचा बहाणा करीत राहिलो. कादिचा कामावर जाईपर्यंत मला वेळ काढणे भाग होते. कुणीही माझ्याशी बोलले नाही, आदल्या रात्रीच्या भांडणाबद्दल कुणी चकार शब्द काढला नाही. अर्थात त्यावेळी माझी दखल घेण्याच्या मन:स्थितीत कुणीही नव्हते. तपासणीची भानगड लौकरात लौकर निस्तरून आपल्या मार्गाला लागण्याच्या धांदलीत जो तो होता. मला मात्र सबंध वेळ चीड येत होती.

दुपारी माझी पाळी आली. ते तपासनीस अखेरीस एकदाचे गेले. सारी जागा मोकळी आणि शांत भासत होती. आमचे ट्रेलर आवाराच्या पिछाडीला ठेवलेले होते. सरळ रस्त्यांवर स्थानिक कामासाठी मधून मधून त्यांचा वापर करीत असत. मी माझ्या पसंतीचा एक ट्रेलर निवडला. चार चाकांवरची ती एक साधी चॅसीस होती. पण या साध्या दिसणाऱ्या ट्रेलरने केवढा गोंधळ केला आणि केवढी संकटे आणली... पुढे काय वाढून ठेवलेय याची मला आधी कल्पना असती तर! पण ती मला नव्हती आणि म्हणूनच अत्यंत निवांतपणे मी वसतीगृहावर गेलो; छानपैकी चापून जेवायचे आणि तासभर ताणून द्यायची असा

विचार होता. हा मामला कठीण जाणार याची मात्र कल्पना होती. झोप काही केल्या येईना. बिछान्यात मी सतत चुळबुळत राहिलो. काळोख पडू लागला तसा मी डेपोत परत गेलो.

कादिचा तेथे होतीच. सारे कागद तयार होते. ते उचलून मी घाईघाईने गॅरेजकडे आलो. "आता बघा लेको सगळे!" मनात विचार आला. मी लॉरी ट्रेलरला जोडली, इंजिन चालू ठेवले व बाहेर पडून सभोवती कोण दिसते याची पाहणी केली. कुणीही दृष्टीपथात नव्हते. सरोवराच्या पाण्यावरील लाटेचा आवाज आणि दुरुस्ती खात्यामधील यंत्रांची घरघर एवढेच काय ते आवाज मला ऐकू येत होते. आकाशात एकही तारा चमकत नव्हता. मोटारीची घरघर मागे चालू होती आणि छातीतले ठोके स्पष्टपणे जाणवत होते. मी सिगरेट पेटवायला लागलो आणि एकदम फेकून दिली. नंतर...

वॉचमनने दाराशी मला थांबवले.

"कुठं निघाला?"

"माल भरायला उस्ताद," आवाजात सहजपणा आणायचा प्रयत्न करीत मी म्हणालो. "हा माझा पास."

म्हाताऱ्याने डोळ्याजवळ कागद नेऊन वाचायचा प्रयत्न केला, पण त्या अंधुक उजेडात त्याला अक्षरे लागेनात.

"माझा खोळंबा करताय उस्ताद. काम थांबवून ठेवता येत नाही," अधीरपणे मी त्याला म्हणालो.

माल भरणे ही नित्याची बाब होती. मी जास्तीत जास्त माल भरून घेतला. त्याबद्दल कुणी चकार शब्द

काढला नाही याचे मला आश्चर्य वाटले. चांगला हमरस्त्याला लागेपर्यंत मी सिगरेट पेटवली नाही. मग जरा आरामात बसलो, पुढचे दिवे पेटवले आणि वेग वाढवला. अंधारा रस्ता एकदम जागा झाला व जोरात पळू लागला. सारा मार्ग मोकळा होता, तुफान वेगात जायला मला अडवणारे कुणीही नव्हते. प्रवास अगदी सुरळीत चालला होता. मागच्या ट्रेलरची खडखड जाणवत नव्हती. वळणावर चाके किंचित घसरत होती आणि लॉरी काबूत ठेवणे जरा अवघड जात होते ही गोष्ट खरी. पण थोड्या सरावाने सारे ठीक होईल असा मी विचार केला. घोडेस्वार घोड्याच्या मानेला बिलगून बसतो तसा मी चाकावर बसलो होतो. रस्ता सरळ असेपर्यंत वेगात जाणे मला आवश्यक होते. मध्यरात्रीच्या दरम्यान माझी दोलनवर चढाई चालू होईल अशी अपेक्षा होती.

सुरुवातीला माझ्या अपेक्षेपेक्षा मी चांगली प्रगती केली होती. पण घाटाचा रस्ता सुरू झाला तसे अधिक काळजीपूर्वक गाडी चालविणे भाग होते. संपूर्ण भरलेला माल इंजिनाला जड जात होता अशातला भाग नव्हता; घाटाची चढण अवघड होती, पण त्यापेक्षा मधले उतार अतिवाईट होते. ट्रेलर कलंडत होता, धडधडत होता, लॉरीवर घुसून आदळत होता आणि त्यामुळे मला बराच त्रास होत होता. गीअर सारखे बदलावे लागत होते, ब्रेकचा सतत वापर करावा लागत होता आणि चाके नीट रस्त्यावर ठेवावी लागत होती. प्रथम मी स्वत:ला खूप काबूत ठेवले होते आणि तो सारा त्रास सहन करीत होतो. पण पुढे पुढे मला फारच

कठीण जाऊ लागले. हे सगळे घाटातले चढउतार कुणी कधी मोजले असतील का असा विचार मनात डोकावू लागला. तरीही मी हिंमत सोडली नव्हती. धोका नव्हता. फक्त मी पुरा दमून जाणार होतो. "काही हरकत नाही. खिंड येण्यापूर्वी मी चांगली विश्रांती घेईन. ही कामगिरी मी फत्ते करीन." त्या शरदामधल्या दिवशी बैतेमीरची लॉरी ओढून नेताना झाला त्यापेक्षा अधिक त्रास का होतोय याचा विचार करायला मी थांबलो नाही.

दोलन जवळ येत चालली होती. खिंडीतल्या प्रचंड दगडांवर व रस्त्याच्या कडेने उभ्या असलेल्या हिमाच्छादित कड्यांवर माझ्या लॉरीचे पुढच्या दिव्यांचे झोत नाचत होते. मोठमोठे हिमकण तरंगत खाली येत होते. "वाऱ्यामुळे बर्फ उडाले असावे" असा मनात विचार आला. पण समोरच्या काचेवर हिमकण घट्ट चिपकून बसू लागले तेव्हा बाहेर हिमवर्षावच होतो आहे याची मला खात्री पटली. तो ओला बर्फ खूप जोरात काचेवर आपटत होता. दातओठ खात मी त्याला दूषणे देत वायपर चालू केले.

खिंडीच्या दिशेचा पहिला उंच चढ सुरू झाला. इंजिनाची ती कान बधीर करणारी परिचित घरघर चालू झाली. एकसुरी, कर्कश्य आवाजाने घनदाट काळोखे वातावरण भरून गेले. अखेरीस त्या चढाचा वरचा टप्पा मी गाठला. आता मला लांबच लांब उतार पार करायचा होता. इंजिन गुरगुरत होते व लॉरी हिंदकळत, घसरत चालली होती. माझ्या मागे ट्रेलरचा वेड्यासारखा थयथयाट चालला होता. तो लॉरीच्या मागील भागावर सारखा आदळत होता, माझ्या

पाठीला सारखे जोरात धक्के बसत होते. सांध्याच्या ठिकाणी धातूवर धातू घासून कर्णकटु आवाज होत होता व अंगावर काटा उभा रहात होता. त्या घासण्याच्या आवाजाने मी पुरता हैराण झालो होतो, मागून बसणाऱ्या धक्क्यांनी पाठीला विलक्षण रग लागली होती व ती वेदना दंडांपर्यंत पोहोचत होती. चाके ब्रेकना जुमानीनाशी झाली होती व ओल्या बर्फावरून सरासरा घसरत होती. लॉरी रस्त्याच्या उतारांवरून जोरात घसरणीला लागली, जोरजोरात हादरे बसू लागले आणि चाक माझ्या हातून सारखे सुटू लागले. मोठ्या कष्टाने ते गच्च पकडून मी जोरात ब्रेक दाबले. मी पुढे जाऊ शकत नव्हतो. माझ्यात तेवढी ताकद उरली नव्हती. मी पुढचे दिवे मालवले आणि इंजिन बंद केले. माझे हात लाकडासारखे बधीर झाले. माझाच श्वास मला ऐकू येऊ लागला. काही मिनिटांनंतर मला बरे वाटू लागले. मी एक सिगरेट पेटवली. माझ्याभोवती दाट, एकाकी काळोख पसरला होता. दाराच्या फटीमधून जोरात घुसणाऱ्या वाऱ्याची शीळ तेवढी ऐकू येत होती. पुढे काय वाढून ठेवले आहे या कल्पनेनेच मी पार खचलो. यापुढचा रस्ता म्हणजे आकड्याच्या आकाराची प्रचंड नागमोडी चढण होती. ही घाटाची अखंड चढण इंजिनावर आणि ड्रायव्हरच्या हातांवर जबरदस्त ताण देणारी होती. अर्थात मी तिथें बसून शोक करू शकत नव्हतो. बर्फ जोरात पडू लागले होते.

मी इंजिन चालू केले. पीडादायी आवाज करीत लॉरी चढण चढू लागली. दात घट्ट आवळून मी एकापाठोपाठ एक वळण पार पाडीत चाललो होतो: श्वास घ्यायला फुरसद

नव्हती. नागमोडी वळणे आता मागे राहिली. यानंतर आता एक जोरदार उतार पार करायचा होता आणि रस्ता दुरुस्ती केंद्राच्या वळणापाशी पोचल्यानंतर एक शेवटची चढण होती. मोठ्या कष्टाने मी उतार पार केला. नंतरच्या सुमारे चार किलोमीटर सरळ रस्त्यावर मी अगदी हळू गेलो. पुढच्या चढणीसाठी माझी सारी ताकद मी एकवटत होतो. मी वर वर चढू लागलो... आणखी वर गेलो... पण रेटा तेवढा जोरात मिळत नव्हता. साहजिकच इंजिनाचा वेग मंदावू लागला. मी दुसरा गीअर टाकला, मग खालच्यात गेलो. मी चाक गच्च पकडून धरले. काळ्या दाट ढगांच्या फटीतून तारे चमकत होते. लॉरी रेसभरही पुढे हलायला तयार होईना. चाकांची रस्त्यावरची पकड सुटली व ती कडेला घसरू लागली. मी ॲक्सलरेटरवर सारी ताकद पणाला लावून पाय दाबला व वेड्यासारखा किंचाळलो: "चल! आणखी फक्त थोडं अंतर! चल पुढे!"

इंजिनाचा बधीर करणारा घरघराट एकदम वरच्या पट्टीत गेला आणि एकदम प्रचंड आवाज झाला. एक बारिक आवाज आणि इंजिन थंड पडले. लॉरी हळूहळू मागे घसरू लागली. ब्रेक चालेनात. मागच्या अवजड वजनाच्या ट्रेलरने लॉरी झपाट्याने मागे मागे घसरत निघाली व अखेरीस एका खडकावर आपटून थांबली. सारे एकदम शांत झाले. मी दार ढकलून उघडले व बाहेर पाहिले. हे असे घडायचे होते तर! थू: माझ्या जिनगानीवर! ट्रेलर खड्ड्यात कलंडला होता. तो बाहेर खेचून काढण्याचा उपाय माझ्याजवळ नव्हता. जिकीरीला येऊन मी पुन्हापुन्हा इंजिन सुरू करीत

होतो व पुढे धक्का देऊन बाहेर पडू बघत होतो. चाके वेड्यासारखी फिरत होती, लॉरी साऱ्या ताकदीनिशी पुढे जाऊ पहात होती, पण एकही इंच पुढे सरकत नव्हती. मी रस्त्यावर उडी मारली आणि ट्रेलरच्या दिशेने धावलो. चाके खोल खड्ड्यात रुतून बसली होती. रागाने मी आंधळा बनलो व त्या रागाच्या भरात सारे शरीर ट्रेलरवर झोकून त्याला जोरात धक्का मारला. मग ओणवा झालो, खांद्याने ट्रेलरला टेकू दिला आणि त्याला वर उचलू लागलो. एखाद्या जनावरासारखा माझ्या तोंडून आवाज निघत होता. त्या जबरदस्त ताणामुळे मस्तकात मरणांतिक वेदना होत होती. पण नशीबाने जराही हात दिला नाही. थकून मी रस्त्यावरच पालथा पडलो आणि बर्फाच्या व चिखलाच्या राड्यात तोंड खुपसून ढसढसा रडलो. मी उठलो तेव्हा लॉरीला अडखळलो व फूटबोर्डावर बसलो.

एकाएकी दूरवरून येणाऱ्या मोटरीचा आवाज ऐकू आला. उभ्या उतारावर प्रकाशाचे दोन प्रखर झोत दिसू लागले व सरळ रस्त्यावरून माझ्या दिशेने जवळ जवळ येऊ लागले. त्या गाडीचा ड्रायव्हर कोण होता आणि एवढ्या मध्यरात्री तो इकडे कशाला आला याचा मी विचार करीत बसलो नाही. मला धास्ती वाटत होती फक्त त्या दोन प्रकाशझोतांची. जणू मला पकडायला ते धावत येत होते. मुद्देमालानिशी एखादा चोर पकडला जात असताना तो जसा पळून जाईल तसा मी गडबडीने उठलो, ट्रेलर व लॉरी यांना जोडणारी साखळी सोडली, घाईने गाडीत बसलो व ट्रेलर

खड्ड्यातच सोडून लॉरी तेवढी घेऊन भरवेगाने चढावर पळालो.

एका चमत्कारिक भीतीने मला ग्रासले होते. ट्रेलर माझा पाठलाग करीत होता, तो मला गाठत होता... मी कमाल वेगाने चाललो होतो. मला त्यावेळी अपघात झाला नाही त्याचे एकमेव कारण म्हणजे मला रस्ता चांगला ठाऊक होता.

आंतरराष्ट्रीय वाहतूक तळावर मी पोहोचलो तेव्हा पहाट उजाडली होती. एखाद्या पिसाळलेल्या वेड्याप्रमाणे मी घराच्या दारावर दाणदाण मुठी आदळल्या. आसेलने दार उघडले तेव्हा तिच्याकडे अजिबात न पाहता तसाच डोक्यापासून पायापर्यंत चिखलाने माखलेल्या अवस्थेत मी घरात सरळ गेलो. कसल्यातरी ओलसर ढिगाला मी अडखळलो. धुतलेल्या कपड्यांचा तो ढीग होता. मी सिगरेटसाठी सारे खिसे चाचपले. बोटांना इंजिन चालू करायच्या चाव्या लागल्या. त्या मी भिंतीवर भिरकावल्या, मान खाली झुकवली आणि अजिबात न हलता, सुन्न मन:स्थितीत तशाच घाणेरड्या अवस्थेत बसून राहिलो. फरशीवर रोखून पहात असताना टेबलाच्या खुरांशी आसेलची पावले अस्वस्थपणे चुळबुळ करताना दिसली. मी तिला काय सांगणार? मी भिरकावलेल्या चाव्या तिने उचलल्या आणि टेबलावर ठेवल्या.

"तुला आंघोळ करायचीय का? गेल्या रात्रीपासून मी पाणी गरम करून ठेवलंय," ती हळूच म्हणाली.

सावकाशपणे मी मान वर उचलली. रात्रीच्या कपड्यात आसेल माझ्यापुढे थरथरत उभी होती. तिचे बारिक हात

वक्षाशी घट्ट आवळलेले होते. तिचे घाबरलेले डोळे माझ्याकडे काळजीने आणि सहानुभूतीने पहात होते.

"पहाडात माझ्या हातून ट्रेलर खड्ड्यात पडला," मी चमत्कारिक, थंड आवाजात म्हणालो.

"कसला ट्रेलर?" तिने गोंधळून विचारले.

"अगदी साधा हिरव्या रंगाचा ०२-३८ नंबरचा ट्रेलर! कसला ट्रेलर होता हे महत्त्वाचं आहे का?" मी चिडून ओरडलो. "मी तो चोरला होता, समजलं? चोरला होता."

एक अस्फुट चीत्कार काढीत आसेल पलंगावर बसली.

"पण कशासाठी?"

"कशासाठी! कशासाठी!" तिला काही समजत नव्हते याचा मला आणखीच राग आला. "मला खिंडीतून ट्रेलर खेचून आणायचा होता. समजलं? मला त्यांना हे दाखवून द्यायचं होतं... आणि मी पराभूत झालो."

मी दोन्ही हातांमध्ये चेहरा झाकून घेतला. थोडा वेळ आम्हा दोघांपैकी कुणीच बोलले नाही. एकाएकी आसेल उठून उभी राहिली व कपडे करू लागली. तिच्या नजरेत एक प्रकारचा ठाम निश्चय दिसत होता.

"चल, नुसता तिथं स्वस्थ बसून राहू नकोस," ती खंबीर आवाजात म्हणाली.

"मग मी काय करू?" अडखळत मी विचारले.

"डेपोत परत जा."

"कसा? ट्रेलरशिवाय?"

"तिथं गेल्यावर सारं समजावून सांग."

"तू वेडी आहेस का?" संतापून मी ओरडलो आणि खोलीत जोरजोराने येरझाऱ्या घालू लागलो. "ट्रेलरशिवाय तिथं जाताना मी अगदी सुंदर दिसेन नाही? मला माफ करा, माझं चुकलं, मला क्षमा करा! मी लाचार होऊन त्यांच्यापुढं नाक घासावं आणि त्यांच्या दयेची याचना करावी असं तुला वाटतं? ते कधीही जमणार नाही! त्यांना काय करायचं ते करू दे. मला त्यांची अजिबात पर्वा नाही!"

माझ्या ओरडण्याने सामत जागा झाला. तो रडू लागला. आसेलने त्याला उचलून कडेवर घेतले, पण तो अधिकच जोराने रडू लागला.

"तू भित्रा आहेस," शांतपणे पण खंबीर सुरात आसेल म्हणाली.

"का ऽऽ य?" मी संतापाने बेभान झालो. तिला मारायला मी तिच्या अंगावर धावून गेलो, पण हात टाकायची हिंमत झाली नाही. तिच्या विस्फारलेल्या मोठ्या डोळ्यातील आश्चर्याने मला थांबवले. तिच्या डोळ्यांच्या बाहुल्यात मला माझा विद्रूप चेहरा दिसला.

तिला बाजूला ढकलून मी दाराकडे तरातरा गेलो आणि दरवाजा धाडकन आपटून बाहेर गेलो.

एव्हांना बाहेर चांगलेच उजाडले होते. आणि त्या दिवसाच्या उजेडात रात्रीच्या सर्व घटना मला अधिकच काळ्याकुट्ट, कुरूप व कधीही दुरुस्त करता येणार नाहीत असे वाटू लागले. लॉरीत असलेला माल पोचवणे एवढेच आता मी करू शकत होतो. करण्यासारखी एवढीच गोष्ट माझ्या हातात आता होती. आणि त्यानंतर काय घडेल ते मला ठाऊक नव्हते...

परतीच्या वाटेवर मी घरी गेलो नाही... आणि आसेलशी मी भांडलो हे त्याचे कारण नव्हते. मला कुणाला माझा चेहरा दाखवायची इच्छा नव्हती, मला कुणाला भेटायची इच्छा नव्हती. इतर लोकांचे मला ठाऊक नाही, पण जेव्हा मी अडचणीत असतो तेव्हा मला एकटे रहावेसे वाटते. कुणीही माझी संकटातली अवस्था पाहू नये असे वाटते. अर्थात माझ्या अडचणींची कुणाला काळजी? दात घट्ट आवळून संकट नाहीसे होईपर्यंत साऱ्या वेदना मुकाट सहन करायच्या...

त्या रात्री मी लॉजमध्ये झोपलो. ती झोप नव्हती तर एक लांबलचक भयंकर वाईट स्वप्न होते. मी पहाडात ट्रेलरचा शोध घेतोय असे स्वप्न पडले. मला चाकाच्या खुणा दिसत होत्या पण ट्रेलर तिथे नव्हता. तो कुणी नेला, कुठे नेला याची मी प्रत्येकाजवळ अगदी काकुळतीने चौकशी करीत होतो...

आणि मी परतीच्या वाटेवर असताना त्या दुर्घटनेच्या ठिकाणी तो खरेच नव्हता. मला नंतर समजले की, अलिबेकने तो डेपोत परत नेला होता.

अलिबेक आणि ट्रेलर यांच्या पाठोपाठच मी तिथे आलो होतो. समोरच्या आरशात मी जेव्हा नजर टाकली तेव्हा माझा चेहरा स्वतःलाच ओळखू येणार नाही एवढा भकास आणि ओढलेला दिसत होता.

त्या सकाळी डेपोत नेहमीप्रमाणेच दैनंदिन कामे चालू होती. प्रत्येकजण आपल्या नेहमीच्या कामात गुंतला होता. फक्त मलाच एखाद्या अपराध्यासारखे वाटत होते. थोड्याशा

अनिश्चित मनःस्थितीत मी फाटकातून लॉरी आवारात आणली व गॅरेजपासून जास्तीत जास्त दूर अंतरावर उभी केली. मी चटकन खाली उतरलो नाही. एकदा चारी बाजूंना नीट न्याहाळून पाहिले. आपापल्या हातातील कामे खाली टाकून लोक माझ्याकडे पहात होते. बापरे, त्याचक्षणी लॉरी परत फिरवून तिथून निघून जाण्याची जबरदस्त ऊर्मी मनात उमळली होती. पण तसे करता येत नव्हते आणि मी खाली उतरलो. सारे मनोबल एकवटून आवार ओलांडून मी डिस्पॅचरच्या ऑफिसकडे गेलो. जणू काही कशाशी माझा संबंध नाही असे भासविण्याचा मी प्रयत्न केला, पण प्रत्यक्षात मात्र सैन्याच्या रांगांसमोरून चालणाऱ्या एकाकी गुन्हेगारासारखे मला वाटत होते. सारे ड्रायव्हर कुत्सित नजरांनी मला पाहताहेत हे जाणवत होते. कुणीही मला हाक मारली नाही किंवा अभिवादन केले नाही. त्यांच्या जागी मी असतो तर मीही असाच वागलो असतो असे मला वाटले.

उंबरठ्याला मी अडखळलो आणि त्या धक्क्यासरशी भानावर आलो: कादिचाबद्दल मी साफ विसरून गेलो होतो. वस्तुतः माझ्यामुळे तिच्यावर मोठे संकट गुदरलेले होते आणि एवढा वेळपर्यंत मला तिची अजिबात आठवण झाली नव्हती.

व्हरांड्यात टांगलेले एक पोस्टर मला वाकुल्या दाखवीत होते. "शरमेची गोष्ट" अशी मोठी अक्षरे त्यावर लिहिलेली होती आणि खाली घाटात सोडून दिलेल्या ट्रेलरचे चित्र होते...

मी दुसरीकडे पाहिले. कुणी खाडकन थोबाडात मारावी तशी मला वेदना झाली. मी डिस्पॅचरच्या ऑफिसमध्ये

शिरलो. कादिचा फोनवर कुणाशीतरी बोलत होती. मला पाहताच तिने फोन खाली ठेवला.

"हे घे," मी माझा कामाचा कागद तिच्या टेबलावर फेकला.

कादिचाने सहानुभूतीने माझ्याकडे पाहिले. तिने आता अधिक गोंधळ करू नये, रडायला सुरुवात करू नये एवढीच प्रार्थना मी मनाशी करीत होतो. "नंतर कुठेतरी, पण आत्ता काही नको!" असे मी डोळ्यांनीच तिला दटावले. ती समजली व काहीही बोलली नाही.

"त्यांनी बराच आरडाओरडा केला?" मी खालच्या आवाजात तिला विचारले.

कादिचाने होकारार्थी मान हलवली.

"घाबरू नको," मी दात आवळून तिला धीर देण्याचा प्रयत्न करीत म्हणालो.

"तुझं या मार्गावरचं काम त्यांनी काढून घेतलंय," ती म्हणाली.

"त्यांनी असं केलं? कायमचं?" मी छद्मीपणे हसत विचारले.

"त्यांचा तसाच विचार होता... पण ड्रायव्हर तुझ्या बाजूनं उभे राहिले... तुला त्यांनी तात्पुरतं स्थानिक कामावर नेमलंय. जाऊन साहेबांना भेट. ते तुझी वाट पाहताहेत."

"कशाला? माझ्याशिवाय ते निर्णय घेऊ शकतात. मी त्याबद्दल रडत बसणार नाही."

अत्यंत वाईट मन:स्थितीत मी तिथून बाहेर पडलो व व्हरांड्यामधून चालू लागलो. कुणीतरी माझ्या दिशेने येत

होते. मला त्याला टाळून जायचे होते, पण अलिबेकने माझा रस्ता अडवला.

"जरा थांब," मला कोपऱ्यात अडवीत तो म्हणाला. माझ्याकडे दुष्ट नजरेने पहात तो घोगऱ्या आवाजात म्हणाला: "काय शूर वीरा, तू काय सिद्ध केलंस? तू नालायक आहेस हेच ना?"

"मी माझ्याकडून शिकस्त केली," मी पुटपुटलो.

"खोटं आहे ते! तुला सारं श्रेय उपटायचं होतं. तू फक्त तुझ्या फायद्यासाठी केलं होतं, इतर कुणाहीसाठी नाही. पण एका चांगल्या कल्पनेचा त्यापायी तू सत्यानाश केलास. खिंडीमधून ट्रेलर ओढून नेता येतो हे आता कुणालातरी सिद्ध करून दाखव. महामूर्ख आहेस तू. नुसता उपटसुंभ!"

दुसऱ्या एखाद्या माणसाला त्याच्या शब्दांमध्ये तथ्य जाणवले असते, पण मला मात्र तसे जाणवले नाही. मी त्यापलिकडे पोचलो होतो. मला त्याच्या या बोलण्यामुळे अधिकच अपमान झाल्यासारखा वाटत होता. तर मी महाउद्धट उपटसुंभ आहे, सारे श्रेय मला हवे असे त्याला वाटते काय! पण हे खरे नव्हते!

"माझ्या वाटेतून बाजूला हो. आधीच मी वैतागलोय," अलिबेकला बाजूला ढकलीत मी म्हणालो.

मी बाहेर गेलो. आवारातील बर्फाचा भुगा चावऱ्या थंडगार वावटळीबरोबर भिरभिरत होता. सारी माणसे माझ्याकडे संशयित नजरेने पहात होती. कुणीही एक शब्द बोलत नव्हते. मी काय करणार होतो? पँटच्या खिशात हात कोंबून मी फाटकाच्या दिशेने निघालो.

डबक्यांवरील बर्फाचा पातळ पापुद्रा माझ्या पायांखाली चुरडला जात होता. वंगणाचे एक रिकामे डबडे मी तिथे पडलेले पाहिले आणि सारी ताकद एकवटून त्याला लाथ हाणली. फाटकामधून ते तीन ताड रस्त्यावर उडाले आणि मीही त्या पाठोपाठ रस्त्यावर गेलो.

तो सारा दिवस त्या छोटया गावातल्या रस्त्यांवरून आणि रिकाम्या धक्क्यावरून मी निरुद्देशपणे भटकत राहिलो. इस्सिक-कुलवर वादळी हवा होती. नांगरलेले पडाव जोरजोराने हिंदकळत होते.

धक्क्यावरच्या गुत्त्यात मी कधी जाऊन बसलो ते समजलेच नाही. माझ्यासमोरची वोदकाची बाटली अर्धी रिकामी झाली होती व समोरच्या थाळीत चिवडलेले अन्न पडले होते. मी वेड्यासारखा माझ्या बुटांकडे रोखून पहात होतो. पहिल्याच ग्लासात माझी कवटी सरकली होती.

"काय मित्रा, एवढा उदास का?" किंचित उपरोधाने पण मित्रत्वाच्या जवळिकीने कोणीतरी माझ्याजवळ येऊन बोलल्याचे जाणवले. मोठ्या कष्टाने मी मान वर उचलून पाहिले. कादिचा माझ्या शेजारी उभी होती.

"एकटयानं पिण्यात काही गंमत नाही, खरं की नाही?" हसून ती म्हणाली व खुर्ची माझ्या टेबलाशी सरकवून बसली. "आपण बरोबर पिऊ या. चालेल?"

तिने दोन ग्लासांमध्ये वोदका ओतली आणि माझा ग्लास माझ्याकडे सरकवला.

"चल घे," असे म्हणून हसत हसत तिने मला डोळा घातला. आम्ही जणू काही मजेने पिण्यासाठी आणि गप्पा

मारण्यासाठी तिथे येऊन बसलो आहोत असेच ती वागत होती.

"एवढा आनंद कसला झालाय?"

"उगीच उदास कशाला बसायचं? इल्याज, तू जेव्हा बरोबर असतोस, तेव्हा कशाचीच पर्वा वाटत नाही बघ. तू फार घट्ट मनाचा माणूस असशील असं मला वाटलं होतं. जाऊ द्या, चल घे," असे म्हणून ती किंचित गालातल्या गालात हसली, माझ्या अधिक जवळ सरकली, माझ्या ग्लासाशी तिने आपला ग्लास भिडवला व तिचे काळेशार डोळे माझ्या डोळ्यांचा वेध घेऊ लागले.

आम्ही प्यायलो. मी सिगरेट पेटवली आणि मला एकदम थोडे बरे वाटले. सबंध दिवसात पहिल्यानेच मला हसू फुटले.

"कादिचा, तू मोठी मस्त खिलाडू स्वभावाची आहेस," असे म्हणून मी तिचा हात माझ्या हातात धरला.

आम्ही जेव्हा तिथून बाहेर पडलो तेव्हा चांगलाच अंधार पडला होता. सरोवरावरून वहात येणाऱ्या वाऱ्याच्या झोतांनी झाडांचे शेंडे व रस्त्यावरचे दिवे हलत होते. माझ्या पायाखालची जमीन तरंगत असल्याचा मला भास होत होता. माझ्या दंडाला धरून कादिचा मला सांभाळून नेत होती. अगदी हळुवारपणे तिने माझ्या कोटाची कॉलर वर केली.

"कादिचा, मी तुला निष्कारण संकटात टाकलं," मी म्हणालो. तिच्या बाबतीत माझ्याकडून झालेला प्रमाद आणि तिच्या वागण्याने वाटणारी कृतज्ञता यांच्या संमिश्र भावनांनी मी गलबलून गेलो होतो. "पण खात्री बाळग, मी तुझ्या पाठीशी उभा राहीन... सारा दोष मी माझ्यावर घेईन..."

"विसरून जा रे माझ्या लाडक्या," ती म्हणाली. "तू अगदी अस्वस्थ आत्मा आहेस बघ. तू नेहमी घाईगर्दीनं काहीतरी करून बसतोस आणि नंतर तुला कष्टी बघून मला वाईट वाटतं. मीसुद्धा पूर्वी तुझ्यासारखीच होते. माणसानं आयुष्य येईल तसं घ्यावं. प्रवाहाच्या विरुद्ध नेहमीच पोहता येत नाही. हाती लागेल ते माणसानं चटकन घ्यावं... उगीच नशीबाला आव्हान कशाला द्यायचं..."

"प्रत्येकाचा बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो" मी तिच्या बोलण्यावर आक्षेप घेतला. पण नंतर क्षणभर विचार करून म्हणालो: "कदाचित तुझं बरोबर असेल."

कादिचाच्या घरासमोर आम्ही थांबलो.

"अरे, माझं घर आलं!" ती म्हणाली.

मी जायची घाई केली नाही. आम्हाला एकत्र बांधणारी एक अज्ञात शक्ती आता अस्तित्वात होती. आणि ताबडतोब वसतीगृहावर जावे असे मला वाटतही नव्हते. सत्य हे चांगले असले तरी काही वेळा ते अति कटु असते आणि ते ऐकायचे तुम्ही टाळता.

"असा का कपाळाला आठ्या घालून उभा आहेस राजा?" कादिचा म्हणाली. "कंटाळलास? फार लांब जायचंय?"

"नाही ठीक आहे. मी जाईन कसातरी. चलतो."

तिने माझ्या हाताला स्पर्श केला.

"बाई ग, बर्फासारखे थंड पडलेत तुझे हात! थांब मी गरम करते," असे म्हणून तिने चटकन माझे हात आपल्या कोटाच्या आत घेतले व वक्षस्थळांवर दाबून धरले. माझे हात काढून घेण्याचा मला धीर झाला नाही. तिच्या त्या

ऊबदार स्पर्शाला नाकारण्याइतका मी खंबीर राहिलो नव्हतो. तिच्या हृदयाची धडधड माझ्या पंजाला जाणवत होती. फार दीर्घ काळ ते प्रतिसादाची वाट पहात होते. त्याचा तो अधिकार होता. मी प्यायलो असलो तरी पुरता झिंगलेला नव्हतो. हळूच मी हात काढून घेतला.

"चाललास?"

"हो."

"अच्छा तर मग," उसासा टाकून कादिचा म्हणाली व चटकन निघून गेली. अंधारात मला जोराने फाटक लावल्याचा आवाज ऐकू आला. मी जायला निघालो पण काही पावलेच पुढे चाललो. कसे घडले ते मला माहीत नाही, पण मी पुन्हा फाटकाशी परत आलो. कादिचा माझी वाट पहात तेथे उभी होती. तिने माझ्याभोवती हातांचा विळखा टाकला, मला घट्ट मिठी मारली व माझ्या ओठांचे चुंबन घेतले.

"तू परत आलास!" ती हळूच कुजबुजली व माझ्या दंडाला धरून घरात घेऊन गेली.

मध्यरात्रीच्या सुमारास मी जागा झालो. प्रथम मी कुठे आहे तेच मला समजेना. माझे डोके विलक्षण ठणकत होते. आम्ही शेजारी शेजारीच झोपलो होतो. कादिचाचे ऊबदार, अनावृत शरीर मला घट्ट बिलगले होते व माझ्या हातावर डोके ठेवून ती गाढ झोपली होती. मला ताबडतोब जाणे भाग होते. मी चुळबुळलो. डोळे न उघडता तिने मला घट्ट धरून ठेवले.

"नको ना जाऊ," तिने विनवणी केली. तिने डोके वर उचलले आणि अंधारातच आपल्या ओठांनी माझे डोळे

चाचपीत उन्मादक अस्फुट आवाजात ती म्हणाली : "तुझ्या-शिवाय यापुढं मला जगता येणार नाही... तू माझा आहेस. तू नेहमी माझाच होता. बस्स, बाकी मला कशाचीही पर्वा नाही. इल्याज, मला तुझ्यापासून दुसरं काहीही नकोय. फक्त तुझं प्रेम हवंय्! मी फक्त एवढंच तुझ्यापाशी मागते... पण मी तुला सोडणार नाही, समजलास? मी तुला सोडणार नाही!" तिला रडू कोसळले आणि तिचे अश्रू माझ्या गालांवरून वाहू लागले.

मी तिथेच राहिलो. पहाटे आमचा डोळा लागला. जाग आली तेव्हा बराच उशीर झाला होता. सकाळ चांगलीच उजाडली होती. मी घाईघाईने कपडे केले. एका अनामिक भीतीने आत गोठल्यासारखे वाटत होते. अंगात लोकरीचा केसाळ कोट घालत घालतच मी घाई गडबडीने फाटकाबाहेर पडलो. आणि समोर नेमका जान्ताइ उभा. त्याच्या तांबड्या केसाळ टोपीचे दोन्ही कान लोंबत होते. आम्ही दोघेही क्षणभर स्तब्ध उभे राहिलो. डोळ्यांनी जर खून करता आला असता तर त्यावेळी माझ्या नजरेने नक्की केला असता! तो कामावर निघाला होता. तो जवळपासच तिथे रहात होता. मी त्याला पाहून न पाहिल्यासारखे केले आणि चटकन डेपोच्या दिशेने चालू लागलो. माझ्या पाठीमागे मी सहेतुक खाकरणे ऐकले. बर्फाचा त्याच्या बुटांखाली चुरचुर आवाज होत होता. तो माझ्या पुढे जाण्याचा प्रयत्न करीत नव्हता, परंतु फारसा मागेही पडत नव्हता. अशा तऱ्हेने एका पाठोपाठ चालत आम्ही डेपोत आलो.

गॅरेजमध्ये जाण्याऐवजी मी ऑफिसकडे चालत गेलो. प्रमुख इंजिनिअरांच्या खोलीतून अनेक आवाज ऐकू येत होते. दररोज काम सुरू होण्यापूर्वी तेथे पाच मिनिटांची सभा भरण्याचा प्रघात होता. त्या खोलीत सरळ चालत जावे, खिडकीच्या खालच्या चौकटीत बसावे, मस्तपैकी पायावर पाय टाकून एक सिगरेट पेटवावी आणि ड्रायव्हर लोकांची लटकी भांडणे ऐकावीत अशी जबरदस्त इच्छा होत होती. तो देखावा इतका मोह घालणारा असेल अशी कधी कल्पनाही मनाला शिवली नव्हती. पण मला आत जायचा धीर झाला नाही. तो माझा केवळ भित्रेपणा होता असे मला वाटत नाही; मनात साचलेल्या तिरस्काराची ती अभिव्यक्ती होती; माझ्या अविचारी, उद्दाम आणि हतबल हट्टीपणाची ती प्रतिक्रिया होती. त्यातच कादिचाबरोबर रात्र घालविल्यामुळे मनात आणखीच गोंधळ माजला होता. माझ्या अपयशी प्रसंगाला विसरायला लोक तयार नव्हते असेही मला आढळून झाले. त्यावेळी ते माझ्याबद्दलच बोलत होते.

"ही शरमेची गोष्ट आहे!" कुणीतरी ओरडले. "त्याच्यावर खटला भरला पाहिजे आणि तुम्ही त्याची जबाबदारी करता. आपली योजना योग्य असल्याचे सांगण्याचे [illegible] त्याने केले! पण अखेरीस ट्रेलर घाटात सोडला ना?"

"तुमचं बरोबर आहे," दुसरा एक आवाज उमटला. "त्याचा स्वभाव आम्हाला ठाऊक आहे. जरा जादा शिष्ट आहे. बोनस मिळवायच्या मागे होता बेटा! डेपोला मदत करण्याचा नुसता बहाणा होता. त्याची योजना फसली हा [illegible]..."

प्रत्येकाने एकाचवेळी बोलायला सुरुवात केली आणि एकच कल्लोळ माजला. मी तिथून दूर गेलो. उगीच कशाला चोरून ऐका?

मागे आवाज ऐकू येताच मी लगबगीने निघालो. सभा संपली होती, पण लोक अजूनही जोरजोराने वाद घालीत होते. मी अलिबेकचा आवाज ऐकला. तो ठाम विश्वासाने बोलत होता:

"आपण इथं गॅरिजमध्येच ट्रेलरसाठी ब्रेक तयार करू. त्यात अवघड काही नाही. कॉम्प्रेसरपासून लांबी पुढे वाढवायची आणि ब्रेक बसवायचे. अरेच्चा, इल्याज तूच आहेस का? अरे ए इल्याज..." अलिबेकने मला हाका मारल्या.

पण चालण्याचा वेग किंचितही कमी न करता मी गॅरिजच्या दिशेने चालत राहिलो. अलिबेकने धापा टाकत मला गाठले आणि खांद्याला धरून खेचले.

"बापरे, केवढ्या वेगाने चालतोस! तुला गाठणं म्हणजे शर्यतच खेळली पाहिजे! हे बघ इल्याज, मी त्या सर्वांची अखेरीस खात्री पटवली आहे. इल्याज, तयारीला लाग. चाचणीसाठी जोडीदार म्हणून तू माझ्याबरोबर येशील? कशी काय कल्पना आहे?"

मला हेही नको होते. याचा अर्थ मला अपयशातून वर खेचण्यासाठी त्याचा आधार घ्यायला पाहिजे होता. आणि तो हे करील? तिरस्काराने मी त्याचा हात झटकला.

"तू आणि तुझे ट्रेलर, खड्ड्यात जा."

"तुला काय खुपतंय? तो सगळा तुझा एकट्याचा दोष होता... अरेच्चा मी विसरलोच. वालोद्या शिऱ्याग्‌वनं तुला काही सांगितलं का?"

"नाही, मी त्याला अजून पाहिलं नाही. का?"

"भले शाब्बास! हा सगळा वेळ तू होतास तरी कुठं? आसेल सारखी तुझी वाट पाहतेय. तू कुठं दिसलास का असं सगळ्या ड्रायव्हरांना विचारतेय. ती बिचारी चिंतेनं हैराण झालीय."

माझ्या पायातली शक्तीच नाहीशी झाल्याचा मला भास झाला. मला माझाच इतका तिरस्कार वाटू लागला, माझी मलाच एवढी शिसारी आली की, मी मेलो तर बरे होईल असे मला वाटले. अलिबेक माझ्या बाहीला खेचत बोलतच होता. ट्रेलरना कोणती उपकरणे बसवावीत याबद्दल तो अखंड उत्साहाने बोलत होता... आमचे संभाषण ऐकीत काही फुटांवरच जान्ताइ उभा होता.

"जाऊं दे मला," मी हिसका देऊन हात मोकळा केला. "मला एकट्याला राहू दे. या सगळ्याचा मला वीट आलाय. तू तुझे ट्रेलर घेऊन खुशाल जा. मी कुणाहीबरोबर जोडीदार म्हणून जाणार नाही... समजलं का?"

अलिबेकने आपले दात एवढे घट्ट आवळले की, त्याच्या गालांचे स्नायू आकसले गेले.

"प्रथम तू सुरुवात केलीस, तूच सारा गोंधळ घातलास आणि आता तू पळून जायला बघतोस? असंच की नाही?" त्याने खणखणीत प्रश्न फेकला.

"तुला काय समजायचं ते समज."

मी माझ्या लॉरीकडे गेलो. माझे हात कापत होते आणि मन अधीर झाले होते. मी तसे का केले कुणास ठाऊक,

पण मी खालच्या खोलगट भागात उडी मारली व डोके थंड करण्यासाठी विटांच्या भिंतीला ते टेकवून उभा राहिलो.

"इल्याज, ऐकलंस का," वरून हलक्या आवाजात कुणी-तरी हाक मारली.

आता आणखी कोण? मी वर पाहिले. जान्ताइ त्याची तांबडी केसाळ टोपी घालून उभा होता. एखाद्या जुनाट कुत्र्याच्या छत्रीसारखा त्या खोलगट भागाच्या कडेवर बसून तो आपल्या बेरक्या बारिक डोळ्यांनी मला निरखीत होता.

"इल्याज, त्या बेटयाला तू चांगला धडा शिकवलास."

"कुणाला?"

"कुणाला म्हणजे? अलिबेकला! त्याला छान गप्प केलास. मोठा संशोधक व्हायला निघालाय बेटा!"

"तुला त्याच्याशी काय करायचंय?"

"तुझ्यासारखंच माझं म्हणणं आहे. ट्रेलर ओढणं आपल्या ड्रायव्हर लोकांच्या फायद्याचं नाही. माझ्यासारखंच तुलाही ते माहीत आहे. ही नेहमीची गोष्ट आहे: कुणी एखादा उठून जादा माल भरतो, कमी वेळात नेऊन पोचवतो आणि मग प्रत्येकाकडून तशाच कामाची अपेक्षा केली जाते. पण त्यामुळे आपल्या पैशात कपात होईल. आपणच आपल्या पायावर धोंडा कशाला पाडून घ्या? कौतुक एका दिवसापुरतं टिकेल आणि मग पुढं काय? आपलं नेमलंय तेवढं काम करून मुकाट रहावं. आम्ही काही तुझ्याविरुद्ध आकस धरलेला नाही..."

"आम्ही म्हणजे कोण?" मी जास्तीत जास्त शांत राहण्याचा प्रयत्न करीत म्हटले. "आम्ही म्हणजे तू स्वत: का?"

"नाही, मी एकटा नव्हे," डोळ्यांची वेगाने उघडझाप करीत जान्ताइ म्हणाला.

"तू खोटं बोलतोयस, खोटारड्या! केवळ तुझ्या नाकावर टिचवण्यासाठी मी ट्रेलर खिंडीतून नेऊन दाखवीन. त्या प्रयत्नात मेलो तरी बेहत्तर! आणि आता इथून चालता हो! नाहीतर माझ्या हातांचा प्रसाद खायला मिळेल!"

"नको रे बाबा," जान्ताइ पटकन म्हणाला. "तू किती तरबेज आहेस ते काय मला माहीत नाही? आणि त्या दुसऱ्या बाबतीत सांगायचं म्हणजे जमेल तितके दिवस मजा कर!"

चार शिव्या हासडून मी साऱ्या ताकदीनिशी त्याच्या तोंडावर ठोसा लगावला.

तो पाठीमागे उताणा पडला. त्याची टोपी उडाली. मी उडी मारून वर येईपर्यंत तो धडपडत उठून उभा राहिला व माझ्यापासून दूर झाला. बेबीच्या देठापासून त्याने ओरडायला सुरुवात केली.

"धावा! तू गुंड आहेस, तू बदमाष आहेस! याबद्दल तुला बेड्या ठोकतील ते! आपला राग दुसऱ्यांवर काढतोस... तू यातून सुटशील असं वाटतं तुला..."

चारी बाजूंनी लोक धावत आले. त्यात अलिबेकही आला होता.

"काय चाललंय तुमचं? का मारलंस तू त्याला?" त्याने मला विचारले.

"खरं बोलल्याबद्दल," जान्ताइ किंचाळला. "त्याच्या तोंडावर खरं बोलल्याबद्दल. त्यानं ट्रेलर चोरला, घाटात खड्डयात घातला, साऱ्या कामाचा सत्यानाश केला आणि काही

प्रामाणिक माणसं त्याची चूक सुधारायला पाहतात तर त्यांनी तसं करू नये म्हणून हा मारामारी करतो! आता त्याची वाहश्वा होणार नाही ना! त्याला कुठला बोनस मिळणार?"

अलिबेकने माझ्याकडे वळून पाहिले. तो आता संतापला होता.

"तू डुक्कर आहेस," माझ्या छातीवर जोरात ढकलून तो म्हणाला. "आम्ही तुझ्याशिवाय ते काम करून दाखवू. काळजी करू नको. तुझ्यासारख्या शूर वीरांशिवाय..."

मी काहीही बोललो नाही. माझी वाचाच बसली होती. जान्ताइच्या धडधडीत खोटेपणाने मी एवढा चकित झालो होतो की, माझ्या तोंडून एक शब्द बाहेर फुटेना. सारी माणसे माझ्याकडे रोखून पहात होती.

मला तिथून दूर जायचे होते, काहीही करून मला तिथून दूर जायचे होते... मी धाडकन लॉरीत उडी टाकली व भर्रकन ती आवाराबाहेर काढली.

रस्त्यावर थांबून मी प्यायलो. एका गुत्त्यात मी एक प्याला प्यायलो, पण नशा चढेना म्हणून पुन्हा पुढच्या गुत्त्याशी थांबलो आणि वोदकाचा भला मोठा प्याला घशाखाली ओतला. मग मला फक्त जाणीव राहिली पुलांची, रस्त्यावरच्या पाट्यांची आणि बाजूने जाणाऱ्या वेगवान मोटरींची. निराशा थोडी कमी झाली. "कशाला कुणाची पर्वा करायची," मी मनाशी विचार केला. "सारं मुकाट्यानं पचव आणि चाकावर हात भक्कम ठेव... आणि कादिचा... ती काही एवढी वाईट नाही. तरुण आहे, दिसायला चांगली आहे. आणि ती तुझ्यावर प्रेम करते, तुझ्यासाठी ती वेडी आहे... तुझ्यासाठी ती काय वाटेल ते करील कृतघ्न मूर्खा!"

मी घरी आलो तेव्हा खूप उशीर झाला होता. मी दारात झोकांड्या खात उभा होतो. एका हातातून कोट बाहेर लोंबकळत होता. काही वेळा उजवा हात कोटाबाहेर काढून गाडी चालवणे सोपे जाते. लहान असताना गलोलीने दगड मारत होतो तेव्हापासून उजवी बाही मोकळी ठेवायची मला सवय होती.

आसेल माझ्याकडे धावत आली.

"इल्याज, काय झालं?" तिने मला विचारले, पण मला वाटते ती काय ते समजली. "असा नुसता उभा काय राहिलास तिथं? तू गारठला असशील, दमला असशील. कोट काढ अंगातून."

ती मला मदत करू इच्छित होती, पण मी काहीही न बोलता तिला दूर ढकलले. मी इतका शरमलो होतो की, शरम झाकण्यासाठी मला तिरसट वागण्याचा आधार घ्यावा लागला. स्टुलाला किंवा कशाला तरी धक्का मारून मी धडपडत खोलीत चालत गेलो व खुर्चीत कोसळलो.

"इल्याज, काही घडलं का?" माझ्या दारूने तारवटलेल्या डोळ्यांकडे काळजीने पहात आसेलने विचारले.

"जसं काही तुला माहीत नाही," मी मान खाली घालून म्हटले. तिच्याकडे न पाहणेच ठीक होते. आसेल माझ्यावर भडिमार केव्हा करते याची वाट पहात मी गप्प बसून राहिलो. ती जे काही बोलेल ते ऐकून घ्यायची माझी तयारी होती. माझ्या समर्थनासाठी मी एकही शब्द उच्चारणार नव्हतो. पण ती एवढी गप्प राहिली की, जणू काही ती त्या खोलीत नव्हतीच. मी वर पाहिले. ती माझ्याकडे

पाठ करून खिडकीशी उभी होती. तिचा चेहरा न पाहताही ती रडते आहे हे मला समजले. माझे अंत:करण चिरफाळून निघाले.

"हे बघ आसेल, मला तुला काही सांगायचंय" मी अडखळत सुरुवात केली. "मला तुला सांगायचंय की..." नाही, माझ्यात तिला सत्य सांगायची हिंमत नव्हती. असा धक्का मी तिला देऊ शकत नव्हतो. पण तरीही तिच्यापासून लपवण्यात काही अर्थ नव्हता. "आपण तुझ्या घरच्यांना लौकर भेटायला जाऊ असे मला वाटत नाही," मी मूळ मुद्द्याला बगल देत म्हटले. "नंतर पाहू या. आता ती सारी तयारी करीत बसायला माझी मन:स्थिती ठीक नाही..."

"काही घाई नाही, आपण नंतर कधीतरी जाऊ," आसेल उत्तरली. तिने डोळे पुसले व ती जवळ आली. "इल्याज, काळजी करायचं सोडून दे. सारं काही ठीक होईल. जरा स्वत:कडे पहा. अलिकडे तू फार बदलला आहेस. तू फार चमत्कारिक वागतोस हल्ली!"

"पुरे कर," मी तिचे बोलणे अर्ध्यावरच तोडले. माझ्या भित्रेपणाचा मलाच राग आला होता. "मी दमलोय, मला गाढ झोप हवीय."

दोन दिवसांनंतर माझ्या परतीच्या प्रवासात खिंडीच्या दुसऱ्या बाजूला माझी अलिबेकशी भेट झाली. तो ट्रेलर ओढीत होता. दोलन खिंड ओलांडण्यात त्याला यश आले होते.

लॉरी चालती असतानाच मला पाहताच त्याने खाली रस्त्यावर उडी मारली व हात केला. मी वेग थोडा कमी

केला. रस्त्याच्या मध्यभागी तो विजयी प्रफुल्लित चेहऱ्याने उभा होता.

"ए इल्याज," त्याने हाक मारली. "उतर खाली. आपण सिगरेटी ओढू या."

मी आणखी वेग कमी केला. त्याच्या लॉरीत दुसरा एक अगदी तरुण ड्रायव्हर मी पाहिला. लॉरीच्या चाकांना त्यांनी साखळ्या बांधल्या होत्या व ट्रेलरला न्यूमॅटिक ब्रेक बसवले होते. एका नजरेत मी हे सारे टिपले. पण मी खाली उतरलो नाही. घाबरून मात्र नव्हे. त्यांना यश आले होते – छान झाले! माझे मला एकट्याला राहू दे!

"अरे थांब," अलिबेक ओरडत माझ्यामागे धावला. "इल्याज, थांब, मला तुझ्याशी बोलायचंय, कामाचं आहे. अरे सैताना तू थांबत का नाहीस? ठीक आहे..."

मी वेग वाढवला. ओरडू नकोस. माझे तुझ्याशी काही एक काम नाही. त्यावेळी मी अगदी मूर्खासारखा वागलो. अलिबेकसारखा उत्तम मित्र मी गमावला. त्याचे बरोबर होते, प्रत्येक बाबतीत बरोबर होते हे मला आता पटते. पण त्यावेळी मात्र ज्या प्रयत्नात मी दमलो, थकलो, अपयशी ठरलो त्यात त्याला एवढ्या सहज यश मिळालेले मला सहन झाले नाही.

अलिबेक नेहमीच प्रत्येक गोष्ट गंभीरपणे विचार करून करणारा आहे. मी जसा धाडकन एकट्याने धाडस करायला गेलो तसे तो कधीही करणार नाही. दुसरा ड्रायव्हर बरोबर घेण्यातही त्याने शहाणपणा केला होता. ते आळीपाळीने ड्रायव्हिंग करून विश्रांती घेऊ शकत होते. इंजिन, ड्रायव्हरची इच्छाशक्ती आणि त्याचे हात या इथे महत्त्वाच्या गोष्टी होत्या. शिवाय

ते दोघे ड्रायव्हिंग करीत असल्याने, नेहमीपेक्षा निम्मा वेळ त्यांना तेवढे अंतर कापायला लागणार होता. अलिबेकने हा सारा अंदाज आधी घेतला होता. त्याने ट्रेलरला ब्रेक लावले. तसेच मागच्या चाकांना साध्या साखळ्या बसवायलाही तो विसरला नाही. दोलन खिंडीवर त्याने सर्व तयारीनिशी हल्ला चढवला होता. आपोआप जे काही घडेल त्यावर विसंबायला तो तयार नव्हता.

अलिबेकने रस्ता दाखवून दिल्यानंतर लौकरच इतर ड्रायव्हर खिंडीतून ट्रेलर ओढून नेऊ लागले. कुठल्याही कार्यात प्रथम एकदा सुरुवात करून द्यावी लागते. दरम्यान, नजीकच्या दुसऱ्या डेपोकडून आम्हाला जादा लॉरींची कुमक मिळाली. पुढचे दहा दिवस तिएन शान रस्ता रात्रंदिवस रहदारीने गजबजला होता. ही लांबड थोडक्यात आटपायची म्हणजे चिनी कामगारांना वेळेत सामग्री मिळाली. आमचे लोक त्यांच्या विश्वासाला जागले. मीही त्यावेळी काम केले. आता त्या घटनेला इतकी वर्षे उलटल्यानंतर मी शांतपणे त्याबद्दल बोलू शकतो. पण त्या गडबडीच्या दिवसात मी थाऱ्यावर नव्हतो. माझा ताबा सुटला होता व मी भलतीकडेच भरकटलो.

अलिबेकची ती तशी रस्त्यात भेट झाल्यानंतर मी जेव्हा डेपोत परतलो तेव्हा काळोख पडला होता. वसतीगृहाकडे जायला निघालो, पण वाटेत गुत्यात शिरलो. त्या दिवसांमध्ये मला प्यायची अतिशय इच्छा व्हायची. सारे काही विसरून जाईपर्यंत पीत रहावे आणि मुडद्यासारखे झोपी जावे असे वाटायचे. मी खूप वोदका प्यायलो, पण काहीच नशा चढली नाही. गुत्यामधून बाहेर पडलो तेव्हा मी अधिकच बेचैन व

दु:खी होतो. मध्यरात्रीच्या सुमारास मी शहरातल्या रस्त्यांवरून चालत सरळ बेरेगोवाया रस्त्याची दिशा धरली. तेथे कादिचा रहात होती.

आणि हे असे चालत राहिले. एका बाजूला सैतानाच्या तावडीत आणि दुसऱ्या बाजूला खोल खवळलेल्या सागराच्या तडाख्यात सापडल्यासारखी माझी अवस्था झाली होती. दिवसा मी लॉरी चालवायचा आणि कामानंतर सरळ कादिचाकडे जायचा. तिच्याबरोबर मला अधिक सुरक्षित वाटायचे, अधिक मोकळे वाटायचे. माझ्यापासून, लोकांपासून, सत्यापासून लपायला मी तिचा आडोसा घेतला. एकटी कादिचा माझ्यावर प्रेम करते आणि मला समजून घेते अशी मी स्वत:ची समजूत करून घेतली. अगदी आवश्यक तेवढा वेळच मी घरात थांबायचा. आसेल, माझी लाडकी आसेल! माझ्यावर प्रचंड विश्वास टाकून, निष्पाप राहून ती मला घरातून बाहेर ढकलत होती हे तिला समजत नव्हते. मी तिच्या लायक नाही, ती माझ्यासाठी जे काही करते आहे त्याला मी पात्र नाही हे समजत असल्यामुळे तिला तोंड दाखवायला मला शरम वाटायची. घरी मी अनेकवेळा तर्रर्र प्यायलेल्या अवस्थेत यायचा. पण तिने माझा तिरस्कार केला नाही. असे ती का वागायची? आजही हा विचार मनाला टोचत राहतो. ही तिची दुर्बलता होती का त्याउलट धैर्य आणि श्रद्धेची अभिव्यक्ती होती? श्रद्धा होती हे तर स्पष्टच होते. मी लौकर सावरीन, संकटावर मात करीन आणि पूर्ववत वागायला लागेन असा तिचा विश्वास होता. पण तिने माझी निर्भर्त्सना करायला हवी होती आणि सत्य कबूल करायला भाग पाडायला हवे होते.

माझ्या कामाशी संबंधित नसलेले काही त्रास माझ्या मागे लागले आहेत याची तिला कल्पना आली असती तर कदाचित ती तशी वागलीही असती. मी कोणत्या परिस्थितीतून चाललोय याची तिला किंचितही कल्पना नव्हती. आणि मी तिच्यापासून लपवून ठेवत होतो; उद्या सांगीन, परवा सांगीन असे करीत तो क्षण पुढे ढकलत होतो आणि अखेरीस तिच्यासाठी, आमच्या प्रेमासाठी, आमच्या कुटुंबासाठी जे करायला हवे होते त्याला फार उशीर झाला...

त्या अखेरच्या दिवशी आसेल दाराशीच मला भेटली. तिचा चेहरा आनंदाने आणि उत्साहाने फुलून आला होता. साऱ्या चेहऱ्यावर रक्तिमा पसरला होता, तिचे डोळे चमकत होते. अंगात कोट आणि पायात बूट असतानाच ती मला खोलीत ओढून घेऊन गेली.

"बघ इल्याज, सामत एकट्यानं उभा रहायला लागला!"

"खरंच? कुठाय तो?"

"तिथं, टेबलाखाली."

"पण तो तर रांगतोय," मी म्हणालो.

"तू बघशील आता! सामत, चल बेटा, बाबांना दाखव तू कसा उभा राहतो ते. चला, चला लौकर, या माझ्याकडे ऽऽ!"

आपली आई काय सांगते आहे ते सामत समजला. तोंड-भर हसू पसरून तो पटकन रांगत टेबलाखालून बाहेर आला आणि पलंगाचा खूर पकडून सरळ उभा राहिला. आपल्या गुबगुबीत पायांवर झोके खात तो मिनिटभर तसा हसत उभा राहिला आणि तशाच हसऱ्या मुद्रेने धपकन फरशीवर त्याने

फतकल घातली. मी चटकन त्याच्याकडे धावलो, त्याला उचलले व घट्ट मिठी मारली. त्याच्या अंगाच्या गोड वासाने मी सुखावलो. तो वास आसेलइतकाच मला प्रिय होता.

"इल्याज, अरे सांभाळून! किती घट्ट धरलायस् त्याला! चेंगरेल ना तो!" असे म्हणत आसेलने बाळाला आपल्याजवळ घेतले. "काय वाटतं तुला त्याच्याबद्दल? चल, अंगातला कोट काढ. आता लौकरच तो मोठा मुलगा होईल आणि मग त्याची आईसुद्धा कामावर जाईल. सगळं काही ठीक होईल लौकरच! हो की नाही रे सोनुल्या? आणि जरा तुझ्याकडे पहा!" हसत हसत आसेलने माझ्याकडे उत्कंठित नजरेने पाहिले. मी जवळच्या खुर्चीवर बसलो. त्या थोडक्या शब्दांमध्ये तिला जे काही सांगायचे होते ते तिने सांगितले होते. त्या वाईट काळात अंतःकरणात साठलेला सारा कडवटपणा ओकून ती मोकळी झाली होती. त्या शब्दांमध्ये आर्जव होते, राग होता, आशा होती. मला तिला ताबडतोब सारे सांगून टाकायला हवे होते किंवा तात्काळ निघून जायला हवे होते. निघून जाणे अधिक चांगले होते. आपण आनंदी आहोत अशी तिची धारणा होती. तिला कोणतेही संशय नव्हते. मी उठलो.

"मी चलतो," मी म्हणालो.

"कुठं?" तिने दचकून विचारले. "तू आजची रात्रही राहणार नाहीस? निदान चहा तरी घे."

"शक्य नाही. मला गेलं पाहिजे," मी पुटपुटलो. "सध्या आम्हाला किती काम आहे ते ठाऊक आहे तुला..."

खरे म्हणजे कामाचा काही एक संबंध नव्हता. मला दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत न गेलेले चालणार होते.

लॉरीत येऊन मी माझ्या सीटवर जडपणे बसलो. चावी फिरवून बराच वेळ इंजिनाशी झटापट करीत राहिलो. इंजिनाचा चमत्कारिक खरखरता आवाज होत राहिला. मी गाडी रस्त्यावर आणली आणि माझ्या घराच्या प्रकाशाने उजळलेल्या खिडक्या दूर मागे राहिल्या. पुलापलिकडच्या घळीत मी गाडी रस्त्यापासून बाजूला वळवली आणि झुडपात उभी करून पुढचे दिवे मालवले. रात्र तिथेच काढायचा मी निर्णय घेतला. सिगरेटी बाहेर काढल्या आणि काड्यापेटीत फक्त एकच काडी शिल्लक राहिल्याचे लक्षात आले. मी काडी ओढली पण सिगरेट पेटण्यापूर्वीच ती लहानशी ज्योत विझून गेली. मी सिगरेटचे पाकीट आणि रिकामी काड्यापेटी अशा दोन्ही गोष्टी खिडकीबाहेर फेकून दिल्या, डोक्यावरून मेंढीच्या कातड्याचा कोट ओढून घेतला व मुटकुळी करून पडलो.

दूर निश्चल पर्वतांपलिकडे फिका चंद्र प्रकाशत होता. घळीतून वाहणारा वारा अधूनमधून एक बारिक केविलवाणी साद घालीत होता व लॉरीचे अर्धवट उघडे दार ढकलले जात होते. त्यावेळी दाराचा करकर असा आवाज होई. एवढे एकाकी मला कधीच वाटले नव्हते. लोकांपासून, माझ्या कुटुंबापासून, मित्रांपासून एवढा एकाकी मी कधीच पडलो नव्हतो. अशा तऱ्हेचे जीवन मी फार काळ जगू शकणार नव्हतो. डेपोत परत गेलो की, ताबडतोब कादिचाला सारे सांगून या जंजाळातून मोकळे व्हायचे अशी मी स्वतःलाच शपथ घातली. मी तिची क्षमेसाठी विनवणी करीन आणि जे काही आपल्यामध्ये घडले ते विसरून जा असे सांगेन. ते प्रामाणिकपणाचे व योग्य ठरले असते.

पण विधीलिखित वेगळे होते. ज्या प्रकारे घटनांनी वळण घेतले तशा गोष्टी घडतील असे मला कधीही वाटले नव्हते. तिसऱ्या दिवशी मी घरी आलो तेव्हा दार उघडे होते पण घरात कुणीही नव्हते. प्रथम मला वाटले की, सर्पण आणायला किंवा पाणी आणायला आसेल शेजारी गेली असावी. पण नंतर घरात सभोवार पाहिले. खोली विस्कटलेली होती. त्या रिकाम्या जागेत एक भयाणता निर्माण झाली होती. मी सामतच्या बिछान्याकडे धावलो – तो तेथे नव्हता.

"आसेल," माझ्या तोंडून अस्फुट भेदरलेला आवाज निघाला. "आसेल" रिकाम्या खोलीच्या भिंतींमधून उत्तरादाखल प्रतिध्वनी उमटला.

"आसेल, आसेल" अशा हाका मारीत मी वेगाने बाहेर आलो.

कुणीही उत्तर दिले नाही. मी शेजाऱ्यांकडे धावलो, नंतर पेट्रोल पंपावर चौकशी केली. पण कुणालाच काही माहीत नव्हते. सारे मिळून त्यांनी मला एवढेच सांगितले: आदल्या दिवशी आसेल कुठे तरी बाहेर गेली. जाताना बाळाला तिने मैत्रिणींकडे ठेवले होते व खूप उशिरा संध्याकाळची ती परतली. "तिला सारे काही समजले आणि म्हणून ती मला सोडून गेली." या भयंकर सत्याची जाणीव होताच मी शहारलो.

त्या दिवशी ज्या वेगाने मी गाडी चालवली त्या वेगाने तिएन शानमधून मी कधीही चालवली नसेन. एखाद्या पुढच्या वळणावर, किंवा पुढच्या घळीत किंवा आणखी पुढच्या रस्त्यावर मी तिला गाठीन अशी आशा मनात होती. वाटेत येणाऱ्या लॉरींवर मी एखाद्या गरुडासारखा झेप घ्यायचा, आमची

मडगार्ड जवळजवळ घासेपर्यंत वेग कमी करायचा, लॉरीत डोकावून पहायचा आणि पुन्हा वेगाने पुढे सटकायचा. त्या ड्रायव्हरने घातलेल्या शिव्या त्यावेळी कानांवर आदळायच्या. क्षणभरही न थांबता सुमारे तीन तास मी तसा गाडी पिटाळीत होतो. अखेरीस रेडिएटरमधील पाणी उकळू लागले. मी त्यावर बर्फाचा चुरा टाकला व आणीबाणीच्या काळात वापरण्यासाठी ठेवलेले पाणी घ्यायला लॉरीच्या मागच्या भागात गेलो. रेडिएटरमधून वाफेचा भपकारा उसळला आणि उरी फुटून धावणाऱ्या घोड्यासारखी इंजिनाने धाप टाकली. मी पुन्हा चाकावर बसत होतो एवढ्यात ट्रेलर जोडलेली अलिबेकची लॉरी समोरून खाली उतरताना दिसली. मला पुन्हा आशेचा किरण दिसला. आम्ही जरी आजकाल बोलत नसलो तरी आसेल त्यांच्या घरी असेल तर तो मला सांगील असे वाटले. मी रस्त्याच्या मध्यभागी धावत जाऊन उभा राहिलो आणि हात उंचावला.

"ए अलिबेक, जरा थांब!"

त्याचा सहकारी गाडी चालवीत होता. त्याने अलिबेककडे प्रश्नार्थक चेहऱ्याने पाहिले. त्याने कपाळाला आठ्या घातल्या व चेहरा दुसरीकडे वळवला. लॉरी माझ्याजवळून वेगात निघून गेली. बर्फाच्या धुळीने पायापासून डोक्यापर्यंत माखलेल्या अवस्थेत मी हात उंचावून तसाच उभा होतो. अखेरीस मी चेहरा पुसला. माझ्यावर बाजू उलटत चालली होती. मी दु:ख करण्याच्या पलिकडे गेलो होतो. अलिबेकच्या घरी आसेल नाही एवढाच विचार त्यावेळी प्राबल्याने माझ्या डोक्यात होता. हे आणखीच वाईट घडले होते. याचा अर्थ ती आपल्या

माणसांकडे घरी परत गेली होती. तिला जायला दुसरे ठिकाण नव्हते. त्या घराचा उंबरा ओलांडून ती परत कशी गेली, तिने त्यांना काय सांगितले?

मला ताबडतोब तिच्या पाठोपाठ तेथे जाणे आवश्यक होते.

शक्य तितक्या लौकर माल उतरवून मी लॉरी रस्त्यातच उभी केली आणि कागदपत्र द्यायला डिस्पॅचरच्या ऑफिसकडे निघालो. फाटकातच माझी जान्ताइशी टक्कर झाली त्याच्या चेहऱ्यावरच्या त्या छद्मी हास्याने कपाळात तिडिक उठली.

मी कादिचाच्या छोटया खिडकीशी डोकावलो तेव्हा तिने माझ्याकडे अत्यंत चमत्कारिक नजरेने पाहिले आणि तिच्या हातातले कागद टेबलावर गळून पडले. तिच्या डोळयात भीती किंवा अपराधाची छटा होती.

"लौकर सही कर," मी म्हणालो.

"काही विशेष घडलं का?"

"ती घरात नाही. आसेल कुठंतरी निघून गेलीय."

"आई ग!" कादिचा एकदम पांढरीफटक पडली. ओठ दातात गच्च दाबून धरून ती उभी राहिली आणि म्हणाली: "इल्याज, मला माफ कर, मला माफ कर, हा माझा दोष आहे."

"काय झालं? सारं सांग मला," असे म्हणत मी दाराकडे धावलो.

"ते सारं अचानक घडलं, कसं ते मला खरंच सांगता येणार नाही इल्याज. काल रात्री दरवान आला आणि खिडकी ठोकून म्हणाला की, एक मुलगी मला भेटायला आलीय. ती आसेल आहे हे मी चटकन ताडले. प्रथम ती गप्प राहून

माझ्याकडे रोखून पहात राहिली आणि नंतर तिने विचारले: 'हे खरं आहे?' आणि मलाही त्यावेळी काय झालं कुणास ठाऊक नि मी म्हणाले: 'होय, हे खरं आहे. सारं काही खरं आहे. तो माझ्याबरोबर आहे'. ती एकदम कचरली. मी या टेबलावर स्वतःला झोकून हुंदके देत वेड्यासारखी बरळत सुटले: 'तो माझा आहे, माझा आहे'. ती केव्हा गेली ते मला समजलं नाही. मला माफ कर इल्याज!"

"थांब जरा, पण तिला हे सगळं समजलं कसं?

"हे जान्ताइचं काम आहे. मला ते ठाऊक होतं, कारण तशी तो मला सतत धमकी घालीत होता. तो किती घाणेरडा माणूस आहे हे तुला ठाऊक नाही का? जा, इल्याज, तिला शोधून काढ. मी यापुढं तुमच्या रस्त्यात कधीच आडवी येणार नाही. मी इथून दूर निघून जाईन."

हिवाळ्याने गोठलेल्या स्तेपमधून मी भिरीभिरी फिरलो. जमीन गोठून निळसर पडली होती. वाऱ्याच्या झोतांबरोबर तरंगत येणाऱ्या हिमाचे तडाखे बसत होते व सुकलेली लव्हाळी खड्ड्यांमधून उडून विखरून पडत होती. दूर अंतरावर खेड्यातल्या जीर्ण चिखलाच्या भिंतींच्या व उघड्याबोडक्या फळबागांच्या दाट काळ्या सावल्या दिसत होत्या.

आसेलच्या घराशी मी थांबलो. मन शांत करण्यासाठी घाईने सिगरेट पेटवली, मग चुरडून टाकली आणि कर्णा वाजवला. पण आसेल बाहेर आली नाही. तिची आई बाहेर आली. तिने कोटात स्वतःला गुंडाळून घेतले होते. मी फूटबोर्डावर उभे राहून शांतपणे म्हणालो: "नमस्कार आईसाहेब."

"अच्छा, तू आहेस तर?" ती रागाने म्हणाली. "आणि एवढं काही केल्यानंतर पुन्हा मला आईसाहेब म्हणून हाक मारण्याचा उर्मटपणा आहे तर तुझ्या अंगात? चल, चालता हो माझ्या नजरेसमोरून! हलकट मेला, गवतातला साप! माझ्या अजाण पोरीला फूस लावून पळवलीस आणि वर इथं येण्याचं धाडस करतोस? आमच्या आयुष्यांचा तू सत्यानाश केलास..."

म्हातारीने मला एकही शब्द बोलू दिला नाही. माहीत असलेले सर्व वाईटातले वाईट शब्द वापरून ती माझा उद्धार करीत होती. शेजाऱ्यांना तिचा आरडाओरडा ऐकू गेला आणि माणसांचा जमाव गोळा व्हायला लागला.

"लोकांना सांगून तुला लाथा मारून हाकलण्याआधी चालता हो! तुझं तोंड इथून काळं कर आणि पुन्हा कधीही इकडं येऊ नकोस!" त्या संतापलेल्या बाईने अंगाभोवताली लपेटलेला कोट जमिनीवर फेकून दिला आणि मला परत लॉरीत ढकलले.

परत चाकावर बसण्याशिवाय मला दुसरा आता उपायच राहिला नव्हता. आसेल बाहेर येऊन माझ्याशी बोलणारसुद्धा नव्हती, त्यामुळे मला तेथून निघून जाणे भाग होते. लॉरीच्या दिशेने काठ्या व दगड यायला लागले होते. खेड्यातली पोरे मला खासा निरोप देत होती.

रात्री खूप उशिरापर्यंत मी तळ्याच्या काठाशी येरझाऱ्या घालीत होतो. चंद्राच्या प्रकाशात न्हाणारे इस्सिक-कुल अस्वस्थ होते. त्याची प्रचंड खळबळ चालली होती. नेहमी नरम असणारे ते सरोवर त्या रात्री थंड, बोचरे आणि तुसडे

होते. मी उपडधा ठेवलेल्या एका होडीवर बसलो. किनाऱ्यावर मोठमोठ्या लाटा येऊन आदळत होत्या, माझ्या बुटांना थपडा मारीत होत्या व उसासे टाकून परतत होत्या.

आणि मग कुणीतरी माझ्यामागून आले व माझ्या खांद्यावर हळुवारपणे हात ठेवला. ती कादिचा होती.

* * *

काही दिवसांनंतर आम्ही फुन्झेला गेलो. अनारखाई स्तेपमध्ये कुरणे तयार करणे शक्य आहे का नाही याची पाहणी करायला एक मोहीम निघणार होती. त्या मोहिमेत आम्हाला कामे मिळाली. मी लॉरी ड्रायव्हर म्हणून नोकरी पत्करली, कादिचाने किरकोळ कामांचा पत्कर घेतला. अशा प्रकारे आम्ही आमच्या नव्या एकत्र जीवनाला आरंभ केला.

मोहिमेचा पल्ला पार अनारखाई स्तेपच्या ऐन मध्यात गेला होता. बाल्खश सरोवराच्या आसपास कुठेतरी आम्ही होतो. जितके दूर तेवढे अधिक चांगले अशी निदान माझी तरी अवस्था होती. भूतकाळाचा संबंध तोडायचा असेल तर तो पुरा पुरा तोडावा असे ठरवले.

पहिल्या काळात मी माझे दुःख कामात बुडवून टाकायचा प्रयत्न केला. तिथे कामही भरपूर होते. त्या मोहिमेबरोबर मी तीन वर्षे होतो त्या काळात आम्ही तो स्तेप प्रदेश उभा आडवा पालथा घातला, विहीरी खणल्या, रस्ते आखले आंतरवाहतुकीचे तळ उभारली. पूर्वी अनारखाई म्हणजे निर्जन प्रदेश होता. भर दिवसाढवळ्या माणूस रस्ता चुकायचा आणि उंच उंच वाढलेला दवणा तुडवीत डोंगराळ स्तेपमधून महिना

वणवण केल्यानंतर एखादी वस्ती त्याच्या नजरेला पडायची. आता ही परिस्थिती पालटली होती. आता ही पशुपालकांची भूमी आहे. तिथे चांगली घरे, सांस्कृतिक केंद्रे आणि सारे काही आहे. अलिकडे तेथे धान्याची लागवडही करतात व गवताचे साठे करतात. अजूनही तेथे भरपूर काम आहे, विशेषतः आम्हा ड्रायव्हर लोकांना तिथे भरपूर काम मिळू शकते. पण मी परत आलो. तिथल्या खडतर आयुष्याला कंटाळून परत आलो असे मुळीच नव्हे. ती गैरसोय तात्पुरती होती. कादिचा आणि मी कष्टांना डरणारे नव्हतो. खरे म्हणजे आमचे सहजीवन चांगले चालले होते. आम्ही एकमेकांचा मान राखत होतो. तरीही मान राखणे ही एक गोष्ट आणि प्रेम ही अगदी वेगळी. जोडप्यातले एकजण खूप प्रेमात असेल आणि दुसरे नसेल तर ते आयुष्य नव्हे असे निदान मला तरी वाटते. माणसाचा स्वभाव हा असा आहे किंवा निदान मी तरी असा घडलोय. पण कसलीतरी उणीव मला सतत भासत राहिली. आणि ती उणीव कामाने, मैत्रीने किंवा माझ्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीच्या दयेने किंवा मायेने भरून येण्यासारखी नव्हती. आसेलचे मन वळवून तिला परत आणण्याचा प्रयत्न करण्याऐवजी तडकाफडकी मूर्खासारखा निर्णय घेऊन इकडे आल्याचा मला लौकरच पश्चात्ताप होऊ लागला. अनारखाईच्या मुक्कामातील त्या अखेरच्या सहा महिन्यात आसेलबद्दलची व मुलाबद्दलची माझी ओढ पराकोटीला पोचली. मला झोप लागेना. गुबगुबीत पायांवर हिंदोळणारा हसरा सामत मला सतत नजरेसमोर दिसू लागला. त्याच्या अंगाचा तो गोड वास मला जन्मभर आठवत राहील. माझ्या लाडक्या तिएन शानकडे परतायला,

माझ्या निळ्यासमोर इस्सिक-कुलचे दर्शन घ्यायला, माझ्या पहिल्यावहिल्या आणि एकमेव प्रेमाची जिथे भेट घडली तो स्तेप प्रदेश पहायला माझा जीव आसुसला होता. मला काय वाटते आहे ते कादिचाला जाणवत होते, पण त्याबद्दल तिने मनात राग धरला नव्हता. अखेरीस आम्हा दोघांनाही जाणवले की, यापुढे एकत्र राहणे अशक्य आहे.

त्या वर्षी अनारखाईत वसंताचे आगमन खूप लौकर झाले. बर्फ चटकन वितळला आणि टेकड्या हिरव्या दिसू लागल्या. स्तेपमध्ये चैतन्य जाणवू लागले. हवीशी वाटणारी उबदार हवा व ओलसरपणा भूमी सामावून घेऊ लागली. रात्री हवा तरल वाटू लागली. आकाश चांदण्यांनी विखुरलेले दिसू लागले.

यारीजवळच्या तंबूत आम्ही बिछान्यावर पडलो होतो. झोपेविना तळमळून काढलेल्या माझ्या अनेक रात्रींपैकी ती एक रात्र होती. एकाएकी, स्तेपच्या त्या शांत वातावरणात, अतिदूर अंतरावर आगगाडीची अस्पष्ट शिट्टी मला ऐकू आली. तो आवाज माझ्यापर्यंत कसा पोहोचला ते सांगणे अवघड आहे. याचे कारण आम्ही ज्या ठिकाणी होतो तिथून मोटरीने बारा तासांच्या अंतरावर रेल्वे होती. कदाचित मला तो भास झाला असेल. नक्की काय ते मला ठाऊक नाही. काय असेल ते असो, पण त्यामुळे माझ्या हृदयाचे ठोके जलद पडू लागले. मला तिथून गेले पाहिजे असे ते सांगू लागले.

"कादिचा, मी चालला."

"होय इल्याज, आपल्याला वेगळं झालं पाहिजे," ती उत्तरली.

आणि आम्ही वेगळे झालो. कादिचा उत्तर कझाखस्तानात नापेर भूमीकडे गेली. ती सुखी व्हावी असे मला वाटत होते. मला प्रामाणिकपणे आशा वाटते आणि विश्वास वाटतो की, कुणी एक पुरुष नकळतपणे कुठेतरी तिची वाट पहात असलेला तिला भेटेल. तिच्या पहिल्या नवऱ्याबरोबर तिच्या वाटयाला दुर्दैव आले होते. तिच्या अपेक्षांना तो उतरला नव्हता. माझ्याबरोबरही ती अधिक सुखी झाली नव्हती. खरे प्रेम काय असते, स्त्रीवर प्रेम करण्यात व तिच्याकडून प्रेम मिळवण्यात काय सुख असते हे मला एकवेळ माहीतच नसते तर कदाचित मी कादिचाबरोबर राहिलोही असतो. ही गोष्ट अशी आहे की, ती शब्दात मांडता येत नाही.

मी कादिचाला घेऊन स्टेशनावर गेलो व तिला निरोप दिला. गाडीला वेग येईपर्यंत मी तिच्याबरोबर धावत राहिलो. "सुखी रहा कादिचा, माझा राग धरू नको," मी अखेरचे तिला म्हणालो.

बगळे अनारखाईच्या दक्षिणेला उडत होते, तर मी उत्तरेला तिएन शान पर्वतांकडे निघालो होतो.

* * *

त्या भागात आल्यानंतर मी पहिली काही गोष्ट केली असेल तर ती म्हणजे रस्त्यात हात दाखवून एक लॉरी थांबवली आणि सरळ आसेलच्या खेडयाचा रस्ता धरला. लॉरीच्या मागच्या भागात बसून प्रवास करताना मी डोक्यातले सगळे विचार पुसून टाकायचा प्रयत्न केला. मला भीतीही वाटत

होती आणि त्याचवेळी आनंदही वाटत होता. ज्या ठिकाणी मी आसेलला भेटत असे त्याच रस्त्यावरून आम्ही निघालो होतो. आता तो खेड्यातला रस्ता राहिला नव्हता. कॉंक्रीटचे पूल बांधलेला, रस्त्यांवर वाहतुकीच्या खुणांच्या पाट्या असलेला तो झकास हमरस्ता बनला होता. पण मला जुन्या रस्त्याची आठवण येत राहिली. खूप दिवसांपूर्वी ज्या ठिकाणी माझी लॉरी चिखलात अडकली होती ते ठिकाण ओळखण्याच्या पलिकडचे झाले होते. तसेच ज्या दगडावर एके काळी आसेल माझी वाट पहात बसली होती, तो दगडही तेथे नव्हता.

खेड्याजवळ आलो तेव्हा मी ड्रायव्हरच्या वरच्या टपावर ठोकले.

"काय झालं?" डोके बाहेर काढून ड्रायव्हरने विचारले.

"थांबवतो का, मला खाली उतरायचं आहे."

"इथं शेतात? आपण खेड्याच्या जवळ आलोय."

"नको, मी चालतच जाईन. माझं ठिकाण इथून फारसं लांब नाही," मी खाली उडी टाकीत म्हटले. मी त्याला काही पैसे देऊ केले.

"राहू दे," तो म्हणाला. "आम्ही आपल्या लोकांकडून पैसे घेत नाही."

"घे रे बाबा. मी ड्रायव्हर आहे हे तुला कसं कळलं?"

"तुझ्या अंगभर लिहिलंय ते."

"ठीक आहे. तुझं भलं होवो!"

तो लॉरी घेऊन निघून गेला. आणि मी रस्त्याच्या मध्यभागी धीर एकवटण्याचा प्रयत्न करीत उभा राहिलो. थरथरत्या हातांनी मी सिगरेट पेटवली. मी तिचे पुन:पुन्हा

जोरजोराने झुरके घेतले. "अखेरीस मी इथं आलो तर," सिगरेटचे थोटुक फेकून देत मी मोठ्याने म्हणालो. मी खेड्याच्या दिशेने चालू लागलो. माझ्या छातीचे एवढे मोठ्यांदा ठोके पडत होते की, माझ्या कानाच्या पड्द्यांना त्रास होऊ लागला. अक्षरशः माझेच विचार मला ऐकू येईनासे झाले.

खेड्यात ठळक बदल घडून आले होते. त्याचा आकार वाढला होता व धाब्याच्या छपराची अनेक नवी घरे उभी राहिली होती. घराघरांना विजेच्या तारांचे ताण बसलेले दिसत होते. सहकारी शेती कचेरीच्या बाहेर खांबाला रेडिओचा कर्णा लावलेला होता. मुले लगबगीने शाळेला निघाली होती. मोठ्या विद्यार्थ्यांचा एक गट आपल्या शिक्षकाबरोबर कशावर तरी जोरजोराने चर्चा करीत चालला होता. एकेकाळी माझ्यावर काट्या दगड मारणाऱ्या बारक्या पोरांपैकी त्यांच्यात कुणी असण्याचीही शक्यता होती. होय, काळाची वाटचाल चालूच असते. ती कधीच एका जागी थांबत नाही.

मी अधिक वेगाने चालू लागलो. तिथे आता मातीची भिंत होती व अंगणात वाळुंजीची झाडे होती. मी श्वास घ्यायला थांबलो. भीतीने सारे रक्त गोठल्यासारखे झाले. मी बिचकत बिचकत फाटकाकडे गेलो व कडी वाजवली. शाळेचे दप्तर घेऊन निघालेली एक मुलगी धावत आली. याच मुलीने जीभ काढून मला वेडावून दाखवले होते. आता ती शाळेत जाणारी मोठी मुलगी झाली होती. ती घाईत होती. माझ्याकडे गोंधळल्या नजरेने पहात ती म्हणाली:

"घरात आत्ता कुणीच नाही."

"कुणीही नाही?"

"नाही. आई लाकूडतोड्यांच्या छावणीत कुणाला तरी भेटायला गेलीय, आणि वडील शेतांमधल्या ट्रॅक्टरना पाणी घेऊन गेलेत."

"आणि आसेल?" मी घाबरत विचारताना माझ्या घशाला एकदम कोरड पडली होती.

"कोण, आसेल?" त्या मुलीच्या आवाजात आश्चर्य होते. "ती तर कित्येक वर्षांपूर्वी घर सोडून गेली."

"आणि कधीही परत आली नाही?"

"ती दरवर्षी जीजाजींबरोबर घरी येते. आई म्हणते तो फार छान माणूस आहे."

मी अधिक काही विचारले नाही. ती मुलगी शाळेला पळाली आणि मी आल्या वाटेने परतलो.

ही बातमी एवढी प्रचंड हादरा देणारी होती की, तिने ज्या माणसाबरोबर लग्न केले त्याचे नाव आणि तिचा ठावठिकाणा या गोष्टी बिनमहत्त्वाच्या ठरल्या. कशाला विचारायचे? आसेल दुसरा पुरुष जवळ करील ही कल्पनाच कशी कुणास ठाऊक, पण मनाला कधी शिवली नव्हती. आणि तरीही हा विचार मी करायला हवा होता. शेवटी माझी वाट पहात तिने तरी आयुष्यातली किती वर्षे फुकट घालवायची?

माझ्या वाटेने जाणाऱ्या एखाद्या लॉरीची वाट पहात बसण्यापेक्षा मी चालत जाण्याचे ठरवले. -

रस्त्यात खूपच बदल झाला होता. तो आता गुळगुळीत आणि पक्का बनला होता. शरदात नांगरलेल्या जमिनीच्या काळसर पट्ट्यांचे स्तेप मात्र पूर्वीसारखेच दिसत होते. फिकट पट्ट्यांवर कापलेल्या पिकाचे खुंट होते. डोंगरांपासून क्षितिजाच्या

कडेपर्यंत प्रचंड लाटांप्रमाणे ते पसरले होते आणि दूरच्या इस्सिक-कुलच्या किनाऱ्याला विरळ होत गेले होते. बर्फ वितळून गेल्यानंतर जमीन ओलसर व मोकळी मोकळी दिसत होती. वसंतातली नांगरट जेथे चालू होती तेथे ट्रॅक्टरांचा घरघराट ऐकू येत होता.

जिल्ह्याच्या ठिकाणी मी पोचलो तेव्हा रात्र झाली होती. सकाळपर्यंत माझ्या मनाचा निश्चय झाला: काम करण्यासाठी मी पुन्हा मोटर डेपोत जाईन. सारे काही संपले होते, सारे काही हरलो होतो. या घटकेला काम करून जगणे एवढेच हाती होते. भविष्यात काय घडेल ते कुणाला ठाऊक...

नेहमीप्रमाणे तिएन शान रस्ता रहदारीने गजबजला होता. माझ्या वाटेने जाणाऱ्या लॉरींची अखंड मालिका लागली होती, पण मला आमच्या डेपोची लॉरी हवी होती. अखेरीस एक आली आणि मी हात उंचावला.

ड्रायव्हर वेगाने बाजूने गेला आणि नंतर त्याने एकदम ब्रेक लावले. मी सूटकेस उचलली तेवढ्या वेळात तो माझ्याकडे आला. तो माझ्या तुकडीमधील एर्मेक होता. त्याला मोटर चालवायला मी शिकवले होते. त्याच्या चेहऱ्यावर अस्पष्ट हसू होते.

"तू मला ओळखलंस?" मी विचारले.

"तुम्ही... तुम्ही सार्जंट... इल्याज. इल्याज अलिबायेव," त्याने अखेरीस मला बरोबर ओळखले.

"होय मीच," कडवट हसून मी म्हणालो. मला ओळखायला त्याला एवढा त्रास पडला होता याचा अर्थ माझ्यात खूपच बदल घडला होता.

बरोबर प्रवास करताना आम्ही इकडच्या तिकडच्या विषयांवर बऱ्याच गप्पा मारल्या, आमचे सैन्यातील दिवस आठवले. मला तो अवघड प्रश्न विचारील अशी सारखी भीती वाटत होती, पण त्याने माझ्याबद्दल काही ऐकलेले नसावे. मला तो मोठा दिलासा वाटला.

"सैन्यातून तू घरी केव्हा परतलास?" मी विचारले.

"मी या कामावर दोन वर्षांच्यापेक्षा जास्त दिवस आहे."

"अलिबेक जान्तुरिन कुठं आहे तुला ठाऊक आहे?"

"नाही, मला माहीत नाही. मी येण्यापूर्वीच त्यांनी इथून नोकरी सोडली. मी असे ऐकले की, पामीरमध्ये कुठेतरी एका डेपोत ते प्रमुख मेकॅनिक म्हणून काम करतात."

"शाब्बास अलिबेक!" मनात विचार आला. "शाब्बास मित्रा. तू जिद्द राखलीस." अखेरीस त्याला जेथे जायचे होते तेथे तो गेला. वाहतूक तांत्रिक विद्यालयात त्याने टपालाद्वारा अभ्यासक्रम पुरा केला.

"अमानजोलोव अजून संचालक आहेत?"

"नाही, त्या जागी नवा माणूस आहे. अमानजोलोव यांची मंत्रालयात बढती झाली."

"मला ते कामावर घेतील असं तुला वाटतं?" मी विचारले.

"नक्कीच, का नाही घेणार? तुम्ही अत्यंत उत्तम ड्रायव्हर आहात. सैन्यात तुमच्याबद्दल सर्वांचं फार चांगलं मत होतं. तुम्हाला ठाऊक आहे ते!"

"होय, एकेकाळी होतं," मी उसासा टाकीत पुटपुटलो. "तुला जान्ताइ माहीत आहे?"

"नाही, हे नाव मी कधी ऐकलं नाही."

"याचा अर्थ डेपोत खूप बदल घडलेत," मी मनाशी विचार केला आणि नंतर विचारले : "तुम्ही खिंडीतून ट्रेलर नेता?"

"हो, फक्त माल किती असतो त्यावर अवलंबून असतं," एर्मेक सहजपणे म्हणाला. "जेव्हा गरज भासते तेव्हा आम्ही ट्रेलर जोडतो. आता आमच्याकडं भक्कम गाड्या आहेत."

त्या ट्रेलरमुळे मला काय काय भोगावे लागले होते याची त्याला कल्पना नव्हती.

अशा तऱ्हेने मी माझ्या जुन्या डेपोत परत आलो. एर्मेकने आपल्या घरी मला बोलावले व आमच्या भेटीनिमित्त पिण्याचे निमंत्रण केले. पण मी नकार दिला. आता मी कधीही दारूला स्पर्श करीत नाही.

डेपोतली माणसे माझ्याशी फार चांगली वागली. माझ्याबद्दलची सारी माहिती असूनही त्यांनी फाजील चौकशांचा माझ्यावर भडिमार केला नाही, त्यांच्याबद्दल मी कृतज्ञ होतो. बहुधा ते असा विचार करीत असावेत: दुसरीकडे आयुष्याचा अनुभव घेऊन हा माणूस इथे परत आलाय, तो आपले काम मन लावून करतो आणि तेवढेच आम्हाला पुरेसे आहे. घडले ते घडले. मी सुद्धा सारे काही विसरून जाण्याचा खूप प्रयत्न केला, संपूर्ण विसरून जाण्याचा प्रयत्न केला. एकेकाळी ज्या ठिकाणी मी माझ्या कुटुंबाबरोबर रहात होतो त्या मालमोटरींच्या थांब्यापासून उजवी-डावीकडे न पाहता मी सरळ वेगाने निघून जात असे. तेथील पेट्रोल पंपावर पेट्रोल घ्यायला कधीही थांबत नसे.

डेपोत परत कामावर रुजू होऊन मला काही दिवस लोटले होते. मी माझा जम बसवीत होतो. माझी लॉरी मला

पुरी माहीत झाली होती. मी वेगवेगळ्या प्रकारे इंजिनाची चाचणी घेतली होती. वेगवेगळ्या रस्त्यांवरून फिरून आलो होतो. थोडक्यात, मला माझे काम उत्तम माहीत झाले होते.

त्या दिवशी मी चीनहून परत येत होतो. मी सरळ चाललो होतो. सिगरेट ओढत स्वतःच्याच तंद्रीत होतो. ते वसंताचे दिवस होते आणि दिवस छान होता. मेंढपाळ उन्हाळी कुरणांकडे निघाले होते. त्यांच्या राहुट्या दुरूनही दिसत होत्या व काहींमधून निळसर धुराच्या रेषा बाहेर पडत होत्या. घोड्यांच्या अस्वस्थ खिंकाळ्या वाऱ्याच्या झुळुकांबरोबर ऐकू येत होत्या. मेंढ्यांचे कळप रस्त्यापासून जवळच चरत होते. या दृश्यांनी लहानपणच्या आठवणी जाग्या झाल्या. मला थोडे खिन्न वाटले... मी सरोवराकडे गाडी नेली आणि मला धक्का बसला — इस्सिक-कुलमध्ये हंस पक्षी होते!

वसंताच्या दिवसात सरोवरात हंस पक्ष्यांना पाहण्याची माझी ही फक्त दुसरी वेळ होती. गहिऱ्या निळ्या पाण्यावर पांढरे शुभ्र पक्षी रिंगण घालीत होते. काहीही विचार न करता मी चटकन लॉरी रस्त्यापासून बाजूला वळवली आणि फार पूर्वी त्या दिवशी जसा गेलो होतो तसा सरळ सरोवराकडे निघालो.

इस्सिक-कुल, माझे इस्सिक-कुल — माझे अधुरे गीत! मी आसेलबरोबर येथे आलो होतो तो दिवस आठवायचे आणि पाण्याच्या अलिकडे जेथे थांबलो होतो तेथेच थांबायचे काय कारण होते? सारे काही तसेच होते. निळ्या-पांढऱ्या लाटा पिवळसर किनाऱ्याकडे हातात हात घालून बागडत येत होत्या. डोंगरापल्याड सूर्य मावळत होता आणि दूरच्या टोकाच्या सरोवराच्या पाण्याला गुलाबी छटा आली होती. आनंदाने कलकल करीत हंसांनी

पाण्यावर फेर धरला होता. ते वर भरारी घेत आणि पंख पसरून थपकन पाण्यावर पडत तेव्हा ते कुजबुजत असल्याचा भास होई. पाण्यावर ते सपासप सपकारे मारीत तेव्हा मोठी, फेसाळ वर्तुळे उमटत. सारे काही त्या वेळेसारखेच होते, फक्त आसेल जवळ नव्हती. लाल रुमालातल्या माझ्या चिनारा, तू कुठे आहेस आता?

मी तिथे खूप वेळ थांबलो आणि नंतर डेपोकडे परत गेलो. मानसिक ताण असह्य झाला आणि मी पुन्हा प्यायलो... माझी पुन्हा जागी झालेली वेदना मारण्यासाठी मी वोदका प्यायला पुन्हा एकदा गुत्त्यात गेलो. मी तिथून बाहेर पडलो तेव्हा बराच उशीर झाला होता. आकाश काळोखले होते व ढगांची दाटी झाली होती. पाईपमधून यावा त्याप्रमाणे घळीतून वाऱ्याचा जोरदार स्रोत वहात होता, झाडांशी तो वेड्यासारखा मस्ती करत होता, विजेच्या तारांना घासून चमत्कारिक आवाज करीत होता आणि काही तुषार माझ्या तोंडावर उडवीत होता. सरोवर खळबळून निघत होते. अखेरीस मी वसतीगृहावर पोहोचलो आणि कपडे उतरवायचे कष्ट न घेता तसाच बिछान्यावर पडून झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी डोके एवढे जबरदस्त ठणकत होते की, मला ते जरासुद्धा वर उचलता येईना. बाहेर अर्धवट पाऊस नि अर्धवट हिमवर्षाव अशी चमत्कारिक झिमझिम चालू होती. मी तीन तास सताड डोळे उघडे टाकून पडून होतो. कामावर जायची अजिबात इच्छा होत नव्हती. कामात गुंतवून घेऊनही मनाला शांतता लाभत नाही असे त्यावेळी प्रथमच घडले होते. मग माझी मलाच शरम वाटली आणि मी उठलो.

लॉरी अगदी सुस्तपणे चालली होती, किंवा माझे मन सुस्त बनले होते. हवासुद्धा खूप खराब होती. वाटेत भेटणाऱ्या मोटरींवर बर्फाचे थर होते. याचा अर्थ घाटात बर्फ पडला होता. पडू दे, बर्फ पडू दे, हिमवादळ होऊ दे, मला कशाचीही पर्वा नाही, मी सारं अनुभवलंय, मग कशाला उगीच चिंता करायची...

माझी मनःस्थिती अत्यंत वाईट होती. समोरच्या आरशात दिसणारा माझाच चेहरा मला पाहवत नव्हता: सुजलेला, बलबलीत, रोगी चेहरा आणि त्यावर वाढलेले दाढीचे खुंट. रस्त्यावरून थांबून मी कुठेतरी जेवायला हवे होते. त्या दिवशी मी काहीही खाल्ले नव्हते, पण मला भूक नव्हती. त्यापेक्षा मला दारू प्यावीशी वाटत होती. तुम्हाला माहीतच आहे, एकदा का इच्छेच्या आधीन झालात की, पुढे थांबवणे कठीण. त्या पहिल्या ग्लासानंतर मला जरा बरे वाटले. माझी गाडीही आता बरी धावू लागली. पुढच्या गुत्त्यात मी पुन्हा थांबलो, पुन्हा मला मोठा प्याला रिचवला. त्यानंतर आणखी एक प्याला पोटात गेला. आता रस्ता माझ्यामागे वेगाने धावत होता आणि समोरच्या काचेवरचे वायपर्स डोळ्यांपुढे नाचत होते. मी चाकाला घट्ट बिलगून बसलो होतो, केव्हाच विझून गेलेली सिगरेट चावीत होतो. समोरून वेगाने येणाऱ्या व माझ्या खिडक्यांवर चिखलाचा सडा उडवणाऱ्या गाड्यांशिवाय मला दुसऱ्या कशाचेच अस्तित्व भासत नव्हते. मी वेग वाढवला. मला उशीर होत होता. घाटात अंधाराने मला गाठले. त्या कुंद रात्री आकाशात चांदण्या दिसत नव्हत्या. पोटातली वोदका बोलू लागली होती. मी थकत चाललो होतो. माझ्या

डोळ्यांसमोर अंधारी येत होती आणि रस्ता दिसेनासा होत होता. लॉरीत मला कोंदटल्यासारखे वाटत होते. मला ओकारी काढावीशी वाटत होती. मी इतका कधी प्यायलो नव्हतो. माझ्या चेहऱ्यावरून घामाच्या धारा वहात होत्या. मी लॉरी चालवीत नसून माझ्या पुढच्या दिव्यांमधून निघणाऱ्या दोन प्रकाशस्रोतांवरून दौडत चाललो आहे असा मला भास होत होता. त्या किरणांवरून दौडताना मी प्रकाशमय पोकळीत एकदम सूर मारीत होतो आणि पुन्हा दगडांच्या पृष्ठभागावरून खाली-वर नाचत नागमोडी वळणांनी धावणाऱ्या प्रकाशकिरणांमागून धावत होतो. दर मिनिटागणिक मी अधिक थकत चाललो होतो, पण मी थांबलो नाही. कारण एकदा का माझी चाकावरची पकड ढिली झाली की, माझा ताबा सुटणार हे मला ठाऊक होते. मी त्यावेळी नक्की कुठे होतो हे मला आठवत नाही, पण मी कुठेतरी खिंडीच्या आसपास होतो. दोलन, तिएन शानची महाप्रचंड खिंड! तुला ओलांडणे हे एक दिव्य आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि त्यातही झिंगलेल्या ड्रायव्हरला फारच कठीण आहे.

चढावरच्या ताणाने प्रचंड घरघराट करीत लॉरी वरच्या टप्प्यापर्यंत पोचली आणि नंतर एकदम उतारावरून घरंगळू लागली. सारे गोल गोल फिरताना दिसू लागले, काळे आकाश उलटून खाली पडल्याचा भास झाला. माझे हात माझ्या ताब्यात राहिले नव्हते. उतारावरचा वेग घेऊन लॉरी बेफाम वेगाने घरंगळत निघाली. काहीतरी आदळल्याचा एक अस्पष्ट आवाज मला ऐकू आला, धातू कुठेतरी खरवडत घासत गेला असे वाटले, पुढचे दिवे एकदाच झगझगले आणि अंधाराने

मला लपेटून टाकले. "माझी लॉरी आदळलीय," हा विचार आत कुठेतरी खोलवर टोचला.

मी तिथे किती वेळ पडून होतो कुणास ठाऊक. मला एवढेच आठवते की, कुणाच्यातरी बोलण्याचे आवाज मला ऐकू येत होते. पण कानात कापसाचे बोळे घातल्यानंतर जसे ऐकू येईल तसा आवाज मला ऐकू येत होता. "जरा, इकडे उजेड टाक," तो आवाज म्हणाला. माझ्या डोक्यावर, खांद्यावर आणि छातीवर कुणाचे तरी हात चाचपत असलेले मला जाणवले. "तो जिवंत आहे, पण चिक्कार प्यालाय." दुसरा आवाज म्हणाला : "आपल्याला रस्ता मोकळा केला पाहिजे."

"चल मित्रा, थोडा प्रयत्न करून बाजूला सरक. आपण तुझी लॉरी रस्त्यामधून बाजूला करू या," माझ्या खांद्याला किंचित धक्का देत तो माणूस म्हणाला.

कण्हत मी डोके वर उचलले. कपाळावरच्या जखमेतून रक्ताचा ओघळ चेहऱ्यावर उतरला. माझ्या छातीत काहीतरी गच्च बसल्यासारखे झाले होते. ते मला सरळ होऊ देत नव्हते. त्या माणसाने काडी ओढून मला एकवार पाहिले. मग पुन्हा त्याने आणखी एक काडी ओढली आणि मला नीट न्याहाळले.

"अरेरे, फार वाईट. मित्रा असा कसा सापडलास?" अंधारात त्याच्या आवाजात माझ्याबद्दल वाटणारी अनुकंपा जाणवत होती.

"लॉरीचं बरंच नुकसान झालंय?" रक्त थुंकीत मी विचारले.

"नाही, फारसं नाही. ती रस्त्यावरून घसरली आहे एवढंच."

"ठीक आहे तर मग मी चलतो. मी रस्ता अडवून बसत नाही," असे म्हणून मी चावी फिरवून इंजिन सुरू करायचा प्रयत्न केला. पण माझी बोटे थरथरा कापत होती.

"पुरे झालं," त्या माणसाने आपला भक्कम पंजा माझ्या खांद्यावर ठेवीत म्हटले. "तू भरपूर नुकसान केलं आहेस. चल आता. आजची रात्र माझ्याकडे काढ आणि सकाळी आपण काय करायचं ते पाहू."

त्या दोघांनी लॉरीतून मला ओढून बाहेर काढले.

"केमेल, लॉरी रस्त्याच्या बाजूला उभी करून घे. मग आपण तिच्याकडे पाहू या."

आपल्या खांद्याचा आधार देऊन त्याने मला बगलेत धरले व ओढत नेले. त्या अंधारात आम्ही कुठे चाललो होतो ते मी सांगू शकत नव्हतो. बऱ्याच फरपटीनंतर आम्ही त्याच्या ठिकाणापर्यंत पोचलो. त्या माणसाने मला दरवाजातून आत जायला मदत केली. पुढच्या खोलीत पॅराफिन तेलाचा दिवा पेटत होता. माझ्या यजमानाने मला स्टुलावर बसवले व माझ्या लोकरी कोटाची बटणे तो सोडू लागला. मी त्यावेळी त्याच्याकडे पाहिले आणि मला एकदम आठवण झाली. तो बैतेमीर होता. त्या रस्ता दुरुस्ती केंद्रावरचा मुकादम. त्याचीच लॉरी मी एकदा खिंडीतून ओढून आणली होती. माझ्या त्या अवस्थेची मला लाज वाटत असली, तरी त्याला पुन्हा पाहून मला खूप आनंद झाला. माफी मागून आभार मानण्यासाठी मी तोंड उघडले तोच माझ्यामागे लाकडे फरशीवर टाकल्याचा आवाज झाला म्हणून मी वळून मागे पाहिले. मोठ्या कष्टाने हळूहळू उठून मी उभा राहिलो. जणू काही माझ्या खांद्यांवर

कुणी मणांचे ओझे लादले आहे असा भास होत होता. दारात आसेल उभी होती व तिच्या पायाशी लाकडांचा भारा विस्कटून पडला होता. ती अगदी ताठ उभी होती आणि मुखस्तंभ होऊन विस्फारल्या डोळ्यांनी एकटक पहात होती.

"का पण... का..." ती अस्फुटपणे उद्गारली.

"आसेल!" म्हणून मी मोठ्यांदा ओरडणारच होतो पण तिच्या नजरेत असा काही तिऱ्हाईताचा भाव होता की, माझ्या तोंडून आवाजच उमटला नाही. शरमेने चूर होऊन मी मान खाली घातली. तो शांततेचा क्षण फार भयानक होता. बैतेमीरने ती शांतता मोडली. त्याने मला पुन्हा खाली बसवले आणि शांतपणे तो आसेलला म्हणाला :

"आसेल, तसं काही विशेष घडलेलं नाही. या लॉरी ड्रायव्हरला छोटासा अपघात झालाय आणि त्याला थोड्या विश्रांतीची गरज आहे... थोडं आयोडिन आणतेस का?"

"आयोडिन? शेजारी घेऊन गेलेत, पण मी जाऊन आत्ता आणते," घाबरट आवाजात ती म्हणाली व घाईने बाहेर गेली.

मी काहीही न बोलता किंवा कसलीही हालचाल न करता तेथे बसून होतो. माझी नशा साफ उतरली होती, त्या धक्क्याने मी एकदम भानावर आलो होतो. कपाळावरच्या शिरा ताडताड उडत होत्या.

"आपण जखमा प्रथम धुतल्या पाहिजेत," माझ्या कपाळावरची जखम तपासून पहात बैतेमीर म्हणाला. बादली घेऊन तो बाहेर गेला. नुसती चड्डी घातलेला पाच वर्षांचा

एक अनवाणी मुलगा पलिकडच्या खोलीतून डोकावला. तो माझ्याकडे कुतूहलाने पहात होता. मी त्याला चटकन ओळखले. मी त्याला कसे ओळखले ते मला समजावून सांगता यायचे नाही, पण माझ्या काळजाने मला ते सांगितले असावे.

"सामत," मी हलक्या आवाजात हाक मारली आणि त्याला घेण्यासाठी बाहू पुढे पसरले. नेमक्या त्याच वेळी बैतेमीर दारात आला आणि का कुणास ठाऊक, मी दचकून मागे झालो. सामतला मी नावाने मारलेली हाक त्याने ऐकली की काय अशी मला भीती वाटत होती. चोरी पकडताना पकडले जाणाऱ्या चोरासारखे मला वाटले. त्या धांदलीत मी एका हाताने कपाळावरची जखम झाकली आणि एकाएकी माझा आवाज मला ऐकू आला:

"तुमचा मुलगा?"

आता असे मला विचारायची काय गरज होती? त्याबद्दल आजही मी स्वतःला क्षमा करू शकत नाही.

"होय, माझा मुलगा," यजमानाच्या शालीनतेने बैतेमीर उत्तरला. त्याने बादली खाली ठेवली व सामतला उचलून घेतले. "होय हा माझा मुलगा, माझाच मुलगा, होय की नाही सामत?" त्या मुलाचा पापा घेत व आपल्या मिशांनी त्याला मानेवर गुदगुल्या करीत तो म्हणाला. बैतेमीरच्या वागण्या-बोलण्यात कुठेही संशयाची किंवा अप्रामाणिकपणाची छटा नव्हती. "तू झोपला का नाहीस? माझ्या शिंगरा, तुला बाहेर येऊन कोण आहे ते बघायचं होतं का? चला, पळा आता, पटकन आपल्या बिछान्यावर जाऊन गुडुप्प झोपा!"

"आई कुठाय?" सामतने विचारले.

"आता एका मिनिटात तो परत येईल. ती बघ आलीच. चल माझ्या राजा, पळ आता."

आसेल पळत पळत खोलीत आली. तिने सारा रागरंग चटकन संशयित नजरेने टिपून घेतला, एकही शब्द न बोलता आयोडिनची बाटली बैतेमीरच्या हातात दिली व सामतला निजवायला ती घेऊन गेली.

बैतेमीरने टॉवेल ओला करून माझ्या तोंडावरचे रक्त पुसून काढले.

"आता किंचाळू नको हं," असे हसऱ्या चेहऱ्याने म्हणत त्याने माझ्या जखमांना आयोडिन लावायला सुरुवात केली आणि खंबीर आवाजात पुढे बोलू लागला: "तुझ्या या उद्योगाबद्दल तुझी चांगलीच हजेरी घ्यायला पाहिजे होती. पण आमचा पाहुणा आहेस, तेव्हा सारं विसरून जा. आसेल, आम्हाला थोडा चहा देतेस का?"

"एका मिनिटात."

बैतेमीरने मऊ गालिचावर दुलई अंथरली व तिच्यावर एक उशी टाकली.

"बैस आणि आराम कर," तो म्हणाला.

"मी ठीक आहे. उगीच जास्त त्रास घेऊ नका माझ्या-साठी," मी उत्तरादाखल पुटपुटलो.

"चल रे बाबा, बैस खाली. अगदी घरच्यासारखा वाग," त्याने आग्रह केला.

ती रात्र फार भयाण होती. मला धड मोकळेपणी श्वास घेता येत नव्हता. एक हात माझे काळीज गच्च पकडतोय असा सारखा भास होत होता. भीतीने माझ्या साऱ्या नसा ताणल्या होत्या. अरे देवा, मी जन्माला तरी कशाला आलो!

आसेल खोलीत आली आणि आमच्याकडे न पाहण्याचा प्रयत्न करीत समोवार घेऊन अंगणात गेली.

"आसेल, मी येतो तुला मदत करायला," बैतेमीरने तिला हाक मारून म्हटले. तो जायला उठला, पण तेवढ्यात सामत परत धावत आला. त्याला झोपायची इच्छा नव्हती असे दिसत होते.

"सामत, आता तुला काय पाहिजे?" बैतेमीरने थोड्याशा प्रेमळ आवाजात विचारले.

"काका, तुम्ही सिनेमातून सरळ आमच्या घरी आलात काय?" माझ्या मुलाने अगदी भाबड्या भावाने विचारले आणि नीट पाहण्यासाठी तो माझ्या अधिक जवळ आला.

त्याला काय म्हणायचे होते ते मला समजले, तसेच बैतेमीरलाही समजले आणि तो खो खो हसू लागला.

"वेडा रे वेडा मुलगा," हसत हसत सामतसमोर बैठक घालीत बैतेमीर म्हणाला. "तू खरंच वल्ली आहेस सामत!" नंतर माझ्याकडे वळून तो म्हणाला: "खाणींमध्ये सिनेमा दाखवतात तेव्हा आम्ही त्याला आमच्याबरोबर घेऊन जातो."

"होय, मी सरळ सिनेमातून इथं आलोय," मीही त्यांच्या गंमतीत सामील होत म्हटले.

"नाही, हे खरं नाहीय्," कपाळाला आठ्या घालीत सामत म्हणाला.

"का हे खरं नाही?"

"मग तुम्ही लढाई करता ती तलवार कुठाय?"

"मी घरी ठेवली."

"तुम्ही मला दाखवाल ती? उद्या दाखवाल?"

"दाखवीन. इकडे ये. तुझं नाव सामत नाही का?"

"हो. आणि तुमचं?"

"माझं..." मी थांबलो. "मी इल्याज काका," शब्द माझ्या घशात अडकल्यासारखे झाले.

"सामत आता झोपायला जा बघू. खूप उशीर झालाय," बैतेमीरने त्याला म्हटले.

"बाबा, मी थोडा वेळ इथं थांबतो ना," सामतने विनवणी केली.

"ठीक आहे. आपण आता चहा आणू या."

सामत माझ्याजवळ येऊन उभा राहिला. मी त्याच्या हातावरून हळूच हात फिरवला. तो खूप माझ्यासारखा दिसायला होता. त्याचे हात माझ्यासारखे होते, त्याचे हसणेसुद्धा माझ्यासारखेच होते.

"मोठेपणी तुला कोण व्हावंसं वाटतं?" माझ्या मुलाशी काहीतरी संभाषण सुरू केले पाहिजे या विचाराने मी हा प्रश्न त्याला विचारला.

"लॉरी ड्रायव्हर."

"तुला मोटारीतून फिरायला आवडतं?"

"हो ऽऽ खूप आवडतं... पण मी हात केला तरी कुणी-सुद्धा मला घेऊन जात नाही."

"उद्या मी तुला फिरवून आणीन. तुला यायचंय?"

"हो ऽऽ! मी तुम्हाला माझ्या खेळातल्या काही कवड्या देईन," असे म्हणून तो दौडत त्या आणायला आपल्या खोलीत पळाला.

बाहेर अंगणात समोवारच्या भांड्याला आगीच्या ज्वाळा चाटत होत्या. आसेल आणि बैतेमीर हळूहळू बोलत होते.

सामतने आपली बकऱ्याच्या कातड्याची छोटी पिशवी आणली. तिच्यात त्याने कवड्या ठेवल्या होत्या.

"तुम्हाला हवी ती निवडा," आपला रंगीबेरंगी खजिना माझ्यासमोर रिता करीत तो म्हणाला.

आठवण म्हणून मला एक घ्यावीशी वाटत होती, पण धीर झाला नाही. दरवाजा एकदम धाडकन उघडला गेला आणि वाफाळता समोवार घेऊन बैतेमीर खोलीत आला. आसेल त्याच्या पाठोपाठ आली. ती चहा तयार करण्यात गुंतली, तोपर्यंत बैतेमीरने छोटे गोल बैठे टेबल गालिचावर ठेवले व त्यावर रुमाल पांघरला. सामतने आणि मी कवड्या परत पिशवीत भरल्या.

"अच्छा, तुझी श्रीमंतीची ऐट दाखवत होतास काय रे लबाडा!" बैतेमीरने सामतचा कान हळूच प्रेमाने पकडला.

चहा तयार झाला होता. आम्ही सारे खाली बसलो. आम्ही कधी पूर्वी भेटलोच नव्हतो असा आसेलने आणि मी बहाणा केला. आम्ही शांत असल्याचा देखावा करण्याचा प्रयत्न करीत होतो, त्यामुळे बहुतेक वेळ आम्ही गप्पच होतो. सामत बैतेमीरच्या मांडीवर चढून बसला होता आणि त्याच्या अंगावर तो खेळत होता.

"आई ग! बाबा तुमच्या मिशा नेहमी टोचतात मला," सामतने तक्रार केली. पण तरीही बैतेमीरला सोडायला तो तयार नव्हता. उलट त्याच्या मिशांमध्ये पुन्हा पुन्हा तोंड खुपसत होता.

प्रत्यक्ष आपल्या मुलाच्या इतक्या जवळ बसायचे, पण तो आपला मुलगा आहे हे उघडपणे सांगायची चोरी, अशा अवस्थेत बसून रहायचे आणि दुसऱ्या माणसाला तो बाबा म्हणून हाक मारताना स्वस्थ राहून ऐकायचे, हे मला अत्यंत कठीण जात होते. आसेल, माझी आसेल एवढ्या जवळ आहे हे माहीत असूनही तिच्या डोळयात सरळ पाहण्याचा मला अधिकार नाही ही जाणीव विलक्षण त्रासदायक होती. ती इथे कशी काय आली? प्रेमाखातर तिने या माणसाशी लग्न केले काय? मी तिच्या ओळखीचा आहे असे ती अजिबात दाखवीत नव्हती आणि मला अगदी परक्यासारखा वागवीत होती, तेव्हा मला काही कसे काय समजणार? माझा ती एवढा तिरस्कार करते? आणि बैतेमीर! त्याला माझ्याबद्दल संशय आला नाही? सामत किती माझ्यासारखा दिसतो हे त्याने पाहिले नाही काय? मी त्याची लॉरी ओढली होती त्या घटनेचा तो का उल्लेख करीत नाही? त्या प्रसंगाचा त्याला खरेच विसर पडला काय?

आम्ही रात्री झोपायच्या तयारीला लागलो तेव्हा तर माझी मन:स्थिती अधिकच बिघडली होती. तिथेच गालिचावर माझा बिछाना घातला होता आणि मी भिंतीकडे तोंड करून पडलो होतो. दिव्याची वात बारिक केली होती आणि आसेल स्वैंपाकघरात झाकपाक करीत होती.

"आसेल," झोपायच्या खोलीतून बैतेमीरने प्रेमळ स्वरात हाक मारली. ती दारापाशी गेली.

"त्याचा शर्ट धुवून टाकतेस का?"

रक्ताने माखलेला माझा चौकड्या चौकड्यांचा सदरा

आसेलने धुवायला सुरुवात केली, पण मध्येच ती एकदम थांबली आणि निजायच्या खोलीत गेली.

"रेडिएटरमधलं पाणी काढून टाकलंत का?" बैतेमीरला संथ सुरात ती विचारीत असल्याचे मी ऐकले. "ते गोठून जाईल..."

"केमेलनं ते काम केलंय," बैतेमीरनेही त्याच शांतपणे उत्तर दिले. "लॉरीचं काही नुकसान झालेलं नाही. उद्या सकाळी आम्ही बघू."

मी पाण्याबद्दल साफ विसरलो होतो. पण त्यावेळी माझे लक्ष मोटरीकडे नव्हतेच.

आसेलने माझा सदरा धुतला व वाळवण्यासाठी शेगडीच्या वर बांधलेल्या दोरीवर टाकला. एक दीर्घ उसासा टाकून तिने दिव्यावर फुंकर घातली आणि ती निजायच्या खोलीत गेली.

घरात अंधार दाटला. त्या रात्री आमच्यापैकी कुणीच झोपले नाही हे मला ठाऊक आहे. आमच्यापैकी प्रत्येकजण आपापल्या विचारात गुरफटला होता. बैतेमीरने आपल्या बिछान्यात सामतला घेतले होते. सामतशी हळुवारपणे तो बोलत असलेला व जेव्हा तो झोपेत पांघरूण उडवून देई तेव्हा ते सरळ करीत असलेला मी ऐकत होतो. आसेलने वारंवार टाकलेले सुस्कारे स्पष्ट ऐकू येत होते. त्या अंधारात तिचे नितळ डोळे अश्रूंनी काठोकाठ भरलेले आहेत असे मला सतत जाणवत होते. ती कसला विचार करीत होती, कुणाचा विचार करीत होती? तिच्याजवळ आता आम्ही तिघेही होतो... कदाचित माझ्याप्रमाणेच तिलाही आमच्या गतजीवनातील कडूगोड प्रसंग आठवत असतील. पण ती आता कक्षेबाहेर होती आणि तिचे विचारही आता माझ्या कक्षेबाहेर गेलेले होते. आसेल

बदलली होती, तिचे डोळे बदलले होते. पूर्वीप्रमाणे ते आता विश्वास ठेवणारे, भाबड्या आणि निष्कपट भावाने चमकणारे राहिले नव्हते. त्यांच्यात आता एक प्रकारचा खंबीरपणा होता. पण काही झाले तरी अद्याप ती माझी आसेल होती, माझे गोड, लहानसे चिनाराचे झाड! तिची प्रत्येक हालचाल, प्रत्येक शब्द मला प्रिय होता, मोलाचा होता. मला पूर्वीपेक्षा अधिकच पश्चात्ताप होऊ लागला, अधिक वैफल्य जाणवू लागले. मी उशीचा कोपरा जोराने चावला आणि सबंध रात्रभर न झोपता तसाच पडून राहिलो.

आकाशामध्ये चंद्राचा ढगांशी चाललेला पाठशिवणीचा खेळ मी खिडकीतून बराच वेळ पहात होतो.

आसेल आणि बैतेमीर पहाटेच उठले आणि नित्यकर्मे आटपायला ते अंगणात गेले तेव्हा मीही उठलो. निघायची वेळ झाली होती. चोरपावलांनी मी सामतजवळ गेलो, त्याचा मुका घेतला आणि पटकन खोलीतून बाहेर आलो.

अंगणात आसेल पाण्याचा भला मोठा हंडा भरीत होती आणि दगडी चुलाण्यासाठी बैतेमीर लाकडे फोडीत होता. तो आणि मी लॉरीकडे गेलो. चालताना आम्ही सिगरेटी ओढीत होतो. आमच्यापैकी कुणीच बोलत नव्हता.

रस्त्याच्या कडेच्या एक दोन दगडांना मी ठोकर मारली होती आणि ते कॉंक्रीटच्या पायामधून मुळापासून उखडले होते. लॉरीचा पुढचा एक दिवा फुटला होता, मडगार्ड आणि बंपर चेपले होते आणि चाक गच्च अडकले होते. एक वाकड्या टोकाची पहार आणि एक हातोडा एवढ्याच हत्यारांनिशी आम्ही जमेल तेवढी दुरुस्ती केली. पुढचेच काम कंटाळवाणे

होते. इंजिन थंडगार पडले होते. तेलाची टाकी गरम करायला आम्ही बऱ्याच चिंध्या जाळल्या आणि बरोबरीनेच हँडल मारत राहिलो. आमचे खांदे एकमेकांना स्पर्शत होते, हँडल मारून मारून आमच्या हातांचे तळवे गरम झाले होते, आमचे श्वास एकमेकांच्या चेहऱ्यांना जाणवत होते, आम्ही एकाच हेतूने काम करीत होतो आणि कदाचित आम्ही एकाच गोष्टीचा विचार करीत होतो.

इंजिन काही केल्या सहकार्य देईना. आमचा दम निघत होता. आसेलने आमच्यासाठी गरम पाण्याच्या दोन बादल्या आणल्या. चकार शब्द न बोलता त्या तिने माझ्यासमोर ठेवल्या आणि बाजूला उभी राहिली. मी रेडिएटरमध्ये पाणी ओतले. बैतेमीरने आणि मी पुन्हा एकदा हँडल मारले, आणखी एक प्रयत्न केला आणि अखेरीस इंजिन सुरू झाले. मी लॉरीत बसलो. इंजिन जेमतेम खडखडत सुरू झाले होते. स्पार्क प्लगची तपासणी करायला बैतेमीरने बॉनेट खोलले. त्याच क्षणाला सामत धापा टाकीत पळत तेथे आला. त्याच्या कोटाची अर्धी बटणे खुलीच होती. तो लॉरीभोवती फेरी घालू लागला. त्याला लॉरीतून फिरायचे होते. आसेलने त्याला धरले आणि घट्ट पकडून ठेवून ती लॉरीशेजारी उभी राहिली. तिने माझ्याकडे विलक्षण बोलका कटाक्ष टाकला. त्यात राग, वेदना आणि अनुकंपा यांचे विलक्षण मिश्रण होते. त्या क्षणी असे वाटले की, त्यांना परत मिळविण्यासाठी जगातली वाटेल ती अशक्यप्राय गोष्ट मी करीन आणि त्यांचा मी जो अपराध केला आहे त्याची भरपाई करीन.

"आसेल," लॉरीच्या उघड्या दारातून डोकावून ओरडून मी म्हटले. "मुलाला घेऊन लॉरीत चढ. पहिल्या वेळेसारखाच

१०*

मी तुला घेऊन जाईन, कायमसाठी मी तुला घेऊन जाईन. आसेल, चल ना," मी तिची विनवणी केली. मोटरीच्या घरघराटात माझे शब्द बैंतेमीरला ऐकू जात नव्हते.

आसेल काहीही बोलली नाही. तिच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर वहात होता. तिने बाजूला नजर टाकली व मानेने नकार दिला.

"चल ना आई, आपण लॉरीतून फिरून येऊ या," तिच्या हाताला खेचत सामत रडत म्हणाला.

ती खाली मान घालून निघून गेली. तिने एकदाही मागे वळून पाहिले नाही. सामतला घरी जायचे नव्हते. तो तिच्या हातून सुटून मागे पळायचा प्रयत्न करीत होता.

बैंतेमीरने बॉनेट खाली आदळले, खिडकीतून हातोडा माझ्या हातात दिला आणि तो म्हणाला: "तयार. सब ठीक." मी निघालो.

पुन्हा एकदा चाकावर, पुन्हा एकदा पहाडात, पुन्हा एकदा रस्त्यांवर. माझी लॉरी मला नेत होती – मला कशाचे भान होते! ...

आसेलचा आणि माझ्या मुलाचा मला पुन्हा असा शोध लागला. आमची अशी भेट झाली आणि वियोग झाला. सीमेपर्यंतच्या रस्त्यात आणि परतीच्या वाटेवर मी याचा खूप खूप विचार केला. माझ्या कुचकामी दुःख करण्याने मी पार थकून गेलो... मला इथून खरेच गेले पाहिजे, अगदी कायमचे गेले पाहिजे, अधिक काळ मी इथे राहू शकत नव्हतो.

हे करण्याचा माझा अगदी निश्चय झाला होता. डेपोत परतताना या विचाराने मनात पक्के मूळ धरले होते. रस्ता दुरुस्ती केंद्राच्या वळणावरून जाताना मी सामतला पाहिले.

एका छोट्या मुलीबरोबर आणि दुसऱ्या एका मुलाबरोबर रस्त्याच्या कडेला तो खेळत होता. बारीक दगड घेऊन ते मेंढवाडा आणि भिंती बांधत होते. या खेळाला ताश-करगॉन असे म्हणतात. असे ते खेळत असताना पूर्वीही मी त्यांना पाहिले असण्याची शक्यता आहे... मी माझ्या मुलाजवळून रोज गाडी घेऊन जात होतो आणि मला ते माहीत नव्हते... मी थांबलो.

"काय सामत," मी हाक मारली. मला त्याला एकदा न्हायची इच्छा झाली होती. ती तिघेही लॉरीकडे पळत आली.

"काका, आम्हाला लॉरीतून फिरवून आणायला आलात का?" सामतने विचारले.

"अर्थात, मी तुम्हाला थोडासा फिरवून आणीन."

पोरे भराभरा लॉरीत चढून बसली.

"हे काका आमचे मित्र आहेत," सामतने आपल्या दोस्तांना बढाईने सांगितले.

मी अगदी थोडे फिरवून आणले. पण माझी खात्री आहे की, त्या पोरांपेक्षा मलाच अधिक आनंद झाला होता.

"आता पळा घरी," त्यांना दार उघडून देत मी म्हटले. त्यांनी जमिनीवर उड्या मारल्या. मीही खाली उतरलो आणि सामतला थांबवून धरले.

"सामत, जरा थांब. मला तुला काही सांगायचंय," मी म्हणालो.

मी त्याला वर उचलले, माझ्या डोक्यापेक्षा उंच उचलून धरले, माझ्या मुलाच्या चेहऱ्याकडे खूप वेळ पहात राहिलो आणि पुन्हा त्याला खाली ठेवण्यापूर्वी मी त्याचा मुका घेऊन त्याला घट्ट मिठी मारली.

"काका, तलवार कुठाय? तुम्ही आणलीत का?" सामतला आठवण होऊन त्याने विचारले.

"अरेरे, काय करावं बुवा! बेटा मी आणायला विसरलो. पुढच्या वेळी येईन तेव्हा नक्की आणीन," मी वचन दिले.

"आता पुन्हा तुम्ही विसरणार नाही ना? काका, इथंच आम्ही नेहमी खेळत असतो."

"छान. आता तुझ्या दोस्तांबरोबर पळ बघू."

डेपोत जाताक्षणी मी सुतारशाळेत गेलो आणि तीन खेळातल्या तलवारी तयार केल्या. दुसऱ्या दिवशी मी त्या बरोबर घेऊन निघालो.

ती तीनही पोरे माझी वाट पहात उभी होती. मी त्यांना पुन्हा एकदा फिरवून आणले. माझ्या मुलाशी आणि त्याच्या दोस्तांशी मी अशी मैत्री जमवली. माझी सवय व्हायला त्यांना फारसा वेळ लागला नाही. मला येताना पाहताच ती रस्त्यावर पळत ओरडत येत: "आमची लॉरी! आमची लॉरी आली!"

मी पुन्हा माणसात आलो. जगण्याला अर्थ आला. माझ्या रोजच्या खेपा मी अधिक मोकळ्या मनाने, एका अद्भुत भावनेने भारून गेल्याप्रमाणे करू लागलो. माझा मुलगा रस्त्यावर माझी वाट पहात उभा असणार हे मला ठाऊक होते. थोडा वेळ का होईना त्याला माझ्या शेजारी मी लॉरीत बसवणार होतो. माझ्या मुलाला भेटण्यासाठी वेळेवर त्या ठिकाणी पोचणे एवढी एकच काळजी मला लागून राहिलेली असायची. मी अशी वेळ जमवली की, दिवसाच मी खिंडीतून जायचा. वसंतातली सुंदर हवा होती, मुले बहुतेक वेळा बाहेर खेळत असायची आणि मला ती बहुधा भेटायचीच. त्यांना

भेटल्यावर मला एवढा प्रचंड आनंद व्हायचा की, केवळ त्या भेटींसाठीच जणू मी जगत होतो आणि काम करीत होतो. पण काही वेळा मी विलक्षण कावराबावरा व्हायचा. मी मुलांना फिरवून आणतो हे आसेल आणि बैतेमीरला ठाऊक आहे का? त्यांना माहीत आहे किंवा नाही कुणास ठाऊक, पण मला भेटायला ते सामतला बंदी करतील, रस्त्याशेजारी यापुढे त्याला ते खेळू देणार नाहीत... मला या गोष्टीची भीती वाटत होती आणि मनातल्या मनात मी सारखी प्रार्थना करीत होतो की, आसेल आणि बैतेमीरने तसे करू नये. माझ्या सप्ताभराच्या भेटींपासून मला वंचित करू नये. पण एक दिवस तसे घडलेच...

मे दिन जवळ येत होता आणि मी माझ्या मुलाला भेटवस्तू द्यायचे ठरवले. मी त्याच्यासाठी चावीची खेळण्यातली लॉरी विकत घेतली. त्या विशिष्ट दिवशी सकाळी मी डेपोत अडकून पडलो आणि निघायला नेहमीपेक्षा उशीर झाला. वाया गेलेला वेळ भरून काढण्यासाठी मला रस्त्यावर वेगाने जाणे भाग होते आणि त्यामुळेच कदाचित मी अस्वस्थ मन:स्थितीत होतो. कोणतेही कारण नसताना उगीचच चिंतेत होतो. आमच्या नेहमीच्या भेटीच्या ठिकाणाला अगदी थोडे अंतर राहिले तेव्हा मी खेळण्याचा खोका सीटवर शेजारी ठेवला आणि सामतला किती आनंद होईल ते दृश्य डोळ्यांसमोर आणू लागलो. अर्थात त्याच्याकडे यापेक्षा खूप चांगली खेळणी होती, पण हे खास खेळणे होते. मोठेपणी लॉरी ड्रायव्हर व्हायची स्वप्ने पाहणाऱ्या एका छोट्या मुलाला त्याच्या ड्रायव्हर मित्राकडून देण्यात येणारी ही भेट होती. पण त्या दिवशी

सामत तेथे खेळत नव्हता. त्याचे दोस्त माझ्याकडे पळत आले. मी लॉरीतून खाली उतरलो.

"सामत कुठाय?" मी विचारले.

"घरी. तो आजारी आहे," तो मुलगा उत्तरला.

"खरंच?"

"नाही काही, तो मुळीच आजारी नाही," त्या मुलीने आपण होऊन माहिती पुरवली. "त्याच्या आईनं त्याला इथं खेळायला बंदी केलीय."

"पण का?"

"मला माहीत नाही का ते. पण त्याला इथं खेळायला परवानगी नाही."

तर हे असे होते. सारे संपले होते.

"हे सामतला दे," मी खेळाचा खोका त्या मुलाकडे देत म्हटले. पण पुन्हा विचार बदलला. "नाही, नको देऊ," खोका त्याच्याकडून परत घेत मी म्हटले. लॉरीकडे परत जाताना मला कमालीचे निराश वाटत होते.

"काका आज आपल्याला फिरायला का नेत नाहीत?" मुलाने आपल्या बहिणीला विचारले.

"काकांना बरं वाटत नाहीय्" मुलगी गंभीरपणे उत्तरली.

तिचे अगदी बरोबर होते. यापूर्वी मला इतके आजारल्यासारखे आणि मोडल्यासारखे कधी वाटले नव्हते. आसेल माझ्याशी एवढी कठोर कशी झाली होती? ठीक आहे, नवरा म्हणून मी नालायक होतो. पण दया म्हणून का होईना, तिच्या मनात माझ्याबद्दल थोडा तरी ओलावा होता की नाही? माझा यावर विश्वास बसत नव्हता. आसेल अशी वागणे शक्य नव्हते. त्यामागे दुसरे काहीतरी होते. पण काय? मला कसे

समजणार... सामत खरोखरीच आजारी आहे, त्याच्या मित्रावर अविश्वास दाखविण्याचे काही कारण नाही, असे मी स्वत:ला पटवून देण्याचा प्रयत्न करीत राहिलो. आणि अखेरीस माझी खात्री पटू लागली की, तो खरोखरीच आजारी होता आणि तो उन्मादावस्थेत तळमळत असल्याची भयाण दृश्ये डोळ्यांसमोर तरळू लागली. समजा त्याला मदतीची गरज भासली, समजा एखादे औषध तातडीने पाहिजे असले, समजा त्याला इस्पितळात न्यायला त्यांच्याजवळ मोटार नसली तर? अखेरीस ते पहाडात रहात होते, शहरात ऐन वस्तीत नव्हे. चिंतेने मी वेडापिसा झालो. निश्चित काय करायचे हे डोक्यात ठरले नसतानाच मी परत वेगाने यायला निघालो. मला माझ्या मुलाला ताबडतोब पाहिले पाहिजे एवढेच मला समजत होते... मी त्याला पाहीन यावर मला विश्वास ठेवायचा होता, मी त्याला पाहीन असे माझे काळीज मला सांगत होते. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे नेमके टाकीतले पेट्रोल संपले आणि पेट्रोल पंपावर मला थांबावे लागावे...

* * *

इल्याज गप्प झाला. तांबडालाल झालेला आपला चेहरा त्याने हाताच्या तळव्याने चोळला, एक दु:खाचा निश्वास टाकला, मग जाईल तेवढी वरपर्यंत खिडकी ढकलली आणि अखंड चाललेल्या धूम्रपानातली नवी सिगरेट पेटवली.

मध्यरात्र केव्हाच उलटून गेली होती. आम्ही दोघे सोडून बहुधा आगगाडीतले सारे प्रवासी एव्हांना गाढ झोपलेले होते.

चाकांचे अखंड गीत चालू होते. उघडलेल्या खिडकीतून मला ती उन्हाळ्यातली रात्र सरताना दिसत होती आणि छोट्या स्टेशनांवरचे दिवे भरारा मागे पडत होते. इंजिनाची खणखणीत शिट्टी वाजत होती.

"भाऊसाहेब, त्यावेळी तुमची माझी पहिली भेट झाली आणि मी तुम्हाला लॉरीतून न्यायला नकार दिला. त्याचं कारण आता तुम्हाला समजलं असेल," स्वतःच्याच डोक्यात आलेल्या विचाराच्या प्रतिक्रियेने तो माणूस किंचित ओठ मुडपून हसला. "तुम्हाला मी पेट्रोल पंपावर सोडले आणि नंतर तुम्ही मला 'पबेदा' मधून गाठले. मी तुम्हाला पाहिले..." मी त्याच काळजीच्या मनःस्थितीत गाडी चालवीत होतो. पण माझ्या काळजाने मला धोका दिला नाही. सामत माझी वाट पहात रस्त्यावर उभा होता. त्याने मला पाहताच तो रस्त्याच्या मध्ये पळत येऊन ओरडू लागला: "काका! ड्रायव्हरकाका!"

माझा पोरगा अगदी छान ठणठणीत होता. मला एकदम खूप बरे वाटले. एवढा आनंद झाला होता की साऱ्या जगाला मिठी मारावीशी वाटत होती. मी गाडी थांबवून पळत त्याच्याकडे गेलो.

"तू खरंच आजारी आहेस का?"

"नाही, आई मला सोडत नव्हती. मी तुमच्याबरोबर पुन्हा फिरायचं नाही असं ती म्हणाली. मग मी रडलो," सामतने मला सांगितले.

"मग आता का तिनं तुला येऊ दिलं?"

"कारण बाबा म्हणाले, कुणाला जर आम्हाला मोटरीतून फिरवून आणावसं वाटत असेल, तर आणू दे."

"असं म्हणाले बाबा?"

"आणि मी म्हणालो की, मी ड्रायव्हर होणार आहे..."

"अर्थात तू आहेसच आणि चांगला ड्रायव्हर आहेस! तुला ठाऊक आहे मी तुझ्यासाठी काय आणलंय?" मी खेळ काढून दाखवला. "ही बघ लॉरी. छोटया ड्रायव्हर लोकांसाठी!"

सामत आनंदाने फुलला.

"मी नेहमी तुमच्याबरोबर लॉरीतून फिरीन. अगदी नेहमी! हो ना काका?" डोळ्यात आर्जवी भाव आणून त्याने विचारले.

"अर्थातच तू फिरणार. नेहमी!" मी त्याला आश्वासन दिले. "मे दिनाला तू माझ्याबरोबर शहरात येशील? आपण लॉरीला छोटे छोटे झेंडे लावून छान सजवू. आणि नंतर मी तुला घरी आणून सोडीन."

मी त्याला तसे का म्हणालो हे आता समजावून सांगणे अवघड आहे. मला तसे करण्याचा काय अधिकार होता आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे तसे घडेल असे मला एकाएकी का वाटले? पण गोष्ट तेवढयावरच थांबली नाही, मी आणखी पुढे गेलो.

"तुला आवडत असेल तर तू नेहमीसाठी माझ्याजवळ रहा," मी माझ्या मुलाला अत्यंत गंभीरपणे सुचवले. "आपण लॉरीतच राहू. माझ्या सगळ्या सफरींवर मी तुला घेऊन जाईन, मी तुला कधी जाऊ देणार नाही, कधीही तुला सोडणार नाही. तुला यायचंय का?"

"हो ऽऽ" सामत उत्साहाने ओरडला. "आपण लॉरीतच राहू या! चला काका, आपण आत्तापासूनच सुरुवात करू या!"

काही क्षण असे असतात की, वयाने मोठा माणूसही लहान मुलासारखा बेजबाबदार वागतो. आम्ही लॉरीत चढलो. विमनस्क मन:स्थितीत मी चावी फिरवली आणि सेल्फ स्टार्टर दाबला. सामतला खूप आनंद झाला होता; तो मला लाडाने खेचून बिलगत होता आणि सीटवर उसळ्या मारीत होता. आम्ही निघालो. सामतला त्याचा अधिकच आनंद झाला. तो हसू लागला व चाके आणि गाडीच्या पुढची अटकफळी यासारख्या गोष्टींवर अखंड बडबडू लागला तेव्हा मीही त्याच्याबरोबर हसू लागलो. एका जोरदार हादऱ्याने मी भानावर आलो. सारे शरीर तापले. मी काय करीत होतो? मी वेग मंदावला, पण सामत मला थांबू देईना.

"काका, जोरात, आणखी जोरात चालवा," तो विनवणी करीत होता. त्याच्या चमकत्या डोळ्यांमधील आर्जवाला नाकारण्याचे धैर्य माझ्याजवळ नव्हते. मी वेग वाढवला. आम्ही असे जोसात चाललो असताना आमच्या पुढे रस्त्याच्या एका पट्ट्यावर रूळाचे इंजिन काम करताना दिसले. इंजिन वळले आणि त्यामागे मी बैतेमीरला पाहिले. तो पट्ट्यावर डांबर ओतीत होता. त्याला पाहताच मी बिचकलो. मला थांबावेसे वाटत होते, पण मामला फार पुढे गेला होता — मी सामतला घरापासून खूप दूर आणले होते. मी चाकाशी खाली वाकलो आणि जोरात गाडी पुढे काढली. बैतेमीरने आमच्याकडे पाहिले नाही. तो आपल्या कामात गर्क होता.

दर मिनिटाला रस्त्यावरून जाणाऱ्या मोटरींकडे पाहणे त्याला शक्य नव्हते. पण सामतने मात्र त्याला पाहिले.

"ते पहा तिथं बाबा आहेत! आपण बाबांना आपल्याबरोबर घेऊ या का काका? थांबा, मी बाबांना हाक मारतो."

मी थांबलो नाही. कसे शक्य होते? बैतेमीरला मी काय सांगणार होतो? त्याला पाहण्यासाठी सामत खिडकीतून बाहेर वाकला आणि एकाएकी तो घाबरला. त्याला एकदम रडू कोसळले आणि तो ओरडू लागला: "मला माझे बाबा हवेत! मला उतरू दे, मला माझे बाबा हवेत. लॉरी थांबवा. मला नाही जायचं! आई गऽऽ!"

मी वेग कमी केला आणि रस्ता जिथे वळत होता तेथे दगडापाठीमागे गाडी थांबवली.

"रडू नको सामत, बाळा रडू नको. मी आत्ता तुला एका मिनिटात परत नेतो. पण आधी रडायचा थांब पाहू."

मी त्याला समजावायचा प्रयत्न केला, पण तो एवढा जबरदस्त घाबरला होता की, माझे अजिबात ऐकेना.

"मला नाही तुमच्याबरोबर जायचं. मला बाबांकडे जायचंय! जाऊं दे मला!" दारावर लाथा मारीत तो किंचाळू लागला. "मला जाऊं दे! मला बाबांकडं जायचंय! दार उघडा!"

किती भयंकर घडले होते!

"सामत, बेटा रडू नको रे," मी त्याची समजावणी करीत होतो. "एका मिनिटात मी दार उघडतो बघ, फक्त रडू नको. मी तुला तुझ्या बाबांकडे स्वतः घेऊन जातो. चल, आपण जाऊ या."

त्याने खाली उडी मारली आणि मोठमोठ्याने रडत तो धावायला लागला. मी त्याला धरले.

"जरा थांब. तुझे डोळे पूस. तू रडायचं नाही. उगी माझ्या राजा, रडू नको. अरेच्चा, तुझी लॉरी कुठं? विसरलास का तू? हे बघ!" मी खेळणे खेचून घेतले व कापऱ्या हातांनी चावी देऊ लागलो.

"ही बघ कशी पळते तुझी लॉरी, पकड!" लॉरी रस्त्यावरून पळत गेली व एका दगडाशी आदळून उलटली व खड्ड्यात पडली.

"मला नाही बघायचं," सामत आणखीच मोठ्याने ओरडू लागला व पळाला.

माझ्या घशात आवंढा अडकला. मी त्याच्यामागे धावलो.

"थांब सामत, रडू नको! थांब, मी तुझा... मी तुझा... तुला माहीत आहे का..." पण पुढचे शब्द मला बोलता आले नाही.

सामत पळत होता आणि एव्हांना तो वळणापलिकडे दिसेनासा झाला. मी त्या वळणापर्यंत त्याच्या पाठोपाठ धावलो आणि तेथेच थांबलो.

बैतेमीरकडे धावत जाऊन त्याने त्याला घट्ट मिठी मारलेली मी पाहिली. बैतेमीर खाली बसला व त्याने सामतला जवळ घेतले. पोराने बैतेमीरच्या मानेभोवती हातांचा विळखा घातला आणि घाबरल्या नजरेने माझ्याकडे डोकावून पाहिले.

बैतेमीरने त्याच्या हाताला धरले, दांताळे आपल्या खांद्यावर लटकावले आणि ते दोघे रस्त्यावरून चालू लागले—एक मोठा माणूस व एक छोटा मुलगा.

मी दगडाला बिलगून बराच वेळ तिथे उभा राहिलो आणि नंतर लॉरीकडे परत आलो. खड्ड्यात उताण्या पडलेल्या त्या खेळण्यातल्या लॉरीजवळ मी क्षणभर थांबलो. माझ्या गालांवरून आसवे ओघळत होती. "ठीक आहे, एकूण असं आहे आयुष्य," असे मी माझ्या लॉरीला उद्देशून म्हटले आणि बॉनिटला थोपटले. माझ्या हाताला गरम लागले. त्या ऊबेत मला बरे वाटणारे असे काहीतरी होते. माझी जुनी सखी – माझी लॉरी - माझ्या मुलाच्या आणि माझ्या अखेरच्या भेटीचा मुका साक्षीदार...

* * *

इल्याज उठला आणि दोन डब्यांच्या मधल्या कॉरिडॉरमध्ये गेला.

"जरा ताजी हवा घेतो," दारातून तो मला म्हणाला.

मी डब्यातच बसून राहिलो. आता जवळ जवळ पहाट झाली होती. खिडकीतून उजाडणाऱ्या आकाशाचे फिके पट्टे मधूनच चमकत होते. तारांच्या खांबांच्या अस्पष्ट आकृती एव्हांना ठळक होऊ लागल्या होत्या. दिव्याची आता आम्हाला जरूरी नव्हती.

मी पडल्या पडल्या विचार करीत होतो. मला ठाऊक असलेल्या पण इल्याजला माहिती नसलेल्या गोष्टी त्याला सांगाव्यात की नाही याचा मनात निर्णय होत नव्हता. पण त्याने परत यायला खूप उशीर लावला. म्हणुन मी त्याला काहीच सांगितले नाही.

* * *

आसेलचा आणि आपल्या मुलाचा इल्याजला ठिकाणा समजल्यानंतरच्या काळात माझी बैंतेमीरशी भेट झाली होती.

किर्घिझ रस्ता कामगारांचे एक प्रतिनिधीमंडळ पामीरला जाणार होते आणि या लोकांसंबंधी एक लेख लिहिण्याची कामगिरी ताजिक मध्यवर्ती वर्तमानपत्राकडून माझ्यावर सोपविण्यात आली होती.

बैंतेमीर कुलोव हा पहिल्या दर्जाचा मुकादम त्या प्रतिनिधींपैकी एक होता आणि त्याचा परिचय करून घेण्यासाठी मी दोलनला आलो होतो.

पण आमची भेट मात्र विलक्षण योगायोगाने झाली. हा योगायोग माझ्या दृष्टीने फार सुदैवी ठरला. घाटात खिंडीच्या आसपास आम्ही असताना एका रस्ता-कामगाराने छोटा लाल बावटा दाखवून आमची बस थांबवली. तिथे नुकताच कडा कोसळल्याचे त्याने आम्हाला सांगितले आणि ते रस्ता मोकळा करीत होते. मी बसमधून उतरलो आणि ती घटना घडली होती त्या स्थळावर गेलो. त्या जागेला भोवतीने एव्हांना भक्कम लाकडी फळ्या लावून बंदिस्त केले होते. एक बुलडोझर माती आणि कोसळलेला भाग रस्त्याच्या कडेपर्यंत ढकलून नेत होता. ज्या ठिकाणी बुलडोझर जाणे शक्य नव्हते तेथे माणसे फावडी आणि मोगरी घेऊन काम करीत होती. ताडपत्रीचा रेनकोट आणि उंच बूट घातलेला एक माणूस बुलडोझरच्या शेजारी उभा राहून ड्रायव्हरला हुकूम देत होता.

"थोडं डावीकडे. आणखी एकदा जाऊ द्या. आता लाकडी फळ्यांजवळ आण. छान! थांब. पुन्हा मागे घे."

त्यांनी काम जवळ जवळ पुरे केले होते आणि रस्ता मोकळा झाला होता. दोन्ही बाजूला थोपवून धरलेले ड्रायव्हर आरडाओरडा करीत होते, शिट्या वाजवीत होते, लौकर जाऊ देण्याची मागणी करीत होते. पण तो ताडपत्रीचा रेनकोट घातलेला माणूस त्यांच्याकडे अजिबात लक्ष न देता शांतपणे आपले काम चोख पार पाडीत होता. तो बुलडोझर त्या जागेवर पुन्हा पुन्हा फिरवून रस्ता साफ आणि भक्कम करीत होता. "हा बैतेमीर असला पाहिजे, त्याला आपले काम पक्के ठाऊक आहे," असा मी मनाशी विचार केला. मी चूक केली नव्हती. तो बैतेमीर कुलोव होता. अखेरीस त्याने रहदारी खुली केली आणि मोटरी व लॉरी आपापल्या मार्गाला लागल्या.

"तुम्ही आता काय करणार? तुमची बस निघून गेली हे माहीत आहे ना?" तो मला म्हणाला.

"मी तुम्हालाच भेटायला इथं आलोय", मी म्हणालो.

बैतेमीरच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटले नाही. "मग तुम्ही आमचे पाहुणे आहात तर," असे म्हणून आदबीने त्याने माझ्याशी हस्तांदोलन केले.

"भाऊसाहेब, मी काही कामानिमित्त तुम्हाला भेटायला आलोय," मी त्याला म्हणालो. "अर्थात तुम्हाला ठाऊक आहेच की, आपल्या रस्ता कामगारांचं एक प्रतिनिधीमंडळ ताजिकीस्तानला चाललं आहे?"

"मी ऐकलंय त्याबद्दल."

"तर तुम्ही तिकडे जाण्यापूर्वी मला तुमच्याशी थोडी बातचीत करायचीय."

आपल्या भुऱ्या मिशांना पीळ भरीत कपाळाला मोठी आठी घालून त्याने माझे बोलणे ऐकले.

"तुम्ही आलात याबद्दल मला आनंद वाटलाय, पण मी पामीरला जाणार नाहीय. तेव्हा माझ्याबद्दल काही लिहायची तसदी घेऊ नका", तो म्हणाला.

"पण का? तुमच्या कामामुळं तुम्हाला जाता येत नाही का घरी काही अडचण आहे?"

"रस्ता हेच माझं काम आहे. तुम्ही आपल्या डोळ्यांनी आत्ता पाहिलंच. आणि घरी म्हणाल तर..." तो गप्प झाला आणि त्याने सिगरेट पेटवली. "आणि घरी म्हणाल तर इतर चारचौघांसारखंच माझंही आहे. माझं कुटुंब आहे आणि बरीच कामं करायची राहिली आहेत... असो. मी पामीरला जाणार नाही एवढं मात्र खरं!"

मी त्याचे मन वळवायचा प्रयत्न केला. त्याच्या लायकीचा माणूस प्रतिनिधीमंडळात असणे किती महत्त्वाचे आहे ते त्याला समजावून दिले. बैतेमीरने विनयशीलपणे माझे म्हणणे ऐकून घेतले, पण आपल्या निश्चयाशी तो पक्का राहिला.

सारेच काम फिस्कटल्याने मी कमालीचा निराश झालो व स्वत:वरच चिडलो होतो. माझा व्यावसायिक होरा चुकला होता, माझा मार्ग चुकला होता. परिणामी माझ्या हाती काहीच साहित्य लाभले नव्हते आणि वर्तमानपत्राची कामगिरी मला पार पाडता आली नव्हती.

"भाऊसाहेब, मला फार दु:ख झालं तुमच्या नकारानं. मी परत चलतो तर मग! एखादी गाडी थांबवून मी जाईन."

आपल्या शांत, बुद्धिमान डोळ्यांनी बैतेमीरने एकदा

माझ्याकडे विचारपूर्वक पाहिले आणि आपल्या दाट मिशांमागे तो किंचित हसला.

"शहरची माणसं आपले रीतीरिवाज विसरायला लागली. मला घर आहे, कुटुंब आहे, पाहुण्यांसाठी सरबराईची व्यवस्था आहे आणि डोकं टेकायला जागा आहे. ज्याअर्थी तुम्ही मला भेटायला आला आहात त्याअर्थी तुम्ही माझं घर उद्या सोडू शकता. पण प्रवासानंतर तुम्ही माझ्याकडं विश्रांती घेतलीच पाहिजे. चला, माझ्या बायकोची आणि मुलाची ओळख करून देतो. मला मात्र माफी करा, अंधार पडण्यापूर्वी माझी फेरी घालून आलं पाहिजे. मी फार उशीर करणार नाही. पण काम हे केलंच पाहिजे. खरं की नाही?

"भाऊसाहेब, चला मीही तुमच्याबरोबर येतो."

माझ्या शहरी कपड्यांकडे पाहताना त्याच्या नजरेत एक चमक उमटली.

"माझ्याबरोबर रपेट करणं तुम्हाला सुखाचं व्हायचं नाही. आम्हाला बरंच लांब जायचंय आणि खूप चढाचा रस्ता आहे."

"काही हरकत नाही."

आम्ही बरोबर गेलो. प्रत्येक पुलाची, प्रत्येक वळणाची, कड्याची आणि वरच्या दगडांची पाहणी करायला तो थांबत होता. साहजिकच आमच्या गप्पा चालू झाल्या. बैतेमीरने आपली कहाणी मला विश्वासाने सांगावी असे मी काय केले किंवा काय बोललो याचे मला आजघटकेपर्यंत कोडे आहे. त्याने आपल्या आयुष्याची आणि आपल्या लग्नाची कहाणी मला सांगितली.

मुकादमाची कहाणी

मला पामीरला जायची इच्छा का नाही असे तुम्ही मला विचारलेत. मी स्वतः पामीरचा किर्घिझ आहे, पण दैवाने मला इकडे तिएन शान पहाडात आणले. इतर अनेक कम्सोमोल स्वयंसेवकांबरोबर मी पामीर रस्ता बांधणीकारांमध्ये सामील झालो तेव्हा मी अगदी तरुणच होतो. आम्ही तरुण मंडळी विशेष निर्धाराने काम करीत होतो. त्याला कारणही तसेच होते. आम्ही दुर्गम्य पामीरच्या ऐन गाभ्यात रस्ता बांधीत होतो! मला धडक कामगार होणे भागच होते. अर्थात बोनस, मान इत्यादी गोष्टी होत्या पण त्यांचे काही तितकेसे मोठे नव्हते.

त्या कामाच्या ठिकाणी माझी एका मुलीशी गाठ पडली. मी तिच्या प्रेमात पडलो. अगदी मनापासून तिच्यावर प्रेम करू लागलो. ती सुंदर होती तशी हुशारही होती. बांधकामाच्या ठिकाणी काम करायला ती खेड्यातून तिथे आली होती आणि त्या काळात एखाद्या किर्घिझ मुलीच्या दृष्टीने ती गोष्ट सोपी नव्हती. तुम्हाला चांगले ठाऊक आहे की, आजच्या काळातही एखाद्या मुलीला उद्योगधंद्याचा व्यवसाय निवडणे तितकेसे सोपे नाही. आमच्या जुन्यापुराण्या चाली-रीतींनी आम्ही अजूनही जखडलेलो आहोत. असो. एक वर्ष उलटले. रस्ता बांधून पुरा होत आला होता. त्यांना आता रस्त्यावर देखरेख करणाऱ्या लोकांची जरूरी होती. सामूहिक प्रयत्नांनी रस्ता बांधता येतो, पण त्याची निगराणी करायला कौशल्य लागते. हुसैनोव नावाचा आमच्यात एक तरुण

इंजिनिअर होता. तो अजून रस्त्याच्या व्यवसायात आहे, फार मोठा अधिकारी आहे आता. आम्ही मित्र होतो. मी प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा करावा ही त्याची कल्पना होती. माझी गुलबारा फार काळ थांबणार नाही अशी मला भीती वाटत होती, तिचे आईबाप तिला चटकन परत खेड्यात घेऊन जातील अशी मला भीती वाटत होती. पण माझी भीती खोटी ठरली. मी परत आलो तेव्हा ती निष्ठेने माझी वाट पहात असलेली मला आढळली. आम्ही लग्न केले आणि रस्ता दुरुस्ती केंद्रावर राहिलो. आमचे वैवाहिक जीवन सुखी होते. आणि मला तुम्हाला सांगितले पाहिजे की, रस्ता दुरुस्ती कामगारांना, वर पहाडात राहून काम करणारांना, सुखी कौटुंबिक जीवन, बायको या गोष्टी इतर कशाहूनही अधिक बहुमोल आणि प्रिय वाटतात. हे मला अनुभवाने ठाऊक आहे. मी माझ्या कामाच्या प्रेमात पडलो होतो व त्याचे श्रेय माझ्या बायकोला होते. आम्हाला पहिली मुलगी झाली, दुसरीही मुलगी झाली आणि युद्धाला तोंड फुटले.

पावसाळ्यात पूर आल्यानंतर जशी नदी दिसते तसा पामीरचा रस्ता सैन्यात भरती व्हायला निघालेल्या लोकांनी दुथडी भरून वहात होता.

माझीही पाळी आली. एके दिवशी सकाळी मी घरापासून निघून रस्त्यावर चालत आलो. छोट्या मुलीला मी उचलून घेतले होते, तर मोठी माझ्या कोटाचे टोक धरून चालली होती. माझी गुलबारा, बिच्चारी गुलबारा! माझी हॅवरसॅक घेऊन ती चालली होती. बरकरणी शांत राहण्याचा ती प्रयत्न करीत होती. पण त्या निर्मनुष्य जागी, पहाडामध्ये

एवढ्या उंचीवर दोन मुलींना घेऊन बाईमाणसाने एकटे रहायचे म्हणजे तिला काय वाटत असेल, याची मी कल्पना करू शकत होतो. माझ्या नातेवाईकांबरोबर खेड्यात राहण्यासाठी त्यांना पाठवण्याची माझी इच्छा होती. पण गुलबाराने त्याला नकार दिला. आपण रस्ता दुरुस्ती केंद्रातच राहू असे तिने सांगितले. मी घरी परत येईन तेव्हा त्या तिघी माझी वाट बघत असतील असे ती म्हणाली. शिवाय कुणीतरी रस्त्यावर देखरेख करायला हवीच होती... त्या शेवटच्या वेळी रस्त्याच्या कडेला उभे राहून मी माझ्या बायकोचा आणि मुलींचा निरोप घेतला. आम्ही म्हणजे मी आणि गुलबारा त्यावेळी वयाने खूप लहान होतो. आयुष्याला नुकती कुठे सुरुवात केलेली होती...

मी इंजिनिअर बटालियनमध्ये होतो. त्या युद्धकाळात आम्ही किती रस्ते, किती नदीवरचे पूल आणि उतार बांधले यांची गणतीच नाही! दॉन, वीस्ला आणि दान्यूब आम्ही ओलांडल्या. थंडगार पाण्यात गोठून जात असता अथवा धुरात आणि आगीच्या ज्वालांमध्ये गुदमरून जात असता, भोवती सर्वत्र बॉंबचे स्फोट होत असता, उतार उध्वस्त होत असता आणि माणसे मारीत असता तुम्हाला असे वाटत राहते की, आता यापुढे अधिक तुमच्याने सहन होणार नाही. शत्रूने घाई करावी व तुम्हाला ठार मारून या सगळ्या यातनांचा शेवट करावा अशी तीव्र भावना मनात उमटत राहते. पण मग तुम्हाला तुमच्या कुटुंबाची आठवण होते, पहाडात ते तुमची वाट पहात असते आणि पुन्हा तुम्हाला दुप्पट जोम येतो. तुम्ही विचार करता, छे: छे: एवढ्या लांबून

पामीरपासून मी इथे पुलाखाली मरायला आलो नाही! माझ्या दातांनी तार वाकवून आधाराला जागा करीन, पण हिंमत हरणार नाही... आणि त्यांनी मला मारले नाही. मी पार बर्लिनपर्यंत जाऊन आलो.

माझी बायको मला सतत लिहित असे. खाली रस्त्यावर टपाल गोळा करायला येणाऱ्या पोस्टमनची ती कधीही चुकामूक होऊ देत नसे. ती साऱ्या गोष्टी तपशीलवार मला कळवी. त्यात रस्त्याच्या परिस्थितीची माहितीही लिहिलेली असे. माझ्या जागी मुकादम म्हणून ती काम पहात होती. तिला ते किती कष्टाचे जात असणार याची मला कल्पना होती. तो साधा रस्ता नव्हता, पामीरचा रस्ता होता.

एकाएकी १९४५ च्या वसंतात तिची पत्रे यायची थांबली. मी काळजीत पडलो, पण मी स्वतःला समजावले. मी युद्धआघाडीवर होतो आणि टपालाचे काहीही बरेवाईट होणे शक्य होते. एक दिवस मला मुख्य ठाण्याचे बोलावणे आले. ते मला म्हणाले, सार्जंट, लढाईतला तुझा वाटा तू उचलला आहेस, आम्ही कृतज्ञ आहोत, ही पदके घे आणि घरी जा. तिथे तुझी आता अधिक गरज आहे. अर्थातच मला याचा आनंद झाला. मी घरी तारसुद्धा ठोकली.

मी आगगाडीतून उतरलो तेव्हा असे ठरवले की, लष्करी नोंदणी कचेरीत मागाहून हजेरी द्यावी, या गोष्टी करायला नंतर भरपूर वेळ आहे, पण आधी तडक घरी जायचे. घर! लौकरात लौकर मला घर गाठायचे होते. एक लॉरी मी धरली आणि आम्ही पामीरच्या रस्त्याला लागलो.

मला पंख असते तर बरे झाले असते असे वाटू लागले. आघाडीवर वेगवान मोटरी चालविल्यानंतर मला त्या लॉरीतून मुंगीच्या पावलांनी जात असल्याची भावना होऊ लागली.

"अरे बंधू जरा वेगात चल," मी त्या ड्रायव्हरवर ओरडलो. "तुझ्या खटाऱ्यात असेल तेवढी शक्ती एकवटून पळव! मी माझ्या घरी परत निघालोय!"

आता नजीक येऊन ठेपलो होतो. पुढच्या वळणावर माझे घर होते. हा ताण मला असह्य झाला होता. चालत्या लॉरीतून मी उडी मारली, पाठंमुळीला हॅवरसॅक लटकावली आणि धावत सुटलो. वेगाने धावतच मी वळण गाठले आणि... मला ते ठिकाण दिसेना. सारे काही जिथल्या-तिथे होते: पहाड, रस्ता, पण घर नव्हते. आसपास चिटपाखरू नव्हते. फक्त दगडांचा व मातीचा ढिगारा. आमचे घर अगदी डोंगरपायथ्याशी उभे होते. तिथे दरी अरुंद आहे. मी डोंगरावर नजर टाकली आणि रक्त एकदम गोठले. प्रचंड बर्फाचा कडा कोसळला असावा. एवढ्या उंचीवरून खाली कोसळताना त्याने वाटेत येणाऱ्या सर्व गोष्टी साफ केल्या असाव्यात. पर्वताच्या एका बाजूची माती एखाद्या प्रचंड पंजाने उकरून काढली असावी आणि पार खाली दरीपर्यंत प्रचंड पट्टा नांगरून काढला असावा असे दृश्य दिसत होते. शेवटच्या पत्रात माझ्या बायकोने म्हटले होते की, तिथे बराच बर्फ पडलाय आणि एकाएकी पावसाला सुरुवात झाली आहे. योग्य वेळीच बर्फाचा कडा उडवून द्यायला हवा होता. पण ते बाईचे काम नव्हते...

घरपरतणी अशी झाली. मृत्यूला मी हजारो वेळा सामोरा गेलो, त्या मृत्यूच्या खाईतून मी सहीसलामत परत आलो... आणि ती... ती जणू कधी अस्तित्वातच नसावीत... विकलांग होऊन मी तिथे उभा होतो. मला ओरडावेसे वाटत होते, किंचाळावेसे वाटत होते, म्हणजे पर्वत दुभंगले असते... पण मला जमले नाही. माझ्या अंतरंगातली प्रत्येक गोष्ट जणू दगड बनली, मी जणू इतःपर जिवंत नव्हतो. माझी हॅवरसॅक खांद्यावरून घरंगळली आणि जमिनीवर पायाशी पडली. मी ती तशीच तेथे टाकली. माझ्या मुलींसाठी आणि बायकोसाठी काही भेटवस्तू मी आणल्या होत्या आणि मिठाईच्या एका पुडयासाठी वाटेत मी माझा कुडता मोबदल्याखातर देऊन टाकला होता. काहीतरी चमत्कार घडेल अशा अपेक्षेने मी तिथे वाट पहात उभा राहिलो. मग मी वळून चालू लागलो. एकदा थांबून मी वर पाहिले: डोंगर झुलतो आहे, माझ्यावर कोसळून येतो आहे असा भास झाला. मी किंचाळून पळत सुटलो. त्या शापित जागेपासून दूर दूर! आणि नंतर मला रडू कोसळले...

नंतर मी कुठेकुठे भटकलो ते मला आठवत नाही. अखेरीस मी रेल्वे स्टेशनवर आलो एवढे खरे. एखाद्या हरवलेल्या आत्म्यासारखा मी लोकांमधून फिरत राहिलो. एकाएकी कुणीतरी मला हाका मारीत असल्याचे जाणवले. तो हुसैनोव होता. सैन्यातून मोकळा होऊन परत घरी निघाला होता. मी त्याला सर्व काही सांगितले. "आता कुठं चाललास?" त्याने विचारले. मला काहीच कल्पना नव्हती. तो म्हणाला, "हे चांगले नाही. तू स्वतःला सावरले

पाहिजेस. असा वेड्यासारखा दिशाहीन भटकायला मी तुला सोडणार नाही. चल, तिएन शान पहाडात मोटरीचा रस्ता बांधायला जाऊ या आणि मग आपण पुढे पाहू..."

आणि अशा रीतीने मी इथे आलो. पहिली काही वर्षे आम्ही पूल बांधण्यात गुंतलो होतो. मी कुठेतरी स्थिर व्हायची वेळ आली होती. हुसैनोव एव्हांना मंत्रालयात काम करायला लागला होता. तो मला वारंवार भेटायला येई आणि रस्ता मुकादमाच्या जुन्या कामावर पुन्हा जाण्याचा सल्ला देई. पण माझी हिंमत होत नव्हती, मला भीती वाटत होती. बांधकामाच्या ठिकाणी भोवती माणसे असल्याने दुःख सहन करणे सोपे जाई. पण हे एकाकी काम होते, मी संपण्याची शक्यता होती. मी अजून बरा झालो नव्हतो. भूतकाळाच्या आठवणी अद्याप ताज्या होत्या. जणू काही माझे आयुष्य तेथे संपले होते आणि भविष्य काहीच नव्हते. पुन्हा लग्न करण्याचा विचार कधीच मनाला शिवला नाही. माझ्या गुलबारावर व माझ्या मुलींवर मी फार प्रेम केले होतो. त्यांची जागा कुणीही घेऊ शकणार नाही असे मला वाटत होते. केवळ स्त्रीसुखासाठी लग्न करणे ही माझी आनंदाची कल्पना नव्हती. त्यापेक्षा एकटे राहणे अधिक ठीक होते.

तरीही, प्रयत्न करून पहावा म्हणून मी रस्ता-मुकादमाचे काम पत्करायला कबूल झालो. या खिंडीत, या विभागाचा प्रमुख म्हणून माझी नेमणूक झाली. आणि इथे तसे काही वाईट नव्हते, लौकरच मी इथे रूळलो. कदाचित हा फार अडचणींचा विभाग आहे, घाटाचा रस्ता आणि खिंड आहे

म्हणून असेल कदाचित, पण मला हे काम आवडले. काळाने माझ्या वेदनेची धार बोथट केली. पण तरीही मला स्वप्ने पडत. मला स्वप्न पडे की, माझे दगडात रूपांतर झाले आहे आणि ज्या ठिकाणी माझे घर होते तेथे मी टक लावून पहात उभा आहे, माझ्या खांद्यावरची हॅवरसॅक गळून पडते आहे... असे स्वप्न पडले की, त्या दिवशी मी घरातून सकाळी लौकर बाहेर पडत असे आणि सबंध दिवसभर, अगदी अंधार पडेपर्यंत रस्त्यावर रहात असे. हा सारा वेळ मी एकटा होतो. एक मात्र खरे, काही वेळा मनात विचार चमकून जायचा: "कदाचित अजूनही तुला सुख भेटेल का?"

आणि खरोखरीच मला सुख भेटले. अगदी कल्पना नसताना अनपेक्षितपणे एका अत्यंत अवघड आणि असुरक्षित सुखाचा मला शोध लागला.

चार वर्षांपूर्वी ही घटना घडली. माझ्या शेजाऱ्याची आई भयंकर आजारी पडली आणि त्या माणसाला कामामुळे व मोठ्या कुटुंबाच्या पसाऱ्यामुळे तिला डॉक्टरकडे न्यायला वेळ होत नव्हता. म्हातारीची प्रकृती दिवसागणिक बिघडत चालली होती. तेव्हा मी तिला लॉरीतून घेऊन जायला स्वतःच तयार झालो. त्यावेळी नुकतीच आमच्या विभागाला लॉरी मिळाली होती. या लॉरीतून शहरात निघालो होतो. डॉक्टर म्हातारीला इस्पितळात ठेवू पहात होते, पण म्हातारी ऐकेना. ती म्हणाली की, आपल्या घरातच मरण बरे. मी जर तिला परत घरी नेले नाही तर तिचे मला कायमचे तळतळाट लागतील असे तिने सांगितले. म्हणून आम्ही परत

यायला निघालो. तोपर्यंत अंधार पडला होता. मालमोटार तळाच्या जरा पुढे ड्रायव्हरने लॉरी थांबवली आणि तो कुणालातरी विचारीत असलेला मी ऐकले: "कुठं जायचंय?" एका बाईच्या आवाजाने काहीतरी उत्तर दिले. ड्रायव्हर म्हणाला: "ठीक आहे, चढ आत."

एक छोटे बाळ आणि एक गाठोडे घेतलेली एक तरुणी लॉरीच्या एका बाजूला आली. मी तिला वर चढायला मदत केली व वाऱ्याचा झोत कमी होता अशा माझ्या जागी तिला बसवून स्वतः कोपऱ्याशी बसलो.

सुसाट घुसणाऱ्या वाऱ्यामुळे कमालीची थंडी वाजत होती. ते मूल रडू लागले. ती त्याला डोलवू लागली, समजावणी घालू लागली पण मूल रडतच राहिले. काहीतरी करणे भाग होते. पुढच्या भागात मी तिला बसवू शकत नव्हतो कारण तिथे आजारी म्हातारी बसली होती. मी तिच्या खांद्याला स्पर्श करून म्हटले:

"माझ्याकडे द्या त्याला, कदाचित शांत होईल तो आणि तुम्ही जरा खाली सरकून बसा म्हणजे वारा कमी लागेल."

माझ्या केसाळ कोटात मी बाळाला घट्ट जवळ धरले. तो रडायचा थांबला आणि झोपी गेला. इतका गोड छोटुकला होता तो. सुमारे दहा महिन्याचा असावा. मी-माझ्या डाव्या अंगाला त्याला धरले होते. आणि एकाएकी माझे काळीज धाडधाड उडू लागले व एखाद्या घायाळ पक्ष्यासारखे तडफडू लागले. ती विलक्षण कडु-गोड संवेदना होती आणि मनात विचार आला: "मी पुन्हा कधीच बाप होणार नाही का?"

आणि तो पिटुकला मला असा काही बिलगला होता की, त्याला जणू कशाची काही पर्वा नव्हती.

"मुलगा आहे का?" मी विचारले.

तिने मान डोलावली. बिचारी ती तरुणी पार गारठून गेली होती. तिच्या अंगावरचा कोट अगदीच पातळ होता. माझ्या केसाळ कोटावर हा पावसाळी कोट मी हिवाळ्यातदेखील वापरतो. माझ्या कामात त्याशिवाय चालतच नाही. एका हातात बाळाला धरून मी दुसरा हात तिच्यासमोर धरला.

"हा कोट ओढून घ्या. तुम्हाला थंडी बाधेल."

"नको नको. उगीच त्रास घेऊ नका", ती म्हणाली.

"चला लौकर घ्या. वारा लागणार नाही जोरात", मी आग्रह केला.

तिने रेनकोटात स्वतःला गुंडाळून घेतले व पायांभोवती नी बांधला.

"थोडं उबदार वाटतंय?"

"हो."

"इतक्या उशीरा का निघाला?"

"निघावं लागलं," ती हळूच म्हणाली.

खाणकामगारांच्या वस्तीजवळून आम्ही घळीतून चाललो होतो. सारे झोपले होते. सर्व खिडक्या अंधाऱ्या होत्या. काही कुत्रे आमच्यामागे भुंकत जोरात धावले. मी दचकून नीट बसलो: ती कुठे चालली होती? मला असे वाटले होते की, ती या वस्तीत राहणारी असावी. पुढे कुठली वस्ती जायला नव्हतीच. नंतर फक्त खिंड आणि रस्ता दुरुस्ती केंद्र.

"तुम्हाला तिथं उतरायचं असावं?" मी विचारले आणि टपावर दणके मारले. "खिंड इथून अवळच आहे आणि लॉरी त्यापुढे जायची नाही."

"आणि इथं काय आहे?" तिने विचारले.

"खाणकामगारांची वसाहत. इथंच तुम्हाला जायचं आहे ना?"

"हो... म्हणजे इथंच..." ती घुटमळत म्हणाली. मग ती चटकन उभी राहिली, माझा कोट माझ्याकडे परत दिला आणि बाळाला तिने कडेवर घेतले. त्याने जोरजोराने रडायला सुरुवात केली. काहीतरी गडबड होती, ती कसल्यातरी संकटात होती. त्या अंधारात आणि गारठ्यात मी तिला एकटीला सोडू शकत नव्हतो.

"तुला कुठेही जायचं नाही", मी एकेरीवर येत ठामपणे बोललो. "डोक्यात काहीतरी खुळ्यासारखे विचार आणू नको. मुलाला माझ्याजवळ दे", मी जवळजवळ मूल तिच्या हातून हिसकावूनच घेतले. "नाही म्हणू नको. आजची रात्र आमच्या जागी काढ आणि नंतर उद्या तुझे काय ते तू ठरव. बस्स! चालू द्या गाडी", मी ड्रायव्हरला फर्मावले.

आम्ही पुढे निघालो आणि ती तेथे काहीही न बोलता हातांमध्ये तोंड झाकून बसून राहिली. बहुधा ती रडत असावी.

"घाबरू नकोस", मी तिला म्हणालो. "मी तुला कोणताही धोका देणार नाही. मी रस्त्यावरचा मुकादम आहे, बैतेमीर कुलोब माझं नाव. तू माझ्यावर विश्वास ठेव."

माझ्या जागेत मी त्यांची व्यवस्था लावली. अंगणात आणखी एक जादा छोटी खोली होती. मी तिथे माझी पथारी टाकली. झोप येत नव्हती. हे कोडे सोडवायचा प्रयत्न करीत मी पडलो होतो. त्याचा मला त्रास होत होता. चौकशा करणे केव्हाही चांगले नाही, लोक जेव्हा चांभारचौकशा करू लागतात तेव्हा स्वत:ला मला खूप चीड येते. पण तरीही मला तिला एक दोन प्रश्न विचारणे भाग होते. तिला कदाचित मदतीची गरज असेल. तिने थोड्या नाठरपणे, काहीशा अलिप्ततेने उत्तरे दिली. पण तिने न सांगितलेल्या गोष्टी मी तर्काने जाणू शकलो. ती अडचणीत होती आणि तिच्या बोललेल्या प्रत्येक शब्दामागे दहा शब्द न बोललेले होते. तिने तिचे घर सोडले होते, नवरा सोडला होता. मानी मुलगी होती हे उघड होते. तिला याचा विलक्षण त्रास होत होता हे मी पहात होतो, पण ती हार जायला तयार नव्हती. अर्थात प्रत्येकाला आपल्या मर्जीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य असते. तिला हे उत्तम माहीत होते. तरीही मला तिच्याबद्दल वाईट वाटले. एक तर ती अगदी तरुण स्त्री होती, खरे म्हणजे सडपातळ बांध्याची ती मुलगीच होती. अत्यंत सुस्वभावी आणि समजूतदार असावी असे तिच्या एकूण वागण्यावरून मला वाटले. अशा मुलीला त्या माणसाने जाऊ कसे दिले? अर्थात हा सर्वस्वी त्यांचा प्रश्न होता. सकाळी येणाऱ्या पहिल्या लॉरीत मी त्यांना बसवीन आणि कायमचा निरोप घेईन. दिवसभरात मी बराच दमलो होतो. लौकरच झोपी गेलो. मला स्वप्न पडत होते: मी लॉरीतून कुठेतरी निघालोय आणि माझ्या केसाळ कोटाच्या आत एका बाळाला मी उबेसाठी घट्ट धरलेय.

पहाटे मी उठलो. माझ्या फेरीवर मी गेलो, पण लौकर परत आलो. माझे पाहुणे कसे काय असतील याच विचारात होतो. मी समोवार पेटवला. माझ्या हालचालींनी त्यांना जाग येणार नाही याची मात्र खबरदारी घेतली. पण ती आधीच उठली होती आणि निघण्याच्या तयारीत होती. तिला मदत केल्याबद्दल तिने माझे आभार मानले. चहा घेतल्याशिवाय मी त्यांना जाऊ द्यायला तयार नव्हतो. मी त्यांना चहासाठी थांबायला लावले. रात्रीचा माझा छोटुकला सहप्रवासी म्हणजे भलतेच मजेदार बाळ होते. त्याच्याशी खेळणे हा एक विशुद्ध आनंद होता...

"तुला कुठं जायचंय?" आम्ही चहा घेत असताना तिला विचारले.

"रिबाच्येला", थोडासा विचार करून ती उत्तरली.

"तुझे आईवडील तिथं राहतात?"

"नाही, ते तोसरच्या पलिकडच्या खेड्यात राहतात."

"अच्छा, म्हणजे तिथं जायला तुला लॉरी बदलाव्या लागणार! हे काही फारसं सोयीचं नाही."

"पण मी तिथं नाही चालले. आम्ही माझ्या आईवडिलांच्या घरी जाऊ शकत नाही", आपल्या बाळाकडे खिन्न नजरेने पहात ती म्हणाली. "हा आमचा स्वतःचा अपराध आहे."

आपल्या आईवडिलांच्या इच्छेविरुद्ध तिने लग्न केले असावे असा मी तर्क केला. तिने तसेच केले होते हे मला नंतर समजले.

ती बाहेर जाऊन रस्त्यावर थांबायला निघाली होती, पण मी तिला समजावून सांगितले की, तिने घरातच थांबणे

इष्ट आहे. बाळाच्या दृष्टीने बाहेर फार वारा होता. तेव्हा मीच जाऊन एखादी लॉरी थांबवतो आणि मग त्यांना बोलावतो.

मी जड अंतःकरणाने चालत निघालो. काही मिनिटातच ती तेथून जाणार आणि मी पुन्हा एकटा पडणार या जाणीवेने मला कमालीचे दुःखी आणि वाईट वाटत होते.

पहिल्यांदा तिच्या मार्गाने जाणाऱ्या लॉरीच येत नव्हत्या. आणि नंतर मी एक तशीच जाऊ दिली, मी हातच उंचावला नाही. माझ्या कृतीची मलाच भीती वाटली. मी असे का केले? आणि तिथून छळवाद सुरू झाला. आणखी लॉरी येत राहिल्या, पण मी त्यांना थांबवीत नव्हतो. विचार करीत होतो: आता पुढची, त्यापुढची लॉरी मी नक्की थांबवीन, पण माझा हात माझे ऐकेनासा झाला होता. नाही, तसे करून चालणार नव्हते. ती वाट पहात होती. माझ्यावर विसंबून होती. मी माझाच तिरस्कार केला, पण ती भावना माझ्याहून बलवान होती. मी रस्त्यावर मागेपुढे येरझाऱ्या घालीत होतो. सबबी शोधून काढायला आणि बहाणे करायला मला अवघड जात नव्हते: एकदा काय तर लॉरीची पुढची काच फुटली आहे तेव्हा पुढे बसल्यावर थंडी वाजेल, किंवा चाकावरच्या माणसाचा अवतार मला आवडला नाही, बहुधा बेदरकार किंवा झिंगलेला ड्रायव्हर असेल. ज्या लॉरींमध्ये आधीच लोक बसलेले मला दिसत तेव्हा तर माझ्या आनंदाला पारावार रहात नसे. काहीही करून त्यांना आत्ता जाऊ द्यायचे नाही, आत्ता नाही, त्यांना आणखी थोडा वेळ राहू दे, आणखी पाच मिनिटे... "नाहीतरी ती

कुठे जाणार?" मी स्वत:लाच प्रश्न केला. "ती आपल्या आईवडिलांकडे जाऊ शकत नाही, तिनेच तसे मला सांगितले. आणि रिबाच्येमध्ये मुलासकट तिला कोण घरात घेईल? हिवाळा तिथं खलास करील तिला. त्यांच्या दृष्टीने सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे इथे राहणे. कदाचित ती नवऱ्याकडे परत जाईल. किंवा तो इथे तिला शोधत येईल..."

कदाचित मी तिला माझ्याबरोबर आणायला पाहिजे होते आणि पाठवणी करायला हवी होती. असे मी तीन तास घालवले. मला माझा खरोखरीच तिरस्कार वाटत होता. पुरे झाले, मी तिला आता इथे घेऊन येईन आणि तिच्या देखतच लॉरी थांबवीन, असा मी निर्णय केला. नाहीतर ही गोष्ट मी केव्हाही करणार नव्हतो. ती मला दाराशीच भेटली. ती जास्तीत जास्त वेळ वाट पहात थांबली होती आणि आता तिचाही धीर सुटला होता. मला माझीच लाज वाटली आणि माझा अपराध माझ्या चेहऱ्यावर उमटला असावा.

"मला फार उशीर लागला का?" मी पुटपुटलो. "तुझ्या मार्गानं जाणाऱ्या लॉरी नाहीत किंवा ज्या होत्या त्या काही ना काही कारणानं प्रवास करायला योग्य नव्हत्या. मला माफ कर... कृपा करून काही गैरसमज करून घेऊ नकोस... मेहरबानी करून मिनिटभरासाठी घरात ये. अगदी मेहरबानी करून!"

ती गोंधळलेली आणि निराश झालेली दिसली. पण तरीही चकार शब्द न बोलता माझ्या पाठोपाठ घरात आली.

"तुम्हाला माझ्याबद्दल फक्त कीव वाटतेय का?" तिने विचारले.

"नाही, तसं नाहीय. हे बघ... मला तुझ्याबद्दल धास्ती वाटतेय. तुला फार कठीण परिस्थितीला तोंड द्यावं लागेल. कशावर तू पोट भरणार?"

"मी काम करीन. पूर्वी मी काम केलंय."

"तुला कुठं काम मिळेल?"

"कुठंतरी मिळेल. पण मी परत जाणार नाही आणि माझ्या आईबापांकडेही जाणार नाही. मी काम करीन आणि जगीन."

मी काय बोलणार? त्यावेळी ती दुसरा कसलाही विचार करायला तयार नव्हती. तिचा दुखावलेला स्वाभिमान आणि तिच्या काळजाला झालेली जखम तिला पुढे खेचून नेत होते. ती कुठे चाललीय याची तिला त्याक्षणी क्षिती नव्हती. "मी काम करीन आणि जगीन"-हे करण्यापेक्षा बोलणे अधिक सोपे होते. पण तुम्ही माणसावर बळजबरी करू शकत नाही.

मुलाने माझ्याकडे येण्यासाठी हात पसरले. मी त्याला जवळ घेऊन त्याचा पापा घेतला. मनात विचार आला: "माझ्या सोनुल्या, मला आता तुला सोडावे लागणार! तू मला एवढा लळा लावलायस की, जणू काही तू माझा स्वत:चाच आहेस."

"ठीक आहे. चलू या", मी शांतपणे म्हणालो. आम्ही जायला निघालो. मी मुलाला घेतले. दारात मी थांबलो.

"तुला इथंच काम मिळेल", मी म्हणालो. "तू इथं राहून काम करू शकशील. तिथं छोटी जादा खोली आहे. मनापासून सांगतो, तू इथं रहा. काही काळ रहा. सोडून केव्हाही जाता येतं. विचार कर."

ती प्रथम कबूल होईना, पण अखेरीस मी तिचे मन वळवले.

अशा रीतीने आसेल आणि तिचा छोटा सामत रस्ता दुरुस्ती केंद्रावर माझ्याबरोबर राहिले.

अंगणातल्या छोट्या खोलीत गारवा होता. म्हणून आसेल आणि तिचा मुलगा यांना मी माझी खोली बळेच घ्यायला लावली व माझे सामान मी छोट्या खोलीत हलवले. मला ही व्यवस्था चांगली वाटली.

मी वेगळे आयुष्य जगत होतो. वरवर पाहता, काहीच बदलले नव्हते. मी अजून एकटाच होतो, पण माझ्यात चैतन्य येऊ लागले होते. दीर्घकाळच्या एकटेपणानंतर माझ्या अंतःकरणाला पुन्हा पाझर फुटू लागला होता. अर्थात यापूर्वीही मी लोकांशी फटकून वागत नव्हतो. पण लोकांशी कितीही मैत्री केली, प्रेमाने त्यांची कितीही आलिंगने घेतली, बरोबर काम केले, त्यांना मदत केली आणि आपण त्यांची मदत घेतली तरी हे सारे पुरेसे वाटत नाही, तुमच्या जीवनात एक पोकळी सदैव राहते आणि ती यांपैकी कुणीही भरू शकत नाही. छोट्या बाळावर माझा कमालीचा जीव जडला. मला जेव्हा फेरीवर जायचे असे तेव्हा मी त्याला गरम कपड्यात गुंडाळून बरोबर घेई आणि सारा दिवस फिरवीत असे. माझा सारा रिकामा वेळ मी त्याच्याबरोबर घालवी. त्याच्याशिवाय मी कसा राहू शकणार होतो? आता तर ती मी कल्पनाही करू शकत नाही. माझे शेजारी भले होते. आसेल आणि सामत यांच्याशी ते अत्यंत चांगुलपणाने वागत. पण मुले कुणाला आवडत नाहीत? आणि आसेल

इतकी सरळसाधी व प्रेमळ होती की, केंद्रावर लौकरच ती आमच्यातली एक झाली. आणि तिच्यामुळेच, आसेलमुळेच, माझा मुलावर एवढा जीव जडला. उगीच लपवायचे कशाला, मी स्वतःपासूनसुद्धा हे लपवू शकत नाही. सारे प्रयत्न व्यर्थ. मी तिच्या प्रेमात पडलो. तिला पाहताक्षणीच मी सर्वस्वाने तिच्या प्रेमात पडलो होतो. ती एकलेपणाची सारी वर्षे, ते सारे दुःख, त्या साऱ्या यातना, जे काही मी गमावले ते सारे सारे त्या प्रेमात सामावून गेले. पण मला ते व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता. ती त्याच्या येण्याची वाट पहात होती. तिने ती आस कधी उघडपणे दाखवली नाही. पण रस्त्यावर आम्ही काम करीत असताना जवळ येणाऱ्या प्रत्येक लॉरीकडे ती किती अधीऱ्या नजरेने पहात असे ते मी हेरले होते. काहीवेळा ती मुलाला घ्यायची आणि रस्त्याच्या कडेच्या दगडावर तासन् तास बसून रहायची. पण तो कधीच आला नाही. तो कोण होता आणि कसा होता हे मला ठाऊक नव्हते. मी आसेलला त्याबद्दल कधी विचारले नाही आणि तिने मला कधी सांगितले नाही.

महिने उलटले. सामत मोठा होत होता. तो खरेच हुशार आणि जीव लावण्यासारखा मुलगा होता. कदाचित कुणीतरी त्याला सांगितले असावे किंवा कदाचित त्याची स्वतःची कल्पना असावी, पण त्याने मला बाबा म्हणून हाक मारायला सुरुवात केली. मला येताना पाहताक्षणी तो धावत माझ्या कुशीत "बाबा! बाबा!" म्हणून शिरायचा. आसेल मंद हसत त्याला पहात रहायची. मला त्यावेळी वेदना

व्हायची आणि आनंदही वाटायचा. मी आनंदाने त्याचा बाबा झालो असतो, पण मी काय करू शकत होतो?

त्या उन्हाळ्यात आम्हाला रस्त्यावर काही दुरुस्ती करायची होती. रहदारी आमच्या अगदी जवळून चालली होती. एकाएकी एका ड्रायव्हरला आसेल हाक मारताना मला आढळली: "ए जान्ताइ, जरा थांबतोस का?"

करकचून ब्रेकचा आवाज करीत लॉरी थांबली. आसेल पळत तिच्याजवळ गेली. ती आणि ड्रायव्हर काय बोलत होते ते मला ऐकू आले नाही. फक्त तिचे शेवटचे रागातले मोठ्याने बोलणे ऐकू आले:

"तू खोटें बोलतोयस. माझा तुझ्यावर विश्वास नाही. चालता हो, या क्षणाला इथून चालता हो!"

तो माणूस लॉरी घेऊन निघून गेला आणि आसेल वेगाने रस्ता ओलांडून घरी धावली. मला वाटते ती रडत असावी.

माझें कामावर लक्ष लागेना. कोण होता तो माणूस? काय सांगितले त्याने तिला? अनेक शंका आणि अनेक तर्क यांची माझ्या डोक्यात एकच गर्दी उडाली. शेवटी मला ते सारे असह्य झाले तेव्हा मी घरी गेलो. पण आसेल बाहेर आली नाही, ती खोलीतच थांबून राहिली. संध्याकाळी मी तिला भेटायला गेलो.

"सामत कुठं आहे? सबंध दिवसात मी त्याला पाहिला नाही."

"तो इथंच आहे," कोसळलेल्या आवाजात तिने उत्तर दिले.

"बाबा!" मी उचलून घ्यावे म्हणून सामतने हात पसरले. मी त्याच्याशी खेळू लागलो व त्याला हसवू लागलो. पण ती मात्र दु:खीकष्टी आणि गप्प राहिली.

“आसेल, काय झालं?” मी विचारले.

“मला इथून गेलं पाहिजे,” एक उसासा टाकून ती म्हणाली. “भाऊसाहेब, मी इथं दुःखी आहे असं नाही. तुमच्याबद्दल मी खूप खूप कृतज्ञ आहे. पण मला इथून गेलं पाहिजे. मी कुठं जाणार हे मला ठाऊक नाही, पण मला गेलं पाहिजे.”

तिच्या मनाचा निश्चय झालेला मी पहात होतो. आता तिला सत्य सांगण्यावाचून मला गत्यंतर नव्हते.

“आसेल, तुला थांबवून धरण्याचा मला अधिकार नाही. पण मीही मग इथं राहणार नाही. मलाही इथून जावं लागेल. पूर्वीही मला एकदा एक संपूर्ण रिकामी जागा सोडावी लागली आहे. उगीच खुलासे कशाला? मला काय वाटतं ते तुला समजतं आसेल. जर तू आता गेलीस, तर मला पुन्हा त्या पामीरच्या दिवसाची आठवण होईल. विचार कर आसेल... पण जर तो परत येत असेल आणि तुझं अंतःकरण त्याच्याबरोबर जायला सांगत असेल, तर मात्र मी तुझ्या मार्गात कधीही आडवा येणार नाही. तू नेहमीच स्वतंत्र राहशील आसेल...”

सामतला उचलून घेऊन मी रस्त्यावर गेलो. त्याला बरोबर घेऊन मी बराच वेळ तिथे फेऱ्या मारल्या. माझ्या लाडक्या बाळाला काय चाललेय याचा काही पत्ता नव्हता.

आसेल राहिली, पण ती किती दिवस थांबणार आहे ते मला ठाऊक नव्हते. ती कशाचा विचार करीत होती, तिने काय करायचे ठरवले होते? या प्रश्नांनी माझा जीव निम्मा झाला होता.

आणि एके दिवशी दुपारी मी घरी परत आलो तर काय माझ्या दृष्टीला पडले? सामत चक्क चालायचा प्रयत्न करीत होता. तो पडला तर धरण्यासाठी आसेल त्याच्या मागोमाग फिरत होती. मी थांबून पहात राहिली.

"भाऊसाहेब, पहा, तुमचा मुलगा चालायला लागला," आनंदाने हसत ती म्हणाली.

मी नीट ऐकले का? "तुमचा मुलगा" असे ती म्हणाली? मी फावडे बाजूला फेकले, खाली जमिनीवर बसलो आणि सामतला माझ्याकडे चालत यायला बोलावू लागलो.

"शाब्बास रे पठ्ठे, अरे वा रे माझ्या गब्रू, चल, चल, ठेव नीट पाऊल भक्कम, हां शाब्बास, घाबरू नको!"

सामतने हात सताड पसरले आणि "बाबा" असे ओरडत तो माझ्याकडे धावला. मी त्याला धरले, हवेत उंच उडवले आणि घट्ट मिठी मारली.

"आसेल, उद्या आपण हा आनंद साजरा करू या," मी म्हणालो. "पांढऱ्या आणि काळ्या लोकरीची दोरी तयार कर आणि शेजाऱ्यांच्या मुलांना बोलाव."

"ठीक आहे भाऊसाहेब," ती हसत म्हणाली.

"काळी आणि पांढरी लोकरच असली पाहिजे."

मी माझा घोडा घेतला आणि माझ्या गुराखी मित्रांकडे दौडत जाऊन भरपूर कुमीस (घोडीचे आंबवलेले दूध) आणि मटण घेऊन आलो. दुसऱ्या दिवशीच्या आमच्या "पायबंद कापणी"च्या छोट्या समारंभाला आम्ही शेजाऱ्यांना निमंत्रण केले.

मी सामतला जमिनीवर उभे केले, त्याच्या पायांना काळ्या-पांढऱ्या दोरीने बांधले, त्याच्या शेजारी एक कात्री ठेवली आणि आमच्या छोटया पाहुण्यांना कुंपणाच्या दुसऱ्या टोकाला नेले.

"तुमच्यापैकी जो पहिल्याने धावत सामतजवळ जाईल आणि त्याच्या पायातली दोरी कापील त्याला पहिले बक्षीस मिळेल," मी त्यांना समजावून सांगितले. "दुसऱ्यांना त्यांच्या पाळीने मिळेल. चला तयार, पळा!" मी त्यांना पळायची खूण केली.

आरडाओरडा करीत पोरे सामतकडे पळत गेली. दोरी कापली गेली.

"माझ्या मुला, आता पळ!" मी सामतला म्हटले. "मित्रांनो, घ्या रे त्याला तुमच्याबरोबर!"

त्यांनी सामतचे हात धरले व त्याच्याबरोबर पळू लागली.

"मंडळी" मी साऱ्यांकडे पहात म्हटले. पण कुणा एकालाच उद्देशून मात्र बोललो नाही. "मंडळी, माझं शिंगरू धावायला लागलंय! पुढं भरधाव धावणाऱ्या उमद्या घोड्यात त्याची वाढ होऊ दे."

सामत मुलांमागे दुडूदुडू धावत होता. मग त्याने वळून "बाबा!" अशी हाक मारली आणि तो धपकन् पडला. आसेल आणि मी त्याच्याकडे धावलो. मी त्याला उचलत असताना आसेल पहिल्या प्रथमच मला म्हणाली: "माझा लाडका नवरूला!"

आणि आम्ही अशा रीतीने नवराबायको झालो.

त्या हिवाळयात आम्ही तिथे आसेलच्या घरच्यांना भेटायला गेलो. त्यांचा आसेलवर अजूनही राग होता, पण त्यांनी तिला क्षमा केली व आम्हाला आशिर्वाद दिले.

वर्षे उलटत चालली होती. सामत आता चार वर्षांचा झाला. आम्ही पूर्ण एकोप्याने रहात होतो. फक्त एकाच गोष्टीवर आम्ही कधी बोलत नसू, तिचा उल्लेख करीत नसू. आम्ही कधीही जादा शब्दांचा वापर केला नाही, पण आमच्यापुरता तो माणूस अस्तित्वात नव्हता...

पण तुम्हाला हव्या तशा गोष्टी नेहमी घडतातच असे नाही. अगदी अलिकडेच तो एकदा आला...

रस्त्यावर एक अपघात झाला होता. मध्यरात्रीच्या सुमाराची घटना. माझा साहाय्यक हा माझा शेजारीच आहे. तो आणि मी अपघाताच्या ठोकरीचा आवाज ऐकून पळत गेलो. कुणी भयंकर जखमी झाला असेल अशी आम्हाला भीती वाटत होती. एक लॉरी रस्त्याच्या कडेच्या दगडांवर आदळली होती. ड्रायव्हरला जोरात खरचटले होते, तो जवळजवळ बेशुद्ध होता आणि चिक्कार प्यायलेला होता. मी त्याला ओळखले पण मला त्याचे नाव आठवेना. एकदा त्याने माझी लॉरी खिंडीतून ओढून आणून मला मदत केली होती. आणि दोलनमधून लॉरी खेचत आणणे ही काही सोपी गोष्ट नव्हे हे तुम्हाला माहीतच आहे. या भागात असा प्रयत्न कधीही झाला नव्हता. पण त्या माणसात धाडस होते, हिंमत होती आणि त्याने आम्हाला सुखरूप इथवर आणले. मला त्यासाठी तो आवडला. मला एकूणच तो खूप

आवडला. त्यानंतर लौकरच कुणीतरी खिंडीपर्यंत ट्रेलर घेऊन आला, त्याने जवळ जवळ फत्ते केली होती, पण काहीतरी चुकले. तो ट्रेलर खड्डयात अडकला आणि त्याला तिथेच टाकून तो निघून गेला. कदाचित तोच धाडसी माणूस नसेल ना असा विचार एकदा माझ्या मनात येऊन गेला आणि त्याला यश आले नाही या विचाराने मला वाईट वाटले. पण नंतर लौकरच ट्रेलर जोडून खिंडीतून जाणे ही नित्याची बाब झाली. ते कसे करायचे हे ड्रायव्हर लोक शिकले आणि सारे एकूण छानच झाले.

अगदी खरे सांगायचे तर या माणसालाच आसेल सोडून आली आहे हे मला ठाऊक नव्हते. पण मला माहीत असते तरी मी तसाच वागलो असतो. मी त्याला माझ्या घरी आणले आणि क्षणात साऱ्या गोष्टी मला स्पष्ट झाल्या. आसेल ओंजळभर सर्पण घेऊन आली. त्याला पाहताच तिच्या हातून पटकन लाकडे खाली पडली. पण आम्ही पूर्वी कधी भेटलोच नाही असा सर्वांनी बहाणा केला. मला फार काळजीपूर्वक वागावे लागले. माझ्या बोलण्याने वा वागण्याने त्यांना वेदना होऊ नये किंवा त्यांच्या पुनर्मिलनात अडथळा येऊ नये अशी माझी मनोमन इच्छा होती. मला काहीच ठरवायचे नव्हते. निर्णय त्यांच्यावर अवलंबून होता: तो त्यांचा भूतकाळ होता आणि आता माझ्या बिछान्यात मला घट्ट बिलगून झोपलेला मुलगा त्यांचाच होता.

त्या रात्री आमच्यापैकी कुणीच झोपले नाही. प्रत्येकजण आपल्या विचारात गर्क होता. मलाही काही विचार करणे भाग होते.

आपल्या मुलाला घेऊन जायला आसेल मोकळी होती. तो त्यांचा हक्क होता. तिने आपल्या हृदयाची हाक ऐकून त्याप्रमाणे वागायला हवे होते. आणि मी... मी कोण होतो, माझ्यावर काही अवलंबून नव्हते, मी तिच्या मार्गात आडवे येऊन चालणार नव्हते...

तो अजून इथे आहे. या मार्गावर तो काम करतो. इतकी वर्षे तो कुठे होता, काय करीत होता ते मला ठाऊक नाही. पण ते महत्त्वाचे नाही. तो त्यांचा प्रश्न आहे...

* * *

नेहमीची फेरी पुरी करून बैतेमीर आणि मी त्याच्या घरी परतलो. दिवस मावळत होता. वसंतातले दिवस. धूसर सूर्यास्त आकाशभर पसरला होता. तिएन शानची हिमाच्छादित शिखरे त्या संधिप्रकाशात गुरफटली होती. रस्त्यावरून लॉरी भरवेगात धावत जात होत्या.

"तेव्हा परिस्थिती सध्या अशी आहे," थोडा वेळ थांबून बैतेमीर चिंताक्रांत सुरात म्हणाला. "मी आता घर सोडू शकत नाही. जर आसेलला जायचे असेल, तर तसे तिने मला सांगितले पाहिजे. स्वच्छ मनाने तिला जाऊ दे. माझे मुलाला आशिर्वादच राहतील. माझ्या रक्तामासाच्या मुलासारखंच मी त्याच्यावर प्रेम करतोय हे तुम्ही जाणता. तरीही मी त्याला त्यांच्यापासून हिरावून घेणार नाही. म्हणून मी जात नाही. शिवाय दुसरे कारण म्हणजे ते

ठिकाण पामीर आहे... अर्थात, मी हे सारे तुम्हाला तुमच्या वर्तमानपत्राच्या लेखासाठी मात्र सांगत नाही. केवळ माणसा माणसाच्या नात्यानं..."

उपसंहाराऐवजी

ओश येथे मी इल्याजचा निरोप घेतला. तो पामीरला चालला होता.

"मी तिथं गेल्यावर अलिबेकचा शोध घेईन. पुन्हा नव्यानं आयुष्य सुरू करीन," आपली स्वप्ने इल्याज मोठ्याने बोलला. "घाबरू नका, अजून मी संपलेलो नाही. योग्य वेळी मी पुन्हा लग्न करीन आणि चारचौघांसारखं मलाही माझं घर आणि कुटुंब असेल. मला मित्रही असतील. फक्त एकच गोष्ट मला कधीही मिळणार नाही. ती मी कायमची गमावली आहे... जोपर्यंत मी जिवंत असेन तोपर्यंत, माझ्या अखेरच्या श्वासापर्यंत, मी आसेलला आणि आमच्यामधील सर्व सुंदर घटनांना आठवत राहीन."

"ज्या दिवशी मी तिथून निघणार होतो त्या दिवशी मी सरोवराकडे गेलो आणि त्या टेकाडावर जाऊन उभा राहिलो. मी तिएन शान पर्वतांचा, इस्सिक-कुल सरोवराचा कायम निरोप घेत होतो. 'इस्सिक-कुल, माझ्या अधुऱ्या गीता, माझा तुला अखेरचा दंडवत! तुला माझ्याबरोबर घेऊन जायची माझी खूप इच्छा होती. तुझं निळं पाणी,

तुझ्या किनाऱ्याची पिवळी वाळू... पण मला शक्य नाही... जसं ज्या स्त्रीवर मी प्रेम करतो तिला मी नेऊ शकत नाही तसंच... अच्छा आसेल, माझ्या लाल रुमालातल्या सुंदर चिनारा! माझ्या प्रेमा, तू सदा सुखी रहावीस हीच माझी इच्छा...'"

ट्यूशन मास्टर

मी खिडक्या सताड उघडतो. ताज्या हवेचे झोत माझी [illegible]नी भरून टाकतात. त्या मंद फिकट निळ्या प्रकाशात नव्या नव्या चित्रासाठी मी स्केचेस्‌ची चळत एकाग्रतेने पहात राहतो. स्केचेस अनेक आहेत, कारण सुरुवातीला मला पुन्हा पुन्हा हात घटवावा लागतो. पण सबंध चित्र उभे रहायला अद्याप फार अवकाश आहे. अजून मला ती मूळ गोष्टच गवसलेली नाही. ती अशी सहजी सापडत नाही. अचानक येते. अनावरपणे येते. या उन्हाळ्याच्या दिवसातल्या [illegible] स्पष्ट उजाडत जाणाऱ्या पहाटेच्या वेळी तुमच्या अंतःकरणात एक गूढ, अबोध भावना जशी अचानक आणि अनावरपणे उमाळून येते तशी! विरत जाणाऱ्या रात्रीच्या त्या शांततेत मी खोलीत येरझाऱ्या घालीत विचार करत राहतो. विचार, विचार, विचार... हे असे दरवेळी घडते. आणि दरवेळी मला जाणवते की, माझे चित्र म्हणजे एक अमूर्त कल्पनाच राहिली.

माझी चित्रे पुरी झाल्याखेरीज अगदी माझ्या जवळच्या दोस्तांना सुद्धा मी त्यांच्याबद्दल काही सांगत नाही. माझ्या कामाबद्दल मी फाजील सावधगिरी बाळगतो असा याचा अर्थ नव्हे. पण मूल पाळण्यात असताना मोठेपणी ते कसे दिसेल हे सांगणे जरा अवघडच असते नाही का? अपुऱ्या चित्राबद्दल काही मत व्यक्त करणे तितकेच अवघड असते. पण तरीही फक्त एकदाच मी माझा नियम मोडणार आहे, कारण माझ्या एका अपुऱ्या चित्राबाबतचे माझे विचार मला उत्कटतेने लोकांना सांगावेसे वाटताहेत.

ही केवळ एक लहर नव्हे. मी दुसऱ्या पद्धतीने वागूच शकत नाही, कारण मला असे वाटते की, हे सारे एकट्याने हाताळणे माझ्या एकट्याच्या ताकदीबाहेरचे आहे. ज्या कथेने माझी पकड घेतली, ज्या कथेमुळे मी हाती कुंचला धरला ती एवढी जबरदस्त आहे की, ती माझ्या एकट्याच्या आवाक्यातली नाही. जणू माझ्या हाती काठोकाठ भरलेला प्याला कुणी दिला आहे आणि तो सांडण्याची मला भीती वाटतेय. म्हणून मला लोकांची मदत हवीय, त्यांचा सल्ला हवाय, माझ्या खुर्चीशी येऊन केवळ मनाने का होईना, माझ्या भावनांशी त्यांनी एकरूप व्हावे असे मला वाटतेय.

माझ्या जवळ या, तुमच्या काळजांची ऊब मला द्यायला नाखुषी दाखवू नका, ही कथा तुम्हाल सांगणे हे माझे कर्तव्य आहे...

* * *

डोंगरपायथ्याच्या एका विस्तीर्ण पठारावर आमचे कुरकुरेयू खेडे विसावले आहे. अनेक घळींमधून छोटेछोटे ओढे खळाळत त्याच्याकडे धावत येत असतात. खेड्याच्या पल्याड पिवळी दरी पसरली आहे. हे महाप्रचंड कझाख स्टेप काळ्या पर्वतांच्या रांगांनी वेढले आहे. मैदानाच्या पलिकडे दूर पश्चिम क्षितिजावर रेल्वेच्या रूळांची काळीशार रेषा छेदत गेलेली दिसते.

आणि खेड्याच्या पाठच्या बाजूच्या टेकडीवर दोन मोठे चिनार उभे आहेत. माझ्या आठवणींच्या सुरुवातीच्या काळापासून ते उभे असलेले मला आठवतात. आमच्या कुरकुरेयू खेड्याला कुठल्याही अंगाने आलात तरी प्रथम नजरेला पडतात ते टेकडीवरचे दोन चिनार. जणू दीपस्तंभांसारखे मार्गदर्शन करीत उभे असलेले. मला माझ्या भावना स्पष्टपणे व्यक्त करता येत नाहीत—याचे कारण कदाचित लहानपणच्या आठवणी विशेष प्रिय असतात म्हणून असेल किंवा मी व्यावसायिक चित्रकार असल्यामुळे असेल—पण कसेही असले तरी दरवेळी आगगाडीतून उतरून स्टेशनावरून मी घराकडे येऊ लागतो तेव्हा दूर अंतरावरूनच माझे डोळे त्या चिनारांना शोधू लागतात. माझे लाडके चिनार सुरक्षित उभे असलेले पाहताच मला खूप आनंद होतो. ते जरी उंच असले तरी एवढ्या अंतरावरून त्यांना पाहणे खरे म्हणजे कठीण आहे. पण मला ते नेहमी दिसतात, अगदी स्पष्ट दिसतात.

दूरदूरच्या ठिकाणांहून मी कुरकुरेयूला परत येतो तेव्हा अनेकवेळा मला ती वियोगाची भावना जाणवते: "माझ्या

चिनारांची जोडी मला पुन्हा पहायला मिळेल का? मी घरापर्यंत कधी पोहोचेन का? त्या टेकडीवर जाऊन त्या चिनारांच्या झाडांखाली खूप वेळपर्यंत उभे रहावे आणि त्यांच्या पानांची सळसळ ऐकत रहावी एवढी एकच इच्छा जोराने उफाळून येत राहते."

आमच्या खेड्यात अनेक झाडे आहेत, पण हे दोन चिनार खास वेगळे आहेत. त्यांची स्वतःची एक स्वतंत्र भाषा आहे आणि त्यांचा स्वतःचा खास, संगीतमय आत्माही असला पाहिजे. दिवसा किंवा रात्री, तुम्ही कोणत्याही वेळी येथे आलात तर ते तुम्हाला नेहमी हळुवारपणे डोलताना दिसतील. त्यांची अखंड सळसळ आणि कुजबूज तुम्ही ऐकाल.

अनेक वर्षांनंतर त्या चिनारांचे रहस्य मला समजले. साऱ्या वादळवाऱ्यांना तोंड देत ते चढावर उभे आहेत. वाऱ्याच्या किंचित झुळकेनेही त्यांची हालचाल होते आणि हवेच्या अगदी बारिकशा मंद लहरीलाही त्यांचे प्रत्येक पान संवेदनाशीलतेने प्रतिसाद देत राहते.

या साध्या सत्याच्या शोधामुळे माझी निराशा झाली नाही किंवा त्यांच्याबद्दल आज घटकेपर्यंत माझ्या मनात जी बालिश भावना आहे तिला अजिबात धक्का बसलेला नाही. अगदी आजही टेकडीवरचे ते दोन चिनार मला देखणे, सजीव भासतात. त्यांच्या पायथ्याशी माझे सुंदर बालपण गेले. बालपणाच्या रम्य आठवणी या चिनारांना बिलगलेल्या आहेत...

उन्हाळ्याची सुटी सुरू होण्यापूर्वी शाळेच्या शेवटच्या दिवशी आम्हा पोरांचा घोळका तिथे टेकडीवर आरडाओरडा

करीत. आरोळ्या ठोकीत पक्ष्यांची घरटी पाडायला जायचा. त्यावेळी हे दोन महाप्रचंड चिनार एकीकडून दुसरीकडे डोलत असायचे. आपल्या थंडगार सावलीत येण्याचे आम्हाला जणू कुजबुजत्या आवाजात आमंत्रण देत असायचे. पण आम्ही अनवाणी उनाडटप्पू पोरे त्यांच्या फांद्यांवर चढून पक्ष्यांच्या राज्यात सैतानासारखे थैमान घालीत असू. पक्षी पंख पसरून कलकलाट करीत आमच्या माथ्यावर घिरट्या घालीत असायचे, पण आम्हाला त्यांची पर्वा नसायची. आम्हाला त्यांचे काय होय? आम्ही उंच उंच झाडावर चढून जात असू – कोण सर्वांत चपळ आणि कोण सर्वांत शूर याबद्दल आमच्यात स्पर्धा लागलेली असायची. आणि वर जाता जाता अचानक आमच्या डोळ्यांपुढे अंतराळाचे आणि प्रकाशाचे सुंदर, अद्‌भुत जग उलगडत जायचे. त्या जगाची भव्यता हादरवून टाकायची. श्वास रोधून आम्ही खाली नजर टाकीत असू तेव्हा प्रत्येकजण आपापल्या फांदीवर मुग्ध होऊन निश्चल बनून रहायचा. पक्ष्यांची घरटी पाडायच्या योजना केव्हाच डोक्यातून पळून जायच्या. सामुदायिक शेताच्या तबेल्याची इमारत ही आमच्या दृष्टीने जगातील सर्वांत मोठी इमारत; पण झाडांच्या शेंड्यावरून तो अतिसामान्य लाकडी आडोसा दिसायचा. खेड्याच्या पलिकडे पसरलेले ओसाड स्तेप चमचमत्या सूर्यप्रकाशात तरंगत असल्याचा भास व्हायचा. दूर टोकाच्या निळाईकडे बारिक नजरेने पाहिले म्हणजे आम्हाला आणखी भूमी दिसायची, रूपेरी तारांप्रमाणे चकाकणाऱ्या दूरदूरच्या नद्या दिसायच्या. ही भूमी किंवा नद्या आमच्या गावापलिकडे अस्तित्वात आहेत याची त्यावेळी

कल्पनाच नव्हती. सारे जग आमच्या गावच्या सीमेत सामावले आहे असे वाटायचे. त्या झाडांच्या फांद्यांना बिलगून निसर्गाचे ते रूप पहात असताना आमच्या बालमनात विचार डोकावत: पृथ्वीचा शेवट तिथेच आहे काय किंवा आमच्यासारखेच तिथे आकाश आहे? आमच्याप्रमाणेच तिथेही ढग, स्तेप आणि नद्या आहेत काय? वाऱ्यांचे सतत घुमणारे संगीत आम्ही ऐकत रहात असू आणि एकाच वेळी कुजबुजणारी झाडांची सारी पाने त्या धूसर निळाईपल्याड दडलेल्या रहस्यमय भूमीची जादू सांगत असत.

पानांचा सळसळाट ऐकताच माझ्या मनात त्या अतिदूरच्या भूमीचे चित्र उभे राही आणि त्या भीतीने व उसळत्या मन:स्थितीमुळे छातीचे ठोके जलद पडू लागत. ते दोन चिनार कुणी लावले याची माहिती करून घेण्याचे त्यावेळी कधी डोक्यातच आले नाही याचे आज आश्चर्य वाटते. ज्या कुणी अज्ञात व्यक्तीने त्या कोवळ्या रोपट्यांना तेथील भूमीत रोवले तिने कोणती स्वप्ने पाहिली होती? कोणत्या आशेने तिने त्यांची निगराणी करून लहानाचे मोठे केले?

ज्या ठिकाणी चिनार उभे आहेत त्या टेकडीला आमचे गावकरी नेहमी "दुईशेनची शाळा" म्हणून ओळखतात. हे नाव का पडले ते माहीत नाही. मला चांगले आठवते की, एकदा एक माणूस आपला हरवलेला घोडा शोधीत असताना एका वाटसरूला विचारत होता: "काय पाव्हणं, आमचं घोडं कुटं बगिटलं का?" त्याला उत्तर मिळाले होते: "कालच्या रातीला दुईशेनच्या शाळंजवळ काही घोडी चरत व्हती बा! त्यात तुमचंबी आसंल!" आम्ही मुलेही त्या

टेकडीला दुईशेनची शाळा म्हणत असू. पण तसे का नाव पडले हा विचारही तेव्हा मनात डोकावत नसे. मोठी माणसे म्हणतात म्हणून आम्हीही म्हणत असू. "चला रे, दुईशेनच्या टेकडीवर जाऊन चिमण्यांची थोडी भंबेरी उडवू या," असे आमच्यातला कुणीतरी म्हणत असे.

कोणे एके काळी त्या ठिकाणी या टेकडीवर एक शाळा होती असे लोक म्हणत. त्या शाळेचा एकही अवशेष मला कधीही दिसला नाही. लहानपणी मी तिथे इमारतीच्या खुणा [illegible] शोध शोधल्या होत्या, पण काहीही आढळले नव्हते. नंतर मात्र एकदा त्या उघड्या बोडक्या टेकडीला "दुईशेनची शाळा" का म्हणतात याचे मला कुतूहल वाटले आणि मी गावच्या काही म्हाताऱ्या माणसांकडे या दुईशेनची चौकशी केली. त्यांच्यातला एकजण तुच्छतेने खांदे उडवून म्हणाला: "दुईशेन? हात्तीच्या, तो इथं आहे की अजून! गावातल्या [illegible]ातला एक! फार फार वर्षांपूर्वी गोष्ट. दुईशेन त्यावेळी कम्सोमोलचा (युवक संघटना) सभासद होता. तिथं टेकडीवर एक मोडकळीला आलेली छपरी होती आणि तिथंच दुईशेननं शाळा चालू केली. तो मुलांना शिकवायचा, न शिकवायचा! शाळा कसली ती, नुसती नावाची शाळा! अरे, तो काळच फार वेगळा होता! त्यावेळी जमाना असा होता की, तुम्ही एखादा घोडा आयाळ धरून पकडलात आणि रिकीबीत पाय अडकवून त्याच्यावर स्वार झालात तर तुम्हीच त्याचे मालक! दुईशेननं तसंच केलं. त्याच्या डोक्यात हे खूळ शिरलं आणि त्यानं शाळा काढली. त्या शाळेच्या [illegible] फुटका दगड आता तिथं उरला नाही, तरी नाव

मात्र कायमचं चिकटलंय. एवढी एकच बरी गोष्ट त्यानं आमच्यासाठी केली."

दुईशेनची माझी अजिबात ओळख नव्हती. मला तो आठवतो म्हणजे एक वयस्क, शेलाट्या बांध्याचा, दाट भुवयांचा माणूस. नदीच्या दुसऱ्या बाजूला त्याचे घर होते. सामुदायिक शेताच्या पाणीवाटपाचे काम त्याच्याकडे होते आणि बहुतेक सारा वेळ तो शेतांमध्ये असायचा. कधीतरी तो आमच्या रस्त्यावरून घोड्यावरून जायचा. त्याच्या खोगीराला भलीमोठी कुदळ लटकत असायची. आणि त्याचा घोडाही मालकासारखाच हाडकुळा अन् लंगडा होता. दुईशेन आता गावचा पोस्टमन झाला होता असे कुणीतरी म्हटल्याचे त्यानंतर बऱ्याच वर्षांनंतरच्या काळात एकदा आठवते. पण ते तेवढेच. त्या काळात कम्सोमोल सभासदाबद्दल माझी कल्पना म्हणजे तरुण माणूस, चटाचट बोलणारा व काम करणारा, गावातला उत्तम कार्यकर्ता आणि सर्वांत शूर माणूस, भरसभेत उठून आपल्या मनातले विचार स्पष्ट मांडणारा किंवा गुंडांबद्दल आणि चोरांबद्दल वर्तमानपत्रात लिहिणारा अशी होती. म्हणून हा गरीबडा, दाढीवाला म्हातारबाबा कम्सोमोलचा सभासद होता ही मी कल्पनाही करू शकत नव्हतो. त्याहून अधिक आश्चर्याची बाब म्हणजे त्याला स्वतःला धड लिहा-वाचायला येत नव्हते आणि त्याने शाळेत शिकवले होते म्हणे! माझ्या नजरेसमोर हे चित्रच उभे रहात नव्हते. खरे सांगायचे तर आमच्या गावात ज्या अनेक गावगप्पा उठत त्यापैकीच ही एक आहे अशी माझी प्रामाणिक समजूत झाली होती. पण माझा तर्क चुकला होता...

* * *

गेल्या शरदामध्ये माझ्या खेड्याकडून मला एक तार आली. सामुदायिक शेतकऱ्यांनी स्वतः बांधलेल्या शाळेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटन समारंभाचे ते आमंत्रण होते. मी या समारंभाला जाण्याचे तात्काळ निश्चित केले; माझ्या गावची एवढी महत्त्वाची घटना मी कशी चुकवणार? मी त्या समारंभाच्या आधीच काही दिवस गावी आलो, कारण थोडे भटकून माझ्या जन्मगावाच्या परिसरातली काही नवी चित्रे काढण्याचा माझा बेत होता. पंडिता सुलैमानोवा यानाही समारंभाला निमंत्रण केल्याचे मला सांगण्यात आले. गावात दोन दिवस राहून मग पुढे त्या मॉस्कोला जाणार होत्या.

या विख्यात महिलेने लहानपणीच आमचे गाव सोडले होते हे मला ठाऊक होते. मीही शहरनिवासी बनलो तेव्हा त्यांच्याशी माझी भेट झाली होती. आता त्यांचे वय मध्यान्हीच्या पलिकडे झुकले होते. अत्यंत प्रमाणबद्ध बांध्याच्या त्या बाईच्या तुकतुकीत काळ्या केसांमध्ये अनेक पांढरे केस दिसू लागले होते. विद्यापीठातील एका अध्यासनाच्या त्या प्रमुख होत्या; तत्त्वज्ञान हा विषय त्या शिकवीत. [illegible]मध्येही काम करीत व वारंवार परदेशी जात. पंडिता सुलैमानोवा या सतत कामात गुंतलेल्या असल्याने मला त्यांचा घनिष्ट परिचय करून घेता आला नव्हता. पण ज्या ज्या वेळी आमची भेट होई त्या त्या वेळी आवर्जुन त्या माझ्या खेड्याची खबर विचारीत आणि माझ्या नव्या चित्रांबाबत अगदी शब्द का होईना, पण न विसरता बोलत. एक दिवस एकदा धीर करून मी त्याना विचारले:

"आल्तीनाई सुलैमानोवा, तुम्ही आपल्या गावी थोडे दिवस रहायला कधीच का जात नाही? गावच्या साऱ्या लोकांना तुमच्याबद्दल फार अभिमान वाटतो, त्यांना तुमच्याबद्दल सारी माहिती आहे, पण ती ऐकीव ठरते. तुम्ही आपल्या कुरकुरेयू जन्मगावाला भेट देऊन त्याचा गौरव करीत नाही म्हणून गावकरी नाराज आहेत."

"होय, खरंच एक दिवस मला तिथं गेलं पाहिजे," त्यांनी किंचित उदासपणे उत्तर दिले. "कुरकुरेयूला जाण्याची माझी फारा दिवसांपासूनची इच्छा आहे. वर्षानुवर्षांत मी तिथे गेलेली नाही. खेड्यात माझे कुणीच नातेवाईक नाहीत ही गोष्ट खरी. पण ही बाब काही तितकीशी महत्त्वाची नाही. लौकरच मी तिथं जाईन, मला खरंच घराची खूप ओढ लागलीय."

समारंभ अगदी सुरू होण्याच्या सुमारास त्या आल्या. शाळेच्या नव्या इमारतीत गोळा झालेल्या लोकांनी त्यांना मोटरीतून येताना पाहिले तेव्हा सर्वांनी दाराशी एकच गर्दी केली. परिचित-अपरिचित, लहान-मोठे अशा सर्वांना त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याची इच्छा होती. आल्तीनाई बाईंना अशा स्वागताची अपेक्षा नसावी असे मला वाटते. त्यामुळे त्या अगदी संकोचून गेल्या होत्या. गर्दीमधून वाट काढीत व्यासपीठावरच्या अध्यक्षीय स्थानाकडे जात असताना वक्षस्थळाशी आपले दोन्ही हात गच्च दाबून त्या डावी-उजवीकडे झुकून लोकांना अभिवादन करीत होत्या.

आल्तीनाईंनी आपल्या आयुष्यात अनेक सभा-समारंभांना हजेरी लावलेली असणार, आणि त्यांचे नेहमीच अत्यंत प्रेमाने

व आदराने स्वागत झाले असणार यात काही शंका नाही. पण गावच्या शाळेत ज्या प्रकारे त्यांचे स्वागत झाले त्याने त्या इतक्या गहिवरून गेल्या की, त्यांच्या डोळयात अश्रू उभे राहिले.

भाषणानंतर बालवीरांच्या प्रतिनिधीमंडळाने त्याना फुलांचा गुच्छ व लाल बालवीर टाय भेट दिला व पाहुण्यांच्या वहीत पहिला शेरा लिहिण्याची विनंती केली. मुलांचा करमणुकीचा अत्यंत मनोरंजक कार्यक्रम त्यानंतर झाला व मुख्याध्यापकांनी सर्वांना आपल्या घरी यायचे आमंत्रण केले.

यजमानमंडळी आणि पाहुणेमंडळी अशी सारीच खाण्यापिण्याच्या सरबराईत मोठ्या उत्साहाने गुंतली होती. ज्या ठिकाणी अत्यंत भारी गालिचे अंथरले होते तेथे त्याना बसायच्या जागा करून देण्यात आली. आपला आदर व कौतुक व्यक्त करण्यासाठी ते सारे लोक डोळयात तेल घालून खाण्यापिण्याकडे सतत ध्यान पुरवीत होते. अशा प्रकारच्या समारंभात जो उत्साह व जो गोंधळ असतो तो सारा काही तसाच होता. प्रत्येकजण मोठ्या उत्साहाने बोलत होता आणि अभीष्टचिंतनाचे प्यालयावर प्याले रिचवले जात होते.

एवढ्यात खेड्यातला एक मुलगा तेथे आला व त्याने पाहुण्यांच्या हाती तारांचा एक गठ्ठा ठेवला. नवी इमारत बांधल्याबद्दल सामुदायिक शेतकऱ्यांचे अभिनंदन करणाऱ्या गावच्या शाळेतील माजी विद्यार्थ्यांच्या त्या तारा होत्या. पाहुण्यांना आळीपाळीने त्या तारा वाचायला देण्यात येत होत्या.

"अरे मला सांग, म्हाताऱ्या दुईशेननं ह्या तारा आणल्या का?" मुख्याध्यापकांनी त्या मुलाला विचारले.

"होय. सभा संपण्यापूर्वी इथं पोचता यावं आणि तारांमधील मजकूर सर्वांना वाचून दाखवता यावा म्हणून त्यानी घोड्याला जोरात पिटाळत आणले असे ते सांगत होते. आमच्या उस्तादांना तरीही थोडा उशीरच झाला म्हणून ते कमालीचे कष्टी झाले."

"पण तो बाहेर का उभा आहे? त्याला आत यायला सांग."

तो तरुण मुलगा दुईशेनला बोलवायला बाहेर गेला. माझ्या शेजारीच बसलेल्या आल्तीनाई एकाएकी अस्वस्थ झाल्या. त्याना कसलीतरी आठवण झाल्याचे त्यांच्या मुद्रेवरून जाणवत होते. कोणत्या दुईशेनबद्दल ही चर्चा चालली आहे हे त्यानी मला विचारले. त्यांचा आवाज व एकूण आविर्भाव मला एकदम वेगळाच भासला.

"तो पोस्टमन आहे. म्हातारा दुईशेन तुम्हाला माहीत आहे?"

विमनस्कपणे त्यानी मान डोलावली आणि जागा सोडून त्या उठणार तोच टापांचा आवाज करीत कुणीतरी खिडकीजवळून दौडत गेले आणि दुईशेन निघून गेल्याचे सांगत तो मुलगा परत आला.

"ते आत यायला तयार नव्हते. त्याना अजून खूप टपाल वाटायचे आहे असे त्यानी सांगितले."

"जाऊ दे त्याला टपाल वाटायला, उगीच कशाला अडवून धरता त्याला? नंतर म्हाताऱ्यांबरोबर येऊन बसेल तो इथं..." कुणीतरी थोडेसे तिरसटपणे उद्गारले.

"अरे तुम्हाला आमचा दुईशेन माहीत नाही! त्याला काम पहिलं महत्त्वाचं! आपलं काम पुरं होईपर्यंत तो कुठंही रेंगाळत थांबणार नाही."

"होय, तो अगदी चमत्कारिक माणूस आहे. युद्धानंतर तो युक्रेनमधल्या इस्पितळातून इथं आला आणि इथंच राहिला. नुकता पाच वर्षांपूर्वीच तो परत आलाय. आपल्या गावीच मरायचं म्हणतो तो. या माणसानं आयुष्यात कधीही लग्न केलं नाही..."

"तरी तो आत आला नाही हे काही बरं झालं नाही. असो, फार विचार करायचं काही कारण नाही," यजमान म्हणाले.

"कॉम्रेडहो, तुमच्यापैकी काहींना आठवत असेल की, एके काळी आपण सगळे दुईशेनच्या शाळेत गेलो होतो," बाजूतील एक अत्यंत प्रतिष्ठित गृहस्थ आपल्या हातातील ग्लास उंचावून म्हणाले. "पण त्याला स्वतःलाही सारी मुळाक्षरे येत नव्हती अशी माझी खात्री आहे." त्या माणसाने विनोदी मुद्रा केली व मान हलवली. त्याच्या या कृतीमध्ये आश्चर्य आणि उपहास असे दोन्हींचे मिश्रण होते.

"हे मात्र खरे आहे," अनेक आवाज एकाच वेळी उमटले.

तेथे एक सार्वत्रिक हशा पिकला.

"हे खरं आहेच! त्या दिवसात दुईशेननं काय केलं नाही? आणि आपणही त्या वेळी तसेच भले—त्याला आपण खरंच मास्तर म्हणून मानत होतो!"

हशा ओसरल्यानंतर त्या वक्त्याने आपला प्याला पुन्हा उंचावला.

"आपल्या जमान्यातली माणसं पहा कशी मोठी झाली! आल्तीनाई सुलैमानोवा पंडिता झाल्या, साऱ्या देशभर त्यांचे नाव झाले. आपल्यापैकी प्रत्येकानं निदान माध्यमिक शिक्षण घेतलं आणि अनेकांनी उच्च शिक्षण घेतलं. आज आपण आपल्या खेड्यात नवी माध्यमिक शाळा उघडली आहे, हीच घटना आज आपलं जीवन किती बदललंय याची साक्ष आहे. कुरकुरेयूचे सुपुत्र आणि सुकन्या आपापल्या काळात नेहमी सर्वोत्तम सुशिक्षितांमध्ये गणली जावोत! त्यांच्या अभीष्टचिंतनासाठी आपण पिऊ या."

प्रत्येक प्याल्याबरोबर बैठक अधिक रंगत चालली होती. एकट्या आल्तीनाई तेवढ्या अस्वस्थ झालेल्या दिसल्या. समोरच्या प्याल्यातील मदिरेचा त्यानी जेमतेम एक घोट घेतला होता. पण कुणाचेच त्याकडे लक्ष नव्हते. प्रत्येकजण उत्साहात होता, आनंदात होता, बडबडत होता, हसत होता.

आल्तीनाई आपल्या मनगटावरील घड्याळाकडे वारंवार पहात होत्या. आणि नंतर सारी मंडळी थोड्या मोकळ्या हवेसाठी बाहेर आली तेव्हा त्या सर्वांपासून अलग उभ्या राहिलेल्या मी पाहिल्या. समोरच्या टेकडीवरचे पिवळे पडलेले चिनार वाऱ्याच्या झुळकींबरोबर हळुवार डोलत होते आणि आल्तीनाई त्यांच्याकडे अगदी टक लावून पहात होत्या. स्तेपच्या फिकट जांभळ्या रेषेशी आकाश जेथे भिडत होते तेथे सूर्य डुबत होता. त्यांच्या संधिप्रकाशाने चिनारांच्या शेंड्यांना एक फिकट, दु:खद जांभळी छटा आणली होती.

मी आल्तीनाईंच्या जवळ गेलो.

"आता त्यांची पानगळ सुरू झालीय, वसंतामध्ये त्यांना पालवी फुटते तेव्हा तुम्ही त्यांना पहायला हवं!"

"मी त्यांचाच विचार करीत होते," त्या एक उसासा टाकून म्हणाल्या. थोडा वेळ गप्प राहून त्या स्वत:शीच बोलल्यागत म्हणाल्या: "खरंच, सगळ्या सजीव गोष्टींना त्यांचा वसंत आणि शरद असतो."

वार्धक्याकडे झुकत चाललेल्या त्यांच्या मुद्रेवर दु:खद विचारांची गडद छटा उमटली. खास स्त्रीसुलभ खेदाच्या भावनेने आल्तीनाई त्या चिनारांकडे पहात होत्या. त्यांच्यातली विद्वत्ता त्या क्षणाला लोपली होती. आत्ता उभी होती ती सुख-दु:खाच्या साऱ्या छटा उघडपणे व्यक्त करणारी एक साधीसुधी, खेडवळ किर्घिझ बाई. आपल्या यौवनातल्या आठवणींमध्ये त्या जणू हरवल्या होत्या. आमच्या गाण्यांमध्ये म्हटले आहे की, अगदी सर्वांत उंच पर्वतावरून जरी तुम्ही साद घातलीत तरी या यौवनातल्या आठवणींना परत बोलावता येत नाही. चिनारांकडे एकटक पहात असताना त्यांना मला काही सांगायचे आहे असे मला वाटले, पण बहुधा विचार बदलून त्यानी आपल्या हातातला चष्मा डोळ्यांवर चढवला.

"मला वाटतं मॉस्कोला जाणारी आगगाडी इथून संध्याकाळी जाते ना?" त्यानी विचारले.

"होय."

"तर मग मला स्टेशनवर जायला आता निघालं पाहिजे."

"पण एवढं अचानक का?" मी विचारले. "तुम्ही इथं काही दिवस रहायचं वचन दिलं आहे ते विसरलात का? लोक तुम्हाला एवढ्या लौकर जाऊ देणार नाहीत."

"मला मॉस्कोत फार तातडीचं काम आहे. मला तावडतोब निघालंच पाहिजे."

त्यांचा निश्चय झाला होता आणि कोणतीही मनधरणी त्याना त्यापासून परावृत्त करू शकत नव्हती.

काळोख दाटत चालला होता. हिरमुसले गावकरी पाहुण्या बाईंना मोटरीपर्यंत पोचवायला आले. लौकरच निदान आठवड्याच्या मुक्कामासाठी त्या गावी परततील असे त्यांनी त्यांच्याकडून वचन घेतले. मी त्यांच्याबरोबर मोटरीतून स्टेशनापर्यंत गेलो.

अशी एकाएकी त्यानी घाई का केली याचे मला आश्चर्य वाटत होते. आपल्या गावच्या लोकांच्या भावना अशा रीतीने दुखावणे, विशेषत: अशा महत्त्वाच्या दिवशी दुखावणे त्यांच्या दृष्टीने तितकेसे शहाणपणाचे नव्हते. त्या असे का वागताहेत हे विचारण्याची माझी इच्छा होती, पण मला धीर झाला नाही. तसे विचारून मी अडाणी ठरेन अशी भीती मुळीच वाटत नव्हती. पण त्याचा काही उपयोग होणार नाही, त्या मला काहीही सांगणार नाहीत याची मला कल्पना होती. त्या विचारात गुंतल्या होत्या व स्टेशनपर्यंतच्या सबंध रस्त्यात त्यानी तोंडातून चकार शब्द काढला नाही.

"कोणत्यातरी कारणानं तुम्ही बेचैन झाला आहात. आम्ही तुमचा नकळत काही अपमान केला का? तुम्ही

कुणावर रागावला आहात काय?" अखेरीस न राहवून मी विचारले.

"छे: छे: मुळीच नाही! अशी कल्पनासुद्धा मनात आणू नका! मी कुणावर रागावणार हो? कदाचित रागावले तर [illegible]. खरंच, मी स्वत:वर मात्र खूप रागवू शकते."

आणि एवढ्यावरच त्यांनी निरोप घेतला. मी शहरात [illegible] त्यानंतर काही दिवसांनी मला त्यांच्याकडून एक पत्र आले तेव्हा मी थोडासा चकितच झालो. आल्तीनाईंनी [illegible] होते की, ठरविल्यापेक्षा त्या मॉस्कोमध्ये अधिक [illegible] राहणार होत्या व पुढे म्हटले होते:

"मॉस्कोत मला अनेक महत्त्वाची आणि तातडीची [illegible] असूनही ती सारी बाजूला ठेवून मी तुम्हाला हे [illegible] पत्र लिहायचे ठरवले आहे. जर तुम्हाला माझी [illegible] आकर्षक वाटली तर तुम्ही तिच्यावर विचार करावा [illegible] मी आपल्याला विनंती करते आणि ती कशी प्रसिद्ध [illegible] याबाबत आपण सूचना करावी. ही गोष्ट केवळ [illegible] गावकऱ्यांच्या हितासाठीच नव्हे तर सर्वांच्या [illegible]. विशेषत: आपल्या तरुणांच्या हितासाठी केली [illegible] असे मला वाटते. या निर्णयाला येण्यापूर्वी या [illegible] मी खूप विचार केला. हा मी लोकांपुढे दिलेला [illegible]जबाब आहे. तसे मी त्यांचे देणे लागते. जेवढे अधिक [illegible] वाचतील, तेवढा माझ्या मनावरचा भार हलका [illegible]. मला शरम वाटेल म्हणून घाबरू नका. हातचे [illegible] राखून सांगू नका."

त्यांच्या पत्राने माझ्या मनावर एवढा जबरदस्त [illegible] केला की, कित्येक दिवस माझ्या डोक्यात त्याशिवाय

दुसरा विचारच येत नव्हता. शेवटी असे ठरवले की, आल्तीनाई स्वतःच गोष्ट सांगत आहेत अशा पद्धतीने निवेदन करणे हेच सर्वांत उत्तम ठरेल.

* * *

१९२४ सालची गोष्ट. होय, तेच ते वर्ष...

आज जेथे सामुदायिक शेत आहे तेथे त्याकाळी गरीब शेतकऱ्यांचे एक छोटेसे खेडे होते. मी त्यावेळी चौदा वर्षांची होते. माझे वडील आणि आई दोघेही वारले होते. मी वडिलांच्या चुलत भावाच्या घरात रहात होते.

त्या वर्षीच्या शरद ऋतूमध्ये, श्रीमंत मेंढपाळ हिवाळ्या-साठी डोंगरात रहायला गेल्यानंतर, भलामोठा लष्करी कोट घातलेला एक नवीनच माणूस आमच्या खेड्यात आला. त्याचा तो मोठा कोट मला आठवतो, कारण आश्चर्य म्हणजे तो काळ्या रंगाचा होता. डोंगरांच्या मध्ये वसलेल्या अतिदूरच्या आमच्या खेड्यात गणवेषातल्या माणसाच्या त्या आगमनाने बरीच खळबळ उडाली.

पहिल्यांदा लोक म्हणत होते की, तो सैन्यामध्ये मोठा अधिकारी होता तेव्हा खेड्यातही तो मोठा अधिकारी बनून आला असणार. पण नंतर असे आढळून आले की, तो अधिकारी वगैरे काही नव्हता तर गावच्या ताश्तानबेकचा मुलगा होता. कित्येक वर्षांपूर्वी एका दुष्काळी हिवाळ्यात हा ताश्तानबेक खेडे सोडून रेल्वेमध्ये काम करण्यासाठी निघून गेला होता व त्याच्याबद्दल पुढे काहीच समजले नव्हते. आणि हा नवा माणूस म्हणजे त्याचा मुलगा दुईशेन होता.

त्याच्या सांगण्याप्रमाणे खेड्यात शाळा सुरू करण्यासाठी व मुलांना लिहा-वाचायला शिकविण्यासाठी त्याला पाठवण्यात आले होते.

त्या काळात आमच्या खेड्यात शाळा हा शब्द माहीत नव्हता आणि असल्या नव्या कल्पना लोकांना अजिबात रुचत नव्हत्या. काहींनी अफवांवर विश्वास ठेवला, तर काहींनी बायकांची वटवट म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. या [illegible] ची चर्चा गावकरी लोकरच विसरून गेले असते, पण दुइशेन गावात आल्यानंतर एक सभा भरविण्यात आली. [illegible] काकाची सभेला जायची इच्छा नव्हती. तो धुसफुसत [illegible]: "कसली आलीय डोंबलाची सभा! माणसं कामात [illegible] हे लोक नेहमी असे सतावत राहतात!" पण [illegible] त्याने आपल्या म्हाताऱ्या तट्टावर खोगीर चढवले [illegible] प्रतिष्ठित गृहस्थाप्रमाणे तो सभेला गेला. शेजाऱ्यांची [illegible] व मी त्याच्यामागून पळत निघालो.

नेहमी ज्या ठिकाणी आमच्या गावच्या सभा भरत [illegible] टेकाडावर आम्ही धापा टाकीत पोहोचलो तेव्हा फिकट [illegible], काळ्या लष्करी डगल्यातला तोच तरुण माणूस [illegible] जमलेल्या घोडेस्वारांना व पायी आलेल्यांना उद्देशून [illegible] देत होता. आम्हाला त्याचे बोलणे नीट ऐकू येत [illegible] म्हणून आम्ही थोडे अधिक जवळ सरकलो. पार [illegible] झालेल्या केसाळ कोटातल्या एका अगदी म्हाताऱ्या [illegible] त्याला अचानक थांबवले.

हे बघ मुला, पूर्वी मुल्ला मुलांना शिकवायचे. पण [illegible] बाप आम्हा सगळ्यांना चांगला ठाऊक आहे, तो आम्हा

सगळ्यांसारखाच भिकेकंगाल होता," तो म्हातारा माणूस भडाभडा बोलत होता. "आम्हाला एक गोष्ट जाणून घ्यायचीय: तू मुल्ला कसा काय झालास?"

"मी मुल्ला नाही उस्ताद, मी कम्सोमोलचा सभासद आहे," दुईशेनने तावडतोब उत्तर दिले. "आता मुलांना मुल्ला शिकवणार नाहीत, मास्तर शिकवतील. सैन्यात मी लिहा-वाचायला शिकलो आणि त्यापूर्वी मी थोडा शाळेत गेलोय. माझ्यात मुल्लापण फक्त तेवढेच आहे."

"मग गोष्टच वेगळी..."

पाठोपाठ प्रशंसेच्या आरोळ्या उमटल्या.

"आणि कम्सोमोलने तुमच्या मुलांना शिकविण्यासाठी मला पाठवलंय. आपल्याला त्यासाठी जागेची गरज आहे. मी शाळा उघडण्याचा विचार करतोय – अर्थात तुमच्या टेकडीवरच्या त्या जुन्या तबेल्यात. ही कल्पना तुम्हाला कशी काय वाटते?"

तावडतोब उत्तर द्यायला लोकांची तयारी नव्हती. या नव्या माणसाच्या मनात काय आहे याचा थांग त्यांना अद्याप लागत नव्हता. सातीमकुलचा त्याला कडवा विरोध होता. त्याने शांततेचा भंग केला. खोगीराच्या पुढच्या टोकावर ओणवून तो भोवतालची बडबड लक्षपूर्वक ऐकत होता आणि दातांमधून थुंकीची पिचकारी मधून मधून मारीत होता.

"तरुण माणसा, एवढी घाई करू नको," जणू काही वेध घ्यावा अशा नजरेने दुईशेनकडे पहात तो म्हणाला. "तू आम्हाला आधी हे सांग: आम्हाला शाळा कशासाठी पाहिजे?"

"शाळा तुम्हाला कशासाठी पाहिजे?" त्याच्या प्रश्नाने चकित झालेल्या दुईशेनने परत त्याच शब्दांचा उच्चार करीत म्हटले.

"होय, कशासाठी पाहिजे?" कुणीतरी विचारले.

सारेजण एकाच वेळी बोलू आणि ओरडू लागले.

"वर्षानुवर्षांपासून जमीन कसणं हेच आमचं आयुष्य. आमची कुदळ आम्हाला नेहमी भाकर देते. आमची मुलंही आमच्यासारखीच राहतील, मग त्यांना शाळेत शिकायची काय गरज? अधिकाऱ्यांना शिकायची गरज असते, आम्ही साधी माणसं! तेव्हा उगीच आमच्या जगण्यात गोंधळ घालू नको!"

हळूहळू आरडाओरडा विरला.

"तुमच्या मुलांनी शाळेत जाण्याच्या तुम्ही विरुद्ध जाणार? कसं शक्य आहे हे?" आपल्यावर रोखून पाहणाऱ्या लोकांच्या चेहऱ्याकडे डोळे विस्फारून बघत दुईशेनने धक्का बसलेल्या आवाजात विचारले.

"समज आम्ही विरुद्ध असलो, तर तू जबरी करणार आहेस काय? ते दिवस गेले आता. आम्ही आता स्वतंत्र आहोत. आम्हाला पाहिजे तसं आम्ही राहू."

दुईशेनचा चेहरा पांढराफटक पडला. थरथरत्या बोटांनी त्याने कोटाची बटणे सोडली, कुडत्याच्या वरच्या खिशात चाचपून त्याने चार घड्या घातलेला एक कागद गडबडीने बाहेर काढला व डोक्यापेक्षा उंच धरून तो म्हणाला:

"तर तुम्ही या कागदातल्या हुकूमाच्या विरुद्ध आहात? तुमच्या मुलांनी शाळेत गेलं पाहिजे असं त्यात म्हटलंय आणि

त्यावर सोविएत सरकारचा शिक्का आहे. कुणी तुम्हाला जमीन आणि पाणी दिलं? कुणी तुम्हाला स्वातंत्र्य दिलं? ठीक आहे, बोला कोण सोविएत सरकारच्या कायद्याला विरोध करतोय? बोला लौकर, उत्तर द्या!"

"उत्तर द्या" हे शब्द तो एवढ्या जोराने ओरडला की, शरदातल्या त्या शांत वातावरणात ते शब्द एखाद्या बंदुकीच्या गोळीसारखे सुसाटत गेले आणि डोंगरांमधून त्यांचा प्रतिध्वनी घुमला. कुणीही एक शब्द उच्चारला नाही. सारे माना खाली घालून गप्प राहिले.

"आपण गरीब शेतकरी आहोत," आता दुईशेन शांत-पणे बोलू लागला. "आपल्या साऱ्या आयुष्यभर आपला अपमान होत राहिला, आपल्याला लाथाडण्यात आलं. आपण अंधारात राहिलो. आता आपण उजेड पहावा, लिहा-वाचायला शिकावं असं सोविएत सरकारला वाटतंय. म्हणून आपल्या मुलांनी शाळेत गेलं पाहिजे."

दुईशेन बोलायचा थांबला व लोकांच्या प्रतिक्रियेची वाट पहात राहिला. त्या चिंध्या झालेल्या केसाळ कोटातल्या म्हाताऱ्या माणसाने प्रथम बोलायला सुरुवात केली.

"ठीक आहे, तुझी इच्छा असेल तर शिकव त्यांना. आम्हाला काही पर्वा नाही..."

"पण मी तुमची मदत मागतोय. टेकडीवरच्या त्या तबेल्याची दुरुस्ती केली पाहिजे, ओढ्यावर पूल बांधायला पाहिजे, हिवाळ्यासाठी सर्पण लागेल..."

"भल्या माणसा, एवढी घाई करू नको, जरा सबुरीनं घे," सातीमकुलने मध्येच आगावूपणे दुईशेनच्या बोलण्यात

घोडा घातला. त्याने दातांमधून थुंकीची पिचकारी मारली व एक डोळा बारिक करून दुष्ट नजरेने दुईशेनकडे पाहिले.

"तू शाळा सुरू करतोस हे साऱ्या गावानं ऐकावं म्हणून मारे इथं जोरानं ओरडतो आहेस. पण मला तर स्पष्ट दिसतंय की, ना तुझ्या अंगावर केसाळ कोट, ना तुला बसायला घोडा, ना जमीन, कसलेल्या जमिनीचा ना तुकडा किंवा तुझ्या नावावर ना एक मेंढरू! भल्या माणसा, तू जगणार कसा? दुसऱ्यांच्या कळपात चोरी करून?

पण आम्हा गरीबांजवळ मेंढरं नाहीत. ज्यांच्याजवळ आहेत ते लोक डोंगरात राहतात."

दुईशेन त्याला काहीतरी तिखट उत्तर देणार होता, पण त्याने चटकन स्वतःला सावरले व तो शांतपणे म्हणाला:

"माझं मी भागवीन. मला पगार मिळेल."

"हां, असं काही बोल!" सातीमकुल स्वतःवरच बेहद्द खूश होऊन म्हणाला. आता तो खोगीरावर सरळ ताठ बसला व गावनालच्या लोकांकडे त्याने एकवार विजयी नजरेने पाहिले. "आता सारं काही स्पष्ट झालं. भाऊ, तुझी काळजी तू जरूर कर आणि तुला मिळणाऱ्या पगारासाठी तू मुलांना खुशाल शिकव. सरकारजवळ भरपूर पैका आहे. आम्हाला मात्र निवांत राहू दे, आधीच आमच्यामागं सतराशे साठ कटकटी आहेत."

एवढे बोलून सातीमकुलने घोडा वळवला व तो दौडत निघून गेला. इतरही त्याच्या मागोमाग निघाले. हातात कागद धरलेला दुईशेन हताश मुद्रेने एकटाच तेथे उभा राहिला होता.

मला त्याच्याबद्दल खूप वाईट वाटले. मुक्या करूणेने पहात मी तेथे उभी राहिले होते. अखेरीस माझ्या काकाने मला तिथून हाकलले.

"झिपरे, काय करतेस तू इथं? काय थोबाड वासून बघत राहिलीस? पळ घरी ताबडतोब!" मी माझ्या बरोबरीच्या सोबत्यांमागे पळाले. "पोरंटोरंसुद्धा आता सभांना यायला लागलीय. काय होणार पुढे कुणास ठाऊक!" माझा काका पुन्हा एकदा गुरगुरला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मुली ओढ्यावर पाणी आणायला गेलो तेव्हा दुईशेन मोठ्या कष्टाने पाण्यातून चालत पलिकडे जात असलेला मी पाहिला. त्याच्या हातात एक फावडे, एक कुदळ, एक कुऱ्हाड आणि एक जुनाट बादली होती.

त्यानंतर दररोज सकाळी दुईशेनची काळ्या कपड्यातली एकाकी आकृती टेकडीवरच्या ओसाड तबेल्याकडे जात असलेली गावकऱ्यांना दिसत असे. संध्याकाळी खूप उशिरा तो खेड्यात खाली परत यायचा. बहुतेक वेळा त्याच्या पाठीवर गवताचा किंवा कडब्याचा प्रचंड भारा असायचा. त्याला दुरून पाहताच रिकिबीतून उंचावून डोळ्यावर हात धरून पहात व त्याच्याबद्दल कुचाळकीचे उद्गार काढीत.

"पाठीवर बोजा घेतलेला तो दुईशेन मास्तर तर नाही ना?"

"दुसरा कोण असणार?"

"बिच्चारा. मास्तराचा धंदा पण काही सोपा दिसत नाही."

"तुला तसं वाटलं काय? त्याच्या पाठीवरचं ते ओझं बघ! जमीनदाराच्या घरच्या मोलकरणीत आणि त्याच्यात काही फरक दिसत नाही."

"पण बेटा केवढ्या मोठ्या लंब्याचवड्या गप्पा मारीत होता."

"कारण त्याच्याजवळ तो कागद आहे ना! त्या शिक्क्यात सगळी ताकद आहे."

खेड्यामागच्या डोंगरपायथ्याशी आम्ही जळणासाठी सुकलेले शेण गोळा करीत असू. एके दिवशी अशीच शेणाने पिशवी भरली असता आम्ही मास्तर काय करतो ते जुन्या तबेल्यात जाऊन पहायचे ठरवले. एकेकाळी ही मातीची झोपडी जमीनदाराच्या मालकीची होती. शरदात व्यायलेल्या आपल्या घोड्या तो हिवाळ्यात या तबेल्यात ठेवायचा. सोविएत सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर मालमत्ता सोडून जमीनदार पळून गेला. त्यानंतर कुणीही तिथे गेले नाही आणि त्या जागी भलेमोठे निवडुंग माजले. पण आता आमच्या दृष्टीला वेगळेच दृश्य दिसले. निवडुंग पुरते उपटून काढून त्याचा एक गठ्ठा लावून ठेवलेला दिसत होता व अंगण साफ केलेले होते. पावसाने धुपून कोसळायला आलेल्या भिंती मातीने लिंपून काढल्या होत्या आणि एका बिजागरीवरचे तिरमी कललेले दार व्यवस्थित दुरुस्त करून बंद केलेले होते.

अंमळ विश्रांती घ्यायला आम्ही पिशव्या जमिनीवर टाकल्या आणि तेवढ्यात दुईशेन बाहेर आला. चिखलाने तो सबंध माखला होता. आम्हाला पाहताच एकदम तो दचकला, पण दुसऱ्याच क्षणी त्याने आमच्याकडे पाहून हास्य केले.

"मुलींनो कुठून आलात तुम्ही?" चेहऱ्यावरचा घाम पुशीत त्याने विचारले.

आमच्या पिशव्यांशेजारीच आम्ही जमिनीवर बसलो होतो. लाजेने एवढ्या चूर झालो होतो की, काही बोलणे दूरच! आमच्या लाजण्यामुळे आम्ही अशा तोंडाला कुलूप घालून बसलो आहोत हे दुईशेनच्या लक्षात आले. आमच्यात मोकळेपणा यावा म्हणून त्याने हळूच डोळा मिचकावला व प्रेमळपणे तो हसला.

"तुमच्या पिशव्या तुमच्यापेक्षा मोठ्या आहेत की ग पोरींनो," तो म्हणाला. "तुम्ही आलात याचा मला खूप आनंद झाला, कारण शेवटी ही तुमचीच शाळा आहे. ठाऊक आहे ना? तुमच्यासाठी ती जवळ जवळ तयार झालीय. मी नुकतीच तिथे शेकोटी बांधली आणि तिच्यावर धुरासाठी चिमणी, पाहिलीत? आता महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिवाळ्यासाठी जळण गोळा करून ठेवायला पाहिजे. पण ते सोपं आहे. इथं भोवताली भरपूर गवत उगवतं. आपण जमिनीवर बसायला खूप वाळलेलं गवत पसरू आणि धडे शिकायला सुरुवात करू. तुम्हाला शाळेला जायला आवडेल की नाही?"

मी सर्वांपेक्षा मोठी होते. तेव्हा उत्तर देण्याची जबाबदारी माझ्यावर आहे असे समजून मी म्हणाले:

"माझ्या काकीनं परवानगी दिली तर मी जाईन."

"का नाही देणार ती परवानगी? जरूर ती तुला शाळेला जायला देईल. काय नाव तुझं?"

"आल्तीनाई," माझ्या गुडघ्यावर फाटलेले कपड्याचे भोक हाताने झटकन झाकीत मी म्हणाले.

"आल्तीनाई — छान आहे नाव." तो इतका प्रसन्न हसला की, तुमचे अंतःकरण अगदी भरून यावे. "तू कुणाची?"

मी गप्प राहिले. माझी कुणी कीव केलेली मला आवडायची नाही.

"पोरकी आहे ती. काकांजवळ राहते," मैत्रिणी म्हणाल्या.

"आल्तीनाई, तू इतर मुलांना घेऊन शाळेला येशील. कबूल?"

"होय काका."

"मला मास्तर म्हणत जा. तुम्हाला इथं आत येऊन पहायचंय? या आत, लाजू नका."

"नको, आम्ही जातो आता. आमची घरी जायची वेळ झाली," आम्ही म्हणालो. खरे म्हणजे आत जायला आम्ही खूप घाबरत होतो.

"पळा तर मग. तुम्ही धडे शिकायला लागाल तेव्हा सारं बघाल. मी पण अंधार पडण्यापूर्वी गवतासाठी एक चक्कर मारतो."

हातात एक लांबलचक दोर व विळा घेऊन दुईशेन निघाला. आम्ही उभे राहिलो, पाठीवर पिशव्या मारल्या आणि खेड्याकडे पळत निघालो. एकाएकी माझ्या डोक्यात एक कल्पना चमकली.

"थांबा ग मुलींनो," मी म्हणाले. "आपण आपल्या पिशव्या इथं शाळेतच रिकाम्या करू या. म्हणजे हिवाळ्यासाठी तेवढंच जास्त जळण होईल."

"आणि घरी रिकाम्या हातांनी जायचं? मोठी शहाणीच लागून गेलीस तू!"

"आपण परत येऊन आणखी शेण गोळा करू."

"नको बाई, मला घरी जायला उशीर झाला तर आईच्या शिव्या खाव्या लागतील."

माझ्यासाठी न थांबता पोरी घाईघाईने निघाल्या.

त्या दिवशी मी तशी का वागले हे अजूनही मला समजत नाही. कदाचित अगदी लहानपणापासून माझ्या सर्व आशा-आकांक्षा, माझ्या भावना क्रूरपणे दडपल्या गेल्यामुळे निर्माण झालेल्या हट्टीपणातून किंवा बंड करून उठण्याच्या अनिवार्य इच्छेमधून मी तशी वागली असेन. या अगदी परक्या अशा माणसाच्या प्रेमळ हास्याने माझ्या काळजावर हळुवार फुंकर घातली, थोडासा का होईना माझ्यावर विश्वास टाकला, चार प्रेमळ शब्द तो माझ्याशी बोलला त्यामुळे त्याच्यासाठी काहीतरी चांगले काम करण्याच्या प्रेरणेनेही मी कदाचित तशी वागले असेन. आणि आता मला समजते की, त्या दिवशी मी जे काही केले तेव्हापासूनच माझ्या सुख-दुःखांसकटच्या सगळ्या खऱ्या जीवनाला सुरुवात झाली. कारण त्या दिवशी पहिल्याप्रथम मी माझ्या मनाने आयुष्यात काहीतरी केले; मला योग्य वाटली ती गोष्ट मुळीच न डगमगता किंवा शिक्षेची भीती न धरता मी केली. माझ्या मैत्रिणींनी मला एकटीला टाकले तेव्हा मी दुईशेनच्या शाळेकडे घाईघाईने गेले, दाराजवळ माझी पिशवी मोकळी केली आणि जेवढ्या वेगात धावता येईल तेवढ्या वेगाने खिंडींमधून व घळींमधून आणखी शेण गोळा करण्यासाठी धावले.

जणू काही पंख असल्याप्रमाणे मी सुसाट धावत होते. मी काहीतरी फार मोठी सुंदर गोष्ट केल्याच्या आनंदात माझ्या हृदयाचे ठोके वेगाने पडत होते. मी का आनंदात होते हे जणू सूर्याला समजत होते. अशा मनमोकळ्या आनंदात मी का धावत होते हे खरोखरीच त्याला समजले असले पाहिजे असे मला वाटते; कारण मी चांगले कृत्य केले होते.

डोंगरमाथ्यावर तो एव्हांना टेकला होता, पण अदृश्य व्हायची त्याची इच्छा दिसत नव्हती. मला आणखी पहात रहायची त्याची इच्छा होती. माझ्या वाटेवरच्या सुकत चाललेल्या पिवळसर गवताला आणि पानांना शेंदरी, गुलाबी आणि जांभळ्या रंगांच्या विविध छटा देऊन तो माझी वाट सुंदर बनवीत होता. झुबकेदार गवतामधून धावताना गवताचे तुरे लवलवत्या ज्योतीप्रमाणे भासत होते. माझ्या ठिगळे लावलेल्या व टाके घातलेल्या बेश्मेतवरील पितळी बटणे सूर्याच्या प्रकाशात चकाकत होती. मी पुढे पुढे धावत होते. माझे अंतःकरण धरतीला, आकाशाला आणि वाऱ्याला उद्देशून जणू गाणे गात होते: "बघा माझ्याकडं! बघा कसा अभिमान वाटतो माझा मला! मी अभ्यास करणार, शाळेला जाणार आणि दुसऱ्यांना पण बरोबर शाळेत नेणार!"

मी किती वेळ धावत होते याचे मला भान नव्हते. पण एकाएकी धक्का बसून पुन्हा पृथ्वीवर आले: शेण! आश्चर्य वाटण्यासारखी बाब होती. उन्हाळ्यात तेथे अनेक गायी चरतात. नेहमी तेथे भरपूर सुकलेले शेण पडलेले असते आणि आता पाहते तो तिथे शेणाचा पत्ताच नव्हता. कदाचित मी

शेण शोधीतच नव्हते? मी जितकी दूर धावत होते तेवढे शेण कमी कमी सापडत होते. "या वेगानं मी अंधार पडण्यापूर्वी पिशवी कधीही भरू शकणार नाही" हा विचार धावताना माझ्या मनात आला आणि मी कासावीस झाले. माझी पिशवी जेमतेम अर्धी भरली होती. दरम्यान संधिप्रकाश अंधुक झाला आणि दरी अंधाराने चटकन भरून गेली.

यापूर्वी इतक्या उशीरापर्यंत मी एकटी कधी बाहेर राहिले नव्हते. रात्रीने आपले काळोखे पंख निवांत, एकाकी टेकड्यांवर पसरले. मी पुरती घाबरून गेले आणि खांद्याला पिशवी लटकावून खेड्याकडे धूम ठोकली. मला एवढी भीती वाटत होती की, जोराने किंचाळावे आणि हमसून रडावेसे वाटत होते. पण गंमतीची गोष्ट म्हणजे दुईशेनचा विचार मनात येताच माझ्या मनातला आकांत थांबला. मी कष्टाने मला सावरले आणि कोणती भुते माझा पाठलाग करताहेत हे दिसू नये म्हणून एकदाही मागे वळून पाहिले नाही.

मी घरी पोचले तेव्हा मला धाप लागली होती, घामाने थबथबले होते आणि सबंध धुळीने माखले होते. धापा टाकीतच मी धडपडत खोलीत शिरले. चुलीशेजारी बसलेली माझी काकी अपशब्दांचा भडिमार करीतच माझ्या अंगावर धावून आली. ती अत्यंत हलक्या मनाची, दुष्ट बाई होती.

"इतका उशीर का केलास?" तिने विचारले आणि मी काही बोलण्यापूर्वीच माझ्याकडून पिशवी खेचून दूर फेकली. "सबंध दिवसात फक्त एवढंच गोळा केलंस?"

माझ्या मैत्रिणींनी माझी चुगली केली होती हे मला मागाहून समजले.

"काळतोंडे, त्या शाळेत तुला काय हवंय? तिथं जाऊन मरन का नाहीस?" तिने माझा कान पकडला आणि डोक्यावर फडफाड मारले. "निर्लज्ज सटवी मेली! लांडग्याचं पोर कधी घरचा कुत्रा होणार नाही! दुसऱ्या माणसांची पोरं कामात मदत करतात, पण तू कध्धी नाही! दुसऱ्यांची पोरं आपलं घर कसं भरेल ते बघतात आणि तू घर फुंकून टाकायला निघाली आहेस! शाळेत गेल्याबद्दल मी तुला चांगली अद्दल घडवते, आणि पुन्हा शाळेजवळ नुसती फिरकलीस तरी तंगडी मोडून ठेवीन! तुझ्या शाळेची मी तुला चांगली आठवण देते!"

मी काहीही बोलले नाही, फक्त तोंडून किंकाळी फुटू नये म्हणून प्रयत्न केला. नंतर आगीसमोर शांतपणे रडत बसून राहिले. आग पेटती ठेवायचे काम माझ्याकडे होते. आमचे कबरे मांजर मांडीवर उडी मारून बसले होते त्याला थोपटत राहिले. जेव्हा जेव्हा मी दुःखात असे तेव्हा त्याला कळे व ते असे माझ्या मांडीवर येऊन बसत असे. माझ्या काकीने मला मारले म्हणून मी रडत नव्हते, मला अशा माराची सवय झाली होती; पण ती मला कधीही शाळेत जाऊ देणार नाही म्हणून मी रडत होते.

दोन दिवसांनंतर, भल्या सकाळीच सबंध खेड्यातली कुत्री जोरजोराने भुंकू लागली व लोकांचे मोठमोठ्या आवाजातील बोलणे ऐकू येऊ लागले. डुईशेन घराघरातून मुलांना गोळा करून शाळेला घेऊन निघाला होता. त्या काळात आमच्या खेड्यात रस्ते नव्हते. आमच्या राखाडी मातीच्या झोपड्या सबंध खेड्याभर विस्कळितपणे पसरलेल्या होत्या.

प्रत्येकाने मनाला येईल तेथे झोपडी बांधली होती. मुलांच्या घोळक्यात वेढलेला दुईशेन एकामागून एक कुटुंबाला हाकारा घालीत निघाला होता.

आमचे घर एका टोकाला होते. मी आणि माझी काकी लाकडाच्या उखळीत बाजरी कांडीत होतो आणि काका बळदातले गहू बाजारात विकायला नेण्यासाठी काढीत होता. आम्ही दोघी आळीपाळीने उखळात मुसळ मारीत होतो. एखाद्या लोहाराच्या घणाप्रमाणे आमचे घाव बसत होते. पण माझे सारे लक्ष मात्र दुईशेन कोठे जातो तिकडे लागले होते. तो आमच्या घरापर्यंत येणारच नाही अशी मला भीती वाटत होती. [माझी काकी मला शाळेत जाऊ देणार नाही हे जरी मला माहीत होते तरी मी कुठे रहाते ते दुईशेनने येऊन पहावे अशी माझी इच्छा होती.] आमच्या घरापर्यंत पोचण्यापूर्वीच त्याने परतू नये म्हणून मी मनोमन त्याची प्रार्थना करीत होते.

"रामराम, देव तुमच्या कामात तुम्हाला मदत करो! आणि देवाने नाही केली मदत तर आम्ही करू, बघा आम्ही किती लोक आहोत?" थोडेसे विनोदी बोलत दुईशेनने माझ्या काकीशी संभाषण सुरू केले.

उत्तरादाखल तिने नुसताच अस्पष्ट हुंकार काढला; माझ्या काकाने तर मास्तराना वळून पाहण्याचाही त्रास घेतला नाही.

अशा स्वागताने दुईशेन मुळीच नाउमेद झाला नाही. अंगणाच्या मधोमध असलेल्या लाकडी ओंडक्यावर तो बसला व त्याने कागद-पेन्सिल बाहेर काढली.

"आम्ही आज शाळा सुरू करतोय. तुमची मुलगी किती वर्षांची आहे?"

माझ्या काकीने काहीच उत्तर न देता जोरजोराने बाजरी कांडायला सुरुवात केली. त्याच्याशी बोलण्याची तिची इच्छा नव्हती हे उघड होते. मी अस्वस्थ झाले: आता काय होणार? दुईशेनने माझ्याकडे एकदा पाहिले आणि तो हसला. तेव्हा मला एकदम धीर आला.

"आल्तीनाई, तुझं वय काय?" त्याने मला विचारले. उत्तर देण्याचे धैर्य मला नव्हते.

"तुला त्याच्याशी काय करायचंय आणि तिचं वय विचारणारा तू कोण?" माझ्या काकीने तिरसटपणे विचारले. "तिला शाळेत जायला वेळ नाही. आईबापांबरोबर राहणाऱ्या पोरीसुद्धा लिहा-वाचायला शिकत नाहीत, मग हिच्यासारख्या पोरीचं काय? तुझ्याबरोबर एवढी पोरं आहेत, जा त्यांना घेऊन आपल्या शाळेला. इथं तुझं काही काम नाही."

"असं तुम्ही बोलता तरी कसं?" ताडकन उभा रहात दुईशेन ओरडून म्हणाला. "ती पोरकी आहे हा काय तिचा दोष? पोरक्या मुलांनी शिकू नये असा कुणी कायदा केलाय?"

"तुझ्या कायद्यांना मी कवडीची किंमत देत नाही. इथं माझे कायदे मी स्वतः करते आणि, इथं मी तुझे हुकूम मुळीच ऐकणार नाही!"

"आपल्या सर्वांना सारखेच कायदे लागू आहेत. या मुलीची कदाचित तुम्हाला गरज नसेल, पण आम्हाला आहे, सोवियत राज्याला आहे. तुम्ही जर आमच्या विरुद्ध गेलात

तर आमचे हुकूम मान्य करायला आम्ही तुम्हाला भाग पाडू."

"अरे वा रे, बघा या साहेबाचं तोंड बघा, मोठा लागून गेलाय!" माझी काकी कमरेवर हात ठेवून लढायला जय्यत तयार झाली. "या कारटीनं कुणाचं ऐकायचं मग? तिला खायला-प्यायला कोण देतं? मी का तू? एका भटक्याचा पोर तू आणि स्वत:ही तसाच!"

या भांडणाचा शेवट कसा झाला असता हे सांगणे अवघड आहे. पण तेवढ्यात माझा काका बळदातून बाहेर आला. आपला नवरा आहे आणि तो घराचा मालक आहे ही गोष्ट विसरून आपली बायको जेव्हा नको त्या भानगडीत नाक खुपशीत असे तेव्हा त्याला भारी राग येई. याबद्दल तो कधीकधी तिला बेदम चोपून काढायचा. आताही तो रागाने लालबुंद झाला.

"भवाने गप्प बैस!" बळदातून बाहेर येत तो गरजला. "घराचे आपण मालक आहोत आणि करतो ते सारे बरोबर वाटायला तुला काय झालंय? आँ? वटवट थोडी कमी कर आणि काम जास्त करीत जा. आणि तू रे, ताश्तानबेकच्या पोरा, घे त्या पोरीला आणि शिकव किंवा जेवणाला भाजून खा. काय पाहिजे ते कर. पण आधी माझ्या अंगणाच्या बाहेर हो! चल हो चालता!"

"म्हणजे तुम्ही तिला उंडारायला पाठवणार आणि घरात मला मदत कोण करणार? कोण करणार विचारते मी?" माझ्या काकीने प्रचंड कांगावा केला पण काका जोरात तिच्यावर खेकसला: "आवाज बंद!" आणि ती गप्प झाली.

प्रत्येक काळ्या ढगाला एक रूपेरी कडा असते असे म्हणतात आणि अशा प्रकारे मी प्रथम शाळेत जायला लागले.

आम्ही शाळेत गेल्यावर दुईशेनने आम्हाला दाट गवत अंथरलेल्या जमिनीवर बसवले आणि प्रत्येकाला एक वही, पेन्सिल व छोटे फळकूट दिले.

"तुमच्या गुडघ्यावर फळकूट ठेवा आणि त्यावर वही ठेवा म्हणजे लिहायला सोपं जाईल," त्याने समजावून सांगितले.

नंतर त्याने भिंतीवर लावलेल्या चित्राकडे बोट केले. ते एका रशियन माणसाचे चित्र होते.

"हे लेनिन," तो म्हणाला.

तो फोटो मी कधीही विसरणार नाही. काही कारणामुळे मला पुन्हा कधीही तो फोटो दिसला नाही, पण मी स्वत:पुरती त्याला अजूनही "दुईशेनचा" फोटो म्हणते. त्या फोटोत लेनिन यानी ढगळ सैनिकी जाकीट घातले होते, त्यांचा चेहरा आक्रसलेला दिसत होता व त्याना जरा लांब दाढी होती. त्यांचा जखमी हात गळयात अडकवलेला होता, टोपी कपाळावर मागे सरकवलेली होती आणि त्यांच्या बारिक डोळ्यांमध्ये शांत भाव होता. त्या डोळयांना जणू आम्हाला म्हणायचे होते: "मुलांनो, किती सुंदर भवितव्य तुमच्यापुढे आहे हे तुम्हाला माहीत असते तर!" त्या शांततेच्या क्षणी मला क्षणभर खरोखरीच असे वाटले की, ते माझ्या भवितव्याचा विचार करीत आहेत.

दुईशेनजवळ ते चित्र बरेच दिवस असले पाहिजे. पोस्टरसाठी वापरण्यात येणाऱ्या स्वस्त कागदावर ते

छापलेले होते व कोपऱ्यांना आणि घड्यांवर घासून ते फाटलेले होते. शाळेतल्या खोलीच्या भिंतीवर दुसरे काहीही नव्हते, फक्त लेनिन यांचे हे चित्र होते.

"मी तुम्हाला वाचायला आणि आकडे मोजायला शिकवीन, अक्षरे आणि आकडे कशी लिहायची ते दाखवीन," दुईशेनने आम्हाला सांगितले. "मला जेवढे माहीत आहे तेवढे सारे मी तुम्हाला शिकवीन."

त्याने खरोखरीच त्याला जेवढे माहीत होते तेवढे सारे आम्हाला शिकवले. आश्चर्य वाटावे एवढी सहनशीलता तो आमच्या बाबतीत दाखवी. पेन्सिल हातात कशी धरायची हे त्याने आमच्यापैकी प्रत्येकाला दाखवले आणि आम्हाला माहीत नसलेल्या शब्दांचा अर्थ तत्परतेने समजावून सांगितला.

त्यावेळचा विचार आता केला की, मला त्याचे खरोखरीच कौतुक वाटते. या अशिक्षित तरुण माणसाला स्वतःला धड लिहिता-वाचता येत नव्हते, त्याच्याजवळ क्रमिक पुस्तके नव्हती, प्राथमिक वाचनमालासुद्धा नव्हती, पण शाळा सुरु करण्याचे केवढे धाडस त्याने केले! खरोखरीच ही त्याची अचाट कामगिरी होती. ज्या पोरांचे बाप आणि त्यांचेही पूर्वज जन्मजात अडाणी होते अशा मुलांना शिकविण्याचा प्रयत्न करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. अर्थात, व्याकरणाचा आणि पद्धतशीर शिकवण्याचा दुईशेनला अजिबात गंध नव्हता. किंबहुना अशा काही गोष्टी अस्तित्वात आहेत याची त्याला यत्किंचित कल्पनाही नसावी.

त्याला जेवढे उत्तम जमेल त्या पद्धतीने त्याने आम्हाला शिकवले. केवळ अंतरीच्या प्रेरणेने त्याला जे आम्हाला

[illegible] वाटले ते त्याने शिकवले. पण ज्या प्रामाणिक [illegible] त्याने काम केले ते आमच्या बाबतीत वाया गेले [illegible] एवढे मी खात्रीपूर्वक सांगू शकते.

पण त्याच्या कल्पनेपेक्षाही त्याने मोठी कामगिरी बजावली [illegible]. होय, त्याने खरेच मोठी कामगिरी बजावली होती! [illegible] त्या शाळेत, त्या जुनाट मातीच्या तबेल्यातील [illegible] भगदाडांमधून आम्हाला हिमाच्छादित पर्वतशिखरे [illegible]. त्या शाळेत आम्हा किर्घिझ मुलांना, ज्यांनी कधी [illegible] वेस ओलांडली नव्हती अशा आम्हा मुलांना एकाएकी [illegible] आणि अद्‌भुत जगाचे ओझरते दर्शन घडले.

लेनिन राहतात ते मॉस्को शहर औलिआता किंवा [illegible] किती तरी पटींनी मोठे आहे हे आम्हाला तेथे [illegible] झाले. तलास्स खोऱ्याच्या आकारापेक्षा मोठे असे [illegible] जगात आहेत आणि आमच्या डोंगरांएवढ्या आकाराची [illegible] त्यांच्यामधून प्रवास करतात हे आम्ही तेथे प्रथम [illegible]. बाजारात लोक विकत घेतात ते रॉकेल पृथ्वीच्या [illegible] येते हे आम्हाला तेथे समजले. आमच्या लोकांची [illegible] जराशी सुधारली म्हणजे आमची शाळा मोठ्या [illegible] असलेल्या भल्यामोठ्या पांढऱ्या रंगाच्या इमारतीत [illegible] आणि विद्यार्थ्यांना लिहिण्यासाठी उतरती मेजे मिळतील [illegible] आमची पक्की धारणा झाली.

आमची पहिली मुळाक्षरे घटून तयार होताच आम्ही [illegible] शब्द लिहिला: "लेनिन." आमच्या राजकीय [illegible] "जमीनदार," "भाडोत्री मजूर" आणि "[illegible]" असे शब्द जमले होते. वर्ष संपण्यापूर्वी "क्रांती"

हा शब्द लिहिण्यास शिकविण्याचे दुईशेनने आम्हाला वचन दिले होते.

दुईशेन जेव्हा कथन करीत असे तेव्हा श्वेतरक्षकांविरुद्ध आम्ही त्याच्या खांद्याला खांदा लावून लढतो आहोत असे आम्हाला वाटे. लेनिन यांचे वर्णन तो इतके हुबेहूब करी, कदाचित त्याने त्याना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले असावे. त्यावेळी त्याने आम्हाला जे काही सांगितले, त्या आमच्या महान् नेत्याभोवती गुंफलेल्या दंतकथा होत्या हे आता समजते; पण त्यावेळी त्यांच्या खरेपणाबद्दल मनाला कधी शंकासुद्धा शिवली नाही. पांढरा म्हणजे पांढरा रंग हा जसा आम्ही विश्वास ठेवला, तसाच त्याच्या बोलण्यावर आम्ही विश्वास ठेवीत असू.

"तुम्ही कधी लेनिन यांच्याबरोबर हस्तांदोलन केलंय?" आम्ही त्याला एकदा विचारले.

"नाही मुलांनो, मी लेनिन याना कधीही प्रत्यक्ष पाहिले नाही," खेदाने मान हलवून तो म्हणाला आणि संकोचून त्याने एक उसासा टाकला. जणू काही त्याने आमचा अपराध केला होता.

दर महिन्याच्या अखेरीस आपल्या कामाचा अहवाल देण्यासाठी दुईशेन वोलस्तला जात असे. तो पायी जायचा आणि साधारणपणे दोन तीन दिवस दूर असायचा.

आम्हाला त्याची त्यावेळी फार आठवण येई. माझा तो मोठा भाऊ असता तरी मला एवढी आठवण आली नसती. जेव्हा काकीचे लक्ष नसे तेव्हा हळूच परसातल्या दारी जाऊन मी दूरवरच्या रस्त्यावर नजर टाकीत असे. त्या रस्त्यावरून

त्याला येताना पहायला, माझ्या काळजात ऊब आणणारे त्याचे हसणे पहायला, नवनवीन ज्ञान करून देणारे त्याचे शब्द ऐकायला माझा जीव नुसता तळमळत असायचा!

त्याच्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये मी वयाने मोठी होते. कदाचित त्यामुळे सर्वांत आधी मी शिकत असे, अर्थात तेवढे एकच कारण होते असे काही मला वाटत नाही. त्याने उच्चारलेला प्रत्येक शब्द, त्याने लिहायला शिकवलेले प्रत्येक अक्षर माझ्या दृष्टीने पवित्र होते. आणि तो शिकवीत होता त्या गोष्टी शिकण्याव्यतिरिक्त आयुष्यात त्याहून महत्त्वाचे असे दुसरे काही नव्हते. /त्याने दिलेली वही मी जपून ठेवली होती व विळ्याच्या टोकाने जमिनीवर, कोळशाने भिंतीवर आणि डहाळीने बर्फावर व धूळीत मी त्या अक्षरांना पुनःपुन्हा घटवीत बसत असे. माझ्या दृष्टीने दुईशेनपेक्षा अधिक शिकलेला आणि अधिक शहाणा माणूस अख्ख्या जगात कुणी नव्हता.

हिवाळा जवळ येत चालला होता.

पहिला हिमवर्षाव होईपर्यंत डोंगरपायथ्याशी जोराने वाहणारा लहानसा ओढा त्याच्या गुळगुळीत गोटयांच्या तळावरून आम्ही चालत जात ओलांडीत असू. पण नंतर आम्हाला बर्फाळ पाणी ओलांडत जाणे अवघड जाऊ लागले. लहान मुलांना तर फारच त्रास व्हायचा. ओढा ओलांडताना दरवेळी त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागायच्या. दुईशेन एका वेळी दोन मुलांना उचलून आता ओढा ओलांडायचा; एकाला पाठुंगळी मारायचा आणि दुसऱ्याला काखोटीला मारायचा.

आता विचार केला की, या सर्व गोष्टींवर विश्वासच बसत नाही. लोक अडाणी होते किंवा मूर्ख होते म्हणून दुईशेनला हसत असत. हिवाळा डोंगरात काढणारे व कधीतरी पिठाच्या गिरणीपर्यंत येणारे श्रीमंत लोक विशेष हेटाळणी करीत. थयथयणाऱ्या चपळ घोड्यांवरून जाताना, तांबड्या केसाळ टोप्या व मेंढ्याच्या कातडीचे कोट घातलेले हे लोक दुईशेन मुलांना घेऊन ओढा ओलांडत असताना त्याला टवकारून बघत रहायचे. ते उपहासाने खिदळायचे आणि त्याच्याकडे बोट दाखवून असे काहीतरी म्हणायचे: "अरेरे, याला मी आधी का पाहिला नाही, माझी दुसरी बायको म्हणून याचा किती छान उपयोग झाला असता!"

हास्याचा गडगडाट करीत व आमच्या अंगावर पाण्याचे आणि चिखलाचे शिंतोडे उडवीत ते घोडी उधळीत निघून जात.

त्यावेळी माझा संताप नुसता उफाळून यायचा. त्या मूर्ख माणसांच्या मागे धावत जाऊन त्यांच्या घोड्यांचे लगाम धरावेत आणि त्यांच्या शिष्ट, टवाळखोर थोबाडांवर ओरडून म्हणावेसे वाटे: "आमच्या मास्तरांबद्दल असे बोलण्याची तुमची हिंमत तरी कशी होते? तुम्ही अगदी मूर्ख, दुष्ट लोक आहात!"

पण एक मुलगी काय बोलते याची कुणी पर्वा केली असती? म्हणून मी मूकपणे कडवट अश्रू गिळून नुसती उभी रहायची. त्यांचे बोलणे आपण जणू ऐकलेच नाही असे दुईशेन दाखवायचा आणि त्या लोकांच्या अपमानकारक उद्‌गारांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करायचा. एवढेच नाही तर तो

त्याचवेळी एखादी मजेदार गोष्ट आठवून आम्हाला हसवायचा व तो प्रसंग विसरायला लावायचा.

दुईशेनने खूप प्रयत्न केले, पण त्या ओढ्यावर पूल बांधायला त्याला लाकूड मिळाले नाही. एक दिवस शाळा सुटल्यानंतर, त्याने सर्व मुलांना ओढ्यापलिकडे नेल्यावर, तो आणि मी दगडांचा व गवताचा उतार बांधायला थांबलो.

आमच्या सर्व गावकऱ्यांनी मनावर घेतले असते तर ओढ्यावर दोन-तीन झाडे आडवी टाकून पूल बांधणे ही अर्ध्या तासाची बाब होती. आपल्या मुलांसाठी त्यांनी एवढे करायला काही हरकत नव्हती. पण शाळेसारखी बाब मनावर घेण्याच्या दृष्टीने त्या काळी आमचे लोक पार अडाणी होते. दुईशेन हा महामूर्ख आहे किंवा पोरकट आहे असा त्यांचा समज होता. तुला त्यांना शिकवायचे असेल तर खुशाल शिकव, नसले शिकवायचे तर पाठवून दे परत – अशी त्यांची दुईशेनबाबत मनोवृत्ती होती. पुरुषांजवळ घोडी होती, त्यामुळे त्यांना पुलांची किंवा उतारांची गरज नव्हती. पण त्यांच्यासारखाच हा भला तरुण माणूस आपल्या मुलांना शिकवण्याची तसदी का घेतो, एवढ्या जबरदस्त अट्टाहासाने हे काम का करतो, एवढ्या सातत्याने का श्रमतो, अडचणींना, संकटांना, कुचाळक्यांना, अपमानांना का जुमानीत नाही याचा विचार करायला जरासे ते थांबू शकले असते.

ज्या दिवशी आम्ही ओढ्यात दगडांच्या पायऱ्या बांधल्या त्या दिवशी सर्वत्र बर्फ होता व पाणी इतके गार होते की, पाय ठेवताच श्वास घुसमटून जात होता. दुईशेनने ते सर्व कसे सहन केले कुणास ठाऊक – तो अनवाणी होता व न

थांबता काम करीत होता. तळाशी पाय टेकवताच गरम तापलेल्या निखाऱ्यांवर पाय ठेवल्यासारख्या वेदना व्हायच्या. मी अर्ध्या वाटेवर असतानाच एकाएकी माझ्या दोन्ही पायात गोळे आले. वेदनेने दुप्पट खाली वाकल्यानंतर मला धड हाक मारता येईना किंवा सरळ उभेही होता येईना व मी पाण्यात खाली खाली बुडत चालले. दुईशेन धावत आला. माझ्या बकोटीला धरून त्याने मला तीरावर खेचत नेले आणि अंगातला भला मोठा कोट जमिनीवर मला बसायला त्याने अंथरला. माझ्या निळ्या, बधीर पायांना त्याने चोळले, माझ्या गारठलेल्या हातांना मसाज करुन त्यावर गरम फुंकरी घातल्या.

"आल्तीनाई, माझ्या कोटात स्वत:ला गुंडाळून घे आणि थोडा वेळ इथं बस," हळुवारपणे काळजीच्या सुरात तो म्हणाला. "बाकी मी पाहून घेतो."

अखेरीस उतार बांधून पुरा झाला. दुईशेन पाण्यातून बाहेर आला आणि पायात बूट घालताना त्याने माझ्याकडे हसून पाहिले. मी त्याचा कोट अंगाभोवती गुंडाळून बसले होते.

"आता थंडी वाजत नाही ना? तू खूप छान मदत केलीस; नीट गुंडाळून घे स्वत:ला कोटात!" तो म्हणाला. थोड्या वेळानंतर त्याने मला विचारले: "आल्तीनाई, त्या दिवशी दाराजवळ जळण तू ठेवून गेली होतीस का?"

"होय," मी उत्तरले.

एक बारिकसे हसू त्याच्या ओठांच्या कोपऱ्यांवर उमटले. जणू तो स्वत:शीच म्हणत होता: "तरी मला तसं वाटलं होतंच!"

त्याला ते समजले होते, तो छोटासा प्रसंगही त्याने लक्षात ठेवला होता हे मला जाणवताच माझी कानशिले लाल झाल्याचे मला आठवते. मला खूप आनंद झाला होता, जणू मी नंदनवनात विहार करीत होते आणि माझा आनंद दुईशेनला समजला होता.

"माझ्या निर्मळ निर्झरा," आपल्या डोळयांनी मला कुरवाळीत तो म्हणाला, "तू इतकी हुशार मुलगी आहेस... जर मी तुला शहरात शिकायला पाठवलं तर किती छान होईल! केवढी मोठी व्यक्ती होशील तू!"

तो मध्येच मागे वळला आणि काठाच्या दिशेने त्याने एक पाऊल टाकले.

आतासुद्धा तो मला तसा त्या खळाळणाऱ्या ओढ्याच्या काठी, डोक्यामागे हात धरून, उंच डोंगरावरून वाऱ्याने पळवल्या जाणाऱ्या पांढऱ्या ढगांकडे चकाकत्या डोळयांनी पहाताना दिसतोय.

त्या काही मिनिटांच्या काळात तो कसला विचार करीत होता? शहरात मला शिकायला पाठवायचा? आणि त्याच्या ओव्हरकोटात स्वतःला गुंडाळून घेतलेली मी विचार करीत होते: "हा माझा भाऊ असता तर किती छान झाले असते! मी त्याच्या कुशीत शिरले असते, त्याला घट्ट मिठी मारली असती. माझे डोळे गच्च मिटून घेतले असते व अत्यंत प्रेमात लाडीगोडीने त्याच्या कानात कुजबुजले असते. देवा, त्याला माझा मोठा भाऊ कर!"

आमच्या मास्तरांच्या दयाळू स्वभावामुळे, त्यांच्या चांगुलपणामुळे, आमच्या भविष्याबाबत ते पहात असलेल्या

स्वप्नांमुळे आम्हा सर्वांनाच त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. आम्ही लहान असलो तरी त्यांच्या या गुणांची आम्हाला कदर वाटत होती. नाहीतर रोज त्या भणाणत्या वाऱ्यामध्ये, बर्फ तुडवीत, धापा टाकीत ती उंच टेकडी चढून दूरवरच्या त्या शाळेत कशाला गेलो असतो? आम्ही स्वेच्छेने शाळेत जात होतो. त्या थंडगार झोपडयात जाऊन काकडत बसायला आमच्यावर कुणीही सक्ती केली नव्हती. तिथे एवढा गारठा असायचा की, आमच्या श्वासोच्छ्वासाने तोंडावर, हातांवर व कपडयांवर हिम तयार व्हायचे. ऊब घ्यायला आम्ही आळीपाळीने शेकोटीजवळ बसायचो, तर बाकीचे त्यावेळी शांत बसून दुईशेनचे बोलणे ऐकत रहायचे.

त्या चावऱ्या थंडीच्या दिवसातील एका सकाळी—ती जानेवारी महिन्याची अखेर होती—दुईशेन आम्हाला नेहमीप्रमाणे घ्यायला आला. तो अगदी गप्प होता, त्याच्या कमानदार भुवया आक्रसल्या होत्या, त्याचा चेहरा पार काळवंडला होता व त्यावर कठोर भाव उमटला होता. त्याची ती मुद्रा जणू भाजून काढलेल्या लोखंडातून घडवल्या-सारखी दिसत होती. आमच्या मास्तरांना आम्ही असे कधी पाहिले नव्हते. काहीतरी बिनसले आहे याची आम्हाला जाणीव झाली व मुकाटपणे आमचा छोटा जथा त्यांच्या मागून जाऊ लागला.

बहुतेक वेळा वाटेवर बर्फ फार पडला असेल तर दुईशेन सर्वांपुढे चालायचा, त्याच्यामागे मी असायची आणि बाकीची मुले एका रांगेत माझ्या मागून यायची. त्या दिवशीही तो सर्वांच्या पुढे आधी गेला, कारण रात्रीच्या वेळी टेकडीच्या

पायथ्याशी बर्फाचा खूप मोठा ढीग साचला होता. /काही वेळा माणसाला पाठमोरा पाहूनही त्याची मन:स्थिती ओळखता येते./ आमच्या मास्तरांना खूप दु:ख झाले आहे हे आम्ही नावडतोब ओळखले. त्यांची मान खाली झुकली होती व मोठ्या कष्टाने पावले पडत होती. काळ्या पांढऱ्या रंगांचा तो अमंगळ देखावा आजही डोळ्यासमोर उभा राहतो: एका रांकेत आम्ही टेकडी चढत असताना माझ्यासमोर काळ्या कपड्यातल्या दुईशेनची वाकलेली पाठ होती, त्याहून उंच टेकडीवर वाकलेल्या उंटांसारखे दिसणारे पांढऱ्या बर्फाचे ढिगारे होते व घोंघावणारा वारा जणू त्यांच्या पाठीवरच्या हिमकणांचा भुगा उडवीत होता. त्याहून वर फिकट पांढऱ्या आकाशात एक एकाकी काळा ढग ओटंगला होता.

आम्ही आमच्या वर्गात आलो आणि गवतावर बसलो तरी नेहमीप्रमाणे चटकन दुईशेनने शेकोटी पेटवली नाही.

"उभे रहा," त्याने आम्हाला आज्ञा केली.

आम्ही त्याप्रमाणे उभे राहिलो.

"डोक्यावरच्या टोप्या काढा."

आज्ञाधारकपणे आम्ही आमच्या डोक्यांवरच्या टोप्या काढल्या, त्यानेही आपली टोकदार टोपी उतरवली. याचा अर्थ काय हे आम्हाला ठाऊक नव्हते. नंतर त्याने कापऱ्या, घोगऱ्या आवाजात सांगितले:

"लेनिन वारले. साऱ्या जगभरचे लोक शोक करताहेत. तुम्हीही आपल्या जागेवर उभे राहून न बोलता दुखवटा व्यक्त केला पाहिजे. या त्यांच्या चित्राकडे पहा. हा दिवस लक्षात ठेवा."

आमचा वर्ग जणू बर्फात गाडला गेल्यासारखा शांत झाला. भिंतींच्या फटींमधून घुसणाऱ्या वाऱ्याचा आवाज आम्हाला ऐकू येत होता. हिमकण गवतावर पडल्यानंतर गवताची होणारी सळसळही आम्हाला ऐकू येत होती.

गजबजलेली शहरे जेव्हा मूक झाली, पृथ्वीला हादरवून टाकणाऱ्या कारखान्यांचा घरघराट जेव्हा थांबला, गडगडाट करीत जाणाऱ्या आगगाड्या जेव्हा रूळांवर थांबल्या, साऱ्या जगाने शांत राहून जेव्हा शोक केला त्या शोकसमयी आम्हीही – लोकांच्या एका भागाच्या एका कणाने – आमच्या मास्तरांबरोबर त्या गारठलेल्या खोपटातल्या शाळेत गंभीर शांततेने उभे राहून लेनिन यांचा निरोप घेतला. आमच्या इतके जणू त्यांच्याजवळचे दुसरे कुणीच नव्हते आणि त्यांच्या मृत्यूने आमची झाली तेवढी कुणाचीच हानी झाली नाही अशी आमच्या अंतःकरणांमध्ये प्रामाणिक भावना होती. आणि ढगळ जाकीटातले, एक हात गळयात अडकवलेले आमचे स्वतःचे लेनिन नेहमीप्रमाणेच आपल्या नितळ, प्रामाणिक नजरेने जणू बोलल्यासारखे भासत होते : "मुलांनो, किती सुंदर भवितव्य तुमच्यापुढे आहे हे तुम्हाला माहीत असते तर!" आणि त्या निःस्तब्ध क्षणी मला वाटले की, ते खरोखरीच माझ्या भवितव्याचा विचार करीत आहेत.

दुईशेनने हाताच्या बाहीने आपले अश्रू पुसले व तो म्हणाला :

"मला वोलस्तला जायला पाहिजे. मी पक्षात नाव दाखल करतोय. तीन दिवसानी मी परत येईन."

त्या तीन दिवसात एवढी कडाक्याची थंडी पडली की, अशी दुसरी थंडी माझ्या तरी आठवणीत नाही. जणू काही त्या महापुरुषाच्या निर्वाणामुळे जगात निर्माण झालेली पोकळी निसर्गातील अज्ञात अशा प्रचंड सामर्थ्यवान शक्ती भरून

काढू पहात होत्या. घळींमधून सोसाट्याचा वारा अखंड घुमत होता, हिमवादळे घोंघावत होती आणि दाट धुके थिजले होते... पंचमहाभूते खवळली होती, पिसाटवारा हिमकणांना सन्नाट भिरकावून देत होता आणि सारी भूमी घुसळून काढीत होता...

काळे ढग खूप खालपर्यंत डोंगरांवर ओठंगले होते व त्या धूसर, अस्पष्ट डोंगरपायथ्याशी आमचे खेडे अंग चोरल्यासारखे चिडीचुप्प बसले होते. चिमण्यांमधून धुराच्या बारिक रेषा उमटत होत्या. लोक घरांमध्ये बसून होते. या सगळ्या थैमानात भर म्हणून की काय, लांडगे पिसाळले होते. दिवसाढवळ्या ते रस्त्यावर येत होते, रात्रीच्या काळोखात खेड्याच्या भोवती घिरट्या घालीत होते आणि रक्त गोठवणारे त्यांच्या ओरडण्याचे आवाज अगदी सूर्योदयापर्यंत ऐकू येत होते.

मला आमच्या मास्तरांची काळजी वाटत होती. थंडी तर कडाक्याची पडली होती आणि त्यांच्याजवळ केसाळ गरम कोट नव्हता, नुसता साधा लष्करी कोट होता. त्यांच्या परत येण्याच्या दिवशी मी कमालीची अस्वस्थ झाले. आगामी संकटाची मला चाहूल लागत असावी. रस्त्यावरून येताना ते दृष्टीस पडावे म्हणून एकाकी, बर्फमय स्तेपवर मधूनमधून मी घरातून हळूच बाहेर पडून एक चोरटी नजर टाकीत होते. पण रस्त्यावर चिटपाखरू दिसत नव्हते.

"मास्तर, तुम्ही कुठं आहात हो? मी तुमची विनवणी करते. जास्त वेळ लांब राहू नका, लौकर परत या! आम्हाला तुमची फार आठवण येते, माझा आवाज तुम्हाला

ऐकू येतोय काय? आम्हाला तुमची फार आठवण येते!"

पण माझ्या मूक रूदनाची त्या स्तेपला कुठली पर्वा! मी का रडत होते ते माझे मलाच समजत नव्हते.

माझ्या सारख्या आत-बाहेरच्या येरझाऱ्यांनी काकी मात्र खूप चिडली.

"त्या दाराला जरा विसावा दे! बैस एका जागी आणि सूत काढायचं काम कर. असं सारखं दार उघडं टाकून सगळ्यांना गारठवून मारायचा विचार आहे काय टवळे! पुन्हा बाहेर जा तर खरी!" माझ्यावर दात-ओठ खाऊन, हाताच्या मुठी वळून ती ओरडली आणि पुन्हा मला तिने बाहेर जाऊ दिले नाही.

एव्हांना चांगलाच अंधार पडू लागला होता आणि दुईशेन परत आला की नाही ते मला माहीत नव्हते. या अनिश्चित मन:स्थितीमुळे मी वेडीपिशी झाले. एक मिनिटाला मी माझी मलाच सांगायची की, तो सुरक्षित परत आला असणार, कारण ज्या दिवशी तो परत येण्याचे वचन देतो ते वचन त्याने आजवर कधीही मोडलेले नाही. पण दुसऱ्याच मिनिटाला माझ्या कल्पनेची भरारी सैरावैरा धावू लागायची: तो आजारी आहे, त्याची चाल मंद आणि कष्टाने होते आहे, बर्फाचे वादळ सुरू झाले तर स्तेपमध्ये तो वाट चुकेल. मी कामावर लक्ष केंद्रित करू शकत नव्हते, माझी सारी बोटे बधीर झाल्यासारखी वाटत होती, धागा सारखा तुटत होता आणि त्यामुळे काकी अधिकच संतापत होती.

"आज तुला झालंय तरी काय? तुझे हात काय लाकडाचे आहेत?" तिने माझ्याकडे रोखून पाहिले आणि

तिच्या रागाचा पारा आणखीच चढला. अखेरीस तिची सहनशक्ती तुटली व ती बेभान होऊन ओरडली: "परमेश्वरा, ही प्लेगनं मरत का नाही? ही पिशवी घे नि सैकल आजीला नेऊन दे, पळ, काळं कर इथून!"

मी मात्र आनंदाने उडी मारली. सैकल आजीच्या घरातच एका खोलीत दुईशेन रहात होता. सैकल आजी आणि तिचा म्हातारा कर्तनबे हे म्हातारे जोडपे माझ्या आईकडून दूरच्या नात्याचे होते. एकेकाळी मी त्यांच्याकडे वारंवार भेटायला जायची आणि काहीवेळा रात्रीची तेथेच रहायची. कदाचित माझ्या काकीला या गोष्टीची आठवण झाली किंवा परमेश्वराने तिच्या मनात तसा विचार आणून सैकल आजीकडे मला धाडवले.

"दुष्काळात लोकांना जशी ओटच्या पिठाची शिसारी येते तशी मला तुझी शिसारी आलीय. तुला त्यांनी रहायला सांगितलं तर रात्रीची तिथंच रहा. चालती हो आणि तुझं थोबाड लौकर दाखवू नको मला!"

मी घाईने निघाले. जादूटोणा करणाऱ्या मांत्रिकाच्या आवाजासारखा वारा घुमत होता. संतापाचा अतिरेक होऊन तो क्षणभर नि:स्तब्ध व्हायचा आणि दुसऱ्याच क्षणी अचानकपणे पुन्हा हल्ला चढवून तापलेल्या चेहऱ्यावर बचकभर ओल्या चिकट बर्फाचा मारा करायचा. काखोटीला पिशवी मारून मी खेड्याच्या दुसऱ्या टोकाला धावतच निघाले. धावताना बर्फात उमटलेल्या घोड्याच्या टापांच्या ताज्या खुणा मी पहात होते. एकच विचार माझ्या मनाला सारखा सतावीत होता: "तो परत आला का?"

तो परत आलेला नव्हता. घुसमटल्या अवस्थेत, धापा टाकीतच मी घरात घुसले तेव्हा बिचारी सैकल आजी घाबरून गेली.

"अगं काय झालं काय?" घाबरून ती ओरडली. एवढी धावत का आलीस? कुठलं संकट कोसळलं तुझ्यावर?"

"नाही, काही संकटबिंकट नाही. मी तुझी पिशवी परत द्यायला आलेय. आज मी रात्रीची तुझ्याबरोबर राहू का?"

"खुशाल रहा माझ्या बाळे! कारटे, केवढं घाबरवलंस मला! फारा दिवसात आली नाहीस आम्हाला भेटायला. ये, इथं अशी जरा आगीजवळ बैस, पार गारठून गेलीयस."

"म्हातारे, भांड्यात थोडं मटण शिजायला ठेव. पोरीला जरा चांगलंचुंगलं खायला दे. लौकरच दुईशेनसुद्धा घरी येईल..." कर्तनबे म्हणाले. खिडकीशी बसून ते आपल्या केसाळ बुटांना नवा तळ बसवीत होते. "खरं म्हणजे दुईशेन केव्हाचा घरी यायला पाहिजे होता, पण काळजी करायचं काही कारण नाही. रात्र पडायच्या आधी तो परत येईल. आमची म्हातारी घोडी घरी परतताना चौखूर दौडते."

हळूहळू खिडक्यांवर रात्रीचा काळोख दाटला. माझा सारा जीव एकवटून दुईशेनची चाहूल घेत होता. दरवेळी कुत्रा भुंकला किंवा बाहेरून कुणाचा आवाज आला म्हणजे काळजाचा ठोका चुकायचा. पण दुईशेनचा पत्ता नव्हता. सैकल आजी खूप बडबडी होती हे एकापरीने बरे होते. तिच्या सतत चालणाऱ्या टकळीमुळे वाट पाहणे सुसह्य झाले होते.

आम्ही त्याची वाट पहात बसून राहिलो होतो. अखेरीस मध्यरात्री कर्तनबेनी झोपायचे ठरवले.

“म्हातारे, बिछाने घाल,” ते म्हणाले. “तो काही आज रात्री येत नाही. आता खूप उशीर झाला. अधिकारी माणसं कामात असतात, त्याला कामामुळे अडकून पडावं लागलेलं दिसतंय. नाहीतर तो केव्हाचा परतला असता.”

म्हातारेबाबा झोपायच्या तयारीला लागले.

चुलीच्या मागेच एका कोपऱ्यात माझा बिछाना घातला होता. पण मला झोप येत नव्हती. कर्तनबे सारा वेळ खोकत होते, एकसारखे या कुशीवरून त्या कुशीवर वळत होते आणि तोंडाने सतत प्रार्थना पुटपुटत होते.

“माझ्या म्हाताऱ्या घोडीचं काय झालं असेल?” चिंतेच्या स्वरात ते अस्पष्टपणे उद्गारले. “आजकाल गवताची एक काडी कुणी फुकट देणार नाही आणि पैसे देऊनही ओट विकत मिळत नाही.”

लौकरच ते झोपले. आता घोंघावणारा वारा मला जागा ठेवीत होता. छपराशी तो झोंबायचा, वळचणीच्या गवताशी [illegible]टायचा आणि आपल्या राकट हातांनी खिडकीची तावदाने [illegible]चा. बाहेरच्या भिंतींवर तो भिरकावत असलेल्या [illegible] आवाज मला ऐकू येत होता.

डुंगेनचे सारे काही ठीक आहे हा कर्तनबे यांचा विश्वास मला काही स्वस्थ करीत नव्हता. मी त्याची वाट पहात होते, माझे सारे विचार त्याच्याभोवती एकवटले होते – बर्फाने [illegible]ल्या स्तेपमधून झोंबऱ्या वाऱ्याशी झगडत येणाऱ्या त्या एकाकी आकृतीकडे माझे सारे ध्यान लागले होते. मला डुलकी लागली असावी, कारण एकदम धक्क्याने मी दचकून [illegible] झाले. जमिनीपासून एक गेंगाणी दीर्घ किंकाळी उमटली

व बराच वेळ हवेत घुमत राहिली. लांडगे! आणि एक नव्हे तर अनेक. वेगवेगळ्या दिशांनी एकमेकांना बोलावून ते एकवटत होते. त्यांच्या त्या केकाटण्यामधून एक लांबलचक, भेसूर आरोळी उमटत होती व वाऱ्याच्या झोतांबरोबर ती जवळ-दूर ऐकू येत होती. काही वेळा तर लांडगे घराच्या अगदी बाहेरच उभे आहेत असा भास होत होता.

"बर्फाचं वादळ होणार म्हणून ते ओरडताहेत," म्हातारी अस्फुट आवाजात म्हणाली.

कर्तनबे काहीच म्हणाले नाही, ते अगदी कान देऊन बाहेरच्या आवाजांचा मागोवा घेत होते.

"नाही, या ओरडण्यामागं काहीतरी कारण आहे. ते कुणाचा तरी पाठलाग करताहेत. कुणा एखाद्या माणसावर किंवा घोड्यावर ते अगदी जवळून तुटून पडताहेत. ऐकलंस त्यांना? हा दुर्दैवी नसावा एवढीच माझी प्रार्थना आहे. कशाचीच भीती वाटत नाही त्या तरुण मूर्खाला." त्या धास्तावलेल्या अवस्थेत कर्तनबे अंधारातच आपला केसाळ कोट चाचपडू लागले. "म्हातारे, दिवा लाव. मेहरबानी करून घाई कर!"

मी आणि सैकल आजी ताबडतोब उठलो. आम्ही भीतीने थरथर कापत होतो. दिवा शोधून तो पेटवायला तिला एक दोन क्षण लागले. आणि एकाएकी ओरडणे थांबले. तो आवाज इतना अचानक थांबला की जणू काही कधी उमटलाच नव्हता.

"त्यांनी अखेर हल्ला केला, हलकट साले!" कर्तनबे ओरडले.

कुबडी उचलून ते गडबडीने दाराकडे निघाले, पण त्याच नेमक्या क्षणाला त्यांच्या कुत्र्यांनी भुंकायला सुरुवात केली.

कुणीतरी खिडकीजवळून झपाट्याने गेले व नंतर दारावर धक्के बसायला सुरुवात झाली.

खोलीत वाफेचा ढग उमटला. तो विरला तेव्हा आम्हाला दुईशेन दिसला. तो अडखळत आत आला, त्याला धाप लागली होती, त्याचा चेहरा काळाठिक्कर पडला होता व भिंतीचा आधार घेऊन तो कसाबसा उभा होता.

"बंदुक," त्याने कसाबसा एक शब्द उच्चारला.

पण आम्ही अत्यंत भेदरून गेल्याने त्याचे बोलणे आम्हाला समजलेच नाही. माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली आणि जणू स्वप्नामधून दोन म्हातारी माणसे बडबडताना ऐकू येऊ लागली:

"काळं बकरं बळी देतो, पांढरं बकरं बळी देतो! बॉबे-इन देव तुला सुरक्षित राखो! तूच आहेस का खरोखर?"

"बंदुक... मला बंदुक द्या!" दुईशेनने पुन्हा तेच शब्द उच्चारले.

"आमच्याजवळ बंदुक नाही, तू कुठं निघालास?" दुईशेनला थोपवून धरण्यासाठी कर्तनबे व म्हातारी अशी दोघे त्याला बिलगली.

"मग काठी द्या."

"आम्ही तुला जाऊ देणार नाही, आमच्या जीवात जीव असेपर्यंत आम्ही तुला जाऊ देणार नाही!" म्हाताऱ्या आजीने त्याची विनवणी केली. "तुला आम्हाला प्रथम ठार मारावे लागेल!"

भयंकरकरीत्या माझे सारे शरीर लुळेपांगळे पडले व एकही शब्द न उच्चारता मी तेथे मुकाट पडून होते.

"अगदी दाराशी त्यांनी मला गाठलं," दुईशेन मोठ्याने उसासा टाकून म्हणाला आणि हातातला चाबूक त्याने कोपऱ्यात

फेकला. "घोडी आधीच धावत सुटली होती आणि मग त्या लांडग्यानी तिचा पाठलाग चालू केला. ती खेड्यापर्यंत कशीबशी पोचली आणि कोसळली. म्हणून ते तिचे लचके तोडायला धावले."

"घोडी गेली तर जाऊ दे, तू सुखरूप राहिलास आणि हेच आम्हाला खूप आहे. घोडी पडली नसती तर त्यांनी तुलाही सोडले नसते. बोंबेदिन देवाची कृपा म्हणून सारं ठीक झालं. कपडे बदल आणि थोडा आगीजवळ बैस. थांब, मी तुझे बूट काढतो," दुईशेनभोवती घुटमळत कर्तनबे म्हणाले. "म्हातारे, काय खायचं असेल ते लौकर गरम कर."

ते दोघे पुरुष आगीसमोर बसले.

"ठीक आहे, जे घडायचे होते ते घडले," उसासा टाकून कर्तनबे म्हणाले. "तुला परत निघायला एवढा उशीर का झाला?"

"माझ्या कल्पनेपेक्षा सभा फार वेळ चालली. भाऊसाहेब, मी पक्षात दाखल झालोय."

"छान केलंस. पण उद्या सकाळी तुला निघता आलं असतं. तुला तिथून कुणी काठी ढोसून हुसकून तर लावलं नसतं, काय?"

"मी आज परत येईन असं मुलांना वचन दिलं होतं," दुईशेन म्हणाला: "उद्या सकाळी ती शाळेला येणार."

"काय महामूर्ख आहेस!" कर्तनबे रागाने कडाडले. "म्हातारे, ऐकलंस, त्या कारट्यांना दिलेलं वचन पुरं करण्यासाठी यानं आपला जीव धोक्यात घातला! आहे की नाही शहाणा! आणि काय रे, तू जर आज जिवंत राहिला

नसतास तर काय? मूर्खा, किती आचरटासारखं तू बोलतोयस याची तुला कल्पना आहे का?"

"भाऊसाहेब, ते माझं कर्तव्य आहे, माझं काम आहे. घोडी गेली याचं मला वाईट वाटतं. मी नेहमी पायी जायचा, तसंच याही वेळी जायला पाहिजे होतं. पण केवळ त्या लांडग्यांना खायला घालायला मी तुमची घोडी घेऊन गेलो असं झालं..."

"विसरून जा. ती म्हातारी घोडी गेली जहन्नम्‌मध्ये! तुझ्या भल्यासाठी मी तिचा देवाला बळी दिला असं समज," म्हातारा तावातावाने म्हणाला. "साऱ्या आयुष्यभर मी घोडा नसलेला शेतकरी होतो, तेव्हा काळजी करू नको, माझं मी जमवीन. सोविएत सत्ता भक्कम उभी राहिली तर मला दुसरं घोडं मिळेल."

"अगदी खरं बाबा," पाणावलेल्या डोळ्यांनी सैकल आजी भरल्या आवाजात म्हणाली. "आम्हाला दुसरी घोडी मिळेल... घे मुला, अन्न गरम आहे तोवर चटचट खाऊन घे."

नी सर्व गप्प राहिली.

आगीमधली राख झटकीत कर्तनबे खेदाच्या सुरात म्हणाले, "दुइशेन, मला समजतच नाही तू. तू काही मूर्ख मनुष्य नाहीस, उलट चांगला हुषार, डोकेबाज माणूस आहेस. त्या नव्वं मुलांना बरोबर घेऊन हा शाळेचा उपद्व्याप कशासाठी लावला आहेस? यापेक्षा चांगलं काम तुला सापडत नाही? समजा, उद्या तू जर कुणाच्या मेंढ्या राखायचं काम पत्करलंस तर छान आरामात राहशील..."

"भाऊसाहेब, तुम्ही माझ्या भल्याच्या इच्छेनं बोलताहात हे मी जाणतो. पण ही मूर्ख पोरं उद्या मोठी झाल्यावर

तुमच्यासारखाच विचार करू लागली आणि या शाळेचा, या शिक्षणाचा काहीही उपयोग नाही असं त्यांना वाटू लागलं, तर सोविएत राज्य फार लांबचा पल्ला गाठणार नाही. तुम्हाला भक्कम उभं रहायची, अखेरपर्यंत उभं रहायची इच्छा आहे ना? आणि म्हणून भाऊसाहेब, हा त्रास सहन करायला मला दु:ख वाटत नाही. फक्त मला याहून अधिक चांगलं शिकवता यावं, बस्स! त्यापलिकडे दुसरी काहीही इच्छा नाही. लेनिन काय म्हणाले होते माहीत आहे..."

"एक मिनिटभर मी काय म्हणतो ते ऐक," कर्तनबेनी त्याचे बोलणे मध्येच तोडले, क्षणभर विचार केला व ते पुढे म्हणाले: "तू एवढं दु:ख करतो आहेस, पण अश्रू काही लेनिनना परत आणणार नाहीत हे तुला माहीत आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे त्यांना परत आणू शकेल अशी एकही शक्ती या पृथ्वीवर नाही. दुसऱ्यांना त्यांच्या निधनाचं तुझ्यासारखं दु:ख झालंच नाही असं वाटतं तुला? या इथं, माझ्या फासळ्यांच्या खाली माझं काळीज धुमसतंय आणि धूर कडवट आहे. तुझ्या राजकारणाशी हे कितीसं जुळतं मला ठाऊक नाही, पण लेनिन यांच्यासाठी मी दिवसातून पाच वेळा प्रार्थना करतो, ते दुसऱ्या धर्माचे असले तरी! दुईशेन, काही वेळा मला असं वाटतं की, तू आणि मी एवढं अश्रू ढाळायचं काही कारण नव्हतं. माझ्या पद्धतीनं मी हा असा विचार करतो. लेनिन यांची आठवण लोकांच्या काळजात कायमची राहिली आहे, ते लोकांमध्येच राहिले आहेत आणि ही आठवण बापापासून मुलाकडे सोपवली जाणार, ती रक्तात भिनली आहे..."

"भाऊसाहेब, तुमच्या या शब्दांनी मला खूप धीर आला. मी तुमचा ऋणी आहे. तुमचे विचार बरोबर आहेत. लेनिन आपल्याला सोडून गेले, पण आपण आपलं जीवन त्यांच्या-सारखं घडवू."

त्यांचे संभाषण ऐकता ऐकता मी त्या दूर अंतरावरून हळूहळू परत ठिकाणावर येत असल्याचे मला जाणवले. प्रथम ते सारे स्वप्नासारखे भासले. दुईशेन सुखरूप खरोखरीच परत आला आहे यावर माझा माझ्यावरच विश्वास बसेना. आणि मग वसंतामधल्या पुरासारखी उसळून ओसंडणारी अनिर्बंध आनंदाची ऊर्मी अंतःकरणात उमटली व मी हुंदके देऊ लागले. क्वचित असा आनंद पूर्वी कुणीच अनुभवला नसावा. त्या काही मिनिटांपुरते काहीही अस्तित्वात नव्हते: ज्या मातीच्या [illegible] मी होते ती झोपडी नव्हती, किंवा बाहेर घोंगावणारे हिमवादळ नव्हते किंवा कर्तनबेच्या एकमेव घोडीचे [illegible] तुकडे तुकडे करणारा लांडग्यांचा कळप नव्हता. काहीही नव्हते! माझ्या अंतःकरणात, माझ्या मनात, माझ्या सर्वांगात फक्त एक अवर्णनीय आनंद जाणवत होता. त्या आनंदाला अंत नव्हता, प्रकाशाप्रमाणेच त्याचे मोजमाप करणे शक्य नव्हते. मी घोंगडी डोक्यावर ओढून घेतली आणि माझे हुंदके कुणाला ऐकू येऊ नयेत म्हणून तोंडावर हात दाबून धरले. पण दुईशेनला माझे हुंदके ऐकू गेले.

"चुलीमागं कोण रडतंय?" त्याने विचारले.

"ती आल्तीनाई, पोर घाबरली म्हणून रडतेय," सैकल काकी त्याला म्हणाली.

"आल्तीनाई इथं आहे?" दुईशेन चटकन उठून माझ्या-कडे आला. माझ्याशेजारी गुडघ्यावर बसून माझ्या खांद्याला

स्पर्श करीत तो म्हणाला: "काय झालं आल्तीनाई? तू का रडतेस?"

मी भिंतीकडे तोंड वळवले आणि आता हमसाहमशी रडू लागले.

"रडू नको, सोनुली. कशाला घाबरलीस एवढी? तू मोठी मुलगी आहेस, तू असं रडायचं नाही... हे बघ, माझ्याकडं बघ..."

मी त्याला घट्ट मिठी मारली, माझा अश्रूंनी ओला झालेला तापलेला चेहरा त्याच्या गळ्यात खुपसला आणि अनावरपणे हुंदके देऊन रडू लागले. आनंदातिशयाने मला कणकण भरली होती, आनंद माझ्यात मावत नव्हता.

"पोरीचं काळीज लकाकलं वाटतं," काळजीच्या सुरात कर्तनबे म्हणाले आणि घोंगडी बाजूला करून उभे राहिले. "चल म्हातारे, लौकर मंत्र म्हण. उशीर करू नको."

ते सारे माझ्याभोवती घोटाळू लागले. सैकल आजीने मंत्राचे शब्द उच्चारले, माझ्या तोंडावर गार आणि गरम पाण्याचे शिंतोडे उडवले आणि आपले अश्रू माझ्या डोळ्यातल्या पाण्यात मिसळवले.

शब्दात मांडता येणार नाही अशा प्रचंड आनंदामुळे माझे काळीज "लकाकले" आहे हे त्यांना समजले असते तर किती बरे झाले असते!

माझ्या तापल्या कपाळावर आपला थंड हात हळुवारपणे फिरवीत मी शांत होऊन झोपी जाईपर्यंत दुईशेन माझ्या बिछान्याशेजारी बसून राहिला.

* * *

डोंगरांच्या दुसऱ्या दिशेला हिवाळा सरकला. वसंतामधील वारे वाहू लागले होते. वितळलेल्या बर्फामुळे फुगलेल्या पठारजमिनीवरील गरम वारे डोंगरांच्या दिशेने वहात होते. या वाऱ्यांच्या झोताबरोबर पृथ्वीचा वसंतगंध येत होता, नव्या कोऱ्या दुधाचा गंध येत होता. बर्फाचे ढीग दबले, पर्वतावरील बर्फाला तडे गेले, निर्झर मंजुळ ध्वनी करीत धावू लागले आणि धावता धावता एकमेकात मिसळून त्यांचे प्रचंड, प्रवाही नद्यांमध्ये रूपांतर होऊ लागले. वाटेत येणाऱ्या सर्व गोष्टींना आपल्या प्रवाहाबरोबर सामावून घेत या नद्या दुथडी भरून वाहू लागल्या व धुऊन निघालेल्या घळी त्यांच्या मादक गीताने गुंजू लागत.

कौमार्यावस्थेतील माझा तो पहिलाच वसंत असावा. तोपर्यंत तरी एवढा सुंदर वसंत ऋतू मला कधीच भासला नव्हता. टेकडीच्या माथ्यावरून निर्झरांचे जग फार सुंदर दिसे. आपले हात पसरून डोंगरउतारावरून ते भरधाव खाली झेप घेताना दिसत आणि वेग अनावर होऊन रूपेरी जाळीदार पडद्याआड झगमगणाऱ्या सूर्यप्रकाशित स्तेपमध्ये उडी घेत. कुठेतरी दूरवर तुम्हाला वितळणाऱ्या तळ्याची निळाई ओझरती दिसे, असेच कुठेतरी दूरवरचे घोड्यांचे खिंकाळणे ऐकू येई, आकाशातून बगळे उडत जाताना दिसत व पांढरे ढग जणू ते आपल्या पंखांबरोबर वाहून नेत. ते कुठून येत आणि आपल्या सतत विरहव्याकुळ ओरडण्याने कुठे चलण्यासाठी तुम्हाला ते साद घालीत?

वसंताच्या आगमनाबरोबर आयुष्याला नवा मजेदार रंग भरत असे. आम्ही नवे नवे खेळ शोधून काढले, केवळ

जगण्याचा आनंद एवढा सुंदर होता की, आम्ही सतत खळाळून हसत होतो आणि शाळा सुटल्यावर आरडाओरडा करीतच आमच्या स्वाऱ्या घराकडे परतत होत्या. माझा आनंद बघून माझ्या काकीला मात्र राग यायचा आणि माझ्यावर शिव्यांची लाखोली वहायची एकही संधी ती सोडीत नसे.

"असलं खिदळणं आता तुला शोभतं का मूर्खे? एवढी घोडी वाढलीस पण त्याची काही शरम वाटत नाही तुला! तुझ्या वयाच्या दुसऱ्या पोरींची केव्हाच लग्नं झाली आणि एव्हांना त्यांना पोरंही झाली नि तू... नुसता वेळ घालवतेय, शाळेत जातेय! हरकत नाही, अजून मी तुला वठणीवर आणीन..."

अगदी खरे सांगायचे तर माझ्या काकीच्या धमकावण्या मी कधीच मनावर घेतल्या नाहीत. तिच्या शिव्यांची मला सवय झाली होती. शिवाय मला वय वाढलेली घोडी म्हणणे काही बरोबर नव्हते. त्या वसंतात माझी उंची थोडी वाढली होती एवढेच.

"तू अजून झिपऱ्या लहान मुलीसारखी आहेस," दुईशेन हसून मला म्हणत असे. "आणि तुझे केसही तांबूस पिवळसर झालेत."

पण मला त्याच्या या बोलण्याचे काही वाटत नसे. "माझे केस आत्ता विस्कटलेले असतात हे मला ठाऊक आहे, पण ते तांबूस पिवळे राहणार नाहीत," मी स्वत:शीच म्हणत असे. "मी आणखी थोडी मोठी झाले व खरीखुरी नवरी बनले म्हणजे अशी दिसणार नाही. मी किती सुंदर दिसेन हे काकी नुसती बघत राहील. माझे डोळे ताऱ्यांसारखे तेजस्वी

आहेत आणि चेहरा ठसठशीत रेखीव आहे असं दुईशेन म्हणतो."

एके दिवशी शाळेतून परतत असताना आमच्या अंगणात दोन नवखे घोडे लगाम बांधून उभे केलेले मला दिसले. खोगीर आणि घोड्यांचा एकूण सरंजाम पाहता घोडेस्वार पहाडातून आले असावेत. पहाडातील काही माणसे धान्य दळून घेण्यासाठी गावात येत किंवा बाजाराहून परत जात तेव्हा माझ्या काका-काकींना घटकाभर भेटून जात असत.

दारात असतानाच माझ्या कानांवर माझ्या काकीच्या वेडसर हसण्याची लकेर आदळली व माझ्या अंगावर एकदम काटा उभा राहिला.

"माझ्या लाडक्या भाच्या, घाबरू नको, एवढ्यानं तुला काही होणार नाही," तिचे बोलणे मी ऐकत होते. "पण एकदा का ते छोटं कबूतर तुझ्या पंजात आलं म्हणजे माझे किती आभार मानावे हे तुला समजायचं नाही."

तिच्या या शब्दांवर हसण्याचा व पसंतीच्या आरोळ्यांचा एकच कल्लोळ उडाला, पण ज्या क्षणी मी आत गेले त्या क्षणी ते सारे एकदम गप्प झाले. गालिचावर एक लठ्ठ, बुटका, तांबड्या रटरटीत चेहऱ्याचा माणूस बसला होता. त्याच्या समोर टेबलावर रुमाल अंथरला होता. आपल्या तांबड्या केसाळ टोपीखालून त्याने तिरकस नजरेने एकदा माझ्याकडे पाहिले, नंतर टोपी आपल्या घामेजल्या कपाळावर खाली ओढून घेतली, घशात तो खाकरला व त्याची नजर खाली झुकली.

"अगबाई, तू परत आलीस का एवढ्यात, ये माझी सोनुली ती," ढोंगीपणाने मायेचे नाटक करीत काकी म्हणाली.

गालिचाच्या एका टोकाला आणखी एका नवख्या माणसा-बरोबर काका बसला होता. ते पत्ते खेळत होते, दारू पीत होते व सागुती खात होते. दोघेही पुरे झिंगले होते आणि जेव्हा पत्ते खाली टाकत तेव्हा त्यांची डोकी मूर्खासारखी डुलत रहात.

आमची मांजरी टेबलावर हळूच आली, पण त्या तांबड्या चेहऱ्याच्या माणसाने तिच्या टाळूवर आपल्या नख्यांनी एवढ्या जोरात मारले की, वेदनेने विव्हळत ती एकदम दूर पळाली व लांबच्या कोपऱ्यात दडून बसली. बिच्चारी मांजरी, त्याने तिला केवढ्या जोरात मारले! मला तिथून निसटायचे होते, पण कसे जावे ते समजत नव्हते. माझी काकी माझ्या मदतीला धावून आली.

"मुली, भांड्यात सारं जेवण आहे, गार होण्यापूर्वी पटकन खाऊन घे," ती मला म्हणाली.

मी तिथून आनंदाने पळाले, पण माझ्या काकीच्या या अचानक प्रेमळ वागण्याने मी चिंतेत पडले व सावध झाले.

दोन तासानंतर ती दोन माणसे घोड्यांवर बसून पहाडाकडे निघून गेली. माझ्या काकीने तावडतोब नेहमीप्रमाणे माझ्यावर शिव्यांची लाखोली सुरू केली आणि माझ्या मना-वरचा ताण एकदम कमी झाला. "ती झिंगली होती म्हणून लाडात बोलली असावी," असा विचार मनात आला.

त्यानंतर काही दिवसांनी सैकल आजी माझ्या काकीला भेटायला आली. मी अंगणात होते पण म्हातारीचे बोलणे मला ऐकू येत होते:

"तुझं डोकं ठिकाणावर आहे का? तिच्या आयुष्याची तू नासाडी करतेयस!"

त्या दोघी कशाबद्दल तरी जोरजोराने वाद घालीत होत्या, दोघी एकाचवेळी एकमेकींवर ओरडू लागत. सैकल आजी घराबाहेर आली तेव्हा चांगलीच संतापलेली होती. तिने माझ्याकडे नजर टाकली तेव्हा त्या नजरेत राग आणि करूणा असे दोन्हीचे मिश्रण होते. माझ्याशी एक अक्षरही न बोलता ती निघून गेली. तिच्या त्या नजरेने मी अस्वस्थ झाले. मी तिची नाराजी कशामुळे ओढवून घेतली, असे चमत्कारिक नजरेने तिने माझ्याकडे का पाहिले?

दुसऱ्या दिवशी सकाळी मी शाळेत गेले तेव्हा दुईशेन दु:खी-कष्टी आणि काळजीत असलेला माझ्या ताबडतोब लक्षात आला. पण आपली मन:स्थिती आमच्यापासून लपवून ठेवायचा तो प्रयत्न करीत होता. आणि दुसरी गोष्ट माझ्या लक्षात आली की, माझ्याकडे पहायचे तो टाळतोय. शिकणे संपल्यानंतर आम्ही सारे जेव्हा दाराबाहेर गर्दीने जायला निघालो तेव्हा दुईशेनने मला परत आत बोलावले.

"आल्तीनाई, जरा थांब, माझ्याकडे एकटक पहात व माझ्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला. "घरी जाऊ नकोस. का ते तुला ठाऊक आहे आल्तीनाई?"

माझे रक्त एकदम गोठल्याचा मला भास झाला. माझ्या काकीला माझे काय करायचे होते याचा आत्ता माझ्या डोक्यात प्रकाश पडला.

"तुझं उत्तर मी स्वत: त्यांना देईन," दुईशेन म्हणाला. "तू तात्पुरती आमच्याजवळच रहा. आणि नेहमी माझ्या जवळपास रहा."

माझी भीती पूर्णांशाने चेहऱ्यावर उमटली असावी. दुईशेनने नाजुक बोटांनी माझी हनुवटी हळूच वर उचलली

आणि माझ्या डोळ्यात थेट पाहून आपले नेहमीचे हास्य केले.

"आल्तीनाई, घाबरू नको," तो हसून म्हणाला. "मी तुझ्याबरोबर असताना तुला भ्यायचे काही एक कारण नाही. जशी नेहमी वागतेस तशीच वाग, अभ्यास कर, शाळेला ये आणि बाकी सारं काही विसरून जा. तू किती भित्री आहेस ते मला माहीत आहे... होय, मला तुला हे एकदा सांगायचं होतं," काहीतरी गंमत आठवल्यासारखे होऊन पुन्हा हसून तो म्हणाला, "त्या दिवशी सकाळी आपण सारे झोपलो असताना भाऊसाहेब कुठं गेले होते माहीत आहे? कुणाला आणायला ते गेले होते असं वाटतं तुला? चेटकिणीला! जैनकची म्हातारी. ते जेव्हा तिला घेऊन घरी आले तेव्हा मी त्याना विचारलं: 'हिला कशाला घेऊन आलात?' तर ते म्हणाले: 'तिला थोडा जादूटोणा करू दे. आल्तीनाईचं काळीज भीतीनं लकाकलंय. पोरीनं हुसका घेतलाय.' मी त्याना म्हणालो: 'आधी तिला घराबाहेर काढा. ती निदान एक बकरी मागील. आणि आपण काही श्रीमंत नाही. आपण तिला घोडीही देऊ शकत नाही कारण तिचा नैवेद्य कालच लांडग्यांना दिलाय!' तोपर्यंत तू झोपलेलीच होती. अशा रीतीनं मी तिच्या तावडीतून सुटका करून घेतली. त्यानंतर आठवडाभर भाऊसाहेब माझ्याशी बोलत नव्हते, मी त्यांना मान खाली घालायला लावली असं ते म्हणाले. पण सैकल आणि कर्तनबे ही फार चांगली माणसं आहेत, अशी दयाळू माणसं फार क्वचित भेटतात. ठीक आहे, आल्तीनाई, आपण आता घरी जाऊ या, चल."

दुईशेनसाठी मी धीटपणाचा आव आणला होता, पण माझी काकी तिथे येऊन मला बळजबरीने खेचून घेऊन जाईल अशी आतून धास्ती वाटत होती. आणि मग त्यांनी माझे हवे ते धिंडवडे केले असते व खेड्यातले कुणीही त्यांना थोपवू शकले नसते. अख्खी रात्र मी जागत राहिले, वादळाला तोंड फुटायची वाट पहात राहिले.

मला काय वाटत होते याची अर्थातच दुईशेनला कल्पना होती. आणि माझे मन दुसरीकडे कशात तरी रमावे म्हणून दुसऱ्या दिवशी तो दोन रोपटी शाळेला घेऊन आला. धडे संपल्यानंतर त्याने माझ्या हाताला धरून शाळेच्या मागे नेले.

"तुला आणि मला मिळून एक काम पार पाडायचं आहे आल्तीनाई," रहस्यमय आवाजात तो म्हणाला. "ही चिनाराची रोपटी मी तुझ्यासाठी आणलीत. आपण दोघे मिळून ती लावणार आहोत. ती जशी मोठी होऊन बळकट होतील, तशी तूही एक सुंदर स्त्री बनशील. तुझं अंतःकरण दयाळू आहे नि मन चौकस आहे. तू पंडिता होशील अशी माझी खात्री झाली आहे. बघ, एक दिवस पंडिता होण्यासाठीच तू जन्माला आली आहेस. ही रोपटी तुझ्यासारखीच लहान आणि सडपातळ आहेत. आल्तीनाई, चल आपल्या हातांनी त्यांना जमिनीत लावू या. माझ्या चमकत्या ताऱ्या, शिकण्यात तुला आनंद गवसू दे..."

रोपटी माझ्याच उंचीची होती. निळसर बुंध्याची ती कोवळी झाडे होती. आम्ही ती रोवली न रोवली तोच डोंगरातून वाऱ्याची झुळूक आली आणि तिने त्यांच्या कोवळ्या

पानांना पहिला स्पर्श करून त्यांच्यात जीव भरला. पाने थरथरली आणि चिनार झुलले...

"बघ किती छान!" काही पावले मागे जात दुईशेन आनंदाने म्हणाला. "आणि आता आपण त्या ओढ्यापासून इथपर्यंत एक छोटा नाला खणू या. तू बघशील, ही झाडं मोठी होतील तेव्हा फार सुंदर दिसतील! या टेकडीवर ती भावाभावांसारखी शेजारी शेजारी उभी राहतील. आणि चांगल्या लोकांना आनंद देण्यासाठी ती सदैव नजरेच्या टप्प्यात राहतील. त्यावेळी आयुष्यही वेगळं असेल आल्तीनाई. अजून उत्तम तर पुढे घडायचंय..."

दुईशेनच्या चांगुलपणामुळे मी किती हेलावून गेले होते ते व्यक्त करायला आताही शब्द अपुरे पडताहेत. मी नुसती उभी राहून एकटक त्याच्याकडे पहात होते. नव्या डोळयांनी मी त्याच्याकडे पहात होते, त्याच्या चेहऱ्यावरील उदात्त सौंदर्याने मोहून मी त्याच्याकडे पहात होते, त्याच्या नजरेतील प्रेमळ आणि दयाळू भाव निरखीत होते; मी त्याच्याकडे अशी काही पहात होते की, जणू त्याचे हात किती बळकट आणि चपळ आहेत, माझ्या हृदयाला ऊब आणणारं त्याचं निर्मळ हसणं किती तेजस्वी आहे हे जसे काही मला माहीतच नव्हते. माझ्या छातीमध्ये एका नव्याच भावनांच्या ऊर्मी जोरजोरात उसळून येत होत्या. हा अनुभव मला नवा होता. मला आतून आतून त्याला सांगावसं वाटत होतं: "मास्तर, तुम्ही जसे काही आहात ते खूप छान आहात, मी तुमची ऋणी आहे... मला तुम्हाला घट्ट मिठी मारून तुमचं चुंबन घ्यावंसं वाटतंय!" पण मला ते धैर्य झाले नाही, मोठ्यांदा ते शब्द बोलायला

मी लाजले. पण मला वाटते त्यावेळी मी ते बोलायला हवे होते...

डोंगरपायथ्यांशी पसरलेल्या मैदानांमध्ये नवी हिरवळ नुकतीच उमटली होती व त्यांच्या मध्येच उभ्या असलेल्या त्या टेकडीच्या माथ्यावर आम्ही दोघे उभे होतो. वर निरभ्र निळे आकाश पसरले होते व प्रत्येकजण आपापल्या स्वप्नात गुंगला होता. माझ्यावर लटकणारा धोका मनातून पार लांब पळाला होता. उद्याचा विचार मी करीत नव्हते, मी दोन दिवस घरी गेले नव्हते तरी मला शोधण्याचा प्रयत्न माझ्या काकीने का केला नाही याचे आश्चर्य करीत नव्हते. ते मला पुरते विसरले किंवा माझा नाद त्यांनी सोडून दिला असावा अशी अंधुक आशा मनात डोकावत होती. पण या विचारांचा दुईशेनला मात्र त्रास होत होता.

खेड्यात परत जाताना तो मला म्हणाला, "आल्तीनाई, जास्त काळजी करू नको, आपण यातून काहीतरी मार्ग शोधून काढू. परवा मी वोलस्तला जातोय, तिथं मी तुझ्याबद्दल बोलतो. कदाचित मी त्यांच्याकडून तुला शिकण्यासाठी शहरात पाठवायची व्यवस्था करीन. तुला आवडेल जायला?"

"मास्तर, तुम्ही जसं सांगाल तशी मी वागेन."

शहर कसे असते याची त्यावेळी जरी मला यत्किंचितही कल्पना नव्हती, तरी दुईशेनला मला शहरात पाठवायची इच्छा आहे हे समजताच मी शहरातील जीवनाची स्वप्ने बघायला सुरुवात केली. आता दुसरा कोणताही विचार माझ्या डोक्यात शिरत नव्हता. एका क्षणाला त्या कल्पनेची विलक्षण

भीती वाटायची तर दुसऱ्याच क्षणी शहरात जायला मी अगदी आतूर झालेली असायची.

दुसऱ्या दिवशी शाळेत शिकत असतानाही मी दिवास्वप्ने पहात होते: शहरात मी कुणाबरोबर राहीन, मी तिथं कशी राहीन? जर कुणी मला रहायला घरात जागा दिली तर मी सांगितलेली सारी कामं करीन — सर्पणासाठी लाकडे फोडीन, पाणी भरीन, कपडे धुईन, सारं काही करीन. बाहेर एकाएकी टापांचा आवाज ऐकून मी दचकले. घोडे एवढ्या जोराने दौडत येत होते की, त्यांच्या टापांखाली आमच्या शाळेचा नक्कीच चक्काचूर झाला असता. दचकून आम्ही सारे सरळ बसलो व घाबरून कानोसा घेऊ लागलो.

"आपलं काम पुढं चालू ठेवा, तिकडं कुणी लक्ष देऊ नका," दुईशेन चटकन म्हणाला.

दार धाडदिशी उघडले गेले व मागच्या भिंतीवर जोरात आपटले. उंबरठ्यावर माझी काकी उभी होती. तिच्या तिरस्काराने भरलेल्या चेहऱ्यावर एक दुष्ट समाधानाची भावना उमटली. दुईशेन दारापर्यंत गेला.

"आपण इथं कशाला आलात?" त्याने तिला विचारले.

"तुझ्याशी त्याचा काही एक संबंध नाही. मी माझ्या पोरीचं लग्न लावतेय. ए रांडे, इकडं ये!" ती माझ्या दिशेने अंगावर धावून आली, पण दुईशेनने तिची वाट अडवली.

"आमच्या इथं फक्त शाळकरी मुलं आहेत, लग्न करण्याइतपत मोठ्या वयाचं कुणीही नाही," मुद्दाम शांत आवाजात तो म्हणाला.

"ते आम्ही पाहून घेऊ. चला रे, त्या सटवीला खेचून न्या बाहेर."

तिने एका घोडेस्वाराला खूण केली. तो लाल केसाळ टोपीतला माणूस होता. दुसरी दोन माणसेही घोड्यावरून खाली उतरली. त्यांच्याजवळ जाडजूड सोटे होते. दुईशेन आपल्या जागी ठाम उभा होता.

"लुतभऱ्या कुत्र्या, नीचा, तू आमच्या पोरींना हुकूमात ठेवशील असं समजतोस काय? माझ्या वाटेतून बाजूला हो!" तो रटरटीत चेहऱ्याचा माणूस फिस्कारला व दुईशेनच्या अंगावर एखाद्या चवताळलेल्या अस्वलाप्रमाणे त्याने चाल केली.

"तुम्हाला येथे घुसण्याचा काही एक अधिकार नाही, ही शाळा आहे," दाराच्या बाजूंना घट्ट धरीत दुईशेन म्हणाला.

"काय सांगितलं मी तुला? हा सगळा वेळपर्यंत या सटवीला तो फुकटात वापरीत होता," माझी काकी किंचाळली.

"मी तुझ्या शाळेवर थुंकतो!" संतापाने किरमिजी होत तो तांबड्या चेहऱ्याचा माणूस गरजला व त्याने आपला चाबूक फडकवला.

दुईशेन त्याच्याहून चपळ होता. त्याने त्या माणसाच्या पोटात लाथ हाणली. तो विव्हळत खाली कोसळला. झपाट्यात दुसरे दोघे घोडेस्वार आमच्या मास्तरांवर तुटून पडले. मुले मोठ्याने किंचाळत मला बिलगली. माझ्या घागऱ्याला मुलांनी घट्ट धरले असल्याच्या अवस्थेतच मी त्या मारामारीत घुसले.

"सोडा आमच्या मास्तरना! त्याना मारू नका!" मी ओरडले.

दुईशेन मागे वळला. तो रक्ताने न्हायला होता आणि त्याचा चेहरा रागाने भेसूर बनला होता. तुटलेल्या दाराचा तुकडा उचलून त्याने भिरकावला व तो ओरडला:

"पळा मुलांनो, घरी पळा, पळ आल्तीनाई!"

ओरडता ओरडता त्याने एकदम किंचाळी ठोकली. त्या गुंडांनी त्याचा हात मोडला. दुसऱ्या हाताने मोडका हात धरून दुईशेन मागे सरला आणि ते दोघे माजलेल्या बैलांसारखे आमच्या निःशस्त्र मास्तरांवर तुटून पडले:

"हाणा त्याला! हाणा! डोक्यावर मारा! ठार करा!"

माझ्या काकीने व त्या लाल तोंडाच्या पशूने मला धरले. माझी वेणी त्यांनी माझ्या गळ्याभोवती आवळली आणि मला बाहेर खेचत नेले. मी माझ्या साऱ्या शक्तीनिशी हिसका मारून सुटायचा प्रयत्न केला. त्या क्षणाला माझे शाळूसोबती घाबरून गर्भगळित होऊन एका कोपऱ्यात उभे असलेले दिसले. किंचाळण्यासाठी त्यांची तोंडे वासलेली होती व रक्ताने न्हायलेला दुईशेन भिंतीशी लोळागोळा होऊन कोसळला.

"मास्तर!"

पण दुईशेन मला मदत करू शकला नाही. त्याला धड उभे राहता येत नव्हते. त्या लोकांनी त्याला बुकलून काढले त्यावेळी त्याचे दारूड्याप्रमाणे झोके जात होते. आपले लोंबकळणारे मुंडके तो उचलायचा प्रयत्न करीत होता, पण ते त्याला पुन्हा पुन्हा मारीत होते. मला जमिनीवर फेकण्यात आले व माझे हात बांधण्यात आले. आणि मग दुईशेन कोसळला.

"मास्तर!"

माझे तोंड गप्प करण्यात आले व खोगीरावर आडवे घालण्यात आले.

तो तांबड्या तोंडाचा माणूस एव्हांना घोड्यावर बसला होता आणि आपल्या हातांनी व शरीराच्या वजनाने मला चिरडत होता. दुसरे दोघेही आपापल्या घोड्यांवर स्वार झाले. माझ्या बाजूने माझी काकी धावत होती आणि शिव्याशाप देत डोक्यावर मारीत होती.

"हे तू स्वतःहून ओढवून घेतलंस! आता सुटले मी तुझ्या कटकटीतून! तुझ्या त्या लाडक्या मास्तराचाही आता निकाल लागला!"

पण दुईशेन अजून संपला नव्हता. अचानक मी त्यांची आकांताने मारलेली हाक ऐकली: "आल्तीनाई!"

डोके खाली उलटे लोंबकळत होते अशा परिस्थितीत घोड्यावरून मी मोठ्या कष्टाने वळून पाहिले. दुईशेन आमच्या मागे धावत होता. मारून मारून त्याचा अगदी भुगा केलेला होता, त्याचे सर्वांग रक्ताने माखले होते. तरीही तो धावत होता व त्याच्या हातात एक मोठा दगड होता. त्याच्या मागोमाग वर्गातली सारी मुले हुंदके देत धावत होती.

"थांबा पशूंनो! थांबा! सोडा तिला! आल्तीनाई!" दुईशेन ओरडला.

घोडेस्वार थांबले. ज्या दोघांनी दुईशेनला मारहाण केली होती त्यांनी त्याच्याभोवती घोड्यावरून रिंगण धरले. मोडलेल्या हाताची बाही दातात धरून दुईशेनने त्यांच्यावर दगड भिरकावला. पण त्याचा नेम चुकला. आणि त्या दोघांनी काठ्यांनी त्याला झोडपून काढले. तो खाली पडला. बेशुद्ध पडायच्या क्षणभर आधी मी मुलांना मास्तरांच्या लोळागोळा होऊन पडलेल्या शरीराकडे धावताना पाहिले.

त्यांनी मला कुठे व कसे नेले ठाऊक नाही. मी एका अनोळखी तंबूत होते. वरच्या उघडया कनातीमधून पहाटेचे तारे शांतपणे चमकताना दिसत होते. जवळ कुठेतरी नदीच्या पाण्याचा आवाज ऐकू येत होता व मेंढपाळांच्या बोलण्याचे आवाज येत होते. एखाद्या जुनाट वठलेल्या खोडासारखी वाकलेली एक गंभीर चेहऱ्याची बाई काळ्या चुलाण्याशेजारी बसली होती. तिचा चेहरा मातीसारखाच काळाकुट्ट होता. मी बाजूला वळले. केवळ नजरेने त्याला ठार मारावे असे तीव्रतेने वाटत होते !

"ए काळतोंडे, तिला उठव," लाल तोंडाचा तो पशू म्हणाला.

ती काळी बाई माझ्याजवळ आली, आपल्या राकट, खरखरीत हाताने तिने माझा खांदा पकडला व हलविले.

"तिला नीट वागायला सांग. नाही वागली तरी हरकत नाही. मी तिच्यासाठी शब्द फुकट घालवीत बसणार नाही."

तो तंबूतून बाहेर गेला. ती काळी बाई पुन्हा खाली बसली आणि तिने तोंडातून चकार शब्द काढला नाही. ती मुकी असावी काय? राखेसारखे तिचे डोळे थंडगार, निस्तेज होते. ती निर्विकार नजरेने पहायची. बेदम मारून आज्ञाधारक बनवलेले कुत्रे असे असतात. त्यांचे क्रूर मालक हाताला येईल त्या वस्तूने प्रथम त्यांच्या डोक्यावर सतत मारीत राहतात आणि मागाहून कुत्र्यांना त्याची सवय होते. पण त्यांच्या डोळ्यात जी एक मुकी, भयानक उदास छटा येते ती पाहिली म्हणजे अंगाचा थरकाप होतो. मी त्या काळ्या बाईच्या मृतप्राय डोळ्यात पाहिले आणि मला असे वाटले

की मी जिवंत नाही, एव्हांना मेले आहे आणि मला पुरले आहे. जर नदीच्या पाण्याचा आवाज मला ऐकू आला नसता तर मी त्यावर विश्वास ठेवला असता. पाणी जोराने खळखळाट करीत वहात होते. ते मुक्त होते...

माझ्या नादान, नालायक काकीच्या काळयाकुट्ट अंतःकरणाचा धिक्कार असो! माझ्या अश्रूंच्या आणि रक्ताच्या पुरात बुडून ती मरो! त्या रात्री माझ्यावर बलात्कार झाला. मी फक्त पंधरा वर्षांची होते. माझ्यावर बलात्कार करणाऱ्या माणसाच्या मुलींहून लहान वयाची!

तिसऱ्या रात्री मी तिथून पळून जायचा निश्चय केला. मी रस्त्यातली सारी संकटे सहन करीन, पकडले जाण्याचा धोका पत्करीन पण अखेरचा श्वास असेपर्यंत माझ्या मास्तरांप्रमाणे, दुईशेनप्रमाणे, मी प्राणपणाने प्रतिकार करीन असा निश्चय केला.

कनातीच्या खालच्या बाजूला मी आवाज न करता सरपटत गेले. अंधारातच मी झालर शोधली, पण ती घोड्याच्या केसांच्या दोरीने पक्की बांधलेली होती. उजेडा-शिवाय त्या गाठी सोडविणे अगदी अशक्य होते. मग तंबूची कनात उचलून मी बाहेर सरपटत जाण्याचा प्रयत्न केला. पण माझी धडपड व्यर्थ गेली. तीसुद्धा बाहेरच्या बाजूने तशाच भक्कम दोरीने बांधलेली होती व खुंट जमिनीत फार खोलवर रोवलेले होते.

एखादी धारदार वस्तू घेऊन दारावरच्या झालरीची दोरी झपाट्यात तोडणे एवढा एकच मार्ग मला दिसत होता. मी अंधारात चाचपडून खूप प्रयत्न केला, पण हाती फक्त एक

लहान लाकडी खुंट सापडला. असहाय मन:स्थितीत मी त्या खुंटाने तंबूच्या कडेला आतील बाजूने खणायला सुरुवात केली. तो उद्योग व्यर्थ होता, पण मी विचारांच्या पलिकडे गेले होते. एकच विचार डोक्यात घण मारीत होता—इथून बाहेर पडायचे किंवा मरायचे, त्याच्या घशाची घरघर आणि घोरण्याचा आवाज पुन्हा न ऐकण्यासाठी काय वाटेल ते करायचे, पण पुन्हा म्हणून येथे बंदिवान रहायचे नाही. मरायचे असेल तर स्वातंत्र्यात मरीन, लढताना मरीन, पण शरणागत राहणार नाही असा मी निश्चय केला.

मला टोकोल बनवले होते—रखेली केले होते. या शब्दाची मला जबरदस्त घृणा आहे. कुठल्या घाणेरड्या काळात कुणी हा शोधून काढला? शरीर आणि मनाने गुलाम बनून दुसरी बायको म्हणून राहण्यापेक्षा अधिक अपमानास्पद काय असू शकते? गरीब बिचाऱ्या बायकांनो, या थडग्यातून वर या! सर्व बलात्कारित, अवमानीत, मानवी प्रतिष्ठेला पारख्या झालेल्या स्त्रियांच्या भुतांनो, उठा! उठा, हुतात्म्यांनो आणि जुन्या, हिडीस काळ्या जगाला गाडून टाका! मी तुम्हाला आवाहन करते आहे, तुमच्याचसारख्या कमनशिबी ठरलेल्यांपैकी शेवटची मी, या कमनशिबाला ठोकरून लावणारी मी तुम्हाला आवाहन करते आहे!

एके दिवशी मी असे बोलू शकेन की नाही,—हे त्या रात्री मला ठाऊक नव्हते. निराशेच्या तीव्र झटक्यामध्ये मी जमीन उकरत होते. जमीन खडकाळ होती, खणली जात नव्हती. माझ्या रक्ताळल्या नखांनी मी खरवडत होते. पण माझे कोपर बाहेर रेटता येतील एवढे खोल खणेपर्यंत दिवस उजाडला,

कुत्री भुंकू लागली, लोक जागे झाले. घोड्यांचा एक कळप नदीकडे दौडत गेला. नंतर झोपाळू, फुरफुरणाऱ्या मेंढ्यांचा कळप आला. मग कुणीतरी तंबूच्या बाहेरच्या दोऱ्या सोडायला सुरुवात केली व नंतर कनाती पाडू लागले. ती गप्प राहणारी काळी बाई हे काम करीत होती.

याचा अर्थ ते त्या ठिकाणाहून निघायची तयारी करीत होते. मला एकाएकी आदल्या दिवशी ऐकलेल्या संभाषणाचा काही भाग आठवला: आज सकाळी ते निघणार होते, प्रथम खिंडीजवळ जाणार होते आणि नंतर उरलेल्या उन्हाळाभर खिंडीपलिकडे डोंगराळ भागाच्या मध्यात राहणार होते. माझी स्थिती आणखीच वाईट बनली होती—तिथून निसटणे आणखी शंभर पटींनी अवघड जाणार होते.

मी जेथे खड्डा खणला होता त्यापासून लांब जाण्याचीही तसदी मी घेतली नाही. काय उपयोग होता? काळ्या बाईने खड्डा पाहिला व त्याशेजारी उकरलेल्या मातीचा ढीगही पाहिला, पण ती काहीही बोलली नाही. आपले काम ती निमूटपणे करीत राहिली. तिच्या एकूण वागण्यात कमालीचा अलिप्तपणा भरलेला होता. जणू जगातली कोणतीही गोष्ट तिच्या भावनांना जाग आणू शकत नव्हती. तिने आपल्या नवऱ्याला जागेही केले नाही, सामानाची बांधाबांध करताना मदत करायला सांगायचा तिला धीर झाला नाही. कांबळ्यांच्या आणि केसाळ कोटांच्या डोंगराखाली एखाद्या अस्वलासारखा तो घोरत पडला होता.

सर्व बुरणुसे गुंडाळून झाली होती, तंबू उघडा पडला होता आणि एखाद्या पिंजऱ्यात बसल्यासारखी मी तेथे बसून

नदीपल्याडी लोक आपापल्या बैलांवर व घोड्यांवर सामान लादीत होते ते पहात होते. तीन घोडेस्वार त्या लोकांकडे जाऊन काहीतरी विचारीत असलेले मी पाहिले आणि नंतर ते आमच्या तंबूच्या दिशेने येऊ लागले. प्रथम मला वाटले की, सगळ्यांना बरोबर निघण्याची सूचना देण्यासाठी ते येत आहेत. पण मी अधिक डोळे ताणून पाहिले तेव्हा माझ्या तोंडून चीत्कार बाहेर पडला. त्या तिघांमधला एक दुईशेन होता आणि दुसऱ्या दोघांनी पोलिसी टोप्या घातल्या होत्या व त्यांच्या लष्करी कोटांच्या खांद्यांवर लाल फिती लावलेल्या होत्या.

मी इतकी चकित झाले होते आणि भावनावेग एवढा अनावर झाला होता की, माझ्या तोंडातून आवाज फुटेना. माझे मास्तर जिवंत होते! केवढी आनंदाची गोष्ट! पण माझ्या अंतःकरणात मात्र काळी भयाण पोकळी होती: मी संपले, पुरी नासवली गेले.

दुईशेनच्या कपाळावर पट्टी बांधलेली होती व त्याचा हात गळ्यात अडकवलेला होता. त्याने जमिनीवर उडी मारली, वेगाने तो राहुटीत शिरला आणि घोरत पडलेल्या त्या लाल तोंड्या पशूच्या अंगावरची कांबळी त्याने उडवली.

"चल ऊठ!" तो ओरडला.

त्या माणसाने डोके उचलून वर पाहिले, डोळे चोळले आणि दुईशेनच्या दिशेने झेप घेतली. पण पोलिसांची दोन पिस्तुले त्याच्यावर रोखलेली पाहताच तो एकदम मागे सरला. दुईशेनने त्याची मानगूट पकडली, त्याला गदगदा हलवले व जोरात हिसका देऊन त्याचा चेहरा आपल्या चेहऱ्याजवळ आणला.

"नादान डुकरा," पांढऱ्याफटक पडलेल्या त्याच्या ओठांमधून उद्गार बाहेर पडला. "तुझी लायकी जिथं आहे तिथंच तू आता जाशील! चल!"

तो माणूस आज्ञाधारकपणे पुढे झाला, पण बुईशेनने त्याच्या गुबगुबीत खांद्यावर घट्ट नखे रोवली, त्याला गर्रकन मागे फिरवले आणि कठोर नजरेने त्याच्याकडे पहात घोगऱ्या आवाजात तो म्हणाला:

"ती म्हणजे तू तुडवलेलं गवताचं एक पातं असं तुला वाटतं होय रे? तू तिला नासवली, कायमची बरबाद केली असं तुला वाटतं? नाही, नीचा, तुला ते जमलेलं नाही. तुझे दिवस संपले, आता तिचे दिवस आहेत आणि ही तुझी अखेर असेल!"

त्या लालतोंड्याला पायात बूट घालू देण्यात आले, नंतर त्याचे हात बांधण्यात आले व त्याला घोड्यावर बसवण्यात आले. एका पोलिसाने त्याच्या घोड्याचा लगाम धरला व दुसरा त्याच्यामागून आपला घोडा चालवू लागला. मी दुईशेनच्या घोड्यावर बसले व तो माझ्या शेजारून चालू लागला.

आम्ही निघालो आणि त्याच क्षणी एक अमानुष किंकाळी आमच्यामागून उमटली. ती काळी बाई आमच्यामागे धावत होती व किंचाळत होती. वेड्यासारखी ती आपल्या नवऱ्यावर झेपावली आणि दगडाने तिने त्याची टोपी उडवली.

"माझं रक्त शोषून घेतलंस त्याबद्दल नीचा, हे घे! अधमा, माझं आयुष्य वैराण केलंस त्याचं हे घे! तुला मी जिवंत सोडत नाही!" पार वरच्या पट्टीत ती ओरडत होती.

कदाचित आपल्या सबंध वैवाहिक जीवनात तिने कधी-ही मान वर करून पाहिले नसावे. आणि आता तिचा साचलेला सारा कडवटपणा, दाबून ठेवलेला सारा तिरस्कार जोरात वर उफाळून आला होता. कानठळ्या बसवणारे तिचे ओरडणे त्या अरूंद खिंडीमध्ये घुमत होते. घाबरून खोगीरावर ओणव्या बसलेल्या आपल्या नवऱ्यावर ती झेपावत होती, त्याच्यावर कचरा, दगड, चिखलाचे गोळे मारीत होती आणि शिव्याशापांची लाखोली वहात होती.

"तू पाय ठेवशील तिथं जमीन ओसाड पडेल! तुझं प्रेत उघड्यावर सडत पडेल आणि गिधाडं तुझे डोळे खातील! तुझं थोबाड मला कधीही दिसू नये! चालता हो सैताना, चालता हो, चालता हो, चालता हो!"

श्वास घ्यायला ती थांबली आणि किंचाळत, केस वाऱ्यावर मोकळे सुटलेल्या अवस्थेत तिथून पळत निघून गेली.

ते सारे एखाद्या भयाण दुःस्वप्नासारखे होते. मी भिरभिरल्यासारखी, मोडून गेल्यासारखी आणि दीनवाणी झाली होते. दुईशेन माझ्या घोड्याचा लगाम धरून चालला होता. तो गप्प राहून चालत होता आणि त्याने आपले जखमी कपाळ खाली झुकवले होते.

अखेरीस ती अमंगळ खिंड एकदाची मागे पडली. पोलिस खूप पुढे गेले होते. आता दुईशेनने घोडा थांबवला आणि प्रथमच माझ्याकडे पाहिले. त्याच्या डोळ्यात अपार वेदना भरली होती.

"आल्तीनाई, मी तुझा अपराधी आहे, मी तुला वाचवू शकलो नाही, मला क्षमा कर," तो म्हणाला. माझा हात

आपल्या गालांवर दाबीत तो पुढे म्हणाला, "पण तू जरी मला क्षमा केलीस तरी मी स्वत:ला कधीही क्षमा करणार नाही."

मी माझ्या घोड्याच्या मानेला मिठी मारून रडू लागले. दुईशेन काहीही न बोलता फक्त माझ्या केसांवरून हळुवारपणे हात फिरवीत राहिला. त्याने मला मनसोक्त रडू दिले.

"चल आल्तीनाई, आपण जाऊ या," अखेरीस तो म्हणाला. "मला तुला काही सांगायचंय. परवा मी वोलस्तला गेलो होतो. तू शहरात जाणार आहेस, शाळेला जाणार आहेस."

एका स्वच्छ, खळखळ वाहणाऱ्या छोटया नदीजवळ आम्ही आलो तेव्हा दुईशेन थांबला.

"स्वच्छ तोंड धू आल्तीनाई," खिशातून साबणाची वडी काढीत तो म्हणाला. "हे घे, याने तोंड धू. तुला हवं असेल तर मी घोडा चरायला घेऊन जातो आणि तू कपडे काढून नदीत स्वच्छ आंघोळ कर. जे काही घडलं ते सगळं विसरून जा, पुन्हा त्याची कधीही आठवण करू नको. आल्तीनाई, पाण्यात थोडा वेळ डुंब, तुला बरं वाटेल. ठीक आहे?"

मी मान हलवली. दुईशेन दूर गेल्यावर मी कपडे काढले आणि हळूहळू पाण्यात उतरले. तळाचे पांढरे, निळे, हिरवे आणि लाल गोटे मला निरखून पहात होते. निळे पाणी माझ्या पायाच्या घोटयांशी भोवरा धरीत होते. मी हातांच्या ओंजळीत थोडे पाणी घेतले व माझ्या वक्षस्थळांवर उडवले. माझ्या अंगावरून ते खाली ओघळले आणि गेल्या तीन दिवसात मी

प्रथमच हसले. हसण्यात किती आनंद सामावला होता! मी माझ्या अंगावर पुन:पुन्हा पाणी उडवले आणि नंतर त्यात डुबकी मारली. प्रवाहाने चटकन मला उथळ पाण्यात वाहून नेले. मी उभी राहिले आणि फेसाळणाऱ्या पाण्यात पुन्हा पुन्हा डुबक्या मारल्या.

"हे नदी, गेल्या तीन दिवसातली सारी घाण आणि अमंगळपणा वाहून ने! हे पाण्या, तुझ्यासारखंच मला निर्मळ कर!" मी हळूच पुटपुटले.

आपल्या सुंदर आठवणींनी ज्या जागा सामावलेल्या असतात तेथे आपया पावलांच्या खुणा कायम का उमटवता येत नाहीत? त्या डोंगरांमधून परत येताना मी आणि दुईशेनने ज्या मार्गावरून वाटचाल केली, तो मला सापडला तर मी त्या भूमीवर लोळण घेऊन माझ्या मास्तरांच्या पदचिन्हांचे चुंबन घेईन. जगातल्या सर्व रस्त्यांपेक्षा तो रस्ता मला अधिक मोलाचा वाटतो. त्या दिवसाला, त्या रस्त्याला, मी परत माणसात आले त्या वाटेला, माझ्यात निर्माण झालेल्या नव्या आत्मविश्वासाला, नव्या आशेला, नव्या प्रकाशाला मी पवित्र मानते... त्या दिवशी प्रकाशणाऱ्या सूर्याचे मी आभार मानते, धरणीमातेचे मी आभार मानते...

त्यानंतर दोन दिवसांनी दुईशेन मला रेल्वे स्टेशनावर घेऊन गेला.

माझ्या आयुष्यात जे काही घडले होते, त्यानंतर मी खेड्यात अजिबात राहू इच्छित नव्हते. माझ्या नव्या जीवनाला नव्या जागेत आरंभ होणे आवश्यक होते. सैकल आणि कर्तनबे यांनी माझ्या प्रवासाची सारी तयारी केली. ती दोघे सारखी

माझ्या भोवती भोवती करीत होती, खाण्याचे पदार्थ बांधून देत होती. मी जाताना ती दोघे अगदी लहान मुलांसारखी रडली. आमचे अनेक शेजारी निरोप द्यायला आले. भांडखोर सातीमकुलसुद्धा आला होता. ताबडतोब गाव सोडण्याचा माझा निर्णय लोकांना आवडला.

"पोरी, तुझं भलं होवो," सातीमकुल मला म्हणाला. "तुझा रस्ता बिनधोक होवो. घाबरू नको, मास्तरांनी तुला शिकवलं तसं रहा म्हणजे तुझं सारं काही ठीक होईल. तू काहीही म्हण, पण आम्हालाही आता काही गोष्टी अधिक चांगल्या कळायला लागल्यात."

आमच्या शाळेतली मुले गाडीमागे खूप वेळपर्यंत धावत होती आणि हात हलवीत होती...

ताश्कंदच्या बालभवनामध्ये माझ्याबरोबर अनेक मुले-मुली चालली होती. कातडी जाकीटातली एक रशियन बाई रेल्वे स्टेशनावर आमची वाट पहात होती.

त्यानंतरच्या आयुष्यात अनेकवेळा त्या डोंगराळ भागातल्या, चिनाराच्या सावलीतल्या छोट्या स्टेशनावरून आगगाडी मला कितीदातरी घेऊन गेली! माझे अर्धे काळीज मी कायम तेथेच ठेवून गेले!

वसंतामधल्या त्या संध्याकाळच्या धूसर फिकट जांभळ्या आकाशात काहीतरी विलक्षण आर्तता, कातरता भरून राहिली होती. जणू काही संधिप्रकाशाला आमचा हा कायमचा निरोप आहे हे समजले होते. दुईशेन आपले दुःख, आपली निराशा लपविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. पण मला त्याच्या वेदना जाणवत होत्या, कारण तशाच दुःखाचा आवंढा माझ्या

घशात येऊन अडकला होता. तो अगदी जवळून माझ्या डोळ्यात निरखून पहात होता. त्याचे हात हळुवारपणे माझ्या केसांवरून, माझ्या चेहऱ्यावरून, इतकेच नव्हे तर माझ्या कोटाच्या बटणांवरूनही फिरत होते.

"मला शक्य असते, तर मी तुला कधीही जाऊ दिले नसते आल्तीनाई, पण तुझ्या वाटेत आडवे येण्याचा मला काही एक अधिकार नाही. तुला अभ्यास केलाच पाहिजे. आणि मी काही तेवढा शिकलेला नाही हे तुला ठाऊक आहे. तुला गेलेच पाहिजे, ते तुझ्या कल्याणाचे आहे... कदाचित तू खरीखुरी आदर्श शिक्षिका होशील आणि मग तुला आपल्या शाळेची आठवण येईल, आणि कदाचित तुला हसू फुटेल. तसंच होवो, तसंच होवो..."

लांबून आगगाडीने शिटी दिली, तिचा आवाज खिंडीमध्ये घुमला आणि मग आम्हाला तिचे दिवे जवळ येत असलेले दिसले. तेथे वाट पहात थांबलेल्या घोळक्यात हालचाल झाली.

"आणखी एका मिनिटानं तू जाणार," कापऱ्या आवाजात दुईशेन म्हणाला. "सुखी हो आल्तीनाई. आणि खूप अभ्यास कर, अभ्यास ही मख्य गोष्ट आहे हे लक्षात ठेव."

मी बोलू शकले नाही. अश्रूंनी मी गुदमरुन गेले होते.

"रडू नको आल्तीनाई," माझे डोळे पुशीत तो म्हणाला. आणि एकाएकी आठवल्यासारखे करून तो म्हणाला: "तू आणि मी मिळून लावलेल्या त्या दोन चिनारांची मी स्वत: निगराणी करीन. आणि जेव्हा तू कुणी मोठी व्यक्ती बनून येशील, तेव्हा ते किती सुंदर मोठे झालेत ते तुला दिसेल."

आगगाडी स्टेशनात आली. एकमेकांवर आपटत डबे थांबले.

"चला, आपण आता निरोप घेतला पाहिजे," दुईशेनने मला मिठीत घेतले आणि माझ्या मस्तकाचे चुंबन घेतले. "माझ्या लाडके, सदैव यशस्वी हो... घाबरू नकोस, नेहमी धीट रहा..."

मी पायरीवर उडी टाकली आणि मानेनेच मागे वळून पाहिले. तो क्षण मी कधीही विसरणार नाही: गळयास हात अडकवलेला दुईशेन डबडबल्या नजरेने माझ्याकडे पहात होता, मला स्पर्श करण्याच्या अनिवार इच्छेने तो पुढे झुकला, पण त्याच क्षणी आगगाडी सुरू झाली.

"अच्छा आल्तीनाई! माझ्या तेजस्वी प्रकाशा, अच्छा!" तो मोठ्यांदा ओरडला.

"येते मी मास्तर! माझ्या आवडत्या, लाडक्या शिक्षका, अच्छा!"

दुईशेन आगगाडीबरोबर धावत होता, जरासा मागे पडनाच अधिक जोराने धावत होता आणि ओरडला: "आल्तीनाई!"

त्याच्या आवाजात अशी काही ओढ होती की, जणू काही त्याला मला अत्यंत महत्त्वाचे काही सांगायची अचानक आठवण झाली होती, पण आता खूप उशीर झालाय हे त्याला जाणवले होते. आज या घटकेलाही मला त्याची ती हाक ऐकू येते. अगदी अंत:करणाच्या खोल गाभ्यातून त्याने घातलेली साद आजही कानात घुमते.

आगगाडी बोगद्यात शिरली, पुन्हा सरळ रस्त्यावर बाहेर आली आणि वेग घेऊन कझाख मैदानांमधून मला माझ्या नव्या आयुष्याकडे घेऊन निघाली...

माझ्या शिक्षका अखेरचा दंडवत, माझ्या पहिल्या शाळेला, माझ्या बालपणाला अखेरचा दंडवत, माझ्या पहिल्या प्रेमाला अखेरचा निरोप...

दुईशेनच्या स्वप्नात होते तशा मोठ्या शहरात मी राहिले, मोठ्ठ्या खिडक्यांच्या मोठ्या शाळेबद्दल त्याने आम्हाला सांगितले होते तशा शाळेत गेले. माध्यमिक शाळेतले शिक्षण पुरे केल्यानंतर मला इन्स्टिटयूटमध्ये शिकण्यासाठी मॉस्कोला धाडण्यात आले.

अभ्यासाच्या त्या दीर्घ काळात अनेक अडचणींना मला तोंड द्यावे लागले. अनेकवेळा मी निराश व्हायची, कारण वाटायचे हे सारे ज्ञान आपण कधीच आत्मसात करू शकणार नाही! पण तरीही मी अभ्यास अर्धवट सोडला नाही, माझी तशी हिंमत झाली नाही, कारण मी माझ्या पहिल्या शिक्षकाचे देणे लागत होते. अत्यंत कठीण परिस्थितीच्या वेळी त्यांच्या आठवणीने मला ताकद यायची. इतरांना जे चटकन समजायचे ते समजून त्यावर प्रभुत्व मिळवायला मला प्रचंड सायास करावे लागत, कारण मला अगदी आरंभापासून सारे शिकावे लागत होते.

माध्यमिक शाळेत असतानाच मी दुईशेनला एक पत्र लिहिले होते व मी त्याच्यावर प्रेम करते आहे नि त्याची वाट पाहते आहे असे सांगितले होते. त्याने उत्तर दिले नाही. आणि मी पुन्हा कधीही लिहिले नाही. मला वाटते मी माझा अभ्यास अपुरा सोडू नये म्हणून त्याने स्वतःच्या आणि माझ्या सुखाला नकार दिला. कदाचित त्याचे बरोबर असावे... किंवा दुसरे काही कारण होते का? त्या काळात संशयाने, मानसिक वेदनांनी मला अपरंपार छळले!

मी प्रबंध सादर केल्यावर मॉस्कोत मला पहिली पदवी मिळाली. तो माझा मोठा, महत्त्वाचा विजय होता. त्या धांदलीच्या काळात मला एकदाही घरी जायला जमले नाही. आणि मग युद्धाला तोंड फुटले. त्या शरदाच्या अखेरच्या दिवसात, फ्रुन्झेला जात असताना मी त्या छोटया रेल्वे स्टेशनावर उतरले. खूप खूप वर्षांपूर्वी माझा आणि दुईशेनचा वियोग तेथेच घडला होता. त्या दिवशी नशीब जोरावर होते, आमच्या खेडयाकडे एक बग्गी जाणार होती.

माझ्या प्रिय घराला मी त्या ऐन युद्धाच्या संकटकाळात भेटीला आले होते! माझ्या देशाचे स्वरूप पालटलेले पाहताना, ती नवी खेडी, ती नवी मशागत केलेली शेते, ते नवे रस्ते आणि हे पाहताना आनंदाचे भरते येत होते. पण युद्धाच्या सावल्यांनी त्या आनंदाला ग्रहण लावले होते.

खेडयाजवळ आम्ही आलो तेव्हा माझ्या मनात भावनांचा कल्लोळ उसळला होता. लांबूनच मी नव्या रस्त्यांवर, घरांवर आणि फळबागांवर नजर टाकली आणि नंतर माझे डोळे टेकडीच्या दिशेने वळले. एके काळी आमची शाळा होती तेथे दोन उंच चिनार शेजारी शेजारी उभे होते. त्यांना पाहताच माझा श्वास रोखल्यासारखा झाला. वाऱ्याच्या झुळुकींबरोबर ते हळुवार डोलत होते. आणि त्यावेळी, आयुष्यात प्रथमच, ज्या माणसाला मी नेहमी मास्तर म्हणून संबोधिले होते त्याला, त्याच्या नावाने हाक मारली!

"दुईशेन" मी अस्फुट उद्गारले. "तू माझ्यासाठी जे काही केलंस त्याबद्दल तुझे लाख लाख वेळा आभार मानते दुईशेन! म्हणजे तू सतत माझी आठवण ठेवून होतास तर...

तू तुझं वचन पाळलंस... दुईशेन तू अगदी तुझ्यासारखाच वागलास!"

माझ्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

"काय झालं?" आमच्या तरुण गाडीवानाने काळजीच्या सुरात विचारले.

"काही नाही विशेष. तुला इथं कुणी माहितीचं आहे?"

"हो. मला प्रत्येकजण माहीत आहे."

"तुला दुईशेन माहीत आहे? एके काळी तो इथं शाळेत शिकवायचा."

"दुईशेन? पण तो सैन्यात भरती झालाय. मी त्याला भरती केंद्रात स्वत: घेऊन गेलो होतो आणि याच बग्गीतून तो गेला होता!"

मला सोडून मी त्याला पुढे जायला सांगितले. मी काय करू? माझी आठवण ठेवणाऱ्या लोकांची घरे धुंडाळत फिरू? या अशा वेळी मी तसे करू शकत नव्हते. आणि दुईशेन तिकडे दूर समरांगणी लढत होता. आणि आणखी एक गोष्ट: माझ्या काकाच्या आणि काकीच्या घरात मी कधीही पाऊल ठेवणार नाही अशी शपथ घेतली होती. माणूस अनेक गोष्टींना क्षमा करू शकतो, पण त्यांनी ज्या पद्धतीचा पाशवी गुन्हा केला तशा गुन्ह्याला कुणी क्षमा करील असे मला वाटत नाही. मी परत आले आहे हे त्यांना कळूही नये अशी माझी इच्छा होती. म्हणून मी रस्त्यापासून बाजूला वळले आणि टेकडीवर चिनारांपाशी गेले.

माझे चिनार, माझे सुंदर चिनार! तुम्ही लहान, सडपातळ रोपटी होता तेव्हापासून आत्तापर्यंत पुलाखालून कितीतरी पाणी

वाहून गेलंय! ज्या माणसाने तुम्हाला इथे रोवले आणि तुमची निगराणी केली त्याची सारी स्वप्ने, त्याची सारी भाकिते खरी ठरलीत! मग तुम्ही असे दुःखाने, असे शोकाने का कुजबुजता? उन्हाळा संपला म्हणून तुम्ही शोक करता आहात का? थंड वारे तुमची पाने ओरबाडून काढताहेत म्हणून तुम्ही तक्रार करताहात का? का आमच्या लोकांच्या दुःखाने आणि वेदनेने तुमचे बुंधे कण्हताहेत?

लौकरच हिवाळा येईल, कडाक्याची थंडी पडेल, बर्फाची वादळे होतील हे खरे आहे; पण नंतर पुन्हा वसंताची बहार येईल...

पिवळ्या पडत चाललेल्या त्या पानांची सळसळ ऐकत मी तिथे खूप वेळ थांबले. झाडांच्या मुळांजवळचे आळे नुकतेच साफ केलेले असावे, कारण जमिनीवर कुदळीने खणल्याचे ताजे घाव अद्याप स्पष्ट दिसत होते. ते आळे स्वच्छ पाण्याने काठोकाठ भरले होते व त्यावर बारिक लाट उमटत होती. चिनारांची गळून पडलेली काही पिवळी पाने त्यात तरंगत होती.

मी जिथे उभी होते तेथून शाळेच्या नव्या इमारतीचे छप्पर दिसत होते. टेकडीवरच्या आमच्या जुन्या शाळेचा मागमूसही राहिला नव्हता...

मी रस्त्यापर्यंत परत चालत आले आणि मिळालेल्या पहिल्याच बग्गीतून स्टेशन गाठले.

* * *

युद्ध झाले व नंतर विजयही मिळाला. आपल्या वडिलांच्या चकाशांच्या पिशव्यांमधून मुले अभिमानाने आपली पुस्तके भरून शाळेला जाऊ लागली. बायकांना पुरुषांच्या कामांमधून मोकळे

करायला पुरुष परत आले आणि युद्धामुळे विधवा झालेल्या स्त्रियांचे अश्रू आटून गेल्यानंतर त्यांनी हळूहळू आपल्या एकटेपणाशी जुळवून घेतले. काही मात्र आपल्या प्रियजनांच्या परतीची आशा धरून वाट पहात राहिल्या.

आणि मलाही दुईशेनबद्दल काहीच समजले नाही. कुरकुरेयूहून शहरात येणारी माणसे सांगत की, बेपत्ता झालेल्या लोकांच्या यादीत त्याचे नाव आहे. खेड्यातल्या सोविएतला एवढेच कळविण्यात आले आहे असे ती सांगत.

"कदाचित तो मारला गेला असावा," ते लोक म्हणत. "खूप दिवस उलटून गेलेत आणि त्याचा अजून पत्ता नाही."

म्हणजे माझे मास्तर परत येत नव्हते. ज्या दिवशी आम्ही एकमेकांचा निरोप घेतला तो अविस्मरणीय दिवस आमचा अखेरचा ठरला होता तर...

माझ्या अंतःकरणात एवढे दुःख आणि एवढा शोक दाटून राहिला आहे याची ही गतजीवनातली पाने उलटेपर्यंत मला कधीही कल्पना नव्हती.

१९४६ च्या शरदाच्या अखेरीस मला तोम्स्कच्या विद्यापीठात कामगिरीवर पाठविण्यात आले.

सैबेरियातला तो माझा पहिलाच प्रवास होता. शरदाच्या अखेरच्या दिवसातल्या त्या वातावरणात सारा प्रदेश उदास आणि भयाण भासत होता. वर्षानुवर्षांची जंगले एखाद्या काळ्याकभिन्न भिंतीसारखी लांबचलांब पसरलेली दिसत होती. मध्ये मध्ये काही मोकळ्या भागात छोट्या घरांच्या छपरांचे काळे ठिपके दिसत होते आणि चिमण्यांमधून पांढऱ्या धुराच्या बारिक रेषा उमटत होत्या. गार पडलेल्या ओसाड शेतांवर

पहिल्या बर्फाचा थर साचू लागला होता. विस्कटलेले कावळे त्यांच्यावर घिरट्या घालीत होते. बहुतेकवेळा आकाश भरून आलेले दिसत होते.

पण माझ्या डब्यातील सहकाऱ्यांबरोबर एकही क्षण कंटाळवाणा जात नव्हता. युद्धात अधू झालेला, कुबड्या घेतलेला एक माणूस सैन्यातल्या मजेदार गोष्टी सांगून व विनोद करून आम्हाला भरपूर हसवत होता. खऱ्या घटनांवर आधारलेले त्याचे किस्से तिखट आणि विनोदी असले तरी दुष्टाव्याने भरलेले, कुणाला अपाय करणारे नव्हते. त्याच्याजवळचा गोष्टींचा खजिना कधी रिता होईल असे वाटत नव्हते. आगगाडीतल्या प्रत्येकाला तो माणूस आवडला. नोवोसिबिर्स्क आम्ही मागे टाकले आणि नंतर एका सिग्नलपाशी आगगाडी मिनिटभर थांबली. त्याने सांगितलेल्या विनोदावर हसत मी खिडकीपाशी बाहेर पहात उभी होते. गाडी पुन्हा चालू झाली आणि आमचा डबा स्विचमनच्या त्या एकाकी छोट्या खोपटाजवळून जात असताना मला एकदम एक धक्का बसला. मी एकदम खिडकीपासून मागे आले आणि पुढल्याच क्षणी मी खिडकीच्या तावदानावर चेहरा दाबला. तो दुईशेन होता, तो तिथे होता! हातात छोटा झेंडा घेऊन तो त्या खोपटाबाहेर उभा होता. मला वाटते माझे डोके फिरले होते.

"थांबा!" मी उंच स्वरात किंचाळले आणि डब्याच्या दुसऱ्या टोकाशी धावले. मी काय करणार याची काही कल्पना नसतानाच मी आणीबाणीच्या काळात वापरायचे ब्रेक पाहिले. मी साखळी खेचली.

डबे एकमेकांवर आपटले, इंजिनाने अचानक ब्रेक लावला व तसेच ते मागे सरले. वरच्या फळयांवरून सूटकेसिस खाली कोसळल्या, टेबलांवरून काचेची भांडी खळखळत पडली, बायका किंचाळल्या, पोरे ओरडू लागली आणि कुणीतरी मोठ्यांदा ओरडले: "माणूस गाडीखाली सापडला!"

मी एव्हांना डब्याच्या पायऱ्यांवर होते. काहीही न बघता मी खाली उडी झोकून दिली आणि तशीच सुसाट त्या खोपटाकडे दुईशेनच्या दिशेने धावत सुटले. माझ्या मागे आगगाडीच्या गार्डाच्या शिट्या ऐकू येत होत्या. प्रवासीही खाली उतरून माझ्यामागे धावत होते.

मी सारी गाडी धावत पार केली. दुईशेन माझ्या दिशेने धावत येत होता.

"दुईशेन! मास्तर!" मी ओरडले.

तो माणूस थांबला आणि धास्तावल्या नजरेने माझ्याकडे बघत राहिला. तो खरेच दुईशेन होता, चेहरा आणि डोळे त्याचेच होते, फक्त तो वयाने थोडा अधिक होता आणि त्याने मिशा राखल्या होत्या.

"काय अडचण आहे तुमची ताई?" त्याने मला दयाळूपणे कझाख भाषेत विचारले. "तुम्ही मला चुकीनं दुसरा कुणीतरी समजला आहात. मी इथला स्विचमन, माझं नाव बैनेयू."

"बैनेयू?"

निराशेमुळे, दुखावल्यामुळे आणि शरमेमुळे तोंडून फुटणारी किंचाळी बाहेर पडू नये म्हणून मी दात गच्च आवळले. काय केले मी हे! मी हातांनी तोंड झाकून घेतले व मान खाली घातली. पृथ्वी मला पोटात का घेत नव्हती? त्या स्विचमनची

मला क्षमा मागितली पाहिजे आणि एकदम घाबरविल्याबद्दल प्रवाशांचीही मी माफी मागितली पाहिजे हे मला समजत होते, पण मी तिथे नुसतीच मुखस्तंभासारखी उभी राहिले. माझे सहप्रवासीही गप्प उभे होते. त्यांनी माझ्यावर सपाटून रागवावे असे मला वाटत होते, पण कुणीही काहीही बोलले नाही. आणि त्या भयाण शांततेत एका बाईने अस्पष्ट हुंदका दिला.

"बिचारी, त्या माणसाला चुकून ती आपला नवरा किंवा भाऊ समजली असावी!"

आता जमावात सजगता आली.

"काय गोष्टी घडतात एकेक!" कुणीतरी खोल आवाजात म्हणाले. "पण युद्धात काय घडायचं बाकी राहिलं? कोणत्या दिव्यातून आपण जायचं बाकी राहिलं?" एका बाईचा कापरा आवाज उत्तरला.

त्या स्विचमनने माझे हात माझ्या चेहऱ्यापासून बाजूला केले आणि तो म्हणाला:

"चला, जाऊ या. मी तुम्हाला तुमच्या डब्यापर्यंत पोचवतो. गारठा वाढत चाललाय."

त्याने माझ्या दंडाला धरले. एका अनोळखी लष्करी अधिकाऱ्याने दुसऱ्या हाताला धरले.

"चला कॉम्रेड. आम्ही तुमच्या भावना समजतो," तो म्हणाला.

लोकांनी मला वाट करून दिली आणि अंत्ययात्रेला निघालेल्या मुख्य शोकाकुल व्यक्तीप्रमाणे मी निघाले. मी हळूहळू चालत होते व बाकीचे माझ्या मागून येत होते.

गाडीतले बाजूला उभे राहिलेले इतर प्रवासीही शांतपणे आमच्या मिरवणुकीत सामील झाले. कुणीतरी लोकरी शाल माझ्या खांद्यावर टाकली. कुबड्या घेतलेला तो माणूस माझ्या अगदी मागेच चालत होता. मधून मधून तो आमच्या बरोबरीने पुढे यायचा व काळजीने माझ्या चेहऱ्याकडे बघायचा. हा थोर विदूषक, हा आनंदी, दयाळू आणि धाडसी माणूस डोक्यावर टोपी न घालता चालत होता. मला वाटते तो रडत होता. मीही रडत होते. आणि त्या आगगाडीजवळून निघालेल्या आमच्या मिरवणुकीत तारेच्या खांबांमधून व वरच्या तारांमधून ऐकू येणारे आवाज शोकयात्रेतील संगीतासारखे भासत होते. "नाही, मी त्याला पुन्हा कधीही पाहणार नव्हते."

आम्ही डब्याजवळ पोहोचलो तेव्हा मुख्य कंडक्टरने मला थांबवले. तो रागाने मोठमोठ्याने बोलत होता आणि माझ्याकडे बोट दाखवून गुन्ह्याची जबाबदारी व दंड वगैरेबद्दल काहीतरी सांगत होता. मी माझ्या समर्थनार्थ काहीच बोलले नाही. माझ्या दृष्टीने कशालाच काही अर्थ नव्हता. त्याने माझ्या हाती निवेदन खुपसले आणि तेथल्या तेथे सही करायचा आग्रह धरला. पण त्याने दिलेली पेन्सिल हाती धरण्याचेही माझ्या अंगात बळ राहिले नव्हते.

आणि त्या क्षणी तो कुबड्या धरलेला माझा सहप्रवासी पुढे झाला व त्या माणसाच्या हातातून कागद खेचून त्याच्या अंगावर जात तो जोराने खेकसला :

"तिला त्रास देऊ नका! मी सही करतो, मी साखळी खेचली, मी जबाबदारी पत्करतो!"

सैबेरियाच्या त्या भूमीत, त्या पुरातन रशियन भूमीत गमावलेला वेळ भरून काढण्यासाठी आगगाडी अधिक वेगाने धावू लागली. कुणीतरी गिटारवर धून वाजवीत होते आणि रात्रीच्या त्या वातावरणात त्या संगीताला कारुण्याची झालर जाणवत होती. रशियन विधवांचे ते शोकपूर्ण गीत मी माझ्या अंतःकरणात सामावून निघाले – युद्धानंतर घडलेल्या परिणामांची माझी एक शोकभरी आठवण!

वर्षे उलटत होती. भूतकाळ मागे सरला आणि भवितव्याच्या लहानमोठ्या चिंता मनाला सतत गुंतवीत होत्या. मी आयुष्यात खूप उशिरा लग्न केले. माझा नवरा फार चांगला माणूस आहे. आम्हाला मुले आहेत, आमचे कुटुंब सुखी-समाधानी आहे. मी आता तत्त्वज्ञानाची डॉक्टर आहे. मला बराच प्रवास करावा लागतो. मी अनेक देशांना जाऊन आले... पण मी कुरकुरेयूला परत कधीही गेले नाही. त्याला माझ्यापाशी कारणे आहेत, खूप कारणे आहेत, पण मी त्याबद्दल स्वतःचे समर्थन करीत नाही. माझ्या जन्मगावाचे सारे पाश तोडणे हे वाईट आहे, अक्षम्य आहे. पण असे आहे खरे! मी भूतकाळ विसरलेले नाही, नव्हे मी विसरूच शकत नाही, फक्त मी त्याच्यापासून वाहवत दूर गेले आहे.

त्या डोंगरातल्या छोट्या झऱ्यांची आठवण मनात उमटते. नवा रस्ता झालाय, त्या ओढ्याकडे जाणारा रस्ता विसरला गेलाय. क्वचित कुणी वाटसरू तिकडे पाणी प्यायला जातो. हल्ली तिथे पुदिन्याची व काटेरी झाडांची दाटी वाढलीय. आणि लौकरच कदाचित तेथे झरा होता की नाही अशी

परिस्थिती तुमच्या दृष्टोत्पत्तीस येईल. अगदी केव्हातरी एखाद्या उन्हाळ्याच्या तापत्या दिवसात कुणालातरी त्या ओढ्याची आठवण होईल, तो वहिवाटीचा रस्ता सोडून आडवाटेला तहान भागवायला जाईल. त्या दुर्लक्षित झऱ्याकडे जेव्हा तो जाईल आणि फांद्या बाजूला सारून जेव्हा त्या स्वच्छ, निर्मळ, शांत पाण्याकडे पाहील तेव्हा आश्चर्याने तो थक्क होईल. त्या पाण्यात तो स्वतःचे प्रतिबिंब पाहील, सूर्य पाहील, आकाश पाहील आणि स्वतःशीच म्हणेल की, एवढी सुंदर जागा माहीत नसणे म्हणजे महापाप आहे. आपल्या दोस्तांना या जागेची माहिती द्यायचा तो निश्चय करील. पण पुन्हा पुढल्या वेळेपर्यंत तो ही गोष्ट विसरून जाईल.

अनेकवेळा आयुष्यातही असे घडते. पण कदाचित असे घडणेच योग्य असावे...

कुरकुरेयूच्या माझ्या अलिकडील भेटीने अशा झऱ्याची मला आठवण झाली.

मी अशी अचानक गाव सोडून निघून का आले याचे अर्थातच तुम्हाला कोडे पडले असणार. मी तिथे होते तेव्हा लोकांना ही गोष्ट सांगू शकत नव्हते का, असेही तुम्ही विचाराल. नाही, मी तसे करू शकत नव्हते. मी इतकी बेचैन होते, स्वतःची एवढी शरम वाटत होती की, मी तिथून ताबडतोब निघायचा निर्णय घेतला. मी दुईशेनला तोंड दाखवू शकत नव्हते, त्याच्या नजरेला सरळ नजर भिडवायची माझी हिंमत होणार नव्हती हे मला ठाऊक होते. मला स्वतःला सावरायला हवे होते, प्रत्येक गोष्टीवर शांतपणे विचार करायला

हवा होता, केवळ आपल्या गावकऱ्यांनाच नव्हे तर त्याशिवाय इतर लोकांनाही काय सांगायचे यावर चिंतन करायला हवे होते.

मला आणखी दुसऱ्या एका कारणासाठीही शरम वाटत होती : माझ्यावर साऱ्यांनी लक्ष केंद्रित केले ते बरोबर नव्हते, शाळेच्या उद्घाटन समारंभाला गौरवस्थानी माझी नेमणूक केली होती हे योग्य झाले नव्हते. तो आमच्या पहिला मास्तरांचा मान होता, आमच्या गावातल्या पहिल्या कम्युनिस्टाचा – दुईशेनचा – मान होता. तेथे असलेल्या सर्व लोकांमध्ये त्याचा सर्वांत प्रथम हक्क होता. पण प्रत्येक गोष्ट वेगळी घडत गेली. आपण सारे मेजवानी झोडत होतो आणि तो शुद्ध सोन्यासारखा कसदार माणूस आमच्या अभिनंदनाच्या तारा वेळेवर पोचविण्यासाठी जिवाचे रान करून घोड्यावरून दौडत होता, पुन्हा नंतर दुसरी पत्रे वाटायला तसाच लगबगीने निघून गेला होता.

अशा गोष्टी घडताना मी पूर्वी पाहिल्या आहेत. ही काही आगळी घटना घडली असे मुळीच नव्हे. आणि म्हणूनच मी स्वतःला विचारते आहे : लेनिन ज्या पद्धतीने सामान्य माणसाचा आदर राखीत तसा आदर राखायला आपण केव्हा-पासून विसरलो? अशा गोष्टींबाबत ढोंग न करता आपण आता मोकळेपणाने बोलतो याचा मला आनंद वाटतो. निदान या बाबतीत तरी आपण लेनिन यांच्या खूप जवळ आलो ही फार चांगली गोष्ट घडली आहे.

कुरकुरेयूच्या तरुणांना दुईशेन हा किती चांगला मास्तर होता हे ठाऊक नाही. अनेक जुनी माणसे आता हयात नाहीत. दुईशेनचे अनेक विद्यार्थी युद्धात मारले गेले. म्हणून नव्या

पिढीला दुईशेन मास्तरांबद्दल सांगणे हे माझे कर्तव्य होते. माझ्या जागी कुणाही माणसाला हे करणे अगत्याचे ठरले असते. पण मी कुरकुरेयूला कधीच गेले नव्हते, दुईशेनची मला काहीच बातमी नव्हती आणि काळाच्या गतीबरोबर त्याची प्रतिमा माझ्या स्मरणाच्या कप्प्यातील एक बहुमोल जुना ठेवा बनला होता.

माझ्या मास्तरांना भेटायला मला परत जायचे आहे, त्यांच्यापुढे जबाब द्यायला उभी राहणार आहे. मला क्षमा करा म्हणून त्यांच्याजवळ याचना करणार आहे.

मॉस्कोतले माझे काम संपल्यानंतर मी कुरकुरेयूला परत जाणार आहे आणि नव्या वसतीगृहाच्या शाळेला दुईशेनचे नाव द्या म्हणून सांगणार आहे. होय, सामुदायिक शेताचा एक सर्व-सामान्य सदस्य, त्याचा पोस्टमन, दुईशेन! तुम्ही, माझे गाववाले मला याबाबतीत पाठिंबा द्याल अशी आशा आहे. कृपया तसे करावे.

आत्ता रात्रीचा एक वाजलाय. माझ्या बाल्कनीत उभी राहून मी शहरी दिव्यांचा सागर पाहते आहे आणि मनात योजते आहे की, लौकरच एक दिवस मी कुरकुरेयूला परत जाईन, माझ्या मास्तरांना पुन्हा पाहीन आणि त्यांच्या पिकल्या दाढीचे चुंबन घेईन...

* * *

मी खिडक्या सताड उघडतो. ताज्या हवेचे स्रोत माझी खोली भरून टाकतात. त्या मंद फिकट निळ्या प्रकाशात माझ्या नव्या चित्रासाठी मी स्केचेस्ची चळत एकाग्रतेने पहात

राहतो. स्केचेस अनेक आहेत, कारण सुरुवातीला मला पुन्हा पुन्हा हात घटवावा लागतो. पण सबंध चित्र उभे रहायला अद्याप फार अवकाश आहे. अजून मला ती मूळ गोष्टच गवसलेली नाही. विरत जाणाऱ्या रात्रीच्या त्या शांततेत मी खोलीत येरझाऱ्या घालीत विचार करीत राहतो. विचार, विचार, विचार... हे असे दरवेळी घडते. आणि दरवेळी मला जाणवते की, माझे चित्र म्हणजे एक अमूर्त कल्पनाच राहिली.

तरीही, माझ्या अद्याप न रंगवलेल्या चित्राबाबत मला तुमच्याशी बोलायचे आहे. तुमचा मला सल्ला हवाय. अर्थात तुम्हांना तुम्ही तर्काने जाणले असेलच की, आमच्या गावच्या पहिल्या मास्तरांना, आमच्या पहिल्या कम्युनिस्टाला – दुईशेनला ते अर्पण करायचे आहे.

पण या लढवय्याच्या जीवनातील गुंतागुंत, त्या जीवनात आलेल्या विविध मानवी व्यक्तिरेखा आणि विविध भावनांचा उमटलेला उत्फुल्ल कल्लोळ रंगांमधून मी व्यक्त करू शकेन किंवा नाही याची मला खात्री वाटत नाही. हा काठोकाठ भरलेला प्याला मला सांडून चालणार नाही, मला तो तुमच्यापर्यंत – माझ्या समकालीनांपर्यंत – सुरक्षित पोचवला पाहिजे, पण हे कसे करायचे? केवळ माझी कल्पना तुमच्यापर्यंत पोचवून मला चालणार नाही, माझे चित्र मला आपली सामायिक निर्मिती केले पाहिजे. पण ते कसे करायचे?

मला हे चित्र रंगविलेच पाहिजे आणि तरीही माझ्या मनात अनेक शंका वै संशय आहेत. काही वेळा मला असे वाटते की, मला काहीच जमत नाही. पण मग नंतर मी

विचार करतो: मग दैवाने मला चित्रकार का बनवले? हा निव्वळ छळवाद आहे! दुसऱ्या वेळी मला मी खूप ताकदवान असल्याचा भास होतो, पर्वताला लोटण्याचे सामर्थ्य अंगी संचारते! आणि मग मी स्वत:ला सांगतो: निरीक्षण कर, अभ्यास कर आणि मग निवड कर. दुईशेन आणि आल्तीनाईचे चिनार रंगव, या चिनारांमागची कथा तुला माहीत नव्हती तरी लहानपणापासून तू ज्यांच्यावर खूप प्रेम करीत आलास ते चिनार रंगव! उन्हाने रापलेल्या चेहऱ्याचा एक अनवाणी मुलगा त्याला चढता येईल तेवढ्या उंच फांदीवर चढून अद्‌भुत रहस्यमय वातावरणाकडे लुब्ध नजरेने एकटक पाहतोय असे रंगव.

किंवा तुझ्या चित्राला "पहिले मास्तर" असे नाव दे आणि पुढील प्रसंग चित्रीत कर: दुईशेन मुलांना घेऊन ओढा ओलांडतोय आणि अत्यंत मूर्ख अशी लाल केसाळ टोप्यांमधली दोन माणसे तुळतुळीत घोड्यांवरून जाताना त्याची टिंगल करताहेत.

किंवा रेल्वे स्टेशनावरचा त्यांचा निरोपाचा प्रसंग रंगव. दुईशेनची हाक आठवते? तर मग तुझे चित्र म्हणजे दुईशेनची हाक उमटू दे. ही हाक आल्तीनाईला आजही ऐकू येईल, चित्र पाहणाऱ्या प्रत्येकाच्या काळजात तिचा पडसाद उमटू दे.

मी स्वत:ला हे असे सांगतोय. मी स्वत:ला अशा अनेक गोष्टी सांगतो, पण त्या सगळयाच प्रत्यक्षात उमटत नाहीत... मी काय रंगवणार हे मला अद्याप ठाऊक नाही. पण मला एक गोष्ट नक्की माहीत आहे: मी प्रयत्न सोडणार नाही.

धरतीमाता

बाबा, या धरणीवर तुम्ही कोठे
चिरनिद्रा घेत आहात ते मला
ठाऊक नाही. तोरेकुल ऐत्मातोव,
मी हे तुम्हाला अर्पण करतो.

आई, आम्हा चौघांना तू लहानाचे
मोठे केलेस. नगिमा ऐत्मातोवा,
मी तुला हे अर्पण करतो.

१

नुकतेच घरात धुवून इस्त्री केलेले, पांढरेस्वच्छ कपडे तिने परिधान केले आहेत, डुलईदार काळे जाकीट अंगात घातले आहे व डोक्याला पांढराशुभ्र रुमाल बांधून ती लगबगीने शेतातल्या खुंटांमधून वाट काढीत चालली आहे.

आसमंतात चिटपाखरू नाही. उन्हाळा सरला आहे. शेतात कोणतेही आवाज ऐकायला येत नाहीत, धाणीने माखलेल्या रस्त्यांवर लॉऱ्या धुळीचे लोट उठवीत नाहीत, क्षितिजरेषेवर पीककापणी यंत्रे दिसत नाहीत आणि पीककापणी झाल्यानंतर उरलेल्या खुंटांमध्ये अद्याप कळप चरायला सोडलेले नाहीत.

उंच चढाच्या राखाडी रस्त्यापल्याड शरदातले स्तेप दूरपर्यंत धुंदकारत गेलेले दिसत आहे. धुरकट ढगांच्या रांगा त्या स्तेपवरून निःशब्दपणे पुढे सरकताहेत. वाराही आवाज न करता शेतामधून धावतोय, पिसार गवतावर आणि वाळल्या शेवाळावर लाटा उमटवतोय व हळूच चोरपावलांनी नदीकडे पसार होतोय. सकाळच्या थिजलेल्या दंवाने ओल्या झालेल्या गवताचा गंध सर्वत्र दरवळला आहे. कापणीनंतर धरती विश्रांती घेतेय. लौकरच हवा बाईट होईल, पाऊस कोसळू लागेल, पहिला हिमवर्षाव धरणीला झाकून टाकील आणि हिमवादळे गर्जू लागतील. पण आत्ता मात्र सारे कसे शांत शांत आहे.

तिला अडवू नका. ती थांबलीय आणि म्हातारपणाने थकलेल्या नजरेने आसपास पाहतेय.

"काय ग धरणीमाते," ती हळूच साद घालते.

"काय ग तोल्गोनाई, शेवटी आलीस तर? बरीच म्हातारी झालीस. तुझे केस पांढरे झालेत.- आणि हातात काठी पण धरून चालते आहेस."

"होय, आता मी म्हातारी होत चाललेय. आणखी एक वर्ष उलटलं आणि धरणीमाते, तू आणखी एक पीक दिलंस. आज स्मरणाचा दिवस आहे."

"माहीत आहे मला. मी तुझी वाट पहात होते तोल्गोनाई. पण पुन्हा तू एकटीच आलीस?"

"होय, तुला हे दिसतेय, पुन्हा एकटीच मी आले आहे."

"तोल्गोनाई, याचा अर्थ अजून तू त्याला सांगितलं नाहिस?"

"नाही, मला धीर झाला नाही."

"त्याला कुणीच कधीही काही सांगणार नाही असं वाटतं तुला? योगायोगानं त्याला कुणी काही सांगणार नाही असं वाटतं तुला?"

"मला ठाऊक आहे. आज ना उद्या त्याला सारे समजेल. तो आता आणखी मोठा झालाय, दुसऱ्यांना विचारून तो माहिती करून घेईल. पण माझ्या नजरेला अजून तो बच्चा आहे. आणि मला भीती वाटते, काहीही सांगायला खूप भीती वाटते."

"तोल्गोनाई, माणसाला सत्य समजलेलं बरं असतं."

"मान्य आहे. पण मी त्याला कशी सांगू? जे मला ठाऊक आहे, माझ्या लाडक्या धरणीमाते जे तुला ठाऊक आहे, जे सर्वांना ठाऊक आहे ते केवळ त्याला एकट्याला माहीत नाही. आणि जेव्हा त्याला समजेल तेव्हा त्याला काय वाटेल, जे काही घडलं त्याकडे तो कोणत्या नजरेनं पाहील? त्याचं मन आणि अंत:करण त्याला सत्याच्या मार्गावर नेईल? तो अजून मुलगाच आहे. म्हणून मी काय करावं याची अद्याप निश्चिती होत नाही, जीवनाकडं त्यानं पाठ फिरवू नये म्हणून मी काय केलं पाहिजे ते अजून समजत नाही. त्यानं सर्व गोष्टींना धीटपणं सामोरं जावं अशी माझी इच्छा आहे.

एखाद्या परीकथेप्रमाणं अगदी थोड्या शब्दात साधेपणानं त्याला हे सांगून टाकता आलं असतं तर किती छान झालं असतं! अलिकडं याशिवाय दुसरा विचारच डोक्यात येत नाही. कुणास ठाऊक, मी पटकन मरून जायची. गेल्या थंडीत मी आजारी पडून अंथरुणाला खिळले तेव्हाच माझी अखेर जवळ आली असं वाटलं होतं. मी मरणाला घाबरत नाही – ते आलं असतं तर हसत मी त्याला सामोरी गेले असते – पण त्याचे डोळे उघडायला अवसर मिळाला नसता. त्याच्याबद्दलचं सत्य माझ्याबरोबरच थडग्यात येणार अशी मला भीती वाटली होती. मी एवढी अस्वस्थ का होते हे त्याला समजत नव्हतं. त्याला माझी काळजी वाटत होती, शाळेतही न जाता तो घरी थांबून राहिला, सतत माझ्या बिछान्याशेजारी बसून राहिला. तो अगदी आपल्या आईची प्रतिमा आहे. तो सारखा विचारायचा – 'आजी, ए आजी! मी तुला औषध देऊ का? थोडं पाणी देऊ का? आणखी पांघरूण हवं का?' पण माझा धीर गोळा होत नव्हता, काहीही सांगायची मला हिंमत होत नव्हती. तो इतका बिनधास्त आहे, इतका निष्पाप आहे. काळ भराभरा उडून चाललाय आणि संभाषणाला आरंभ कसा करावा तेच मला सुचत नाहीय. मी इकडून तिकडून खूप विचार करते, पण शेवटी नेहमी त्याच निष्कर्षाला येते. जे काही घडलं त्याचं अचूक आकलन त्याला व्हायला हवं असेल, जीवनाला योग्य तऱ्हेनं त्यानं समजून घ्यायला पाहिजे असेल, तर केवळ त्याच्याबद्दलच मला सांगून चालणार नाही, तर माझ्याबद्दलही आणि माझ्या काळाबद्दल त्याला सांगितलं पाहिजे; धरणीमाते,

तुझ्याबद्दल, आपल्या आयुष्याबद्दल, इतकंच काय तर ज्या निःशंक मनानं तो सायकलवरून शाळेला जातो त्या सायकलबद्दलही त्याला सांगितलं पाहिजे. कदाचित हाच एकमेव योग्य मार्ग आहे. कारण काहीच टाकता येत नाही, काहीच भर घालता येत नाही: जीवनानं आपणा सर्वांना एकाच मिश्रणात एकत्र कालवलंय, आपणा सर्वांना एकाच गाठीत बांधून टाकलंय. आणि ही कथा अशी आहे की, प्रत्येक जाणत्याला त्यातून आपला मार्ग स्पष्ट दिसेलच असं नाही. ती तनमनानं अनुभवून जाणायची. म्हणून मी सारखी विचार करीत राहते. हे माझं कर्तव्य आहे याची मला जाणीव आहे आणि ते पार पाडलं म्हणजे मी मरणाला घाबरणार नाही..."

"बैस तोल्गोनाई. अशी उभी राहू नको, दमलेत तुझे पाय. त्या दगडावर बैस. आपण या सर्वांचा पुन्हा एकदा मिळून विचार करू या. तोल्गोनाई, तू इथं पहिल्यांदा आलीस ते दिवस आठवतात?"

"आठवणं अवघड आहे. तेव्हापासून इतकं काही घडून गेलंय."

"प्रयत्न तर करून पहा. अगदी आरंभापासून सर्व काही आठवायचा प्रयत्न कर."

२

मला अस्पष्ट आठवते की, मी जेव्हा अगदी लहान होते तेव्हा हंगामाच्या दिवसात मला हाताला धरून ते इथं आणायचे आणि गवताच्या गंजीच्या सावलीत मला बसवून

ठेवायचे. मी रडू नये म्हणून माझ्या हाती भाकरीचा एक तुकडा चघळायला ठेवून जायचे. आणि मी थोडी मोठी झाल्यानंतर इथे पळत पळत यायची व पिकाची राखण करीत बसायची. वसंतामध्ये ते इथून डोंगरात कळप हाकलत न्यायचे. त्यावेळी मी म्हणजे केसाच्या झिपऱ्या सोडलेली नि पायाला भिंगरी लावलेली मुलगी होते. लहानपण म्हणजे किती सुंदर, निष्काळजी काळ! पिवळ्या खोऱ्यातून गुराखी कळप घेऊन यायचे ते मला आठवतेय. एकापाठोपाठ एक गुरांचे कळप येत रहायचे व थंडगार डोंगरकुरणांकडे जायचे. आता मी त्याचा विचार करते तेव्हा मी किती मूर्खासारखी वागायची याची जाणीव होते. एखाद्या वादळासारखे गडगडत गुरांचे कळप स्तेपमधून दौडत यायचे. तुम्ही त्यांच्या वाटेत आलात तर क्षणात तुमचा चेंदामेंदा झालाच समजा. धुळीचे लोट मैलभर आकाशात उंच उठायचे. पण मी गव्हाच्या शेतात लपून बसायची आणि एखाद्या जनावरासारखी अचानक त्यांच्यासमोर उडी घालून त्यांना घाबरवायची. घोडे घाबरून चार पावले मागे सरकायचे आणि गुराखी माझा पाठलाग करायचे.

"ए कारटे, थांब जरा! हातात सापडलीस म्हणजे दावतो इंगा!" माझ्या मागे धावताना ते ओरडायचे.

पण मी त्यांना चकवायची आणि ओहळाच्या उतारात गुडुप व्हायची.

दिवसांमागून दिवसापर्यंत तांबारल्या रंगाच्या मेंढ्या आपल्या लठ्ठ शेपट्या हलवीत धुळीतून जात रहायच्या आणि त्यांच्या खुरांचा आवाज गारांच्या सड्यासारखा ऐकू येत

रहायचा. काळवंडल्या चेहऱ्याचे मेंढपाळ मेंढयांच्या कळपांना पुढे हाकलीत न्यायचे. त्यांच्या नंतर श्रीमंत खेडयांमधले भटक्यांचे तांडे आपल्या उंटांच्या काफल्यांबरोबर यायचे. त्यांच्या उंटांवरच्या खोगीरांना घोडीच्या आंबवलेल्या दुधाचे बुधले बांधलेले असायचे. रेशमी कपडयातल्या तरुण मुली व नववधू हिरव्यागार कुरणांची आणि स्वच्छ पाण्याच्या झऱ्यांची गाणी म्हणत आपल्या बागडत जाणाऱ्या घोडयांवरून डौलाने जायच्या. मी चकित होऊन, भान हरपून त्यांच्याकडे पहात रहायची व त्यांच्या मागून धावायची: "असा पोषाख आणि अशी गोंडेदार शाल माझ्याजवळ असती तर किती मजा आली असती!" दृष्टीच्या टप्प्यापल्याड त्या अदृश्य होईपर्यंत मी स्वप्नरंजनात मश्गुल व्हायची. त्यावेळी मी कोण होते? मजुरीवर शेतात काम करणाऱ्याची एक अनवाणी मुलगी. आपली कर्जे चुकती करण्यासाठी माझा आजा आयुष्यभर नांगर ओढीत होता आणि तेच पुढे कुटुंबात चालू होते. मी कधी रेशमी पोषाख ल्यायले नाही, तरी मोठी झाले तेव्हा मी आकर्षक तरुणी म्हणून ओळखली जाऊ लागले. माझी सावली पहायला मला आवडायची. माझ्या सावलीला पहात मी तिच्याबरोबर अशी चालत रहायची की, जणू स्वत:ला आरशात पाहून मी माझ्या प्रतिबिंबाचे कौतुक करते आहे! खरेच मी मोठी विचित्र मुलगी होते. कापणीच्या दिवसात मी सुवानकुलला भेटले तेव्हा सतरा वर्षांची असेन. त्या वर्षी तो वेर्खनी तलास गावातून मजुरी करण्यासाठी मैदानावर आला. आत्तासुद्धा मी डोळे मिटले, तर त्यावेळी तो जसा दिसायचा तस्सा नजरेसमोर उभा राहतो. त्यावेळी

तो अवघा एकोणीस वर्षांचा असावा. त्याच्याजवळ एक सदराही नव्हता, पण आपल्या उघड्या खांद्यावर ठुलईदार जुनाट जाकीट टाकून तो फिरायचा. उन्हाने तो एवढा काळवंडला होता की, भाजून काढल्यासारखा दिसायचा; त्याच्या गालाची हाडे तापवलेल्या तांब्यासारखी चकाकायची. दिसायला जरी तो रोड वाटला तरी त्याची छाती भरदार होती आणि दंड पोलादाच्या कांबीसारखे होते. त्याच्यासारखा काम करणारा माणूस क्वचित सापडतो. अगदी भुईशी लागून तो सहजपणे गहू छाटायचा. तुम्हाला फक्त विळयाचा आणि कापलेल्या कणसांचा आवाज ऐकू येत रहायचा. काम करताना ज्यांना बघत रहावे अशी काही माणसे असतात. सुवानकुल अशा लोकांपैकी एक होता. मी खूप वेगाने पीक कापायची असे लोक म्हणायचे, पण मी त्याची कधीही बरोबरी करू शकले नाही. सुवानकुल भराभरा कणसे कापीत पार पुढे निघून जायचा, मग मागे नजर टाकायचा आणि मला मदत करायला यायचा. पण त्याच्या या वागण्याने माझा अभिमान दुखावायचा आणि मी रागावून त्याला हाकलून देत म्हणायची:

"कुणी सांगितलं तुला मागं परत यायला? मला राहू दे एकटीला, तुझ्याशिवाय करीन मी माझं काम!"

पण तो अपमान वाटून घ्यायचा नाही. गालातल्या गालात हसून मुकाट काम करीत रहायचा: मी त्याच्याशी असे वैर का धरायची? अगदीच मूर्ख मुलगी होते की नाही मी?

आम्ही नेहमी कामावर सर्वांआधी पहिले हजर होत असू. पहाट नुकती कुठे फुटते आहे, सारेजण अजून गाढ

माखरझोपेत आहेत, अशा वेळी आम्ही शेताकडे निघत असू. खेड्याच्या टोकाशी, आमच्या जाण्याच्या रस्त्यावर सुवानकुल नेहमी माझी वाट पहात थांबायचा.

"आलीस," तो म्हणायचा.

"मला वाटलं तू केव्हाचा निघून गेलास," मी नेहमी उत्तरादाखल म्हणायची. अर्थात तो माझ्याशिवाय कधीही जाणार नाही हे मला ठाऊक असायचे.

आणि मग आम्ही दोघे बरोबर जात असू.

दरम्यान पहाट उजाडायची, डोंगराची उंच बर्फाळ शिखरे सोनेरी रंगात न्हाऊन निघायची आणि स्तेपवरून वाहणारा वारा अगदी नितळ, निर्मळ असायचा. उन्हाळ्यातल्या या पहाटवेळा म्हणजे आमच्या प्रेमाचा उष:काल होता. आम्ही बरोबर चालू लागलो म्हणजे एखाद्या परीकथेतल्याप्रमाणे सारे जग अद्‌भुत भासायचे. आणि गव्हाळी रंगाचे नांगरलेले शेत जगातील सर्वात सुंदर शेत वाटायचे. लौकर जागा झालेला चंडोल पक्षी आमच्याबरोबरच त्याला भेटायचा. तो उंच, उंच आकाशात भरारी घेऊन तिथेच काही काळ ठिपक्यासारखा तरंगत रहायचा, माणसाच्या काळजासारखा थरथरत फडफडत रहायचा आणि त्याचे गाणे तिथून आनंदाने गुंजत रहायचे.

"बघ, बघ, आपला चंडोल गातोय!" सुवानकुल म्हणायचा.

काय गंमत पहा, आमचा स्वत:चा चंडोल पक्षीसुद्धा होता!

आणि ती चांदणी रात्र? कदाचित अशी चांदरात पुन्हा कधीही होणार नाही. त्या रात्री चांदण्याच्या प्रकाशात कापणी

करण्यासाठी मी आणि सुवानकुल थांबलो होतो. त्या काळ्या डोंगराच्या शिखरावरून जेव्हा मला मोठा पौर्णिमेचा चंद्र उगवला तेव्हा आकाशातल्या साऱ्या तारकांनी जणू भराभरा आपले डोळे उघडले. मला वाटते आम्ही त्यांना दिसत होतो. शेताच्या टोकाला आम्ही सुवानकुलच्या जाकीटावर पहुडलो होतो. पाण्याच्या कालव्याचा काठ म्हणजे आमची उशी होती. सर्व उशांमध्ये ती सर्वांत मऊ उशी होती! आणि ती आमची पहिली रात्र! त्या दिवसापासून आम्ही नेहमी बरोबर होतो. सुवानकुल आपल्या भक्कम, घट्टे पडलेल्या पंजांनी हळुवारपणे मला कुरवाळत होता. त्याचा हात माझ्या चेहऱ्यावरून, भुंवयांवरून, केसांवरून फिरत होता आणि त्याचे हात त्याच्या काळजातला आनंद बोलत होते.

"सुवान, आपण सुखी होऊ का रे?" मी कुजबुजले. आणि तो उत्तरला:

"जर सर्व माणसांमध्ये जमीन आणि पाणी सारखं वाटलं, जर आपल्यालाही आपलं शेत मिळालं आणि आपण स्वत: नांगरून आपलं पीक पेरलं आणि कापलं, तर तेच आपलं सुख असेल. तोल्गोनाई, याहून माणसाला आणखी सुखाची गरज नसते. शेतकऱ्याचं सुख तो काय पेरतो आणि काय पिकवतो यावरच असतं."

तो जे काही बोलला ते मला खूप आवडले. मला एकदम सुरक्षित वाटले. मी सुवानकुलला घट्ट मिठी मारली आणि त्याच्या तापलेल्या, उन्हा-पावसाने रापलेल्या चेहऱ्याची भराभरा चुंबने घेतली. मग आम्ही त्या बारक्या ओहोळात मनसोक्त डुंबलो, एकमेकांना भिजवून काढलं आणि खूप

खिदळलो. पाणी गार आणि ताजे होते. चांदण्यात ते चमचमत होते आणि डोंगरवाऱ्यांचा त्याला गंध होता. मग आम्ही एकमेकांच्या हातात हात गुंफून आकाशाकडे तोंड करून धरतीवर पहुडलो आणि शांतपणे तारे पाहू लागलो. त्या रात्री आकाशात खूपच तारे होते.

आमच्याबरोबर धरतीही त्या फिकट निळया रात्रीचा आनंद अनुभवीत होती. त्या गारव्यामुळे आणि नीरवतेमुळे धरित्रीही आनंदित झाली होती. सबंध स्तेपवर एक स्तब्धता पसरली होती. ओहोळातले पाणी खळखळत होते. गवतातल्या वेलींच्या गोड मादक गंधाने आम्ही धुंदावलो होतो. गवतवेलीला पुरा बहर आला होता. अधूनमधून कापूरकचरीच्या गंधाने माखलेली गरम वाऱ्याची झुळूक चाटून जायची आणि शेताच्या बांधावरची धान्याची कणसे सळसळून डोलायची. अशी रात्र बहुधा एकदाच उजाडली. ऐन मध्यरात्री मी आकाशाकडे नजर टाकली. त्या तारकांमध्ये आकाशगंगेचा चंदेरी पट्टा उमटला होता. कापणी करणाऱ्याची वाट आकाशात उमटली होती. मला सुवानकुलचे शब्द आठवले आणि वाटले की, खरोखरीच एखाद्या दयाळू कोणि बलाढ्य कापणी करणाऱ्याने या रात्री झोडपलेल्या [illegible]चा भलामोठा भारा उराशी धरून आकाश ओलांडले आणि जाताना तो वाटेत भूस व धान्य सांडत गेला. एकदम मी कल्पना केली की, जर कधी आमच्या इच्छा खरोखरीच [illegible] उतरल्या, तर माझा सुवानकुलदेखील झोडपणीच्या [illegible]ट्यावर पहिला मोठा भारा घेऊन जाईल. आमच्या [illegible]च्या धान्याचा तो पहिला गवती भारा असेल. आणि

तो हा गंधित भारा घेऊन जाईल तेव्हा भुशीचा पट्टा मागे उमटवीत जाईल. मी हे असे स्वप्न पहात होते आणि तारे माझ्या स्वप्नात वाटेकरी होते. हे सारे सारे खरे व्हावे असे मला एकदम तीव्रतेने वाटले. तेव्हा मी धरणीमातेशी आयुष्यात प्रथमच बोलले: एखाद्या माणसाशी बोलावे तसे! मी म्हणाले: "धरणीमाते, आपल्या उरावर तू आम्हा सर्वांचा भार सहन करतेस; जर तू आम्हाला सुख दिलं नाहीस तर कशाला तू धरतीमाता झालीस आणि कशाला आम्ही जन्मलो? धरतीमाते, आम्ही तुझी लेकरं आहोत. आम्हाला आनंद दे, सुख दे!" त्या रात्री मी असे म्हणाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी जागी झाले तेव्हा सुवानकुल माझ्याशेजारी नसल्याचे मला आढळले. तो केव्हा उठला ते मला समजलेच नाही. बहुधा खूप लौकर उठला असावा. खुंट राहिलेल्या जमिनीवर ताजे कापलेले गव्हाच्या लोंब्यांचे भारे सगळीकडे रचून ठेवलेले दिसत होते. मी दुखावले, कारण त्या पहाटेच्या वेळी त्याच्या जोडीने काम करायला मला खूप आवडले असते.

"सुवानकुल, तू मला का उठवलं नाहीस?" मी ओरडले.

माझ्या आवाजासरशी त्याने गर्रकन मागे वळून पाहिले. त्या दिवशी सकाळी तो कसा दिसत होता हे मला आठवते: कमरेपर्यंत तो सबंध उघडा होता आणि त्याचे मजबूत पिळदार काळसर बाहू घामाने चकचकत होते. जणू काही त्याने मला ओळखलेच नाही अशा चेहऱ्याने तो माझ्याकडे पहात तेथे उभा होता. मग चेहऱ्यावरचा घाम पुसीत हसून तो मला म्हणाला:

"तू थोडा वेळ आणखी झोपावंस असं मला वाटलं."

"आणि तू?" मी विचारले.

"मी आता दोघांसाठी काम करतोय," तो उत्तरला.

त्याच्या या बोलण्याने मला मनापासून आनंद झाला, तरी मी आणखी दुखावले आणि मला जवळजवळ रडू कोसळले.

"मग तुझ्या कालच्या वचनांचं काय?" मी त्याला रागावून विचारले. "तू म्हणाला होतास की, सर्व बाबतीत आपण एकमेकांना सारखं वागवायचं."

सुवानकुलने हातातला विळा बाजूला फेकला, पळत माझ्याजवळ आला आणि अल्लद आपल्या बाहूंवर मला घेऊन मला आपल्या दोन्ही हातांवर उचलून घेऊन चुंबनांमधून म्हणाला:

"माझ्या लाडके, माझ्या चंडोला, यापुढं प्रत्येक बाबतीत आपण दोघे म्हणजे एकच!"

तो चालत असताना माझ्याशी बोलत होता, मला चंडोल म्हणत होता, आणखी मजेदार नावांनी हाक मारीत होता आणि मी माझ्या हातांचा विळखा त्याच्या मानेभोवती घालून खिदळत होते, लाथा झाडीत होते व हसत होते, कारण फक्त लहान मुलांनाच जरी चंडोल म्हणत असले, तरी ते शब्द आत्ता ऐकताना मला खूप खूप छान वाटत होते!

सूर्य नुकता उगवत होता आणि त्याची कडा डोंगराच्या वराशी वर आली होती. सुवानकुलने मला खाली उभे केले, आपले हात माझ्याभोवती गुंफले आणि एकदम सूर्याला उद्देशून तो ओरडला:

"हे सूर्या! ही बघ माझी बायको! बघ कशी आहे

माझी बायको! तुझ्या किरणांचं वधूच्या देखासाठी मला दान दे, तुझ्या प्रकाशाचं मला दान दे!"

हे तो विनोदाने म्हणाला का खरोखरच गंभीरपणे म्हणाला ते मला समजले नाही, पण मी एकाएकी रडू लागले. माझ्या अंत:करणात मावेनासा झालेला आनंद मी आवरू शकले नाही.

आता मला या गोष्टीची आठवण झाली तरी मी मूर्खासारखी रडते. ते अश्रू वेगळे होते, आयुष्यात एकदाच, एका माणसालाच ते अर्पण करता येतात. आणि आम्ही जसे स्वप्न पाहिले होते तसे आमचे आयुष्य बनले का? होय, तसे घडले. सुवानकुलने आणि मी आपल्या स्वत:च्या हातांनी आमचे आयुष्य घडवले. आम्ही अमाप कष्ट केले, उन्हाळा असो किंवा हिवाळा असो, नांगर कधी खाली ठेवला नाही. अक्षरश: निढळाचा घाम गळेतो आम्ही श्रमलो. नंतर नव्या काळात आम्ही घर बांधले आणि चार गुरे गोठ्यात आली. थोडक्यात म्हणजे आम्ही चांगले जगू लागलो. पण सर्वांत मोठा आनंद म्हणजे आमच्या तीन मुलांचा जन्म. एकापाठोपाठ एक असे तीनही मुलगेच आम्हाला झाले. काही वेळा मात्र एक पश्चात्तापाची भावना उगीचच काळीज पोळून काढते आणि एक मूर्ख विचार मनाला कुरतडत राहतो: एखाद्या मेंढीसारखी मी दर वर्षा-दीड वर्षाला अशी कशी बाळंत होत राहिले? इतर लोकांसारखे तीन-चार वर्षांनंतर एक मूल मला का नाही झाले? मग कदाचित हे सारे घडले नसते. कदाचित ते याहून जन्मालाच आले नसते तर फार फार बरे झाले असते. माझ्या मुलांनो, मी हे दु:खाने, वेदनेने बोलतेय. कारण मी एक आई आहे, एक माता आहे.

शेतात ते पहिल्याप्रथम आले तो दिवस मला आठवतो. त्या दिवशी सुवानकुलने येथे पहिला ट्रॅक्टर चालवला. शरदात आणि हिवाळ्यात तो दररोज नदीपलिकडच्या झारेच्ये गावात ट्रॅक्टर चालवायला शिकायला जात होता. ट्रॅक्टर म्हणजे काय हे त्या काळात आमच्यापैकी कुणालाच माहीत नव्हते. आणि खूप दुरून चालत यावे लागत असल्याने रात्र पडेपर्यंत सुवानकुल घरी यायचा नाही तेव्हा मला त्याच्याबद्दल वाईट वाटायचे आणि मी दुखावतही असे.

"कशाला या नसत्या भानगडीत पडतोस? पथक-प्रमुख आहेस एवढ्यावर तुला समाधान होत नाही?" मी त्याला चिडून विचारले.

पण नेहमीप्रमाणे तो मंद हसला आणि म्हणाला:

"हे बघ तोल्गोनाई, उगीच ओरडू नको. वसंतापर्यंत जरा थांब आणि मग बघ. आणखी थोडे दिवस कळ काढ."

मी त्याला बोलले तेव्हा मनात कडवट भावना नव्हती. पण मुलांची उस्तवार, घरचे काम आणि शिवाय सामुदायिक शेतावरचे माझे काम—या सर्व गोष्टी त्याच्या मदतीविना पार पाडायला मला फार जड जात होते. पण तो गारठलेला आणि भुकेजलेला पाहिला, त्यात भरीला भर म्हणून मी त्याला अपराधीपणाची भावना करून देते आहे हे जाणवले की, पटकन मी शांत व्हायची. शेवटी तर मला अगदीच अवघडल्यासारखे वाटायचे.

"ठीक आहे, जरा आगीजवळ बैस. तुझ्या अन्नाच्या तर अगदी गारगोट्या झाल्यात," जणू त्याची माफी मागितल्याच्या सुरात मी कुरबुरायची.

पण सुवानकुल काही गंमतीसाठी तेथे जात नाही हे मला अंत:करणात चांगले ठाऊक होते. धडे शिकायला खेड्यात एकही साक्षर माणूस नव्हता तेव्हा सुवानकुल स्वेच्छेने भरती झाला होता. तो म्हणाला होता – "मी जाईन आणि लिहा-वाचायला शिकेन. पथक-प्रमुखाच्या जबाबदारीतून मला मोकळं करा."

त्याने स्वेच्छेने जबाबदारी घेतली पण त्याचा त्याला भरपूर त्रासही झाला. त्यावेळी मुले आपल्या बापांना शिकवायची तेव्हा फार गंमत यायची. कासीम आणि मासेलबेक तेव्हा शाळेत जात होते आणि ते मास्तर बनले होते. संध्याकाळी रोज घरात धडे चालायचे. त्यावेळी मेज वगैरे काही नव्हते. जमिनीवर पालथी मांडी घालून सुवानकुल पुस्ती गिरवायचा तेव्हा तीनही पोरे तीन बाजूंनी त्याच्याभोवती गिल्ला करीत त्याला सुनावीत असायची: "अब्बा, तुमची पेन्सिल सरळ धरा." "बघा, ही ओळ वाकडी आली." "हात नीट पकडा, तो कापतोय बघा." "हे असं लिहायला पाहिजे तुम्ही." "तुमची वही ही अशी धरा." किंवा त्यांचा आपसात वाद सुरू व्हायचा आणि आपल्याला सर्वांत चांगले समजते हे सिद्ध करायचा प्रत्येकाचा प्रयत्न चालायचा. ही जर दुसरी कोणती बाब असती तर मुलांच्या वडिलांनी केव्हाच त्यांना आपापली योग्यता दाखवून ताळ्यावर आणले असते. पण या शिकण्याच्या बाबतीत मात्र सुवानकुल त्यांचे सारे आदराने ऐकायचा, खऱ्याखुऱ्या मास्तरांसारखा मुलांना मान द्यायचा. एक शब्द लिहीपर्यंत तो थकून जायचा, त्याच्या चेहऱ्यावरून घामाच्या धारा अशा काही वाहू लागायच्या

… कुणाला वाटावे हा अक्षरे लिहीत नसून धान्याच्या …गी उचलतोय. त्याच्या वहीबाबत किंवा अंकलिपीबाबत …ंची एकाच वेळी बडबड चालायची. त्या साऱ्यांकडे …ताना मला हसू आवरायचे नाही.

"पोरांनो, अब्बांना त्रास नका रे देऊ. त्याना मुल्ला बनवायचा विचार आहे काय तुमचा? आणि सुवानकुल, …गळ्याच गोष्टी एकदम करायला धावू नको. एक काय … निवड: मुल्ला तरी हो नाहीतर ट्रॅक्टर ड्रायव्हर हो."

सुवानकुलला याचा भारी राग यायचा. त्याची नजर … जायची, तो मान हलवायचा आणि उसासा टाकून …णायचा:

"ही विनोद करण्याची बाब नव्हे."

ती खरोखरीच दु:खाची तरी गंमतीची बाब होती. ते …ही असो, अखेरीस सुवानकुल आपल्या पद्धतीने वागायचा.

वसंतामधल्या एका भल्या सकाळची वेळ. बर्फ नुकता …डे वितळला होता, हवेत थोडीशी ऊब यायला लागली …ती. खेड्याच्या वेशीबाहेर बरीच गडबड उडाली होती. …लेला गुरांचा कळप रस्त्यावरून उधळत गेला. मी …गणाबाहेर धावले. बागांपलिकडून एक ट्रॅक्टर येत होता. …चा रंग काळा होता, तो लोखंडाचा बनवलेला होता आणि चालताना तो धूर ओकत होता. लौकरच खेड्यातल्या …र्व लोकांचा त्याच्याभोवती गराडा पडला. काही घोड्यांवर …ते, काही पायीच होते. एखाद्या बाजारासारखा त्यांनी …गोंधळ मांडला होता. माझ्या शेजाऱ्यांबरोबर मी तिथे धावले. …ल्यांदा दृष्टीला पडले माझे मुलगे. तिघेही आपल्या

बापाबरोबर ट्रॅक्टरवर उभे होते आणि त्यांनी एकमेकांना गच्च धरले होते. गावची पोरे शिट्ट्या वाजवीत होती, टोप्या उडवीत होती. माझ्या मुलांचा अभिमान त्यांच्या चेहऱ्यांवरून ओसंडत होता. वीरांसारखे ते उभे होते, त्यांचे चेहरे आनंदाने फुलले होते. काय डांबीस कारटी होती! बापाच्या ट्रॅक्टरचे स्वागत करायला भल्या सकाळीच उठून नदीकडे पळाली होती आणि कदाचित मी जायला देणार नाही म्हणून मला एका अक्षराने त्यांनी काही सांगितले नव्हते! आणि मी मात्र त्यांची काळजी करीत बसले होते. हो, काय घडेल त्याचा नेम कुणी सांगितलाय!

"कासीम! मासेलबेक! जयनाक! थांबा मेल्यांनो! माझ्या तावडीत सापडलात म्हणजे सांगते तुम्हाला! उतरा खाली आधी!" मी ओरडले. पण त्या ट्रॅक्टरच्या इंजिनाच्या घरघरीत माझा आवाज धड मलाही ऐकू आला नाही.

पण सुवानकुलला माझी मनःस्थिती समजली; त्याने हसून मान हलवली. काही घाबरू नको, काही विपरीत घडणार नाही असेच जणू त्याला सांगायचे होते. मोठ्या अभिमानाने तो ट्रॅक्टर चालवायच्या जागी बसला होता, त्याचा चेहरा आनंदी दिसत होता. आज तो एकदम कितीतरी वर्षांनी लहान दिसत होता. खरेच, तो त्या काळातही काळ्या मिशा राखलेला जवान माणूस होता. आणि त्या क्षणी मला कधी नव्हते एवढे जाणवले की, माझी मुले अगदी थेट बापाच्या वळणावर गेली आहेत.

ते चौघे भावाभावांसारखे दिसत होते. कासीम आणि मासेलबेक हे मोठे दोघे अगदी सुवानकुलसारखे होते. तसेच

मद्यपानळ, तशीच तापवलेल्या तांब्याच्या रंगाची चकाकणारी गालावरची हाडे. छोटा जयनाक खूपसा माझ्यासारखा होता. तो अधिक गोरा होता. त्याचे डोळे काळे होते व नजरेत प्रेमळ छटा होती.

शेवटच्या घरांपर्यंत ट्रॅक्टर न थांबता घरघरत गेला आणि तो कसा नांगरतो ते पाहण्याच्या उत्सुकतेने आम्हीही सारे त्याच्या मागोमाग धावत गेलो. जेव्हा ट्रॅक्टरच्या तीन प्रचंड फाळांनी भसकन जमिनीत घुसून एखाद्या घोड्याच्या भरदार आयाळीएवढी माती सहज उकरली तेव्हा सर्वांनी टाळ्या वाजवून एकच कल्लोळ केला आणि आपल्या फुरफुरणाऱ्या घोड्यांना चाबूक मारून नांगरल्या जमिनीच्या पुढे जाण्याची एकच दाटी केली. मी एका बाजूला जाऊन का उभी राहिले, मी मागे का राहिले हे मला समजले नाही. पण एकाएकी मी खूप एकटी आहे असे मला जाणवले. मी खिळून उभी राहिल्यासारखी तेथे थांबले होते. ट्रॅक्टर पुढे पुढे जात होता, पण मी तिथे हताश होऊन उभी होते, माझी नजर तेवढी ट्रॅक्टरबरोबर जात होती. तरीही, त्या दिवशी या जगात माझ्याएवढे आनंदी दुसरे कुणी नव्हते! कशा कशाचा म्हणून आनंद मानू तेच मला सुचत नव्हते: सुवानकुलने खेड्यात पहिला ट्रॅक्टर आणला त्याचा आनंद मानू, का त्या दिवशी माझी मुले किती मोठी झाली आहेत आणि ती किती आपल्या बापासारखी दिसताहेत त्याची जाणीव झाली याचा आनंद मानू तेच समजत नव्हते. माझी नजर त्यांची पाठराखण करीत होती आणि रडता रडता मी पुटपुटत होते: “माझ्या मुलांनो, आजच्यासारखे सदैव आपल्या वडिलांबरोबर रहा!

तुम्ही त्यांच्यासारखे झालात, तर माझं आणखी काही मागणं नाही!"

माझ्या मातृत्वाची ती सर्वांत सुंदर वर्षे होती. मी माझ्या कामात निपुण होते, मला नेहमी काम करायला आवडायचे. माणूस जर निरोगी असेल, हात-पाय धडधाकट असतील तर कामासारखा दुसरा आनंद नाही!

काळ उलटत होता आणि मला जाणवायच्या आधीच कोवळ्या चिनारासारखी मुले उंच वाढली. प्रत्येकाने आपापल्या जीवनाचा मार्ग निवडला. कासीमने आपल्या वडिलांच्या पावलांवर पाऊल ठेवले: तो ट्रॅक्टर ड्रायव्हर झाला. मग त्याने कंबाईन ऑपरेटरचे काम शिकून घेतले. एका उन्हाळयामध्ये त्याने नदीपलिकडच्या डोंगराजवळच्या काईन्दी सामुदायिक शेतावर काम केले. पुढच्या वर्षाला तो आपल्या स्वत:च्या खेड्यात कंबाईन ऑपरेटर म्हणून कामाला आला.

आई आपल्या सर्वच मुलांवर प्रेम करते, सारी तिला सारखीच प्रिय असतात हे खरे असले तरी इतर सर्वांपेक्षा मला मासेलबेक जास्त आवडायचा. मला त्याचा खूप अभिमान वाटायचा. कदाचित तो दूर असल्यामुळे त्याची अधिक आठवण यायची. पहिल्यांदा उडायला शिकलेल्या लहान पाखराप्रमाणे, लहान वयातच तो घरापासून दूर रहायला गेला. शाळेत पहिल्यापासूनच तो अभ्यासात हुशार होता. वाचायचा त्याला खूप नाद होता आणि हाती पुस्तक पडले म्हणजे दुसरे काही त्याला सुचत नसे. शाळेतले शिक्षण पुरे केल्यावर पुढच्या अभ्यासाला तो शहरात गेला, कारण त्याने पुढे शिक्षक व्हायचे ठरवले होते.

माझा सर्वांत छोटा जयनाक चांगला बळकट, देखणा तरुण बनला होता. त्याच्या बाबत एकच तक्रार म्हणजे त्याचा घरात कधी पाय ठरायचा नाही. शेताच्या कम्सोमोल संघटनेचा चिटणीस म्हणून त्याची निवड झाली होती आणि तो नेहमी सभा, मेळावे, भित्तीपत्रके किंवा आणखी कसल्या तरी उद्योगात गुंतलेला असायचा. सतत रात्रंदिवस त्याचे भिंगरीसारखे फिरणे पाहून मला खूप वेळा त्याचा राग यायचा.

"तू अगदी कुचकामी मुलगा आहेस," मी त्याला म्हणायची, "तुझं ॲकॉर्डियन आणि तुझी उशी घेऊन शेतावरच्या कचेरीतच का रहायला जात नाहीस? आपण कुठं राहतो याची नाही तरी तुला पर्वा नाही. तुला घराची गरज नाही किंवा आई-बापांची गरज नाही."

पण सुवानकुल आपल्या मुलाची बाजू घ्यायचा. माझ्या तोंडाचा पट्टा थांबेपर्यंत तो गप्प राह्यचा आणि मग हळूच म्हणायचा :

"अम्मी, अशी अस्वस्थ होऊ नको. त्याला इतरांबरोबर मिळून-मिसळून रहायला शिकू दे. जर तो उगीच उनाडक्या करीत वेळ फुकट घालवताना दिसला तर पहिल्यांदा मीच त्याच्या पाठीची चामडी सोलून काढीन."

या दरम्यान सुवानकुल परत आपल्या पथक-प्रमुखाच्या जागेवर परतला होता. तरुण मंडळी आता ट्रॅक्टर चालवायची.

पुढची महत्त्वाची घटना म्हणजे कासीमचे लग्न. पहिल्या सुनेने आमच्या घराचा उंबरठा ओलांडला. हे सारे कसे घडले ते मी त्यांना विचारले नाही. त्या उन्हाळयात कासीम जेव्हा

नदीपलिकडे ड्रायव्हर म्हणून काम करीत होता तेव्हा त्यांची एकमेकांची ओळख झाली असावी. काईन्दीहून तो तिला घेऊन आला. अलिमान ही तरुण, काळसर वर्णाची पहाडी मुलगी होती. माझी सून इतकी सुंदर, प्रसन्न आणि चटपटीत आहे याचाच मला प्रथम आनंद झाला. लौकरच माझा तिच्यावर जीव जडला, कारण मला अगदी हवी होती तशीच ती होती. मला स्वतःला एक मुलगी असावी असे नेहमी आतून आतून वाटत असायचे. पण एवढे एकच कारण नव्हते. ती शहाणीसुर्ती होती, कष्टाळू होती आणि काचेसारखी शुद्ध-निर्मळ मनाची होती. अगदी माझ्या स्वतःच्या मुलीसारखे मी तिच्यावर प्रेम करू लागले. अनेक लोकांचे आपल्या सुनांशी पटत नाही, पण मी सुदैवी होते. अशी सून घरात असणे हा एक फार मोठा आनंद होता. योगायोगाने, वळवाच्या सरीसारखे सुख कोसळत नाही, ते खरे सुखच नव्हे असे मला वाटते. खरे सुख माणसाला कणाकणाने भेटते, आयुष्याकडे तो कसा पाहतो–आपल्या बरोबरच्या माणसांकडे तो कसा पाहतो यावर ते अवलंबून असते. एकेका कणाने वाढत वाढत सुखाची वृद्धी होत असते. मग आपण ज्याला सुख-सुख म्हणतो तो सुखाचा ठेवा आपल्याला गवसतो.

अलिमान आमच्या घरात आली तो उन्हाळा अविस्मरणीय होता. गहू लौकर पिकला होता. नदीला पूरही लौकर आला होता. सुगीच्या आधी डोंगरात खूप मुसळधार पाऊस झाला. अगदी दुरूनही तेथले बर्फ साखरेसारखे विरघळून जाताना दिसत होते. पुराच्या लोंढ्यामध्ये पाणी खळाळून

जोरात वहात येत होते. त्या खळबळत्या, घुसळत येणाऱ्या पाण्यावर पिवळसर फेस उमटत होता, डोंगरावरची उन्मळून पडलेली देवदाराची झाडे वाहून येत होती आणि धबधब्याच्या नळाला त्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत होत्या. पावसाची पहिली रात्र फार भयाण होती. पहाटेपर्यंत डोंगरउतारावरचा नदीच्या पाण्याचा प्रवाह रोरावत, गर्जत होता. सकाळी आमच्या दृष्टीला पडले की, जुनी बेटे अदृश्य झाली आहेत. रात्रीच्या पावसाने ती पुरती धुपून गेली होती.

पण दिवसा खूप गरम व्हायचे. गहू छान पिकत होता. मुळाशी तो हिरवट दिसायचा आणि शेंड्याला सोनेरी रंग चढत होता. पिकल्या गव्हाची शेते स्तेपवर अथांग पसरली होती. पार क्षितिजापर्यंत नुसता गहू डोलताना दिसायचा. कापणीचा हंगाम अजून सुरू झाला नव्हता. फक्त शेतांच्या कडेचा गहू आम्ही हाताने कापून कापणी यंत्राला वाट तयार करून देत होतो. अलिमान आणि मी शेजारी शेजारी काम करीत होतो. तेव्हा काही बायका माझी थट्टा करीत होत्या:

"आता आपल्या तरण्याताठ्या सुनेबरोबर स्पर्धा करण्यापेक्षा निवांत घरामध्ये का बसत नाहीस? तुला स्वतःला काही इभ्रत आहे की नाही?"

मला त्यांचे बोलणे पटायचे नाही. घरी बसून राहण्यात कसली आली आहे इभ्रत? निदान मला तरी तसे करणे कधीही जमणार नाही. कापणीचे काम करायला मला खूप खूप आवडते.

तर मी आणि अलिमान जोडीनेच काम करीत होतो. त्यावेळी मी पाहिलेले एक दृश्य कधीही विसरणार नाही.

शेताच्या कडेला कणसांमध्ये जंगली फुलांना बहर आला होता. गव्हाच्या लोंब्यांबरोबर गुलाबी आणि पांढऱ्या रंगाची फुलेही विळयांच्या सपकाऱ्याबरोबर खाली कोसळून पडत होती. अलिमानने अशा फुलांचा एक गुच्छ तयार केला व तो ती अगदी हळुवारपणे हातात धरून जात असलेली मी पाहिले. मी तिच्याकडे अगदी बारकाईने निरखून पहात होते व पुढे ती काय करते याबद्दल मनात उत्सुकता दाटून राहिली होती. ती पळत कंबाईन यंत्राकडे गेली, त्याच्या तळच्या पायरीवर तिने तो फुलांचा गुच्छ ठेवला आणि पळत ती पुन्हा परत आली. कापणी कोणत्याही दिवशी सुरू झाली असती म्हणून कंबाईन रस्त्यालगतच आणून उभा केलेला होता. तिथे कुणीच नव्हते. कासीम बहुधा कुठेतरी दुसऱ्या कामाला गेला असावा.

मी हे काही पाहिलेच नाही असा बहाणा केला, कारण अजून ती थोडी लाजरी असल्याने तिला शरमिंदी करण्याची माझी इच्छा नव्हती. पण मला मनातून मात्र खूप आनंद झाला. याचा अर्थ ती त्याच्यावर प्रेम करीत होती. इतके चांगल्या वागणाऱ्या माझ्या सुनेला पाहून माझा ऊर भरून आला. अजून ती तशीच माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते: लाल रुमाल नि पांढरा पोषाख, हातात जंगली फुलांचा मोठा गुच्छ, गाल लालेलाल झालेले, डोळ्यात आनंद मावेनासा झालेला आणि त्या नजरेत एक मिस्कील छटा! मूर्तिमंत तारुण्य! माझी लाडकी लेक अलिमान! एखाद्या लहान मुलीसारखी ती फुलांवर प्रेम करायची. वसंतामध्ये, बर्फाचे ढीग अजून साचलेले असायचे तेव्हा स्तेपमधून ती

पहिली फुललेली पांढरी फुले घेऊन यायची. माझी लाडकी अलिमान !

दुसऱ्या दिवशी कापणी सुरू झाली. कापणीचा पहिला दिवस म्हणजे सणाचा दिवस. या दिवशी कुणी दुर्मुखलेला माणूस मी तरी पाहिलेला नाही. हा दिवस सणाचा-सुट्टीचा म्हणून कुणीही जाहीर केलेला नाही, पण लोकांमध्ये ही रीत चालत आली आहे. त्यांच्या वागण्यात, बोलण्यात, नजरेत हा सण सामावून राहिला आहे. चांगल्या पोसलेल्या तुकतुकीत घोड्यांच्या चपळ चौकचालीत आणि गाडीच्या चाकांच्या खडखडाटात या सणाचा आनंद उमटलेला दिसायचा. कापणीच्या दिवशी सबंध दिवसभर कुणीही काम करीत नाही, असे म्हणायला पाहिजे. थोडे इकडेतिकडे जरासे काम होते आणि उत्सवाला उधाण येते. रिवाजाप्रमाणे त्या दिवशी सकाळीही अशीच धांदल गर्दी माजली होती. शेताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत आनंदी आवाजांनी वातावरण भरून गेले होते. पण सगळ्यात मोठी धमाल आम्ही जेथे हाताने कापणी करणाऱ्या बायका होतो तेथे होती. कारण सगळ्या तरुण बायका-पोरींचा कळपच तेथे होता. या पोरी मोठ्या मिस्कील होत्या. शेताने बक्षीस दिलेल्या सायकलवरून कासीम चालला होता. त्या मिस्कील, वट्टाळ मुलींनी त्याची वाट अडवली.

"ए ड्रायव्हर, उतर सायकलवरनं! कापणीचं काम करणाऱ्यांना तू रामराम का केला नाहीस? एवढा कसला तोरा आलाय? चल, आम्हाला मुजरा घाल, तुझ्या बायकोपुढं लोटांगण घाल !"

त्या साऱ्याजणींनी त्याला घेराव घातला आणि अलिमानपुढे त्याला खाली वाकायला लावून तिची माफी मागायला लावली. त्यानेही आपल्या परीने नाटक वठवले:

"हे कापणी करणाऱ्या बायकांनो, मला माफ करा, मी अपराधी आहे. यापुढं एक मैलावरून मी लोटांगण घालीत येईन."

पण त्याची एवढ्या सहजी सुटका होणार नव्हती.

त्या म्हणाल्या, "आता शहरातल्या मुलींसारखं आम्हाला तुझ्या सायकलवर बसवून फिरवून आण! आमच्या कानात वारं घुमलं पाहिजे अशी सायकल पळव!"

आणि एकमेकींना सीटवर बसायला मदत करीत खिदळत त्या सायकलबरोबर धावू लागल्या. त्या सीटवर गुमान बसू शकल्या असत्या... पण छे, त्या खिदळत होत्या, किंचाळत होत्या, त्यांनी एकच दंगा मांडला होता.

हसण्याच्या त्या कल्लोळात कासीमची मात्र दमछाक झाली.

"चांडाळणींनो, पुरे आता! सोडा माझा पिच्छा!" त्याने विनवणी केली.

पण त्या तयार नव्हत्या. एक मुलगी उतरली रे उतरली की दुसरी पटकन चढून बसायची.

अखेरीस कासीम खरोखरीच रागावला.

"तुमची सगळ्यांची डोकी फिरलीत काय? दव वाळून गेलंय, मला कंबाईन चालू करायचाय आणि तुम्ही हा काय खेळ मांडलाय? तुम्ही इथं काम करायला आलात का खेळायला? जाऊ दे मला!"

पण तो सबंध दिवस हसण्याला नुसता पूर आला होता. आकाश एवढे निळे कधीच नव्हते आणि सूर्य पूर्ण तेजाने प्रकाशत होता!

आम्ही कामाला लागलो. विळे पुढे मागे चकाकत होते, सूर्य तापत होता, रानकिड्यांच्या आवाजाने वातावरण भरून गेले होते. कामावर हात बसेपर्यंत सराव नसल्याने प्रथम प्रथम कापणीला चांगला वेग येत नाही. पण त्या सकाळच्या आनंदाने सबंध दिवसभर माझी साथ केली. काळीज कसे हलके नि मोकळे वाटत होते. माझे डोळे पहात असलेल्या साऱ्या गोष्टी, मी ऐकत आणि जाणवत असलेल्या साऱ्या गोष्टी, मी विचार करीत असलेल्या साऱ्या गोष्टी जणू काही माझ्यासाठीच निर्माण झाल्या होत्या, माझ्या सुखासाठी निर्माण झाल्या होत्या आणि मनात येणारी प्रत्येक गोष्ट अमाप आनंदाने व सौंदर्याने काठोकाठ भरून येत होती. पिकाच्या त्या उंच लाटांमध्ये कुणीतरी दौडत जाताना पहाय-ला एक अननुभूत आनंद होत होता—बहुधा तो सुवानकुल असावा! कोयत्यांचा हवेत फिरताना होणारा आवाज, पिकाच्या ताटांचा जमिनीवर कोसळताना होणारा आवाज, कापणी करणाऱ्यांचे आवाज व हसणे ऐकताना मनस्वी आनंद होत होता. या सगळ्या आवाजांना गिळून टाकणारा कासीमचा कंबाईन शेजारी चालताना पहायला आनंद वाटत होता. चाकाशी कासीम उभा होता आणि भल्यामोठ्या ट्रकमध्ये झोडपलेल्या ताज्या धान्याचा लोंढा कोसळत होता त्याने हाताची ओंजळ धरून त्या ओंजळीतल्या ताज्या धान्याचा दरवेळी नाकाशी वास घेत होता. त्या पिकलेल्या धान्याच्या

गरम, दुधाळ, मादक गंधाने मीही माखले आहे असे मला वाटले. आणि आम्ही जेथे काम करीत होतो त्यासमोर एक क्षणभर कंबाईन थांबला तेव्हा जणू काही लांब डोंगराच्या माथ्यावरून ओरडावे अशा आवाजात कासीम ओरडला:

"ए ड्रायव्हर! लौकर! मला ताटकळत ठेवू नको!"

ऐरानच्या थंडगार खुजाला घाईघाईने पकडून अलिमान म्हणाली:

"मी चटकन त्याला ऐरान प्यायला देऊन येते!"

नुकत्याच कापलेल्या खुंटावरून ती कंबाईनकडे धावत होती तेव्हा लाल रुमालातली आणि पांढऱ्या पोषाखातली तिची तरुण व लवलवती आकृती पाहताना असे वाटत होते की, घडा घेऊन जाण्याऐवजी ती प्रेमळ बायकोचे गाणेच घेऊन चालली आहे. तिच्या अंगअंगातून प्रेम बोलत होते. एकदम मनात आले—"सुवानकुलला थोडं थंडगार ऐरान प्यायला द्यावं"—मी इकडेतिकडे पाहिले, पण व्यर्थ! एकदा कापणी चालू झाली म्हणजे पथक-प्रमुखाला शोधणे महाकठीण! तो सारखा घोड्यावरून इकडेतिकडे दौडत असतो, काळज्यांच्या आणि जबाबदारीच्या ओझ्यांनी दबलेला असतो.

त्या संध्याकाळी शेतावरच्या मुक्कामात आम्ही नव्या पिकाची पहिली भाकरी खाल्ली. आठवड्यापूर्वी शेताच्या कडेची कणसे आम्ही हातांनी कापली होती, त्या धान्यापासून दळून ठेवलेल्या पिठाची ही पहिली भाकर होती. माझ्या आयुष्यात अनेकवेळा मी अशी नव्या पिकाची पहिली भाकर खाल्ली आहे, आणि दरवेळी मी या भाकरीचा पहिला घास तोंडाशी आणते तेव्हा काहीतरी पवित्र विधी करीत असल्याची

भावना मनात असते. ही भाकरी काळसर आणि चिकट असली, तरी तिच्या गोड चवीची आणि खमंग वासाची तुलना जगात कोणत्याही गोष्टीशी होऊ शकणार नाही. तिला उन्हाचा, ताज्या कडब्याचा आणि धुराचा गंध असतो.

सूर्य मावळतीला चालला होता. भुकेजलेले लोक शेतावरच्या मुक्कामाकडे परतत होते. पाण्याच्या ओहोळानजीकच्या गवतावर सारे एकत्र झाले. शेताच्या पार कडेपर्यंत पसरलेल्या गव्हावर लाल ज्वालांचा रंग पसरला होता. ती संध्याकाळ मोठी सुरेख होती. संधिप्रकाश खूप वेळ रेंगाळत होता. राहुटीशेजारी गवतावर सारे पहुडले. सुवानकुल अजून परतला नव्हता, आता कोणत्याही क्षणाला तो आला असता. ज्यनाक नेहमीप्रमाणे गायब होता. आपली भावाची सायकल पिटाळीत कसलीतरी नोटीस लावायला तो क्लबाकडे धावला होता.

अलिमानने गवतावर चादर पसरली, ताज्या सफरचंदांचा ढीग त्यावर ओतला, गव्हाच्या गरम गरम भाकऱ्या आणल्या व क्वासने पेले भरले. कासीमने शेजारच्या पाण्यात हात स्वच्छ धुतले आणि चादरीशेजारी बसून भाकरीचे हळूहळू तुकडे केले.

"अजून गरम आहे," तो म्हणाला. "अम्मी, नव्या भाकरीची चव तू घे प्रथम."

मी भाकरीला नमस्कार केला आणि घास घेतला तेव्हा एक वेगळीच चव आणि वास मला जाणवला. तो कंबाईन ऑपरेटरच्या हाताचा वास होता. ताजे धान्य, तापलेले पोलाद आणि रॉकेल या सगळ्यांचा मिळून एक वास तयार

झाला होता. मी आणखी घास घेतले, त्या सर्वांना रॉकेलचा किंचित वास होता. पण एवढी चवदार भाकरी मी यापूर्वी कधी चाखली नव्हती. ही माझ्या मुलाने दिलेली भाकरी होती, माझ्या मुलाच्या ड्रायव्हरच्या हातांनी तिला धरलेले होते. ही लोकांची भाकरी होती, ज्यांनी पिकवले होते त्यांची ही भाकरी होती, माझ्या मुलाबरोबर त्या संध्याकाळी शेतावरच्या मुक्कामात जी माणसे होती त्यांनी केलेली ही भाकरी होती. ती पवित्र भाकरी होती! माझ्या मुलाबद्दलच्या अभिमानाने माझा ऊर भरून आला, पण माझी मन:स्थिती दुसऱ्या कुणाला समजली नाही. तेव्हा मला जाणवले की, लोकांच्या आनंदातून आईच्या आनंदाचा जन्म होतो. मुळांपासून निघालेल्या बुंध्यासारखी ही जवळिक असते. आपल्या लोकांच्या आयुष्यापासून दूर असे आयुष्य आईला असूच शकत नाही. मला जे काही सोसावे लागले, आयुष्याने मला कितीही कठोरपणे वागवले असले तरी आत्तासुद्धा माझ्या या श्रद्धेला तडा जाणार नाही. माझी माणसे जीवन जगताहेत, तशीच मीही पुढे जगते आहे.

त्या संध्याकाळी खूप उशीरापर्यंत सुवानकुल आला नाही. अंधार पडला. नदीतटाच्या उंचवट्यावर तरुण मंडळींनी शेकोट्या पेटवल्या आणि ती गाणी गात होती. त्या अनेक आवाजांमध्ये माझ्या जयनाकचा आवाज मला स्पष्ट ऐकू येत होता. तो ॲकॉर्डियन वाजवीत होता आणि नेहमीप्रमाणे नाच-गाण्याचे नेतेपण त्याच्याकडे होते. माझ्या मुलाचा परिचित आवाज ऐकत असताना मी मनात त्याच्याशी बोलले: "गा, माझ्या लेकरा, तरुण आहेस तोवर मनसोक्त

ऐकून घे. गाण्यानं अंतःकरण शुद्ध होतं, लोकांना ते अधिक जवळ आणतं. पुढे केव्हातरी हे गाणं ऐकशील तेव्हा आजच्या संध्याकाळी तुझ्याबरोबर ज्यांनी गाणं म्हटलं ती माणसं तुला आठवतील." आणि पुन्हा एकदा माझे विचारचक्र मुलांच्या दिशेने वळले. आईचा स्वभाव हा असा असतो. मी विचार केला. "कासीम आता स्वतंत्र झाला, देवाची कृपा! ...नामध्ये तो आणि अलिमान त्यांच्या नव्या घरात रहायला जातील. आपलं घर बांधायला एव्हांना त्यांनी सुरुवात केली आहे आणि फर्निचरसुद्धा हळूहळू विकत घेताहेत. आणि बघता बघता घरात नातवंडं खेळायला लागतील." कासीमची मला काळजी वाटत नव्हती. आपल्या वडिलांसारखाच तो कष्टाळू होता. एका क्षणाची उसंत घेत नव्हता. अंधार पडला होता तरी अजून तो कंबाईनवर होता, कारण थोडे काम बाकी होते. ट्रॅक्टर आणि कंबाईनचे पुढचे दिवे पेटलेले होते. त्याच्या शेजारीच अलिमान होती. कापणीच्या वेळचा ...दिवसांचा प्रत्येक क्षण फार मोलाचा असतो.

नंतर मासेलबेकचा विचार मनात आला आणि ऊर भरून आले. मागल्या आठवड्यात त्याचे आम्हाला पत्र आले होते. यंदा उन्हाळ्याच्या सुटीत घरी यायला जमणार नाही असे त्याने लिहिले होते. मुलांच्या एका गटाबरोबर बालवीर ...न इस्सिक-कूल तळ्याच्या काठी त्याला पाठवणार होते आणि तिथे त्याच्यावर गटनायकाचे काम सोपवणार होते. याबाबतीत आम्हाला काहीच करायला उरले नव्हते आणि ज्याअर्थी त्याने ही कामगिरी पत्करली होती त्याचा अर्थ त्याला ती आवडली होती. तो कुठे का असेना,

प्रकृतीने छान आहे ही महत्त्वाची गोष्ट, असे मी स्वतःलाच समजावीत होते.

सुवानकुल खूप उशिरा परत आला. त्याने घाईघाईने खाल्ले आणि आम्ही घरी परतलो. सकाळी घरची कामे उरकणे भाग होते. संध्याकाळच्या वेळी गुरांची दाणावैरण बघ, असे मी शेजारच्या आयेषाला सांगून आले होते. ती बिचारी नेहमी आजारी असायची. एक दिवस शेतावर काम केले की, तिला दोन दिवस घरात झोपून काढावे लागायचे. तिचा आजार हा बायकांचा आजार होता आणि तिची पाठ नेहमी दुखायची. या आजारामुळे तिला बेक्ताश नावाचा एकच मुलगा होता.

आम्ही घोड्यावरून घरी परतलो तेव्हा रात्र झाली होती. वाऱ्याची झुळूक वहात होती. गव्हाच्या लोंब्यांवर चंद्राचा प्रकाश डोलत होता. पिकलेल्या रशियन उंटकाटऱ्याची पिसार टोके रिकिबीशी घासत होती आणि हळूच धुंद वासाच्या परागांचा सडा पडत होता. आसमंतात दरवळलेल्या गोड वासावरून गवतवेल फुलली आहे हे मी ठामपणे सांगू शकत होते. ही रात्र काहीशी परिचित वाटत होती. माझ्या काळजाचा एक ठोका चुकला. मी सुवानकुलच्या मागे खोगीरउशीवर बसले होते. तो मला नेहमी पुढे बसायला सांगायचा, पण मला मात्र मागे बसून त्याच्या पट्ट्याला धरून घोड्यावरून जायला आवडायचे. सबंध दिवसाच्या श्रमांनी तो खूप दमला होता आणि म्हणून मुकाट राहून घोड्यावरून चालला होता. मध्येच त्याला डुलकी लागून त्याचे डोके खाली झुकायचे आणि त्या हिसक्यासरशी दचकून

जागा होऊन तो एकदम घोड्याला टाच मारायचा. हे सारे पहायला-अनुभवायला मला खूप आवडत होते. त्या भरदार खांद्यांकडे मी एकवार नजर टाकली आणि त्यावर माझे डोके टेकवताना एक प्रेमळ विचार मनात आला: "सुवान, आपण म्हातारे होत चाललो. काळाची वाटचाल चालूच असते. पण आपण अर्थहीन जगतोय असं मात्र मुळीच वाटत नाही. ही महत्त्वाची गोष्ट आहे. आम्ही तरुण होतो ही अगदी काल घडल्यासारखी गोष्ट वाटते. वर्षं किती वेगानं उलटतात. खरंच, जिवंत असणं ही किती भाग्याची बाब आहे. एवढ्यात थांबणं फार घाईचं ठरेल. अजून खूप काही करायचं बाकी आहे. मला तुझ्याबरोबर खूप खूप वर्षं जगायचंय!"

मी डोके वर उचलले, आकाशाकडे नजर टाकली आणि माझा श्वास रोखला गेला. त्या तिथे, तेजस्वी तारकांच्या मध्ये उंच ठिकाणी, पूर्वीप्रमाणेच सबंध आकाशभर पसरलेला चंदेरी पट्टा होता. कापणी करणाऱ्याची वाट! कुणीतरी गाज्या झोडपलेल्या ताटांचा भारा उराशी धरून धान्याचे दाणे वाटभर सांडीत गेला आहे, या कथेवर मी पुन्हा एकदा विश्वास ठेवायला तयार होते. त्या उंच आकाशात कडब्याच्या ताटांचे सोनेरी तुकडे, भूस आणि तुसे वाऱ्यावर जणू तरंगताहेत असे वाटत होते. भुशीबरोबर सांडलेले दाणे वेगळे निवडून काढण्याइतके स्पष्ट दिसत होते. "अगबाई!" मी चकित हळूच उद्गारले आणि क्षणात सारे काही आठवले: फार फार वर्षांपूर्वीची ती आमची पहिली रात्र, आमचे प्रेम, आमचे तारुण्य आणि स्वप्नात पाहिलेला बलाढ्य

शेतकरी! खरेच, सारे खरे झाले होते, आम्ही पाहिलेली सारी स्वप्ने प्रत्यक्षात उतरली होती. भूमी आणि पाणी आमचे स्वतःचे होते, आमचे स्वतःचे धान्य आम्ही नांगरीत होतो, पेरीत होतो आणि झोडपीत होतो. त्या पहिल्या रात्री आम्ही ज्या ज्या गोष्टी मनात आणल्या होत्या त्या सर्वच्या सर्व प्रत्यक्षात उतरल्या होत्या. एका नव्या काळाचा उदय होईल, एक नवे जीवन अस्तित्वात येईल याची त्या पहिल्या रात्री आम्हाला कल्पना नव्हती. पण काळाच्या आकांक्षा, चांगल्याची व न्यायाची इच्छा या गोष्टीबरोबर जुळल्या होत्या. या विचारात गर्क होऊन काहीही न बोलता मी स्तब्ध बसून होते. सुवानकुल माझ्याकडे वळून म्हणाला:

"झोपलीस काय तोल्गोनाई? दमलीयस् तू. काळजी नको करू, आत्ता घर येईल. मी सुद्धा पार थकलोय." थोडा वेळ गप्प राहून तो पुढे म्हणाला: "नव्या रस्त्याला चक्कर मारून जाऊ या?"

"हो, चला जाऊ या."

खेड्याच्या एका टोकाला पडीत जमिनीवर हा नवा रस्ता तयार होत होता. खरे म्हणजे अजून तेथे रस्ता झालेला नव्हता. नव्या जोडप्यांसाठी त्या वसंतात जमिनीचे तुकडे पाडून प्लॉटची आखणी तेवढी करून ठेवलेली होती. कुठेतरी अर्धवट भिंती उभ्या राहिलेल्या दिसत होत्या. कासीम आणि अलिमानला एक प्लॉट मिळाला होता. म्हणून एकूण काम कुठपर्यंत आले आहे यावर नजर टाकण्यासाठी आम्ही नव्या रस्त्याला चक्कर मारून जाणार होतो. कापणीच्या दिवसात स्वतःच्या खाजगी कामाला दिवसा वेळ सापडत

नाही. वसंतामध्ये कासीम, अलिमान आणि जयनाकने मातीच्या विटा तयार करून ठेवल्या होत्या. त्यांचे ढीग आत्ता वाळत होते. त्यांनी घराचा पाया एव्हांना खणला होता आणि गेल्या आठवड्यातच नदीवरून दगड व रेती गाड्या भरून आणले होते. नदीला पूर येण्यापूर्वीच सुदैवाने त्यांनी हे सारे काम पार पाडले होते. आता कुंपणाच्या मध्यभागी दगडांची भलीमोठी रास पडली होती. आपल्या मुलांच्या कामगिरीवर सुबानकुल खूष होता.

"भले शाबास, त्यांनी इथं कामाला सुरुवात तर केली आहे. इथं भरपूर दगड आहे, खरं म्हणजे जरूरीपेक्षा जास्त आहे." तो म्हणाला. "कापणीच्या हंगामानंतर आपण भिंती उभारू आणि छप्पर घालू. पुढच्या वसंतापर्यंत सारी [illegible] कामं उरकून टाकू. कुठल्याही परिस्थितीत हिवाळ्याच्या आधी सारी कामं आटपायला आपल्याला काही वेळ मिळणार नाही. तुला काय वाटतं तोल्गोनाई?"

"बरोबर आहे," मी म्हणाले. "भिंती उभ्या करणं आणि छप्पर घालणं हे मुख्य काम. बाकी सारं आपोआप होईल." एकाएकी माझ्या मनात जयनाकचा विचार आला आणि मी हसले. "आता आपल्या जयनाकचंच पहा, त्याला नव्या गोष्टींची नुसती घाई! तो म्हणाला की, सभेत म्हणे ठराव मंजूर केलाय नि या रस्त्याला कम्सोमोल रस्ता हे नाव द्यायचं ठरवलंय. अलिमान त्याला चिडवून म्हणाली: 'जयनाक, तू त्या जुन्या काळच्या स्वप्नाळू [illegible] आहेस. मूल जन्मायच्या आधीच तू नाव ठेवून मोकळा! प्रथम लग्न करून, घर बांधून, त्यासमोर

रस्ता आखून मग नावाचा विचार का करीत नाहीस?' पण जयनाक काय तिला ऐकतोय! 'तुला काहीही समजणार नाही' असं तिला म्हणून मोकळा झाला."

सुवानकुलने मान डोलावली व तो हसला.

"तुझं बरोबर आहे. जन्मतःच तो उतावळा आहे. पण त्यानं रस्त्याला अगदी योग्य नाव शोधून काढलं. ही इथली सारी घरं तरुण मंडळींची आहेत. आपली माणसं वाढताहेत, दर वर्षाला जास्त जास्त माणसं होताहेत. आता खेड्यात पुरेशी जागा नाही म्हणून आपल्याला नवे रस्ते आखावे लागले. हे चांगलं चिन्ह आहे. आणि जेव्हा या नव्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना घरं उभी राहतील, तेव्हा तुझ्या मुलाचं बरोबर होतं याची तुला खात्री पटेल."

आम्ही तेथे बोलत उभे होतो तेव्हा ही रात्र सर्वांत भयानक शापित रात्र आहे याची त्यावेळी आम्हाला कल्पना नव्हती...

३

"तोल्गोनाई, डोकं वर उचल, स्वतःला सावर."

"ठीक आहे. दुसरं मी काय करू शकते? प्रयत्न करीन. धरतीमाते, आठवतो तुला तो दिवस?"

"अर्थात. तोल्गोनाई, मी कधीच काहीही विसरत नाही. काळ जेव्हा सुरू झाला तेव्हापासून शतकानुशतकांच्या खुणा मी बरोबर बाळगतेय. पुस्तकात सारा इतिहास सापडणार

नाही, लोकांच्या मनात सारा इतिहास सामावून रहात नाही, पण तो सारा माझ्यात सामावला आहे. आणि तोल्गोनाई, तुझं आयुष्यही माझ्यात सामावलं आहे, माझ्या काळजात कोरलेलं आहे. मी तुझं ऐकतेय, तोल्गोनाई. आज तुझा दिवस आहे."

४

दुसऱ्या दिवशी सूर्य वर येण्यापूर्वीच आम्ही कामाला सुरुवात केली. नदीपासच्या कड्यावरचा गव्हाचा पट्टा आम्ही [illegible] दिवशी कापायला घेतला होता. त्या जागी कंबाईन वाढवायला तसा पट्टा नव्हता, पण लोंब्या एव्हांना सुकायला लागल्या होत्या. शेताच्या कडेच्या गव्हाच्या लोंब्या नेहमी [illegible] पिकतात. एका ओळीत उभे राहून आम्ही दोन पेंढ्या [illegible] असतील नसतील तोच नदीच्या दुसऱ्या तीराला [illegible] घोडेस्वार आमच्या नजरेला पडला. झारेच्येमधल्या शेजारच्या घरापासून तो अचानक उगवलेला दिसला. त्याच्यामागे धुळीचे लोट उठवीत, झाडाझुडपातून तुफान [illegible]. जणू कुणीतरी पाठलाग करीत असल्याप्रमाणे तो [illegible] घोडा पिटाळीत होता. लौकरच तो नदीकिनारीच्या [illegible]पर्यंत येऊन पोचला. त्या खडकावरून तो सरळ नदीच्या [illegible] आपला घोडा घालू पहात होता. आश्चर्यचकित होऊन [illegible] सारे ताठ उभे राहून पाहू लागलो. अशी कोणती [illegible] त्याला लागली होती? तिथून केवळ दोन मैलांवर

असलेल्या पुलावरून तो का येत नव्हता? तो घोडेस्वार एक रशियन मुलगा होता. आपला तांबूस पिंगट रंगाचा घोडा तो जबरीने नदीत घालीत होता. आम्ही श्वास रोखले: असा का तो स्वतःच्या जिवावर उदार झाला होता? अशा भलत्या वेळी कुणी नदीशी खेळ करीत नाही. अशा पुरामध्ये घोडाच काय, पण उंट सुद्धा पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जातो आणि त्याचा मागमूसही रहात नाही.

"अरे! कुठं चाललायस् तू? थांब! थांब!" आम्ही ओरडलो.

तोसुद्धा हातवारे करीत ओरडत होता, पण नदीच्या घोंघावणाऱ्या आवाजात त्याचे शब्द बुडाले. आम्हाला फक्त त्याचा "... आ SSS ... ई SSS ... आ SSS ... ई SSS" असा लांब ओढलेला सूर ऐकू येत होता.

त्याचे वागणे आम्हाला समजत नव्हते. त्याने झटकन घोड्याचा किंचित लगाम खेचला, त्या तांबूस पिंगट जनावराला चाबूक मारला आणि नदीत घातले. लौकरच ते प्रवाहात सापडले. घोड्याचे डोके व कान ताबडतोब पाण्यात सपाट पडले आणि उघड्या पडलेल्या त्याच्या जबड्यामधील दात लाटांना इकडेतिकडे तोडू लागले. तो मुलगा घोड्याची आयाळ गच्च पकडून होता. त्याच्या डोक्यावरची टोपी पाण्याच्या भोवऱ्याने खेचून घेतली होती. आम्ही तीरावर मागेपुढे धावत होतो. प्रवाहाने त्याला पकडले होते व तो वेगाने वहात चालला होता. पण त्याने बरोबर दिशा धरून पैलतीर गाठायची धडपड चालवली होती. खूप खालपर्यंत तो वाहवत गेला व चक्कीपलिकडे घोड्यासकट किनाऱ्यावर

आला. आम्ही सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. काहींना त्या घोडेस्वाराच्या धाडसाचे कौतुक वाटले आणि त्यांनी त्याचे कौतुक केले. काही म्हणाले की, त्याच्या या येण्यामागे नक्कीच काही कारण असले पाहिजे आणि आपण ते शोधून काढले पाहिजे. पण दुसरा एक वैतागून म्हणाला:

"कुणीतरी दारू ढोसलेला मूर्ख शहाणपणा दाखवीत असावा आणि इथं तुम्ही उगीच त्याच्यामागं धावायला बघनाय!"

आमची गडबड एवढ्यावर थांबली. आम्हाला काम करणे भाग होते. मीही मनाशी विचार केला, "बरोबर असावे. डोकं ताळ्यावर असलेला माणूस असा धोका कधीही पत्करणार नाही."

कासीम त्या दिवशी चक्कीजवळच्या पट्ट्याची कापणी करीत होता. त्याचा कंबाईन जेव्हा अचानक थांबला तेव्हा पट्टा ढिला झाला असेल, किंवा साखळी तुटली असेल किंवा आणखी काहीतरी बिघाड झाला असेल असे वाटून मी तिकडे लक्ष दिले नाही. माझ्यापासून जवळच अलिमान कापणी करीत होती. एकाएकी ती उंच पट्टीत ओरडली:

"अम्मी SSS !"

मी दचकले. भीतीने तिचा चेहरा पांढराफटक पडला होता आणि हातातला विळा पायाशी पडला होता.

"काय झालं? साप?" मी धावत तिच्याकडे गेले.

ती काहीच बोलली नाही. तिची घाबरली नजर ज्या दिशेला खिळली होती तिकडे मी पाहिले आणि एकदम स्तब्ध झाले. तिथे कंबाईनजवळ आरडाओरडा चालू होता, गहू

तुडवून लोक त्याच्याकडे सैरावैरा धावत होते, काही घोडेस्वार तिकडे दौडत होते, तर घोडागाडीवाले उभ्याने घोड्यांना चाबकाने पिटाळीत तिकडे निघाले होते.

"अम्मी, तिथं काहीतरी झालंय!" अलिमान किंचाळली आणि धावत सुटली.

कुणाच्या तरी बोलण्याने माझे काळीज चरचरा कापीत गेले:

"कुणीतरी पात्यामध्ये सापडलं वाटतं! किंवा पिपात पडलं! धावा लौकर!"

आणि सारे अलिमान पाठोपाठ धावले.

"इडा पिडा टळो! इडा पिडा टळो!" मी तोंडाने प्रार्थना पुटपुटत हात उंचावून तिकडे धावले. ओहळावरून उडी मारताना मी सपशेल पालथी पडले, पुन्हा उठून पाय फरपटत धावू लागले. देवा रे, काय वेगाने मी गव्हामधून धावत होते! माझ्यासाठी थोडे थांबा असे मला इतरांना ओरडून सांगावेसे वाटत होते, पण मला ओरडायला जमेना. माझ्या तोंडून आवाजच उमटत नव्हता.

मी कंबाईनजवळ पोचले तेव्हा जमावाची एकच गडबड चालली होती. मला धड एक शब्दही ऐकू येत नव्हता, काय चालले ते काहीही समजत नव्हते. त्या लोकांमध्ये घुसत मी ओरडले: "थांबा! मला जाऊ दे!" लोक बाजूला झाले. कासीम आणि अलिमान एकमेकांशेजारी कंबाईनजवळ उभे राहिलेले मी पाहिले, तेव्हा एखाद्या आंधळीप्रमाणे माझा तोल गेला. कासीमने चटकन पुढे होऊन मला धरले.

"अम्मी, लढाई चालू झालीय!" त्याचा आवाज लांब कुठून तरी मला ऐकू येतोय असे वाटले.

मी त्याच्याकडे बावरल्यासारखी पहात राहिले.

"लढाई? तू लढाई म्हणालास?" मी विचारले.

"होय, अम्मी, लढाई चालू झालीय."

पण तरीही मला काही समजत नव्हते. त्या शब्दांचा अर्थच कळेनासा झाला होता.

"लढाई म्हणजे काय? कशाला लढाई? तू खरंच लढाई म्हणालास?" मी तो अपरिचित, भयानक शब्द सारखा सारखा बोलत राहिले आणि एकदम घाबरून शहारले व नुकत्याच अनुभवलेल्या भीतीमुळे आणि धक्का देणाऱ्या बातमीमुळे स्फुंदून स्फुंदून रडू लागले.

अश्रू माझ्या चेहऱ्यावरून ओघळत होते; माझे पाहून इतर बायकाही गळा काढून रडू लागल्या.

"शांत रहा! सारेजण शांत रहा!" एका पुरुषाचा आवाज ओरडला.

ती बातमी खरी नाही असे तो माणूस सांगेल या आशेने सारेजण एका क्षणात गप्प झाले. पण तो काहीच बोलला नाही. आणि दुसरेही कुणी काही बोलले नाही. स्तेपमध्ये एवढी शांतता पसरली की, नदीच्या फेसाळ पाण्याचा आवाज आम्हाला ऐकू येत होता. कुणीतरी मोठ्यांदा सुस्कारा टाकला आणि हालचाल केली. पुन्हा साऱ्यांचा तणाव वाढला, पण तरीही कुणीही एकही शब्द उच्चारला नाही. पुन्हा सारा स्तेप एवढे स्तब्ध झाले की, उन्हाच्या झळांचा आम्हाला डासांच्या तारस्वरातल्या गुणगुणण्यासारखा आवाज ऐकू येत होता. कासीमने चहुकडे नजर टाकली व स्वतःशीच पुटपुटल्यागत तो म्हणाला:

"बर्फ पडण्यापूर्वी आपल्याला सारं पीक कापायचं असेल तर घाई केली पाहिजे." एक क्षणभर तो गप्प राहिला आणि चटकन ड्रायव्हरकडे नजर टाकून तो म्हणाला: "अरे थांबलात कशाला तिथं? मोटर चालू करा! बघताय कशाकडं? जर आपण गहू कापला नाही तर उद्या आपल्यालाच उपाशी रहावं लागेल! चला, आपापल्या कामाला लागा!"

जमाव पांगू लागला. झारेच्येहून आलेल्या त्या रशियन मुलाकडे माझे लक्ष गेले. ओलाचिंब निथळत तो तिथे उभा होता आणि आपल्या ओल्या घोड्याचे लगाम त्याने हातात धरले होते. जमावाच्या हालचालीने तो तरुण निरोप्या भानावर आला, त्याने हळूच आपला देखणा चेहरा वर उचलला आणि खोगीराचा पट्टा आवळायला सुरुवात केली. तो वयाने किती लहान आहे याची त्यावेळी मला जाणीव झाली. माझ्या जयनाकच्याच वयाचा तो असावा, जरा त्याच्यापेक्षा उंच होता आणि त्याचे खांदे अधिक रुंद होते. त्याच्या कपाळावर ओल्या केसांची झुलुपे गच्च चिकटून बसली होती, त्याच्या ओठांवर व चेहऱ्यावर खरचटल्याच्या खुणा उमटल्या होत्या. लोकांकडे पाहताना त्याच्या नजरेत एवढी तीव्र वेदना भरली होती की, नुकतेच त्याने आपले बालपण मागे सारले आहे व आत्ता, एका सकाळीत तो प्रौढ बनला आहे, हे मला जाणवले. त्याने एक मोठा उसासा टाकला, रिकिबीत पाय अडकवला आणि खेड्यातल्या एका मुलाला उद्देशून म्हणाला:

"मित्रा, शेताच्या अध्यक्षांना आणि पथक-प्रमुखांना शोधून काढ आणि त्यांना सांग की, जिल्हा समितीच्या कचेरीत त्यांना ताबडतोब बोलावलंय. मला वेळ नाही, मला आणखी दोन सामुदायिक शेतांवर जायचंय." एवढे बोलून तो घोड्यावर स्वार झाला आणि लगामांना त्याने झटका दिला.

पण ज्या मुलाशी तो बोलला त्याने त्याला थांबवले.

"थांब. तुझी टोपी वाहून गेलीय. ही माझी घे. आज ऊन खूप तापतंय."

त्या तरुण दूताच्या पाठमोऱ्या आकृतीकडे आम्ही एकटक पहात राहिलो. वाऱ्याच्या वेगाने धावणाऱ्या त्याच्या तांबूस [illegible] घोड्याच्या टापांचा त्या धुळकट रस्त्यावर खूप [illegible] आवाज येत होता. लौकरच धुळीच्या लोटात तो घोडेस्वार दिसेनासा झाला. तरीही आम्ही रस्त्यावर उभेच होतो. प्रत्येकजण आपापल्या विचारात गर्क होता. जेव्हा [illegible] आणि कंबाईनच्या इंजिनांचा एकदम आवाज सुरू झाला तेव्हा लोकांनी दचकून एकमेकांकडे पाहिले.

त्या क्षणापासून एक नवे आयुष्य सुरू झाले. लढाईच्या [illegible]नले आयुष्य...

लढाईचे स्फोट आम्हाला ऐकू येत नसले तरी आमच्या [illegible]ग्रामधला आकांत आणि आमच्या लोकांचा आक्रोश आम्हाला ऐकू येत होता. अशी जळती, भाजून काढणारी [illegible] मी आयुष्यात कधीही अनुभवली नव्हती. दगडावर [illegible] तर क्षणात त्या लाळेची वाफ व्हायची. एकदम [illegible] चार दिवसात गहू पिकला. सुकलेल्या गव्हाच्या ताटांची [illegible] पार क्षितिजापर्यंत उभी होती. कापणी ताबडतोब

करायला पाहिजे होती. गव्हाची केवढी दौलत उभी होती! घाईगडबडीत आता जे नुकसान होणार होते ते बघताना भयंकर यातना होणार होत्या. किती गहू तुडवला गेला, रस्त्यावर सांडला गेला, वाया गेला. आम्हाला वेळ एवढा अपुरा पडत होता की, गव्हाच्या पेंढ्याही आम्ही बांधू शकत नव्हतो. तसेच भारे उचलून गाड्यांमध्ये भरीत होतो, घाईघाईने झोडपणीला नेत होतो. वाटेवर असंख्य लोंब्या सांडत होत्या. पण हे नष्टचर्य एवढ्यावरच थांबले नव्हते. लोकांकडे बघवत नव्हते. दर दिवशी पुरुषांना बोलावणी येत होती आणि सैन्यात दाखल व्हायला ते जात होते. जे मागे राहिले होते ते सतत काम करीत होते. दिवसभर तापत्या उन्हात आणि कोंदलेल्या वातावरणाच्या रात्रीतही ते कापणी करीत होते, झोडपणी करीत होते, धान्याची पाठवणी करीत होते. तहानभूक विसरून, झोपेविना, विश्रांतीविना ते सतत काम करीत होते. आणि कामाचा बोजा सतत वाढत होता, कारण पुरुषांची संख्या सतत कमी होत चालली होती. माझा मुलगा कासीम अहोरात्र खपत होता. अनेकांच्या ताकदीपलिकडचे काम आपण एकट्याने पार पाडू असे बिचाऱ्याला खरेच वाटत होते का? कापणी कशीबशी रडतखडत चालली होती आणि तो शेतांमध्ये वेड्यासारखा कंबाईनच्या खेपा घालीत होता. रात्रंदिवस त्याचा कंबाईन चालू होता, एकामागून एक गव्हाचा पट्टा तो कापीत होता, तापत्या धुळीच्या लोटांमधून तो या शेतापासून त्या शेतापर्यंत धावत होता. त्या साऱ्या दिवसात कासीम एकदाही कंबाईन सोडून गेला नाही. उन्हाच्या

भाजल्या झळा सोसत, अद्याप कापणी व्हायच्या गव्हाच्या शेतांकडे अंधुक धुक्यातून बारिक नजरेने न्याहाळीत तो कंबाईनच्या प्लॅटफॉर्मवर उभा राहून सतत काम करीत होता. त्याच्या काळवंडलेल्या चेहऱ्याकडे पाहताना, त्याच्या खपाटलेल्या गालफडांकडे बघताना भीती वाटत होती, तसेच वाईटही वाटत होते. त्याच्यासाठी माझी आतडी पिळवटत होती. "उन्हात तो कोसळून पडेल, अशा कामानं तो खलास होईल" असा विचार सतत मनाला बोचत राही, पण तसे मोठ्याने बोलायचा मला धीर होत नव्हता. त्याच्या डोळ्यातली रागीट झाक मला सांगत होती की, तो माघार घेणार नाही, तो आपल्या जागी शेवटपर्यंत ठाम उभा राहणार.

आणि अखेरीस तो शेवटचा क्षण आला. एक दिवस अलिमान धावत कंबाईनकडे गेली आणि परतली तेव्हा पार कोलमडून गेली होती.

"त्याला बोलावलंय."

"केव्हा?"

"गावच्या पंचायतीकडून आताच निरोप्या आला होता."

आज ना उद्या कासीमची पाळी येणार याची मला कल्पना होती. आणि तरीही मी ती बातमी ऐकली तेव्हा एकदम पायातली शक्तीच गेल्यासारखी वाटली. कामाने दुखऱ्या माझ्या बाव्हट्यांमधून अशी जबरदस्त वेदना गेली की झटकन माझ्या हातून विळा गळून पडला आणि मी मटकन जमिनीवर बसले.

"तो तिथं काय करतोय, त्याला जायची तयारी केली

पाहिजे," मी पुटपुटले. माझे थरथरणारे ओठ काबूत आणणे मला कठीण जात होते.

"तो संध्याकाळी घरी येईन असं म्हणाला. अम्मी, मी आता जाते. तुम्ही अब्बांना सांगा. मी सबंध दिवसात जयनाकला पाहिलं नाही. तो कुठं असेल?"

"घरी जा, अलिमान. थोडी खिचडी तयार कर. मी लौकरच येते," मी म्हणाले.

पण मी खुंटांमध्ये तशीच बसून राहिले. खूप वेळपर्यंत मी तशी बसून होते. माझ्या डोक्यावरून गळून पडलेला रुमाल उचलायची सुद्धा माझ्यात ताकद उरली नव्हती. जवळून चाललेल्या मुंग्यांच्या लांबच लांब रांगेकडे माझी नजर खिळली. गवताच्या बारिक काड्या आणि धान्याचे कण वाहून नेण्याचे काम त्या सतत करीत होत्या. त्यांच्या सारखाच एक कष्टकरी जीव दुःखाने गुदमरून त्यांच्या शेजारीच बसला आहे याची त्यांना खिन्भरही कल्पना नव्हती. त्या क्षणाला त्या बारक्या जीवांचा मला हेवा वाटला. काळजी किंवा चिंता न करता त्या काम करू शकत होत्या. लढाई नसती तर मला मुंग्यांच्या आयुष्याचा असा कधी हेवा वाटला असता का? मला या विचाराची सुद्धा लाज वाटतेय.

दरम्यान जयनाक आपल्या गाडीतून आला. रेल्वे स्टेशनावर धान्य वाहून नेणाऱ्या कम्सोमोल पथकाचा तो सभासद होता. कदाचित त्याला आपल्या भावाला बोलावणे आल्याची बातमी समजली असावी, म्हणून तो मला भेटायला आला होता. जयनाकने गाडीतून उडी मारली, माझा रुमाल उचलला आणि माझ्या डोक्यावर ठेवला.

"चल अम्मी, घरी जाऊ या," मला हाताला धरून [illegible] तो म्हणाला.

आम्ही घरापर्यंत काहीच बोललो नाही. गेल्या काही दिवसात जयनाक पुरता बदलून गेला होता. तो एकदम [illegible] बनला होता. त्या निरोप घेऊन आलेल्या रशियन [illegible] आणि त्याच्यात मला काहीतरी साम्य जाणवत होते. [illegible] तरुण नजरेत तीच गांभिर्याची छटा कायम ठाण [illegible] बसली होती. गेल्या काही दिवसात त्यानेही आपल्या [illegible]सुलभ भावनांना निरोप दिला होता. इतर अनेकांचे [illegible] झाले होते. जयनाकबद्दल विचार करीत असतानाच [illegible] आठवण झाली की, खूप दिवसात मासेलबेककडून [illegible] काहीच खबर आलेली नाही. "काय घडले असावे? [illegible] बोलावणे आलेय काय? त्याने पत्र का नाही लिहीले, [illegible] निरोप त्याने का पाठवू नये? त्याला घराचा [illegible] पडला असावा. आपल्या आईवडिलांना तो विसरला [illegible] शहरी वातावरणात रमून गेला. हे काही अभ्यासाचे [illegible] नव्हते. त्याने घरी असणे आत्ता आवश्यक होते, [illegible] तो शहरात काय करीत बसलाय?" मी गाडीत [illegible] असताना अशा तऱ्हेचे दु:खी विचार माझ्या मनात [illegible] होते.

"जयनाक, तू सारखा स्टेशनावर जात असतोस," मी [illegible], "ते काय म्हणतात ते तू ऐकलंस काय? लढाई [illegible] संपेल?"

"नाही, अम्मी, लढाई एवढ्यात संपणार नाही. हा [illegible] कठीण काळ आहे. जर्मन आपल्याला आणखी

आणखी मागं रेटताहेत. जर एखाद्या ठिकाणी दम धरून आपण त्यांना चांगला चोप दिला, तरच आपण मुसंडी मारून पुढं जाऊ शकू. मला वाटतं, लौकरच तसं काहीतरी घडावं." त्याने घोड्यांना चुचकारले आणि मागे वळून तो म्हणाला: "अम्मी, तुला भीती वाटते? तू खूप घाबरली आहेस का? या गोष्टींचा विचार करायचं सोडून दे. अम्मी, याचा विचार करू नको आणि चिंता करू नको. सारं काही ठीक होईल, फक्त धीर धर आणि पहा."

माझा वेडा बछडा! माझे सांत्वन करायची त्याची ही तऱ्हा होती. विचार करायचे कुणी थांबेल का? मी डोळे मिटले आणि कान बंद केले तरी मी सतत विचार करीत राहणारच.

आम्ही घरी आलो तेव्हा अलिमान रडत बसलेली आम्हाला दिसली. तिने स्वैपाकाची काहीही तयारी केलेली नव्हती. मला खूप राग आला. "काय झालंय काय तुला, दुसऱ्या मुलींना काय तुझ्यासारखं दु:ख झालेलं नाही?" मला असे म्हणावेसे वाटत होते. "सारेचजण लढाईवर चाललेत, एकटा तुझा नवराच नाही काही! अशी कोपऱ्यात नाक सुरमुरत काय बसलीस! ही काय वागण्याची तऱ्हा झाली? मग आपण पुढं निभावून कसं नेणार?" पण मी विचार बदलला आणि काहीच बोलले नाही. तिच्या तारुण्याची मला दया आली. कदाचित माझे चुकत होते, तिचे अंत:करण मी पहिल्या दिवसापासून भाजून पोळून काढायला हवे होते, म्हणजे पुढे सहन करणे सोपे गेले असते. मला काहीच माहीत नाही. मी काहीच बोलले नाही, एवढेच मला ठाऊक आहे.

संध्याकाळच्या सुमाराला कासीम घरी आला. फाटकात शिरला न शिरला तोच चुलीशी बसलेली अलिमान गमारखी त्याच्याकडे धावत सुटली आणि त्याच्या भोवती मिठी घालून हमसाहमशी रडू लागली.

"मी मागं राहणार नाही, मला तुझ्याशिवाय रहायला जमणार नाही, त्यापेक्षा मी मरण पत्करीन!"

कासीम थेट कंबाईनवरून तसाच आला होता. तो धुळीने. घाणीने माखला होता. त्याचा चेहरा गंभीर झाला होता. आपल्या बायकोचे हात खांद्यावरून बाजूला करीत तो म्हणाला:

"जरा थांब अलिमान. मी फार मळलोय. मला साबण आणि टॉवेल दे. मी नदीवर जाऊन आंघोळ करून येतो."

अलिमानने माझ्याकडे वळून पाहिले. मी समजले. रिकामी बादली हातात देऊन मी तिला म्हणाले:

"परत येताना थोडं पाणी घेऊन ये."

त्या रात्री ती दोघे परत घरी आली तेव्हा चंद्र मावळतीला चालला होता. मी घरातली कामे जयनाकच्या मदतीने करीत होते. मध्यरात्रीच्या सुमाराला सुवानकुल घरी आला. तो कुठे गेला असावा याची चिंता करीत मी वाट पहात होते. कळपामधून राखी घोडा परत आणण्यासाठी म्हणून तो डोंगरात गेला होता असे त्याने मला सांगितले. कासीम जेव्हा प्रथम ट्रॅक्टर ड्रायव्हर झाला तेव्हा त्याच्या-साठी आम्ही ते शिंगरू विकत घेतले होते. आता तो भरधाव पळणारा नगडा घोडा बनला होता. त्याचे खूर मजबूत होते आणि मागचे पाय खुरांशी पांढरे होते. सारे गाव आमच्या घोड्याला ओळखायचे आणि मुली तर गाणे म्हणायच्या:

"...ऐकता टापा अबलख घोड्याच्या रस्त्याला,
हरपून भान धावते त्याला निरखायला..."

आपल्या मुलाने लढाईवर जाण्यापूर्वी निदान एक दोन दिवस तरी त्याच्या राखी घोड्यावरून दौड करावी अशी सुवानकुलची इच्छा होती.

भल्या सकाळीच आम्ही सारे सेनाभरतीच्या कचेरीकडे निघालो. अलिमान आणि मी जयनाकच्या घोड्याच्या गाडीत बसलो होतो, तर कासीम आणि त्याचे वडील आपापल्या घोड्यांवर होते.

त्यावेळी सेनाभरती मोठ्या प्रमाणावर चालू होती. अजून खेड्यांमध्ये खूप पुरुष होते. मी त्या चढाच्या हमरस्त्याकडे पाहिले. एका टोकाला मोठ्या खिंडीपर्यंत गेलेल्या काळ्या फितीसारखा तो दिसत होता आणि त्याचे दुसरे टोक नजरेआड गेले होते. सगळ्या खेड्यांमधून लोक घोड्यांवरून आणि बैलगाड्यांमधून तेथे आले होते. जिल्ह्याच्या ठिकाणी लोकांची आणि गाड्यांची एवढी दाटी झाली होती की, त्यामधून वाट काढणे अगदी दुरापास्त झाले होते. तिथे लहान मुले होती, म्हातारे-म्हाताऱ्या होत्या. सारीजण आपापल्या मुलांभोवती गोळा झाली होती, एक क्षणभरही त्यांना विसंबत नव्हती. काही रडत होते, काही थोडेसे धुंदावले होते. ती जुनी म्हण किती खरी आहे: लोक समुद्रासारखे असतात, कुठे खोल तर कुठे उथळ! लढाईवर जाणाऱ्यांना निरोप देण्याच्या या गजबजल्या जागी तसेच काहीसे होते. तिथे काही धीट, स्वच्छ टपोऱ्या डोळ्यांचे तरुणही होते. त्यांनी स्वतःला उत्तम सावरले तर होतेच,

पण आपल्या नातेवाईकांना त्यांनी धीर दिला होता. ते गात होते, नाचत होते, छान बोलत होते, ॲकॉर्डियन वाजवीत होते. ते किर्घिझ आणि रशियन गाणी गात होते. प्रत्येकजण 'कात्युशा' गात होता. त्यावेळी ते गीत मी प्रथम ऐकले.

एकत्रित केलेले सारे सैनिक त्या रिक्रूट कचेरीच्या भल्या मोठ्या आवारात मावत नव्हते. म्हणून हजरी घेताना त्यांना मुख्य रस्त्याच्या मध्ये रांगेने उभे केले होते. लोक ताबडतोब शांत झाले, प्रत्येकाने श्वास रोखून धरला. लढाईवर जाणाऱ्यांकडे मी एकदा पाहिले आणि एक जळती लाट माझ्या मनात उमटली. ते सारे किती सारखे होते: भक्कम आणि निरोगी तरुण पुरुष. काम करायला आणि जगायला खरे म्हणजे त्यांच्यापुढे लांबच लांब आयुष्य होते. दरवेळी ज्याचे नाव घेतले जाई तो "हजर" म्हणून उत्तर देई, आणि आमच्याकडे पहात असे. "सुवानकुलोव कासीम" हे नाव उच्चारताच मी दचकले आणि एक नवी तीव्र वेदनेची लाट माझ्या काळजातून आरपार गेली. "हजर!" कासीम उत्तरला. अलिमानने माझा हात जोराने दाबला. "अम्मी" ती अस्फुट म्हणाली. मी काय करू शकत होते? हा विरह किती खूप अवघड आणि भयानक जात आहे याची मला कल्पना होती, पण अशा कसोटीच्या दिवसात आपल्या लोकांपासून लांब राहणे कसे शक्य होते! माझी लाडकी अलिमान! ही लढाईच्या काळाची गरज आहे, ही देशाची गरज आहे हे तीसुद्धा समजली होती. तिच्याएवढे नवऱ्यावर प्रेम करणारी बाई यापूर्वी तरी मला ठाऊक नव्हती.

चोवीस तासाच्या आत ती माणसे लढाईवर जातील असे आम्हाला सांगण्यात आल्याने आम्ही त्याच दिवशी खेड्यात परतलो. आम्ही घरी परत जावे असे कासीमनेच आम्हाला सांगितले. आम्ही शहरात ताटकळत राहण्यात काही अर्थ नाही असे त्याने आम्हाला सांगितले व तो म्हणाला की, त्याच्या जाण्याच्या रस्त्यावर आमचे सामुदायिक शेत आहे, तेव्हा तेथेच तो आमचा निरोप घ्यायला येईल. आम्ही अलिमानसाठी सुवानकुलचा घोडा ठेवला आणि गाडीतून इतरांबरोबर परत आलो. रंगरूटांना आपल्या गाडीतून स्टेशनापर्यंत नेण्यासाठी जयनाकही मागे थांबला.

त्या रात्री मी जेव्हा रिकाम्या घरात शिरले तेव्हा मी माझ्या भावनांना वाट मोकळी करून दिली आणि खूप रडले. सुवानकुलने चहासाठी थोडे पाणी उकळले, माझ्यासाठी कडक चहाचा एक प्याला तयार केला आणि मला तो प्यायला लावला. नंतर तो माझ्याशेजारी बसून म्हणाला.

"तोल्गोनाई, आपण कोण होतो? या लोकांबरोबर राहून आपल्या आयुष्याला अर्थ आला, आपण कुणीतरी बनलो. तेव्हा आपल्या लोकांबरोबर चांगल्या-वाईट अशा साऱ्या काळाची सारखीच भागीदारी करू या. जेव्हा वेळ चांगली होती तेव्हा प्रत्येकजण समाधानी होता, पण आता प्रत्येकजण स्वत:पुरता विचार करील आणि आपल्या नशीबाला दोष देत बसेल का? नाही, हे योग्य होणार नाही. उद्या स्वत:ला आवर. अलिमान बेचैन झाली तर ती गोष्ट वेगळी आहे. कारण आपण जे आयुष्य अनुभवलं ते तिनं पाहिलेलं नाही. आणि तू आई आहेस. याची आठवण ठेव. शिवाय

लढाई पुढं चालू राहिली तर कदाचित मलाही जावं लागेल. मासेलबेकही वयात आलेला आहे, त्यालाही कदाचित बोलावतील. गरज पडेल तर आम्ही सारे जाऊ. तेव्हा तोल्गोनाई; कोणत्याही प्रसंगाला तोंड द्यायची तयारी ठेव. या परिस्थितीचा सराव करून घे."

दुसऱ्या दिवशी दुपारी तुकडी निघाली. कासीम आणि अलिमान यानी इतरांना मागे टाकले व ती दौडत घरी आली. निरोप घेण्यासाठी घरी थांबायला कासीमला परवानगी मिळाली होती. अलिमानचे डोळे खूप सुजले होते. बहुधा ती सबंध वाटेत रडत असावी. कासीम स्वतःला सावरून नेहमीसारखा वागायचा प्रयत्न करीत होता, पण ते सोपे नव्हते. आणि त्याने एक नवीनच कथा कुठून हुडकून काढली कुणास ठाऊक: एक तर विरहाच्या वेळी जास्त त्रास होऊ नये म्हणून अलिमानसाठी त्याने ही गोष्ट रचली असावी किंवा त्यांनी खरोखरच त्याला तसे सांगितले असावे. पण घरी आल्यानंतर घोड्यावरून उतरल्या क्षणापासून त्याने आम्हाला स्टेशनावर येऊ नका असे सांगायला सुरुवात केली. कासीमने सांगितले की, कदाचित तो स्टेशनावरून घरी परत येईल. कारण पीक कापणीचा हंगाम संपेतोपर्यंत कंबाईन ऑपरेटरांना आणि ट्रॅक्टर-ड्रायव्हरांना लढाईवर बोलवायचे नाही असे ठरवले होते म्हणे. आणि हा हुकूम जर वेळेवर मिळाला, तर अजूनही तो स्टेशनावरून परतला असता. त्याला अलिमानबद्दल आता वाईट वाटत होते, आम्हा सर्वांबद्दल वाईट वाटत होते याची मला आता जाणीव झाली. स्टेशनापर्यंत जायचे म्हणजे एक दिवसाचा प्रवास होता आणि

नंतर परत घरी परतताना काय? रस्ता संपता संपला नसता आणि सबंध रस्ताभर नुसते अश्रू, अश्रू आणि अश्रू! पण मी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. जीव असेपर्यंत आशा धरून असते म्हणतात. मुख्य रस्त्यापर्यंत त्याला निरोप द्यायला गेलो तेव्हा कुठे मला त्याच्या सांगण्याबद्दल संशय वाटायला सुरुवात झाली.

वाटेवर जाताना ज्यांनी ज्यांनी म्हणून कासीमबरोबर काम केले होते ते सारे त्याला निरोप द्यायला आले. कापणी करणारे, ड्रायव्हर लोक, झोडपणी करणारे—सारे धावत आले; कंबाईनसुद्धा जवळच उभा होता. कासीमच्या मदतनीसांनी तो थांबवला व ते निरोप द्यायला धावत आले.

लोहार लढाईवर जायला निघतो तेव्हा आपल्या घणाचा आणि ऐरणीचा निरोप घेतो, असे म्हणतात. माझा कासीमही आपल्या धंद्यातला कारागिर होता. कंबाईन थांबला तेव्हा तो काही गावकऱ्यांशी बोलत होता. त्याने पटकन रस्त्यावर नजर टाकली. घोड्याच्या गाड्या बरोबर असलेली आणि लाल झेंडा बरोबर घेतलेली रंगरूटांची रांग नुकतीच वळणावर वळली होती.

“अब्बा, धरा याला!” असे म्हणून कासीमने आपल्या राखी घोड्याचे लगाम सुवानकुलच्या हाती दिले आणि तो कंबाईनच्या दिशेने निघाला. त्याने त्याच्याभोवती फेरी मारली, सर्व बाजूंनी त्याची पाहणी केली. नंतर चपळपणे तो फलाटाच्या पायऱ्या चढला. “चल एशेनकुल, चालू कर! नेहमीप्रमाणं फुल स्पीडनं चालू दे!” तो ट्रॅक्टर ड्रायव्हरला ओरडून म्हणाला.

निम्म्या वेगात घरघरणारी इंजिने एकदम वेगाने फिरू लागली, त्यांचा घरघराट वाढला. कंबाईन थडथडू लागला, त्याच्या साखळया खळखळू लागल्या व कडब्याच्या चोयटयांचा ढीग बाजूला फेकताना गव्हाची रास तो आपल्या पट्टयाने नामावून घेऊ लागला. गरम वाऱ्याच्या झोतावर कासीमने आपला चेहरा धरला, तो खळखळून हसला, त्याने खांदे मागे उडवले आणि भोवतालचे जणू सारे काही क्षणभर विसरला. तो आणि ट्रॅक्टर ड्रायव्हर एकमेकांशी ओरडून बोलत होते, माना डोलावीत होते; शेताच्या टोकाला ते पुन्हा मागे वळले. स्तेपमधल्या पक्ष्यासारखा कंबाईन शेतामध्ये भिरीभिरी फिरत होता. एक क्षणभर आम्ही लढाईबाबतचे सारे काही विसरलो. लोक आनंदित नजरेने हा सारा प्रसंग पहात होते. पण अलिमानच्या नजरेतून तर आपल्या नवऱ्याबद्दलचा अभिमान ओसंडून चालला होता. कंबाईनच्या दिशेने ती हसऱ्या चेहऱ्याने, मंद मंद पावले टाकीत चालली होती. अखेर कंबाईन थांबला. आमचे चेहरे पुन्हा दुःखाने झाकोळले. आमच्या शेजारणीचा-आयेषाचा-मुलगा बेक्ताश त्यावेळी जेमतेम तेरा वर्षांचा होता आणि कासीमचा मदतनीस म्हणून कंबाईनवर काम करीत होता. तो एकदम कासीमकडे धावला आणि त्याला मिठी मारून रडू लागला. डोळयातले पाणी आवरून धरण्यासाठी मी ओठ आवळून धरले. सुवानकुलच्या ताकीदीची आठवण असल्याने मला रडायचा धीर होत नव्हता. कासीमने बेक्ताशला हवेत वर उचलले, त्याला घट्ट मिठी मारली आणि चाकाशी त्या मुलाला अलगद खाली उभा करून तो हळूहळू कंबाईनवरून खाली उतरला. आम्ही भोवती

जमा झालो. आपल्या इतर मदतनीसांचा, ड्रायव्हरचा आणि ट्रॅक्टर ड्रायव्हरचा त्याने निरोप घेतला. त्याला घाई करणे भाग होते. हमरस्त्यावरच्या उंचवट्यावरची सैनिकांची रांग एव्हांना पुढे सरकली होती.

कासीमचा आम्ही असा निरोप घेतला. आपल्या घोड्यावर चढण्याची त्याची वेळ येऊन ठेपली तेव्हा अलिमान भोवतालच्या लहानथोरांना विसरून धावत रडत कासीमकडे धावली व तिने त्याला मिठी घातली. बिच्चारी अलिमान! तिचा चेहरा पांढराफटक पडला होता, फक्त डोळे लालभडक झाले होते. आम्ही तिला दूर खेचले. पण ती पुन्हा आपल्या नवऱ्याकडे धावली. एखाद्या लहान मुलासारखी ती सारखा कासीमचा हात खेचीत होती आणि त्याला रिकिबीत पाय घालू देत नव्हती. ती विनवणी करीत होती:

"थांब ना! एक मिनिट! आणखी फक्त एकच मिनिट!"

कासीम पुन्हा पुन्हा तिची चुंबने घेऊन तिला चुचकारीत होता:

"अलिमान, आता रडू नको! मी उद्या स्टेशनावरून परत येतो बघ! विश्वास ठेव माझ्यावर!"

आणि मग सुबानकुल आपल्या सुनेला म्हणाला:

"अलिमान, त्याच्याबरोबर रस्त्यापर्यंत निरोप द्यायला जा. आम्ही इथंच त्याचा निरोप घेतो. आम्ही त्याला थांबवून धरत नाही." सुबानकुलने आपल्या मुलाचा हात हातात घेतला आणि प्रेमळ आवाजात तो म्हणाला:

"माझ्या डोळ्यात बघ."

त्या दोघांनी एकमेकांच्या डोळ्यात खोलवर पाहिले.

"मला समजलास?" त्याचे वडील म्हणाले.

"होय अब्बा, समजलो," मुलगा उत्तरला.

"यशवंत हो!" एवढे शब्द बोलून सुवानकुल आपल्या [illegible]ड्यावर स्वार झाला आणि एकदाही मागे न बघता दौडत [illegible]न गेला.

[illegible]सीमचा मुका घेऊन निरोप घेतला तेव्हा तो म्हणाला:

"[illegible]नेव्हेकची काही बातमी समजली तर मला त्याचा [illegible]."

[illegible] घोड्यांना घेऊन कासीम आणि अलिमान रस्त्याकडे [illegible] माझी नजर त्यांच्यापासून बाजूला सरकत नव्हती. [illegible] रस्त्यावरची रांग नजरेआड झाली होती. [illegible] रिकिबीला धरून शेजारून धावत होती, नंतर [illegible] झुकला, त्याने तिचे अखेरचे चुंबन घेतले [illegible] वेगाने दौडत जाण्यासाठी घोड्याला टाच [illegible] अलिमान त्याच्या टापांच्या धुळीतून धावत [illegible] तिच्यामागे धावले आणि तिला घरी परत आणले.

[illegible] दिवशी संध्याकाळच्या सुमाराला जयनाक [illegible] आला. त्याच्या गाडीला मागच्या बाजूला [illegible] बांधलेला होता.

५

[illegible] तिकडे लढाया चालल्या होत्या आणि रक्ताचे पाट [illegible], पण इथे आमचे काम म्हणजे एक लढाईच होती. [illegible] कासीमने दिलेला इशारा खरा ठरला होता. आम्ही

कितीही घाई केली तरी अखेरीस शेतातल्या काही गव्हाच्या पिकावर आणि झोडपणीच्या खळ्यावर बर्फाचा थर साचलाच. बर्फाखाली अजून इकडेतिकडे काही बटाटे राहिले होते. दर दिवसागणिक पुरुष माणसे गाव सोडून लढाईवर जात होती. पण आम्ही सारे दिवस शेतावर काम करीत होतो. आमच्या बोलण्यात लढाई शिवाय दुसरा विषय नव्हता, तिथे काय चालले असेल याचाच सतत विचार करीत होतो. प्रत्येक घर पोस्टमनची मोठ्या आतुरतेने वाट पहात असायचे.

कासीमला आम्ही निरोप देऊन आठवडा उलटला आणि मासेलबेककडून आम्हाला पत्र आले. पहिल्या पत्रात त्याने लिहिले होते की, त्याला आणि त्याच्याबरोबर अभ्यास करणाऱ्या मुलांना सैन्यात भरती होण्याचा सांगावा आला आहे, पण तूर्तास त्याच शहरात त्यांचे ठाणे होते. एकमेकांना भेटायला आणि निरोप घ्यायला मिळाले नाही म्हणून निराश होऊ नका असे त्याने म्हटले होते. गोष्टी जशा घडल्या तशा घडतील असे कुणाला वाटले होते, पण त्यांचा खेद करीत बसण्यात अर्थ नाही, घरी परतताना विजयी होऊन परतणे ही महत्त्वाची गोष्ट होती. त्याचे दुसरे पत्र नोवोसिबिर्स्कहून आले. अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण विद्यालयात तो शिकतोय असे त्याने लिहिले होते आणि सोबत आपला स्वतःचा फोटो जोडला होता. तो अजून भिंतीवर काचेच्या फ्रेममध्ये लटकतो आहे, पण काळाने तो अंधुक पडलाय. तो फोटो खूप देखणा आहे, त्याचा गणवेश त्याला अगदी शोभून दिसतोय. त्याचे दाट केस त्याने सरळ मागे वळवले आहेत आणि त्याची नजर किंचित खिन्न आहे. जेव्हा त्याचे मला स्वप्न पडते

तेव्हा मला तो असा दिसतो. अलिमानने मासेलबेकला फक्त एकदाच, तिच्या आणि कासीमच्या लग्नाच्या वेळेस तो आला होता तेव्हा पाहिले होते.

त्याच्या फोटोकडे बघून ती म्हणाली होती: "अम्मी, आपला मासेलबेक किती देखणा आहे नाही! त्यावेळी मी त्याला नुसतं पडद्यामागून पाहिलं होतं. तेव्हा नवी नवरी होते ना मी, मग नजर रोखून कशी सरळ पाहणार? मी बरीच लाजरी होते. तो परत आला आणि त्याच्यासारखीच शिकलेली आणि सुंदर मुलगी त्याला बायको म्हणून मिळाली तर किती छान होईल नाही? अम्मी, खरंच किती छान होईल नाही?"

मी मान डोलावली आणि त्या सोनेरी दिवसाची स्वप्ने पहाण्यात दंग झाले.

हिवाळ्याच्या मध्यापर्यंत माझी मनःस्थिती बरीचशी ठीक होती. माझ्या मुलांकडून पत्रे येत होती आणि तेवढ्यावर मी समाधान मानून होते. पण एक दिवस कासीमचे पत्र आले की, त्याची तुकडी आघाडीवर जात होती. आणि तेव्हा मात्र मी खरी घाबरले; माझ्या काळजाचा ठोका सारखा चुकू लागला. त्यात आणखी भरीला भर म्हणून की काय, सुवानकुलला रिक्रूट कचेरीचे सारखे बोलावणे येऊ लागले. एके दिवशी काय तर तपासणीला बोलवीत, तर दुसऱ्या वेळी नोंदणीसाठी, तर पुढच्या वेळी नोंदणीतल्या बदलासाठी. रिक्रूट कचेरीच्या हेलपाट्यांनी आणि पथक-प्रमुखाच्या कामाने तो अगदी पुरता थकून गेला होता. सुवानकुलला लष्करात भरतीचं बोलावणे येईल असा विचारही कधी माझ्या मनात

आला नव्हता. काही झाले तरी सामुदायिक शेताचा कारभार पथक-प्रमुखाशिवाय नीट चालणे शक्य नव्हते. पण त्यालाही जावे लागले. वर्फाचा थर बसलेला शेवटचा गहू मी झोडपीत होते तेव्हा झोडपणीच्या खळ्यावर मला ती बातमी समजली. जेव्हा मी ती बातमी ऐकली तेव्हा पेंढ्यांमध्ये मी चिमटा खुपसला, त्याच्या थंडगार दांड्यावर डोके टेकले आणि संपूर्ण भान हरपलेल्या अवस्थेत तेथे उभी राहिले. आम्ही काय करणार होतो? आम्ही कसे जगणार होतो? माझे दोन मुलगे आधीच गेले होते, आता नवराही चालला होता आणि सारे आघाडीवर लढायला चालले होते.

एवढ्यात सुवानकुल स्वतःच तेथे आला. शांतपणे तो घोड्यावरून खाली उतरला आणि माझ्या जवळ येऊन म्हणाला :

"चल, घरी जाऊ या. मला माझं सामान आवरायचं आहे."

मी त्याच्या घोड्यावर बसले आणि तो शेजारून चालत राहिला. तसे चालताना बोलायला सोपे जाईल असे तो म्हणाला. पण बोलायला आम्हाला नीट शब्दच सापडेनात आणि बहुतेक सारा रस्ता आम्ही गप्पच राहिलो. आमच्यापाशी बोलण्यासारखे काहीच नव्हते असे नाही. पण आमच्या अंतःकरणांवर कमालीची दडपणे आली होती, प्रत्येक शब्द काळीज चिरडून टाकीत होता, अपार वेदना देत होता. तर असे आम्ही चाललो होतो, मी घोड्यावर आणि तो माझ्या शेजारून चालत. काळ्याकुट्ट ढगांनी आकाश भरले होते. पिवळ्या खोऱ्यातून उत्तरेचे वारे भणाणत होते,

[illegible]च्या वाऱ्याला जोर येत होता आणि या वाऱ्यांची [illegible]णारी शीळ म्हणजे आगामी बर्फाच्या वादळाची नांदी [illegible]. मी भोवताली पाहिले. शेत भयाण आणि उघडे बोडके [illegible] होते. तेथे माणसे नव्हती, आवाज नव्हते, काही [illegible] नव्हती. सारे कसे थंड आणि उदास होते.

मुबानकुल चालताना एकामागून एक विडया ओढीत [illegible]. नंतर त्याने माझा हात आपल्या हातात धरला.

"थंडी वाजतेय?" त्याने विचारले.

मी उत्तर दिले नाही. त्याला काहीतरी बोलायचे असावे, [illegible] त्याने विचार बदलला. कदाचित त्याला आपले विचार [illegible] सांगायचे असावेत. "हे बघ, मी मुलांपाठोपाठ [illegible]य. गोष्टी कशा घडतील कुणाला ठाऊक, नशीब [illegible] जिवंत घरी आणील की नाही हे माहीत नाही... [illegible] हा आपला अखेरचा निरोप आहे. असेच असेल [illegible]... आपण आनंदात आणि मैत्रीच्या नात्यानं खूप वर्षं [illegible] राहिलो. काही कठोर बोललो असलो तर एकमेकांना [illegible] करू या. नशीबात काय वाढून ठेवलंय हे अखेरीस [illegible] माहीत?" त्याला हे शब्द बोलायचे होते की नाही [illegible] माहीत नाही. कदाचित त्याला दुसरे काही सांगायचे [illegible]. पण त्यावेळी मात्र तो काहीही न बोलता नुसता [illegible]कडे पहात राहिला होता, आपले ओठ चावीत होता. [illegible] काळयाभोर मिशांमध्ये पांढरे केस उमटलेत याची [illegible] एकाएकी जाणीव झाली. कसे कुणास ठाऊक, पण [illegible] ही गोष्ट कधी माझ्या लक्षात आली नव्हती.

आम्ही तरुण असताना याच शेतात सुवानकुलची आणि माझी कशी भेट झाली होती ते मला आठवले. निढळाचा घाम गाळीत बावीस वर्षे आम्ही कसे एकत्र काम केले, आमच्या मुलांना आम्ही कसे लहानाचे मोठे केले, आम्ही गहू कसा पिकवला, ह्या साऱ्या साऱ्या गोष्टी माझ्या नजरेसमोरून भराभरा जात होत्या. आमचे सारे एकत्रित आयुष्य डोळ्यांसमोरून सरकत जात होते. आमचा अशा रीतीने वियोग होईल, कदाचित कायमचा वियोग होईल असा कधी विचारही मनाला शिवला नव्हता, असे कधी स्वप्नातही आले नव्हते. उन्हाळ्यातल्या एका रात्री, कापणीच्या पहिल्या दिवशी याच रस्त्यावरून आम्ही घोड्यावरून कसे आलो होतो ते मला आठवले. आता खेड्याच्या टोकाचा तो नवा रस्ता ओसाड, एकाकी पडला होता. अलिमान आणि कासीमच्या आवारात दगडविटांचा ढीग पडलेला मी पाहिला आणि घोड्याच्या आयाळीवर डोके टेकून मी रडले. मी खूप वेळपर्यंत रडत होते. सुवानकुल अत्यंत शांतपणे दम धरून थांबला होता. नंतर तो म्हणाला :

"तोल्गोनाई, आत्ता काय रडायचं ते एकदा भरपूर रडून घे. इथं आसपास कुणीही नाही. पण यानंतर मात्र कुणाच्याही नजरेला तुझ्या डोळ्यातलं पाणी दिसून चालणार नाही. अलिमान आणि जयनाक यांची काळजी घेणाऱ्या घराचीच केवळ यापुढं तू प्रमुख नाहीस, तर पथक-प्रमुख म्हणून माझ्या कामाची जबाबदारी तुला आपल्या अंगावर घ्यायची आहे. तुझ्याशिवाय या कामाला दुसरं कुणी नाही."

[illegible] पूर्वीपेक्षा अधिक जोराने रडू लागले.

"[illegible] तुझ्या कामाची काय गरज? अशा वेळी तुला [illegible] बोलवतात तरी कशा? मला काही नको. मला [illegible] काही ऐकायची इच्छा नाही!"

[illegible] संध्याकाळी त्यांनी मला शेतावरच्या कचेरीत [illegible] धाडले. लढाईत घायाळ झालेले उसेनबे नावाचे [illegible] सैनिक आमचे नवे अध्यक्ष तेथे होते, तसेच [illegible] आणि गावातली अनेक म्हातारी माणसे तेथे होती. [illegible] यानी अधिक शब्द वाया न घालवता सरळ मुद्द्याला [illegible].

"[illegible]नाई मावशी, तुम्ही काहीही म्हणा, पण [illegible] पुरुषामारखी कंबर कसून तुम्हाला पथक-प्रमुखाच्या [illegible] यापुढं स्वार झालं पाहिजे. तुमच्याएवढी दुसऱ्या [illegible] आपल्या जमिनीची, आपल्या पाण्याची, आपल्या [illegible] लोकांची माहिती नाही. आम्ही तुमच्यावर विश्वास [illegible] आणि विशेष म्हणजे आताच्या पथक-प्रमुखानंही या [illegible] आपलं अनुमोदन दिलं आहे. त्याना आपण आता [illegible] जायला निरोप देत आहोत आणि असे करताना [illegible] अत्यंत वेदना होत आहेत. पण आम्ही काहीही [illegible] नाही. परिस्थिती ही अशी आहे. तोल्गोनाई [illegible]. उद्यापासून तुम्ही आपल्या नव्या कामाची जबाबदारी [illegible]"

[illegible] मला काम पत्करण्याचा सल्ला दिला. अखेरीस [illegible] माझं मन वळवले आणि पथक-प्रमुख म्हणून काम [illegible] मी तयार झाले. मी कशी नाही म्हणणार? काळ

कसा आला आहे याची मला पुरी जाणीव होती. मी जे काही केले ते योग्य होते, कारण माझ्या सुवानकुलची ती अखेरची इच्छा होती. त्या रात्री तो अजिबात झोपला नाही, उलट मला सारख्या सूचना देत होता. वसंताच्या तयारीला लागा, ओझी ओढणाऱ्या जनावरांना विश्रांती द्या, नांगरांची, दंताळ्यांची आणि गाड्यांची दुरुस्ती करा. जास्त माणसांच्या कुटुंबांकडे आणि म्हाताऱ्या लोकांकडे अधिक लक्ष द्या. हे करा, ते करा... अरे माझ्या बेचैन माणसा, माझ्या लाडक्या नवऱ्या, माझ्या सर्वांत लाडक्या मित्रा...

आणि सारी रात्र बर्फाच्या वादळाने थैमान घातले. चिमणीमध्ये वारा घोंघावत होता.

मोठ्या रस्त्यापर्यंत आम्ही सुवानकुलला निरोप द्यायला गेलो. जयनाकच्या गाडीत आणखी अनेक मध्यम वयाच्या लोकांच्या बरोबर तो चढला आणि भिरभिरणाऱ्या बर्फाआड ते दिसेनासे झाले. थंडी जबरदस्त होती, झोंबरा वारा माझा चेहरा भाजून काढीत होता. मी सतत मागे पहात, हुंदके देत, रडत हळू हळू चालत होते.

त्या दिवसापासून, आमचे अध्यक्ष उसेनबे यानी सांगितल्याप्रमाणे, मी एखाद्या पुरुषासारखी कंबर कसली, घोड्यावर मांड टाकली आणि पथक-प्रमुख म्हणून काम अंगावर घेतले. अजूनही हे काम सोपे नाही, प्रत्येकाला हे काम करायला जमत नाही, पण त्यावेळी तर ही जबाबदारी म्हणजे निव्वळ यातना होत्या. धडधाकट पुरुष शेतावर उरले नव्हते. सारे अपंग आणि आजारी पुरुष व बायका, मुली, लहान मुले आणि म्हातारी माणसे कामाला उरलेली. जे काही आम्ही

[illegible] [illegible]नो ते सारे आघाडीसाठी जात होते. चाके [illegible] गाड्यांवर आम्हाला काम भागवावे लागत होते, [illegible] जोडाजोडी केलेला घोड्याचा सरंजाम होता, [illegible] [illegible]नी घेऊन काम करावे लागत होते आणि लोहाराच्या [illegible] [illegible]ळमाच नव्हता. भट्टी चालू ठेवण्यासाठी आम्ही [illegible] [illegible]च्यात गोळा केलेल्या काटेरी फांद्यांपासून कोळसा [illegible] [illegible]यला सुरुवात केली. आयुष्य पूर्वीसारखे राहिले [illegible] [illegible]ना भूक आमची दारे ठोठावीत होती. तरीही [illegible] शेताचा कारभार जास्तीत जास्त सुरळित चालावा [illegible] [illegible] प्रयत्नांची शर्थ केली. त्या गाड्याची चाके [illegible] [illegible]लावी म्हणून आम्ही सर्वांनी खांदा दिला. मी [illegible] [illegible] बोलून काम करून घ्यायची, काहींवर रागवावे [illegible] काहीवेळा तर प्रकरण हातघाईवर यायचे. साऱ्या [illegible] [illegible] तेथे होते. अनेक अनुभवांमधून मला जावे [illegible] [illegible] तरीही माझ्या लोकांसमोर माझी आदराने मान [illegible] [illegible]. कारण त्या कसोटीच्या क्षणी विस्कटून न [illegible] [illegible] सारे एकत्रित उभे राहिले. ती खरी माणसे होती. [illegible] [illegible]च्या बायका, आता त्या म्हाताऱ्या आहेत आणि [illegible] [illegible]ली मुले, आताच्या कुटुंबांमधले आई-बाप बनली [illegible] [illegible] सारी माणसे कदाचित तो काळ विसरली असतील. [illegible] [illegible] वेळी मी त्यांना पाहते तेव्हा मला ते दिवस [illegible]. त्यावेळी ही माणसे कशी होती ते आठवते. माझ्या [illegible] त्यांच्या त्यावेळच्या मूर्ती उभ्या राहतात: [illegible] [illegible]ड्यातल्या आणि भुकेल्या. सामुदायिक शेतावर [illegible] [illegible] काम केले, विजयासाठी त्यांचा जीव कसा

आसुसत होता, ते कसे ढसढसा रडायचे आणि तरीही कसे पुन्हा धैर्याने वागायचे ते सारे आठवते! आपल्या कृती अजरामर झाल्या आहेत याची त्यांना यत्किंचितही कल्पना येत नाही. आणि मला कितीही सहन करावे लागले असले, माझ्या ओझ्यांखाली मी कितीही धडपडले असले, तरी मी पथक-प्रमुख होते याचा मला कधीही, अगदी कधीही, खेद वाटणार नाही. अगदी पहाट फुटायच्या सुमाराला मी अंथरुणातून उठायची आणि शेताचा रस्ता धरायची. सबंध दिवसभर मी घोड्यावरून चकरा मारीत असायची, स्तेप आणि डोंगराळ भाग यांच्या दरम्यान खेपा घालायची. संध्याकाळपासून रात्री उशिरापर्यंत मी शेताच्या कचेरीत काम करीत बसायची. त्यामुळे दिवस कसे भराभरा उलटत होते याचे भानच रहात नव्हते. कदाचित त्यामुळेच मी बचावले. आणि अनेकवेळा लोक माझ्या दु:खापायी किंवा तिरस्कारापायी राग धरायचे, माझी कोंडी करायचे व काम सोडून जायचे, तरी मी कधी तो माझा अपमान मानला नाही. मी अशावेळी जयनाक आणि अलिमानवर कामाचा आणखी बोजा टाकायची, त्यांना रात्रंदिवस उसंत घेऊ द्यायची नाही. त्यांना असे दयामाया न दाखवता कामाला जुंपल्या-बद्दल मला मुळीच खेद वाटत नाही. असे केले नसते, तर आम्ही भीतीच्या आणि निराशेच्या तडाख्यात सापडलो असतो, कारण एकाच कुटुंबातून तीन पुरुष लढाईवर गेले होते–या विचारापासून आम्हाला कुणी परावृत्त करू शकत होते का? दोन महिन्यात कासीमकडून बोटभर चिठ्ठी आलेली नव्हती. कासीमबद्दल मनात येणारे वेडेवाकडे भयानक विचार

…ध्याने बोलून दाखवायची भीती वाटत होती म्हणून मी …णि अलिमान एकमेकींच्या नजरा टाळीत होतो. जर काही …म्ही बोललोच तर ते कामाचे असायचे किंवा घरच्या …बाबत असायचे. आम्ही लहान मुलांसारखे वागत होतो. … विषय सतत टाळायला पहात होतो.

हिवाळ्यातली एक सकाळ. ओझी ओढणाऱ्या आमच्या …ड्यांना नवे नाल बसवायला मदत करायला मी …हारभट्टीकडे निघाले होते. उसेनबे माझ्या नजरेला पडले. …च्या हातात कागदाचा एक लहान कपटा घेऊन ते दौडत …झ्याकडे येत होते. ते म्हणाले की, मला ती तातडीची …र आली आहे. माझा श्वास रोखला गेला. मला फक्त …णीवर बसणाऱ्या घणांचा आवाज ऐकू येत होता, पण ते …म जणू माझ्या छातीवर बसताहेत असे वाटत होते. माझा …हरा भयानक झाला असावा.

"तोल्गोनाई मावशी!" अध्यक्ष ओरडून म्हणाले. "सारं …ही ठीक आहे, मासेलबेककडून तार आली आहे. …ोविसिर्कहून आलीय. इकडे या आणि घ्या. घाबरू …का!" आणि घोड्यावरून ओणवे होऊन त्यानी माझ्या …तात तो कागद दिला. "तुम्ही स्टेशनावर जायला निघणं …र," ते पुढे म्हणाले. "तुमचा मुलगा या मार्गावरून …णार आहे, त्याला तुम्हाला बघायची इच्छा आहे, तुम्ही …ला भेटावं अशी त्याची विनंती आहे. मी तुमच्यासाठी गाडी …डायला सांगितलीय आणि घोड्यांसाठी ते थोडं गवत नि …ट घेताहेत. आता अशा थांबून राहू नका, चला निघायच्या …यारीला लागा लौकर!"

आनंदाची एक लाट मला लपेटून गेली. मी लोहाराच्या भट्टीशी उगीचच घोटाळत राहिले. काय करावे ते समजत नव्हते. अखेरीस लोहारांनी मला तिथून पळवून लावले.

"आम्ही तुमच्याशिवाय सारं काही जमवून घेऊ. तुम्ही लौकर स्टेशनावर जा. उशीर करून चालणार नाही."

मी घरी पळत निघाले. डोक्यात विचारांची एकच गर्दी झाली होती. मासेलबेक मला भेटू इच्छित होता, मी स्टेशनावर यावे अशी मासेलबेकची विनंती होती, एवढा एकच विचार तेवढा स्पष्ट होता. थंडीचे दिवस होते, तरी रस्त्यावरून जोरात धावत निघाल्यामुळे सारे शरीर तापले होते, मी घामाने न्हाऊन निघाले होते. एखाद्या वेडीप्रमाणे धावत असताना मी स्वत:शीच बडबडत होते.

"याचा अर्थ काय असावा: भेट अशी मला विनंती करतोय? विनंती कशाला? माझ्या लाडक्या मुला, तुला नुसतं पहायला मी हजारो मैल धावत येईन!"

छे: छे:, अशी कशी मी वेडी? माझा मुलगा कुठल्या दिशेला चाललाय याचीसुद्धा मी कशी चौकशी केली नाही?

मी धावत घरी आले, काही खायचे पदार्थ एकत्र बांधले, थोडे मटण शिजवले कारण मासेलबेक नक्कीच एकटा नव्हता. त्याचे मित्र त्याच्याबरोबर होते. आता त्यांना तो थोडे घरचे अन्न खायला देऊ शकला असता. एका बोगीरात मी ते सारे बांधले आणि त्याच दिवशी मी व अलिमान स्टेशनावर जायला निघालो. प्रथम मला जयनाकला बरोबर घ्यायची इच्छा होती, पण त्याने स्वत:च नाकारले.

[illegible] म्हणाला, "नाही अम्मी, त्याऐवजी अलिमानला [illegible]. मी घरात थांबून घराची काळजी घेतो. ते जास्त [illegible]

[illegible] सर्वांत छोटया मुलाने योग्य तेच केले याची मला [illegible] झाली. तो वयाने पोरसवदा असला तरी मूर्ख [illegible] अलिमान कोणत्या यातनांमधून जाते आहे, ती [illegible] काळजीत आहे आणि तिला किती त्रास होतोय [illegible] कल्पना होती. अलिमान काम करीत होती [illegible] दिशाऱ्यांकडे तो धावला आणि त्याने तिला [illegible]. फारा दिवसांनंतर माझी सून मला पुन्हा [illegible] दिसत होती. तिचा चेहरा उजळला होता, [illegible] होते, माझ्यापेक्षा तिचाच उत्साह ओसंडून [illegible] आणि ती मला घाई करीत होती.

[illegible] चला लौकर! हा तुमचा कोट, ही तुमची [illegible] कपडे घाला आणि आपण ताबडतोब निघू या!"

[illegible] रस्ताभर ती बेचैन होती.

[illegible] आणखी जोरानं पळव!" ती गाडीवानाला विनवीत [illegible] काही वेळा ती सरळ त्याच्या हातून लगाम [illegible] आणि आरोळी ठोकून घोड्यांना पिटाळायची.

[illegible] गच्च भरलेल्या रस्त्यावरून गाडी धडधडत जात [illegible] घोडे चपळपणे दौडत होते, वंगण घातलेली चाके [illegible] धावत होती. सारा रस्ताभर बर्फ पडत होता. [illegible] तो वर्षाव आनंद वाढवीत होता. वातावरण [illegible]. अलिमान सारी बर्फाने माखली होती. तिला [illegible] माजरे दिसत होते याची तिला स्वत:ला कल्पना

नव्हती. हिमाचे मोठे मोठे तुषार तिच्या डोक्याला, शालीला, तिच्या केसांच्या बटांना, कोटाच्या कॉलरला चिपकले होते. त्यामुळे तिचा गव्हाळ-सोनेरी रंग अधिकच खुलला होता, गुलाबी गाल चकाकत होते, काळे डोळे व शुभ्र दात चमकत होते. तरुण वयात सारे काही साजरे दिसते, बर्फसुद्धा! सबंध वाटेत अलिमान सारखी बडबडत होती. पहिली गोष्ट तिने मला सांगितली म्हणजे मासेलबेक आगगाडीतून उतरल्यानंतर मी काहीही बोलायचे नाही. तो तिला ओळखतो की नाही हे तिला पहायचे होते. मग ती म्हणाली की, ती मागून लपतछपत येईल आणि त्याच्या डोळ्यांवर एकदम हात गच्च दाबून धरील: तो काय म्हणेल, तो दचकेल का, कदाचित तो असेही विचारील की, असे मूर्खासारखे कोण वागतेय? आणि स्वतःच्याच या कल्पनांवर ती खळखळून हसली. अलिमान, माझ्या लाडक्या अलिमान, माझ्या गोड सूनबाई! ती अशी का वागतेय हे मला कधीच समजले नाही असे तिला वाटले का? पण ती आपल्या भावनांना वाट मोकळी करून देत होती. एकाएकी ती गप्प झाली, हसायची थांबली आणि पुटपुटली:

"मासेलबेक किती कासीमसारखा दिसतो. ते जुळ्या भावांसारखे वाटतात नाही?"

मी ऐकून न ऐकल्याचा बहाणा केला. ती पुढे काही म्हणाली नाही. नंतर तिने पुन्हा त्या गाडी हाकणाऱ्या पोराच्या हातून लगाम हिसकावून घेतले आणि घोड्यांवर ती ओरडली.

संध्याकाळच्या सुमाराला आम्ही स्टेशनावर पोचलो. गाडी थांबताक्षणी मी आणि अलिमान रूळांकडे धावलो. जणू

काही मासेलबेक आता कोणत्याही मिनिटाला येणार होता! सारे उजाड होते. आम्ही सभोवार खिन्नपणे पाहिले. अनाथ मुलांप्रमाणे आम्ही उभे होतो. कुठे जायचे आणि पुढे काय करायचे ते आम्हाला माहीत नव्हते. रूळांवरून आणि मधल्या स्लीपर्सवरून वारा घोंघावत होता. एक इंजिन मागे-पुढे जात होते आणि थिजल्या दवाने माखलेले, बर्फाने मढलेले डबे एकमेकांवर आपटून आवाज करीत होते. तारांना कापून जाताना वारा शीळ घालीत होता.

यापूर्वी आम्ही असे स्टेशनावर कुणाला कधी भेटायला आलो नव्हतो. आगगाडी स्टेशनात केव्हा येणार आहे हे कुणाला विचारण्याचेही आमच्या डोक्यात आले नाही. दरम्यान दूरवर आम्हाला शिट्टी ऐकू आली आणि आगगाडी आली.

"अम्मी, गाडी येतेय!" अलिमान म्हणाली.

माझे पाय थरथर कापू लागले. मला भीती वाटू लागली. आगगाडी वेगाने जवळ येत होती. बर्फाची धूळ उडवीत इंजिन आमच्याजवळून पुढे गेले. ते थांबले. गर्दीने गच्च भरलेल्या डब्यांजवळून आम्ही धावू लागलो. डब्यांमध्ये बायका, मुले आणि सैनिक होते. ते कोण होते आणि कुठे चालले होते कुणाला माहीत? आम्ही प्रत्येक डब्याशी थांबून विचारीत होतो:

"मासेलबेक सुवानकुलोव इथं आहे का? मासेलबेक सुवानकुलोव इथं असला तर सांगता का?"

आपल्याला ठाऊक नाही असे काही म्हणाले, काही गप्प राहिले, तर काही नुसते हसले. आम्ही अशी पुढे मागे धावपळ करीत असतानाच आगगाडी स्टेशनातून हलली. ती केवळ

तीन मिनिटे तेथे थांबली होती. हातून जणू पक्षी सुटून जावा अशा अवस्थेत आम्ही तेथे उभ्या राहिलो. काळ्या लोकरी कोटातला आणि गरम बुटातला रेल्वेतला एक वयस्क रशियन माणूस आमच्याजवळ आला. आगगाडी स्टेशनात आली तेव्हा तो फलाटावर आलेला मी पाहिले होते. आम्ही कुणाची वाट पाहतोय याची त्याने चौकशी केली. आम्ही त्याला सारे सांगितले आणि मासेलबेकची तार दाखवली. त्याने डोळ्यांवर चष्मा चढवला. वाचताना त्याचे ओठ हळू हळू हलत होते. मग तो म्हणाला:

"तुमचा मुलगा फौजी आगगाडीनं जातोय. पण तो कोणत्या गाडीत आहे आणि ती इथं केव्हा येणार हे कुणाला ठाऊक? जर तिला उशीर झाला नाही तर ती आज रात्री किंवा उद्या सकाळी आली पाहिजे. पण कदाचित ती इथून आधीच निघूनही गेली असेल. दरदिवशी इथून खूप फौजी आगगाड्या जाताहेत आणि काही तर थांबतही नाहीत."

आम्ही कमालीच्या उदास झालो.

"हे सारं लढाईमुळं होतंय," तो माणूस म्हणाला आणि त्याने सुस्कारा टाकला. "लढाईनं पार सारी उलथापालथ करून टाकलीय. आता इथं थंडीवाऱ्यात उभं राहून काय उपयोग आहे? स्टेशनातल्या वेटिंग रूममध्ये जा. तुम्ही तिथं आत बसा आणि जेव्हा आगगाडी येईल तेव्हा फलाटावर या. एवढी एकच गोष्ट करता येण्याजोगी आहे."

वेटिंग रूममध्ये सुमारे दहा एक माणसे होती. बाकड्यांवर ती पसरली होती. या रस्त्यांवर आणि स्टेशनांवर राहण्याची पाळी आयुष्याने त्यांच्यावर बहुधा आणली असावी. अशा

जगण्याच्या आयुष्याची कदाचित त्यांना आता सवय झाली असावी आणि या आडोशाला त्यांना घराची ऊब भासत असावी. काही लोक गाढ झोपले होते, काही बोलत होते किंवा सिगरेटी ओढीत होते. एका कोपऱ्यातली दोन माणसे पत्र्याच्या कपांमधून उकळते पाणी पीत होती, त्यांची तोंडे लाल होती व ते पाण्यावर फुंकरी घालीत होते, तर दुसरा एक गिटारच्या तारा छेडीत स्वत:शीच हळू आवाजात गात होता. फुटक्या, धुरकटलेल्या काचेचा तेलाचा दिवा भगभगत होता आणि धूर ओकीत होता. त्या अर्धवट अंधारात आम्ही चारी बाजूंना पाहिले आणि एका बाकाच्या कडेला बसलो. थोड्या वेळानंतर आम्हाला आगगाडीचा आवाज ऐकू आला आणि आम्ही दाराकडे धावलो. त्या अंधारात वारा आमच्या डब्यांना झोंबत होता आणि कोटांच्या किनारींवर त्याचे च्यासप फटकारे बसत होते. ती सबंध मालगाडी होती. आम्हाला एकही सैनिक दिसत नव्हता, तरीही आम्ही त्या डब्यांच्या बाजूने धावत ओरडत होतो:

"मासेलबेक सुवानकुलोव आहे का?"

"मासेलबेक सुवानकुलोव!"

कुणीही उत्तर दिले नाही. तिथे कुणी नव्हतेच मुळी! आम्ही पुन्हा त्या खोलीत आलो तेव्हा सारे झोपले होते.

"अम्मी, तुम्ही थोडा वेळ पडून विश्रांती घ्या. मी आगगाडीवर लक्ष ठेवते," अलिमान म्हणाली.

मी माझ्या सुनेच्या खांद्यावर मान टेकली आणि एक डुलकी घेण्याचा विचार केला. पण मला झोप आली नाही. मी कशी झोपणार? आणि येणाऱ्या आगगाड्यांचा कानोसा

केवळ माझे कानच नव्हे, तर माझे काळीज आणि मनही घेत असताना झोपेचा मी विचार तरी कशी करणार? येणाऱ्या आगगाडीच्या धडधडाटामुळे प्रथम पायाखालची फरशी मंद थरथरली तरी मी दचकून जागी व्हायची. कोणत्या का दिशेने गाडी येईना, आम्ही पटकन उठून उभ्या राह्यच्या आणि पडशी खांद्यावर मारून धावत बाहेर जायच्या.

सैनिकी आगगाड्या जात होत्या, पण त्या एकीतही मासेलबेक नव्हता. मध्यरात्री जमीन पुन्हा थरथरू लागली तेव्हा आम्ही उठून बाहेर पळत निघालो. खिंडीच्या दोन्ही बाजूंनी आगगाडीच्या शिट्यांचे कर्णकर्कश्य आवाज घुमले. दोन विरुद्ध बाजूंनी दोन आगगाड्या एकाच वेळी येत होत्या. आम्ही गोंधळलो आणि पुढेमागे धावू लागलो. अखेरीस आम्ही दोन मार्गांच्या मध्ये अडकलो. दोन्ही आगगाड्या जणू पुऱ्या वेगाने एकमेकींच्या अंगांवर धावून येत होत्या. त्यांच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाने वातावरण भरून गेले होते. चाके खडखडत जात होती, वारा घोंघावत होता आणि आमच्यावर बर्फाळ वावटळी उठवीत चाकांच्या खाली आम्हाला ओढू पहात होता.

"अम्मी!" अलिमानने किंकाळी फोडली आणि मला घट्ट धरून एका खांबाला दाबले. आपल्या हातांचा घट्ट विळखा तिने माझ्याभोवती घातला होता.

डोळ्यांसमोरून धावत जाणाऱ्या आगगाडीच्या डब्यांच्या खिडक्यांमध्ये मी नजर बारिक करून डोकावून पहात होते. माझा मासेलबेक त्या डब्यात असला, माझा मुलगा तिथे असला आणि मी त्याला पाहिले नाही तर? धावणाऱ्या

[illegible] ओझ्याखाली रूळ कण्हत होते आणि माझ्या मुला-[illegible] आगीने भरलेल्या माझ्या काळजात त्यांचे पडसाद [illegible] होते. बर्फाच्या धुराळ्यात आगगाड्या निघून गेल्या, [illegible] आम्ही तशाच खांबाला घट्ट मिठी मारून खूप वेळपर्यंत [illegible] होतो.

त्या रात्री आम्ही जराही खाली टेकलो नाही. फौजी [illegible] आल्या म्हणजे गाडीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पळत होतो. पहाट व्हायला थोडा अवकाश असताना [illegible] एकाएकी थांबले आणि एक चमत्कारिक दिसणारी [illegible] पश्चिमेकडून स्टेशनात आली. सर्व डबे जळून [illegible] होते, छपरे फाटली होती आणि दरवाजे निखळून [illegible] होते. सबंध आगगाडीत एकही जिवंत प्राणी नव्हता. ते निकामे डबे स्मशानासारखे भासत होते, त्यांना धुराचा, जळक्या लोखंडाचा, भाजून निघालेल्या लाकडाचा व रंगाचा [illegible] येत होता.

दुसऱ्या दिवशी आमची ओळख झालेला तो काळ्या [illegible] कोटातला रेल्वेतला माणूस हातात कंदिल घेऊन फलाटावर आला.

"ही कसली आगगाडी आहे?" अलिमानने हळूच विचारले.

"[illegible] बाँब टाकले." तोही हळू आवाजात उत्तरला.

"कुठं चाललीय?"

"दुरुस्तीला."

त्यांचे संभाषण ऐकताना माझ्या मनात त्या आगगाडीतल्या [illegible] संबंधीचे विचार येत होते. धुराच्या लोटांमध्ये, किंकाळ्या [illegible] असताना आणि आगीच्या ज्वालांनी लपेटले जात असताना

त्यांची आयुष्याशी ताटातूट झाली असणार, कित्येकांचे हातपाय तुटून पडले असणार, कित्येकजण जन्माचे बहिरे आणि आंधळे झाले असणार. पण हे बाँब म्हणजे लढाईचा एक अस्पष्ट प्रतिध्वनी होता. मग प्रत्यक्ष लढाई कशी होती?

बाँबने उध्वस्त झालेली ती आगगाडी खूप वेळपर्यंत स्टेशनात थांबली आणि मग आवाज न करता चालू लागली. ती पुढे चालू लागल्यावर चाकांचा एक करूण आवाज येत होता. मी भरल्या अंतःकरणाने तिच्याकडे पाहिले. बाँबने उध्वस्त झालेली ही आगगाडी जेथून आली होती तेथे मासेलबेक जाणार होता! आणि कासीम कसा होता? सुवानकुल कसा होता? ऱ्याझानच्या आसपास कुठेतरी त्याचे ठाणे आहे असे त्याने लिहिले होते. आघाडीपासून ते ठाणे फारसे दूर नसावे.

सकाळ उजाडली. परत निघायला पाहिजे होते. घोड्यांना खायला गवत शिल्लक राहिले नव्हते. पण मासेलबेक अजून इथून गेला नसला तर? तर काय? आम्ही एवढा वेळ थांबलो होतो आणि आम्ही निघून गेल्यावर तो आला तर? किती भयंकर! आम्ही खूप विचार केला. तेथून निघायची आमची हिंमत होत नव्हती.

आदल्या दिवसासारखीच हवा थंड आणि वादळी होती. त्या खिंडीतल्या स्टेशनाला वाऱ्यांच्या मुक्कामाचे ठिकाण म्हणून ओळखीत यात आश्चर्य वाटण्यासारखे नव्हते. एकाएकी ढग बाजूला झाले आणि त्यांच्यामधून सूर्य डोकावला. मनात विचार आला: "हा सूर्य जसा ढगांआडून अचानक आला तसा माझा मुलगा अचानक आला तर किती बहार होईल! केवळ एक क्षण तो माझ्या नजरेला पडला तर!"

आणि आम्हाला दूरवरून येणाऱ्या आगगाडीचा आवाज ऐकू आला. ती पूर्वेकडून येत होती. शिट्टीचे दोन प्रचंड आवाज खिंडीत घुमले.

आमच्या पायाखालची जमीन हादरू लागली, रूळांचा आवाज ऐकू येऊ लागला. लाल चाकांची दोन काळी इंजिने धुराचे लोट सोडीत, वाफांचे ढग व आगीचे लोळ उठवीत धडधडत जाऊ लागली. उघड्या डब्यांवर रणगाडे आणि मोठ्या तोफा ताडपत्र्या झाकून ठेवलेल्या होत्या व काळ्या करड्या कोटांमधले सैनिक त्यांच्याशेजारी हातात रायफली घेऊन उभे होते. तापलेल्या मालगाडीच्या उघड्या डब्यांवर सैनिकांचे जथे बसले होते. एकामागून एक डबे पुढे धावत होते. डोळ्यांसमोरून हे डबे सरकत असताना आम्हाला अस्पष्ट चेहरे, मोठाले कोट दिसत होते. कानांवर गाण्यांच्या ओळी, शब्द, ॲकॉर्डियन आणि बलालैकाचे सूर अर्धवट पडत होते. आम्ही एका जागी खिळून उभ्या होतो. एवढ्यात हातात तांबडी पिवळी सिग्नलची निशाणे घेतलेला एक माणूस धावत आमच्यापाशी आला व कानांजवळ ओरडून म्हणाला :

"ही आगगाडी इथं थांबणार नाही! ही थांबणार नाही! बाजूला व्हा!" आणि त्याने आम्हाला मागे रेटायला सुरुवात केली.

आणि एवढ्यात कुणीतरी ओरडले :

"अम्मी ऽऽऽऽ! अलिमा ऽऽऽ न!"

तोच होता! तो मासेलबेक होता! अरे देवा, अरे देवा! तो इतक्या जवळून, एवढ्या जवळून चालला होता!

दाराच्या एका बिजागरीला एका हाताने तो लोंबकळला होता, सारे शरीर त्याने डब्याबाहेर काढले होते व मोकळ्या हाताने आपली टोपी हालवीत तो ओरडून आमचा निरोप घेत होता. "मासेलबेक!" अशी जोरदार आरोळी ठोकल्याचे तेवढे मला आठवते. त्या तेवढ्या क्षणात मी त्याला एवढा स्पष्ट, ठसठशीत पाहिला. वाऱ्याने त्याचे केस विस्कटले होते, त्याचा बटणे सुटलेला ओव्हरकोट पसरलेल्या पंखांप्रमाणे दिसत होता आणि त्याचा चेहरा व डोळे—त्यावर आनंद, दुःख, खेद आणि वियोग या सर्वांचे मिश्रण उमटले होते! त्याच्यावरून एकदाही नजर बाजूला न काढता मी आगगाडीबरोबर धावू लागले. शेवटचा डबा निघून गेला तरी मी स्लीपर्सवरून धावत राहिले. अखेरीस मी खाली कोसळले. मी किती शोक केला आणि रडले त्याला सुमार नाही. माझा बाळ रणांगणावर चालला होता आणि मी थंडगार, लोखंडी रूळांना मिठी घालून त्याला निरोप देत होते. चाकांचा खडखडाट हळू हळू विरत चालला होता आणि मग तो पूर्णपणे विरला.

अजूनही काही वेळा माझ्या डोक्यात फौजी आगगाड्यांचा आवाज कधीतरी घुमू लागतो आणि नंतर खूप वेळपर्यंत चाकांचा खडखडाट ऐकू येत राहतो.

अलिमान धावत माझ्याकडे आली. तिच्या चेहऱ्यावरून अश्रूंच्या धारा वहात होत्या. माझ्या शेजारी-ती गुडघ्यावर ओणवी झाली आणि आपल्या थरथरत्या बाहूंनी मला वर उठवण्याचा तिने व्यर्थ प्रयत्न केला. आपल्या हुंदक्यांवाटे काळजातल्या दुःखाला ती वाट मोकळी करून देत होती. तेवढ्यात रेल्वेत काम करणारी एक रशियन बाई आमच्याजवळ

. तिनेही "आई ! आई !" म्हणून हंबरडा फोडला व
मिठी मारली. त्या दोघींनी मिळून मला फलाटावर नेले.
च्या इमारतीकडे जाताना अलिमानने माझ्या हाती ती
टोपी दिली.

ती म्हणाली, "अम्मी, ही घ्या. मासेलबेकनं तुमच्यासाठी
दिलीय."

मी आगगाडीमागून धावताना त्याने ती टोपी माझ्याकडे
फेकावली होती.

घोडागाडीतून घरी परतताना सबंध रस्ताभर मी ती
उराशी कवटाळून बसले होते.

त्याची टोपी अजून घरात खुंटीवर टांगलेली आहे. ती
साधी, करड्या रंगाची, पुढच्या बाजूला मध्यभागी
तारा असलेली गरम सैनिकी टोपी आहे. काही वेळा
ती खुंटीवरून काढून माझ्या तोंडावर दाबून धरते आणि
माझ्या मुलाच्या वासाची आठवण पुन्हा आणू पाहते.

६

"हे धरणीमाते, आपल्या मुलाच्या एवढ्या ओझरत्या
दर्शनासाठी कुठल्या आईला एवढं दुःख सोसावं लागलंय का?"

"तोल्गोनाई, मला माहीत नाही. तू ज्या युद्धामधून
गेलीस तसलं युद्ध जगानं कधी अनुभवलं नव्हतं."

"तर मग आपल्या मुलाची एवढी वाट पाहणारी मी
शेवटची माता ठरू दे. दुसऱ्या कुणाही मातेवर लोखंडी

रूळांना मिठी मारण्याचा आणि स्लीपर्सवर डोकं आपटून घेण्याचा प्रसंग न येवो."

"तू घरी परतलीस तेव्हा तुझी व तुझ्या मुलाची गाठभेट झाली नाही असंच सर्वांना वाटलं होतं. तुझा चेहरा पांढराफटक पडला होता आणि तुझ्या रडून लाल झालेल्या डोळ्यांखाली काळी वर्तुळं उमटली होती. जणू काही एका मोठ्या आजारातून उठल्यासारखा तुझा चेहरा दिसत होता."

"त्यापेक्षा सबंध महिनाभर ताप चढला असता तर फार चांगले झाले असते."

"बिच्चारी माझी तोल्गोनाई. त्या वर्षात तुझे केस पांढरे झाले. तोपर्यंत तुझ्या वेण्या किती जाड आणि सुंदर होत्या. पण आता तू खूप गप्प आणि स्वतःत गुरफटल्यासारखी असायची. तू इथं मुकी होऊन यायचीस आणि परत जाताना तुझे दात गच्च आवळलेले असायचे. पण मी समजून घेतलं. तुझ्या डोळ्यांवरून मला समजायचं की, दरवेळी तुला आणखी आणखी अवघड जातंय."

"होय धरतीमाते, आयुष्य माणसाला असं पार बदलून टाकतं. अशी मी काही एकटीच नव्हते. असं एकही कुटुंब नाही, अशी एकही व्यक्ती नाही की जिला युद्धाच्या झळा पोचल्या नाहीत. आणि मरणाची खबर घेऊन जेव्हा काळ्या किनारीचे कागद यायचे, खेड्यातल्या दोन तीन घरात एकाच वेळी जेव्हा आक्रोश उमटायचा तेव्हा माझं रक्त उकळायला लागायचं. सूडाची आग माझ्या डोळ्यात भडकायची आणि सूडानं काळीज पेटून उठायचं. त्या काळात मी पथक-प्रमुख होते याचा मला अभिमान वाटतो. स्वतःची वेदना सोसताना

[illegible] [illegible]च्या दु:खातही वाटेकरी होत होते, माझ्या माणसांच्या [illegible] [illegible], त्यांची उपासमार, त्यांच्या हालअपेष्टा मीही [illegible] होते. म्हणून मी टिकून राहिले, दुसऱ्यांसाठी जगत [illegible] [illegible] झालं नसतं तर केव्हाच मी कोसळून पडले असते [illegible] [illegible]ढाईनं मला धुळीत पायदळी तुडवलं असतं. लढाई [illegible] एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे लढणं, झुंजणं [illegible] विजय मिळवणं हे मला त्यावेळी जाणवलं. याला [illegible] म्हणजे फक्त मरण! म्हणून माझ्या सर्वांत लाडक्या [illegible]. मी नेहमी घोडयावरून इथं यायची, तुला कधीही [illegible] [illegible]यची नाही, मूक राहून तुला अभिवादन करायची [illegible] [illegible]जीच मुकाटयानं परतायची."

७

[illegible] एक दिवस आम्हाला कासीमकडून पत्र आले. हातात [illegible] धरून मी घोडयावरून भरधाव निघाले. वाटेतल्या [illegible]ची आणि तरंगत्या बर्फाच्या खडयांची मला पर्वा वाटत [illegible]. अलिमान आणि जयनाक शेतात खत पसरीत होते. [illegible] त्यांना उद्देशून आमच्या भाषेत ओरडले :

"मुइउंचू, मुइउंचू—आनंदाची बातमी!"

माझा आनंद तसाच त्यांचाही आनंद होता. दोन महिन्यात आम्हाला कासीमकडून काहीही पत्र आले नव्हते आणि त्याचे [illegible] झाले हे कळायला काही मार्ग नव्हता. आपल्या पत्रात त्यानं लिहिले होते की, मॉस्कोकडे जाणाऱ्या मार्गाचे त्याने

दोन वेळा रक्षण केले होते आणि दोन्ही वेळा तो सुखरूप बचावला होता. जर्मनांना रोखले आहे, त्यांच्या फळ्या कापून काढल्या आहेत असे त्याने लिहिले होते. आता त्याच्या रेजिमेंटला विश्रांतीसाठी पिछाडीला पाठवीत होते.

अलिमानला खूप आनंद झाला होता. गाडीतून उडी टाकून, जयनाकला मागे टाकून ती जोराने धावत माझ्याकडे आली.

"अम्मी, तुमच्या तोंडात साखर पडो!" आपल्या थर-थरत्या हातांनी तिने ते पत्र माझ्याकडून हिसकावून घेतले. आनंदाने ती मोहरली होती आणि तिचे सारे अंग कापत होते. तिला ते पत्र धड वाचताही येत नव्हते. ती पुन्हा पुन्हा एकच वाक्य बोलत होती: "तो जिवंत आहे! तो जिवंत आहे आणि सुखरूप आहे!"

इतर बायाही धावत आल्या आणि त्यांनी तिच्याभोवती कोंडाळे केले.

"अलिमान, वाच ना पत्र! काय लिहितो तुझा नवरा? कदाचित त्यानं आमच्या पुरुषमाणसांबद्दल लिहिलं असेल बघ!"

अलिमान उत्तरली:

"एक सेकंद थांबा!" पण तिला एकही ओळ वाचता येईना.

जयनाकला अधिक धीर धरवेना.

"आण माझ्याकडं! तो काय लिहितोय ते लोकांना ऐकायचंय." त्याने पत्र तिच्याकडून घेतले आणि तो मोठ्याने वाचू लागला.

दरम्यान अलिमान मटकन खाली बसली आणि मूठ मूठ बर्फ कपाळावर ठेवू लागली. जयनाकने जेव्हा पत्र वाचून

... आपल्या तोंडावरचा बर्फ पुसायचे तसेच विसरून ... राहिली. आनंदाने फुलून ती तेथे उभी होती, बर्फाचे ... ओघळ तिच्या चेहऱ्यावरून वहात होते.

"चला, परत कामाला लागू या!" ती हळूच म्हणाली व ... हळूहळू चालू लागली.

ती चालताना विचारात गुरफटलेली दिसत होती. तिच्या ... कोणते विचार येत होते हे कुणाला माहीत? कदाचित ... आठवत असेल, उन्हाळ्यात कापलेल्या खुंटांवरून आपण ... धावत नवऱ्यासाठी घडा कसा घेऊन गेलो होतो; किंवा ...ने आपल्या कंबाईनचा इथं कसा निरोप घेतला. तिला ... असलेल्या साऱ्या आठवणी, तिच्या बहुमोल आठवणींचे ... ती पुन्हा जगते आहे असे मला जाणवले. तिचे डोळे ... होते आणि मंदावत होते. समोरच्या मुख्य रस्त्याकडे ... लावून पहात होती: कदाचित आमचा राखी घोडा ... अदृश्य होताना आणि ती स्वतः कासीममागे धावताना ... एकदा मनःचक्षूंनी पहात असावी.

जयनाक तिच्या बरोबरीने चालला होता. त्याने तिला चिडवायला सुरुवात केली.

"ए, जागी हो! जरा शुद्धीवर ये. सगळ्या गावभर ... आता तुला हसणार. आपलं पत्रसुद्धा तुला वाचता येत नाही! जरा थांब, मी आता कासीमलाच लिहितो की, तुझ्या बायकोला मुळाक्षरं शिकवायला पुन्हा एकदा शाळेत ...वावं लागलंय!"

अन्निमानने त्याच्या पाठीवर बुक्के मारायला सुरुवात केली, मग एकमेकांचा पाठलाग करीत ती गाडीकडे गेली.

विचारात गढलेल्या अवस्थेतच मी त्यांच्या मागून निघाले. मी स्वत:शीच म्हणाले, माझ्या मुलासारखे बहाद्दर लोकांचे रक्षण करणार नाहीत तर दुसरे कोण करणार! फक्त त्यांनी सुखरूप आणि विजयी होऊन घरी परतावे! बाकी सारे काही सहन करता येईल. विजय पहायला आमची नुसती कातडी आणि हाडे उरली असती तर त्याची कुणाला पर्वा? फक्त हे सारे लौकरात लौकर घडायला हवे होते. ही केवळ माझी एकटीचीच इच्छा नव्हती, सगळ्या लोकांचे हे स्वप्न होते, ध्येय होते. मी सारे सहन केले होते, काहीही पत्करायची माझी तयारी होती.

माझा अखेरचा आणि सर्वांत लहान मुलगा लढाईवर गेला तेव्हा पुरता अठरा वर्षांचाही नव्हता. मी ओठ घट्ट मिटून घेतले, काहीही बोलले नाही आणि मुकाटपणे ती वेदना सोसली.

हिवाळ्याच्या अखेरीला रिक्रूट कचेरीत कवायतीसाठी त्याला ते सारखे बोलावू लागले. केवळ त्यालाच नव्हे तर आणखी इतर मुलांनाही असे बोलावणे यायचे. ही काही खास वेगळी बाब नव्हती आणि मला त्याबद्दल फारशी काळजी वाटत नव्हती. तिथे दहा एक दिवस त्यांना रपेट घडवायचे आणि पुन्हा सगळ्यांना आपापल्या घरी परत पाठवून द्यायचे. पण एकदा मात्र फक्त एकच दिवसानंतर तो परत आला.

"एवढ्या लौकर त्यांनी तुला परत का पाठवलं?" मी आश्चर्याने विचारले. "का तुझी आता त्यातून कायमची सुटका झाली?"

"नाही अम्मी, मी पुन्हा उद्या जाणार आहे. त्यांनी मला एका दिवसासाठी घरी जायला परवानगी दिली. यावेळी

तिथं नेहमीपेक्षा थोडे जास्त दिवस रहावं लागेल. तेव्हा काळजी करू नको."

आणि कुठलाही संशय मनात न धरता मी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. जणू काही खूप दूरच्या प्रवासाला निघावे अशा तऱ्हेने त्याने त्या दिवशी तयारी चालवली होती. त्याचे ते वागणे मला जरा चमत्कारिकच वाटले. सबंध सकाळभर हातात हातोडा आणि खिळे घेऊन त्याने सबंध घरात ठाकठोक चालवली होती. मग त्याने सर्पणासाठी लाकडांचा ढिगारा फोडून ठेवला, परसात गाडीभर खत आणून ओतले आणि छपरावर पसरलेले वाळलेले गवत दंताळ्याने साफ करून एकत्र गोळा करून ठेवले. संध्याकाळी मी घरी आले तेव्हा त्याने अंगण झाडून ठेवलेले व मोडलेली गव्हाण दुरुस्त करून ठेवलेली पाहिली. सुवानकुल घरी असताना आम्ही ती वापरत असू, कारण घोडा हाताशी असलेला त्याला आवडत असे.

"जयनाक, तू आत्ता या गोष्टींवर वेळ फुकट का घालवतोयस? उन्हाळ्यात तू ती दुरुस्त केली असतीस," मी म्हणाले.

माणसाला वेळ असताना काम उरकून टाकावे, कारण नंतर करण्यासारख्या अनेक गोष्टी नेहमी असतात असे त्याने त्यावर मला उत्तर दिले. तरीही मला त्यावेळी काही वावगे वाटले नाही. त्याला काय म्हणायचे होते याची मला किंचितही चाहूल लागली नाही. कम्सोमोलचा सभासद या नात्याने आघाडीवर लढण्यासाठी तो स्वतः होऊन भरती झाला होता. जयनाक वाटेवर असताना आम्हाला या गोष्टीचा शोध लागला. स्टेशनावरून त्याने आम्हाला एक चिठी पाठवली. माझ्या

वेड्या मुला, तुझे हे करणे बरोबर नव्हते. तू जरी आम्हाला पत्र लिहिलेस तरी निरोप घेतल्याविना तू जायला नको होते. मी कितीही आधीच दुःखात असले तरी तू मला कोणतीही गोष्ट सांगायला काहीही हरकत नव्हती. एकही शब्द न बोलता घर सोडून गेल्याबद्दल त्याने त्या पत्रात माझी आणि अलिमानची माफी मागितली होती. असे करणे अधिक सोपे, एकाच घावात सारे पाश तोडणे चांगले असे त्याने म्हटले होते. आम्हाला काळजीतून आणि चिंतेतून वाचवण्यासाठी त्याने असे केल्याचे म्हटले होते. आम्हाला अखेरीस एकदमच ही वार्ता समजली म्हणजे आम्ही त्याच्या निर्णयापुढे हार खाऊन त्याच्या म्हणण्याला संमती देऊ असे त्याला वाटले होते. कुणास ठाऊक, कदाचित त्याचेच बरोबर असेल. मला एकदम सरळ सांगणे त्याला नक्कीच अवघड गेले असते; किंवा एकदम मी रडायला सुरुवात करीन आणि त्याला घरातच राहण्याची गळ घालीन अशी त्याला भीती वाटली असावी.

मी त्याला आता गमावला आहे आणि त्या घटनेला अनेक वर्षे लोटून गेली आहेत, तेव्हा मी माझ्या धरतीमातेशी बोलते तशी त्याच्याशी बोलते.

"जयनाक, मला काय म्हणायचंय ते ऐक! तुझ्या जाणीवेला टोचणी लावून घेऊ नकोस, तू मला दुखावलेलं नाहीस. माझ्या सर्वांत लहान मुला, माझ्या लाडक्या लेकरा, माझ्या आनंदी सोन्या, अरे जयनाक, मी तुला त्याचवेळी क्षमा केलीय! माझा निरोप न घेता तू का गेलास, तू मला एकटीला का टाकलंस, तुझ्या बालपणाला, तारुण्याला आणि तुझ्या भावी जीवनाला तू अखेरचा निरोप का दिलास हे मला

न्मजलं नाही असं का वाटतं तुला? तू खोडकर, दंगामस्ती करणारा मुलगा होतास, पण तू लोकांवर खूप प्रेम करायचास हे फार थोड्यांना माहीत होतं. आमच्या यातनांकडं तू अलिप्तपणानं पाहू शकत नव्हतास, म्हणून तू निघून गेलास. लोकांनी माणुसकी सोडू नये, युद्धाने जीवनात खंड पाडू नये असे तुला वाटत होते. आमच्यातील दयाळू प्रवृत्ती कायम राहावी आणि सर्व दयाशीलता व उदारता जळून खाक होऊ नये असे त्याला वाटत होते. हे घडू नये म्हणून तू आपल्या सर्व ताकदीनिशी प्रतिकार केलास. फक्त दयाळू कृत्ये कायम राहनात. बाकी सारे अदृश्य होते. तुझी चांगली, दयाळू कृत्येही राहिली आहेत. फार पूर्वीच तू नाहीसा झालास, लढाईत तू बेपत्ता झाल्याचं जाहीर करण्यात आलं. तू छत्रीधारी सैनिक होतास आणि शत्रूच्या पिछाडीला तीनदा जाऊन आलास असं लिहिलं होतंस. आणि १९४४ सालातील एका अंधाऱ्या रात्री, आपल्या गनिमी सैनिकांच्या मदतीला जाण्यासाठी आपल्या इतर सहकाऱ्यांबरोबर तू विमानातून खाली उडी घेतलीस आणि मोहिमेत बेपत्ता झाल्याचे नमूद करण्यात आले. तू प्रत्यक्ष लढाईत मारला गेलास, का तुला एकादी चुकून उडालेली गोळी लागली, का तुला पकडले, का तू दलदलीत बुडालास ते समजले नाही. पण जर तू वाचला असतास तर एवढ्या वर्षांत तुझ्याकडून एखादा शब्द तरी आम्हाला कळला असता. तर जयनाक, तूही हरवलास. तू निघून गेलास तेव्हा अवघा अठरा वर्षांचा कोवळा मुलगा होतास, लोकांच्या मनात आपल्या फारशा आठवणी ठेवून गेला नाहीस. पण तू मला नेहमी आठवतोस. माझ्यावरच्या प्रेमामुळं आणि मला फार

यातना होऊ नयेत म्हणून न सांगता तू कसा आघाडीवर गेलास ते मला नेहमी आठवतं. एकदा तू स्टेशनावर एका मुलाला आपला लोकरी कोट कसा काढून दिला होतास ते मला आठवतं. एक निर्वासित कुटुंब तू पाहिलंस, आई आणि चार मुलं होती. सर्वांत मोठ्या मुलाच्या अंगावर गरम काहीही नाही असं पाहून तू पटकन त्याला आपला लोकरी कोट काढून दिलास. आणि घरी तू जाकीटात कुडकुडत आलास. कदाचित तो मुलगा आता मोठा माणूस बनला असेल, काहीवेळा आपल्याला कोट देणारा लहान मुलगा म्हणून त्याला तुझी आठवण होत असेल, कारण आता तू त्याच्याहून खूपच लहान आहेस, पण तू त्याचा शिक्षक होतास. कारण अशी दयाशीलता काही रस्त्याच्या कडेला सवंग मिळत नाही, तुझ्या अंगी ती काही एकदम आली नव्हती. एक माणूस दुसऱ्याला दयाळूपणा शिकवतो."

पण आता बोलून काय उपयोग आहे, शब्दांची काहीही मदत होणार नाही. लढाईने किती तरी माणसे ओढून नेली. जर युद्ध झाले नसते तर माझा जयनाक एक देखणा, दयाळू माणूस म्हणून मोठा झाला असता!

"माझ्या मुला, आयुष्यातल्या बारा फुलांपैकी एकही फूल उचलायला तुला अवसर मिळाला नाही हा विचार मला दुखावतो. तू नुकती कुठं जगायला सुरुवात केली होतीस, तुला कोणती मुलगी सर्वांत अधिक आवडत होती हेसुद्धा मला ठाऊक नव्हतं."

माझ्या अंतःकरणात शेवटची ज्योत पेटते आहे. लौकरच तीही विझून जाईल. पण मला सारे काही आठवते, आम्ही

नांगरत असताना तो म्हातारा माणूस माझ्याकडे आला तो भयंकर दिवस मला आठवतो.

वसंतामधले पहिले दिवस होते. पांढरी फुले अजून उमलत होती आणि आम्ही नांगरणी करीत होतो. पिवळ्या खोऱ्यातून उबदार वारे वहात होते, शरदात नांगरलेली जमीन वाळत होती आणि सूर्याच्या प्रकाशात गवत हिरवेगार चमकत होते.

त्या दिवशी आम्ही नांगरणी नुकती सुरू केली होती. ट्रॅक्टरमागून मी माझा घोडा हळू हळू नेत होते, नुकत्या उकरलेल्या मातीच्या ढेकळांचा वास येत होता. सुवानकुल किंवा कासीमकडून फारा दिवसात काही पत्र आले नाही हा विचार मनात येत होता.

दरम्यान खेड्यातील एक वयस्क माणूस घोड्यावरून आला. त्याला काही खास घाई दिसत नव्हती. मी त्याला म्हणाले :

"उस्ताद, तुम्ही अगदी योग्य वेळी आलात. आमच्या नांगरणीच्या सुरुवातीला आशीर्वाद द्या."

त्यानी पंजे पसरले, दाढीला गोंजारले आणि अस्पष्ट आवाजात ते म्हणाले :

"शेतकऱ्यांचा पाठराखा दायकन-बाबा तुमचं भलं करो, पुराच्या वेळी नदीला दुथडी येते तसं तुमच्या शेतात पीक येवो." आणि नंतर तो मला म्हणाला : "तोल्गोनाई, जिल्ह्याच्या ठिकाणाहून तुला कुणीतरी भेटायला आलंय. तुला त्यानं कचेरीत बोलावलंय. मी तुला न्यायला आलोय."

"ठीक आहे, चला जाऊ या."

मी नांगरणी करणाऱ्यांकडे गेले आणि ते किती काम करतात ते पहायला संध्याकाळी परत येते असे त्यांना सांगितले. मग आम्ही खेड्याकडे निघालो. जिल्ह्याच्या ठिकाणाहून मला कुणी भेटायला आलेय ही काही नवलाची बाब नव्हती. ही नेहमीचीच गोष्ट होती. पेरणीच्या सुरुवातीला काही प्रतिनिधी गावाला भेट देऊन जात असत. आम्ही घोड्यावरून हळू हळू जात होतो, अनेक गोष्टींबद्दल, एकूण आयुष्याबद्दल बोलत होतो. तो म्हातारा माणूस म्हणाला:

"तोल्गोनाई, अशा कठीण काळात तू आपल्या लोकांची सेवा करतेस त्याबद्दल तुझे आभार मानले पाहिजेत. तू बाईमाणूस असलीस तरी वेळप्रसंगी आम्ही सारे तुझ्या सल्ल्यासाठी धावतो. अशीच धीरानं वाग तोल्गोनाई, लगामावरची पकड गच्च ठेव. कसोटीच्या काळात तू आमच्यावर खुशाल भरवसा टाकून रहा आणि आम्ही तुझ्यावर विसंबून राहू. तुला हे सारं किती अवघड जातंय याची आम्हाला पुरी कल्पना आहे. माणसाचं आयुष्य डोंगरवाटेसारखं असतं. कधी चढ तर कधी उतार आणि एकदम पुढ्यात प्रचंड पोकळी उभी ठाकते. एकट्याला ही वाट नेहमीच चालायला जमते असं नाही, पण प्रत्येकानं हात दिला तर रस्ता पार करता येतो. आपल्या आयुष्यात ही अशी परिस्थिती आहे."

एव्हांना आम्ही रस्त्यावरून चाललो होतो आणि आमच्या आवाराच्या बाहेर मी लोकांची गर्दी जमलेली पाहिली. मातीच्या भिंतीपलिकडून त्यांची डोकी मला दिसली, पण कसल्याशा कारणाने मी तिकडे फारसे महत्त्व दिले नाही.

मग त्या म्हाताऱ्या माणसाने अचानक माझे लगाम धरले आणि माझी नजर टाळीत तो म्हणाला:

"खाली उतर तोल्गोनाई, तुला आता खाली उतरलं पाहिजे."

मी त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले. तो खाली उतरला, माझ्या हाताला त्याने धरले आणि तो पुन्हा म्हणाला:

"तोल्गोनाई, तुला खाली उतरलं पाहिजे."

तरीही हा काय प्रकार आहे ते मला समजेना. पण कसल्यातरी भयानक शंकेने मला एकदम घेरले आणि एखाद्या मढ्यासारखी हळूच खोगीरावरून खाली घसरत आले. तीन बायकांबरोबर अलिमान घराकडे येत असलेली मला दिसली. त्या दिवशी त्या खळगे साफ करीत होत्या. अलिमान खांद्यावर तिची कुदळ टाकून येत होती. एका बाईने ती तिच्यापासून काढून घेतली. आणि मग मला सारा उलगडा झाला.

"काय प्रकार आहे? तुम्ही सारे इथं कशाला जमलाय?" मी किंचाळले.

माझ्या ओरडण्याच्या आवाजासरशी शेजारच्या आयेषाच्या आवारातून बायका धावत आल्या. त्या पटकन माझ्याजवळ आल्या, शांतपणे त्यांनी माझ्या हाताला धरले आणि म्हणाल्या:

"धीरानं घे तोल्गोनाई. आपले आवडते बहिरीससाणे आपण गमावलेत. सुवानकुल आणि कासीम मारले गेले."

अलिमानची किंकाळी मला ऐकू आली आणि नंतर साऱ्या बायका विव्हळू लागल्या:

"बोरूमोइ — आमचे भाऊ! बोरूमोइ!"

त्यानंतर मला काहीही ऐकू आले नाही. एका क्षणात मी जणू ठार बहिरी झाले. कदाचित माझ्या स्वतःच्याच किंकाळ्यांनी मी बहिरी झाली असावे. रस्ता गरगर फिरू लागला, घरे आणि झाडे कोसळून पडताहेत असे मला वाटू लागले. त्या भयाण शांततेत माझ्या डोळ्यांसमोरून भराभरा ढग जात होते व त्यातून मला अनोळखी, वेडेवाकडे, गप्प राहिलेले चेहरे दिसत होते. मी सुटायचा प्रयत्न केला, मला गच्च पकडून ठेवलेल्या हातांपासून माझे हात खेचून घेण्याचा मी प्रयत्न करू लागले. मला कोण पकडून धरतेय ते मला समजत नव्हते आणि दाराशी माणसे का जमलीत ते कळत नव्हते. मला फक्त अलिमान दिसली. अगदी नको इतकी ती मला स्पष्ट, ठसठशीत दिसली. ती भयानक दिसत होती, तिच्या कपाळावरून रक्त वहात होते, तिचे केस पुरते विस्कटले होते व कपडे फाटले होते. बायका तिला आवरायला पहात होत्या, तिचे हात मागे खेचून धरीत होत्या, पण ती सगळ्या ताकदीनिशी सुटून माझ्याकडे यायला पहात होती. ती एवढ्या मोठ्यांदा किंचाळत होती की, मलाही काहीच ऐकू येत नव्हते. मीही तिच्या दिशेने जायला पहात होते. तिच्या मदतीला लौकरात लौकर धावून जायचे एवढी एकच इच्छा माझ्या मनात होती. पण अखेरीस आम्ही एकत्र येईपर्यंतचा काळ जणू अनंतासारखा भासला. आणि ज्यावेळी अलिमानने आपले हात माझ्या मानेभोवती टाकले तेव्हा कुठे तिच्या घोगऱ्या आवाजातली हृदयभेदक किंकाळी मला ऐकू आली :

अम्मी! आपण विधवा झालो अम्मी! दीनवाण्या [illegible] आपले सूर्य लोपले! आपले दिवस अंधारले! अम्मी [illegible] आपले दिवस काळोखले!"

[illegible]. आम्ही आता विधवा झालो होतो. दोन विधवा. [illegible] आणि तिची सून. आम्ही आमच्या कर्माला दोष देत [illegible] एकमेकींना मिठ्या मारीत होतो, आमचे दु:खाचे [illegible] वहात होते.

[illegible] आमच्या शोकाला लौकर आवर घालण्यात आला. [illegible] दिवशी मृतांना श्रद्धांजली वहायला सामुदायिक शेतकरी [illegible] घरी पुन्हा एकदा जमा झाले. ते म्हणाले:

वर्षभर शोक करीत बसलं तरी पुरा पडणार नाही. आम्ही नेहमी त्यांची आठवण ठेवू, पण आयुष्य हे तर जगलं [illegible]हिजेच. त्या दोघांचं उरलेलं आयुष्य मासेलबेक आणि [illegible] लाभो." (त्यावेळी जयनाककडून आम्हाला जवळ [illegible] दर आठवड्याला पत्रे मिळत होती.) "ते विजयी होऊन [illegible] येवोत. तुम्ही कामावर परत चलावं असं सांगायला आम्ही आलोय. आता पेरणीचा मोसम आहे, जमीन वाट [illegible] थांबायची नाही. काळीज घट्ट करा. आमच्या जोडीनं कामाला लागा. शत्रूवर आपण असा सूड घेऊ या."

अलिमानने आणि मी यावर चर्चा केली आणि आमच्या लोकांच्या म्हणण्याला मान्यता दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कामाला जाण्याच्या तयारीत असताना आमचे अध्यक्ष उसेनबे कागदाचे दोन चिटोरे घेऊन आले. त्या मरणाच्या खबरी आहेत आणि आम्ही त्या जपून ठेवाव्या असे त्यानी सांगितले. कासीमच्या मरणाची खबर

शेतावर तीन आठवड्यांपूर्वीच आली होती. मॉस्कोच्या बाहेर अरेखोव्का खेड्यात चढाईच्या वेळी तो लढाईत कामी आला होता. ही बातमी आम्हाला कशी सांगावी याचा विचार ते लोक करीत असतानाच सुवानकुलच्या मरणाची खबर त्यांना मिळाली. येलेत्स शहरानजीक एका मोठ्या चढाईतच त्यालाही वीरमरण आले होते. आमच्या गावकऱ्यांना आता आम्हाला सत्य सांगण्यावाचून दुसरा पर्याय राहिला नव्हता. आणि ही कामगिरी त्यांना एकदम पार पाडण्याला तोंड द्यावे लागले. त्यानंतरच्या घटना काही विशेष सांगण्यासारख्या नाहीत. पुन्हा एकदा मी कंबर कसली आणि पुन्हा एकदा पथक-प्रमुखाच्या घोड्यावर मांड टाकली.

मी जर शोक करीत, विव्हळत, माझ्या कर्माला दोष देत बसले असते तर अलिमानचे काय झाले असते? ती दुःखाने एवढी खचली होती की, मी घाबरून गेले. माझे दुःख काही तिच्याहून कमी नव्हते, कारण मी नवरा आणि मुलगा असे दोघेही गमावले होते. उलट तिच्यापेक्षा माझी नुकसानी दुप्पट झाली होती. तरीही परिस्थिती वेगळी होती. काहीही असो, सुवानकुल आणि मी खूप काळ एकत्र जगलो होतो. आम्ही दोघांनी एकत्र खूप पाहिले, खूप अनुभवले होते. सुखाचा आणि दुःखाचा असे दोन्ही काळ आम्ही अनुभवले होते. आम्हाला मुले झाली होती, आमचे कुटुंब होते आणि जोडीने आम्ही काम केले होते. आणि युद्ध झाले नसते तर आम्ही अखेरपर्यंत तसेच एकत्र आयुष्य जगलो असतो. पण अलिमान आणि कासीम यांनी काय अनुभवले होते? सारे आयुष्य तर अजून त्यांच्यापुढे भविष्यात होते, त्यांच्या

[illegible] होते, त्यांच्या योजनांमध्ये होते. ऐन तारुण्याच्या [illegible] लढाईच्या कुऱ्हाडीने त्यांच्यावर वर्मी घाव घातला [illegible] अलिमानच्या काळजावरची जखम काळाने नक्की भरून [illegible] या धरतीवर खूप चांगली माणसे आहेत. कदाचित [illegible] काळाने प्रेम करावासा वाटेल असा पुरुष तिच्या आयुष्यात [illegible] आणि पुन्हा एकदा तिच्या जीवनात नव्या आशा अंकुरतील. इतर सैनिकांच्या विधवा या वाटेने गेल्या. लढाई [illegible] त्यांनी पुन्हा लग्ने केली. काही सुखी झाल्या, काही झाल्या नाही. पण त्या एकट्या राहिल्या नाही. त्या [illegible] कुणाच्या तरी बायका आणि माता आहेत. त्यांच्यापैकी [illegible] जणींना खऱ्या सुखाचा शोध लागला. पण सारीच [illegible] सारखी नसतात. काही लोक आपले दुःख चटकन [illegible] आणि पटकन मार्ग बदलून पुन्हा पुढे चालू लागतात. [illegible] दुसरे केवळ काळ काढीत, कुढत, कण्हत, जिवाच्या [illegible] जगत राहतात. आपल्या आठवणी विसरणे त्यांना अशक्य ठरते. अलिमानच्या दुर्दैवाने ती दुसऱ्या प्रकारच्या [illegible]सारखी निघाली. भूतकाळ ती विसरू शकली नाही, आपले नशीब ती पत्करू शकली नाही. एका परीने मी दोषी आहे. मी फार दुबळी ठरले, तिच्याबद्दलच्या अनुकंपेवर मी [illegible] करू शकले नाही.

त्या वसंतामध्ये आमचे पथक पाण्याचे मुख्य कालवे [illegible] होते. मीही तेथे काम करीत होते. एके दिवशी सूर्य मावळण्यापूर्वीच आम्ही काम संपवले व लोक आपापल्या घरांकडे निघाले. तिथून जवळच राहुटी टाकून राहिलेल्या नांगरणीवाल्यांशी मला कामाचे चार शब्द बोलायचे होते,

म्हणून मी अलिमानला माझी वाट बघू नको असे सांगितले. ते लोक नुकते जेवणाला बसत होते. मी हाताशी असलेल्या कामाबद्दल बोलले आणि बाहेर आले. मी घोड्यावर बसणार एवढ्यात अलिमान माझ्या नजरेला पडली. ती घरी न जाता एकटीच तिथे थांबून राहिली होती. नांगरलेल्या जमिनीतून ती एकटीच चालत ट्युलिपची फुले वेचीत होती. एखाद्या लहान मुलीसारखी तिला फुले आवडायची. अलिमान, माझी लाडकी अलिमान, माझी बिच्चारी सून! तिने सुमारे डझनभर मोठी ट्युलिपची फुले गोळा केली होती आणि बहुधा ती घरी आणायचा तिचा विचार असावा. मी तिच्या हातात फुले पाहिली तेव्हा माझ्या कपाळावर घाम थबथबला. शेताच्या कडेला तिने रानटी फुले कशी गोळा केली होती ते मला आठवले. त्या वेळेसारखीच ती आताही हातात फुले धरून उभी होती. त्यावेळी तिने लाल रुमाल बांधला होता आणि तिची फुले गुलाबी व पांढरी होती, पण आता तिने काळा रुमाल बांधला होता आणि फुले लाल होती. फक्त एवढाच काय तो फरक होता. पण माझे काळीज या दृश्याने चरचर कापीत गेले! दरम्यान अलिमानची नजर वर गेली आणि तिने भोवताली पाहिले. मग पुन्हा मान खाली घातली व उदासपणे फुलांकडे पाहू लागली. जणू तिला म्हणायचे होते: ही कुणासाठी? मी कुठं घेऊन जाऊ ही फुलं? एकाएकी तिने जमिनीवर अंग टाकले व त्या ट्युलिपच्या फुलांचे ती तुकडे तुकडे करू लागली. जमिनीवर त्यांना झोडपू लागली. काही वेळाने ती स्तब्ध झाली, तिने अंग जमिनीवर पसरले होते, तोंड पंजांनी लपवून घेतले होते. तिचा चेहरा चिखलाने

…त होता. मी राहुटीमागे लपले. तिने मला पहावे असे …त नव्हते. तिला मनसोक्त रडू दिले तर बरे वाटेल असे …ला वाटले. पण तिने एकदम उठून उडी मारली आणि …ण ओलांडून ती मुख्य रस्त्याकडे धावली. मी घाबरले, …झ्या घोड्यावर स्वार झाले आणि तिच्या पाठोपाठ गेले. …र लाल मैदानातून काळा रुमाल बांधून तिला पळताना पाहून … रुमालीची घाबरले.

"अलिमान! थांब! काय झालं? थांब अलिमान!" … ओरडले पण ती थांबली नाही.

पूर्वी ज्या रस्त्यावरून आमचा राखी घोडा एकदा दौडत …त होता त्या रस्त्यापर्यंत ती पोचली आणि केवळ तिथेच … तिला गाठले.

"अम्मी! एक शब्द बोलू नका. अम्मी, कृपा करून …ही बोलू नका! माझ्यावर दया करा!" मी घोड्याचे …म खेचले. ती धावत आली, घोड्याची आयाळ तिने …च पकडली, माझ्या पायाशी तोंड लपवले आणि ती हुंदके … लागली. मी काहीही बोलले नाही. काय बोलणार मी? … तिने आपला चेहरा वर उचलला. तिचा सारा चेहरा …नाने आणि अश्रूंनी माखला होता. हुंदके देत देत ती …लू लागली :

"अम्मी, पहा सूर्य कसा तळपतोय. आकाश पहा किती … दिसतंय आणि सारं स्तेप फुलांनी झाकलंय! पण कासीम …च परतणार नाही ना? तो कधीच परतणार नाही?"

"नाही, तो कधीच परतणार नाही," मी म्हणाले. …लिमानने सुस्कारा टाकला.

"अम्मी मला क्षमा करा," ती हळूच म्हणाली. "मला पळून जाऊन तिथं त्याच्याबरोबर मरून जायची इच्छा होती."

आता मला पुढे सहन होईना आणि मी रडू लागले. पण काहीही बोलले नाही. मी अधिक शहाणी आणि अधिक व्यवहारी आई असते तर तेथल्या तेथे मी सांगितले असते:

"तू काय आता कुक्कुलं बाळ आहेस? अशी तू काही एकटीच नाहीस, तुझ्यासारख्या कितीतरी तरुण मुली विधवा झाल्यात ते पहा. त्यांची गणती करणंसुद्धा शक्य नाही. स्वतःला सावरायचा प्रयत्न कर. ऐकायला कितीही भयंकर वाटलं तरी चालेल—पण कासीमला विसरायचा प्रयत्न कर. कायमचं गेलेलं माणूस तू परत आणू शकत नाहीस. प्रेम करण्याजोगी दुसरी एखादी व्यक्ती काही काळानं तुला भेटेल. तू स्वतःवर ताबा मिळवला नाहीस, तर तुला स्वतःलाच अधिक त्रास होत राहील. अशी स्वतःला शिक्षा करून का घेतेस? अजून तू वयानं लहान आहेस, सारं आयुष्य अजून तुझ्यापुढं आहे." हे कठोर सत्य, हे एकमेव खरे सत्य त्यावेळी तिला सांगायचे धैर्य मला झाले नाही याचा आता पश्चात्ताप होतो. आणि नंतरही अनेकवेळा तशी संधी आली व हे शब्द अगदी माझ्या जिभेच्या टोकावर होते, पण ते उच्चारायचे धैर्य मला कधीच झाले नाही. कुठल्यातरी अनावर शक्तीने त्यांना नेहमी रोधून धरले. अलिमानला स्वतःलाही असे काही माझ्याकडून ऐकायची इच्छा नव्हती. तापल्या लोखंडाप्रमाणे प्रत्येक शब्दही लवचिकपणे वाकण्याचा एक नेमका दिवस असतो. ही वेळ चुकली तर शब्द थंड होतो, त्याचे दगडात रूपांतर होते आणि तुमच्या काळजावर तो असा दडपून बसतो की, त्या वजनाला

दुसरी बाजूला करणे अवघड होऊन बसते. एवढी वर्षे उलटून गेल्यानंतर आत्ता मी हे बोलतेय, पण त्यावेळच्या रोजच्या आयुष्याच्या धबडग्यात, आमच्या सामुदायिक शेताच्या कामाच्या च्या व्यापात शांतपणे बसून एवढा स्पष्ट विचार करायला वेळच नव्हता. एकाच विचारावर आमच्या साऱ्या आशा एकवटल्या होत्या: जर विजय नजीक येऊन ठेपला असेल, जर लढाई चटकन संपली, तर बाकी गोष्टींना नंतर वेळ मिळेल. लढाई संपताच साऱ्या गोष्टी आपसूक ठिकाणावर येतील असे आम्हाला वाटत होते. पण तसे घडले नाही.

८

"धरणीमाते, सुवानकुल आणि कासीमसारखी माणसे जेव्हा नाश पावतात तेव्हा डोंगर का कोसळून पडत नाहीत, नद्री का दुथडी भरून ओसंडत नाहीत? बापलेक दोघेही हाडाचे शेतकरी होते. काळाच्या सुरुवातीपासून अशा माणसांच्या प्रयत्नांमुळे जग टिकून राहिले आहे. जगाला ती खाऊ घालतात, जोपासतात, लढाईच्या काळात त्याचे रक्षण करतात, हाती शस्त्र घेण्याचे आवाहन केल्यानंतर पहिल्यांदा उत्तर त्यांच्याकडून येते. लढाई झाली नसती तर सुवानकुल आणि कासीम या दोघांनीही कितीतरी गोष्टी केल्या असत्या! त्यांच्या श्रमांच्या फळांचा कितीतरी लोकांना फायदा झाला असता, आणखी कितीतरी शेते पेरली गेली असती, आणखी कितीतरी धान्य पाखडले गेले असते. आणि धरतीवर

राहिलेल्या लोकांच्या श्रमांमुळे त्यांचा स्वतःचा शंभरपटींनी फायदा झाला असता, आणखी कितीतरी आनंदाचा त्यांना लाभ झाला असता! धरणीमाते, सांग मला, अगदी खरं खरं सांग: लढाईशिवाय माणसं राहू शकतात का?"

"तोल्गोनाई, हा प्रश्न फार अवघड आहे. पूर्वीच्या लढायांमध्ये काहीही मागमूस न राहता माणसे नाहीशी झाली, आगीच्या डोंबात गावंच्या गांव भस्मसात झाली आणि नंतर वाळूच्या ढिगांखाली गाडली गेली. माणसाच्या अस्तित्वाच्या खुणा पाहण्याची मी शतकानुशतकं स्वप्नं पाहिली. दरवेळी लोकांनी एकमेकांविरुद्ध लढाई सुरू केली म्हणजे मी म्हणत असे: 'थांबा! एकमेकांचे रक्त सांडू नका!' आणि आता पुन्हा मी हेच शब्द आणखी एकदा उच्चारते: 'पर्वतांपलिकडच्या आणि सागरांपलिकडच्या माणसांनो! जगातल्या माणसांनो, तुम्हाला काय हवंय–भूमी? ही मी धरती इथं आहे! मी तुम्हा सर्वांसाठी इथं आहे आणि माझ्या दृष्टीला तुम्ही सारे सारखेच आहात. मला तुमची भांडणं नकोत, मला तुमची मैत्री हवीय, तुमचे कष्ट हवेत! नांगरलेल्या भूमीत एक दाणा टाका आणि मी तुम्हाला शंभर दाणे देते. काठी रोवा आणि तिचे मी तुम्हाला झाड करून देते. फळबाग लावा आणि मी तुमच्यावर फळांचा वर्षाव करते. गुरांना पाळा आणि मी गवत होते. घरे बांधा मी भिंती बनते. फळाफुला आणि शतगुणित व्हा, आणि मी तुम्हा साऱ्यांचे सुंदर घर बनते. मी अनंत आहे, अथांग आहे, मी खोल आहे, उंच आहे, विस्तृत आहे, प्रत्येकाला पुरी पडेन अशी मी आहे!' आणि तोल्गोनाई, लोक लढाईशिवाय राहू शकतात का म्हणून तू मला विचारतेस.

तुम्हा लोकांवर अवलंबून आहे, माझ्यावर नाही. तुमच्या इच्छाशक्तीवर आणि तुमच्या भक्कम विचारधारेवर अवलंबून आहे."

"प्रिय धरती, तुझे उत्तम कामगार, तुझे उत्तम कारागीर युद्धानं ओढून नेले. मला हे मान्य नाही, तनमनानं मी याच्या विरुद्ध आहे! लढाईकडे जाण्याचा मार्ग लोक रोखू शकतात, त्यांनी तो रोखला पाहिजे."

"तोल्गोनाई, या लढायांमुळं मला यातना होत नाहीत असं वाटतं का तुला? अत्यंत क्रूर असा माझा छळ होतो. शेतकऱ्यांचे हात मला स्पर्शत नाहीत, माझ्या हलधरांसाठी – माझ्या मुलांसाठी – मी सतत शोक करीत राहते. मला सुवानकुलची कासीमची, जयनाकची, धारातीर्थी पडलेल्या सर्व सैनिकांची नेहमी अत्यंत गरज भासते. माझी नांगरणी होत नाही, माझ्या शेतांची कापणी होत नाही आणि धान्य पाखडले जात नाही तेव्हा मी त्यांना साद घालते: 'माझ्या हलधरांनो, तुम्ही कुठं आहात? पेरणी करणाऱ्यांनो, तुम्ही कुठं आहात? उठा माझ्या बाळांनो, माझ्या नांगरणी करणारांनो! या, मला मदत करा, मी गुदमरते आहे, मी मरते आहे!' सुवानकुल आपली कुदळ हातात घेऊन आला, कासीम कंबाईन चालवीत आला आणि जयनाक गाडी घेऊन आला तर किती छान होईल! पण ते उत्तर देत नाहीत."

"हे धरती, तू जे काही बोललीस त्याबद्दल आभार. याचा अर्थ मला त्यांची जेवढी आठवण होते तेवढीच तुलाही होते. माझ्यासारखीच तूही त्यांच्यासाठी शोक करतेस. हे धरणी, आभारी आहे."

९

लढाईच्या तिसऱ्या आणि चौथ्या वर्षांनी आनंद आणला तसे कष्टही आणले; शत्रू अधिकाधिक मागे रेटला जात होता, आमची अंतःकरणे आनंदाने गात होती, पण उलटणाऱ्या दर दिवसागणिक आमच्या अडचणीही वाढत चालल्या होत्या. खुंटांमध्ये पडलेली धान्याची कणसे आम्ही गोळा करीत होतो आणि आमच्या बागांमधले बटाटे खणून काढीत होतो तोपर्यंत — शरदातल्या त्या दिवसांपर्यंत — बरेचसे सहन करण्याजोगे होते. पण हिवाळ्याच्या मध्याला उपासमार ठाण देऊन बसली असती. वसंतामध्ये आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीलाही परिस्थिती तितकीच भयानक वाईट राहिली असती. काही कुटुंबे तर अक्षरशः कंदमुळे खाऊन, गवत खाऊन आणि रंगापुरते दूध पाण्यात मिसळून दिवस काढीत होती. अलिमान आणि मी अशा दोघीही काम करीत होतो. आमच्या पदरी लहान मुले नव्हती. असती तर फार बरे झाले असते. मोठ्या कुटुंबांमधली मुले पाहताना, भुकेमुळे फुगलेली त्यांची पोटे व सुजलेले चेहरे पाहताना, तुमच्या हातांकडे आशाळभूत नजरांनी पहात अन्नासाठी तिष्ठत असलेली पाहताना काळीज पिळवटून निघायचे. जर कुणी सांगितले असते: "आघाडीवर जा आणि मर, म्हणजे लढाई संपेल आणि मुलं पुढं उपाशी राहणार नाहीत," तर मी क्षणभरही घुटमळले नसते. त्या भुकेल्या नजरांचे दृश्य टाळण्यासाठी मी काहीही केले असते. एकदा मी अलिमानला हे सारे बोलले. तिने माझ्याकडे पाहिले आणि ती म्हणाली:

"मीसुद्धा असंच करीन. आपल्याला का उपाशी रहावं लागणंय हे मुलांना समजत नाही याचं सर्वांत जास्त दुःख वनं. आपण मोठी माणसं निदान स्वतःचं सांत्वन करतो, कारणं शोधून काढतो, कधीतरी या सर्वाचा अंत होणार आहे हे आपल्याला माहीत आहे. पण मुलांना हे समजत नाही. त्यांचे बाप परत येईपर्यंत आपणच त्यांना खाऊ घातलं पाहिजे. अम्मी, एवढंच आपलं आता काम आहे. हे नसेल करता येण्यासारखं, तर जगण्याला काही अर्थच नाही."

सारे काही लढाईसाठी आहुती पडत होते: आमची आयुष्ये, आमचे श्रम, आमच्या इच्छा-आकांक्षा आणि मुलांची सुद्धा! युद्धाच्या खाईत छोट्यातल्या छोटा थेंबही आहुती पडत होता. तरीही, युद्धप्रयत्नांसाठी कोणताही त्याग करण्यास तयार नसलेलीही काही माणसे होती. अशी माणसेही अस्तित्वात होती हे सत्य लपविण्यात काही अर्थ नाही. ही माणसेही आमच्या तोंडचा घास काढून घेत होती.

एकदा मी वाट चुकले. त्रेचाळीसमधली गोष्ट. मला वाटते हिवाळ्याच्या मध्यावरचे दिवस. नाही, हिवाळ्याची अखेर होती. स्तेपमधल्या जमिनीवर काही गडद काळे पट्टे दिसू लागले होते, पण रात्रीच्या वेळी खिडक्यांवर बर्फ अजून साचत नव्हता.

मी परत आले तेव्हा किती वाजले होते कुणास ठाऊक, प्रत्येकजण केव्हाच झोपी गेला होता. अशा वेळी कुणीतरी खिडकीवर एवढ्या जोराने ठोकायला सुरुवात केली की, मला वाटले आता खिडकी फुटणार.

"तोल्गोनाई! लौकर ऊठ! जागी हो!" कुणीतरी मोठ्याने ओरडत होते.

मी आणि अलिमान अशा दोघीही घाबरून बिछान्यात चटकन उठून उभ्या राहिलो.

"अम्मी!" काळोखात अलिमान कापऱ्या आवाजात कुजबुजली. काहीतरी चमत्कार घडेल अशी आशा तिच्या आवाजात डोकावत होती.

जळो ती कधी न संपणारी आशा! भीतीने आणि अंधुक आनंदाने माझ्याही काळजाचा ठोका चुकला: "कदाचित आमच्या घरचा एखादा पुरुष परत आला?" आणि मी खिडकीच्या तावदानाला चेहरा दाबला.

"कोण आहे? कोण आहे तिथं?"

"लौकर तोल्गोनाई! लौकर! त्यांनी आपले घोडे चोरून नेले!" खिडकीपलिकडचा आवाज ओरडला.

अलिमान दिवा पेटवीत होती तोपर्यंत मी बूट चढवले, माझा कोट अंगात घातला आणि दाराकडे धावले. आम्ही तबेल्याकडे धावलो तेव्हा आमच्या आधीच तेथे अध्यक्ष आणि अनेक गावकरी आलेले दिसले. चोरांनी आमचे तीन घोडे पळवल्याचे समजले. त्यात आमचा राखी घोडाही होता. मी तो शेताला दिला होता. ही आम्ही तयार केलेली सर्वांत उत्तम जनावरे होती. वसंतातल्या नांगरटीसाठी आम्ही त्यांना तयार करीत होतो. तबेलावाला म्हणाला की, मध्यरात्रीसाठी थोडे गवत आणायला तो गवताच्या गंजीकडे गेला. तो परत आला तेव्हा दिवा विझला होता आणि तबेल्यात अंधार होता. त्याला वाटले वाऱ्याने दिवा विझला असावा, म्हणून त्याने हळू हळू दिवा पेटवला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, शेवटचे तीन गाळे रिकामे होते.

त्या काळात कामाचे तीन धडधाकट घोडे गमावणे म्हणजे आजच्या काळात दहा ट्रॅक्टर गमावण्यासारखेच होते. पण त्याचबरोबर प्रत्येक आघाडीवरच्या सैनिकाला त्याच्या रोजच्या शिध्याला फाटा देण्यासारखे होते. आम्ही आमच्या घोड्यांवर खोगिरे चढवली, काहींनी आपल्या रायफली बरोबर घेतल्या आणि आम्ही शोधात निघालो. जर आमच्या हाती चोर सापडले असते तर आम्ही यत्किंचितही दयामाया दाखवली नसती. नाही, आम्ही नक्कीच दया दाखवली नसती!

गावाच्या सीमेशी आम्ही छोट्या छोट्या गटांमध्ये पांगलो आणि वेगवेगळ्या दिशांना निघालो. मी एका जातिवंत घोड्यावर स्वार झाले होते. तो अगदी तगडा, बळकट होता आणि लगामाला सारखा ओढ धरीत होता. मी त्याला मन मानेल तसा दौडू दिला. आम्ही हमरस्ता ओलांडून डोंगराकडे निघालो. दोन घोडेस्वार माझ्या मागून येत होते. मी मागे वळून पाहिले तेव्हा ते दिसेनासे झाले होते. ते किंवा मी कुठल्या तरी वळणाशी एकमेकांना चुकलो होतो. वाट चुकणे काही अवघड नव्हते, कारण आकाशात चंद्र जरी उगवला असला तरी त्याचा प्रकाश एवढा फसवा होता की, वीस पावलांपलिकडे अंधाराशिवाय दुसरे काही दिसत नव्हते. चोरांना पकडणे एवढा एकच विचार माझ्या डोक्यात होता. मी एवढी अस्वस्थ आणि त्रासलेली होते की, माझा घोडा मला कुठे नेतोय हेही माझ्या ध्यानात आले नाही. एकाएकी तो थांबला तेव्हा एका खोल दरीच्या टोकाशी आम्ही उभे आहोत असे माझ्या लक्षात आले. त्या पर्वत पायथ्याच्या टेकड्या होत्या. काळ्या शिखरावरून चंद्र सावधगिरीने चालला

होता, तारे मंद चमकत होते. कुठेही उजेड नव्हता. वाळलेल्या कापुरकचरीला वारा घासत होता आणि कर्कश्य शीळ घालीत होता. एका जुन्या मातीच्या थडग्याच्या अवशेषांवर घुबडे घूत्कारत होती.

मी त्या दरीत उतरले. कसलाही आवाज तेथे ऐकू येत नव्हता. घाबरलेला एक कोल्हा लव्हाळ्यांमधून उड्या मारीत पसार झाला. चंद्राच्या प्रकाशात तो चंदेरी निळसर दिसत होता. दृष्टीपथात दुसरा सजीव प्राणी दिसत नव्हता.

मग मी खेड्याकडे मोहरा वळवला. त्या दरीच्या काठाने प्रवास करताना मला एकदम आठवण झाली की, आमच्या खेड्यात राहणाऱ्या जेन्शेन्कुलबद्दल लोकात काही चर्चा चालू होती. लोक म्हणत की, तो आघाडीवरून पळून परत आला होता. त्याच्याबरोबर त्याच्याचसारखे पिवळ्या खोऱ्यातले आणखी दोघेजण होते आणि ते सारे पर्वतात दडून राहले होते. मी या अफवांकडे फारसे लक्ष दिले नव्हते. एवढे सारे पणाला लागले असता कुणी आडोसा घ्यायला धावू कसे शकते हेच मला समजत नव्हते. काहींनी लढाईवर जाऊन मरायला पाहिजे होते आणि त्यांच्या पाठीशी काहीजण खुशाल जीव वाचवून दडत होते, असे एकूण दिसत होते. असा बेशरमपणा करणारा कुणी माणूस असेल असे मला वाटत नव्हते. पण आता एकाएकी माझ्या मनात शंका येऊ लागल्या. तळहातावरच्या रेषांप्रमाणे आम्ही गावकरी एकमेकांना ओळखतो, घोडे चोरण्याची हिंमत त्यातला कुणी करील अशी शक्यता नव्हती. आणि घोडा म्हणजे काही सुई नव्हे की, आपली पटकन कोटाच्या कॉलरमागे लपवता येईल! मग तीन

…ड्यांची तर गोष्टच नको. त्यावरून एवढेच स्पष्ट होत … की. चोर बाहेरून आले होते. आता ते पर्वतामधून आणि …मधून लांडग्यांप्रमाणे धावत असणार. जर जेनृशेनकुल …च लढाईतून पळून येऊन दडून बसला असेल, तर त्याचेच … काम असले पाहिजे असा विचार माझ्या मनात आला. … नगांही तशी माझी खात्री होत नव्हती: काही झाले तरी …ी सापडत नाही तोपर्यंत चोर नाही आणि चोरी करताना …णाही त्याला पाहिले नव्हते.

…ीन घोडे दोन फाळांच्या नांगराला जोडता यायचे. …ी कसाबसा एक नांगर जोडला. आणि चार शिंगरांना …ाना जुंपले. तसे करताना आमची आतडी तुटत होती, … आमच्यापुढे दुसरा उपाय नव्हता. एव्हांना पेरणीची … झाली होती आणि आमच्या दुभंगलेल्या काळजांचा विचार …त बसायला अवसर नव्हता, मग चोरांचा कुठून करणार! … वाटते माझ्या आयुष्यातला तो सर्वांत खडतर वसंत … होता. लोकांना दोष देण्यात अर्थ नव्हता. लोकांना काम …ची इच्छा होती, आपल्यापरीने ते प्रयत्नांची शिकस्त …त होते, पण उपाशी पोटी कुणीही चांगले काम करू … नाही. जे काम आम्ही पूर्वी एका दिवसात उरकले … त्याला आता आठ आठ दिवस लागू लागले. आमचे … मागे पडले होते आणि पेरणी योजनेनुसार होत नव्हती. … आणखी एक आपत्ती आमच्यावर येऊन कोसळली. …च्याजवळ पुरेसे बियाणे उरले नव्हते. आम्ही कोपरा न् … धुंडाळून काढला आणि आमच्या नांगराने कसेबसे … काम पार पाडले.

त्यावेळी आमच्या आयुष्याबद्दल मी खूप विचार करायची. आमच्या कामासाठी आम्हाला काहीच मिळत नव्हते आणि सारे साठे वापरावे लागत होते. आम्ही काय करणार होतो? शेत सोडून भटकेगिरी करणार होतो? तसे केले असते तर आम्ही कायमचेच हरलो असतो. पण मग काय करायला पाहिजे होते? आम्ही शरदापर्यंत कसाबसा दम काढला असता आणि हिवाळा रडतखडत ओढला असता, तरी पुन्हा एकदा वसंत पुढे होता आणि आम्हाला पुन्हा एकदा भुकेल्या, अशक्त लोकांना कामाला जुंपावे लागणार होते. काम केल्याविना आमचे पुढे चालणार नव्हते.

माझ्या जागत्या रात्रींमध्ये मी या प्रश्नाचा अनेक बाजूंनी विचार केला आणि शेवटी एक कल्पना डोक्यात चमकली: पडित जमीन आम्ही नांगरली तर काय होईल? इथून जवळच एक छोटे पडित मैदान पसरले होते आणि त्यावरचे पीक आम्ही सर्व कुटुंबांमध्ये वाटले असते. मी अध्यक्षांशी त्याबाबत बोलले आणि पुढे जिल्ह्याच्या ठिकाणी गेले. मी त्यांना सांगितले की, आमचे नेमून दिलेले काम आम्ही पुरे केले आहे आणि हे योजनेबाहेरचे जादा काम असेल. आम्ही ते बाहेरच्या मदतीशिवाय पार पाडू, केवळ आमच्या हिंमतीवर पार पाडू, आमच्या कामाचा मोबदला म्हणून आणि लोकांना आधार म्हणून हे काम करू. टेबलाशी बसलेले कुणीतरी म्हणाले:

"असं करून तुम्ही स्तालिन यांचा सामुदायिक शेताबद्दलचा कायदा मोडताहात!"

मी संतापाने उफाळून उद्गारले:

"ठीक आहे, आग लावा त्या कायद्याला! आम्ही उपाशी राहिलो तर तुम्हाला कोण खायला घालील?"

अशा बोलण्याचे काय परिणाम होतील तुम्हाला माहीत आहे?

"होय. माहीत आहे. आणि त्यामुळं जर गोष्टी सोप्या होणार असतील तर जरूर माझी तात्काळ पाठवणी करा. पण त्याआधी सैनिकाच्या भाकरीसाठी कोण पेरणी करील तेवढं मात्र बघा."

प्रत्येकाने एकदमच बोलायला सुरुवात केली. शेवटी त्यांनी ती बाब जिल्हा पक्ष समितीपर्यंत नेली. अखेरीस त्यांनी परवानगी दिली, मात्र या सर्व प्रकाराला मी व्यक्तिशः जबाबदार राहीन असे त्यांनी सांगितले. पण प्रश्न जबाबदारीचा नव्हता, बियाण्याचा होता. शेतावर काहीही शिल्लक नव्हते, सारे बियाणे पेरले होते. मी खूप विचार केला आणि माझ्या गावातील लहानापासून थोरापर्यंत सर्वांना एकत्र बोलावले. त्यामुळे त्या बैठकीला कौटुंबिक मेळाव्याचे स्वरूप आले होते.

"काय करायचं ते आपण ठरवू या," मी म्हणाले. "शेतामधल्या पिकांवर आपण विसंबून राहू शकत नाही. तुम्हाला सर्वांना ठाऊक आहे की, ते सारं धान्य सैन्यासाठी जाणार आणि जर काही उरलंच तर ते बियाण्यासाठी वापरलं जाणार. पण आपल्याला जर दुसरीकडून बियाणं मिळविता आलं, तर मोठ्या कुटुंबातल्या मातांना, म्हाताऱ्या लोकांना आणि अनाथांना आपण मदत करू शकू. तुम्ही माझ्यावर विश्वास टाकत असाल तर ही कामगिरी पार पाडायची जबाबदारी मी अंगावर घेते. तुमच्या घरातल्या पोत्यात तुम्हाला उरलेले शेवटचे धान्याचे बहुमोल दाणे द्या, अशी मी तुमच्याकडं मागणी करते. रागावू नका. आपण आपल्या

तोंडचा शेवटचा घास काढला आणि उपाशी राहिलो तरी कापणीच्या हंगामापर्यंत दुधावर दिवस निभावून नेऊ हे मला माहीत आहे. पण प्रत्येक दाणा शंभरपटीनं परत मिळेल. माझ्या प्रिय मित्रांनो, आपल्या कंबरा कसा, मुठी वळवा आणि या मोठ्या त्यागाला तयार व्हा. हे तुमच्या स्वतःच्या भल्यासाठी आहे, तुमच्या मुलांच्या भल्यासाठी आहे. तुम्हाला याबद्दल पश्चात्तापाची पाळी येणार नाही. माझ्यावर विश्वास ठेवा, एक आई म्हणून माझ्या शब्दावर विश्वास ठेवा. पेरणीला अजून वेळ आहे तेवढ्यात मला मदत करा.

सभेत प्रत्येकाची या योजनेला संमती आहे असे वाटले. पण प्रत्यक्ष धान्य द्यायची जेव्हा वेळ आली तेव्हा मात्र अवघड जाऊ लागले. साराच प्रकार भयंकर होता. मोठ्या कुटुंबातल्या माता जगातल्या साऱ्या गोष्टींना शिव्याशाप देत घरांमधून तरातरा निघून जात तेव्हा ते दृश्य पाहणे असह्य होई. लढाई, आपले आयुष्य, आपली मुले, शेत आणि मी अशा सर्वांना त्या शिव्याशाप मोजीत. तरीही आपल्या रक्ताने भळभळणाऱ्या काळजाचा तुकडा काढून त्या देत. प्रत्येकजण आपापल्या ताकदीनुसार जास्तीत जास्त धान्य देत होता. काहींनी अठरा पौंडापर्यंत दिले, तर काहींनी मूठभर दिले. आपल्याजवळचे अखेरचे धान्य ही माणसे मला देत आहेत याची जाणीव होती, तरीही मी त्यांच्याकडून ते घेत होते. मी धान्य गोळा करून ते पोत्यांमध्ये भरले. मी गाडी घेऊन घरोघर फिरले. लोकांच्या विनवण्या केल्या, गोड बोलले, वाद घातला, अक्षरशः त्यांच्या हातून धान्य हिसकावून घेतले. एकच दिलासा मला वाटत होता की, शरदामध्ये लोक मला

[illegible] देतील, त्यावेळी त्यांच्या मूठभर धान्याच्या बदल्यात [illegible] धान्य त्यांना देता येईल.

माझ्या शेजारणीशी, सदा आजारी असलेल्या आयेषाशी [illegible] वागले ते कधीही विसरणार नाही. ती लहान वयातच [illegible] झाली होती, तिचा नवरा जमनबे युद्धापूर्वीच वारला [illegible]. या कृश बाईला आणि बेक्ताश या एकुलत्या एक [illegible] सोडून तो या जगातून गेला होता. ती जेव्हा बरी [illegible] तेव्हा शेतावर किंवा बागेत काम करायची. तिची [illegible] गाय होती आणि त्यामुळे निर्वाहाला व मुलाच्या संगोपनाला [illegible] मदत होत होती. दरम्यान बेक्ताश आपल्या कामाचा [illegible] पार पाडू लागला होता, तो विश्वासू मुलगा होता. [illegible] दिवशी घरोघर फिरायला आम्ही त्याचा छकडा वापरीत [illegible]. जेव्हा त्याच्या घराशी पोचलो तेव्हा मी म्हणाले:

"बेक्ताश, तुमच्या घरात काही धान्य आहे का?"

"थोडंसं आहे." तो काही वेळ गप्प बसला आणि पुढे म्हणाला: "भट्टीमागच्या पोत्यात आहे."

"जाऊन घेऊन ये," मी म्हणाले.

"नाही तोल्गोनाई मावशी. तुम्हीच जाऊन आणा."

आयेषा त्यावेळी आजारी होती. गरम कांबळ्यावर ती [illegible] होती व कमरेभोवती तिने गरम शाल गुंडाळली होती.

"आयेषा, प्रत्येकजण जे देतोय ते घ्यायला मी आलेय," मी म्हणाले.

"जे काही आमच्याजवळ आहे ते तिथं," भट्टीमागचे [illegible] बोटाने दाखवीत ती म्हणाली.

"जे काही तुझ्याजवळ असेल ते. मी काही गंमतीसाठी मागत नाही. बियाण्यासाठी मागतेय. शेत तयार आहे,

पेरणीची तेवढी खोटी आहे. आम्हाला अडवून धरू नको आयेषा," मी विनवणी केली.

तिने दातात ओठ दाबून धरला व फरशीकडे पाहिले. अरे देवा, गरज माणसाला काय बनवते!

"आयेषा, विचारानं वाग. हे धान्य तुला फार तर दहा पंधरा दिवस पुरेल. पुढच्या हिवाळ्याचा, पुढच्या वसंताचा विचार कर. मी तुझ्या मुलाच्या भल्यासाठी, तुझ्यासाठी हात पसरतेय आयेषा. तो छकडा घेऊन बाहेर उभा आहे."

तिने आपली नजर वर उचलली आणि दीनवाण्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहिले.

"देण्यासारखं काही असतं तर मी लपवून ठेवलं असतं असं वाटतं का तुला? तोल्गोनाई, तू मला ओळखतेस, मी तुझी शेजारीण आहे."

मी तिच्या विनवणीला बळी पडणार असे मला वाटले, पण मनाचा हिय्या करून सारी दया बाजूला ठेवली.

"मी इथं तुझी शेजारीण म्हणून आत्ता आलेले नाही, तुझ्या पथकाची प्रमुख म्हणून आले आहे!" तिचे बोलणे तोडून मी म्हटले. "लोकांसाठी मी हे धान्य घेऊन जातेय!" एवढे बोलून मी भट्टीकडे गेले आणि पोते उचलले.

आयेषाने तोंड फिरवले.

तिथे सुमारे पंधरा पौंड गहू होते. मला सगळे घ्यावेसे वाटले, पण तसे करायचा धीर झाला नाही. म्हणून मी निम्मे रिकाम्या भांड्यात ओतले.

"बघ आयेषा, मी फक्त निम्मे घेतेय. रागावू नकोस," मी म्हणाले.

तिने पुन्हा फिरून माझ्याकडे पाहिले. तिच्या चेहऱ्यावरून आसवे ओघळत होती. मला कसेसेच झाले आणि मी नावडतीने घराबाहेर पडले. खरेच, का मी ते पोते तसेच भरून ठेवले नाही? पण मी गोळा केलेल्या धान्याचे पुढे काय होणार होते हे मला काय ठाऊक?

एकूण दोन मोठी पोती धान्य गोळा झाले. आम्ही धान्य निवडून त्यातले तण काढून स्वच्छ धान्य बाजूला काढले. मी म्हणजे पोती शेतावर घेऊन गेले. मी आणखी एक दिवस थांबायला पाहिजे होते. शेताची कड अजून नांगरून व्हायची होती. आणि मी तर धान्य पेरायला अगदी अधीर झाले होते. उद्या आम्ही हाताने धान्य पेरायला लागणार होतो. सारी तयारी झाली होती: बियाणे होते आणि शेतही होते. मी ठरविल्याप्रमाणे सर्व काही पार पडत होते.

त्या दिवशी संध्याकाळी मी कामावरून परत घरी आले तेव्हा अस्वस्थ होते. दिवसा मी बेक्ताशला आणखी एका मुलाला दंताळी त्यांच्या छकड्यातून शेतावर न्यायला सांगितली होती. पण काही झाले तरी शेवटी मुले ती मुलेच. त्यांनी मी सांगितलेली कामगिरी पार पाडलीच असेल अशी मला खात्री वाटत नव्हती. म्हणून मी अलिमानला म्हणाले:

"मुलांच्या तिथं मी जाऊन येते. ती काय करताहेत ते मला पाहिलं पाहिजे."

मी घोड्यावर जीन टाकून निघाले.

खेड्याच्या वेशीपासून मी दौडायला सुरुवात केली, कारण संध्याकाळ झाली होती आणि अंधार पडू लागला होता. मी शेतावर गेले तेव्हा बैलांना अजून जोखडाखाली जुंपून ठेवलेले

मला दिसले. आजूबाजूला चिटपाखरू दिसत नव्हते. मी नांगरणी करणाऱ्यावर भयंकर चिडले. तसा तो पोरच होता, पण त्याने त्या मुक्या जनावरांना अजून जोखडात अडकवून ठेवल्याबद्दल मला अतिशय संताप आला होता. "थांब आता, हातात सापडला म्हणजे शिकवते तुला चांगली अद्दल," मी मनाशी म्हणाले. त्याचा शोध घ्यायला मी निघाले तर एकाएकी मला उलटलेला छकडा आणि दंताळी पडलेली दिसली. तिथेही जवळपास कुणी नव्हते.

"अरे पोरांनो! कुठं आहात तुम्ही? उत्तर द्या!" मी साद घातली.

काहीही आवाज आला नाही, कुणीही दिसले नाही. काय झाले होते त्यांना? गेले कुठे सारे? मी घाबरले. मी राहुटीपर्यंत घोड्यावरून दौडत गेले आणि खाली उडी मारली. काड्यापेटी पेटवली तेव्हा तिच्या उजेडात मला ती मुले राहुटीत जमिनीवर पडलेली दिसली. त्यांचे हातपाय बांधले होते, तोंडात बोळे कोंबले होते, बेदम मारहाण केलेली होती व ते रक्ताळले होते. मी घाईने बेक्ताशच्या तोंडातला बोळा उपसून काढला आणि ओरडून विचारले:

"बियाणे! बियाणे कुठं आहेत?" माझा आवाज एवढा चमत्कारिक झाला होता की, माझा मलाच ओळखू येत नव्हता.

"त्यांनी नेले! त्यांनी आम्हाला मारलं!" धाप टाकीत तो म्हणाला व ज्या दिशेने चोर पसार झाले होते तिकडे मानेचा झटका दिला.

त्यानंतर काय घडले ते मला आठवत नाही. त्या रात्री मी घोडा पिटाळला तसा कधीही पिटाळला नव्हता. रात्रीची

[illegible] होती, भयाण स्मशानासारखा अंधार होता इत्यादींची [illegible] पर्वा केली नाही. माझे स्वतःचे घर जळून खाक झाले [illegible] आणि लुटले गेले असते तर मी तोंडातून चकार शब्द [illegible] नसता. शरदाच्या दिवसात झोडपणीच्या खळ्यावरून [illegible] पोती धान्य चोरीला गेले असते तरी मी गप्प राहिले [illegible] कारण उंदिरसुद्धा आमचे धान्य चोरतात. पण हे [illegible] चोरल्याबद्दल, आमची पुढची भाकरी चोरल्याबद्दल [illegible] गुन्हेगारांची नुसत्या हातांनी मुंडी मुरगाळली असती.

मी चोरांचा जोरदार पाठलाग केला आणि लौकरच ते [illegible] नजरेला दिसले. त्यांच्या घोड्यांच्या खुरांमधून ठिणग्या [illegible] दिसत होत्या. चोरांच्या पुढ्यात पोती होती. ते [illegible]कडे निघाले होते.

मी त्यांना पाहताच ओरडून म्हटले :

"पोती खाली टाका, ते बियाणं आहे! पोती परत द्या, [illegible] बियाणं आहे! ते बियाणं आहे!"

मग त्यांनी मागे वळूनसुद्धा पाहिले नाही. मी त्यांच्या [illegible] जवळ जात होते. मग मी पाहिले की, एका बाजूचा [illegible] आमच्या राखी घोड्यावर स्वार झाला होता. मी [illegible] नावडतोब ओळखले. आमचा राखी घोडा मी [illegible] ओळखणार नाही असे कसे होईल? मी त्याची चाल ओळखली [illegible] त्याच्या मागच्या पायाच्या खुराजवळचे पांढरे [illegible] ओळखले. मग मी ओरडले :

"थांब! तू कोण आहेस ते मी ओळखलंय! तू [illegible]! तू जेनुशेनुकुल आहेस! आता तू माझ्या हातून [illegible] नाहीस! थांब!"

खरेच तो जेन्शेन्कुल होता. तो इतरांपासून बाजूला वळला आणि माझ्या दिशेला आला. अंधारात एक ज्योत पेटली व मोठा स्फोट झाला. मी खोगीरावरून खाली कोसळताना ती गोळी झाडली होती हे समजले. क्षणभर मला वाटले की, माझा घोडा अडखळून कोसळला.

मी शुद्धीवर आले तेव्हा माझ्या पाठीत बारिक दुखत असल्याची जाणीव झाली. डोक्यामधून रक्त वहात होते व मानेवरून ओघळून तेथे थंडगार थारोळे जमले होते. माझा घोडा धापा टाकीत अखेरचे आचके देत होता. तो अजून पाय झाडून उठून उभा रहायचा प्रयत्न करीत होता. मी त्याचा अखेरचा आचका ऐकला, जमिनीवर त्याचे डोके धाडकन आपटले आणि ते जनावर एकदम शांत झाले. सारेच स्तब्ध झाले, सबंध आयुष्यच जणू थांबले. अजिबात हालचाल न करता मी तिथे पडून होते. उठायचा साधा प्रयत्नही मी केला नाही. मला आता कशाचीच पर्वा वाटत नव्हती. माझ्या दृष्टीने आयुष्याला आता काहीच अर्थ राहिला नव्हता. स्वत:ची अखेर कशी करायची एवढा एकच विचार मनात घोळत होता. जवळच जर तुटलेला कडा असता तर मी सरपटत जाऊन त्याच्यावरून स्वत:ला खाली झोकून दिले असते. आता कुणाला मी तोंड दाखवू शकेन अशी कल्पनाही करवत नव्हती. आणि मग कापणी करणाऱ्याचा तो मार्ग मला आकाशात दिसला. आकाशगंगेचा तो फिकट दुधाळ पट्टा पाहताना मला आयेषाच्या गालांवरून ओघळलेल्या आसवांच्या धारा आठवल्या. मी गुडघ्यावर उठून उभी राहिले, नंतर सरळ ताठ पायांवर उभी राहिले व पुन्हा झोक जाऊन खाली

रडले. दुःखाने आणि वेदनेने हुंदके देत मी त्या अंधारात मोठ्यांदा ओरडत शिव्याशाप उच्चारू लागले.

"जेन्शेन्कुल, लढाईत सांडलेल्या रक्ताचा तुला तळतळाट लागो! मृतात्म्यांचा तुला शाप बाधो जेन्शेन्कुल! मगळ्या मुलांचा तुला शाप बाधो जेन्शेन्कुल!"

शरीरातली ताकद संपेपर्यंत मी हुंदके देत राहिले आणि ओरडत राहिले.

बराच वेळ निघून गेला. मग मला पावलांचा आवाज ऐकू आला. कुणीतरी हाक मारीत होते :

"तोल्गोनाई मावशी, तुम्ही कुठं आहात? तोल्गोनाई मावशी ऽऽ!"

मी बेक्ताशचा आवाज ओळखला आणि त्याला हाक मारली. बेक्ताश धावत माझ्याजवळ आला तेव्हा त्याला धाप लागली होती. तो गुडघ्यावर चटकन खाली बसला आणि त्याने माझे डोके वर उचलले.

"तोल्गोनाई मावशी काय झालं? तुम्हाला जखम झालीय काय?"

"नाही, नुसतं खरचटलंय मला," मी त्याला दिलासा देत म्हटले. "गोळीनं माझा घोडा मेला."

"ठीक आहे, तेवढ्यावरच निभावलं. चला मी तुम्हाला मदत करतो," तो अधिक आनंदाच्या सुरात म्हणाला. पुढे तो बोलला: "घोड्याचं मांस उपयोगी पडेल. आपण ते लोकांमध्ये वाटू या."

मुलांनी आपल्या छकड्यातून मला घरी आणले. पाठीतल्या वेदनेने तीन दिवस मी अंथरुणाला खिळून होते.

अजूनही हवा खराब असली की, पाठ दुखते. माझ्या प्रकृतीची विचारपूस करायला खूप माणसे घरी येऊन गेली. मला भेटायला आल्याबद्दल तर मी त्यांची आभारी आहेच, पण झाल्या प्रकाराबद्दल एका शब्दाने कुणी मला बोल लावला नाही, कुणीही काहीही म्हणाले नाही, जणू काही घडलेच नाही असे सर्वांनी भासवले त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. कदाचित मला किती वाईट वाटले होते ते त्यांनी जाणले. आमचे सारे श्रम कसे वाया गेले, शेतांमध्ये पेरणी कशी झाली नाही आणि रडणाऱ्या मुलांच्या तोंडचा घास काढून मी गोळा केलेले धान्य त्या दुष्ट दरोडेखोरांचे कसे भक्ष्य बनले, याची जेव्हा जेव्हा आठवण येते तेव्हा तेव्हा माझ्या काळजातून एक जबरदस्त वेदना आरपार घुसून जाते व डोळ्यांपुढे अंधेरी येते.

१०

"तोल्गोनाई, केवळ तुलाच नव्हे तर मलाही, या धरणीलाही, ही वेदना जाणवली. सबंध उन्हाळाभर उघडेबोडके पडलेले ते मैदान म्हणजे एक ठसठसणारी जखम होती. ही वेदना फार काळ राहिली. तोल्गोनाई, माझी शेतं उघडीबोडकी टाकण्याहून अधिक मोठी यातना दुसरी कोणतीही नाही. लढाईमुळं किती शेतं ओसाड पडली! लढाया सुरू करणारे माझे सर्वांत कट्टर शत्रू आहेत."

"तुझं बरोबर आहे धरतीमाते. माझ्या मुलानं — मासेलबेकनं — असंच लिहिलं नव्हतं का? हे धरती, तुला मासेलबेकचे पत्र आठवतं?"

"होय तोल्गोनाई."

"होय आपणा दोघींनाही आठवतंय. धरतीमाते, आज आठवणी काढण्याचा दिवस आहे. जे जे घडलं ते सारं आज आपण आठवू या."

"जरूर आठवू या तोल्गोनाई. मासेलबेक केवळ तुझाच मुलगा नव्हता, माझाही होता, या धरतीचा पुत्र होता. तोल्गोनाई, त्याच्या पत्राबद्दल मला पुन्हा एकदा सांग."

११

जेव्हा लोक मला भेटायला येत तेव्हा जे काही घडले त्याचा उल्लेख न करता दुसऱ्याच गोष्टी बोलत. जगातल्या ताज्या बातम्यांसंबंधी बोलत, आपल्या कामासंबंधी बोलत, हवापाण्याच्या गप्पा करीत. माझ्याबद्दलच्या दयेमुळे ते तसे वागत असावेत असे मला वाटे. पण त्यामागे दुसरे कारण होते. ते काय असावे हे नंतर मी ताडले. पण माझ्यापुढे काय वाढून ठेवले आहे ते त्या सर्वांना ठाऊक होते.

आयेषा मला भेटायला आली तेव्हा कपभर सायीचे दूध घेऊन आली. तिला पाहताच मला कमालीची शरम वाटली. काय बोलावे ते न समजून मी तशीच मुकाट बिछान्यावर बसून राहिले. तीच प्रथम बोलली.

"तोल्गोनाई, जे काही घडलं त्याचा आता विचार करून स्वतःला उगीच त्रास करून घेऊ नको. आणि माझ्या दुबळेपणाबद्दल मला क्षमा कर. मी तुझ्यावर रागवले नाही.

गरज पडली तर माझं सारं आयुष्य मी तुला देईन. आपल्या दोघींना मदत करण्याएवढा माझा बेक्ताश आता मोठा झालाय. तुला माहीत आहे तोल्गोनाई, माझ्यापेक्षा तुझ्यावर त्याचं जास्त प्रेम आहे. मला आनंद वाटतो याचा. याचा अर्थ तो मोठा झाल्यावर चांगला शहाणा, विचारी माणूस होईल."

"आयेषा, तुझ्या चांगुलपणाची मी कशी उतराई होऊ," मी पुटपुटले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मला अधिक बरे वाटले तेव्हा मी थोडी अंगणात गेले. पण मला ताबडतोब दम लागला. मी खिडकीखाली ऊन खायला जाऊन बसले. अलिमान अंगणात कपडे धूत होती. मी तिला कामावर जायला सांगितले, पण ती म्हणाली की, माझी देखभाल करायला आजच्या दिवस तिला घरीच रहायला अध्यक्षानी सांगितले होते.

त्या वसंतामध्ये सुवानकुलने लावलेले मोठे जुने सफरचंदाचे झाड खूप बहरले. त्याला एवढा प्रचंड बहर आला होता की, जणू काही त्याला पुन्हा जोम आला होता, पुन्हा तारुण्य लाभले होते. फळबागांना बहर येतो तेव्हा वातावरण कमालीचे स्वच्छ असते आणि दूरचे अंतरही नजरेला जवळ भासते. मी माझ्याच कौतुकात तेथे बसून होते, एवढ्यात दुरून आमचा पोस्टमन, म्हातारा तेमिरचाल, येत असताना दिसला. त्याने माझी विचारपूस केली. पण जणू खूप घाईत असल्यासारखा चमत्कारिक वागला. तो सारखा खोकत राहिला आणि गेला आठवडाभर थंडी बाधल्याने आजारी पडल्याची तक्रार करीत राहिला. ताप गेला तरी कफ-

बोकल्याने पिच्छा सोडला नाही म्हणून कुरकुरत होता. मग एकदम सहज जाता जाता बोलावे तसे म्हणाला:

"मला वाटतं, तुमचं पत्र आहे." असे बोलून त्याने खिशातून पत्र काढले.

त्याच्या या तिऱ्हाईत वागण्याने मी दुखावले.

"मग सरळ का सांगत नाही? कुणाकडून आलंय?"

"मला वाटतं मासेलबेककडून," तो पुटपुटला.

माझ्या आनंदाच्या भरात ते पत्र नेहमीप्रमाणे सैनिकाचे त्रिकोणी पाकीट नाही हे माझ्या ध्यानात आले नाही. उलट हा पांढरा जाड लखोटा होता आणि त्यावरचे शब्द टाईप केलेले होते. आमचा शेजारी बेक्तुरसुन कुबड्यांवरून लंगडत तेथे आला. तो युद्धात अपंग बनला होता. त्याचा दुखरा पाय फार वाईट स्थितीत असावा, कारण त्याला जेमतेम लंगडत चालता येत होते. काही वेळा आमच्या घरी येऊन तो गप्पा मारीत बसत असे. बेक्तुरसुनने आम्हाला नमस्कार केला आणि पाकीट घेतले. ते मासेलबेककडून आले असल्याचे तो म्हणाला.

"तुझे हात का कापताहेत? तिथं कुबड्या धरून उभा राहू नको, खाली बैस आणि वाच माझ्यासाठी," मी म्हणाले.

खाली बसताना त्याला अडचण होत होती, कारण त्याला पाय वाकवता येत नव्हता. बेक्तुरसुनने थरथरत्या बोटांनी पाकीट उघडले व वाचायला सुरुवात केली. माझ्या लाडक्या मुला, अगदी पहिल्या शब्दांपासून मला सारे काही समजले.

त्याने लिहिले होते, "माझ्या प्रिय अम्मी, काही काळ उलटून गेल्यानंतर एक दिवस तू मला समजून घेशील, मी जे

केले ते योग्य होते अशी तुझी खात्री पटेल. माझी खात्री आहे की, तुझा मुलगा प्रामाणिकपणे वागला असेच तू म्हणशील. आणि तरीही, जरी तू समजून घेतलेस तरी कुठेतरी खोलवर तुझ्या अंत:करणात तू मला न बोललेले शब्द उमटत राहतील: 'माझ्या मुला, हे सुंदर प्रकाशमय जग तू एवढ्या सहज कसा सोडून गेलास? कशाला मी तुला जन्म दिला, कशाला मी तुला लहानाचा मोठा केला?' खरेच अम्मी, तू एक माता आहेस आणि असे उत्तर मागायचा तुला अधिकार आहे. पण इतिहास एक दिवस तुझ्या प्रश्नांना उत्तरे देईल. मी आत्ता एवढेच म्हणू शकतो की, हे युद्ध काही आम्ही मागून घेतले नाही आणि आम्ही ते सुरू केले नाही. ही आम्हा सर्वांवर, सर्व लोकांवर महाभयंकर आपत्ती आहे. या राक्षसाला चिरडून त्याचा नाश करण्यासाठी आम्हाला रक्त सांडले पाहिजे आणि प्राणांची आहुती दिली पाहिजे. जर आम्ही असे वागलो नाही, तर माणूस या संज्ञेला आम्ही पात्र ठरणार नाही. लष्करी वीर होण्याची मी कधीही स्वप्ने पाहिली नाही. एका अत्यंत नेमस्त व्यवसायासाठी मी अभ्यास करीत होतो, मला शिक्षक व्हायचे होते. खरंच, शिक्षक व्हायची मला किती इच्छा होती! पण हातात खडूऐवजी मला बंदुक धरावी लागली आणि सैनिक बनावे लागले. मला याचा दोष लागत नाही. ज्या काळात आम्ही राहतो त्याचा दोष आहे. मुलांना एकही धडा शिकवायची मला संधी मिळाली नाही.

"आणखी एका तासानंतर मी माझ्या देशासाठी एका कामगिरीवर जायला निघेन. मी जिवंत परत येईन असे मला वाटत नाही. आगामी चढाईत माझ्या अनेक बांधवांचे प्राण

वाचविण्यासाठी मी तेथे जात आहे. माझ्या लोकांसाठी, जेवण्यासाठी, माणसामध्ये जे जे काही सुंदर आहे त्या सर्वांसाठी मी तेथे जात आहे.

"हे माझे शेवटचे पत्र आणि हे माझे शेवटचे शब्द. अरे अम्मी! होय, मी तुझ्या नावाचा पुनरुच्चार करतो अम्मा. हजार वेळा करतो आणि तरीही मी तुझ्या ऋणातून कधीही मुक्त होणार नाही. तुला जे दुःख मी देतोय त्याबद्दल मला माफ कर. पण हा अविचारी त्याग नाही हे तू समजून घ्यावेस अशी माझी इच्छा आहे. तसे मुळीच नाही. आयुष्याने मला हे असे जगायला शिकवले. मी स्वेच्छेने आणि पूर्ण विचाराने जात आहे. सगळ्या लोकांसाठी हे सर्वांत महान् कर्तव्य बजावताना मला अभिमान वाटतोय.

"रडू नको अम्मी. मला कुणीही रडायला नकोय. अशा वेळी कुणीही रडू नये.

"मला माफ कर अम्मी, माझा अखेरचा दंडवत.

"माझ्या अला-तोहो पर्वतांनो, अखेरचा दंडवत! तुमच्यावर मी प्राणांपलिकडं प्रेम केलं!

"तुझा मुलगा, लेफ्टनंट मासेलबेक सुवानकुलोव, शिक्षक.

"९ मार्च १९४३ रोजी आघाडीवर मध्यरात्री लिहिले."

स्वप्नातून उठल्याप्रमाणे मी जड झालेले माझे डोके वर उचलले. अंगणात लोकांचा जमाव शांतपणे उभा होता. कुणीही रडले नाही. आम्ही रडू नये असे मासेलबेकने म्हटले होते. बायकांनी मला उभे केले. मी उभी राहिले त्यावेळी वाऱ्याच्या झोताने सफरचंदाचे झाड गदगदा हलवले आणि जमिनीवर पांढऱ्या पाकळ्यांचा सडा पडला. त्या आमच्या

माथ्यांवर मुकाट पडत होत्या. आमच्या पांढऱ्या सफरचंदाच्या झाडापल्याड, दूरच्या पर्वताच्या पांढऱ्या शिखरांपल्याड स्वच्छ निळे आकाश विस्तीर्ण पसरले होते. एक जबरदस्त किंकाळी माझ्या अंतरात घुमत होती. साऱ्या जगाने ऐकावी अशी प्रचंड किंकाळी फोडण्याची मला इच्छा होत होती. पण मी गप्प होते. मी माझ्या मुलाची शेवटची इच्छा पुरी करणार होते, मी रडू नये असे त्याने मागणे मागितले होते. अलिमान काय करीत होती मला ठाऊक नव्हते. दोन्ही हात पसरून ती माझ्याकडे येत असलेली मी पाहिली. ती खूप जवळ आली, माझ्या डोळ्यात तिने पाहिले आणि एकदम वळून दोन्ही हातांनी तोंड झाकून घेऊन तिथून चालत गेली.

माझा मधला मुलगा मी असा गमावला. त्याची टोपी तेवढी माझ्याजवळ शिल्लक राहिली.

१२

"पण तोल्गोनाई, त्याचं नाव माझ्यापाशी आहे. मी त्याची मायभूमी. तोल्गोनाई, लोकांजवळ त्याचे शब्द आहेत. ते त्याचे देशबांधव."

"होय धरतीमाते, हे खरं आहे. आता आमच्या सामुदायिक शेताला त्याचं नाव दिलेलं आहे. मासेलबेकच्या सहकाऱ्यांनी त्याचं अखेरचं पत्र खेड्यातल्या पंचायती कडे एका पत्राबरोबर पाठवलं. त्यांनी लिहिलं होतं की, आपल्या कॉम्रेडला ते कधीही विसरणार नाहीत, त्याच्या शूर कृत्याचा

त्यांना नेहमी अभिमान वाटत राहील आणि आपला देश नेहमी त्याची आठवण ठेवील. त्यांनी लिहिलं होतं की, मोठ्या लढाईच्या आधी मासेलबेकनं शत्रूचं दारूचं कोठार उडवून टाकलं होतं. त्या स्फोटानं भोवतालचा कित्येक मैल भाग पूर्ण नष्ट झाला. त्या वीरांच्या आणि माझ्या मुलाच्या- मासेलबेकच्या–शौर्यापुढं मी नतमस्तक आहे. त्यांच्या गौरवाचा मला अभिमान वाटतो. पण जगातला कोणताही गौरव, कोणतीही गोष्ट त्याची जागा घेऊ शकत नाही. कुणाही आईला विचारा, तिला हा असला गौरव नको असतो. माता आपली मुलं या जगात जगावी म्हणून जन्माला घालतात, जीवनातला आनंद त्यांना लाभावा म्हणून मुलांना जन्म देतात."

"तोल्गोनाई, तुझं बरोबर आहे. विजयाचा तो वसंत ऋतू मी कधीही विसरणार नाही. लढाईवरून परतणाऱ्या आपल्या सैनिकांचं लोकांनी केलेलं प्रचंड स्वागत माझ्या नेहमी लक्षात राहील. त्यावेळी आनंद अधिक होता का दुःख अधिक होतं हे मला सांगता येणार नाही तोल्गोनाई."

१३

शेतावरचा नांगर आमच्या बागेत वापरायची त्या दिवशी आमची पाळी होती. आम्ही नुकते कुठे काम संपवत होतो, तेवढ्यात रस्त्यात एकदम खूप गोंधळ चाललेला ऐकू आला. हे कसली गडबड चालली आहे ते पाहण्यासाठी अलिमान धावत गेली. झटक्यात ती परत आली.

"अम्मी, लौकर चला!" ती आग्रहाने म्हणाली. "लोक सैनिकांना भेटायला चाललेत!"

आम्ही नांगर आणि जोखडाला जुंपलेले बैल तसेच शेताच्या मध्ये सोडले. खरेच, सारे खेडे, घोडयावरून आणि पायी, वाकलेले म्हातारे-म्हाताऱ्या, मुले आणि कुबडया घेतलेले अपंग जवान असे सारेजण एकाच दिशेने धावत होते. घाईघाईने जाताना लोक एकमेकांना बातमी सांगत होते. कुणी एका वाटेने जाणाऱ्या माणसाने (तो झारेच्येचा होता म्हणतात) कुणाला तरी सांगितले की, सैनिक घरी परतायला लागले आहेत, दोन फौजी गाडया स्टेशनात आल्यात, खेडयातले तरुण त्यात आहेत, ते एव्हांना गावाच्या वाटेने निघालेत आणि तासाभरात गावात पोचतील. हे खरे किंवा खोटे याची कुणीही विचारणा केली नाही. हे खरेच असावे अशी लोकांची इच्छा होती, या दिवसाची ते खूप काळ वाट पहात होते आणि म्हणून कुणालाही कसलेही संशय नव्हते.

लढाईच्या जरा आधी नवा रस्ता बांधायला जेथे सुरुवात केली होती तेथे गावाच्या टोकाला आम्ही धावलो. घोडे-स्वार खाली उतरले नाही, पायी चालणारे पाण्याच्या कालव्याजवळच्या टेकाडावर चढले, अर्धवट बांधलेल्या भिंतींच्या अवशेषांवर मुले चढून बसली आणि काही जवळच्या झाडांवर चढून बसली. प्रत्येकजण रस्त्याकडे टक लावून वाट पहात बसला. काहीजण घाईमध्ये एकमेकाला अडवीत आदल्या रात्रीच्या आनंदी स्वप्नांबद्दल बोलत होते; काहींनी मूठभर छोटे गोटे जमवून त्यांच्या साह्याने भविष्य सांगायला सुरुवात केली. त्या स्वप्नांमध्ये आणि भविष्यकथनांमध्ये, इतर शकुनांमध्ये

लोकांना फक्त चांगल्या गोष्टीच दिसत होत्या. आपल्या सर्व आशा, आकांक्षा पुऱ्या झालेल्या दिसत होत्या. मला हे आठवते तेव्हा मनात विचार येतो की, आम्ही ज्याप्रमाणे वाट पहात थांबलो आणि प्रेम केले त्याप्रमाणे जगभरच्या लोकांनी आपल्या मुलांची, भावांची, बापांची आणि नवऱ्यांची वाट पाहिली असती व त्यांच्यावर प्रेम केले असते, तर कदाचित या पृथ्वीवर आणखी युद्ध कधी झालेच नसते.

जमावातली बडबड काही वेळा थांबायची तेव्हा लोक खाली माना घालून आपल्या विचारांमध्ये बुडून जायचे. आपल्या नशिबाची पारख करून घ्यायला ते थांबले होते. प्रत्येकजण स्वतःला विचारीत होता: कोण परत येईल, कोण येणार नाही? वाट बघितल्याचे फळ कुणाला मिळेल आणि कुणाला नाही? आयुष्य आणि भविष्यकाळ या प्रश्नांच्या उत्तरांवर अवलंबून होते.

अशा एका क्षणाला झाडाच्या शेंड्यावरच्या एका मुलाने अचानक आरोळी ठोकली: "ते येताहेत!" प्रत्येकजण गोठल्यासारखा झाला, कोमुझ वाद्याच्या तारांसारखा ताठला. मग त्या साऱ्यांनी तोच आवाज एकसुरात पुन्हा उमटवला: "ते येताहेत!" पुन्हा एकदा ते सारे वाट पहात गप्प झाले, पुन्हा सारे काही स्तब्ध झाले. अगदी पूर्णतया स्तब्ध. पण मग एकदमच त्यांनी ओरडायला सुरुवात केली: "कुठे आहेत? कुठे आहेत ते?" आणि पुन्हा ते गप्प झाले. रस्त्यावर एक गाडी येताना दिसू लागली. रस्त्याला फाटा फुटत होता तिथे ती खडखडत येऊन उभी राहिली. तिथून आमच्या गावची पायवाट फुटत होती. एका सैनिकाने गाडीतून

खाली उडी मारली. त्याने आपला सैनिकी कोट व पिशवी उचलली, गाडीवानाला रामराम केला आणि तो आमच्या दिशेने यायला निघाला.

जमावातल्या एकाही माणसाने एकही शब्द उच्चारला नाही. तो एकटा एक सैनिक आपला सैनिकी कोट हातावर टाकून आणि खांद्याला पिशवी लटकावून त्या रस्त्यावरून एकटाच येत होता आणि सारेजण गप्प राहून त्याच्याकडे एकटक पहात होते. तो अधिक जवळ येत होता, पण कुणीही जागचे हलले नाही. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बावरलेपण होते. आम्ही सारे चमत्कार घडण्याची वाट पहात होतो. आमचा आमच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता, कारण आम्ही एकाची नव्हे, अनेकांची वाट पहात होतो.

तो सैनिक अधिकाधिक जवळ येत होता. नंतर तोही घुटमळून थांबला, कारण खेड्याच्या वेशीवर माणसांचा गप्प जमाव उभा असलेला पाहून तोही गोंधळला होता. कदाचित तो विचार करीत असावा: कोण हे लोक? का ते गप्प आहेत? कशासाठी ते तिथे उभे आहेत? ते कुणाची वाट पाहताहेत का? त्या सैनिकाने अनेक वेळा रस्त्यावर मागे वळून पाहिले, पण त्याच्याशिवाय त्या रस्त्यावर चिटपाखरू नव्हते. तो आमच्या दिशेने निघाला, पुन्हा थांबला आणि त्याने पुन्हा मागे वळून पाहिले. जमावाच्या पुढे असलेली एक अनवाणी मुलगी अचानक ओरडली:

"तो माझा भाऊ आहे! अशीरअली! अशीरअली!" आणि डोक्यावरचा रुमाल खाली खेचून ती तडक त्याच्याकडे धावत सुटली.

तिने त्याला कसे ओळखले हे एक देवाला ठाऊक, पण तिच्या त्या ओरडण्याने आम्ही सारे भानावर आलो. अगदी लहान मुले आणि मुली तिच्या पाठोपाठ नंतर धावल्या.

"अशीरअली! तोच तो!" इतर ओरडले आणि नंतर लहानथोर सारेच त्या सैनिकाकडे धावले.

कुठल्यातरी महान् शक्तीने आम्हा सर्वांना भारले आणि आपल्या पंखांवरून आम्हाला वाहून नेले. त्या सैनिकाकडे हात पसरून आम्ही धावलो तेव्हा जणू आमची आयुष्ये आम्ही त्याच्याकडे घेऊन धावलो, ज्या यातनांमधून आम्ही गेलो होतो त्या यातना, अनंत काळपर्यंत वाट पाहण्याचा सोसलेला छळवाद, आमच्या झोपेविना गेलेल्या रात्री, आमचे पांढरे झालेले केस, म्हाताऱ्या बनलेल्या आमच्या तरुण मुली, आमच्या विधवा, आमची अनाथ बनलेली मुले, आमचे अश्रू आणि आमचा शोक, आमचा धीर—या सर्व गोष्टी आम्ही त्या विजयी सैनिकाकडे घेऊन धावलो. आणि आम्ही त्याच्या स्वागताला आलो आहोत याची अचानक जाणीव होताच तोही धावू लागला.

त्या गर्दीमधून धावत असताना मला अचानक जाणवले की, फौजी आगगाडी धडाडत समोरून चालली आहे; वारा माझ्या तोंडावर झोंबतोय आणि मला हाक ऐकू येतेय: "अम्मी ऽऽऽ! अलिमा ऽऽऽ न!" आणि चाकांचा खडखडाट माझ्या कानात घुमत राहिला.

घोडेस्वार पहिल्या प्रथम सैनिकापर्यंत पोचले. त्यांनी त्याचा सैनिकी कोट व पिशवी झडप घालून उचलून घेतली आणि त्याचे दोन्ही हात आपल्या हातांमध्ये गच्च पकडून घेतले.

हे विजयश्री! तुझी आम्ही किती काळपर्यंत वाट पाहत होतो! विजयश्री, तुझा गौरव असो! आमच्या अश्रूंना क्षमा कर! अशीरअलीच्या छातीवर डोके आपटून आणि त्याचे खांदे गदगदा हलवून "तो कुठे आहे? माझा कासीम कुठे आहे?" असा आक्रोश केल्याबद्दल माझ्या सुनेला—अलिमानला —क्षमा कर. हे विजयश्री, आम्हा सर्वांना क्षमा कर. आम्ही तुझ्यासाठी खूप त्याग केला. "दुसरे कुठं आहेत? माझा मुलगा कुठं आहे? माझा बाळ कुठं आहे? इतर सगळे कुठं आहेत? ते घरी केव्हा येणार?" अशा आमच्या आक्रोशाला क्षमा कर. आणि "माझ्या मित्रांनो, ते परत येतील, ते सारे घरी परत येतील. लौकरच ते घरी येतील. उद्याच परत येतील," असे बोलल्याबद्दल सैनिक अशीरअलीला क्षमा कर. हे विजयश्री, आम्हाला क्षमा कर, क्षमा कर. अशीरअलीला मिठी मारून मी त्याचे चुंबन घेतले तेव्हा माझ्या मनात जयनाक, मासेलबेक, कासीम आणि सुवानकुल यांचा विचार होता. ते कधीच परत येणार नाहीत. त्यांच्यापैकी कुणीच कधी परत येणार नाही. विजयश्री, मला क्षमा कर.

आम्ही मुकाट राहून चालत होतो. मधून मधून अलिमान जोरात हुंदका द्यायची आणि जणू गुदमरल्याप्रमाणे मोठा उसासा टाकायची. तिच्या चेहऱ्यावर केविलवाणा भाव पसरला होता. नजर जमिनीवर खिळली होती, मान खाली झुकली होती, स्वतःच्याच विचारांमध्ये ती हरवली होती. तिला घेरणारे विचार मी समजू शकत होते. अलिमान कमालीची निराश झाली होती. तिच्या चेहऱ्यावरून, तिच्या डहुळलेल्या नजरेवरून, ज्या प्रकारे ती ओठ चावत होती त्यावरून मला

तिची मनाची अवस्था समजत होती. ती कसला विचार करीत होती ते मला समजत होते. तिला उद्देशून मी स्वत:शीच म्हणाले: "माझ्या लाडक्या सुने, आपण वेगळ्या वाटांना जाण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपली आहे. कासीमची आठवण कायमची तू गाडून टाकली आहेस. तू तरी दुसरं काय करणार? मेलेल्यामागं थडग्यात तर जाता येत नाही; तू जन्मभर विधवा म्हणूनही जगू शकत नाहीस. आता सारं काही संपलंय. तू आता सोडून जाशील. आता त्याबाबत काही करता येण्यासारखं राहिलं नाही, तू आता नक्की सोडून जाशील. त्याबद्दल मी तुला दोषी धरत नाही. तुझी इच्छा आहे म्हणून तू चाललेली नाहीस, ही काही एकाएकी डोक्यात आलेली लहर नाही. हे नशीब आहे. हाय रे दैवा! अलिमान, तुला निरोप देणं किती कठीण वाटतंय हे तुला समजलं असतं तर! आपण दोघी मायलेकीसारख्या एकमेकींशी वागलो. जेव्हा तू जायला निघशील तेव्हा माझ्या लेकीला द्यावा तसा मी तुला आशीर्वाद देईन आणि तुझ्या सुखासाठी देवाजवळ प्रार्थना करीन. सारं आयुष्य अजून तुझ्यापुढं आहे, तू तरुण आहेस, सुंदर आहेस आणि तुला कुणीतरी चांगला मुलगा भेटेल. चांगला सज्जन माणूस शोधणं ही महत्त्वाची गोष्ट आहे. तुझ्या अंत:करणात कासीमला जी जागा आहे ती जागा तो घेईल का? कुणास ठाऊक? मी कोणत्याच बाजूनं तुला मदत करू शकत नाही. तू गेल्यानंतर माझी अधूनमधून आठवण ठेव एवढं एकच मागणं तुझ्याजवळ आहे. तुझ्याशिवाय आता माझं असं कुणीच राहिलं नाही. आता घरात मी फक्त एकटी राहीन. या अफाट जगात

अगदी एकटी! याचा नुसता विचारही थरकाप उडवतो. आणि माझ्या म्हातारपणाला सांत्वना द्यायलाही काही नाही, मला नातवंड द्यायला तुला अवसरच मिळाला नाही. कदाचित तुझ्या दृष्टीनं हे बरंच आहे. पण माझ्याकडं लक्ष देऊ नको. शेवटी माझ्यासारख्या म्हातारीसाठी तू तुझं तारुण्य का म्हणून वाया घालवावं? मी माझं आयुष्य पुरेपूर जगले. तुझं अजून तुला पुढं जगायचंय. तू जेव्हा जायचं ठरवशील तेव्हा मला तेवढं सांग. कोणत्याही वेळी जायला तू मोकळी आहेस. स्वच्छ मनानं तू जावंस अशी माझी इच्छा आहे. मी तुझी नेहमी आठवण ठेवीन, तुझ्यावर प्रेम करीन आणि तुझ्याशी कृतज्ञ राहीन."

हे सारे विचार मनात घोळवीत मी चालले होते, शब्दांमध्ये त्यांना मांडण्यासाठी धीर गोळा करीत होते. मी कसला विचार करते आहे ते अलिमानला समजले. माणसे जेव्हा एकमेकांच्या खूप जवळ येतात तेव्हा एका नजरेत ती एकमेकांना समजतात. आणि तरीही ती जे काही बोलली त्याची मला अपेक्षा नव्हती.

त्या ओसाड रस्त्यावरून आम्ही चाललो होतो. दुर्दैवाने अलिमान आणि कासीमच्या पूर्वीच्या प्लॉटकडे माझी नजर गेली. पाच वर्षांपूर्वी होता तसाच तेथे अजूनही दगडांचा प्रचंड ढीग पडला होता, पण विटांचा मात्र केव्हाच भुगा झाला होता. लढाई सुरू होताच अर्धवट बांधलेला तो रस्ता तसाच सोडून दिलेला होता. दर उन्हाळ्यात नवे तण उगवत होते. काही ठिकाणी भिंती खचून कोसळल्या होत्या, घरांच्या आतमध्ये खाजकुयली उगवल्या होत्या आणि खिडक्यांच्या

मनाड उघडया भोकांमधून बाहेर डोकावत होत्या. शरदामध्ये इथं लोळण्याला बांधलेली वासरे चरत, तर पक्षी कळवळून आर्त साद घालीत. तुरेवाले पक्षी त्या स्मशानशांततेचा आसरा घेत. थडग्यांवर बसल्याप्रमाणे त्या घरांच्या अवशेषांवर ते बसत आणि वसंतामधल्या त्या उबदार वातावरणात न्हाऊन निघताना एकमेकांना मूक, शोकभरी साद घालीत.

त्या पोकळीकडे पहात मी स्वतःशी म्हणाले: "इथं रहायची इच्छा असलेल्या लोकांचं काय झालं? आपल्या शेकोटया पेटवून या घरांना ऊब आणायची इच्छा होती त्यांना काय झालं? बिचाऱ्या माझ्या कासीमच्या नशीबातही त्याचं पहिलं घर इथं बांधण्याचं नव्हतं!" माझे अंतःकरण उदास आणि दुःखी होते. अलिमानने माझा हात पकडला आणि प्रेमळपणे ती हसली.

ती म्हणाली: "अम्मी, तुम्ही एवढया निराश का? आयुष्यावरचा सारा विश्वास गमावलात? असं करू नका अम्मी. हे किती अवघड आहे त्याची मला कल्पना आहे. पण तुम्ही खंबीर आहात. तुम्ही..." ती घुटमळली. तिला पुढे काहीतरी बोलायचे होते. पण नंतर विचार बदलून ती अपराधी चेहऱ्याने हसली. "तुम्ही इतक्या चांगल्या आहात. चला, आपण या टेकाडावर बसून थोडं बोलू या."

"आता ती जाणार आहे हे सांगेल," मी स्वतःशी विचार केला. तिच्या आणि माझ्या स्वतःबद्दलच्या अनुकंपेची एक पेटती लाट मनात जोरात उमटून गेली आणि माझा कापरा आवाज सावरीत मी म्हटले.

"ठीक आहे. आपण इथं बसून बोलू या."

रस्त्याच्या कडेच्या एका ढिगाऱ्याशी आम्ही थांबलो. तिथे आम्ही दोघीच थांबलो. एक आई आणि तिची सून आपले भवितव्य ठरविण्यासाठी आणि पुढे कसे जगायचे ते ठरविण्यासाठी तेथे थांबल्या.

अलिमानने नजर जमिनीवर खिळवली आणि एक मोठा उसासा टाकला. नंतर ती म्हणाली:

"अम्मी, ही क्रूर लढाई संपलीय. यापुढं आपण काय करायचं याचा बहुधा तुम्ही विचार करीत असाल." ती गप्प राहिली. मीही गप्प होते. अलिमानने नजर वर केली आणि माझ्याकडे अगदी मोकळेपणाने व गंभीर नजरेने पाहिले. खिन्न हसून ती म्हणाली, "अम्मी, अशा कष्टी होऊ नका. आपल्या वाट्याला खिनभरसुद्धा आनंद राहिला नाही असं तुम्हाला वाटतं का? आपल्या चार पुरुषांपैकी एकही परत येणार नाही असं मला वाटत नाही. थांबा अम्मी, मला मध्येच अडवू नका. मला काय म्हणायचंय ते ऐका. तुमचं सांत्वन करण्यासाठी मी हे बोलत नाही. पण मी स्वत:ची कधीही फसवणूक करणार नाही. माझ्यावर विश्वास ठेवा अम्मी, जयनाक परत येईल असं माझं अंत:करण मला सांगतंय. कारवाईत बेपत्ता याचा अर्थ तो जिवंत आहे. त्याला मरताना कुणीच पाहिलेलं नाही. कदाचित तो कैद झाला असेल किंवा आपल्या गनिमी सैनिकांबरोबर जंगलात लढत असेल आणि तो आता अचानक परत येईल. किंवा कदाचित तो जबरदस्त घायाळ झाला असेल आणि म्हणून आपल्याला पत्र लिहू शकत नसेल. काहीही घडू शकेल. तुम्ही बघाल, एक दिवस अचानक तो कुठूनतरी उगवेल.

अम्मी, आपण त्याची वाट पाहू या. त्याला एवढ्यात गाडून टाकण्याची घाई करू नका. तुम्हाला अशा अनेक गोष्टी घडलेल्या माहीत आहेत, कारवाईत केवळ बेपत्ता झाले असे न म्हणता अधिकृतपणे मरण पावले म्हणून जाहीर झालेले कितीतरी लोक घरी धडधाकटपणे परत आले आहेत. एवढंच कशाला, आपल्या शेजारच्या खेड्यात आणि कक्षाकांच्या शिवळ्या खोऱ्यात त्यांनी मर्तिकाची जेवणंही घातली आणि नंतर मेलेले जिवंत ठरून परत आले. आपला जयनाक जिवंत आहे आणि लौकरच तो परत घरी येईल अशी माझी भावना आहे, अशी माझी खात्री झाली आहे. चार पुरुषांपैकी एकही मरणणार नाही, असं होणं शक्य नाही. अम्मी, आपण आणखी थोडं थांबू या. आपण एवढं थांबलोय, तसं आणखी थोडं थांबू या. माझ्याबद्दल चिंता करू नका. जर आजपर्यंत मी तुमची सून म्हणून राहिले असले, तर आता यापुढं मी तुमच्या मार्‍या मुलांची जागा घेईन."

अलिमान गप्प होती. खूप वेळपर्यंत आम्ही तशाच गप्प बसून होतो. मे महिन्याच्या मध्यावरचे ते दिवस होते. दूर दूर अंतरावर पांढऱ्या ढगांचे पुंजके एकत्रित होऊन त्यांचे पावसाच्या काळ्या ढगात रूपांतर होत होते. जणू त्या पांढऱ्या ढगांमध्ये काळा धूर भरला जात आहे असा भास होत होता. विजांचा कडकडाट होत होता. पावसाचा थंडगार गंध आमच्यापर्यंत येऊन पोचला. नंतर त्या दूर क्षितिजावर पडणाऱ्या झिमझिम पावसाचे एकदम मुसळधार पावसात रूपांतर झाले. त्या धो धो कोसळणाऱ्या पावसाच्या धारा उन्हात चमकत होत्या, अदृश्यपणे झपाट्याने धरतीवरून पुढे

सरकत येत होत्या. आत्ता डोंगरात पाऊस पडताना दिसायचा, तर पुढच्या मिनिटाला खालच्या खोऱ्यात कोसळताना दिसायचा, पुन्हा डोंगरमाथ्यावर जलधारा पडताना दिसायच्या, तर पुन्हा एकदा खालच्या स्तेपवर पाऊस उतरून यायचा. मी नजर खिळवून क्षितिजाकडे पहात होते. माझा तापलेला चेहरा त्या दूरवरच्या पावसात भिजून येणाऱ्या वाऱ्याने थंडावला. मी अलिमानला काहीच बोलले नाही. त्या दूरवर चमकणाऱ्या पावसाच्या धारांप्रमाणे उदार आणि तेजस्वी असे जणू माझे सारे शब्द केवळ तिच्यासाठी राहिले होते.

पाऊस पडणार होता, गहू पिकणार होता, लोक जीवन जगत राहणार होते आणि मीही त्यांच्याबरोबर जगणार होते. अलिमानला माझी दया आली म्हणून मला असे वाटले असे नव्हे, तिच्या अंतःकरणातील दयेपोटी ती मला सोडून जाणार नाही असे म्हणाली म्हणूनही नव्हे. तसे काहीही नव्हते. दुसऱ्याच एका कारणासाठी मला आनंद झाला होता. लढाई माणसांना क्रूर, नीच, लोभी आणि रिती बनवते असे कुणी सांगितले? मुळीच नाही. हे रणचंडी, आपल्या पायांखाली चाळीस वर्षे जरी तू लोकांना तुडवलेस, ठार मारलेस, लुटालूट केलीस, जाळपोळ केलीस, नाश केलास, तरी मानवाला मोडण्यात, त्याचा अपमान करण्यात, त्याच्यावर विजय मिळविण्यात तुला कधीही यश येणार नाही.

आणि माझी अलिमानही एक मानव होती. नाही तर एका अंधाऱ्या रात्री शत्रूच्या प्रदेशात हवाई छत्रीमधून उडी घेतलेला आणि त्याच रात्री अदृश्य झालेला जयनाक हा नक्की जिवंत आहे आणि तो हमखास घरी परत येईल अशा स्वतःच्या

विश्वासाला तिने स्वतःच बळकटी का दिली? आम्हाला वाटते नेवढे जग अन्यायी नाही असे ती स्वतःला का बजावीत राहिली? या विश्वासाला तडा देण्याची माझी हिंमत नव्हती, तिच्या आशांमध्ये गोंधळ निर्माण करण्याची माझ्यात धमक नव्हती. उलट मीसुद्धा तिच्यावर विश्वास ठेवला. खरेच जयनाक परत आला तर? एके दिवशी तो खरेच आला असता तर तो चमत्कार वाटला नसता. एखाद्या लहान मुलासारखा मी यावर विश्वास ठेवला. मला तेच हवे होते. तो दिवस मी माझ्या मनासमोर रंगवायलाही सुरुवात केली. एवढ्यात अलिमानने आमच्या शांततेचा भंग केला. आम्ही बाग अजून पुरती नांगरली नाही याची तिने मला प्रथम आठवण करून दिली.

"अम्मी, नांगर तसाच पडलाय. चला लौकर! माती वाळून जाईल नाही तर," ती म्हणाली.

आम्ही बागेकडे पळालो. बैलांनी केव्हाच नांगर ओढीत एका बाजूला नेला होता व जवळच्या गवताच्या पट्ट्यावर ते चरत होते. अलिमानने त्याना हाकलत परत आणले, आम्ही नांगराचा फाळ पुन्हा ढेकळांमध्ये घातला आणि पुढे नांगरायला लागलो. खरेच, माणसाला किती थोड्याची गरज असते? काही वेळा नुसता एक दयाळू शब्द त्याच्या साऱ्या मेलेल्या भावना जाग्या करायला पुरेसा ठरतो. अलिमानच्या बाबतीत असेच झाले होते. किंवा मलाच तसा नुसता भास झाला होता? एकाएकी ती पुन्हा पूर्वीची, लढाईपूर्वीच्या दिवसातली अलिमान बनली होती. तिच्या सर्व गोष्टींना एक झळाळी आली होती. तिचा प्रत्येक शब्द, प्रत्येक हसणे, प्रत्येक

हालचाल, साऱ्या काही गोष्टी पूर्वीसारख्या बनल्या. तिने आपले आखूड जाकीट जमिनीवर भिरकावले, कपडे खोवले, बाह्या वर सरसावल्या, डोक्यावरून रुमाल मागे सरकवला आणि मोठ्या ऐटीत लगामाच्या दोऱ्या हाती धरल्या.

"ए पांढऱ्या, चल पुढं! ए हाडकुळ्या, चल पुढं!" लांब चाबूक फडकवीत ती ओरडली.

मी आनंदी व्हावे, काम करावे, जगावे अशी अलिमानची इच्छा होती. म्हणून त्या कधीही विसरल्या न जाणाऱ्या दिवशी ती तशी वागत होती. काम करताना मध्येच ती मागे वळून बघायची आणि हसून म्हणायची:

"अम्मी, दांड्यावर एवढ्या वाकू नका. एवढ्या जोराने काम करू नका. तुमची ताकद राखून ठेवा!"

आम्हाला अजून दोन तीन फेऱ्या करायच्या होत्या, तेवढ्यात पावसाला सुरुवात झाली. खूप तडाकून छान सरी कोसळत होत्या. पहिल्यांदा पावसाच्या थेंबांचे बैलांच्या पाठीवर चार शिंतोडे उडाले, मग तो थांबल्यासारखा झाला आणि नंतर एकदम सरी कोसळू लागल्या. अख्खे गाव एका क्षणात भिजून चिप्प ओले झाले. आपल्या पिलांना घेऊन धावताना कोंबड्या पंख पसरवून ओरडत होत्या. बायकांनी वाळत घातलेले तारांवरचे कपडे भराभरा खेचले व त्या घरात धावल्या. मुले आणि कुत्री मात्र रस्त्यांवर धावली. कोसळणाऱ्या पावसात चिंब भिजत मुले नाचू-गाऊ लागली:

पावसा पावसा निघून जा,
पुन्हा केव्हातरी भिजवून जा.

"आपण पुरत्या भिजून जाऊ! पळ!" मी अलिमानला म्हणाले.

पण तिने मान हलवली.

"काळजी करू नका अम्मी, आपण काही विरघळून जाणार नाही!" पावसाच्या थेंबांनी गुदगुल्या झाल्यामुळे ती एखाद्या लहान मुलीसारखी खिदळली आणि तिने बैलांना आणखी जोराने हाकले.

तिचा आनंद लक्ष वेधून घेणारा होता. तिला पाहताना मला विलक्षण आनंद होत होता. मी स्वत:शीच पुटपुटले: "माझी तेजस्वी पावसातली मुलगी! किती सुखी झाली असतीस तू! अरे दैवा, अरे आयुष्या..." ती हे सारे माझ्यासाठी करीत होती हे आत्ता मला समजत आहे. लढाई-बद्दल मी विसरून जावे, माझे दुःख विसरावे, आयुष्याकडे पुन्हा विश्वासाने बघायला लागावे असे तिला फार फार वाटत होते. अलिमानने पावसाच्या धारांकडे हात वर धरले व तोंडही तसेच उचलले आणि ती म्हणाली:

"अम्मी, पावसाकडं पहा! पहा किती स्वच्छ आहे! यंदा पीक चांगलं येईल! ये रे पावसा! तुझ्या मुसळधार सरी कोसळू देत!" तिने पावसावर आणि बैलांच्या वाफाळणाऱ्या पाठींवर चाबूक उडवला.

ती हसत होती. आपल्या सौंदर्याची तिला कल्पना नव्हती. त्या चिंब भिजलेल्या अवस्थेत तिचा सडपातळ कमनीय बांधा, उभार स्तन आणि पुष्ट नितंब उठून दिसत होते. तिचे डोळे चकाकत होते आणि गाल लाल झाले होते. त्या दुष्ट लढाईचा त्रिवार निःपात घडो!

पावसाच्या धारा थांबल्या आणि पाऊस दुसरीकडे कुठेतरी खेळायला गेला, तशी अलिमान एकदम शांत झाली. जाणाऱ्या

पावसाकडे ती खेदाने पहात होती. नदीपलिकडे विरत जाणारा त्याचा आवाज ती कान देऊन ऐकत होती. कदाचित तिच्या मनात विचार आला असावा की, पाऊससुद्धा चिरंतन टिकत नाही आणि तोही चटकन निघून जातो. तिने एक मोठा उसासा टाकला. ती त्यावेळी कासीमचा विचार करीत होती का आणखी कशाचा विचार तिच्या मनात घोळत होता हे मला माहीत नाही. पण माझ्याकडे पाहताच पुन्हा तिने चेहऱ्यावर हसू आणले.

"जमीन ओली असताना आताच आपण मक्याचे दाणे पेरू या!" ती म्हणाली आणि घरात पळाली.

भिजवलेल्या मक्याची एक छोटी बादली अलिमान घेऊन आली. तिने मूठभर भलेमोठे फुगलेले गर घेतले.

"अम्मी!" ती म्हणाली, "मका पिकायच्या आधी जयनाक परत येवो!" या शब्दांबरोबर तिने पहिल्या मूठभर मक्याची जमिनीवर पखरण केली.

मी तो दिवस कधीही विसरणार नाही. स्वच्छ, पावसात न्हाऊन निघालेला सूर्य ढगांआडून एखाद्या लहान बाळासारखा डोकावला. काळ्याभोर, ओलसर मातीच्या ढेकळांमधून अलिमान अनवाणी चालत होती आणि दर पावलागणिक मूठभर मक्याचे गर पेरीत होती. ती पेरीत असलेले हे बियाणे साधे नव्हते. ती आशेच्या, चांगुलपणाच्या, अपेक्षांच्या बिया रुजवीत होती.

धान्य पेरीत असताना ती म्हणाली, "माझे शब्द खरे होतात की नाही ते बघालच तुम्ही अम्मी. मी जयनाकसाठी स्वतः मक्याची कणसं गरम निखाऱ्यांवर भाजीन. कणसांसाठी

माझ्याबरोबर तो कसा भांडायचा ते आठवतं? एकदा निखाऱ्यांमधून त्यानं एक कणीस ओढून काढलं, सदऱ्यात लपवलं आणि माझ्यापासून लांब पळाला. पण त्यानं त्याचं पोट भाजलं आणि तो तिथं तो थयथया नाचायला लागला. आपल्या छातीवर त्यानं पाण्याची अख्खी बादली उपडी केली. त्याला मदत करायची सोडून मी पोट दुखेपर्यंत हसले आणि ओरडले: 'भली खोड जिरली! खाशी जिरली एका माणसाची!' त्यावेळची ही गोष्ट तुम्हाला आठवते अम्मी?" त्यावेळच्या आठवणींनी हसत ती म्हणाली.

तिच्या या वागण्याबद्दलही मी कृतज्ञ आहे.

१४

"होय तोल्गोनाई, जयनाकची तुम्ही खूप दिवसपर्यंत वाट पाहिलीत".

"धरतीमाते, आम्ही त्याची वाट पाहिली. धान्य एकदा नाही, दोनदा-तीनदा पिकलं, पण आमचा जयनाक परत आला नाही. कधीच आला नाही. आणि त्याच्याकडून एका शब्दाने काही समजले नाही. माझ्या दु:खात तुला वाटेकरी करण्यासाठी भरल्या डोळ्यांनी किती वेळा मी तुझ्याकडं आले ते आठवतं?"

"होय तोल्गोनाई, अशा वेळा खूपदा आल्या. तू रडायचीस आणि आपल्या सुनेचं काय करू म्हणून विचारायचीस, तिची जवानी नासवण्यापासून कशी वाचवायची ते विचारायचीस. पण तुला मदत करण्याचा माझ्याजवळ काहीही उपाय नव्हता. तेव्हापासून आतापर्यंत अनेक वर्षे उलटली, पण अजून मी काहीही सांगू शकले नाही."

१५

जीवन पुढे चालले होते. सामुदायिक शेतावरच्या परिस्थितीत सुधारणा होत होती. आयुष्य थोडे अधिक सोपे झाले होते. लोकांच्या लढाईबद्दलच्या आठवणी फिकट होत चालल्या होत्या, त्यांच्या खुणा त्यांच्या काळजांवरून पुसू लागल्या होत्या.

अलिमान आणि मी शेतावर काम करीतच होतो. सैनिक परत येताच मी माझे काम त्यांच्या हाती सोपवले होते.

"तीन वर्षं मी पथक-प्रमुख म्हणून काम केलं आणि माझ्या वाटचा काळज्यांचा सारा भार उचलला. आता तुम्ही परत आला आहात आणि ही कामाची सूत्रं परत घेऊ शकता," मी त्यांना म्हणाले. "मला आता विश्रांती द्या. या काळात मी म्हातारी झालेय, पण तरीही या ना त्या तऱ्हेनं मी तुम्हाला मदत करीत राहीन."

त्या काळातली तरुण मंडळी अजूनही मला "आपा पथक-प्रमुख" म्हणून हाक मारतात. मला अजूनही ते मान देतात याचे हे चिन्ह आहे.

आयुष्य जरी परत सुरळित झाले होते तरी मला आणि अलिमानला शांतता लाभत नव्हती. कुणाच्या लक्षात येत नव्हते, पण अंतरात आम्ही सतत जळत होतो, त्याच त्याच गोष्टींभोवती आमचे विचार सतत फिरत रहात होते. अगदी वर वर पाहता असे वाटायचे की, आम्ही मनमोकळ्या बोललो तर सारे काही अगदी सोपे आहे. आहे ही परिस्थिती पत्करायची आणि आपापल्या वाटेने आयुष्य जगायचे, प्रत्येकीने आपले आयुष्य कसे जगायचे ते स्वतः ठरवायचे. खरेच,

पहायला ते अगदी खरोखरीच सोपे होते. अलिमानऐवजी मला दुसरी कुणी सून म्हणून असती किंवा ती माझ्याशी एवढी चांगली वागली नसती, तर तिला स्पष्टपणे सांगायला मी दुसऱ्यांदासुद्धा विचार केला नसता की, "बाई ग अशी वर्षं वाया घालवण्यात काही अर्थ नाही, तुला साजेसा एक नवरा बघ आणि उशीर व्हायच्या आधी इथून काढता पाय घे." पण हे शब्द अलिमानला बोलायचा मला कधीही धीर झाला नाही, कारण कितीही काळजीपूर्वक निवडून बोलले, तरी शेवटी त्यांचा अर्थ रांगडा आणि क्रूरच राहतो. तिच्या इच्छेविरुद्ध तिला तिथून हाकून लावण्याचा मला काहीही अधिकार नव्हता. एकदा तिचे काईन्दीचे नातेवाईक कुठेतरी प्रवासाला निघाले असता वाटेत आम्हाला भेटून गेले. मला माझी विचारबुद्धी स्वच्छ ठेवायची होती, म्हणून मी मोठ्या कष्टाने धीर करून त्यांना सांगितले की, माझ्यापुरते विचारीत असाल तर अलिमान मोकळी आहे, मी तिला नेहमी आशीर्वादच देईन. पण अलिमानने आमचे बोलणे एवढ्या ताडकन तोडले की, मलाच आम्हा दोघींबद्दल शरम वाटली. या विषयावर ती आम्हाला अजिबात चर्चा करू देत नव्हती. आपले डोके चांगले ठिकाणावर आहे आणि घर सोडून जायचे किंवा नाही हा सर्वस्वी आपला स्वतःचा प्रश्न आहे व त्यांनी तिच्या भानगडीत अजिबात नाक खुपसू नये, असे तिने स्पष्टपणे बजावले. मी ज्या घाईगडबडीने बोलले त्याबद्दल मला पश्चात्ताप वाटू लागला आणि तिच्याकडे मान वर करून बघायची शरम वाटू लागली. पण त्या शहाण्या मुलीने सारे काही समजून घेतले आणि जणू काही घडलेच नाही असे

भासवून एकही शब्द त्यावर बोलली नाही. तर अशा आम्ही जगत होतो, एकमेकींची करूणा करीत होतो, जयनाक परत येईल अशी आशा बाळगून स्वत:ला फसवीत होतो; पुढे ही आशाही अंधुक होत गेली, काळ पुढे जातच होता आणि मग साराच उशीर झाला.

त्या साऱ्या गोष्टी कशा घडून आल्या ते मला ठाऊक नाही. गुरांचे कळप जाण्याच्या वाटेवर आमचे खेडे आहे. फार पूर्वीच्या काळापासून मेंढपाळांनी या वाटेने आपले कळप हाकलीत नेले आहेत. वसंतात ते डोंगराकडे जात आणि शरदात परत स्तेपकडे येत. काही वेळा स्वत:च्या आणि कळपाच्या अशा दोघांच्या विश्रांतीसाठी मेंढपाळ आमच्या गावात मुक्काम करीत.

शेहेचाळीसच्या शरदातली गोष्ट. आमच्या शेजारच्या खेड्यातल्या एका तरुण मेंढपाळाने कोरड्या खोऱ्यातून कुरणांकडे आपला कळप हाकलीत चालवला होता. तो सैनिक होता हें त्याला पाहताच समजून येत होते. अजून तो मोठा सैनिकी कोट घालीत होता, छान तगड्या घोड्यावर स्वार होऊन खांद्याला बंदुक लटकावून फिरत होता. त्याच्या खोगीराशी लोकरी कोट बांधलेला असायचा. बऱ्याच वेळा तो खेड्यातून दौडत जायचा. मी कधीच त्याच्याकडे लक्ष दिले नव्हते. माझ्यापुरते बोलायचे तर त्याला पाहिजे तेवढे तो दौडू शकत होता. अशी अनेक माणसे गावात मागेपुढे चकरा मारीत असत. मला तो माहीतही नव्हता.

त्या शरदात खेड्यात बरीच लग्ने लागली. कुणीतरी आपल्या मुलाच्या लग्नानिमित्त बोकडाची शिकार घोड्यावरून

करण्याची स्पर्धा लावली होती. हा मेंढपाळ मोठा कुशल घोडेस्वार निघाला. अलिमान आणि मी लग्नाला जाण्याच्या नयारीत होतो. ती कपडे करून तयार होत असताना रस्त्यावरून एक घोडा वाऱ्याच्या वेगाने दौडत आला व आमच्या कुंपणाच्या फाटकाशी धप्पदिशी मोठा आवाज ऐकू आला. काय झाले म्हणून बघायला मी धावले. तो मेंढपाळ तेथे होता. त्याचा घोडा थयथया नाचत होता व त्याच्या मांडीखाली उसळ्या मारीत होता. दातात चाबूक धरलेली व वरच्या कोटाच्या बाह्या वर सरकवलेली त्याची घोड्यावरची स्वारी मोठी देखणी दिसत होती. आमच्या कुंपणाच्या फाटकाशी बोकडाचे धड पडले होते. शिकारीतला विजयी माणूस त्याला पाहिजे त्या कुंपणात आपली शिकार टाकू शकतो. मी इतकी गोंधळून गेले होते की, काय बोलावे तेच मला समजेना.

"तुझ्या मनात काय आहे मुला?" मला समजायच्या आधीच माझ्या तोंडून शब्द उमटले.

"कुणी घरात आहे?" त्याने विचारले.

"कोण पाहिजे तुला?"

मग चुकीने आपल्या हातून तसे घडले असे तो काहीतरी पुटपुटला. जमिनीवरचा बोकड त्याने उचलला, आपला घोडा वळवला व दुडक्या चालीने निघून गेला. एवढ्यात त्याच्या पाठलागावरचे लोक नजरेच्या टप्प्यात आले. त्याला बोकड बरोबर घेऊन जाताना त्यांनी पाहिले तेव्हा ते सारे त्याच्या मागे दौडले. त्यावेळी तेवढेच घडले. त्यानंतर मी काही त्याला पाहिले नाही. त्यावेळी मात्र मला पुरते गोंधळून गेल्यासारखे

झाले होते, कारण चालीरीतीप्रमाणे एकदा एका घरात बोकड टाकल्यानंतर त्या बोकडावर त्या घरच्यांची मालकी असते. त्याने खरेच तो चुकीने टाकला होता का? मग तो नेमका फाटकाखाली कसा पडला होता? रस्त्यावर का पडला नव्हता? याचा अर्थ काय असू शकेल?

अलिमान जेव्हा घरातून बाहेर आली तेव्हा सर्व काही स्पष्ट झाले. तिने फुलाफुलांची शाल घेतली होती व रेशमी कपडे घातले होते. तिने पटकन माझ्याकडे नजर टाकली व शरमेने मान खाली घातली.

"चला, जाऊ या अम्मी," ती हळूच म्हणाली.

तो मेंढपाळ आमच्या घराशी का आला होता हे अगदी स्पष्ट झाले होते. आमच्या आवाराच्या बाहेरच विहीरीत भरपूर पाणी असूनही गेल्या काही दिवसात अलिमान रोज संध्याकाळची नदीवर पाणी भरायला जात होती आणि दरवेळी खूप उशीर करून घरी परतत होती याची मला आठवण झाली. काळजात कुठेतरी ठुसठुसले. ही वेदना मी मत्सरी झाले म्हणून नव्हती– कदाचित मला खरोखरीच मत्सर वाटलाही असेल–पण त्यामागे दुसरे काही कारण होते. अलिमान कायमची विधवा राहू नये, तिने लौकरच आपला नवरा शोधावा अशी स्वतः मीच प्रार्थना करीत होते आणि तसे व्हावे अशी माझी अगदी मनापासून इच्छा होती. पण आता एकाएकी मला भीती वाटू लागली होती. माझ्या सुनेचे नव्हे तर माझ्या मुलीचे लग्न लावायचे आहे अशा भावनेने मी एकाएकी चिंतेत पडले. ती कदाचित चूक करील अशी मला भीती वाटत होती आणि नव्या घरात तिला कसे आयुष्य

लाभेल, तिचे सासू-सासरे कसे असतील आणि तिचा नवरा कसा असेल या चिंतेने मला घेरले होते. लग्नाच्या त्या समारंभात या विचारांनी सतत माझा पिच्छा तर पुरवलाच, पण घरी परतताना वाटेतसुद्धा हेच विचार माझ्या मनात घोळत होते.

"अलिमान, तू खरंच त्याला ओळखतेस का? कोणत्या प्रकारचा माणूस आहे तो? माझ्या छबकड्या अलिमान, अशी एकदम घाई करू नको. काहीतरी घोटाळा करू नको. तू त्याला नीट पारखून घेतलं पाहिजे," मी मनाशीच तिची मनधरणी करीत होते. तरुणांच्या वाटेत मी अडथळा ठरू नये अशी माझी इच्छा होती. माझ्या उपस्थितीत अलिमान लाजणार नाही असे मी कसे करणार? तिला जे उत्तम वाटतं ते करायला ती पूर्ण स्वतंत्र आहे हे मी तिला नाजुकपणं कसं सुचवणार? माझी धास्ती लपविण्याचा व नेहमीप्रमाणे तिच्याशी बोलण्याचा मी प्रयत्न केला. तिला संशय येऊ नये किंवा परमेश्वर करो, पण तिचे वागणे मला पसंत नाही असे वाटू नये म्हणून मी हसायचा आणि विनोद करायचाही प्रयत्न केला. पण माझ्या मनातली सारी भीती आणि चिंता तिला ठाऊक होत्या.

त्या संध्याकाळी जेव्हा अलिमानने बादली उचलली आणि ती पाण्याला निघाली तेव्हा जणू काही माझ्या डोक्यावरचा बोजा खाली उतरल्यासारखा मी सुटकेचा निश्वास टाकला. आता तिला त्याला भेटण्याची संधी मिळेल असा मी विचार केला. पण ती पटकन परतली. ती नदीवर गेलीच नव्हती, जवळच्या विहीरीतून तिने पाणी आणले होते.

पाण्याची बादली खाली ठेवीत ती म्हणाली, "अम्मी, मी पाणी गरम करते. आज तुम्ही तुमचे केस धुवा."

"अग एवढी काही घाई नाही," मी म्हणाले. "उद्या धुता येतील. जर तुला कुठं जायचं असलं तर..."

पण तिने मला मध्येच अडवले.

"उद्या मला कामावर जायला पाहिजे आणि तेव्हा वेळ मिळायचा नाही. अम्मी, तुम्ही तुमचं डोकं धुवा आणि मग मी तुमचे केस विंचरीन."

अलिमानने भांडेभर पाणी गरम केले आणि एखाद्या लहान मुलीला आपले केस कसे धुवायचे ते माहीत नसल्यानंतर तिला जसे बोलावे तसे ती माझ्याशी बोलू लागली. पहिल्यांदा तिने ताकाने माझे केस धुतले, नंतर साबणाने धुतले, मग पुन्हा चोळले व पुन्हा साबण लावला. ती सारखी माझ्या भोवती फिरत होती, पाणी बदलत होती, गरम पाण्यात गार पाणी मिसळीत होती आणि भांडी भरभरून माझ्या डोक्यावर ओतीत होती. दुसऱ्या एखाद्या वेळी मी चिडले असते आणि मला एकटीला राहू दे असे तिला सांगितले असते, पण त्या संध्याकाळी मी तसे करू शकत नव्हते. तिच्या प्रियकराच्या भेटीला ती न जाण्याचे कारण मी आहे, या विचाराने मला अपराधी वाटत होते. "छे छे! का बरं ती गेली नाही?" मला आश्चर्य वाटत होते, आम्हा दोघींवर मी चिडले होते. पण अलिमान मात्र खुषीत दिसत होती. माझे केस विंचरीत असताना ती खिन्नपणे म्हणाली:

"अम्मी, एकेकाळी तुमच्या वेण्याही चांगल्या जाड होत्या नाही, कारण तुम्हीही तरुण होतात."

माझ्या डोक्यावरून ती हळुवारपणे बोटे फिरवीत होती. तिच्या बोटांचा माझ्या चेहऱ्याला स्पर्श होत होता. पाण्याने

डबडबलेले माझे डोळे मी वर उचलू शकत नव्हते. "ती माझा निरोप घेतेय," मी उदासपणे मनाशी म्हणाले. नंतर तिने माझ्या वेण्या घातल्या आणि ट्रंकेतून जपून ठेवलेले अत्तर काढले. कासीमने ते तिच्यासाठी आणले होते आणि तिने ते अजूनपर्यंत राखून ठेवले होते.

"अलिमान, अग तुला झालंय तरी काय?" मी विरोध केला. "आता अत्तर मला काय करायचं? मी म्हातारीनं अत्तर चोपडलेलं बघून लोक हसतील मला!"

तिने माझे ऐकले तर नाहीच, उलट ती खळाळून हसली. अलिमानने माझ्या तोंडावर, मानेवर, डोक्यावर अत्तर उडवले आणि बाटली संपवली. मग मला मिठी मारून चारी बाजूंनी निरखून पाहू लागली.

"बघा तुम्ही किती तरुण आणि सुंदर आहात!" आपल्या स्वत:च्या करामतींवर खुष होत ती म्हणाली.

मला थोडे अधिक आनंदी वाटत होते. चहा झाल्यानंतर अलिमान म्हणाली:

"अम्मी, झोपायची वेळ झालीय. मी तुमचा बिछाना तयार करते."

त्या रात्री आम्हा दोघींपैकी कुणीच झोपले नाही. अलिमान आपल्या विचारांमध्ये गुरफटली होती, कोपऱ्यात सारखी उसासे टाकीत होती, या कुशीवरून त्या कुशीवर सारखी तळमळत होती. माझ्या मनात तिच्याबद्दलच्या विचारांनी गर्दी केली होती. हातात जंगली फुलांचा गुच्छ घेऊन गव्हामधून कंबाईनकडे धावत जाताना प्रथम ती नजरेसमोर यायची. तिने कंबाईनच्या पायरीवर फुले ठेवली आणि खोडकरपणे

ती तिथून पळाली. मग कासीमला ती पुन्हा घोड्यावरून खाली खेचतेय, एखाद्या लहान मुलाप्रमाणे डबडबल्या डोळ्यांनी त्याच्या हाताला पकडतेय, असं दृश्य नजरेसमोर यायचे. नंतर मला आम्ही स्टेशनावर गेलो तो प्रसंग आठवला. आम्ही घोड्यांच्या गाडीतून चाललोय, अलिमान माझ्या शेजारी बसलीय, गारठ्यात तिचे गाल लाल झालेत, बारिक बर्फाची भुरभुर तिच्या सर्वांगावर पसरलीय. तिच्या शालीवर बर्फ चिकटलाय, वाऱ्याने उडणाऱ्या तिच्या केसांच्या बटांना बर्फ अडकलाय, तिच्या कॉलरवर बर्फ साचलाय आणि या सर्व गोष्टींमुळे ती अधिकच सुंदर दिसतेय. मग ती मला दिसली दोन्ही हात पसरून ओरडत माझ्याकडे धावताना: "अम्मी ऽऽ! आपण विधवा झालो! दीनवाण्या विधवा!" काळा रुमाल बांधून ट्युलिपच्या लाल भडक ताटव्यांमधून धावताना ती मला दिसली. आम्हा दोघींना एकत्र आणणाऱ्या सर्व घटना मी आठवत होते आणि एकाएकी मनात कल्पना आली की, त्या मेंढपाळाबरोबर मेंढ्यांचा कळप हाकीत ती खोऱ्याकडे निघाली आहे. तिचा आवाज मला ऐकू येत होता: "अम्मी, मला क्षमा करा. मी तुम्हाला सोडून चाललेय. माझ्यावर दया करा. येते मी अम्मी!" उंच काठावरून मी हात हलवीत तिला निरोप देत धावत गेले: "माझ्या सूर्यप्रकाशा, सुखी रहा! माझ्या आयुष्यातला प्रकाश गेला. अलिमान जा बेटा! सुखी हो!" "अरे तरुण माणसा!" मी मेंढपाळाला ओरडून म्हटले. "तिला चांगलं वागव. माझ्या सुनेची काळजी घे. तसं केलं नाहीस तर माझे शाप बाधतील तुला!" डोळ्यातल्या पाण्याच्या धारांनी माझी उशी भिजून चिंब झाली होती.

अलिमानला माझे रडणे ऐकू जाऊ नये म्हणून डोक्यावर पांघरूण ओढून घेऊन मी हळू हळू रडत होते.

दुसऱ्या दिवशी अलिमान कामावरून परत आल्यानंतर कुठेही बाहेर न जाता सबंध संध्याकाळभर घरात बसून राहिली. त्यानंतर तो मेंढपाळ आपला कळप घेऊन निघून गेला आणि परत आला नाही. अलिमान बेचैन आणि निराश दिसत होती.

"माझ्याकडं तू दुर्लक्ष करायला पाहिजे होतं आणि तुला तो एवढा आवडला होता तर जायला हवं होतंस," मी मनातल्या मनात तिची खरडपट्टी काढीत होते. मग मला तिच्याबद्दल वाईट वाटले. "बिच्चारी! एवढं दु:ख सोसायला का जन्माला आली!" दिवस उलटत राहिले आणि हळू हळू सारे काही विसरले गेले.

पुढच्या वसंताच्या सुरुवातीला तो मेंढपाळ परत आला. कुरणात मेंढ्या चारीत तो बसला होता तेव्हा मी त्याला पाहिले आणि ताबडतोब ओळखले. पुन्हा एकदा अलिमान संध्याकाळची बाहेर जाऊ लागली आणि रात्री उशिरा घरी परतू लागली. मी काहीही बोलले नाही. तिचे नशीब तिचे तिलाच ठरवायचे होते.

एके रात्री मी खूप उशिरापर्यंत अलिमान घरी परत येण्याची वाट पहात राहिले. सारे खेडे झोपी गेले होते. मी दिवा विझवून बिछान्यावर पडले, पण झोप येत नव्हती. मी बेचैन आणि खचलेल्या मन:स्थितीत होते. तिची वाट पहात असताना प्रत्येक आवाजाची चाहूल मी घेत होते. वसंतातली ती एक निवांत रात्र होती. चंद्र आकाशात प्रकाशत होता, मधून मधून ढगांचे त्याच्यावर सावट येत होते. थंडीमुळे

नव्हे तर एकटेपणामुळे मी गारठल्यासारखी झाली होते. लोकरी कोट अंगाभोवती गुंडाळून मी बिछान्यात पडल्या पडल्या एक डुलकी काढली. कशाच्या तरी भीतीने मी एकदम दचकून जागी झाले. अलिमान दारात उभी होती. तिच्या पोषाखाची बटणे तुटून पडली होती, तिची छाती उघडी पडली होती, केस विस्कटलेले होते आणि डोळे चमत्कारिक दिसत होते. तिला दारू पिऊन झिंगलेल्या अवस्थेत मी प्रथमच पहात होते. तिने उंबऱ्यावर पाऊल ठेवले, तिचा झोका गेला, सावरण्यासाठी तिने स्टोव्हला पकडले आणि मान हलवली. माझ्या पाठीतून झिणझिण्या गेल्या.

"काय बघताय?" डोके वर उचलून तिने विचारले. "आँ, काय बघताय? होय, मी प्यायलेय. वोदका पीत होते. दुसरं मी करणार तरी काय? मी नाही प्यायचं तर कुणी? आँ? बोला, काहीतरी बोला!"

मी इतकी बधीर झाले होते की, एकही शब्द माझ्या तोंडातून फुटेना. माझ्या सुनेचे काय झाले होते ते पाहताना मन हादरून गेले होते. स्टोव्हचा आधार धरून अलिमान झुकांडया खात तिथे उभी होती. तिने मान खाली घातली आणि ती एकदम पुटपुटली:

"अम्मी, तुम्हाला काही ठाऊक नाही, मी... आज मी... तुम्हाला आठवतं आपण कासीमचा निरोप घेतला तेव्हा नदीवर गेलो होतो. तिथे आज..." वाक्य पुरे करण्याऐवजी तिने किंकाळी फोडली आणि दोन्ही हातात डोके धरून हुंदके देत तिने जमिनीवर लोळण घेतली.

तेव्हा कुठे मी भानावर आले. मी तिच्याकडे धावले, तिला पकडले व छातीशी घट्ट आवळून धरले.

"अलिमान, काय झालं? का रडतेस तू? सांग मला. कसला त्रास होतोय तुला? कुणी तुला दुखावलं का? सांग मला! मी काही चुकीचं वागले का? तसं असेल तर काय ते मला स्पष्ट सांग."

"नाही अम्मी!" ती मुसमुसत म्हणाली. "माझी, बिच्चारी, एकटी अम्मी! तुम्हाला काहीच माहीत नाही. आणि झालं माहीत तरी तुम्ही काय करणार? अम्मी! अम्मी ऽऽ!"

ती रडत होती, कण्हत होती. तिचा अश्रूंनी ओला झालेला चेहरा तिने माझ्या छातीत खुपसला होता. अखेरीस तिचा रडण्याचा आवेग कमी झाला आणि तिला झोप लागली. पण झोपेतही ती कण्हत होती आणि हुंदके देत होती. मी पहाटेपर्यंत तिच्या बिछान्याशी बसून होते. मनात सारखा विचार येत होता: आम्ही पुढे कशा जगत राहणार? पुढे आम्ही काय करायचे? तिच्या मनची गोष्ट काढून घ्यायचे मी ठरवले. पण दुसऱ्या दिवशी सकाळी ती काहीही बोलायला तयार नव्हती. तिचे तिलाच आधी कसेतरी वाटत होते. काही न बोलता केवळ डोळ्यांनीच ती रात्री काय घडले त्याबद्दल मी बोलू नये असे विनवीत होती. कामावर निघताना आम्ही फाटकामधून जात होतो तेव्हा ती हळूच म्हणाली:

"अम्मी, मला क्षमा करा."

आणि तिने काळजी करत बसावी असे मला वाटत नव्हते.

तीन महिने उलटले. त्या उन्हाळ्यात आमच्या तिथे चौकशी चालू होती. लढाईच्या दिवसात आघाडीवरून पळून आलेल्या जेन्‌शेन्‌कुलवर खटला चालू होता. लढाईनंतर खेड्यात उघडपणे येण्याची त्याची हिंमत होत नव्हती, पण रात्रीचा तो चोरून आपल्या घरी येत असे. चोरलेली गुरे विकून तो पैसे कमवीत होता आणि कझाखस्तानात कुठेतरी लपून बसला होता. अखेरीस, आता त्याला पकडले होते. त्याचा भूतकाळ आता उजेडात आला होता व साक्षींसाठी त्याला आमच्या खेड्यात आणले होते. खेड्यातल्या पंचायती कडून एक निरोप्या माझ्या घरी माझ्यासाठी पाठविण्यात आला होता.

"तुम्हाला साक्ष द्यायला बोलावलंय," तो निरोप्या म्हणाला.

वाटेत जाताना मला अलिमान भेटली. ती कामावरून घरी परत येत होती. चालत येताना ती दमलेली आणि उदास वाटत होती. त्या उन्हाळ्यात तिचा चेहरा खरकला होता. मला तिच्याबद्दल वाईट वाटले. तिने एकटीने घरात बसू नये अशी माझी इच्छा होती.

"चल मुली," मी म्हणाले. "कचेरीत जाऊ या. मग आपण बरोबरच परतू."

"नको अम्मी," ती उत्तरली, "मी तिथं काय करणार? मी घरी जाते, माझं डोकं दुखतंय."

"ठीक आहे, थोडी पडून विश्रांती घे. मी परत आल्यावर गायीची धार काढीन."

गावच्या पंचायती बाहेर चारी बाजूंनी बंद अशी एक टपाची गाडी उभी होती. व्हरांड्यात साक्षीदारांचा आणि

कामावरून परतणाऱ्या बघ्यांचा जमाव उभा होता. मला वाटते जवळ जवळ सात वर्षे मी जेन्शेन्कुलला पाहिला नव्हता. त्याचे पापी जगणे त्याला मानवलेले असावे. तो चांगला भक्कम, माजलेल्या बैलासारखा दिसत होता. खिडकीशी बसून तो चिडलेल्या नजरेने सभोवार पहात होता आणि कुणावर तरी खेकसत होता :

"तर मी चोर आहे काय? पण तुमच्या हातांनी मला कधी धरलंय, तुमच्या डोळ्यांनी मला चोरी करताना कधी पाहिलंय? नाही? मग माझ्या नावाला उगीच काळोखी फासू नका. तुम्हाला काय पाहिजे ते तुम्ही बडबडू शकता, पण ते नुसते पोकळ शब्द ठरतील. तुमच्याजवळ काहीही पुरावा नाही! पुरावा!"

त्यासरशी मी खिडकी सताड उघडली आणि रस्त्यावरूनच ओरडले :

"तू खोटं बोलतोयस नीचा! तुला पुरावा पाहिजे म्हणतोस ना—ठीक आहे, ही मी इथं आहे! मी स्वतः पुरावा आहे!"

टेबलामागील खुर्चीवरून उठून उभे रहात चौकशी करणारा माणूस म्हणाला, "तुम्ही जरा इकडे येता का माताजी?"

मी आत गेले व गेल्याक्षणी बोलायला सुरुवात केली.

"होय, तुझं बरोबर आहे, आम्ही तुला प्रत्यक्ष चोरी करताना कधीच पकडलं नाही. पण तुझ्यामागं धावायला आम्हाला वेळ नव्हता. नुसत्या हातांनी आम्ही जमीन नांगरीत होतो, आघाडीसाठी आम्ही धान्य पिकवीत होतो. आमच्या मुलांना खायला घालण्यासाठी आम्ही खाली पडलेली कणसे

वेचीत होतो. पण तू आमचे घोडे पळवलेस, नांगराला जुंपायचे घोडे पळवलेस. एक एक दाणा करून जमवलेलं अखेरचं बियाणं, आमच्या मुलांच्या तोंडचा घास काढून जमवलेलं धान्यही तू हिसकावून नेलंस. तू ते चोरलंस. याचा अर्थ तू आमचा शत्रू होता. आणि मी जेव्हा तुला पकडलं होतं तेव्हा मी ओरडले होते: 'थांब! मी तुला ओळखलंय जेन्शेन्कुल! थांब!' तू मागं वळून माझ्यावर गोळी झाडलीस. हा घे तुझा पुरावा!"

चौकशी करणारा म्हणाला:

"तुमचे आभारी आहोत माताजी. तुम्ही आता जायला मोकळे आहात. आपल्या घरी तुम्ही आता जाऊ शकता."

मी परत यायला निघाले होते तोच जेन्शेन्कुलची बायको दाराशी धावत आली. रागाने किंचाळत ती माझ्यावर झेपावली:

"थेरडे! तुला सत्याचा मारे पुळका आलाय, पण हे सत्यच तुला धडा शिकवील! आणि आतापर्यंत तुला चांगली अद्दल घडवलीच आहे! अजून पुरेसं झालं नसेल तर लौकरच तुला आणखी एकदा धाय मोकलून रडायची पाळी येणार आहे. तुझ्या सुनेनं कुठून आपलं पोट फुगवून घेतलं? तुझ्या नाकावर टिच्चून त्या रांडेनं स्वत:ला भानगडीत गुंतवून घेतलं आणि तू सत्याला धुंडाळत फिरतेयस! बेशरम सटव्यांनो, आता त्या सत्याचा शोध तुम्ही दोघी का घेत नाही?"

लोकांनी तिला दूर कोपऱ्यात खेचत नेले व तिच्या तोंडावर त्यांनी हात दाबून धरले. पण मी म्हणाले:

"सोडा तिला. तिच्या अंगाला हात लावू नका." आणि मी घरी जायला निघाले.

त्या दिवशी एक तर रस्त्यावरची धूळ खूप तापली होती किंवा शरमेने माझे पाय भाजत होते, पण सुरुवातीला तर मी अक्षरशः पळत असल्याचे मला जाणवले. मी वेग कमी केला आणि माझ्या विचारांना थाऱ्यावर आणायचा प्रयत्न करीत भटकत निघाले. अशी काही गोष्ट माझ्या डोक्यातच शिरली नव्हती, पण मी तर्क करायला हवा होता. अलिकडे अलिमानमध्ये बदल झाला होता, ती एकटी एकटी रहात होती, ती अलिकडे क्वचित बोलायची आणि मैत्रिणींपासूनही लांब लांब रहायची. त्या मेंढपाळाबरोबरच्या ओळखीतून पुढे काहीच घडले नाही म्हणून ती असे वागत असावी असे मला वाटले होते. त्या वसंतात तो डोंगराकडे निघून गेला होता, त्यानंतर तो दिसला नव्हता. मला वाटले त्यांचे भांडण झाले आणि तिने ते मनाला लावून घेतले आहे. पण खरा प्रकार नसा नव्हता. हाय रे दैवा! गोष्टींना असे वळण मिळेल याची कुणाला कल्पना? मी पुरती भांबावून गेले, काय करावे ते मला सुचेना. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आयेषाने मला चहाला बोलावले. गप्पा मारता मारता ती म्हणाली:

"काल रात्री जेन्शेन्कुलची बायको गाव सोडून गेली." मी काहीच बोलले नाही. मला त्याचे काय सुखदुःख होते? तिला पाहिजे तर ती जाऊ शकत होती. प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे कुठेही जाण्याचे स्वातंत्र्य होते. पण दोन वर्षांनंतर मला समजले की, त्या रात्री गावकरी तिच्या घरी गेले, तिची सारी चीजवस्तू त्यांनी गाड्यांमध्ये भरून दिली आणि तिला म्हणाले: "तुला कुठं पाहिजे तियं जा. आमच्या गावात तुला जागा नाही." त्यानंतर आमच्या दुर्दैवाबद्दल

गावातल्या कुणाही माणसाने चकार शब्दाने कधी माझ्याजवळ उल्लेख केला नाही. कदाचित ते अलिमानला त्याबद्दल बोलले असतील, कुणी तिची कीव केली असेल, कुणी तिची कानउघाडणी केली असेल, पण मला मात्र कुणीही काहीही बोलले नाही. याबद्दल मी लोकांची कृतज्ञ आहे. त्यानंतर अनेक वर्षे लोटली, पण अजूनही मला पूर्वीसारखाच मान देतात.

अलिमान गरोदर आहे हे मला समजल्यानंतरही आमच्या संबंधांमध्ये काहीही बदल झाला नाही. आम्ही काम करीत होतो, एकत्र रहात होतो आणि पूर्वीप्रमाणेच अनेक बाबतीत एकमेकींचा सल्ला घेत होतो. अलिमान आपल्या पोटातल्या पोराबद्दल कधीही बोलली नाही. एक तर ते कसे बोलावे ते तिला समजत नव्हते किंवा ती काळ काढीत होती. तिचा अभिमान सांभाळून मीही काही बोलले नाही. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या काळजात मी तिचा धिक्कार केला नव्हता. मला तसे करायचा अधिकार नव्हता, कारण तिचे सारे आयुष्य माझ्या डोळ्यांसमोर सरले होते. मी सारे काही पाहिले होते, सारे काही समजून घेतले होते आणि मलाही घडले त्याचा दोष लागत होता. म्हणून मी स्वत:लाच म्हणाले: "जर अलिमाननं पाप केलं असेल, तर ते माझंही पाप आहे, जर ती पोटात मूल वाढवीत असेल तर, ते माझंही मूल असेल. सारी बेइज्जती, साऱ्या अडचणी, साऱ्या यातना मी सोशीन. आज ना उद्या आम्हाला त्याबद्दल बोलावे लागणार हे मला माहीत होते, मग आमच्या खूप काळ गप्प राहण्याबद्दल आम्ही एकमेकींना क्षमा करू. आणि तरीही

आम्ही हे संभाषण आजचे उद्यावर ढकलीत चाललो होतो. पण तो दिवस येणे अटळ होते.

उन्हाळ्याच्या अखेरीस अलिमानला पाचवा किंवा सहावा महिना असावा. मी आमच्या गायीला भल्या सकाळीच कळपाकडे घेऊन चालले होते. त्या दिवशी सकाळी ते लहान गुराख्याचे पोर उत्साहाने नुसते फुलले होते. कळप लौकरच आमच्या फाटकाच्या पुढे गेला. तो पोरगा कळप हाकलीत चालला असताना त्याने माझ्याकडे पाहिले आणि तो तोंड भरून हसला.

"तोल्गोनाई मावशी!" तो म्हणाला, "सुइउंचू! आनंदाची खबर! मी आणलेल्या चांगल्या बातमीबद्दल मला काहीतरी द्या! जोरोबेक आजोबांच्या सुनेला बाळ झालं!"

"खरंच? केव्हा?"

"आज पहाटेला."

"मुलगा का मुलगी?"

"मुलगी झाली. ते तिचं नाव चंडोल ठेवणार आहेत म्हणे, कारण चंडोलासारखी ती पहाटेला जन्मली म्हणून!

"किती छान. चांगलं दीर्घायुष्य लाभो पोरीला. बरी छान बातमी दिलीस बाबा सकाळी सकाळीच."

त्या अनाथ पोराला या जगात दुसरे एक मूल जगात आल्याबद्दल एवढा आनंद झालेला पाहून मी विशेष हेलावले. साऱ्या अंगातून एक आनंदाची लाट उमटून गेली आणि त्याच तंद्रीत मी घरी आले. असा कसा माझ्याकडून अविचार घडला? ज्याचा मी दिवसरात्र विचार करीत होते ती गोष्ट मी त्या क्षणाला पुरती विसरले. फाटकाशी असतानाच मी ओरडले:

"अलिमान! तू एक खूषखबर ऐकलीस का? जोरोबेकच्या सुनेला मुलगी झाली. ऐकलंस का? बिचारीला बाळंतपणात फार त्रास झाला. बरं झालं देवा लौकर सुटका झाली..." आणि वाक्याच्या मध्येच एकदम मी थांबले. जणू बोलता बोलता एकदम दाताखाली माझी जीभ सापडावी तशी मी थांबले.

अलिमान जमिनीवर नजर खिळवून ओठ दाताखाली गच्च आवळून तेथे गप्प उभी होती. तिने ओठ एवढे आवळले होते की, ते पांढरेफटक पडले होते. त्या क्षणी ती कसला विचार करीत होती? जेव्हा तिला मूल होईल तेव्हा घराघरातून ही बातमी आनंदाने सांगत कुणी फिरणार नाही असा विचार कदाचित तिच्या मनात आला असावा. माझ्या वेंधळेपणाची मला विलक्षण लाज वाटत होती. तिच्याकडे पाहण्याचा मला धीर होईना. मी मुकाट शेकोटीमध्ये गरज नसताना लाकडे सारीत बसले. मी मागे वळून पाहिले तेव्हा अजूनही अलिमान भिंतीशी उभी होती व तिची नजर जमिनीवर खिळलेली होती. तिच्याबद्दल अंतःकरणात दयेची एक कळ उमटली. मी स्वतःच उठून तिच्याजवळ गेले.

"काय झालं? तुला बरं वाटत नाही का?"

"नाही अम्मी."

"काम करणं कठीण जात असेल तर घरी राहून थोडी विश्रांती का घेत नाहीस?"

"नाही. कामाचं काही विशेष नाही. तंबाखूची पानं बांधण्यात कसले कष्ट आलेत?" बाहेर जाता जाता ती म्हणाली.

आता गोष्टी दूर ठेवण्यात अर्थ नाही असा मी निर्णय घेतला. लाज वाटण्यासारखे काहीही घडले नाही, सगळी नव्याने जन्मलेली मुले सारखीच असतात आणि तिचे मूल ते माझेही मूल असेल असे तिला सांगून टाकायचे मी ठरवले. माझ्या स्वतःच्या मुलांसारखीच तिच्या मुलाची मी काळजी घेईन, हे तिला समजावे अशी माझी इच्छा होती. तिने मान खाली घालून फिरावे असे मला वाटत नव्हते. तिने अभिमान धरावा, धीट नजरेने लोकांकडे पहावे, कारण आई व्हायचा तिला पूर्ण हक्क होता असे मला वाटत होते.

मी तिच्यामागे हाका मारीत ओरडत धावत असताना माझ्या डोक्यात हे विचार येत होते.

"अलिमान! एक मिनिट थांब! मला तुझ्याशी बोलायचंय! थांब!" मी ओरडत होते.

तिने न ऐकल्याचा बहाणा केला आणि ती पुढे चालतच राहिली. मागे वळून तिने पाहिले नाही.

सारा दिवस मी मनाशी झुरमुरत राहिले. मनात विचार येत होते: "हे असेच चालत राहणे शक्य नाही. आज रात्री मी तिला नक्की सांगून टाकीन. ते आम्हा दोघींनाही पुढे सोपे जाईल." पण तसे घडायचे नव्हते. मी त्या संध्याकाळी कामावरून घरी आले तेव्हा अलिमान तेथे नव्हती. मी थोडा वेळ वाट पाहिली आणि काळजी करू लागले. काय घडले असावे? इतका वेळपर्यंत ती कुठे होती? मी तिला पहायला म्हणून बाहेर आले तो बेक्ताश नजरेला पडला. फाटक उघडताना तो काहीच बोलला नाही. तो गवताची भली मोठी पेंढी उचलून आणीत होता. प्रथम त्याने गायीच्या

समोरील पन्हळीत तो भारा टाकला आणि मग अगदी हळू आवाजात तो म्हणाला :

"तोल्गोनाई मावशी, अलिमान म्हणाली की तुम्ही तिला शोधू नका. काईंदीला आपल्या घरी परत जातेय असं ती म्हणाली."

माझ्या पायातली जणू शक्तीच नाहीशी झाली आणि मी उंबऱ्यावर बसकण घातली.

"कधी गेली ती?"

"दुपारच्या जेवणानंतर. दोन तासापूर्वी. रस्त्यावरून जाणाऱ्या एका लॉरीतून ती गेली."

मला अगदी चुरमडून गेल्यासारखे झाले. अंत:करणात कमालीचे दाटून आले, मी विलक्षण निराश झाले. जणू काही माझी मरणघटिका जवळ आल्याचा मला भास झाला. बेक्ताश माझे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होता.

"काळजी करू नको तोल्गोनाई मावशी. ड्रायव्हरनं तिला पुढं बसवलंय. लॉरीच्या पुढच्या भागात आत छान असतं."

"अरे बेक्ताश, बेटा तेवढंच असतं तर गोष्ट वेगळी होती!" मी मनाशी म्हटले. पण तरीही त्याच्या भाबड्या सांत्वनाबद्दल मी कृतज्ञ होते. एव्हांना तो चांगला उंचापुरा मुलगा झाला होता आणि गाडीवान म्हणून काम करीत होता. मी त्याच्याकडे नजर टाकली तेव्हा त्याची उंची आणि रुंद खांदे बघून मीच स्वत:शी नवल करीत राहिले. त्याच्या चालीत आणि आवाजात मर्दानीपणा आला होता. त्याचा चेहरा शांत आणि प्रेमळ होता. तो लहान असताना मला

खूप आवडायचा आणि आता अशा संकटाच्या वेळी तो माझ्या मदतीला आल्याचा मला आनंद झाला. बेक्ताशने विहीरीतून थोडे पाणी आणले, समोवार पेटवला, अंगणात पाणी शिंपडले आणि तो झाडू लागला.

"तोल्गोनाई मावशी, तुम्ही बसून थोडी विश्रांती घ्या," तो म्हणाला. "सफरचंदाच्या झाडाखाली मी सतरंजी अंथरतो. आई आत्ता येईल. ती म्हणाली की, खूप दिवसात तुमच्या-कडचा चहा प्यायला मिळाला नाही. आत्ता येईल ती."

अलिमान घर सोडून गेल्यानंतर दिवस रेटता रेटेनात. या जगात मी एकटी आहे असा विचार कधी केला होता? खरा एकटेपणा कसा असतो ते मला आजवर माहीतच नव्हते. तीन दिवस मी कसाबसा दम धरला. पुढे मात्र माझ्याने राहवेना. माझ्या घराला घरपण राहिले नाही नि जगण्यात काही अर्थच वाटेना. आपणही असेच कुठेतरी भरकटत निघून जावे असे खूप वाटू लागले. जेव्हा जेव्हा अलिमानचा विचार मनात येई आणि तिचे तिथे कसे चालले असेल याचा विचार येई तेव्हा तेव्हा मनाची स्थिती अधिकच वाईट होत असे. काईंदीमधल्या तिच्या घरच्यांनी तिचे नीट स्वागत केले असेल तर ठीक. पण जर ते तिला टोचून बोलत असतील तर? आम्ही भेटायला आलो तेव्हा तू आमचा एक शब्द ऐकायला तयार नव्हतीस आणि आम्ही तुझ्या बाबतीत नाक खुपसायचे कारण नाही असे म्हणाली होतीस, याची त्यांनी तिला आठवण करून टोचले असेल तर? तुझी तू सारे निस्तरायला समर्थ आहेस असे तुला वाटले होते आणि आता कशी नाक घाशीत आमच्याकडे आलीस? आता कशी एकदम तुला

आमची गरज भासली, असे त्यांनी विचारले तर? अशा प्रकारे ते तिला बोलतील का? होय, तसे बोलण्याची शक्यता होती. आणि तसे ते बोलले तर ती कशी वागेल? ती फार मानी आहे, अशी मानहानी ती कशी सहन करील? न जाणो, स्वतःच्या जीवाचे ती काही बरेवाईट करून घेईल तर? अलिमान, अगं अलिमान, तू जर इथे माझ्याजवळ असतीस तर सारी बेइज्जती मी स्वतःच्या शिरावर घेतली असती आणि कुणालाही तुझा अपमान करू दिला नसता. मी खूप विचार केला आणि अशा निर्णयाला आले की, "नाही, हे असे चालणार नाही. मी तिथे जाऊन माझ्या डोळ्यांनी सारी परिस्थिती पाहीन. मी तिला घरी परत चलण्याचा आग्रह करीन, तिचे मन वळवायला बघीन. कदाचित ती माझे ऐकेल. ती परत आली तर किती छान होईल! पण जर तिला नको असेल परत यायला, तर मात्र मी काहीच करू शकणार नाही. मी तिला आशीर्वाद देईन आणि एकटी परतेन." मी मनाशी असा निर्णय घेतला आणि दुसऱ्याच दिवशी निघाले. आयेषा घराकडे आणि गायीकडे लक्ष देणार होती. बेक्ताशने एक लॉरी थांबवली, मी मागे चढून बसले आणि काईदीला निघाले.

खेडे मागे टाकून आम्ही खाचखळग्यांच्या रस्त्याने निघालो होतो. एवढ्यात शेतातल्या खुंटांमधल्या पायवाटेने एक बाई येताना नजरेला पडली. मी तिला ताबडतोब ओळखले — ती अलिमान होती! माझी लाडकी, माझी लाघवी अलिमान, माझ्यासाठी घरी परत येत होती! मी लॉरीच्या टपावर ठोकून ओरडले: "थांबा! थांबा!" लॉरी भरवेगात असल्याने

पटकन थांबू शकली नाही. ती थांबताच मी ओटंगून बाजूने बॅगेसकट खाली उतरले. लॉरीच्या चाकांमुळे धुळीचे लोट उठले होते आणि आसमंत अंधुक बनला होता. मी माझ्या अलिमानलाच पाहिले किंवा नाही याचा मला क्षणभर संभ्रम पडला. जेव्हा ट्रकमागची धूळ खाली बसली तेव्हा मी तिला पुन्हा पाहिले.

"अलिमा ऽऽऽ न!" मी अगदी बेंबीच्या देठापासून हाक मारली.

मी तिच्यापर्यंत कशी पोचले ते मला आठवत नाही. आम्ही एकमेकींना मिठी मारून पटापटा मुके घेतले आणि खूप रडलो एवढेच आठवते. आम्हा दोघींना एकमेकींचा विरह एवढा असह्य झाला होता की, त्या दिवसांमध्ये आमच्या मनात काय घालमेल झाली होती ती व्यक्त करायला आम्हाला शब्द सापडेनात. मी अलिमानच्या चेहऱ्यावरून हात फिरवीत पुन्हा पुन्हा बोलत राहिले:

"तू परत आलीस, माझ्या सोनुली, तू परत आलीस. तू तुझ्या आईकडं परत आलीस!"

"होय, मी परत आले! अम्मी, मी तुमच्याकडं परत आलेय!" ती उत्तरली.

आम्ही एकमेकींना अशी घट्ट मिठी घालून उभ्या असताना तिच्या पोटातल्या बाळाने एकाएकी हालचाल केली आणि दोनदा पाय झाडले! आम्हा दोघींनाही त्याच्या हालचाली जाणवल्या. अलिमानने पोटावर हात दाबून धरले व हळुवारपणे त्यावरून हात फिरवायला सुरुवात केली. तिच्या डोळ्यातल्या त्या वेळच्या भावांनी माझे पुरते आयुष्य जणू

बदलून गेल्यासारखे झाले. तिच्याबद्दल असे भयानक विचार माझ्या मनात आले तरी कसे? पवित्र मातृत्व! एवढ्या आनंदाच्या एका थेंबासाठी दु:खाचा सागर पार करायला सांगितला तरी चालेल. मी तिच्या गालांना तोंड भिडवले आणि मनमोकळेपणाने रडले.

"माझी लाडकी मुलगी! किती मी तुझी काळजी करीत बसले!"

"अम्मी, रडू नका," ती म्हणाली. "माझ्या मूर्ख वागण्याबद्दल मला क्षमा करा. मी तुम्हाला कधीही सोडू शकणार नाही. मी प्रयत्न केला, पण त्यातून काही निर्माण झालं नाही. मला घराची सारखी आठवण येत राहिली."

सारे काही मोकळेपणाने बोलून टाकायची हीच वेळ आहे याची मला जाणीव झाली.

"का तू निघून गेलीस? माझ्यावर रागावली होतीस?"

ती गप्प राहून स्वत:चे उत्तर जणू जोखून पहात होती. अखेरीस उसासा टाकून ती म्हणाली:

"अम्मी, त्याबद्दल मला विचारू नका. काय करायचं तुम्हाला जाणून? तुम्ही काही बोलू नका आणि मीही काही बोलत नाही. मला छळू नका अम्मी, भोगते आहे तेवढीच शिक्षा पुरेशी आहे."

पुन्हा एकदा ती दूर पळाली होती. हे नेहमी असेच होत होते. असे करून ती स्वत:चेच नुकसान करीत आहे हे तिला कसे समजत नव्हते?

त्या वर्षी शरद ऋतू खूप लांबला आणि सतत पाऊस पडत राहिला पाऊस नाही असा एक दिवस जात नव्हता.

त्या कंटाळवाण्या लांबलचक पावसाळी दिवसात आम्ही बहुतेक वेळ घरातच बसून होतो. त्या वाईट हवेसारखीच अलिमानची अवस्था वाईट होती. ती अधिक अधिक अबोल आणि दु:खी बनली, बोलायचे आणि हसायचे तिने जवळ जवळ टाकलेच. सतत ती आपल्या मूक विचारांमध्ये गुरफटलेली असायची. ती तिच्या गरोदरपणाच्या अखेरच्या दिवसात आहे हे मला जाणवले. मी तिला बाष्कळ बडबडून किंवा चुचकारून कितीही आनंदी करायचे प्रयत्न केले, तरी ते सारे व्यर्थ ठरले. एखाद्या गोड पाप्याने साऱ्या चिंता भुर्रदिशी उडवून द्यायला ती काही कुक्कुले बाळ नव्हती. तिच्या संकटकाळात इतरांनीही तिला मदत करायचे प्रयत्न केले, पण शेवटी आम्ही काय करणार? एके दिवशी बेक्ताश थोडा कडबा घेऊन आला आणि म्हणाला की, त्याच्या आईने परत अंथरूण धरलेय. मी तिला भेटायला गेले. आयेषाच्या अंगात ताप होता आणि तिला जबरदस्त खोकला झाला होता.

"ही सारी तुझी चूक," मी कडाडले. "तुझी तुला काळजी घ्यायला पाहिजे हे तुला माहीत आहे. तर उलट तू अशा हवेत भटकायला गेलीस."

अपराधी चेहऱ्याने ती हसली. आपल्या बाजूने तिला काहीच बोलण्यासारखे नव्हते, कारण अलिकडेच ती आणि तीन बायका शेजारच्या खेड्यात बेक्ताशच्या गाडीतून एका लग्नाला जाऊन आल्या होत्या. मी निरोप घेऊन जायला निघाले तेव्हा आयेषाने मला हाक मारली.

"तोल्गोनाई, जरा थांब. तुला काही सांगायचं आहे. तू रागावणार नाहीस असं वाटतं."

“ बोल , काय सांगायचंय ? ” दारापासून मागे वळत मी म्हणाले.

“आम्ही कुठल्याही लग्नाला गेलो नव्हतो. त्या खेड्यात माझे कुणीही नातेवाईक नाहीत आणि हे तुला माहीत आहे. तुझी परवानगी न घेताच आम्ही काही करायचं ठरवलं होतं. तोल्गोनाई, त्याबद्दल आम्हाला माफ कर, पण जे जास्तीत जास्त चांगलं करण्यासारखं होतं ते करायचा आम्ही प्रयत्न केला. आम्ही त्या माणसाला, त्या मेंढपाळाला शोधून काढला आणि चारी बाजूंनी त्याला घेरला. आता कुठल्याही दिवशी अलिमान बाळंत होईल आणि तू त्यानंतर कधीही गावात तोंड दाखवलं नाहीस, असं म्हणून आम्ही त्याची हजेरी घेतली. ही वागण्याची रीत नव्हे असंही आम्ही त्याला बजावलं. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. पहिली गोष्ट म्हणजे त्याचं लग्न झालेलं आहे असं आम्हाला आढळून आलं आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्याला आपल्या केल्या कर्माची अजीबात चाड नाही. तो आमचं बोलणं धड ऐकून घ्यायला तयार नव्हता. आम्ही कशाबद्दल बोलतो आहोत तेच आपल्याला समजत नाही असं म्हणून त्यानं प्रथम कानावर हात ठेवले. मग त्याच्या बायकोला हा सारा गोंधळ उमजला. पण ती भलतीच आक्रस्ताळी बाई निघाली. तिने खूप आरडाओरडा केला. तिनं आमची कशी शोभा केली आणि आम्हाला हाकलून लावलं ते मी तुला सांगू शकत नाही. परत येताना वाटेत आम्ही पावसात सापडलो आणि चिंब भिजलो. मला थंडी ही अशी बाधली. पण हे महत्त्वाचं नाही. आपण अलिमानबाबत काय करू शकतो?” येणारा हुंदका दाबण्यासाठी आयेषाने आपल्या तोंडाव हारताची मूठ दाबली.

"रडू नको आयेषा," मी म्हणाले. "जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत तिची सारी काळजी वाहीन." आणि मी तिथून निघून गेले. आणखी मी काय बोलणार?

पुढचे दिवस अधिक कठीण गेले. अलिमानचे दिवस भरत आले होते आणि मी तिला क्षणभरही नजरेआड होऊ देत नव्हते. जरा कुठे ती बाहेर अंगणात गेली की, लगोलग मी तिच्या मागे धावायची. मी तिला एकटीला अजीबात सोडायची नाही. तिची प्रसूतीची वेळ येईल तेव्हा मदतीला मी जवळ नसेन अशी मला सारखी भीती वाटत रहायची. एरवी मी तिचा असा पिच्छा पुरवला असता का?

एके दिवशी ती कपडे करून तयार झाली व तिने अंगावर शाल घेतली.

"कुठं निघालीस बाळ?"

"नदीवर चाललेय," ती म्हणाली.

"तुझ्याजागी मी असते तर आत्ता गेले नसते. अशी वाईट हवा असताना कशासाठी तू तिकडं निघाली आहेस? त्यापेक्षा निवांत घरी बैस."

"नाही, मी जाणार."

"ठीक आहे तर, मग मीही येते. मी तुला एकटीला जाऊ देणार नाही."

तिच्या अंतःकरणात जे काही खदखदत होते ते सारे एकदम तिच्या नजरेत उसळून आले. माझ्याकडे त्या चमत्कारिक नजरेने पहात ती खेकसली:

"एवढे कशाला माझे लाड करता? काय हवंय तुम्हाला? सावलीसारख्या साऱ्या दिवसभर माझ्या मागं मागं कशाला फिरता? राहू दे मला एकटीला! मी मरून जाईन किंवा

आणखी काही घडेल असं तुम्हाला वाटतं का? तशी नका चिंता करू. माझं तसं काही होणार नाही!" तिने धाडकन दार आपटले आणि ती निघून गेली.

तं दार जणू तिने माझ्या काळजावर आपटले होते. मी कमालीची दुखावले. तरीही मला घरात बसवेना आणि बाहेर तिच्या पाठोपाट निघाले. ती नजरेच्या टप्प्यात कुठेच दिसत नव्हती. कदाचित पाणथळ कुरणाकडे गेली असावी.

झिमझिम पाऊस पडत होता. राखी रंगाच्या ढगांचे धागे वारा पिंजून काढीत होता. फळबाग भकास दिसत होती, तिच्यातली झाडे उघडी-नागडी थंडगार उभी होती, त्यांच्या फांद्या काळपटल्या होत्या व ओल्याचिंब भिजल्या होत्या. या अशा दिवशी प्रत्येकजण आपापल्या घरात होता. सबंध रस्ता निर्मनुष्य होता. त्या धुंदकारल्या वातावरणात काळ्या डोंगरांचे कडे मला स्पष्ट दिसत नव्हते.

थोडी वाट पाहून मी तिच्या पाठोपाठ निघाले. ती कितीही रागावली तरी त्याची मला पर्वा नव्हती. प्रसूतीच्या वेणा देत ती ओल्या जमिनीवर पडून राहिली असती तर ते त्याहून भयंकर होते. बागेच्या मागच्या रस्त्यापर्यंत मी चालत गेले तोच अलिमान नजरेला पडली. ती अगदी हळू-हळू, पावले फरपटत, नजर जमिनीवर खाली खिळवून परत येत होती. मी घाईने घरी धावले, पाण्याची किटली चुलीवर ठेवली आणि अंडी, साय व पीठ एकत्र खलवून धिरडी केली. मग स्वच्छ कापड जाजमावर अंथरले आणि उत्तम हिवाळी सफरचंदे आणली. अलिमान आत आली आणि तिने जेव्हा ते कापड पाहिले तेव्हा ती खिन्नपणे माझ्याकडे पाहून हसली.

“बेटा, तुला थंडी वाजतेय का? ये आणि थोडा गरम चहा पी नि धिरडं खा,” मी म्हणाले.

“नको, मला काही खावंसंच वाटत नाही अम्मी. पण एक सफरचंद द्या मला.”

“तुला कशाचा तरी त्रास होतोय का अलिमान? तसं असेल तर सांग ना मला.”

पण तिने एवढेच उत्तर दिले:

“विचारू नका अम्मी. मला काय झालंय ते माझं मलाच समजत नाही. माझा मलाच तिरस्कार वाटतो. आणि तुमच्यावर असं खेकसायचा खरं म्हणजे मला काहीही अधिकार नाही. पण मला कृपा करून एकटीला शांतपणं राहू द्या.” तिने एक मोठा उसासा टाकला.

रात्र झाली. झोपायच्या तयारीत असताना माझ्या मनात खिन्न विचार येत होते की, यापुढे मी काहीही अलिमानला म्हणाले, तरी ती त्यात काहीतरी दोष शोधत बसणार. या दु:खाच्या टोचणीची भावना घेऊनच मी झोपी गेले. सर्वसाधारणपणे मी रात्रीची अनेकवेळा अलिमान कशी आहे ते पहायला जागी व्हायची, पण यावेळी मात्र एखाद्या मुडद्यासारखी ठार झोप मला लागली. काय घडणार हे माहीत असते तर मी डोळे तरी मिटले असते का? अशा वेळी ओळीने दहा रात्रीसुद्धा मी डोळ्याला डोळा लावला नसता.

मी एकाएकी का जागी झाले आणि केव्हा जाग आली ते मला आठवत नाही. पण भोवती पाहिले तर अलिमान दिसेना. मला अजून झोपेची अर्धवट गुंगी होती आणि काय झाले आहे ते चटकन लक्षात येत नव्हते. प्रथम मला वाटले

की, ती थोडी बाहेर गेली असावी. मी वाट पाहिली. पण कसलाच आवाज ऐकू येत नव्हता. मग मी तिच्या बिछान्याजवळ जाऊन त्याला हात लावून पाहिला. तो गार होता. माझे काळीज गोठले. याचा अर्थ तिला जाऊन बराच वेळ झाला होता! मी गडबडीने काही कपडे अंगात चढवले आणि वेगाने घराबाहेर पडले. मी सारे अंगण धुंडाळले, बागेत गेले आणि रस्त्यावर जाऊनही पाहिले. मग मी हाका मारायचा सपाटा लावला: "अलिमान! अलिमा ऽऽ न!" पण तिचे उत्तर आले नाही. शेजारच्या घरांच्या आवारांमधील कुत्र्यांच्या भुंकण्याने मी दचकले. माझ्या डोळ्यांपुढे अंधारी आली. ती निघून गेली! अशा काळोख्या रात्री ती कुठे बरे गेली असावी? मला काय करायला हवे होते? कदाचित अजून मी तिला गाठले असते. मी परत घरात धावले, कंदील पेटवला आणि तिच्या शोधाला बाहेर पडले. मी उंबरा ओलांडला आणि कोठीतून कण्हण्याचा व रडण्याचा आवाज ऐकू आल्यासारखा वाटला. मी घाईने अंगण ओलांडले, कोठीचे दार सताड उघडे टाकले आणि स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास न बसून मी कंदील जवळ जवळ हातातून खाली टाकला: अलिमान तिथे गवतावर पसरली होती. तिला प्रसूतीच्या कळा येत होत्या आणि ती कमालीची तळमळत होती.

"का? का सांगितलं नाहीस मला?" मी तिच्याकडे धावत जाताना ओरडले.

तिला मदत करायची माझी इच्छा होती. मी तिला उठवायचा प्रयत्न करताना रक्ताने भिजलेला तिचा पोषाख माझ्या हातावर सपकन बसला तेव्हा माझे काळीज एकदम

लकाकले. अलिमान तापाने फणफणत होती. मोठ्या कष्टाने ती श्वास घेत होती.

"मी मरतेय, मी मरतेय." ती विव्हळत होती.

ती बराच वेळ तिथे वेदनेने तळमळत पडली होती.

"देवा, तिचं रक्षण कर! तिला वाचव!" तिची प्रसूती डॉक्टरच्या मदतीशिवाय सुरळीत पार पडणार नाही हे माझ्या लक्षात येताच मी देवाची प्रार्थना करू लागले.

मी धावत आयेषाच्या खिडकीशी गेले आणि साऱ्या शक्तीनिशी खिडकीवर ठोमे मारीत ओरडले:

"लौकर! लौकर उठ बेक्ताश! गाडीला घोडे जुंप! अलिमानचं जास्ती झालंय! लौकर चल बाळा, तिची तब्येत फार बिघडलीय!"

मी त्यांना जागे केले, परत अलिमानकडे पळत गेले आणि तिला थोडे पाणी दिले. कपाच्या काठावर तिचे दात कडाकडा आपटत होते. पाणी ती प्याली न प्याली तोच पुन्हा तिने कण्हायला व तळमळायला सुरुवात केली. आजारी आयेषा नशीब अंथरुण सोडून धापा टाकीत आली. तिने अलिमानची ती अवस्था पाहताच तिचा धीर सुटला व ती विव्हळू लागली:

"बेटी अलिमान, झालं तरी काय? माझ्या पोरी, घाबरू नको ऽऽ! आम्ही तुला इस्पितळात आत्ता नेतो!"

सुदैवाने त्या दिवशी बेक्ताश उशिरा घरी आला होता आणि त्याने घोडे तबेल्यात नेले नव्हते. ते अजून अंगणातल्या आडोशालाच बांधलेले होते. ताबडतोब त्याची गाडी कोठीघराजवळ येऊन थडकली. आम्ही काही गवत गाडीत पसरले, मग आमची कांबळी आणि उशा त्यावर अंथरल्या

आणि तिघानी मिळून अलिमानला कसेबसे कोठीघरातून बाहेर काढून गाडीत आणून निजवले. आम्ही तावडतोब इस्पितळाकडे निघालो.

शरदातल्या दिवसातला तो चिखलाचा रस्ता, ती भयाण शापित काळरात्र... त्या दिवसात फक्त झारेच्येमध्ये इस्पितळ होते आणि नदीवरचा पूल फार लांबच्या रस्त्याला होता.

खेडयाची सीमा आम्ही ओलांडली असेल नसेल तोच अलिमानच्या वेणा परत चालू झाल्या. ती ओरडू लागली आणि अंगावरची पांघरूणे फेकू लागली. मी माझ्या मांडीवर तिचे डोके घेतले व तिचे अंग झाकायचा प्रयत्न केला. तिच्या तोंडावर कंदीलाचा उजेड धरून तिच्या डोळयात पहात मी तिला धीर देऊ लागले. बेक्ताशही तिला धीर देऊ लागला.

"जरा कळ काढ अलिमान," तो म्हणाला. "आपण लौकरच पोचू तिथं. तू बघशील आपण किती लौकर पोचतो ते! आपण आता पुलाजवळ आलोय बघ."

पण पूल अजून खूप लांब होता. अलिमानला खूप हादरे बसतील म्हणून घोडयांना चाबूक हाणून बेक्ताशला गाडीही जोरात पिटाळता येत नव्हती. तेवढयात मुसळधार पाऊस पडू लागला. जणू प्रत्येक गोष्ट आमच्या विरोधी होती: रात्रीचा काळोख, हुडहुडी भरवणारा पाऊस, चिखल, रस्त्यावरचे खळगे आणि उंचवटे अशा सर्व गोष्टी विरोधाला समोर ठाकल्या होत्या. अलिमान कळांमुळे थरथर कापत होती, कण्हत होती, किंचाळत होती आणि एकाएकी ती गप्प झाली व तिचा श्वास जड होऊ लागला.

"अलिमान! अलिमान! काय झालं?" मी चटकन सावध होऊन तिला विळखा घालीत कंदील उचलून म्हटले. तिचे जळजळते डोळे माझ्याकडे एकटक रोखून पहात होते.

"थांबा! मी मरतेय! थांबा!" आपल्या काळवंडलेल्या, सुकलेल्या ओठांमधून मोठ्या कष्टाने तिने हे शब्द उच्चारले. श्वास घेण्यासाठी ती पुन्हा धाप टाकू लागली.

आम्ही गाडी थांबवली.

"माझं डोकं आणखी वर उचला," ती म्हणाली. "मला श्वास घेता येत नाहीय." आणि ती रडू लागली. घाईघाईने तिने आपले रडू आवरले व ती बोलू लागली: "अम्मी, माझ्या लाडक्या अम्मी... माझ्या आत सारं काही जळतंय. माझ्यात आता ताकद उरली नाही... मी मरतेय... माझ्यासाठी जे काही केलंत त्याची मी उतराई आहे. मला क्षमा करा... कासीम जर जिवंत असता... आई ग ऽऽ कासीम, मी मरतेय... मला माफ कर..."

मी तिला समजावू लागले:

"नाही बेटा, तू मरणार नाहीस. थोडी आणखी कळ काढ. आपण पुलाच्या अगदी जवळ आलोय. ऐकतेस का मी काय बोलते ते? तू मरणार नाहीस!"

वेदनेने ती हैराण झाली होती. दात घट्ट आवळून, शुद्ध हरपता हरपता ती बाळाला जन्म देण्यासाठी शेवटचा प्रयत्न करीत होती.

"बेक्ताश!" मी हुकूम केला, "तिला बगलेत घेऊन वर उचल. लौकर! आणि कृपा करून आता लाजत बसू नको!"

बेक्ताशने अलिमानला वर उचलले आणि मी बाळाला

बाहेर यायला मदत करण्याचा प्रयत्न करू लागले. मग बेक्ताश मोठ्याने हुंदके देऊ लागला आणि पुन्हा एकदा फौजी आगगाडीचा आवाज मला ऐकू आल्याचा भास झाला. कानात चाकांचा खडखडाट घुमू लागला: वाऱ्याबरोबर आरोळी ऐकू आली: "अम्मी ऽऽऽ! अलिमा ऽऽ न!" आणि या क्षणात नव्याने जन्माला आलेल्या बाळाने पहिला टाहो फोडला. हाय रे आयुष्या, तू एवढे दुष्ट का? एवढे आंधळे का? मूल जन्मले पण अलिमान मरणाच्या वाटेवर होती. ते छोटे नागडे शरीर मी माझ्या परकरात कसेबसे गुंडाळले असेल आणि अलिमानकडे पाहते तो ती बेक्ताशच्या हातांवर निर्जीवपणे लोंबकळत होती. तिची मान बाजूला कलंडली होती व हात लोंबकळत होते.

"अलिमान!" घुसमटलेल्या आवाजात मी ओरडले आणि तिचे मनगट पकडले. मला नाडी सापडेना.

एका क्षणात जीवन-मृत्यूची एकमेकांशी टक्कर होऊन गेली होती.

आम्ही परतलो तेव्हा जवळजवळ पहाट झाली होती. पहाटेच्या धूसर प्रकाशात बर्फाचे भलेमोठे पांढरे पुंजके भिरभिरत येताना दिसत होते. ते अलगद जमिनीवर कोसळत होते. सारे काही शांत शांत होते. कसलाही आवाज ऐकू येत नव्हता. साऱ्या जगावर एक पांढरी शांतता पसरली होती. या शुभ्र शांततेत दमलेले घोडे मुकाटपणे वाटचाल करीत होते. त्यांच्या आयाळी पांढऱ्या झाल्या होत्या, त्यांच्या शेपट्या पांढऱ्या झाल्या होत्या. बेक्ताश गाडीत मूकपणाने रडत होता. तो घोड्यांना हाकलत नव्हताच, घोडे स्वतःच घराची वाट

चालत होते. तो सबंध रस्ताभर रडत होता. मी गाडीच्या बाजूने त्या बाळाला जाकीटाखाली स्तनाशी धरून चालले होते आणि जमिनीवरचा पांढरा बर्फ मला काळा भासत होता.

१६

लढाईने आपणहून स्वतःची आठवण मला करून देण्याची ही शेवटची वेळ. त्या सकाळी मी चाललेला रस्ता ही माझ्या आयुष्यातली सर्वांत कठीण वाट होती. असे जगत राहण्यापेक्षा मरण बरे असे मला वाटत होते. पण माझ्या ऊबेने चळवळ करणारे ते बाळ, तो मऊ गोळा सतत रडत होता. त्याला घेऊन चालताना मी त्याच्याशी बोलत होते: "किती दुर्दैवी आहेस तू! तुझा पहिला टाहो तुझ्या आईचा अखेरचा निरोप घेणारा ठरला!" मग कुठून तरी दूरवरून एक विचार आला: "पण आयुष्य पूर्णपणं संपलं नाही, एक बारिक कोंब उरलाय." मग दुसऱ्या विचाराने त्याची जागा घेतली: "आपल्या आईच्या दुधाची चवही त्यानं घेतली नाही, तर तो कसा जगेल? नाही, तो फार काळ जगायचा नाही." त्या बाळाने जगावे असे मला फार फार वाटत होते. म्हणून मी देवाची करूणा भाकली: "निदान याला तरी जगू दे! त्याला मरू देऊ नको. कदाचित हा वाचेल. कदाचित तो त्यातून सहीसलामत राहील." मी अशी भावनांच्या हिंदोळ्यात वाटचाल करीत होते. एकदा आशा वाटायची, पुन्हा निराशा घेरायची. आम्ही खेड्यात पोचलो तेव्हा सकाळ झाली होती हे लक्षातच आले नाही.

अजूनही जोरात बर्फ पडत होते आणि सारा आसमंत पांढराशुभ्र व शांत होता. या भयाण शांततेत त्या ओसाड रस्त्यावरील अर्धवट घरे अधिकच भेसूर वाटत होती. सात वर्षांपूर्वी येथे सुरू झालेल्या कामाचा आता मागमूसही राहिला नव्हता. त्या निर्जीव रस्त्याभोवती बर्फाने कडे केले होते. घरांचे अवशेष आणि बर्फाने वाहून आलेली सुकी खाजकुयली व रानगवताचे ढीग यांच्यामधली मोकळी जागा त्याने भरून काढली होती. एकेकाळी जेथे अलिमान आणि कासीमचे घर उभे राहणार होते, जेथे त्यांची स्वप्ने फुलणार होती तेथे आता फक्त दगडविटांचा एक ढिगारा उभा होता.

कायमची शांत झालेली अलिमान आता फिकट दिसत होती, तिचे डोळे मिटलेले होते. गाडीच्या हालचालीबरोबर तिचे डोके लडबडत होते आणि तिच्या तोंडावर पडणारा बर्फ वितळत नव्हता.

पहिल्या घरांपाशी पोचताच बेक्ताशने गाडीतून खाली उडी टाकली आणि आपल्या पुरुषी घोगऱ्या आवाजात मोठमोठ्याने रडत रडत तो लोकांना मरणाची खबर देऊ लागला. गावकरी आपापल्या घरांमधून धावत बाहेर आले व भरल्या डोळ्यांनी त्यांनी आमच्याभोवती गर्दी केली. आयेषा मोठमोठ्यांदा रडत धावत आली आणि तिने मूल माझ्या हातून घेऊन आपल्या घरात नेले.

अलिमानचे दुसऱ्या दिवशी आम्ही दफन केले. रीतीप्रमाणे बाई स्मशानात जात नाही, पण मी गेले आणि त्याबद्दल कुणीही एका शब्दाने मला बोलले नाही. रीत चालवायला माझ्या घरात पुरुषच राहिला नव्हता. अलिमानला मी स्वतः

पुरले, तिच्या थडग्याच्या तळाशी मी तिला ठेवले आणि पहिली मूठमाती मीच तिच्यावर पसरली. त्या दिवशी बर्फ खूप दाट पडत होता. त्याची अखंड भुरभुर चालू होती आणि मातीच्या लाल उंचवटयाचे बघता बघता पांढऱ्या टेकाडात रूपांतर झाले.

वसंतामध्ये अलिमानच्या कबरीवर मी फुले लावली. तिला फुले खूप आवडायची म्हणून दर वसंतात मी तिथे फुले लावते.

तर असे आयुष्य चालले होते. झानूबोलतच्या आयुष्याच्या पहिल्या दिवसात जोरोबेक आजोबांच्या सुनेने त्याचे पालनपोषण केले. मग मी त्याला बकरीचे दूध देऊ लागले. आमच्या वाटयाचे दु:ख आम्ही भोगले आणि ते बोलून दाखवण्यात काही अर्थ नाही. थोडक्यात सांगायचे तर जगणे त्याच्या नशीबात होते म्हणून तो वाचला. दैवाची मी त्याबद्दल कृतज्ञ आहे. तो आता बारा वर्षांचा आहे. तो लहान असताना ज्या डॉक्टरानी त्याची काळजी घेतली ते आता आमच्या भागात फार प्रसिद्ध व्यक्ती झाले आहेत. जेव्हा ते मला भेटतात तेव्हा म्हणतात:

"काय आजी, तुमचा नातू कसा आहे?"

"देवाची कृपा, तो आता छान तरणाबांड होत चाललाय!" मी म्हणते.

माझ्याकडे हसून पाहून ते म्हणतात:

"छान! त्याला चांगला भला माणूस बनवा!"

मला आणि झानूबोलतला ते खूप काळापासून ओळखतात. त्यावेळी झानूबोलत अवघा अठरा महिन्यांचा होता.

तो म्हणजे अगदी काटकुळे बाळ होते. एकदा त्याला थंडी बाधली आणि तो सपाटून आजारी पडला. त्याचे ओठ निळे पडले, त्याचे डोळे उघडेनात आणि जेमतेम श्वास चालला होता. मी त्याला पटकन कपड्यात गुंडाळून इस्पितळात आणले. पुन्हा एकदा ती हिवाळ्यातली मध्यरात्र होती आणि मी नदी ओलांडली. डॉक्टर अगदी तरुण माणूस होता, नुकताच त्याने अभ्यास संपवला असावा. मला गारठ्याने कुडकुडताना चिंब भिजलेली पाहून तो घाबरला.

"वेड्या आहात काय?" त्याने माझी खरडपट्टी काढायला सुरुवात केली. "कुणी तुम्हाला नदी ओलांडायला दिली? याचे आईबाप कुठं आहेत?"

"मुला, मीच त्याची आई आणि मीच त्याचा बाप. त्याला मरू देऊ नको. जर तो मेला तर मलाही मरावे लागेल," मी म्हणाले.

सारी रात्र तो बाळाबरोबर जागत बसला होता, दर दोन तासांनी त्याला इंजेक्शने देत होता. त्याने मला काही कोरडे कपडे आणि कसलेसे औषध दिले, पण सकाळी मी तापाने फणफणत होते आणि रक्त थुंकीत होते. मी तिथे गुंगीत अर्धवट बेशुद्धीत पडले होते. डॉक्टर माझ्या बिछान्याशी आले आणि माझ्या कपाळावर हात ठेवून बोलले तेवढेच मला आठवते :

"आई, धीर सोडू नका. खंबीर रहा. तुमचा नातू आता छान हसतोय नि खेळतोय."

"मग मी नक्की बरी होईन," मी पुटपुटले.

कदाचित माझा नातू वाचला म्हणूनच मी त्या आजारातून उठले असावे.

गेल्या वसंतात एक मोठी गंमतीची गोष्ट घडली. शाळेच्या सुटीच्या दिवसात ज्ञानबोलत इकडेतिकडे उनाडत होता आणि मला समजायच्या आधीच त्याने कासीमची जुनी सायकल बाहेर अंगणात काढली. गेली वीस वर्षे तीच सायकल कोठीघरात भिंतीवर टांगून पडली होती. त्याने ती फरपटत अंगणात आणली व तिची दुरुस्ती तो करू लागला. मी काहीच बोलले नाही. काही झाले तरी तो अजून लहान मुलगा आहे. मला वाटले, थोडा वेळ तो सायकलभोवती घुटमळेल आणि नंतर विसरून जाईल. खरे म्हणजे दुरुस्ती करण्यासारखे काही राहिलेच नव्हते. सारे धातूचे भाग गंजले होते आणि रबरी धावा फुटल्या होत्या. त्याचे मित्र तेथे येऊन त्याची थट्टा करून गेले. ती सायकल म्हणजे एक जुना खटारा आहे अशी त्यांनी त्याची टिंगल केली. पण तो हटवादीपणे त्या सायकलीच्या खनपटीला बसला. बेक्ताशने त्यात लक्ष घातले नसते तर काही त्यातून निर्माण झाले असते असे मला काही वाटत नाही. तो आता जरी एका कुटुंबाचा बाप बनला असला, तरी त्याने लहान मुलाच्या उत्साहाने त्या सायकलची दुरुस्ती हाती घेतली. बेक्ताशचे ज्ञानबोलतवर प्रेम आहे आणि काही गडबड असली तर तो नेहमी शाळेत जाऊन मास्तरांशी बोलतो. आयेषा जिवंत असतानाच त्याने लग्न केले होते. ती अलिमाननंतर तीन वर्षांनी वारली. माझ्या प्रिय मैत्रिणीच्या मरणाचे मला विलक्षण दुःख झाले. आम्ही दोघींनी एकत्र दुःख खूप पाहिले होते. बेक्ताश फार चांगला माणूस बनला

होता. तो बुद्धिमान आणि कष्टाळू आहे. त्याला आता तीन मुले आहेत आणि त्याची बायको गुलसुन फार चांगली शेजारीण आहे. अनेक वर्षे बेक्ताश कंबाईन ऑपरेटरचे काम करतोय.

तर एक दिवस झान्‌बोलत आपली चकचकीत केलेली व तेलपाणी घातलेली सायकल घेऊन दाखल झाला. तो स्वत: मात्र वंगणाने माखला होता.

"आजी," तो म्हणाला, "बघ, बाबांची सायकल आता कशी दिसते ती!"

त्याच्या त्या शब्दांनी माझे हात मात्र एकदम बधिर झाल्यासारखे वाटले. त्या शब्दांनी मला आनंद झाला होता, तसे दु:खही झाले होते. पण त्याला मात्र विलक्षण अभिमान वाटत होता.

"मला ती कशी चालवायची तेसुद्धा माहीत आहे. बघ मला!"

तो नीट सीटवर बसला असता तर त्याचे पॅडलवर पाय पोचत नव्हते, म्हणून तो एका बाजूला कलंडन लटपटत सायकल चालवीत होता. कोणत्याही क्षणी तो पडेल अशी पाहणाऱ्याला भीती वाटत होती.

"अरे उतर बाबा खाली, पडशील!" मी ओरडले.

पण त्यामुळे तो आणखीच जोरात सायकल चालवू लागला. फाटकातून तो रस्त्यावर गेला आणि मी त्याच्यामागे धावले. तो जोरात जात असतानाच अचानक अडखळला आणि सायकलसकट आपटला. त्याला स्वत:ला बरेच लागले. मी धावत त्याच्यापर्यंत गेले, त्याला उठवले आणि त्याची खरडपट्टी काढू लागले.

"काय स्वत:ला ठार मारून घ्यायचंय? आता तेवढंच राहिलंय माझ्यासाठी! पुन्हा त्या सायकलवर कधी मला दिसलास तर खबरदार!"

"आजी, मी पुन्हा नाही पडणार," तो म्हणाला. "मला नुसता प्रयत्न करून बघायचा होता. मी पूर्वी कधीही सायकलवरून पडलो नाही."

मी हसले. नंतर बेक्ताश फाटकाशी उभा असलेला मी पाहिला. कदाचित तो तिथे नुसता सहज उभा राहून पहात असावा. तो काही बोलला नाही आणि मीही काही बोलले नाही. पण आम्ही एकमेकांना समजलो.

लौकरच कापणीचा हंगाम सुरू झाला. एका संध्याकाळी बेक्ताश आला.

"कंबाईनवर मदतनीस म्हणून मला तुमच्या झान्बोलतला घ्यायचं आहे," तो म्हणाला.

"त्याला काम जमेल असं तुला वाटत असेल तर खुशाल घे," मी संमती दिली.

मी त्याला जरी जाण्याची परवानगी दिली होती, तरी तो कसे काय काम करतो ते पाहण्यासाठी दोन दिवसानंतर मी स्वत: बघायला निघाले. काही झाले तरी अजून तो लहान होता आणि कापणीच्या वेळी ते काम कदाचित त्याला जड गेले असते.

माझा झान्बोलत मदतनीस म्हणून काम करीत होता. त्याने मला पाहिले तेव्हा आपण अगदी जगातल्या सर्वात उंच शिखरावर बसल्याच्या थाटात तो ओरडला:

"आज्जी! मी इथं आहे!"

बेक्ताश चाकावर होता. त्याने हात हलवून वाकून मला सलाम केला.

मी ओहोळाच्या काठाशी एका झाडाच्या सावलीत संध्याकाळपर्यंत कापणीचे काम बघत बसले होते. खळ्यावर धान्य झोडपणीसाठी न्यायला फेऱ्या घालताना लॉऱ्या रस्त्यावर धुळीचे लोट उठवीत होत्या.

दिवस मावळल्यावर कंबाईनचे ड्रायव्हर काम करायचे थांबले. झान्‌बोलत दमलेला दिसत होता, पण तो अभिमानाने चालत होता व प्रत्येक बाबतीत बेक्ताशचे अनुकरण करायला बघत होता. पाण्याच्या ओहोळात कमरेपर्यंत अंग धुताना त्याने बेक्ताशची हुबेहूब नक्कल चालवली होती. माझ्या हाती गाठोडे पाहताच तो आनंदाने ओरडला:

"आजी, तू मला सफरचंद आणलीस?"

"होय, आणलीत," मी उत्तरले.

मग तो धावत माझ्याकडे आला, आपल्या हातांचा विळखा त्याने माझ्याभोवती घातला व माझा पापा घेतला.

बेक्ताशने च्यॅक् आवाज केला.

"एवढा कसला भाव खातोयस?" तो म्हणाला. "तू हे काम केव्हाच करायला पाहिजे होतं. ठीक आहे, बैस चिकटून आजीला, नंतर तुला वेळ मिळायचा नाही."

शेतावरच्या वॅगनजवळ आम्ही गवतावर संध्याकाळच्या जेवणाला बसलो. भाकरी गरम आणि ताजी होती. झान्‌बोलतने गरम भाकरीचा तुकडा मोडला.

"आजी, हा घे तुला!" तो म्हणाला.

मी भाकरीला नमस्कार केला आणि पहिल्याच घासाला मला कंबाईन ऑपरेटरच्या हाताचा परिचित वास आला. रॉकेल, लोखंड, कडबा आणि पिकलेल्या धान्याची अशी एकत्रित चव मी चाखीत होते. अगदी पूर्वीप्रमाणेच! घशातल्या आवंढ्याबरोबर मी तो घास गिळला. आणि मनात आले: "भाकरी अमर आहे! कासीम, माझ्या मुला, तू ऐकतोयस का? आणि जीवन अमर आहे, कष्ट अमर आहेत!"

लोक मला घरी जाऊ देईनात. मी त्यांची पाहुणी आहे आणि रात्रभर मी शेतावरच रहावे असा आग्रह त्यांनी चालू केला. माझ्यासाठी गवताचा खास बिछाना त्यांनी तयार केला. त्या रात्री मी आकाशाकडे पाहिले तेव्हा आकाशगंगेच्या पट्ट्यावर ताजें सोनेरी गवत, सांडलेले धान्य व भूस पडल्याचा मला भास झाला. आणि त्या अतिउंच आकाशात, त्या कापणी करणाऱ्याच्या रस्त्यापल्याड, एखाद्या दुरून ऐकू येणाऱ्या गाण्याप्रमाणे, फौजी आगगाडीचा धडधडत जाणारा आवाज दूर जाताना ऐकू येत होता व चाकांचा खडखडाट आता अगदी मंद फिकट ऐकू येत होता. त्या दिवशी नव्या कष्टकऱ्याने त्याची जागा घेतली या जाणीवेला घेऊन मी त्या चाकांची मंद खडखड ऐकीत झोपी गेले. त्याला खूप दीर्घ आयुष्य लाभो, आकाशातल्या ताऱ्यांएवढे त्याला अमाप धान्य लाभो.

मी पहाटे जागी झाले आणि घराची वाट चालू लागले. मला कुणाला उठवायचे नव्हते.

डोंगरावर असा सूर्योदय पाहून फार वर्षे झाली होती. चंडोल पक्षी इतका गोड गाताना कित्येक वर्षांत ऐकला नव्हता.

उजाडत जाणाऱ्या आकाशात तो उंच उंच भरारी घेत होता, एका छोटया राखी ठिपक्याप्रमाणे तो आकाशात एकाच जागी तरंगताना दिसत होता, माणसाच्या काळजासारखी त्याची फडफड चाललेली दिसत होती, साऱ्या स्तेपमध्ये त्याचे गाणे घुमत होते. "बघ! आपला चंडोल गातोय!" सुवानकुल एकदा म्हणाला होता. किती आश्चर्याची गोष्ट, आमचा स्वतःचा चंडोलसुद्धा होता. माझ्या चंडोला, तू सुद्धा अमर आहेस!

१७

"माझ्या परमप्रिय धरणी, पिकांच्या कापणीनंतर तू सध्या विसावते आहेस. कसलेही आवाज ऐकू येत नाहीत, धुळकट रस्त्यांवर लॉऱ्या धुळीचे लोट उठवीत नाहीत, कापणीयंत्रे दृष्टीला पडत नाहीत आणि खुंटामध्ये अजून कळप चरायला सोडलेले नाहीत. तू आपली फळे आम्हाला दिलीस आणि एखाद्या बाईने बाळाला जन्म दिल्यानंतर विश्रांती घ्यावी तशी तू विश्रांती घेत आहेस. शरदातल्या नांगरणीपर्यंत तू विसावशील. आत्ता फक्त आपण दोघी आहोत, तू आणि मी, दुसरे कुणी नाही. माझ्या आयुष्याची संपूर्ण कहाणी तुला माहीत आहे. आज सार्वजनिक आठवणींचा दिवस आहे. सुवानकुल, कासीम, मासेलबेक, जयनाक आणि अलिमान यांच्या आठवणीला आज मी वंदन करते. मी जिवंत असेपर्यंत त्यांची आठवण ठेवीन. एकदा वेळ येईल तेव्हा झानबोलतला सर्व काही सांगीन. जर त्याला मोठं मन आणि मोठं काळीज

माणसं असेल तर तो सारं समजून घेईल. पण इतरांचं काय, जगातल्या इतर सर्व लोकांचं काय? मला त्यांच्याशी बोललं पाहिजे. प्रत्येकाच्या काळजापर्यंत मी कशी पोचणार?

"सूर्या, तू आकाशात तेजाने तळपत रहा, पृथ्वीला प्रदक्षिणा घाल आणि तू त्यांना सांग.

"पावसाच्या मेघा, जगावर चमकदार बरसात कर आणि प्रत्येक पावसाच्या थेंबाबरोबर त्यांना सांग!

"हे धरणी, धरतीमाते, आपल्या वक्षावर तू आम्हा सर्वांना आधार देत आहेस, जगातल्या प्रत्येक कानाकोपऱ्यातल्या माणसांना तू खाऊ घालत आहेस. सांग त्यांना, प्रिय धरणी, सांग त्यांना!"

"नाही तोल्गोनाई. तू सांग त्यांना. तू मानव आहेस. तू सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहेस. तू इतरांपेक्षा अधिक शहाणी आहेस. तू सांग त्यांना!"

१८

"निघालीस तोल्गोनाई?"

"होय अजून जिवंत राहिले तर जरूर परत येईन. हे धरती, तुला अखेरचा दंडवत!"

वाचकांना विनंती

या पुस्तकाबद्दल, त्याच्या भाषांतराबद्दल आणि त्याच्या सजावटीबद्दल आपली मते तसेच, आगामी प्रकाशनाबद्दल आपल्या काही सूचना असल्यास त्या जाणून घेण्यास 'प्रगती प्रकाशना'ला आनंद होईल.

आपल्या सूचना कृपया खालील पत्त्यावर पाठवा.

प्रगती प्रकाशन

२१, झुबोव्स्की बुलवार्द, मॉस्को, सोविएत संघ